# ॥ सुबोध ज्ञानेश्वरी ॥




ज्ञानेश्वरीपाठीं। जो वोवी करील मऱ्हाटी।
तेणें अमृताचे ताटीं। जाण नरोटी ठेविली॥
संत एकनाथ

Ashok Basargekar
1423 North Cleveland Street
Orange, California, 92867 - 3707
Tel. No. (714) 639 - 3996
December 24, 2011

# Contents


**1 Withdrawal of Arjuna at the Battlefield अर्जुनविषादयोग 1**

**2 Geeta Summarized सांख्ययोग 12**

**3 Karma Yoga कर्मयोग 28**

**4 Transcendental Knowledge ज्ञानकर्मसंन्यासयोग 40**

**5 Action in Krishna Consciousness कर्मसंन्यासयोग 50**

**6 Control of Mind and Senses आत्मसंयमयोग 57**

**7 Knowledge of the Absolute ज्ञानविज्ञानयोग 77**

**8 Attaining the Supreme अक्षरब्रह्मयोग 86**

**9 The most confidential Knowledge राजविद्या राजगुह्ययोग 98**

**10 The Opulence of the Absolute विभूतियोग 119**

**11 The Universal Form विश्वरूपदर्शन 134**

**12 Devotional Service भक्तियोग 164**

**13 Body and Consciousness क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग 173**

**14 Three modes of material nature गुणत्रयविभागयोग 216**

**15 Yoga of the Supreme Person पुरुषोत्तमयोग 232**

**16 The Devine and Demonic Natures दैवासुरसंपद्विभागयोग 255**

**17 The Division of Faiths श्रद्धात्रयविभागयोग 273**

**18 The Perfection of Renunciation मोक्षसंन्यासयोग 289**

18.1 Critical Appriciation of Gita गीतामहात्म्य . . . 351

18.2 Final Prayers पसायदान . . . 356

# 1 Withdrawal of Arjuna at the Battlefield अर्जुनविषादयोग

ज्ञानेश्वरी
अध्याय पहिला

---

श्रीगणेशाय नमः।
ॐ नमो जी आद्या। वेदप्रतिपाद्या।
जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा ॥ १॥

देवा तूचि गणेशु। सकलमतिप्रकाशु।
म्हणे निवृत्तिदासु। अवधारिजो जी ॥ २॥

हें शब्दब्रह्म अशेष। तेचि मूर्ति सुवेष।
तेथ वर्णवपु निर्दोष। मिरवत असे ॥ ३॥

स्मृति तेचि अवयव। देखा आंगिकभाव।
तेथ लावण्याची ठेव। अर्थशोभा ॥ ४॥

अष्टादश पुराणें। तींचि मणिभूषणें।
पदपद्धती खेवणें। प्रमेयरत्नांचीं ॥ ५॥

पदबंध नागर। तेंचि रंगाथिलें अंबर।
जेथ साहित्य वाणें सपूर। उजाळाचें ॥ ६॥

देखा काव्यनाटका। जें निर्धारितां सकौतुका।
त्याचि रुणझुणती क्षुद्रघंटिका। अर्थध्वनि ॥ ७॥

नाना प्रमेयांची परी। निपुणपणें पाहतां कुसरी।
दिसती उचित पदें माझारीं। रत्नें भलीं ॥ ८॥

जेथ व्यासादिकांची मती। तेचि मेखळा मिरवती।
चोखाळपणें झळकती। पल्लवसडका ॥ ९॥

देखा षड्दर्शनें म्हणिपती। तेचि भुजांची आकृती।
म्हणऊनि विसंवादें धरिती। आयुधें हातीं ॥ १०॥

तरी तर्कु तोचि फरशु। नीतिभेदु अंकुशु।
वेदान्तु तो महारसु। मोदकु मिरवे ॥ ११॥

एके हाती दंतु। जोस्वभावता खंडितु।
तो बौद्धमतसंकेतु। वार्तिकांचा ॥ १२॥

मग सत्कारवादु। तो पद्मकरु वरदु।
धर्मप्रतिष्ठा तो सिद्धु। अभयहस्तु ॥ १३॥

देखा विवेक तंव सुविमळु। तोचि शुडादंडु सरळु।
जेथ परमानंदु केवळु। महासुखाचा ॥ १४॥

तरी संवादु तोचि दशनु। जो समताशुभ्रवर्णु।
देवो उन्मेषसूक्ष्मेक्षणु। विघ्नराजु ॥ १५॥

मज अवगमलिया दोनी। मीमांसा श्रवणस्थानीं।
बोधमदामृत मुनी। अली सेविती ॥ १६॥

प्रमेयप्रवाल सुप्रभ। द्वैताद्वैत तेचि निकुम्भ।
सरिसे एकवटती इभ। मस्तकावरी ॥ १७॥

उपरि दशोपनिषदें। जियें उदारें ज्ञानमकरंदें।
तियें कुसुमें मुगुटीं सुगंधें। शोभतीं भलीं ॥ १८॥

अकार चरणयुगुल। उकार उदर विशाल।
मकार महामंडल। मस्तकाकारें ॥ १९॥

हे तिन्ही एकवटले। तेथें शब्दब्रह्म कवळलें।
तें मियां श्रीगुरुकृपा नमिलें। आदिबीज ॥ २०॥

आतां अभिनव वाग्विलासिनी। जे चातुर्यार्थकलाकामिनी।
ते शारदा विश्वमोहिनी। नमिली मियां॥ २१॥

मज हृदयीं सद्गुरू। जेणें तारिलों हा संसारपूरू।
म्हणऊनि विशेषें अत्यादरू। विवेकावरी ॥ २२

जैसें डोळ्यां अंजन भेटे। ते वेळीं दृष्टीसी फांटा फुटे।
मग वास पाहिजे तेथ प्रगटे। महानिधी॥ २३॥

कां चिंतामणि आलिया हातीं। सदा विजयवृत्ति मनोरथीं।
तैसा मीं पूर्णकाम श्रीनिवृत्ती। ज्ञानदेवो म्हणे॥ २४॥

म्हणोनि जाणतेने गुरु भजिजे। तेणें कृतकार्य होईजे।
जैसें मूळसिंचनेंसहजें। शाखापल्ल्व संतोषती॥ २५॥

कां तीर्थें जियें त्रिभुवनीं। तियें घडती समुद्रावगाहनीं।
ना तरी अमृतरसास्वादनीं। रस सकळ॥ २६॥

तैसा पुढतपुढती तोचि। मियां अभिवंदिला श्रीगुरुचि।
जो अभिलषित मनोरुचि। पुरविता तो॥ २७॥

आतां अवधारा कथा गहन। जे सकळां कौतुकां जन्मस्थान।
कीं अभिनव उद्यान। विवेकतरूंचें॥ २८॥

ना तरी सर्व सुखांची आदि। जे प्रमेयमहानिधि।
नाना नवरससुधाब्धि। परिपूर्ण हे॥ २९॥

कीं परमधाम प्रकट। सर्व विद्यांचें मूळपीठ।
शास्त्रजातां वसौट। अशेषांचें॥ ३०॥

ना तरी सकळ धर्मांचें माहेर। सज्जनांचें जिव्हार।
लावण्यरत्नभांडार। शारदेचें॥ ३१॥

नाना कथारूपें भारती। प्रकटली असे त्रिजगतीं।
आविष्करोनि महामती। व्यासाचिये॥ ३२॥

म्हणोनि हा काव्यां रावो। ग्रन्थ गुरुवतीचा ठावो।
एथूनि रसां झाला आवो। रसाळपणाचा॥ ३३॥

तेवींचि आइका आणीक एक। एथूनि शब्दश्री सच्छास्त्रिक।
आणि महाबोधीं कोंवळीक। दुणावली॥ ३४॥

एथ चातुर्य शहाणें झालें। प्रमेय रुचीस आलें।
आणि सौभाग्य पोखलें। सुखाचें एथ॥ ३५॥

माधुर्यीं मधुरता। शृंगारीं सुरेखता।
रूढपण उचितां। दिसे भलें॥ ३६॥

एथ कळाविदपण कळा। पुण्यासि प्रतापु आगळा।
म्हणऊनि जनमेजायाचे अवलीळा। दोष हरले॥ ३७॥

आणि पाहतां नावेक। रंगीं सुरंगतेची आगळीक।
गुणां सगुणपणाचें बिक। बहुवस एथ ॥ ३८॥

भानुचेनि तेजें धवळलें। जैसें त्रैलोक्य दिसे उजळिलें।
तैसें व्यासमती कवळिलें। मिरवे विश्व॥ ३९॥

कां सुक्षेत्रीं बीज घातलें। तें आपुलियापरी विस्तारलें।
तैसें भारतीं सुरवाडलें। अर्थजात॥ ४०॥

ना तरी नगरांतरीं वसिजे। तरी नागरचि होईजे।
तैसे व्यासोक्तितेजें। धवळित सकळ॥ ४१॥

कीं प्रथमवयसाकाळीं। लावण्याची नव्हाळी।
प्रगटे जैसी आगळी। अंगनाअंगीं॥ ४२॥

ना तरीं उद्यानीं माधवी घडे। तेथ वनशोभेची खाणी उघडे।
आदिलापासोनि अपाडें। जियापरी॥ ४३॥

नाना घनीभूत सुवर्ण। जैसे न्याहाळितां साधारण।
मग अळंकारीं बरवेपण। निवाडु दावी॥ ४४॥

तैसें व्यासोक्ति अळंकारिलें। आवडे तें बरवेपण पातलें।
तें जाणोनि काय आश्रयिलें। इतिहासीं॥ ४५॥

नाना पुरतिये प्रतिष्ठेलागीं। सानीव धरूनि अंगीं।
पुराणें आख्यानरूपें जगीं। भारता आलीं॥ ४६॥

म्हणऊनि महाभारतीं जे नाहीं। तें नोहेचि लोकीं तिहीं।
येणें कारणें म्हणिपे पाहीं। व्यासोच्छिष्ट जगत्रय॥ ४७॥

ऐसी सुरस जगीं कथा। ते जन्मभूमि परमार्था।
मुनि सांगे नृपनाथा। जनमेजया॥ ४८॥

जें अद्वितीय उत्तम। पवित्रैक निरुपम।
परम मंगलधाम। अवधारिजो॥ ४९॥

आतां भारतीं कमळपरागु। गीताख्यु प्रसंगु।
जो संवादला श्रीरंगु। अर्जुनेसी॥ ५०॥

ना तरी शब्दब्रह्माब्धि। मथियेला व्यासबुद्धि।
निवडिलें निरवधि। नवनीत हें॥ ५१॥

मग ज्ञानाग्निसंपर्कें। कडसिलें विवेकें।
पद आलें परिपाकें। आमोदासी॥ ५२॥

जें अपेक्षिजे विरक्तीं। सदा अनुभविजे संतीं।
सोहंभावें पारंगती। रमिजे जेथ॥ ५३॥

जें आकर्णिजे भक्तीं। जें आदिवंद्य त्रिजगतीं।
ते भीष्मपर्वीं संगती। सांगिजेल॥ ५४॥

जें भगवद्गीता म्हणिजे। जें ब्रह्मेशांनीं प्रशंसिजे।
जें सनकादिकीं सेविजे। आदरेसीं॥ ५५॥

जैसें शारदीयेचें चंद्रकळे। माजीं अमृतकण कोंवळे।
ते वेंचिती मनें मवाळें। चकोरतलगें॥ ५६॥

तियापरी श्रोता। अनुभवावी हे कथा।
अति हळुवारपण चित्ता। आणूनियां॥ ५७॥

हे शब्देविण संवादिजे। इंद्रिया नेणितां भोगिजे।
बोलाआदि झोंबिजे। प्रमेयासि॥ ५८॥

जैसे भ्रमर परागु नेती। परि कमळदळें नेणती।
तैसी परी आहे सेविती। ग्रंथीं इये॥ ५९॥

कां आपुला ठाय न सांडितां। आलिंगिजे चंद्रु प्रगटतां।
हा अनुरागु भोगितां। कुमुदिनी जाणे॥ ६०॥

ऐसेनि गंभीरपणें। थिरावलेनि अंतःकरणें।
आथिला तोचि जाणे। मानूं इये॥ ६१॥

अहो अर्जुनाचिये पांती। जे परिसणया योग्य होती।
तिहीं कृपा करूनि संतीं। अवधान द्यावें॥ ६२॥

हें सलगीं म्या म्हणितलें। चरणां लागोनि विनविलें।
प्रभू सखोल हृदय आपुलें। म्हणऊनियां॥ ६३॥

जैसा स्वभावो मायबापांचा। अपत्य बोले जरी बोबडी वाचा।
तरी अधिकचि तयाचा। संतोष आथी॥ ६४॥

तैसा तुम्हीं मी अंगिकारिला। सज्जनीं आपुला म्हणितला।
तरी उणें सहजें उपसाहला। प्रार्थूं काई॥ ६५॥

परी अपराधु तो आणीक आहे। जें मी गीतार्थ कवळूं पाहें।
तें अवधारा विनवूं लाहे। म्हणऊनियां॥ ६६॥

हें अनावर न विचारितां। वायांचि धिंवसा उपनला चित्ता।
येऱ्हवीं काय भानुतेजीं खद्योता। शोभा आथी॥ ६७॥

कीं टिटिभू चांचुवरी। माप सूये सागरीं।
मी नेणतु त्यापरी। प्रवर्तें येथ॥ ६८॥

आयका आकाश गिंवसावें। तरी आणीक त्याहूनि थोर होआवें।
म्हणऊनि अपाडु हें आघवें। निर्धारितां॥ ६९॥

तया गीतार्थाची थोरी। स्वयें शंभू विवरी।
जेथ भवानी प्रश्नु करी। चमत्कारोनी॥ ७०॥

तेथ हरु म्हणे नेणिजे। देवी जैसें कां स्वरूप तुझें।
तैसे हें नित्य नूतन देखिजे। गीतातत्त्व॥ ७१॥

हा वेदार्थसागरु। जया निद्रिताचा घोरु।
तो स्वयें श्रीसर्वेश्वरु। प्रत्यक्ष अनुवादला॥ ७२॥

ऐसें जें अगाध। जेथ वेडावती वेद।
तेथ अल्प मी मतिमंद। काय होय॥ ७३॥

हें अपार कैसेनि कवळावें। महातेज कवणें धवळावें।
गगन मुठीं सुवावें। मशकें केवीं॥ ७४॥

परि एथ असे एक आधारु। तेणेंचि बोलें मी सधरु।
जै सानुकूळ श्रीगुरू। ज्ञानदेवो म्हणे॥ ७५॥

येऱ्हवीं तरी मी मुर्खु। जरी जाहला अविवेकु।
तरी संतकृपादीपकु। सोज्वळु असे॥ ७६॥

लोहाचें कनक होये। हें सामर्थ्य परिसींच आहे।
कां मृतही जीवित लाहे। अमृतसिद्धो॥ ७७॥

जरी प्रकटे सिद्धसरस्वती। तरी मुकया आथी भारती।
एथ वस्तुसामर्थ्यशक्ती। नवल कायी॥ ७८॥

कां जयातें कामधेनु माये। तयासी अप्राप्य कांहीं आहे।
म्हणऊनि मी प्रवर्तों लाहें। ग्रंथीं इये॥ ७९॥

तरी न्यून तें पुरतें। अधिक तें सरतें।
करूनि घेयावें हें तुमतें। विनवितु असें॥ ८०॥

आतां देइजो अवधान। तुम्हीं बोलविला मी बोलेन।
जैसें चेष्टे सूत्राधीन। दारुयंत्र॥ ८१॥

तैसा मी अनुग्रहीतु। साधूंचा निरूपितु।
ते आपुला अलंकारितु। भलतयापरी॥ ८२॥

तंव श्रीगुरु म्हणती राहीं। हें तुज बोलावें नलगे कांहीं।
आतां ग्रंथा चित्त देई। झडकरी वेगा॥ ८३॥

या बोला निवृत्तिदासु। पावूनि परम उल्हासु।
म्हणे परिसा मना अवकाशु। देऊनियां॥ ८४॥

धृतराष्ट्र उवाच –
धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः।
मामकाः पांडवाश्चैव किमकुर्वत संजय॥ १.१॥

तरी पुत्रस्नेहें मोहितु। धृतराष्ट्र असे पुसतु।
म्हणे संजया सांगें मातु। कुरुक्षेत्रींची॥ ८५॥

जें धर्मालय म्हणिजे। तेथ पांडव आणि माझें
गेले असती व्याजें। जुंझाचेनि॥ ८६॥

तरी तिहीं येतुला अवसरीं। काय किजत असे येरयेरीं।
तें झडकरी कथन करीं। मजप्रती॥ ८७॥

संजय उवाच –
दृष्ट्वा तु पाण्डवानीकं व्यूढं दुर्योधनस्तदा।
आचार्यमुपसंगम्य राजा वचनमब्रवीत्॥ १.२॥

तिये वेळीं तो संजय बोले। म्हणे पांडवसैन्य उचललें।
जैसें महाप्रळयीं पसरलें। कृतांतमुख॥ ८८॥

तैसें तें घनदाट। उठावलें एकवाट।
जैसें उसळलें काळकूट। धरी कवण॥ ८९॥

ना तरीं वडवानलु सांदुकला। प्रलयवातें पोखला।
सागर शोषूनि उधवला। अंबरासी॥ ९०॥

तैसें दळ दुर्धर। नानाव्यूहीं परिकर।
अवगमलें भयासुर। तिये काळीं॥ ९१॥

तें देखिलेयां दुर्योधनें। अव्हेरिलें कवणें मानें।
जैसें न गणिजे पंचाननें। गजघंटांतें॥ ९२॥

पश्यैतां पाण्डुपुत्राणाम् आचार्य महतीं चमूम्।
व्यूढां द्रुपदपुत्रेण तव शिष्येण धीमता॥ १.३॥

मग द्रोणापासीं आला। तयातें म्हणे हा देखिला।
कैसा दळभारु उचलला। पांडवांचा॥ ९३॥

गिरिदुर्ग जैसे चालते। तैसे विविध व्यूह संभवते।
हे रचिले आथि बुद्धिमंतें। द्रुपदकुमरें॥ ९४॥

जो कां तुम्हीं शिष्य्य आपुला। विद्येसि वसौटा केला।
तेणें हा सैन्यसिंधु पाखरिला। देख देख॥ ९५॥

अत्र शूरा महेष्वासा भीमार्जुनसमा युधि।
युयुधानो विराटश्च द्रुपदश्च महारथः॥ १.४॥

आणीकही असाधारण। जे शस्त्रास्त्रीं प्रवीण।
क्षात्रधर्मी निपुण। वीर आहाती॥ ९६॥

जे बळें प्रौढी पौरुषें। भीमार्जुनांसारिखे।
ते सांगेन कौतुकें। प्रसंगेंची॥ ९७॥

एथ युयुधानु सुभटु। आला असे विराटु।
महारथी श्रेष्ठु। द्रुपद वीरु॥ ९८॥

धृष्टकेतुश्चेकितानः काशिराजश्च वीर्यवान्।
पुरुजित्कुन्तिभोजश्च शैब्यश्च नरपुङ्गवः॥ १.५॥

चेकितान धृष्टकेतु। काशीश्वरु विक्रान्तु।
उत्तमौजा नृपनाथु। शैब्य देख॥ ९९॥

हा कुंतिभोजु पाहें एथ युधामन्यु आला आहे।
आणि पुरुजितादि राय हे। सकळ देखें॥ १००॥

युधामन्युश्च विक्रान्त उत्तमौजाश्च वीर्यवान्।
सौभद्रो द्रौपदेयाश्च सर्व एव महारथाः॥ १.६॥

हा सुभद्रा हृदयनंदनु। जो अपरु नवार्जुनु।
तो अभिमन्यु म्हणे दुर्योधनु। देखें द्रोणा॥ १०१॥

आणीकही द्रौपदीकुमर। हे सकळही महारथी वीर।
मिती नेणिजे परि अपार। मीनले असती॥ १०२॥

अस्माकं तु विशिष्टा ये तान्निबोध द्विजोत्तम।
नायका मम सैन्यस्य संज्ञार्थं तान्ब्रवीमि ते॥ १.७॥

आतां आमुच्या दळीं नायक। जे रूढ वीर सैनिक।
ते प्रसंगें आइक। सांगिजती॥ १०३॥

भवान्भीष्मश्च कर्णश्च कृपश्च समितिञ्जयः।
अश्वत्थामा विकर्णश्च सौमदत्तिस्तथैव च॥ १.८॥

उद्देशें एक दोनी। जायिजती बोलोनी।
तुम्ही आदिकरूनी। मुख्य जे जे॥ १०४॥

हा भीष्मु गंगानंदनु। जो प्रतापतेजस्वी भानु।
रिपुगजपंचाननु। कर्ण वीरु॥ १०५॥

या एकेकाचेनि मनोव्यापारें। हें विश्व होय संहरे।
हा कृपाचार्य न पुरे। एकलाचि॥ १०६॥

एथ विकर्ण वीरु आहे। हा अश्वत्थामा पैल पाहें।
याचा अडदरु सदा वाहे। कृतांतु मनीं॥ १०७॥

समितिंजयो सौमदत्ति। ऐसे आणीकही बहुत आहाती।
जयांचिया बळा मिती। धाताही नेणे॥ १०८॥

अन्ये च बहवः शूरा मदर्थे त्यक्त जीविताः।
नानाशस्त्रप्रहरणाः सर्वे युद्धविशारदाः॥ १.९॥

जे शस्त्रविद्यापारंगत। मंत्रावतार मूर्त।
हो का जे अस्त्रजात। एथूनि रूढ॥ १०९॥

हे अप्रतिमल्ल जगीं। पुरता प्रतापु आंगीं।
परी सर्व प्राणें मजचिलागीं। आरायिले असती॥ ११०॥

पतिव्रतेचें हृदय जैसें। पतीवांचूनि न स्पर्शे।
मी सर्वस्व यां तैसें। सुभटांसी॥ १११॥

आमुचिया काजाचेनि पाडें। देखति आपुलें जीवित थोकडें।
ऐसे निरवधि चोखडे। स्वामिभक्त॥ ११२॥

झुंजती कुळकर्णी जाणती। कळे कीर्तीसी जिती।
हें बहु असो क्षात्रनीती। एथोनियां॥ ११३॥

ऐसे सर्वांपरी पुरते। वीर दळीं आमुतें।
आतां काय गणूं यांतें। अपार हे॥ ११४॥

अपर्याप्तं तदस्माकं बलं भीष्माभिरक्षितम्।
पर्याप्तं त्विदमेतेषां बलं भीमाभिरक्षितम्॥ १.१०॥

वरी क्षत्रियांमाजी श्रेष्ठु। जो जगजेठी जगीं सुभटु।
तया दळवैपणाचा पाटु। भीष्मासि पैं॥ ११५॥

आतां याचेनि बळें गवसलें। हें दुर्ग जैसें पन्नासिलें।
येणें पाडें थेंकुलें। लोकत्रय॥ ११६॥

आधींच समुद्र पाहीं। तेथ दुवाडपण कवणा नाहीं।
मग वडवानळु तैसेयाही। विरजा जैसा॥ ११७॥

ना तरी प्रलयवन्हि महावातु। या दोघां जैसा संघातु।
तैसा हा गंगासुतु। सेनापति॥ ११८॥

आतां येणेंसि कवण भिडे। हें पांडव सैन्य कीर थोकडें।
वरचिलेनि पाडें। दिसत असे॥ ११९॥

वरी भीमसेन बेथु। तो जाहला असे सेनानाथु।
ऐसें बोलोनियां हे मातु। सांडिली तेणें॥ १२०॥

अयनेषु च सर्वेषु यथाभागमवस्थिताः।
भीष्ममेवाभिरक्षन्तु भवन्तः सर्व एव हि॥ १.११॥

मग पुनरपि काय बोले। सकळ सैनिकांतें म्हणितलें।
आतां दळभार आपुलाले। सरसे करा॥ १२१॥

जया जिया अक्षौहिणी। तेणें तिया आरणी।
वरगण कवणकवणी। महारथिया॥ १२२॥

तेणें तिया आवरिजे। भीष्मातळीं राहिजे।
द्रोणातें म्हणे पाहिजे। तुम्ही सकळ॥ १२३॥

हाचि एकु रक्षावा। मी तैसा हा देखावा।
येणें दळभारु आघवा। साचु आमुचा॥ १२४॥

तस्य संजनयन् हर्षं कुरुवृद्धः पितामहः।
सिंहनादं विनद्योच्चैः शंखं दध्मौ प्रतापवान्॥ १.१२॥

या राजाचिया बोला। सेनापति संतोषला।
मग तेणें केला। सिंहनादु॥ १२५॥

तो गाजत असे अद्भुतु। दोन्ही सैन्यांआंतु।
प्रतिध्वनि न समातु। उपजत असे॥ १२६॥

तयाचि तुलगासवें। वीरवृत्तिचेनि थांवें।
दिव्य शंख भीष्मदेवें। आस्फुरिला॥ १२७॥

ते दोन्ही नाद मिनले। तेथ त्रैलोक्य बधिरभूत जाहलें।
जैसें आकाश कां पडिलें। तुटोनियां॥ १२८॥

घडघडीत अंबर। उचंबळत सागर।
क्षोभलें चराचर। कांपत असे॥ १२९॥

तेणें महाघोष गजरें। दुमदुमिताती गिरिकंदरें।
तंव दळामाजि रणतुरें। आस्फुरिलीं॥ १३०॥

ततः शङ्खाश्च भेर्यश्च पणवानकगोमुखाः।
सहसैवाभ्यहन्यन्त स शब्दस्तुमुलोऽभवत्॥ १.१३॥

उदंड सैंघ वाजतें। भयानकें खाखातें।
महाप्रळयो जेथें। धोकंडांसी॥ १३१॥

भेरी निशाण मांदळ। शंख काहळा भोंगळ।
आणि भयासुर रणकोल्हाळ। सुभटांचे॥ १३२॥

आवेशें भुजा त्राहाटिती। विसणैले हांका देती।
जेथ महामद भद्रजाती। आवरती ना॥ १३३॥

तेथ भेडांची कवण मातु। काचया केर फिटतु।
जेणें दचकला कृतांतु। आंग नेघे॥ १३४॥

एकां उभयांचि प्राण गेले। चांगांचे दांत बैसले।
बिरुदांचे दादुले। हिंवताती॥ १३५॥

ऐसा अद्भुत तूरबंबाळु। ऐकोनि ब्रह्मा व्याकुळु।
देव म्हणती प्रळयकाळु। वोढवला आजी॥ १३६॥

ऐसी स्वर्गी मातु। देखोनि तो आकांतु।
तंव पांडवदळाआंतु। वर्तलें कायी॥ १३७॥

हो कां निजसार विजयाचें। कीं तें भांडार महातेजाचें।
जेथ गरुडाचिये जावळिचे। कांतले चाऱ्ही॥ १३८॥

ततः श्वेतैर्हयैर्युक्ते महति स्यन्दने स्थितौ।
माधवः पांडवश्चैव दिव्यौ शंखौ प्रदध्मतुः॥ १.१४॥

कीं पाखांचा मेरु जैसा। रहंवरु मिरवतसे तैसा।
तेजें कोंदाटलिया दिशा। जयाचेनि॥ १३९॥

जेथ अश्ववाहकु आपण। वैकूंठीचा राणा जाण।
तया रथाचे गुण। काय वर्णूं॥ १४०॥

ध्वजस्तंभावरी वानरु। तो मूर्तिमंत शंकरु।
सारथी शार्ङ्गधर। अर्जुनेंसी॥ १४१॥

देखा नवल तया प्रभूचें। अद्भुत प्रेम भक्तांचें।
जे सारथ्यपण पार्थाचें। करितु असे॥ १४२॥

पाइकु पाठीसीं घातला। आपण पुढां राहिला।
तेणें पाचजन्यु आस्फुरिला। अवलीळाचि॥ १४३॥

पाञ्चजन्यं हृषीकेशो देवदत्तं धनञ्जयः।
पौण्ड्रं दध्मो महाशङ्खं भीमकर्मा वृकोदरः॥ १.१५॥

परी तो महाघोषु थोरु। गर्जत असे गंहिरु।
जैसा उदैला लोपी दिनकरु। नक्षत्रांतें॥ १४४॥

तैसे तूरबंबाळ भंवते। कौरवदळीं गाजत होते।
तें हारपोनि नेणों केउते। गेले तेथ॥ १४५॥

तैसाचि देखें येरें। निनादें अति गजरें।
देवदत्तं धनुर्धरें। आस्फुरिला॥ १४६॥

ते दोनी शब्द अचाट। मिनले एकवट।
तेथ ब्रह्मकटाह शतकूट। हों पाहत असे॥ १४७॥

तंव भीमसेनु विसणैला। जैसा महाकाळु खवळला।
तेणें पौन्ड्र आस्फुरिला। महाशंखु॥ १४८॥

अनन्तविजयं राजा कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः।
नकुलः सहदेवश्च सुघोषमणिपुष्पकौ॥ १.१६॥

तो महाप्रलयजलधरु। जैसा घडघडिला गंहिरु।
तंव अनंतविजयो युधिष्ठिरु। आस्फुरित असे॥ १४९॥

नकुळें सुघोषु। सहदेवें मणिपुष्पकु।
जेणें नादें अंतकु। गजबजला ठाके॥ १५०॥

काश्यश्च परमेष्वासः शिखण्डी च महारथः।
धृष्टद्युम्नो विराटश्च सात्यकिश्चापराजितः॥ १.१७॥
द्रुपदो द्रौपदेयाश्च सर्वशः पृथिवीपते।
सौभद्रश्च महाबाहुः शङ्खान्दध्मुः पृथक् पृथक्॥ १.१८॥

तेथ भूपती होते अनेक। द्रुपद द्रौपदेयादिक।
हा काशीपति देख। महाबाहू॥ १५१॥

तेथ अर्जुनाचा सुतु। सात्यकि अपराजितु।
धृष्टद्युम्नु नृपनाथु। शिखंडी हन॥ १५२॥

विराटादि नृपवर। जे सैनिक मुख्य वीर।
तिहीं नाना शंख निरंतर। आस्फुरिले॥ १५३॥

तेणें महाघोषनिर्घातें। शेष कूर्म अवचितें।
गजबजोनि भूभारातें। सांडूं पाहति॥ १५४॥

तेथ तिन्ही लोक डळमळित। मेरु मांदार आंदोळित।
समुद्रजळ उसळत। कैलासवरी॥ १५५॥

स घोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत्।
नभश्च पृथिवीं चैव तुमुलो व्यनुनादयन्॥ १.१९॥

पृथ्वीतळ उलथों पहात। आकाश असे आसुडत।
तेथ सडा होत। नक्षत्रांचा॥ १५६॥

सृष्टि गेली रे गेली। देवां मोकळवादी जाहली।
ऐशी एक टाळी पिटिली। सत्यलोकीं॥ १५७॥

दिहाचि दिन थोकला। जैसा प्रळयकाळ मांडला।
तैसा हाहाकारु उठिला। तिहीं लोकीं॥ १५८॥

तंव आदिपुरुष विस्मितु। म्हणे झणें होय पां अंतु।
मग लोपिला अद्भुतु। संभ्रमु तो॥ १५९॥

म्हणोनि विश्व सांवरलें। एऱ्हवीं युगान्त होतें वोढवलें।
जैं महाशंख आस्फुरिले। कृष्णादिकीं॥ १६०॥

तो घोष तरी उपसंहरला। परी पडिसाद होत राहिला।
तेणें दळभार विध्वंसिला। कौरवांचा॥ १६१॥

जैसा गजघटाआंतु। सिंह लीला विदारितु।
तैसा हृदयातें भेदितु। कौरवांचिया॥ १६२॥

तो गाजत जंव आइकती। तंव उभेचि हियें घालिती।
एकमेकांतें म्हणती। सावध रे सावध॥ १६३॥

तेथ बळें प्रौढीपुरते। जे महारथी वीर होते।
तिहीं पुनरपि दळातें। आवरिलें॥ १६४॥

अथ व्यवस्थितान्दृष्ट्वा धार्तराष्ट्रान्कपिध्वजः।
प्रवृत्ते शस्त्रसम्पाते धनुरुद्यम्य पांडवः॥ १.२०॥

मग सरिसेपणें उठावले। दुणवटोनि उचलले।
तया दंडीं क्षोभलें। लोकत्रय॥ १६५॥

तेथ बाणवरी धनुर्धर। वर्षताती निरंतर।
जैसे प्रळयांत जलधर। अनिवार कां॥ १६६॥

तें देखिलिया अर्जुनें। संतोष घेऊनि मनें।
मग संभ्रमें दिठी सेने। घालीतसे॥ १६७॥

तंव संग्रामीं सज्ज जाहले। सकळ कौरव देखिले।
मग लीला धनुष्य उचलिलें। पंडुकुमरें॥ १६८॥

हृषीकेशं तदा वाक्यमिदमाह महीपते।
अर्जुन उवाच –
सेनयोरुभयोर्मध्ये रथम् स्थापय मेऽच्युत॥ १.२१॥

ते वेळीं अर्जुन म्हणतसे देवा। आतां झडकरी रथु पेलावा।
नेऊनि मध्ये घालावा। दोहीं दळां॥ १६९॥

यावदेतान्निरीक्षेऽहं योद्धुकामानवस्थितान्।
कैर्मयासह योद्धव्यम् अस्मिन् रणसमुद्यमे॥ १.२२॥

जंव मी नावेक। हे सकळ वीर सैनिक।
न्याहाळीन अशेख। झुंजते जे॥ १७०॥

योत्स्यमानानवेक्षेऽहं य एतेऽत्र समागताः।
धार्तराष्ट्रस्य दुर्बुद्धेः युद्धे प्रियचिकीर्षवः॥ १.२३॥

एथ आले असती आघवे। परी कवणेसीं म्या झुंजावें।
हें रणीं लागे पहावें। म्हणऊनियां॥ १७१॥

बहुतकरूनि कौरव। हे आतुर दुःस्वभावे।
वांटिवावीण हांव। बांधिती झुंजीं॥ १७२॥

झुंजाची आवडी धरिती। परी संग्रामीं धीर नव्हती।
हें सांगोनि रायाप्रती। काय संजयो म्हणे॥ १७३॥

संजय उवाच –
एवमुक्तो हृषीकेशो गुडाकेशेन भारत।
सेनयोरुभयोर्मध्ये स्थापयित्वा रथोत्तमम्॥ १.२४॥

आइका अर्जुन इतुकें बोलिला। तंव कृष्णें रथु पेलिला।
दोहीं सैन्यामाजीं केला। उभा तेणें॥ १७४॥

भीष्मद्रोणप्रमुखतः सर्वेषां च महीक्षिताम्।
उवाच पार्थ पश्यैतान् समवेतान्कुरूनिति॥ १.२५॥

जेथ भीष्मद्रोणादिक। जवळिकेचि सन्मुख।
पृथिवीपति आणिक। बहु आहाती॥ १७५॥

तत्रापश्यत्स्थितान्पार्थः पितृनथ पितामहान्।
आचार्यान्मातुलान्भ्रातृन् पुत्रान्पौत्रान्सखींस्तथा॥ १.२६॥

श्वशुरान्सुहृदश्चैव सेनयोरुभयोरपि
तान्समीक्ष्य स कौन्तेयः सर्वान्बंधूनवस्थितान्॥ १.२७॥

तेथ स्थिर करूनियां रथु। अर्जुन असे पाहातु।
तो दळभार समस्तु। संभ्रमेंसी॥ १७६॥

मग देवा म्हणे देख देख। हे गोत्रगुरु अशेख।
तंव कृष्णा मनीं नावेक। विस्मो जाहला॥ १७७॥

तो आपणयां आपण म्हणे। एथ कायी कवण जाणे।
हें मनीं धरिलें येणें। परि काहीं आश्चर्य असे॥ १७८॥

ऐसी पुढील से घेतु। तो सहजें जाणे हृदयस्थु।
परि उगा असे निवांतु। तिये वेळीं॥ १७९॥

तंव तेथ पार्थु सकळ। पितृ पितामह केवळ।
गुरु बंधु मातुळ। देखता जाहला॥ १८०॥

इष्ट मित्र आपुले। कुमरजन देखिले।
हे सकळ असती आले। तयांमाजीं॥ १८१॥

सुहृज्जन सासरे। आणीकही सखे सोइरे।
कुमर पौत्र धनुर्धरें। देखिले तेथ॥ १८२॥

जयां उपकार होते केले। कीं आपदीं जे रक्षिले।
हे असो वडिल धाकुले। आदिकरूनी॥ १८३॥

ऐसें गोत्रचि दोहीं दळीं। उदित जालें असे कळीं।
हें अर्जुनें तिये वेळी। अवलोकिलें॥ १८४॥

कृपया परयाऽविष्टो विषीदन्निदमब्रवीत्।
अर्जुन उवाच –
दृष्ट्वेमं स्वजनं कृष्ण युयुत्सुं समुपस्थितम्॥ १.२८॥

तेथ मनीं गजबज जाहली। आणि आपैसी कृपा आली।
तेणें अपमानें निघाली। वीरवृत्ति॥ १८५॥

जिया उत्तम कुळींचिया होती। आणि गुणलावण्य आथी।
तिया आणिकीतें न साहती। सुतेजपणें॥ १८६॥

नविये आवडीचेनि भरें। कामुक निजवनिता विसरे।
मग पाडेंवीण अनुसरे। भ्रमला जैसा॥ १८७॥

कीं तपोबळें ऋद्धी। पातलिया भ्रंशे बुद्धी।
मग तया विरक्तता सिद्धी। आठवेना॥ १८८॥

तैसें अर्जुना तेथ जाहलें। असतें पुरुषत्व गेलें।
जें अंतःकरण दिधलें। कारुण्यासी॥ १८९॥

देखा मंत्रज्ञु बरळु जाय। मग तेथ का जैसा संचारु होय।
तैसा तो धनुर्धर महामोहें। आकळिला॥ १९०॥

म्हणवूनि असतां धीरु गेला। हृदया द्रावो आला।
जैसा चंद्रकळीं सिंपिला। सोमकांतु॥ १९१॥

तयापरी पार्थु। अतिस्नेहें मोहितु।
मग सखेद असे बोलतु। श्रीअच्युतेसीं॥ १९२॥

तो म्हणे अवधारीं देवा। म्यां पाहिला हा मेळावा।
तंव गोत्रुवर्ग आघवा। देखिला एथ॥ १९३॥

हे संग्रामीं अति उदित। जहाले असती कीर समस्त।
पण आपणेपयां उचित। केवीं होय॥ १९४॥

सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति।
वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते॥ १.२९॥

येणें नावेंचि नेणों कायी। मज आपणपें सर्वथा नाही।
मन बुद्धी ठायीं। स्थिर नोहे॥ १९५ ॥

देखें देह कांपत। तोंड असे कोरडे होत।
विकळता उपजत। गात्रांसी॥ १९६ ॥

गाण्डीवं स्रंसते हस्तात त्वक्चैव परिदह्यते।
न च शक्नोम्यवस्थातुं भ्रमतीव च मे मनः॥ १.३०॥

सर्वांगा कांटाळा आला। अति संतापु उपजला।
तेथ बेंबळ हातु गेला। गांडिवाचा॥ १९७॥

तें न धरितचि निष्टलें। परि नेणेंचि हातोनि पडिलें।
ऐसें हृदय असे व्यापिलें। मोहें येणें॥ १९८॥

जें वज्रापासोनि अति कठिण। दुर्धर अतिदारुण।
तयाहून असाधारण। हें स्नेह नवल॥ १९९ ॥

जेणें संग्रामी हरु जिंतिला। निवातकवचांचा ठावो फेडिला।
तो अर्जुन मोहें कवळिला। क्षणामाजीं॥ २००॥

जैसें भ्रमर भेदी कोडें। भलतैसें काष्ठ कोरडें।
परि कळिकेमाजीं सांपडे। कोंवळिये॥ २०१॥

तेथ उत्तीर्ण होईल प्राणें। परी तें कमळदळ चिरूं नेणें।
तैसें कठिण कोंवळेंपणें। स्नेह देखा॥ २०२॥

हे आदिपुरुषाची माया। ब्रह्मेयाही नयेचि आया।
म्हणऊनि भुलविला ऐके राया। संजयो म्हणे॥ २०३॥

अवधारी मग तो अर्जुनु। देखोनि सकळ स्वजनु।
विसरला अभिमानु। संग्रामींचा॥ २०४॥

कैसी नेणों सदयता। उपनली तेथें चित्ता।
मग म्हणे कृष्णा आतां। नसिजे एथ॥ २०५॥

माझें अतिशयें मन व्याकुळ। होतसे वाचा बरळ।
जे वधावे हे सकळ। येणें नांवें॥ २०६॥

निमित्तानि च पश्यामि विपरीतानि केशव।
नच श्रेयोऽनुपश्यामि हत्वा स्वजनमाहवे॥ १.३१॥

या कौरवां जरी वधावें। तरी युधिष्ठिरादिकां कां न वधावें।
हे येरयेर आघवे। गोत्रज आमुचे॥ २०७॥

म्हणोनि जळो हें झुंज। प्रत्यया न ये मज।
एणें काय काज। महापापें॥ २०८॥

देवा बहुतांपरी पाहतां। एथ वोखटें होईल झुंजतां।
वर काहीं चुकवितां। लाभु आथी॥ २०९॥

न कांक्षे विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च।
किं नो राज्येन गोविन्द किं भोगैर्जीवितेन वा॥ १.३२॥

तया विजयवृत्ती कांहीं। मज सर्वथा काज नाहीं।
एथ राज्य तरी कायी। हें पाहुनियां॥ २१०॥

यां सकळांतें वधावें। मग जे भोग भोगावे।
ते जळोत आघवे। पार्थु म्हणे॥ २११॥

येषामर्थे कांक्षितं नो राज्यं भोगाः सुखानि च।
त इमेऽवस्थिता युद्धे प्राणांस्त्यक्त्वा धनानि च॥ १.३३॥

तेणें सुखेंविण होईल। तें भलतैसें साहिजेल।
वरी जीवितही वेंचिजेल। याचिलागीं॥ २१२॥

परी यांसि घातु कीजे। मग आपण राज्य भोगिजे।
हें स्वप्नींही मन माझें। करूं न शके॥ २१३॥

तरी आम्हीं कां जन्मावें। कवणालागीं जियावें।
जें वडिलां यां चिंतावें। अहित मनें॥ २१४॥

पुत्रातें इच्छी कुळ। तयाचें कायि हेंचि फळ।
जे निर्दळिजे केवळ। गोत्र आपुलें॥ २१५॥

हें मनींचि केविं धरिजे। आपण वज्राचेयां होइजे।
वरी घडे तरी कीजे। भलें इयां॥ २१६॥

आम्हीं जें जें जोडावें। तें समस्तीं इहीं भोगावें।
हें जीवितही उपकारावें। काजीं इयांच्या॥ २१७॥

आम्ही दिगंतीचे भूपाळ। विभांडूनि सकळ।
मग संतोषविजे कुळ। आपुलें जें॥ २१८॥

तेचि हे समस्त। परी कैसें कर्म विपरीत।
जे जाहले असती उद्यत। झुंजावया॥ २१९॥

अंतौरिया कुमरें। सांडोनियां भांडारें।
शस्त्राग्रीं जिव्हारें। आरोपुनी॥ २२०॥

ऐसियांतें कैसेनि मारूं। कवणावरी शस्त्र धरूं।
निज हृदया करूं। घातु केवीं॥ २२१॥

आचार्याः पितरः पुत्रास्तथैव च पितामहाः।
मातुलाः श्वशुराः पौत्राः श्यालाः संबंधिनस्तथा॥ १.३४॥

हे नेणसी तूं कवण। परी पैल भीष्म द्रोण।
जयांचे उपकार असाधारण। आम्हां बहुत॥ २२२॥

एथ शालक सासरे मातुळ। आणि बंधु कीं हे सकळ।
पुत्र नातू केवळ। इष्टही असती॥ २२३॥

अवधारीं अति जवळिकेचे। हे सकळही सोयरे आमुचे।
म्हणोनि दोष आथि वाचे। बोलतांचि॥ २२४॥

एतान्न हंतुमिच्छामि घ्नतोऽपि मधुसूदन।
अपि त्रैलोक्यराजस्य हेतोः किं न महीकृते॥ १.३५॥

हे वरी भलतें करितु। आतांचि एथें मारितु।
परि आपण मनें घातु। न चिंतावा॥ २२५॥

त्रैलोक्यींचें अनकळित। जरी राज्य होईल प्राप्त।
तरी हें अनुचित। नाचरें मी॥ २२६॥

जरी आजि एथ ऐसें कीजे। तरी कवणाच्या मनीं उरिजे।
सांगें मुख केवीं पाहिजे। तुझें कृष्णा॥ २२७॥

निहत्य धार्तराष्ट्रान्नः का प्रीतिः स्याज्जनार्दन।
पापमेवा श्रयेदस्मान्हत्वैतानाततायिनः॥ १.३६॥

जरी वधु करूनि गोत्रजांचा। तरी वसौटा होऊनि दोषांचा।
मज जोडिलासि तूं हातींचा। दूर होसी॥ २२८॥

कुळहरणीं पातकें। तियें आंगीं जडती अशेखें।
तये वेळीं तुं कवणें कें। देखावासी॥ २२९॥

जैसा उद्यानामाजीं अनळु। संचरला देखोनि प्रबळु।
मग क्षणभरी कोकिळु। स्थिर नोहे॥ २३०॥

कां सकर्दम सरोवरु। अवलोकूनि चकोरु।
न सेवितु अव्हेरु। करूनि निघे॥ २३१॥

तयापरी तूं देवा। मज झकवून न येसी मावा।
जरी पुण्याचा वोलावा। नाशिजैल॥ २३२॥

तस्मान्नार्हा वयं हन्तुं धार्तराष्ट्रान्स्वबान्धवान्।
स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम माधव॥ १.३७॥

म्हणोनि मी हें न करीं। इये संग्रामीं शस्त्र न धरीं।
हें किडाळ बहुतीं परी। दिसतसे॥ २३३॥

तुजसीं अंतराय होईल। मग सांगें आमचें काय उरेल।
तेणें दुःखें हियें फुटेल। तुजवीण कृष्णा॥ २३४॥

म्हणऊनि कौरव हे वधिजती। मग आम्ही भोग भोगिजती।
हे असो मात अघडती। अर्जुन म्हणे॥ २३५॥

यद्यप्येते न पश्यन्ति लोभोपहतचेतसः।
कुलक्षयकृतं दोषं मित्रद्रोहे च पातकम्॥ १.३८॥

हे अभिमानमदें भुलले। जऱ्ही पां संग्रामा आले।
तऱ्ही आम्हीं हित आपुलें। जाणावें लागे॥ २३६॥

हे ऐसें कैसें करावें। जे आपुले आपण मारावे।
जाणत जाणतांचि सेवावें। काळकूट॥ २३७॥

हां जी मार्गीं चालतां। पुढां सिंह जाहला अवचितां।
तो तंव चुकवितां। लाभु आथी॥ २३८॥

असता प्रकाशु सांडावा। मग अंधकूप आश्रावा।
तरी तेथ कवणु देवा। लाभु सांगे॥ २३९॥

कां समोर अग्नि देखोनी। जरी न वचिजे वोसंडोनी।
तरी क्षणीं एका कवळूनि। जाळूं शके॥ २४०॥

कथं न ज्ञेयमस्माभिः पापादस्मान्निवर्तितुम्।
कुलक्षयकृतं दोषं प्रपश्यद्भिर्जनार्दन॥ १.३९॥

तैसे दोष हे मूर्त। अंगीं वाजों असती पहात।
हें जाणतांही केवीं एथ। प्रवर्तावें॥ २४१॥

ऐसें पार्थ तिये अवसरीं। म्हणे देवा अवधारीं।
या कल्मषाची थोरी। सांगेन तुज॥ २४२॥

कुलक्षये प्रणश्यन्ति कुलधर्माः सनातनाः।
धर्मे नष्टे कुलं कृत्स्नमधर्मोऽभिभवत्युत॥ १.४०॥

जैसें काष्ठें काष्ठ मथिजे। तेथ वन्हि एक उपजे।
तेणें काष्ठजात जाळिजे। प्रज्वळलेनि॥ २४३॥

तैसा गोत्रींची परस्परें। जरी वधु घडे मत्सरें।
तरी तेणें महादोषें घोरें। कुळचि नाशे॥ २४४॥

म्हणवूनि एणें पापें। वंशजधर्मु लोपे।
मग अधर्मुचि आरोपे। कुळामाजी॥ २४५॥

अधर्माभिभवात्कृष्ण प्रदुष्यन्ति कुलस्त्रियः।
स्त्रीषु दुष्टासि वार्ष्णेय जायते वर्णसंकरः॥ १.४१॥

एथ सारासार विचारावें। कवणें काय आचरावें।
आणि विधिनिषेध आघवे। पारुषती॥ २४६॥

असता दीपु दवडिजे। मग अंधकारीं राहाटिजे।
तरी उजूचि का आडळिजे। जयापरी॥ २४७॥

तैसा कुळीं कुळक्षयो होय। तयें वेळीं तो आद्यधर्मु जाय।
मग आन कांहीं आहे। पापांवांचुनी॥ २४८॥

जैं यमनियम ठाकती। तेथ इंद्रियें सैरा विचरती।
म्हणौनि व्यभिचार घडती। कुळस्त्रियांसी॥ २४९॥

उत्तम अधमीं संचरती। ऐसे वर्णावर्ण मिसळती।
तेथ समूळ उपडती। जातिधर्म॥ २५०॥

जैसी चोहटाचिये बळी। पाविजे सैरा काउळीं।
तैसीं महापापें कुळीं। प्रवेशती॥ २५१॥

सङ्करो नरकायैव कुलघ्नानां कुलस्य च।
पतन्ति पितरो ह्येषां लुप्तपिण्डोदकक्रियाः॥ १.४२॥

मग कुळा तया अशेखा। आणि कुळघातकां।
येरयेरां नरका। जाणें आथी॥ २५२॥

देखें वंशवृद्धि समस्त। यापरी होय पतित।
मग वोवांडिती स्वर्गस्थ। पूर्वपुरुष॥ २५३॥

जेथ नित्यादि क्रिया ठाके। आणि नैमित्तिक कर्म पारुखे।
तेथ कवणा तिळोदकें। कवण अर्पी॥ २५४॥

तरी पितर काय करिती। कैसेनि स्वर्गीं वसती।
म्हणोनि तेही येती। कुळापासीं॥ २५५॥

जैसा नखाग्रीं व्याळु लागे। तो शिखांत व्यापी वेगें।
तेवीं आब्रह्म कुळ आघवें। आप्लविजे॥ २५६॥

दोषैरतैः कुलघ्नानां वर्णसङ्करकारकैः।
उत्साद्यन्ते जातिधर्माः कुलधर्माश्च शाश्वताः॥ १.४३॥
उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन।
नरके नियतं वासो भवतीत्यनुशुश्रुम॥ १.४४॥

देवा अवधारीं आणीक एक। एथ घडे महापातक।
जे संगदोषें हा लौकिक। भ्रंशु पावे॥ २५७॥

जैसा घरीं आपुलां। वानिवसें वन्ही लागला।
तो आणिकांहीं प्रज्वळिला। जाळूनि घाली॥ २५८॥

तैसिया तया कुळसंगती। जे जे लोक वर्तती।
तेही बाधु पावती। निमित्तें येणें॥ २५९॥

तैसें नाना दोषें सकळ। अर्जुन म्हणे तें कुळ।
मग महाघोर केवळ। निरय भोगी॥ २६०॥

पडिलिया तिये ठायीं। मग कल्पांतींहीं उघडु नाहीं।
येसणें पतन कुळक्षयीं। अर्जुन म्हणे॥ २६१॥

अहो बत महत्पापं कर्तुं व्यवसिता वयम्।
यद्राज्यसुखलोभेन हन्तुं स्वजनमुद्यताः॥ १.४५॥

देवा हें विविध कानीं ऐकिजे। परी अझुनिवरी त्रासु नुपजे।
हृदय वज्राचें हें काय कीजे। अवधारीं पां॥ २६२॥

अपेक्षिजे राज्यसुख। जयालागीं तें तंव क्षणिक।
ऐसें जाणतांही दोख। अव्हेरूं ना॥ २६३॥

जे हे वडिल सकळ आपुले। वधावया दिठी सूदले।
सांग पां काय थेकुलें। घडलें आम्हां॥ २६४॥

यदि मामप्रतीकारमशस्त्रं शस्त्रपाणयः।
धार्तराष्ट्रा रणे हन्युस्तन्मे क्षेमतरम भवेत्॥ १.४६॥

आतां यावरी जें जियावें। तयापासूनि हें बरवें।
जे शस्त्रें सांडूनि साहावे। बाण यांचे ॥ २६५॥

तयावरी होय जितुकें। तें मरण ही वरी निकें।
परी येणें कल्मषें। चाड नाहीं ॥ २६६॥

ऐसें देखून सकळ। अर्जुनें आपुलें कुळ।
मग म्हणें राज्य तें केवळ। निरयभोगु ॥ २६७॥

ऐसें तिये अवसरीं। अर्जुन बोलिला समरीं।
संजयो म्हणे अवधारीं। धृतराष्ट्रातें ॥ २६८॥

संजय उवाच–
एवमुक्त्वाऽर्जुनः संख्ये रथोपस्थ उपाविशत् ॥
विसृज्य सशरं चापं शोकसंविग्नमानसः ॥ १.४७॥

मग अत्यंत उद्वेगला। न धरत गहिंवरु आला।
तेथ उडी घातली खालां। रथौनियां ॥ २६९॥

जैसा राजकुमरु पदच्युतु। सर्वथा होय उपहतु।
कां रवि राहुग्रस्तु। प्रभाहीनु ॥ २७०॥

ना तरी महासिद्धिसंभ्रमें। जिंतला तापसु भ्रमें।
मग आकळूनि कामें। दीनु कीजे ॥ २७१॥

तैसा तो धनुर्धरु। अत्यंत दुःखें जर्जरु।
दिसे जेथ रहंवरु। त्यजिला तेणें ॥ २७२॥

मग धनुष्य बाण सांडिले। न धरत अश्रुपात आले।
ऐसें ऐकें राया तेथें वर्तलें। संजयो म्हणे ॥ २७३॥

आतां यावरी तो वैकुण्ठनाथु। देखोनि सखेद पार्थु।
कवणेपरी परमार्थु। निरूपील ॥ २७४॥

ते सविस्तर पुढारी कथा। अति सकौतुक ऐकतां।
ज्ञानदेव म्हणे आतां। निवृत्तिदासु ॥ २७५॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु
ब्रम्हविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
अर्जुनविषादयोगोनाम प्रथमोध्यायः ॥ १॥

इति ज्ञानदेवकृत भावार्थदीपिकायां प्रथमोऽध्यायः॥

## 2 Geeta Summarized सांख्ययोग

ज्ञानेश्वरी
अध्याय दुसरा

---

संजय उवाच –
तं तथा कृपयाऽविष्टम् अश्रुपूर्णाकुलेक्षणम्।
विषीदन्तम् इदं वाक्यम् उवाच मधुसूदनः ॥ २.१॥

मग सञ्जयो म्हणे रायातें। आइकें तो पार्थु तेथें।
शोकाकुल रुदनातें। करितु असे ॥ १॥

तें कुळ देखोनि समस्त। स्नेह उपनलें अद्भुत।
तेणें द्रवलें असे चित्त। कवणेपरि ॥ २॥

जैसें लवण जळे झळंबलें। ना तरीं अभ्र वातें हाले।
तैसें सधीर परी विरमलें। हृदय तयाचें ॥ ३॥

म्हणोनी कृपा आकळिला। दिसतसे अति कोमाइला।
जैसा कर्दमीं रुपला। राजहंस ॥ ४॥

तयापरी तो पाण्डुकुमरु। महामोहें अति जर्जरु।
देखोनी श्रीशारङ्गधरु। काय बोले ॥ ५॥

श्रीभगवानुवाच –
कुतस्त्वा कश्मलम् इदं विषमे समुपस्थितम्।
अनार्यजुष्टम् अस्वर्ग्यम् अकीर्तिकरमर्जुन॥ २.२॥

म्हणे अर्जुना आदि पाहीं। हें उचित काय इये ठायीं।
तूं कवण हें कायी। करीत, आहासी ॥ ६॥

तुज सांगें काय जाहलें। कवण उणें आलें।
करितां काय ठेलें। खेदु कायिसा ॥ ७॥

तूं अनुचिता चित्त नेदिसी। धीरु कंहींच ना संडिसी।
तुझेनि नामे अपयशीं। दिशा लंघिजे ॥ ८॥

तूं शूरवृत्तीचा ठावो। क्षत्रियांमाजीं रावो।
तुझिया लाठेपणाचा आवो। तिहीं लोकीं ॥ ९॥

तुवां संग्रामीं हरु जिंकिला। निवातकवचांचा ठावो फेडिला।
पवाडा तुवां केला। गंधर्वांसी ॥ १०॥

हें पाहतां तुझेनि पाडें। दिसे त्रैलोक्यही थोकडें।
ऐसें पौरुष चोखडें। पार्था तुझें ॥ ११॥

तो तूं कीं आजि एथें। सांडूनिया वीरवृत्तीतें।
अधोमुख रुदनातें। करितु आहासी ॥ १२॥

विचारीं तूं अर्जुनु। कीं कारुण्यें कीजसी दीनु।
सांग पां अंधकारें भानु। ग्रासिला आथी ॥ १३॥

ना तरी पवनु मेघासी बिहे। कीं अमृतासी मरण आहे।
पाहें पां इन्धनचि गिळोनि जाये। पावकातें ॥ १४॥

कीं लवणेंचि जळ विरें। संसर्गें काळकूट मरे।
सांग महाफणी दर्दूरें। गिळिजे कायी ॥ १५॥

सिंहासी झोंबे कोल्हा। ऐसा अपाडु आथि कें जाहाला।
परी तो त्वां साच केला। आजि एथ ॥ १६॥

म्हणोनि अझुनी अर्जुना। झणें चित्त देसी या हीना।
वेगीं धीर करूनियां मना। सावधान होई ॥ १७॥

सांडी हें मूर्खपण। उठीं घे धनुष्यबाण।
संग्रामीं हें कवण। कारुण्य तुझें ॥ १८॥

हां गा तूं जाणता। तरी न विचारिसी कां आतां।
सांगे झुंजावेळे सदयता। उचित कायी ॥ १९॥

हे असतिये कीर्तीसी नाशु। आणि पारत्रिकासि अपभ्रंशु।
म्हणे जगन्निवासु। अर्जुनातें ॥ २०॥

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत् त्वयि उपपद्यते।
क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप॥ २.३॥

म्हणोनि शोकु न करीं। तूं पुरता धीरू धरीं।
हे शोच्यता अव्हेरीं। पांडुकुमरा ॥ २१॥

तुज नव्हे हें उचित। येणें नासेल जोडलें बहुत।
तूं अझुनि तरी हित। विचारीं पां ॥ २२॥

येणें संग्रामाचेनि अवसरें। एथ कृपाळुपण नुपकरे।
हे आतांचि काय सोयरे। जाहले तुज ॥ २३॥

तूं आधींचि काय नेणसी। कीं हे गोत्रज नोळखसी।
वायांचि काय करिसी। अतिशयो आतां ॥ २४॥

आजिचें हें झुंज। काय जन्मा नवल तुज।
हें परस्परें तुम्हां व्याज। सदाचि आथी ॥ २५॥

तरी आतां काय जाहलें। कायि स्नेह उपनलें।
हें नेणिजे परी कुडें केलें। अर्जुना तुवां ॥ २६॥

मोह धरिलिया ऐसें होईल। जे असती प्रतिष्ठा जाईल।
आणि परलोकही अंतरेल। ऐहिकेंसी ॥ २७॥

हृदयाचें ढिलेपण। एथ निकयासि नव्हे कारण।
हें संग्रामीं पतन जाण। क्षत्रियांसीं ॥ २८॥

ऐसेनि तो कृपावन्तु। नानापरी असे शिकवतु।
हें ऐकोनि पांडुसुतु। काय बोले ॥ २९॥

अर्जुन उवाच –
कथं भीष्ममहं संख्ये द्रोणं च मधुसूदन।
इषुभिः प्रतियोत्स्यामि पूजार्हावरिसूदन ॥ २.४॥

देवा हें येतुलेवरी। बोलावें नलगे अवधारीं।
आधीं तूंचि चित्तीं विचारीं। संग्रामु हा ॥ ३०॥

हें झुंज नव्हे प्रमादु। एथ प्रवर्तलिया दिसतसे बाधु।
हा उघडा लिंगभेदु। वोढवला आम्हां ॥ ३१॥

देखें मातापितरें अर्चिजती। सर्वस्वें तोष पावविजती।
तियें पाठीं केवीं वधिजती। आपुलियां हातीं ॥ ३२॥

देवा संतवृंद नमस्कारिजे। कां घडे तरी पूजिजे।
हें वांचूनि केवीं निन्दिजे। स्वयें वाचा ॥ ३३॥

तैसे गोत्रगुरु आमुचे। हे पूजनीय आम्हां नेमाचे।
मज बहुत भीष्मद्रोणांचें। वर्ततसे ॥ ३४॥

जयांलागीं मनें विरु। आम्ही स्वप्नींही न शको धरूं।
तयां प्रत्यक्ष केवीं करूं। घातु देवा ॥ ३५ ॥

वरी जळो हें जियालें। एथ अघवेयांसि हेंचि काय जाहलें।
जे यांच्या वधीं अभ्यासिलें। मिरविजे आम्हीं ॥ ३६ ॥

मी पार्थु द्रोणाचा केला। येणें धनुर्वेदु मज दिधला।
तेणें उपकारें काय आभारैला। वधीं तयातें ॥ ३७ ॥

जेथींचिया कृपा लाभिजे वरु। तेथेंचि मनें व्याभिचारु।
तरी काय मी भस्मासुरु। अर्जुन म्हणे ॥ ३८ ॥

देवा समुद्र गंभीर आइकिजे। वरी तोहि आहाच देखिजे।
परी क्षोभु मनीं नेणिजे। द्रोणाचिये ॥ ३९ ॥

हें अपार जें गगन। वरी तयाही होईल मान।
परी अगाध भलें गहन। हृदय याचें ॥ ४० ॥

वरी अमृतही विटे। कीं काळवशें वज्रही फुटे।
परी मनोधर्मु न लोटे। विकरविलाही ॥ ४१ ॥

स्नेहालागीं माये। म्हणिपे तें कीरु होये।
पण कृपा ते मूर्त आहे। द्रोणीं इये ॥ ४२ ॥

हा कारुण्याची आदि। सकळ गुणांच निधि।
विद्यासिंधु निरवधि। अर्जुन म्हणे ॥ ४३ ॥

हा येणें मानें महंतु। वरी आम्हांलागीं कृपावंतु।
आतां सांग पां येथ घातु। चिंतूं येईल ॥ ४४ ॥

गुरूनहत्वा हि महानुभावान्
श्रेयो भोक्तुं भैक्ष्यमपीह लोके॥
हत्वाऽर्थकामांस्तु गुरूनिहैव
भुञ्जिय भोगान् रुधिरप्रदिग्धान्॥ २.५ ॥

ऐसे हे रणीं वधावे। मग आपण राज्यसुख भोगावें।
तें मना न ये आघवें। जीवितेंसीं ॥ ४५ ॥

हें येणें मानें दुर्भर। जे याहीहुनि भोग सधर।
ते असतु येथवर। भिक्षा मागतां भली॥ ४६ ॥

ना तरी देशत्यागें जाइजे। कां गिरिकंदर सेविजे।
परी शस्त्र आतां न धरिजे। इयांवरी ॥ ४७ ॥

देवा नवनिशतीं शरीं। वावरोनी यांच्या जिव्हारीं।
भोग गिंवसावे रुधिरीं। बुडाले जे ॥ ४८ ॥

ते काढूनि काय किजती। लिप्त केंवी सेविजती।
मज न ये हे उपपत्ती। याचिलागीं ॥ ४९ ॥

न चैतद्विद्मः कतरन्नो गरीयो
यद्वा जयेम यदि वा नो जयेयुः॥
यानेव हत्वा न जिजीविषामः
तेऽवस्थिताः प्रमुखे धार्तराष्ट्राः॥ २.६ ॥

ऐसें अर्जुन तिये अवसरीं। म्हणे श्रीकृष्णा अवधारीं।
परि तें मना न येचि मुरारी। आइकोनीया ॥ ५०॥

हें जाणोनि पार्थु भ्याला। मग पुनरपि बोलों लागला।
म्हणे देवो कां चित्त या बोला। देतीचि ना ॥ ५१॥

येऱ्हवीं माझ्या चित्तीं जें होतें। तें मी विवरूनि बोलिलों एथें।
परी निकें काय यापरौतें। तें तुम्ही जाणा ॥ ५२॥

पैं विरु जयांसी ऐकिजे। आणि या बोलींचि प्राणु सांडिजे।
ते एथ संग्रामव्याजें। उभे आहाती ॥ ५३॥

आतं ऐसेयांतें वधावें। कीं अव्हेरूनिया निघावें।
या दोहोंमाजीं बरवें। तें नेणों आम्ही ॥ ५४॥

कार्पण्यदोषोपहतस्वभावः
पृच्छामि त्वां धर्मसंमूढचेताः॥
यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे
शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम्॥ २.७ ॥

आम्हां काय उचित। तें पाहतां न स्फुरे येथ।
जे मोहें येणें चित्त। व्याकुळ माझें ॥ ५५॥

तिमिरावरुद्ध जैसें। दृष्टीचें तेज भ्रंशे।
मग पांसींच असतां न दिसे। वस्तुजात ॥ ५६॥

देवा मज तैसें जाहलें। जें मन हें भ्रांती ग्रासिलें।
आतां काय हित आपुलें। तेंही नेणें ॥ ५७॥

तरी श्रीकृष्णा तुवां जाणावें। निकें तें आम्हां सांगावें।
जे सखा सर्वस्व आघवें। आम्हांसि तूं ॥ ५८॥

तूं गुरु बंधु पिता। तूं आमुची इष्ट देवता।
तूंचि सदा रक्षिता। आपदीं आमुतें ॥ ५९॥

जैसा शिष्यांतें गुरु। सर्वथा नेणे अव्हेरु।
कीं सरितांतें सागरु। त्यजी केवीं ॥ ६०॥

ना तरी अपत्यातें माये। सांडूनि जरी जाये।
तरी तें कैसेंनि जिये। ऐकें कृष्णा ॥ ६१॥

तैसा सर्वांपरी आम्हांसी। देवा तूंचि एक आहासि।
आणि बोलिलें जरी न मनिसी। मागील माझें ॥ ६२॥

न हि प्रपश्यामि ममापनुद्यात्
यच्छोकमुच्छोषणमिंद्रियाणाम्॥
अवाप्य भूमावसपत्नमृद्धं
राज्यं सुराणामपि चाऽधिपत्यम्॥ २.८॥

तरी उचित काय आम्हां। जें व्यभिचरेना धर्मा।
तें झडकरी पुरुषोत्तमा। सांगें आतां ॥ ६३॥

हें सकळ कुळ देखोनि। जो शोकु उपजलासे मनीं।
तो तुझिया वाक्यावांचुनि। न जाय आणिकें ॥ ६४॥

एथ पृथ्वीतळ आपु होईल। हें महेंद्रपदही पाविजेल।
परि मोह हा न फिटेल। मानसींचा ॥ ६५॥

जैसीं बीजें सर्वथा आहाळलीं। तीं सुक्षेत्रीं जर्‍ही पेरिलीं।
तरी न विरूढती सिंचलीं। आवडे तैसीं ॥ ६६॥

ना तरी आयुष्य पुरलें आहे। तरी औषधें कांहीं नोहे।
एथ एकचि उपेगा जाये। परमामृत ॥ ६७॥

तैसे राज्यभोगसमृद्धि। उज्जीवन नोहे जीवबुद्धि।
एथ जिव्हाळा कृपानिधि। कारुण्य तुझें ॥ ६८॥

ऐसें अर्जुन तेथ बोलिला। तंव क्षण एक भ्रांती सांडिला।
मग पुनरपि व्यापिला। उर्मी तेणें ॥ ६९॥

कीं मज पाहतां उर्मी नोहे। हे अनारिसे गमत आहे।
तो ग्रासिला महामोहें। काळसर्पें ॥ ७०॥

सवर्म हृदयकल्हारीं। तेथ कारुण्यवेळेच्या भरीं।
लागला म्हणोनि लहरी। भांजेचि ना ॥ ७१॥

हें जाणोनि ऐसी प्रौढी। जो दृष्टिसवेंचि विष फेडी।
तो धावया श्रीहरी गारुडी। पातला कीं ॥ ७२॥

तैसिया पंडुकुमरा व्याकुळा। मिरवतसे श्रीकृष्ण जवळा।
तो कृपावशें अवळीला। रक्षील आतां ॥ ७३॥

म्हणोनि तो पार्थु। मोहफणिग्रस्तु।
म्यां म्हणितला हा हेतु। जाणोनियां ॥ ७४॥

मग देखा तेथ फाल्गुनु। घेतला असे भ्रांती कवळूनु।
जैसा घनपडळीं भानु। आच्छादिजे ॥ ७५॥

तयापरी तो धनुर्धरु। जाहलासे दुःखें जर्जरु।
जैसा ग्रीष्मकाळीं गिरिवरु। वणवला कां ॥ ७६॥

म्हणोनि सहजें सुनीळु। कृपामृतें सजळु।
तो वोळलासे श्रीगोपाळु। महामेघु ॥ ७७॥

तेथ सुदर्शनाची द्युति। तेचि विद्युल्लता झळकती।
गंभीर वाचा ते आयती। गर्जनेची ॥ ७८॥

आतां तो उदार कैसा वर्षेल। तेणें अर्जुनाचळु निवेल।
मग नवी विरुढी फुटेल। उन्मेषाची ॥ ७९॥

ते कथा आइका। मनाचिया आराणुका।
ज्ञानदेवो म्हणे देखा। निवृत्तीदासु ॥ ८०॥

संजय उवाच –
एवमुक्त्वा हृषीकेशं गुडाकेशः परंतपः॥
न योत्स्य इति गोविंदमुक्त्वा तूष्णीं बभूव ह ॥ २.९॥

ऐसें संजयो सांगतु। म्हणे राया तो पार्थु।
पुनरपि शोकाकुळितु। काय बोले ॥ ८१॥

आइकें सखेदु बोले श्रीकृष्णातें। आतां नाळवावें तुम्हीं
मातें।
मी सर्वथा न झुंजें येथें। भरंवसेनि ॥ ८२॥

ऐसें येकि हेळां बोलिला। मग मौन करूनि ठेला।
तेथ श्रीकृष्णा विस्मयो पावला। देखोनि तयातें ॥ ८३॥

तमुवाच हृषीकेशः प्रहसन्निव भारत।
सेनयोरुभयोर्मध्ये विषीदन्तमिदं वचः॥ २.१०॥

मग आपुलां चित्तीं म्हणें। एथ हें कायी आदरिलें येणें।
अर्जुन सर्वथा कांहीं नेणे। काय कीजे ॥ ८४ ॥

हा उमजे आतां कवणेपरी। कैसेनि धीरु स्वीकारी।
जैसा ग्रहाते पंचाक्षरी। अनुमानी कां ॥ ८५ ॥

ना तरी असाध्य देखोनि व्याधी। अमृतासम दिव्य औषधी।
वैद्य सूची निरवधि। निदानींची ॥ ८६ ॥

तैसे विवरतु असे श्रीअनन्तु। तया दोहीं सैन्याआंतु।
जयापरी पार्थु। भ्रांति सांडी ॥ ८७ ॥

तें कारण मनीं धरिलें। मग सरोष बोलों आदरिलें।
जैसे मातेच्या कोपीं थोकलें। स्नेह आथी ॥ ८८ ॥

कीं औषधाचिया कडुवटपणीं। जैसी अमृताची पुरवणी।
ते आहाच न दिसे, परी गुणीं। प्रकट होय ॥ ८९ ॥

तैसीं वरिवरी पाहतां उदासें। आंत तरी अतिसुरसें।
तियें वाक्यें हृषीकेशें। बोलों आदरिलीं ॥ ९० ॥

श्रीभगवानुवाच –
अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे।
गतासूनगतासूंश्च नानुशोचन्ति पंडिताः ॥ २.११ ॥

मग अर्जुनातें म्हणितलें। आम्हीं आजि हें नवल देखिलें।
जें तुवा एथ आदरिलें। माझांरींचि ॥ ९१ ॥

तूं जाणता तरी म्हणविसी। परी नेणिवेतें न संडिसी।
आणि शिकवूं म्हणों तरी बोलसी। बहुसाल नीति ॥ ९२ ॥

जात्यंधा लागे पिसे। मग तें सैरा धावे जैसें।
तुझें शहाणपण तैसें। दिसतसे ॥ ९३ ॥

तू आपणपें तरी नेणसी। परी या कौरवांते शोचूं पहासी।
हा बहु विस्मय आम्हांसीं। पुढतपुढती ॥ ९४ ॥

तरी सांग पां मज अर्जुना। तुज पासूनि स्थिति या त्रिभुवना।
हे अनादि विश्वरचना। तें लटकें कायी ॥ ९५ ॥

एथ समर्थु एक आथी। तयापासूनि भुतें होती।
तरी हें वांयाचि काय बोलती। जगामाजी ॥ ९६ ॥

हो कां सांप्रत ऐसें जाहलें। जे हे जन्ममृत्यू तुवां सृजिले।
आणि नाशु पावे नाशिले। तुझेनि कायी ॥ ९७ ॥

तू भ्रमलेपणें अहंकृती। यांसि घातु न धरिसी चित्तीं।
तरी सांगें कायि हे होती। चिरंतन ॥ ९८ ॥

कीं तूं एक वधिता। आणि सकळ लोकु हा मरता।
ऐसी भ्रांति झणें चित्ता। येवों देसी ॥ ९९ ॥

अनादिसिद्ध हें आघवें। होत जात स्वभावें।
तरी तुवां कां शोचावें। सांगें मज ॥ १०० ॥

परी मूर्खपणें नेणसी। न चिंतावें तें चिंतिसी।
आणि तूंचि नीति सांगसी। आम्हांप्रति ॥ १०१ ॥

देखें विवेकी जे होती। ते दोहींतेंही न शोचती।
जे होय जाय हे भ्रांती। म्हणऊनियां ॥ १०२ ॥

न त्वेवाहं जातु नासं न त्वं नेमे जनाधिपाः।
न चैव न भविष्यामः सर्वे वयमतः परम्॥ २.१२ ॥

अर्जुना सांगेन आइक। एथ आम्ही तुम्ही देख।
आणि हे भूपति अशेख। आदिकरूनी ॥ १०३ ॥

नित्यता ऐसेचि असोनी। ना तरी निश्चित क्षया जाऊनि।
हे भ्रांति वेगळी करूनी दोन्हीं नाही ॥ १०४ ॥

हें उपजे आणि नाशे। तें मायावशें दिसे।
येऱ्हव्हीं तत्त्वता वस्तु जे असे। ते अविनाशचि ॥ १०५ ॥

जैसें पवनें तोय हालविलें। आणि तरंगाकार जाहले।
तरी कवण कें जन्मलें। म्हणो ये तेथ ॥ १०६ ॥

तेंचि वायूचें स्फुरण ठेलें। आणि उदक सहज सपाटलें।
तरी आतां काय निमालें। विचारीं पां ॥ १०७ ॥

देहिनोऽस्मिन्यथा देहे कौमारं यौवनं जरा॥
तथा देहान्तरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ॥ २.१३ ॥

आइकें शरीर तरी एक। परी वयसा भेद अनेक।
हें प्रत्यक्षचि देख। प्रमाण तूं ॥ १०८॥

एथ कौमारत्व दिसे। मग तारुण्यीं तें भ्रंशे।
परी देहचि ना नाशे। एकेकासवें ॥ १०९॥

तैसीं चैतन्याच्या ठायीं। इयें शरीरांतरें होती जाती पाहीं।
ऐसें जाणे तया नाहीं। व्यामोहदुःख ॥ ११०॥

मात्रास्पर्शास्तु कौंतेय शीतोष्ण सुखदुःखदाः॥
आगमापायिनोऽनित्याः तान् तितिक्षस्व भारत ॥ २.१४॥

एथ नेणावया हेंचि कारण। जे इंद्रियांआधीनपण।
तिहीं आकळिजे अंतःकरण। म्हणऊनि भ्रमे ॥ १११॥

इंद्रियें विषय सेविती। तेथ हर्ष शोकु उपजती।
ते अंतर आप्लविती। संगें येणें ॥ ११२॥

जयां विषयांच्या ठायीं। एकनिष्ठता कहीं नाहीं।
तेथ दुःख आणि कांहीं। सुखही दिसे ॥ ११३॥

देखें हे शब्दाची व्याप्ति। निंदा आणि स्तुति।
तेथ द्वेषाद्वेष उपजती। श्रवणद्वारें ॥ ११४॥

मृदु आणि कठीण। हे स्पर्शाचे दोन्ही गुण।
जे वपूचेनि संगे कारण। संतोषखेदां ॥ ११५॥

भ्यासुर आणि सुरेख। हें रूपाचें स्वरूप देख।
जें उपजवी सुखदुःख। नेत्रद्वारें ॥ ११६॥

सुगंधु आणि दुर्गंधु। हा परिमळाचा भेदु।
जो घ्राणसंगें विषादु। तोषु देता ॥ ११७॥

तैसाचि द्विविध रसु। उपजवी प्रीति त्रासु।
म्हणूनि हा अपभ्रंशु। विषयसंगु ॥ ११८॥

देखें इंद्रियां आधीन होइजे। तैं शीतोष्णांतें पाविजे।
आणि सुखदुःखीं आकळिजे। आपणपें ॥ ११९॥

या विषयांवांचूनि कांहीं। आणिक सर्वथा रम्य नाहीं।
ऐसा स्वभावोचि पाहीं। इंद्रियांचा ॥ १२०॥

हे विषय तरी कैसे। रोहिणीचें जळ जैसें।
कां स्वप्नींचा आभासे। भद्रजाति ॥ १२१॥

देखें अनित्य ते यापरी। म्हणऊनि तूं अव्हेरीं।
हा सर्वथा संगु न धरीं। धनुर्धरा ॥ १२२॥

यं हि न व्यथयन्त्येते पुरुषं पुरुषर्षभ॥
समदुःखसुखं धीरं सोऽमृतत्वाय कल्पते ॥ २.१५॥

हे विषय जयातें नाकळती। तया सुखदुःखें दोनी न पवती।
आणि गर्भवासुसंगती। नाही तया ॥ १२३॥

तो नित्यरूपु पार्था। वोळखावा सर्वथा।
जो या इंद्रियार्थां। नागवेचि ॥ १२४॥

नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः।
उभयोरपि दृष्टोऽन्तः त्वनयोः तत्त्वदर्शिभिः ॥ २.१६॥

आतां अर्जुना आणिक कांहीं एक। सांगेन मी आइक।
जें विचारें पर लोक। वोळखिती ॥ १२५॥

या उपाधिमाजीं गुप्त। चैतन्य असे सर्वगत।
तें तत्त्वज्ञ सतत। स्वीकारिती ॥ १२६॥

सलिलीं पय जैसें। एक होऊनी मीनलें असे।
परी निवडूनि राजहंसें। वेगळे कीजे ॥ १२७॥

कीं अग्निमुखें किडाळ। तोडोनियां चोखाळ।
निवडिती केवळ। बुद्धिमंत ॥ १२८॥

ना तरी जाणिवेच्या आयणी। करितां दधि कडसणी।
मग नवनीत निर्वाणीं। दिसे जैसें ॥ १२९॥

कीं भूस बीज एकवट। उपणितां राहे घनवट।
तेथ उडे तें फळकट। जाणों आलें ॥ १३०॥

तैसें विचारितां निरसलें। तें प्रपंचु सहजें सांडवलें।
मग तत्त्वता तत्त्व उरलें। ज्ञानियांसी ॥ १३१॥

म्हणोनि अनित्याच्या ठायीं। तयां आस्तिक्यबुद्धि नाहीं।
निष्कर्षु दोहींही। देखिला असे ॥ १३२॥

अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम्॥
विनाशमव्ययस्यास्य न कश्चित्कर्तुमर्हति॥ २.१७॥

देखें सारासार विचारितां। भ्रांति ते पाहीं असारता।
तरी सार तें स्वभावता। नित्य जाणें ॥१३३॥

हा लोकत्रयाकारु। तो जयाचा विस्तारु।
तेथ नाम वर्ण आकारु। चिन्ह नाहीं ॥१३४॥

जो सर्वदा सर्वगतु। जन्मक्षयातीतु।
तया केलियाहि घातु। कदाचि नोहे ॥१३५॥

अन्तवन्त इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः॥
अनाशिनोऽप्रमेयस्य तस्माद्युध्यस्व भारत ॥ २.१८॥

आणि शरीरजात आघवे। हें नाशवंत स्वभावे।
म्हणोनि तुवां झुंजावें। पंडुकुमरा ॥१३६॥

य एनं वेत्ति हन्तारं यश्चैनं मन्यते हतम्।
उभौ तौ न विजानीतो नायं हन्ति न हन्यते ॥ २.१९॥

तूं धरूनि देहाभिमानातें। दिठी सूनि या शरीरातें।
मी मारिता हे मरते। म्हणत आहासी ॥१३७॥

तरी अर्जुना तूं हें नेणसी। जरी तत्त्वता विचारिसी।
तरी वधिता तूं नव्हेसी। हे वध्य नव्हती ॥१३८॥

न जायते म्रियते वा कदाचिन्
नायं भूत्वाऽभविता वा न भूयः॥
अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो
न हन्यते हन्यमाने शरीरे ॥ २.२०॥

जैसें स्वप्नामाजिं देखिजे। तें स्वप्नींचि साच आपजे।
मग चेऊनियां पाहिजे। तंव कांहीं नाहीं ॥१३९॥

तैसी हे जाण माया। तूं भ्रमत आहासी वायां।
शस्त्रें हाणितलिया छाया। जैसी आंगीं न रुपे ॥१४०॥

कां पूर्ण कुंभ उलंडला। तेथ बिंबाकारु दिसे भ्रंशला।
परी भानु नाहीं नासला। तयासवें ॥१४१॥

ना तरी मठीं आकाश जैसें। मठाकृती अवतरले असे।
तो भंगलिया आपैसें। स्वरूपचि ॥१४२॥

वेदाविनाशिनं नित्यं य एनमजमव्ययम्॥
कथं स पुरुषः पार्थ कं घातयति हन्ति कम् ॥ २.२१॥

तैसें शरीराच्या लोपीं। सर्वथा नाशु नाहीं स्वरुपीं।
म्हणऊनि तूं हें नारोपीं। भ्रांति बापा ॥१४३॥

वासांसि जीर्णानि यथा विहाय
नवानि गृह्णाति नरोऽपराणि ॥
तथा शरीराणि विहाय जीर्णानि
अन्यानि संयाति नवानि देही ॥ २.२२॥

जैसें जीर्ण वस्त्र सांडिजे। मग नूतन वेढिजे।
तैसें देहांतरातें स्वीकारिजे। चैतन्यनाथें ॥१४४॥

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः॥
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ॥ २.२३॥

हा अनादि नित्यसिद्धु। निरुपाधि विशुद्धु।
म्हणऊनि शस्त्रादिकीं छेदु। न घडे यया ॥१४५॥

अच्छेद्योऽयमदाह्योऽयम् अक्लेद्योऽशोष्य एव च॥
नित्यः सर्वगतः स्थाणुर् अचलोऽयं सनातनः ॥ २.२४॥
अव्यक्तोऽयमचिंत्योऽयम् अविकार्योऽयमुच्यते॥
तस्मादेवं विदित्वैनं नानुशोचितुमर्हसि ॥ २.२५॥

हा प्रळयोदकें नाप्लवे। हा अग्निदाहो न संभवे।
एथ महाशोषु न प्रभवे। मारुताचा ॥१४६॥

अर्जुना हा नित्य। अचळ हा शाश्वत।
सर्वत्र सदोदित। परिपूर्ण हा ॥१४७॥

हा तर्कांचिये दिठी। गोचर नोहे किरीटी।
ध्यान याचिये भेटी। उत्कंठा वाहे ॥१४८॥

हा सदा दुर्लभु मना। आपु नोहे साधना ।
निःसीमु हा अर्जुना। पुरुषोत्तमु ॥१४९॥

हा गुणत्रयारहितु। व्यक्तीसी अतीतु।
अनादि अविकृतु। सर्वरूप ॥१५०॥

अर्जुना ऐसा जाणावा। हा सकळात्मकु देखावा।
मग सहजें शोकु आघवा। हरेल तुझा ॥१५१॥

अथवा ऐसा नेणसी। तूं अंतवंतचि हें मानिसी।
तऱ्ही शोचूं न पवसी। पंडुकुमरा ॥ १५२॥

अथ चैनं नित्यजातं नित्यं वा मन्यसे मृतम्॥
तथाऽपि त्वं महाबाहो नैनं शोचितुमर्हसी ॥ २.२६॥

जे आदि स्थिति अंतु। हा निरंतर असे नित्यु।
जैसा प्रवाहो अनुस्यूतु। गंगाजळाचा ॥ १५३॥

तें आदि नाहीं खंडलें। समुद्रीं तरी असे मिनलें।
आणि जातांचि मध्यें उरलें। दिसे जैसें ॥ १५४॥

इयें तिन्ही तयापरी। सरसींच सदा अवधारीं।
भूतांसि कवणीं अवसरीं। ठाकती ना ॥ १५५॥

म्हणोनि हें आघवें। एथ तुज नलगे शोचावें।
जे स्थितीची हे स्वभावें। अनादि ऐसी ॥ १५६॥

जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च॥
तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ॥ २.२७॥

ना तरी हें अर्जुना। नयेचि तुझिया मना।
जे देखोनि लोकु अधीना। जन्मक्षया ॥ १५७॥

तरी येथें कांहीं। तुज शोकासि कारण नाहीं।
हे जन्ममृत्यु हे पाहीं। अपरिहर ॥ १५८॥

उपजे तें नाशे। नाशलें पुनरपि दिसे।
हें घटिकायंत्र तैसें। परिभ्रमे गा ॥ १५९॥

ना तरी उदो अस्तु आपैसे। अखंडित होत जात जैसे।
हें जन्ममरण तैसें। अनिवार जगीं ॥ १६०॥

महाप्रळयअवसरे। हें त्रैलोक्यही संहरे।
म्हणोनि हा न परिहरे। आदि अंतु ॥ १६१॥

तूं जरी हें ऐसें मानिसी। तरी खेदु कां करिसी।
काय जाणतचि नेणसी। धनुर्धरा ॥ १६२॥

एथ आणीकही एक पार्था। तुज बहुतीं परी पहातां।
दुःख करावया सर्वथा। विषो नाहीं ॥ १६३॥

अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत ॥
अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ॥ २.२८॥

जें समस्तें इयें भूतें। जन्माआदि अमूर्तें।
मग पातलीं व्यक्तीतें। जन्मलेया ॥ १६४॥

तियें क्षयासि जेथ जाती। तेथ निभ्रांत आनें नव्हती।
देखें पूर्व स्थितीच येती। आपुलिये ॥ १६५॥

येर मध्यें जें प्रतिभासे। तें निद्रिता स्वप्न जैसें।
तैसा आकारु हा मायावशें। सत्स्वरूपीं ॥ १६६॥

ना तरी पवनें स्पर्शिलें नीर। पढियासे तरंगाकार।
का परापेक्ष अळंकार। व्यक्ति कनकीं ॥ १६७॥

तैसें सकळ हें मूर्त। जाण पां मायाकारित।
जैसें आकाशीं बिंबत। अभ्रपटळ ॥ १६८॥

तैसें आदीचि जें नाहीं। तयालागीं तूं रुदसि कायी।
तूं अवीट तें पाहीं। चैतन्य एक ॥ १६९॥

आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनम्
आश्चर्यवद्वदति तथैव चान्यः ॥
आश्चर्यवच्चैनमन्यः श्रुणोति श्रुत्वाऽपि
एनं वेद न चैव कश्चित्॥ २.२९॥

जयाची आर्तीचि भोगित। विषयीं त्यजिलें संत।
जयालागीं विरक्त। वनवासिये ॥ १७०॥

दृष्टी सूनि जयातें। ब्रह्मचर्यादि व्रतें।
मुनीश्वर तपातें। आचरताती ॥ १७१॥

एक अंतरीं निश्चळ। जें निहाळितां केवळ।
विसरले सकळ। संसारजात ॥ १७२॥

एकां गुणानुवादु करितां। उपरती होऊनि चित्ता।
निरवधि तल्लीनता। निरंतर ॥ १७३॥

एक ऐकतांचि निवाले। ते देहभावीं सांडिले।
एक अनुभवें पातले। तद्रूपता। ॥ १७४॥

जैसे सरिता ओघ समस्त। समुद्रामाजिं मिळत।
परी माघौते न समात। परतले नाहीं ॥ १७५॥

तैसिया योगिश्वरांचिया मती। मिळणीं सवें एकवटती।
परी जे विचारूनि पुनरावृत्ति। भजतीचिना ॥ १७६ ॥

देही नित्यम् अवध्योऽयं देहे सर्वस्य भारत ॥
तस्मात्सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुमर्हसि ॥ २.३० ॥

जें सर्वत्र सर्वही देहीं। जया करितांही घातु नाहीं।
तें विश्वात्मक तूं पाहीं। चैतन्य एक ॥ १७७ ॥

इयाचेनिचि स्वभावें। हें होत जात आघवें।
तरी सांग काय शोचावें। एथ तुवां ॥ १७८ ॥

एऱ्हवीं तरी पार्था। तुज कां नेणों न मनें चित्ता।
परी किडाळ हें शोचितां। बहुतां परी ॥ १७९ ॥

स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकम्पितुमर्हसि ॥
धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यत् क्षत्रियस्य न विद्यते ॥ २.३१ ॥

तूं अझुनि कां न विचारिसी। काय हें चिंतितु आहासी।
स्वधर्मु तो विसरलासी। तरावें जेणें ॥ १८० ॥

या कौरवां भलतें जाहलें। अथवा तुजचि कांही पातलें।
कीं युगचि हें बुडालें। जऱ्हीं एथ ॥ १८१ ॥

तरी स्वधर्मु एक आहे। तो सर्वथा त्याज्य नोहे।
मग तरिजेल काय पाहें। कृपाळूपणे ॥ १८२ ॥

अर्जुना तुझें चित्त। जऱ्ही जाहलें द्रवीभूत।
तऱ्ही हें अनुचित। संग्रामसमयीं ॥ १८३ ॥

अगा गोक्षीर जरी जाहलें। तरी पथ्यासि नाहीं म्हणितलें।
ऐसेनिहि विष होय सुदलें। नवज्वरीं देतां ॥ १८४ ॥

तैसें आनी आन करितां। नाशु होईल स्वहिता।
म्हणऊनि तूं आतां। सावध होई ॥ १८५ ॥

वायांचि व्याकुळ कायी। आपुला निजधर्मु पाहीं।
जो आचरितां बाधु नाहीं। कवणें काळीं ॥ १८६ ॥

जैसें मार्गेंचि चालतां। अपावो न पवे सर्वथा।
कां दीपाधारें वर्ततां। नाडळिजे ॥ १८७ ॥

तयापरी पार्था। स्वधर्में राहाटतां।
सकळ कामपूर्तता। सहजें होय ॥ १८८ ॥

म्हणोनि या लागीं पाहीं। तुम्हां क्षत्रियां आणिक कांही।
संग्रामावांचूनि नाहीं। उचित जाणें ॥ १८९ ॥

निष्कपटी होआवें। उसिणा घाई जुंझावें।
हें असो काय सांगावें। प्रत्यक्षावरी ॥ १९० ॥

यदृच्छया चोपपन्नं स्वर्गद्वारमपावृतम् ॥
सुखिनः क्षत्रियाः पार्थ लभन्ते युद्धमीदृशम् ॥ २.३२ ॥

अर्जुना झुंज देखें आतांचें। हें हो कां जें दैव तुमचें।
की निधान सकळ धर्माचें। प्रगटलें असे ॥ १९१ ॥

हा संग्रामु काय म्हणिपे। कीं स्वर्गुचि येणें रूपें।
मूर्त कां प्रतापें। उदो केला ॥ १९२ ॥

ना तरी गुणाचेनि पतिकरें। आर्तीचेनि पडिभरें।
हे कीर्तीचि स्वयंवरें। आली तुज ॥ १९३ ॥

क्षत्रियें बहुत पुण्य कीजे। तैं झुंज ऐसें हें लाहिजे।
जैसें मार्गें जातां आडळिजे। चिंतामणिसी ॥ १९४ ॥

ना तरी जांभया पसरे मुख। तेथ अवचटें पडे पीयूख।
तैसा संग्रामु हा देख। पातला असे ॥ १९५ ॥

अथ चेत्त्वमिमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि ॥
ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापमवाप्स्यसि ॥ २.३३ ॥

आतां हा ऐसा अव्हेरिजे। मग नाथिले शोचूं बैसिजे।
तरी आपण आहाणा होइजे। आपणपेयां ॥ १९६ ॥

पूर्वजांचें जोडलें। आपणचि होय धाडिलें।
जरी आजि शस्त्र सांडिलें। रणीं इये ॥ १९७ ॥

तरी असती कीर्ति जाईल। जगचि अभिशापु देईल।
आणि गिंवसित पावतील। महादोष ॥ १९८ ॥

जैंसी भातारेंहीन वनिता। उपहति पावे सर्वथा।
मग तैशी दशा जीविता। स्वधर्मेंवीण ॥ १९९ ॥

ना तरी रणीं शव सांडिजे। तें चौमेरी गिधीं विदारिजे।
तैसें स्वधर्महीना अभिभविजे। महादोषीं ॥ २०० ॥

अकीर्तिं चापि भूतानि कथयिष्यन्ति तेऽव्ययाम्॥
संभावितस्य चकीर्तिर्मरणादतिरिच्यते ॥ २.३४ ॥

म्हणोनि स्वधर्म हा सांडसील। तरी पापा वरपडा होसील।
आणि अपेश तें न वचेल। कल्पांतवरी ॥ २०१ ॥

जाणतेनि तंवचि जियावें। जंव अपकीर्ति आंगा न पवे।
आणि सांग पां केवीं निगावें। एथोनियां ॥ २०२ ॥

तूं निर्मत्सरु सदयता। येथूनि निघसी कीर माघौता।
परी ते गति समस्तां। न मनेल ययां ॥ २०३ ॥

भयाद्रणादुपरतं मंस्यंते त्वां महारथाः ॥
येषां च त्वं बहुमतो भूत्वा यास्यसि लाघवम् ॥ २.३५ ॥

हे चहूंकडूनि वेढितील। बाणवरी घेतील।
तेथ पार्था न सुटिजेल। कृपाळुपणें ॥ २०४ ॥

ऐसेनिहि प्राणसंकटें। जरी विपायें पां निघणें घटे।
तरी तें जियालेंही वोखटे। मरणाहुनी ॥ २०५ ॥

तूं आणीकही एक न विचारिसी। एथ संभ्रमें झुंजों आलासी।
आणि सकणवपणें निघालासी। मागुता जरी ॥ २०६ ॥

तरी तुझें तें अर्जुना। या वैरियां दुर्जनां।
कां प्रत्यया येईल मना। सांगे मज ॥ २०७ ॥

अवाच्यवादांश्च बहून्वदिष्यन्ति तवाहिताः॥
निन्दन्तस्तव सामर्थ्यं ततो दुःखतरं नु किम् ॥ २.३६ ॥

हे म्हणतील गेला रे गेला। अर्जुन आम्हां बिहाला।
हा सांगें बोलु उरला। निका कायी ॥ २०८ ॥

लोक सायासें करूनि बहुतें। वेंचिती आपुलीं जीवितें।
परी वाढविती कीर्तीतें। धनुर्धरा ॥ २०९ ॥

ते तुज अनायासें। अनकळित जोडिली असे।
हें अद्वितीय जैसें। गगन आहे ॥ २१० ॥

तैसी कीर्ती निःसीम। तुझ्या ठायीं निरुपम।
तुझे गुण उत्तम। तिहीं लोकीं ॥ २११ ॥

दिगंतीचे भूपति। भाट होऊनि वाखाणिती।
जे ऐकिलिया दचकती। कृतांतादिक ॥ २१२ ॥

ऐक ऐसी महिमा घनवट। गंगा तैसी चोखट।
जया देखी जगीं सुभट। वांठ जाहली ॥ २१३ ॥

तें पौरुष तुझें अद्भुत। आइकोनियां हे समस्त।
जाहले अति विरक्त। जीवितेंसी ॥ २१४ ॥

जैसा सिंहाचिया हांका। युगांतु होय मदमुखा।
तैसा कौरवां अशेखां। धाकु तुझा ॥ २१५ ॥

जैसे पर्वत वज्रातें। ना तरी सर्प गरुडातें।
तैसे अर्जुना हे तूंतें। मानिती सदा ॥ २१६ ॥

तें अगाधपण जाईल। मग हीनत्व अंगा येईल।
जरी मागुता निघसील। न झुंजताचि ॥ २१७ ॥

आणि हे पळतां पळों नेदिती। धरूनि अवकळा करिती।
न गणित कुटी बोलती। आइकतां तुज ॥ २१८ ॥

मग ते वेळीं हियें फुटावें। आतां लाठेपणें कां न झुंजावें।
हें जिंतलें तरी भोगावें। पृथ्वीतळ ॥ २१९ ॥

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ॥
तस्मादुत्तिष्ठ कौंतेय युद्धाय कृतनिश्चयः ॥ २.३७ ॥

ना तरी रणीं एथ। झुंजतां वेंचलें जीवित।
तरी स्वर्गसुख अनकळित। पावसील ॥ २२० ॥

म्हणोनि ये गोष्टी। विचारु न करीं किरीटी। आतां धनुष्य घेऊनि उठीं। झुंझें वेगीं ॥ २२१ ॥
देखें स्वधर्मु हा आचरतां। दोषु नाशे असता।
तुज भ्रांति हे कवण चित्ता। एथ पातकाची ॥ २२२ ॥

सांगें प्लवेंचि काय बुडिजे। कां मार्गीं जातां आडळिजे।
परी विपायें चालों नेणिजे। तरी तेंही घडे॥ २२३ ॥

अमृतें तरीचि मरिजे। जरी विषेंसि सेविजे।
तैसा स्वधर्मे दोषु पाविजे। हेतुकपणें ॥ २२४ ॥

म्हणोनिया तुज पार्था। हेतु सांडोनि सर्वथा।
क्षात्रवृत्ती झुंजतां। पाप नाहीं ॥ २२५ ॥

सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ॥
ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ॥ २.३८ ॥

सुखीं संतोषा न यावें। दुःखीं विषादा न भजावें।
आणि लाभालाभ न धरावे। मनामाजीं ॥ २२६ ॥

एथ विजयपण होईल। कां सर्वथा देह जाईल।
हें आधींचि कांहीं पुढील। चिंतावेना ॥ २२७ ॥

आपणयां उचिता। स्वधर्मातेंचि राहाटतां।
जें पावे तें निवांता। साहोनि जावें ॥ २२८ ॥

ऐसेया मनें होआवें। तरी दोषु न घडे स्वभावें।
म्हणोनि आतां झुंजावें। निभ्रांत तुवां ॥ २२९ ॥

एषा तेऽभिहिता सांख्ये बुद्धिर्योगे त्विमां शृणु ॥
बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबन्धं प्रहास्यसि ॥ २.३९ ॥

हे सांख्यस्थिति मुकुळित। सांगितली तुज एथ।
आतां बुद्धियोगु निश्चित। अवधारीं पां ॥ २३० ॥

जया बुद्धियुक्ता। जाहालिया पार्था।
कर्मबंधु सर्वथा। बाधूं न पवे ॥ २३१ ॥

जैसें वज्रकवच लेइजे। मग शस्त्रांचा वर्षावो साहिजे।
परी जैतेंसीं उरिजे। अचुंबिता ॥ २३२ ॥

तैसें ऐहिक तरी न नशे। आणि मोक्षु तो उरला असे।
जेथ पूर्वानुक्रमु दिसे। चोखाळत ॥ २३३ ॥

नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते॥
स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ॥ २.४० ॥

कर्माधारें राहाटिजे। परी कर्मफळ न निरीक्षिजे।
जैसा मंत्रज्ञु न बधिजे। भूतबाधा ॥ २३४ ॥

तियापरी जे सुबुद्धि। आपु जालिया निरवधि।
हा असतांचि उपाधि। आकळूं न सके ॥ २३५ ॥

व्यवसायात्मिका बुद्धिः एकेह कुरुनन्दन ॥
बहुशाखा ह्यनन्ताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम् ॥ २.४१ ॥

जेथ न संचरे पुण्यपाप। जें सूक्ष्म अति निष्कंप।
गुणत्रयादि लेप। न लगती जेथ ॥ २३६ ॥

अर्जुना तें पुण्यवशें। जरी अल्पचि हृदयीं बुद्धि प्रकाशे।
तरी अशेषही नाशे। संसारभय ॥ २३७ ॥

जैसी दीपकळिका धाकुटी। परी बहु तेजातें प्रगटी।
तैसी सद्बुद्धि हे थेकुटी। म्हणों नये ॥ २३८ ॥

पार्था बहुतीं परी। हे अपेक्षिजे विचारशूरीं।
जे दुर्लभ चराचरीं। सद्वासना ॥ २३९ ॥

आणिका सारिखा बहुवसु। जैसा न जोडे परिसु।
कां अमृताचा लेशु। दैवगुणें ॥ २४० ॥

तैसी दुर्लभ जे सद्बुद्धि। जिये परमात्माचि अवधि।
जैसा गंगेसी उदधि। निरंतर ॥ २४१ ॥

तैसा ईश्वरावांचुनि कांहीं। जिये आणिक लाणी नाहीं।
ते एकचि बुद्धि पाहीं। अर्जुना जगीं ॥ २४२ ॥

येरी ते दुर्मति। जे बहुधा असे विकरती।
तेथ निरंतर रमती। अविवेकिये ॥ २४३ ॥

म्हणोनि तया पार्था। स्वर्ग संसार नरकावस्था।
आत्मसुख सर्वथा। दृष्ट नाहीं ॥ २४४ ॥

यामिमां पुष्पितां वाचं प्रवदन्त्यविपश्चितः ॥
वेदवादरताः पार्थ नान्यदस्तीति वादिनः ॥ २.४२ ॥

वेदाधारें बोलती। केवळ कर्म प्रतिष्ठिती।
परी कर्मफळीं आसक्ती धरूनियां ॥ २४५ ॥

म्हणती संसारी जन्मिजे। यज्ञादिक कर्म कीजे।
मग स्वर्गसुख भोगिजे। मनोहर ॥ २४६ ॥

एथ हें वांचूनि कांहीं। आणिक सर्वथा सुखचि नाहीं।
ऐसें अर्जुना बोलती पाहीं। दुर्बुद्धि ते ॥ २४७ ॥

कामात्मानः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम् ॥
क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यगतिं प्रति ॥ २.४३ ॥

देखें कामना अभिभूत। होऊनि कर्मे आचरत।
ते केवळ भोगीं चित्त। देऊनियां ॥ २४८ ॥

क्रियाविशेषें बहुतें। न लोपिती विधीतें।
निपुण होऊनि धर्मातें। अनुष्ठिती ॥ २४९ ॥

भोगैश्वर्यप्रसक्तानां तयापहृतचेतसाम् ॥
व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते ॥ २.४४ ॥

परी एकचि कुडें करिती। जे स्वर्गकामु मनीं धरिती।
यज्ञपुरुषा चुकती। भोक्ता जो ॥ २५० ॥

जैसा कर्पूराचा राशि कीजे। मग अग्नि लाऊनि दीजे।
कां मिष्टान्नीं संचरविजे। काळकूट ॥ २५१ ॥

दैवें अमृतकुंभ जोडला। तो पयें हाणोनि उलंडिला।
तैसा नासिती धर्मु निपजला। हेतुकपणे ॥ २५२ ॥

सायासें पुण्य अर्जिजे। मग संसारु कां अपेक्षिजे।
परी नेणती ते काय कीजे। अप्राप्त देखें ॥ २५३ ॥

जैसी रांधवणी रससोय निकी। करूनियां मोलें विकी।
तैसा भोगासाठीं अविवेकी। धाडिती धर्मु ॥ २५४ ॥

म्हणोनि हे पार्था। दुर्बुद्धि देख सर्वथा।
तयां वेदवादरतां। मनीं वसे ॥ २५५ ॥

त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन ॥
निर्द्वन्द्वो नित्यसत्त्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ॥ २.४५ ॥

तिहीं गुणीं आवृत। हे वेद जाणें निभ्रांत।
म्हणोनि उपनिषदादि समस्त। सात्त्विक ते ॥ २५६ ॥

येर रजतमात्मक। जेथ निरूपिजे कर्मादिक।
जे केवळ स्वर्गसूचक। धनुर्धरा ॥ २५७ ॥

म्हणोनि तूं जाण। हे सुखदुःखांसीच कारण।
एथ झणें अंतःकरण। रिघों देसी ॥ २५८ ॥

तूं गुणत्रयातें अव्हेरी। मी माझें हें न करीं।
एक आत्मसुख अंतरीं। विसंब झणीं ॥ २५९ ॥

यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके ॥
तावान्सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः ॥ २.४६ ॥

जरी वेदें बहुत बोलिलें। विविध भेद सूचिले।
तऱ्ही आपण हित आपुलें। तेंचि घेपे ॥ २६० ॥

जैसा प्रगटलिया गभस्ती। अशेषही मार्ग दिसती।
तरी तेतुलेही काय चालिजती। सांगें मज ॥ २६१ ॥

कां उदकमय सकळ। जऱ्ही जाहलें असे महीतळ।
तरी आपण घेपे केवळ। आर्तीचजोगें ॥ २६२ ॥

तैसे ज्ञानीये जे होती। ते वेदार्थातें विवरिती।
मग अपेक्षित तें स्वीकारिती। शाश्वत जें ॥ २६३ ॥

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ॥
मा कर्मफलहेतुर्भुः मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥ २.४७ ॥

म्हणोनि आइकें पार्था। याचिपरी पहातां।
तुज उचित होय आतां। स्वकर्म हें ॥ २६४ ॥

आम्हीं समस्तही विचारिलें। तंव ऐसेंचि हें मना आलें।
जे न संडिजे तुवां आपुलें। विहित कर्म ॥ २६५ ॥

परी कर्मफळीं आस न करावी। आणि कुकर्मी संगति न व्हावी।
हे सत्क्रियाचि आचरावी। हेतूंविण ॥ २६६ ॥

योगस्थः कुरु कर्माणि सङ्गं त्यक्त्वा धनंजय ॥
सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते ॥ २.४८ ॥

तूं योगयुक्त होउनी। फळाचा संग टाकुनी।
मग अर्जुना चित्त देउनी। करीं कर्मे ॥ २६७ ॥

परी आदरिलें कर्म दैवें। जरी समाप्तीतें पावे।
तरी विशेषें तेथ तोषावें। हेंही नको ॥ २६८ ॥

कां निमित्तें कोणें एकें। तें सिद्धी न वचतांचि ठाके।
तरी तेथिंचेनि अपरितोखें। क्षोभावें ना ॥ २६९ ॥

आचरितां सिद्धी गेलें। तरी काजाचि कीर आलें।
परी ठेलियाही सगुण जाहालें। ऐसेंचि मानीं ॥ २७०॥

देखें जेतुलालें कर्म निपजे। तेतुलें आदिपुरुषीं जरी अर्पिजे।
तरी परीपूर्ण सहजें। जाहलें जाणें ॥ २७१॥

देखें संतासंतीं कर्मीं। हें जें सरिसेपण मनोधर्मीं।
तेचि योगस्थिति उत्तमीं। प्रशंसिजे ॥ २७२॥

दूरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगाद्धनंजय ॥
बुद्धौ शरणमन्विच्छ कृपणाः फलहेतवः ॥ २.४९॥

अर्जुना समत्व चित्ताचें। तेंचि सार जाण योगाचें।
जेथ मना आणि बुद्धीचें। ऐक्य आथी ॥ २७३॥

तो बुद्धीयोग विवरितां। बहुतें पाडें पार्था।
दिसे हा अरुता। कर्मयोग ॥ २७४॥

परी तेंचि कर्म आचरिजे। तरीच हा योगु पाविजे।
जे कर्मशेष सहजें। योगस्थिति ॥ २७५॥

बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते ॥
तस्माद्योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ॥ २.५०॥

म्हणोनि बुद्धियोगु सधरु। तेथ अर्जुना होई स्थिरु।
मनें करीं अव्हेरु। फळहेतूचा ॥ २७६॥

जे बुद्धियोगा योजिले। तेचि पारंगत जाहले।
इहीं उभयबंधी सांडिलें। पापपुण्यीं ॥ २७७॥

कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिणः ॥
जन्मबन्धविनिर्मुक्ताः पदं गच्छन्त्यनामयम् ॥ २.५१॥

ते कर्मीं तरी वर्तती। परी कर्मफळा नातळती।
आणि यातायाती लोपती। अर्जुना तयां ॥ २७८॥

मग निरामयभरित। पावती पद अच्युत।
ते बुद्धियोगयुक्त। धनुर्धरा ॥ २७९॥

तूं ऐसा तैं होसी। जैं मोहातें या सांडिसी।
आणि वैराग्य मानसीं। संचरेल ॥ २८०॥

यदा ते मोहकलिलं बुद्धिर्व्यतितरिष्यति ॥
तदा गन्तासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च॥ २.५२॥

मग निष्कळंक गहन। उपजेल आत्मज्ञान।
तेणें निचाडें होईल मन। आपैसें तुझें ॥ २८१॥

तेथ आणिक कांहीं जाणावें। कां मागीलतें स्मरावें।
हें अर्जुना आघवें। पारुषेल ॥ २८२॥

श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला ॥
समाधावचला बुद्धिः तदा योगमवाप्स्यसि ॥ २.५३॥

इंद्रियांचिया संगती। जियें पसरु होतसे मती।
ते स्थिर होईल मागुती। आत्मस्वरूपीं ॥ २८३॥

समाधिसुखीं केवळ। जैं बुद्धि होईल निश्चळ।
तैं पावसी तूं सकळ। योगस्थिति ॥ २८४॥

अर्जुन उवाच।
स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव।
स्थितधीः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम् ॥ २.५४॥

तेथ अर्जुन म्हणे देवा। हाचि अभिप्रावो आघवा।
मी पुसेन आतां संगावा। कृपानिधी ॥ २८५॥

मग अच्युत म्हणे सुखें। जें किरीटी तुज निकें।
तें पूस पां उन्मेखें। मनाचेनि ॥ २८६॥

या बोला पार्थें। म्हणितलें सांग पां श्रीकृष्णातें।
काय म्हणिपे स्थितप्रज्ञातें। वोळखों केवीं ॥ २८७॥

आणि स्थिरबुद्धि जो म्हणिजे। तो कैसिया चिन्हीं जाणिजे।
जो समाधिसुख भुंजे। अखंडित ॥ २८८॥

तो कवणे स्थिती असे। कैसेनि रूपीं विलसे।
देवा सांगावें हें ऐसें। लक्ष्मीपती ॥ २८९॥

तंव परब्रह्म अवतरणु। जो षड्गुणाधिकरणु।
तो काय तेथ नारायणु। बोलतु असे ॥ २९०॥

श्रीभगवानुवाच।
प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान् ॥

आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते॥ २.५५ ॥

म्हणे अर्जुना परियेसीं। जो हा अभिलाषु प्रौढ मानसीं।
तो अंतराय स्वसुखेंसी। करीत असे ॥ २९१॥

जो सर्वदा नित्यतृप्तु। अंतःकरणभरितु।
परी विषयामाजि पतितु। जेणें संगें कीजे॥ २९२॥

तो कामु सर्वथा जाये। जयाचें आत्मतोषीं मन राहे।
तोचि स्थितप्रज्ञ होये। पुरुष जाणें ॥ २९३॥

दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः॥
वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते ॥ २.५६॥

नाना दुःखीं प्राप्तीं। जयासी उद्वेगु नाहीं चित्तीं।
आणि सुखाचिया आर्ती। अडपैचिजेना ॥ २९४॥

अर्जुना तयाच्या ठायीं। कामक्रोधु सहजें नाहीं।
आणि भयातें नेणे कहीं। परिपूर्णु तो ॥ २९५॥

ऐसा जो निरवधि। तो जाण पां स्थिरबुद्धि।
जो निरसूनि उपाधि। भेदरहितु ॥ २९६॥

यः सर्वत्रानभिस्नेहस्तत्तत्प्राप्य शुभाशुभम ॥
नाभिनन्दति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता॥ २.५७॥

जो सर्वत्र सदा सरिसा। परिपूर्ण चंद्र कां जैसा।
अधमोत्तम प्रकाशा- । माजीं न म्हणे ॥ २९७॥

ऐसी अनवच्छिन्न समता। भूतमात्रीं सदयता।
आणि पालटु नाहीं चित्ता। कवणे वेळे ॥ २९८॥

गोमटें कांहीं पावे। तरी संतोषें तेणें नाभिभवे।
जो ओखटेनि नागवे। विषादासी ॥ २९९॥

ऐसा हरिखशोकरहितु। जो आत्मबोधभरितु।
तो जाण पां प्रज्ञायुक्तु। धनुर्धरा ॥ ३००॥

यदा संहरते चायं कूर्मोऽगानीव सर्वशः॥
इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता॥ २.५८॥

कां कूर्म जियापरी। उवाइला अवेव पसरी।
ना इच्छावशें आवरी। आपुले आपण ॥ ३०१॥

तैसीं इंद्रियें आपैतीं होती। जयाचें म्हणितलें करिती।
तयाची प्रज्ञा जाण स्थिति। पातली असे ॥ ३०२॥

आतां अर्जुना आणिकही एक। सांगेन ऐकें कवतिक।
जे विषयांते साधक। त्यजिती नियमें ॥ ३०३॥

विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिनः॥
रसवर्जं रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते॥ २.५९॥

श्रोत्रादि इंद्रियें आवरिती। परि रसने नियमु न करिती।
ते सहस्रधा कवळिजती विषयीं इहीं ॥ ३०४॥

जैसी वरिवरी पालवी खुडिजे। आणि मुळीं उदक घालिजे।
तरी कैसेनि नाशु निपजे। तया वृक्षा ॥ ३०५॥

तो उदकाचेनि बळें अधिकें। जैसा आडवेनि आंगे फांके।
तैसा मानसीं विषय पोखे। रसनाद्वारें ॥ ३०६॥

येरां इंद्रियां विषय तुटे। तैसा नियमू न ये रस हटें।
जें जीवनचि हें न घटे। येणेंविण ॥ ३०७॥

मग अर्जुना स्वभावें। ऐसियाही नियमातें पावे।
जैं कां परब्रह्म अनुभवें। होऊनि जाइजे ॥ ३०८॥

तैं शरीरभाव नासती। इंद्रियें विषय विसरती।
जैं सोहंभावप्रतीती। प्रगट होय ॥ ३०९॥

यततो ह्यपि कौन्तेय पुरुषस्य विपश्चितः॥
इन्द्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः ॥ २.६०॥

येऱ्हवी तरी अर्जुना। हें आया न ये साधना।
जे राहटताती जतना। निरंतर ॥ ३१०॥

जयातें अभ्यासाची घरटी। यमनियमांची ताटी।
जे मनातें सदा मुठी। धरूनि आहाती ॥ ३११॥

तेही किजती कासाविसी। या इंद्रियांची प्रौढी ऐसी।
जैसी मंत्रज्ञातें विवसी। भुलवी कां ॥ ३१२॥

देखें विषय हे तैसे। पावती ऋद्धिसिद्धीचेनि मिषें।
मग आकळती स्पर्शें। इंद्रियांचेनी ॥ ३१३॥

तिये संधीं मन जाये। मग अभ्यासीं थोटावलें ठाये।
ऐसें बळकटपण आहे। इंद्रियांचे ॥ ३१४॥

तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः॥
वशे हि यस्येन्द्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता॥ २.६१॥

म्हणोनि आइकें पार्था। यांतें निर्दळी जो सर्वथा।
सर्वविषयीं आस्था। सांडूनियां ॥ ३१५॥

तोचि तूं जाण। योगनिष्ठेसि कारण।
जयाचें विषयसुखें अंतःकरण। झकवेना ॥ ३१६॥

जो आत्मबोधुयक्तु। होऊनि असे सततु।
जो मातें हृदयाआंतु। विसंबेना ॥ ३१७॥

एऱ्हवीं बाह्यविषय तरी नाहीं। परी मानसीं होईल जरी कांहीं।
तरी साद्यंतुचि हा पाहीं। संसारु असे ॥ ३१८॥

जैसा कां विषाचा लेशु। घेतलियां होय बहुवसु।
मग निभ्रांत करी नाशु। जीवितासी ॥ ३१९॥

तैसी यां विषयांची शंका। मनीं वसती देखा।
घातु करी अशेखा। विवेकजाता ॥ ३२०॥

ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषूपजायते॥
संगात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते॥ २.६२॥

क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः॥
स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥ २.६३॥

जरी हृदयीं विषयस्मृती। तरी निःसंगाही आपजे संगती।
संगें प्रगटे मूर्ति। अभिलाषाची ॥ ३२१॥

जेथ कामु उपजला। तेथ क्रोधु आधींचि आला।
क्रोधीं असे ठेविला। संमोह् जाणे ॥ ३२२॥

संमोहा जालिया व्यक्ती। तरी नाशु पावे स्मृती।
चंडवातें ज्योती। हत जैसी ॥ ३२३॥

कां अस्तमानीं निशी। जैसी सूर्यतेजातें ग्रासि।
तैसी दशा स्मृतिभ्रंशीं। प्राणियांसी ॥ ३२४॥

मग अज्ञानांध केवळ। तेणें आप्लविजे सकळ।
तेथ बुद्धि होय व्याकुळ। हृदयामाजीं ॥ ३२५॥

जैसें जात्यंधा पळणी पावे। मग ते काकुळती सैरा धांवे।
तैसे बुद्धिसि होती भंवें। धनुर्धरा ॥ ३२६॥

ऐसा स्मृतिभ्रंशु घडे। मग सर्वथा बुद्धि अवघडे।
तेथ समूळ हें उपडे। ज्ञानजात ॥ ३२७॥

चैतन्याच्या भ्रंशीं। शरीरा दशा जैशी।
तैशी पुरुषा बुद्धिनाशीं। होय देखें ॥ ३२८॥

म्हणोनि आइकें अर्जुना। जैसा विस्फुलिंग लागे इंधना।
मग तो प्रौढ जालिया त्रिभुवना। पुरों शके ॥ ३२९॥

तैसें विषयांचे ध्यान। जरी विपायें वाहे मन।
तरी येसणें हें पतन। गिंवसीत पावे ॥ ३३०॥

रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिन्द्रियैश्चरन्॥
आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति ॥ २.६४॥

म्हणोनि विषय हे आघवे। सर्वथा मनौनि सांडावे।
मग रागद्वेष स्वभावें। नाशतील ॥ ३३१॥

पार्था आणिकही एक। जरी नाशले रागद्वेष।
तरी इंद्रियां विषयीं बाधक। रमतां नाहीं ॥ ३३२॥

जैसा सूर्य आकाशगतु। रश्मिकरें जगातें स्पर्शतु।
तरी संगदोषें काय लिंपतु। तेथिंचेनि ॥ ३३३॥

तैसा इंद्रियार्थीं उदासीन। आत्मरसेंचि निर्भिन्न।
जो कामक्रोधविहीन। होऊनि असे ॥ ३३४॥

तरी विषयांतही कांहीं। आपणपेंवाचूनि नाहीं।
मग विषय कवण कायी। बाधितील कवणा ॥ ३३५॥

जरी उदकें उदकीं बुडिजे। कां अग्नि आगी पोळिजे।
तरी विषयसंगें आप्लविजे। परिपूर्ण तो ॥ ३३६॥

ऐसा आपणचि केवळ। होऊनि असे निखिळ।
तयाची प्रज्ञा अचळ। निभ्रांत मानीं ॥ ३३७॥

प्रसादे सर्व दुःखानां हानिरस्योपजायते॥
प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिःपर्यवतिष्ठते ॥ २.६५ ॥

देखें अखंडित प्रसन्नता। आथी जेथ चित्ता।
तेथ रिगणें नाहीं समस्तां। संसारदुःखां ॥ ३३८ ॥

जैसा अमृताचा निर्झरु। प्रसवे जयाचा जठरु।
तया क्षुधेतृषेचा अडदरु। काहींचि नाहीं ॥ ३३९ ॥

तैसें हृदय प्रसन्न होये। तरी दुःख कैचें कें आहे।
तेथ आपैसी बुद्धि राहे। परमात्मरूपीं ॥ ३४० ॥

जैसा निर्वातीचा दीपु। सर्वथा नेणे कंपु।
तैसा स्थिरबुद्धि स्वस्वरूपु। योगयुक्तु ॥ ३४१ ॥

नास्तिबुद्धिरयुक्तस्य न चाऽयुक्तस्य भावना ॥
न चाभावयतः शान्तिः अशान्तस्य कुतः सुखम् ॥ २.६६ ॥

ये युक्तीचि कडसणी। नाहीं जयाच्या अंतःकरणीं।
तो आकळिला जाण गुणीं। विषयादिकीं ॥ ३४२ ॥

तया स्थिरबुद्धि पार्था। कहीं नाहीं सर्वथा।
आणि स्थैर्याची आस्था। तेही नुपजे ॥ ३४३ ॥

निश्चळत्वाची भावना। जरी नव्हेचि देखें मना।
तरी शांति केवी अर्जुना। आपु होय ॥ ३४४ ॥

आणि जेथ शांतीचा जिव्हाळा नाहीं। तेथ सुख विसरोनि न रिघे कांहीं।
जैसा पापियाच्या ठायीं। मोक्षु न वसे ॥ ३४५ ॥

देखें अग्निमाजीं घापती। तियें बीजें जरी विरूढती।
तरी अशांता सुखप्राप्ती। घडों शके ॥ ३४६ ॥

म्हणोनि अयुक्तपण मनाचें। तेंचि सर्वस्व दुःखाचें।
या कारणें इंद्रियांचें। दमन निकें ॥ ३४७ ॥

इंद्रियाणां हि चरतां यन्मनोऽनुविधीयते ॥
तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावमिवाम्भसि ॥ २.६७ ॥

ये इंद्रियें जें जें म्हणती। तें तेंचि जे पुरुष करिती।
ते तरलेचि न तरती। विषयसिंधु ॥ ३४८ ॥

जैसी नाव थडिये ठाकितां। जरी वरपडी होय दुवार्ता।
तरी चुकलाही मागौता। अपावो पावे ॥ ३४९ ॥

तैसीं प्राप्तेंही पुरुषें। इंद्रियें लाळिलीं जरी कौतुकें।
तरी आक्रमिला देख दुःखें। सांसारिकें ॥ ३५० ॥

तस्माद्यस्य महाबाहो निगृहीतानि सर्वशः ॥
इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ २.६८ ॥

म्हणोनि आपुलीं आपणपया। जरी ये इंद्रियें येती आया।
तरी अधिक कांही धनंजया। सार्थक असे ॥ ३५१ ॥

देखें कूर्म जियापरि। उवाइला अवयव पसरी।
ना तरी इच्छावशें आवरी। आपणपेंचि ॥ ३५२ ॥

तैसीं इंद्रियें आपैतीं होती। जयाचें म्हणितलें करिती।
तयाची प्रज्ञा जाण स्थिती। पातली असे ॥ ३५३ ॥

आतां आणिक एक गहन। पूर्णाचें चिन्ह।
अर्जुना तुज सांगेन। परिस पां ॥ ३५४ ॥

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ॥
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥ २.६९ ॥

देखें भूतजात निदेलें। तेथेंचि जया पाहलें।
आणि जीव जेथ चेइले। तेथ निद्रितु जो ॥ ३५५ ॥

तोचि तो निरुपाधि। अर्जुना तो स्थिरबुद्धि।
तोचि जाणे निरवधि। मुनीश्वर ॥ ३५६ ॥

आपूर्यमाणमचलप्रतिष्ठम्
समुद्रमापः प्रविशन्ति यद्वत्।
तद्वत्कामा यं प्रविशन्ति सर्वे
स शान्तिमाप्नोति न कामकामी ॥ २.७० ॥

पार्था आणिकही परी। तो जाणों येईल अवधारीं।
जैसी अक्षोभता सागरीं। अखंडित ॥ ३५७ ॥

जर्‍ही सरीतावोघ समस्त। परिपूर्ण होउनि मिळत।
तर्‍ही अधिक नोहे ईषत। मर्यादा न सांडी ॥ ३५८ ॥

ना तरी ग्रीष्मकाळीं सरिता। शोषूनि जाती समस्ता।
परी न्यून नव्हे पार्था। समुद्र जैसा ॥ ३५९ ॥

तैसा प्राप्तीं ऋद्धि सिद्धि। तयासि क्षोभु नाहीं बुद्धि।
आणि न पवतां न बाधी। अधृति तयातें ॥ ३६०॥

सांगें सूर्याच्या घरीं। प्रकाशु काय वातीवेऱ्ही।
कां न लाविजे तरी अंधारीं। कोंडेल तो ॥ ३६१॥

देखें ऋद्धि सिद्धि तयापरी। आली गेली से न करी।
तोचि गुंतला असे अंतरी। महासुखीं ॥ ३६२॥

जो आपलेंनि नागरपणें। इंद्रभुवनातें पाबळें म्हणे।
तो केवीं रंजे पालविणे। भिल्लांचेनि ॥ ३६३॥

जो अमृतातें ठी ठेवी। तो जैसा कांजी न सेवी।
तैसा स्वसुखानुभवी। न भोगी ऋद्धि ॥ ३६४॥

पार्था नवल हें पाहीं। जेथ स्वर्गसुख लेखणीय नाहीं।
तेथ ऋद्धि सिद्धि कायी। प्राकृता होती ॥ ३६५॥

विहाय कामान्यः सर्वान्पुमांश्चरति निस्पृहः ॥
निर्ममो निरहंकारः स शान्तिमधिगच्छति ॥ २.७१॥

ऐसा आत्मबोधे तोषला। जो परमानंदे पोखला।
तोचि स्थिरप्रज्ञ भला। वोळख तू। ॥ ३६६॥

तो अहंकारातें दवडुनी। सकळ कामु सांडोनिई।
विचरे विश्व होउनि। विश्वाचि माजीं ॥ ३६७॥

एषा ब्राम्ही स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति॥
स्थित्वाऽस्यामन्तकालेऽपि ब्रम्हनिर्वाणमृच्छति ॥ २.७२॥

हे ब्रम्हस्थिति निःसीम। जे अनुभवितीं निष्काम।
ते पावले परब्रम्ह। अनायासें ॥ ३६८॥

जे चिद्रूपीं मिळता। देहांतीची व्याकुळता।
आड ठाकों न शके चित्ता। प्राज्ञा जया ॥ ३६९॥

तेचि हे स्थिति। स्वमुखें श्रीपति।
सांगत अर्जुनाप्रति। संजयो म्हणे ॥ ३७०॥

ऐसें कृष्णवाक्य ऐकिलें। तेथ अर्जुनें मनीं म्हणितलें।
आतां आमुचियाचि काजा आले। उपपत्ती इया ॥ ३७१॥

जें कर्मजात आघवें। एथ निराकारिलें देवें।
तरी पारुषलें म्या झुंजावे। म्हणूनियां ॥ ३७२॥

ऐसा श्रीअच्युताचिया बोला। चित्तीं धनुर्धरु उवाइला।
आतां प्रश्नु करील भला। आशंकोनियां ॥ ३७३॥

तो प्रसंगु असे नागरु। जो सकळ धर्मासि आगरु।
कीं विवेकामृतसागरु। प्रांतहीनु ॥ ३७४॥

जो आपण सर्वज्ञनाथु। निरूपिता होईल श्रीअनंतु।
ते ज्ञानदेवो सांगेल मातु। निवृत्तिदासु ॥ ३७५॥

इति श्रीभगवद्गीतासूपनिषत्सु
ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
सांख्ययोगोनाम द्वितियोध्यायः॥
ओंव्या ३७५. श्लोक ७२.

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां
द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥

## 3 Karma Yoga कर्मयोग

ज्ञानेश्वरी
अध्याय तिसरा
श्रीमद्भगवद्गीता तृतीयोद्यायः

---

अर्जुन उवाच। ज्यायसी चेत्कर्मणस्ते मता बुद्धिर्जनार्दन।
तत्किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव॥ ३.१॥

मग आइका अर्जुने म्हणितलें। देवा तुम्हीं जें वाक्य बोलिलें।
तें निकें म्यां परिसलें। कमळापती॥ १॥

तेथ कर्म आणि कर्ता। उरेचिना पाहतां।
ऐसें मत तुझें श्रीअनंता। निश्चित जरी॥ २॥

तरी मातें केवी श्रीहरी। म्हणसी पार्था संग्रामु करी।
इये लाजसीना महाघोरीं। कर्मीं सुतां॥ ३॥

हां गा कर्म तूंचि अशेष। निराकरिसी निःशेष।
तरी मजकरवीं हें हिंसक। कां करविसी तूं॥ ४॥

तरी हेंचि विचारीं श्रीहृषीकेशा। तूं मानु देसी कर्मलेशा।
आणि येसणी हे हिंसा। करवीत आहासी॥ ५॥

व्यामिश्रेणव वाक्येन बुद्धिं मोहयसीव मे।
तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोऽहमाप्नुयाम्॥ ३.२॥

देवा तुवांचि ऐसे बोलावें। तरी आम्हीं नेणती काय करावें।
आतां संपलें म्हणो पां आघवें। विवेकाचें॥ ६॥

हां गा उपदेशु जरी ऐसा। तरी अपभ्रंशु तो कैसा।
आतां पुरला आम्हां धिंवसा। आत्मबोधाचा॥ ७॥

वैद्यु पथ्य वारूनि जाये। मग जरी आपणचि विष सुये।
तरी रोगिया कैसेनि जिये। सांगें मज॥ ८॥

जैसें आंधळें सुइजे आव्हांटा। कां माजवण दीजे मर्कटा।
तैसा उपदेशु हा गोमटा। वोढवला आम्हां॥ ९॥

मीं आधींचि कांहीं नेणे। वरी कवळिलों मोहें येणें।
श्रीकृष्णा विवेकु याकारणें। पुसिला तुज॥ १०॥

तंव तुझी एकेक नवाई। एथ उपदेशामाजिं गोवाई।
तरी अनुसरलिया काई। ऐसें कीजे॥ ११॥

आम्हीं तनुमनुजीवें। तुझिया बोला वोठंगावें।
आणि तुवांचि ऐसें करावें। तरी सरलें म्हणे॥ १२॥

आतां ऐसियापरी बोधिसी। तरी निकें आम्हां करिसी।
एथ ज्ञानाची आस कायसी। अर्जुन म्हणे॥ १३॥

तरी ये जाणिवेचें कीर सरलें। परी आणीक एक असें जाहलें।
जें थितें हें डहुळलें। मानस माझें॥ १४॥

तेवींचि श्रीकृष्णा हें तुझें। चरित्र कांहीं नेणिजे।
जरी चित्त पाहसी माझें। येणें मिषें॥ १५॥

ना तरी झकवीतु आहासी मातें। कीं तत्त्वचि कथिसी ध्वनितें।
हें अवगमितां निरुतें। जाणवेना॥ १६॥

म्हणोनि आइकें देवा। हा भावार्थु आतां न बोलावा।
मज विवेकु सांगावा। मऱ्हाटा जी॥ १७॥

मी अत्यंत जड असे। परी ऐसाही निकें परियेसें।
श्रीकृष्णा बोलावें तुवां तैसें। एकनिष्ठ॥ १८॥

देखें रोगातें जिणावें। औषध तरी देयावें।
परी तें अतिरुच्य व्हावें। मधुर जैसें॥ १९॥

तैसें सकळार्थभरित। तत्त्व तरी सांगावें उचित।
परी बोधे माझें चित्त। जयापरी॥ २०॥

देवा तुज ऐसा निजगुरु। आजि आर्ती धणी कां न करूं।
एथ भीड कवणाची धरूं। तूं माय आमुची॥ २१॥

हां गा कामधेनूचें दुभतें। दैवें जाहलें जरी आपैतें।
तरी कामनेची कां तेथें। वाणी कीजे॥ २२॥

जरी चिंतामणी हातां चढे। तरी वांच्छेचें कवण सांकडें।
कां आपुलेनि सुरवाडें। इच्छावे ना॥ २३॥

देखा अमृतसिंधूतें ठाकावें। मग ताहानाचि जरी फुटावें।
तरी सायासु कां करावे। मागील ते॥ २४॥

तैसा जन्मांतरीं बहुतीं। उपासितां श्रीलक्ष्मीपती।
तूं दैवें आजि हातीं। जाहलासि जरी॥ २५॥

तरी आपुलेया सवेसा। कां न मागावासि परेशा।
देवा सुकाळु हा मानसा। पाहला असे॥ २६॥

देखें सकळार्तीचें जियालें। आजि पुण्य यशासि आलें।
हे मनोरथ जाहाले। विजयी माझे॥ २७॥

जी जी परममंगळधामा। सकळ देवदेवोत्तमा।
तूं स्वाधीन आजि आम्हां। म्हणऊनियां॥ २८॥

जैसें मातेच्या ठायीं। अपत्या अनवसरु नाहीं।
स्तन्यालागूनि पाहीं। जियापरी॥ २९॥

तैसें देवा तूतें। पुसिजतसे आवडे तें।
आपुलेंनि आर्तें। कृपानिधि॥ ३०॥

तरी पारत्रिकीं हित। आणि आचरितां तरी उचित।
तें सांगें एक निश्चित। पार्थु म्हणे॥ ३१॥

श्री भगवानुवाच।
लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयानघ।
ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगिनाम्॥ ३.३॥

या बोला श्रीअच्युतु। म्हणतसे अति विस्मितु।
अर्जुना हा ध्वनितु। अभिप्रावो॥ ३२॥

जे बुद्धियोगु सांगतां। सांख्यमतसंस्था।
प्रकटिली स्वभावता। प्रसंगें आम्हीं॥ ३३॥

तो उद्देश तूं नेणसीचि। म्हणोनि क्षोभलासि वायांचि।
तरी आतां जाणें मीचि। उक्त दोन्ही॥ ३४॥

अवधारीं वीरश्रेष्ठा। ये लोकीं या दोन्ही निष्ठा।
मजचिपासूनि प्रगटा। अनादिसिद्धा॥ ३५॥

एकु ज्ञानयोगु म्हणिजे। जो सांख्यीं अनुष्ठिजे।
जेथ ओळखीसवें पाविजे। तद्रूपता॥ ३६॥

एक कर्मयोगु जाण। जेथ साधकजन निपुण।
होऊनिया निर्वाण। पावती वेळे॥ ३७॥

हे मार्गु तरी दोनी। परि एकवटती निदानीं।
जैसी सिद्धसाध्यभोजनीं। तृप्ति एक॥ ३८॥

कां पूर्वापर सरिता। भिन्न दिसती वाहतां।
मग सिंधूमिळणीं ऐक्यता। पावती शेखीं॥ ३९॥

तैसीं दोनींही मतें। सूचिती एका कारणातें।
परी उपास्ति ते योग्यते। आधीन असे॥ ४०॥

देखें उत्प्लवनासरिसा। पक्षी फळासि झोंबे जैसा।
सांगें नरु केवीं तैसा। पावे वेगां॥ ४१॥

तो हळूहळू ढाळेंढाळें। केतुलेनि एके वेळे।
मार्गाचेनि बळें। निश्चित ठाकी॥ ४२॥

तैसे देख पां विहंगममतें। अधिष्ठूनि ज्ञानातें।
सांख्य सद्य मोक्षातें। आकळिती॥ ४३॥

येर योगिये कर्माधारें। विहितेंचि निजाचारें।
पूर्णता अवसरें। पावते होती॥ ४४॥

न कर्मणामनारम्भान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते।
न च संन्यसनादेव सिद्धिं समधिगच्छति॥ ३.४॥

वांचोनि कर्मारंभ उचित। न करितांचि सिद्धवत।
कर्महीना निश्चित। होईजे ना॥ ४५॥

कीं प्राप्तकर्म सांडिजे। येतुलेनि नैष्कर्म्य होईजे।
हें अर्जुना वायां बोलिजे। मूर्खपणें॥ ४६॥

सांगें पैलतीरा जावें। ऐसें व्यसन कां जेथ पावे।
तेथ नावेतें त्यजावें। घडे केवीं॥ ४७

ना तरी तृप्ति इच्छिजे। तरी कैसेनि पाकु न कीजे।
कीं सिद्धुही न सेविजे। केवीं सांगें॥ ४८॥

न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठकर्मकृत्।
कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः॥ ३.५॥

जंव निरार्तता नाहीं। तंव व्यापारु असे पाहीं।
मग संतुष्टीच्या ठायीं। कुंठे सहजें॥ ४९॥

म्हणोनि आइकें पार्था। जया नैष्कर्म्यपदीं आस्था।
तया उचित कर्म सर्वथा। त्याज्य नोहे॥ ५०॥

आणि आपुलालिया चाडे। आपादिलें हें मांडे।
कीं त्यजिलें कर्म सांडे। ऐसें आहे॥ ५१॥

हें वायांचि सैरा बोलिजे। उकलु तरी देखोंनि पाहिजे।
परी त्यजिता कर्म न त्यजे। निभ्रांत मानीं॥ ५२॥

जंव प्रकृतीचें अधिष्ठान। तंव सांडी मांडी हें अज्ञान।
जे चेष्टा ते गुणाधीन। आपैसी असे॥ ५३॥

देखें विहित कर्म जेतुलें। तें सगळें जरी वोसंडिलें।
तरी स्वभाव काय निमाले। इंद्रियांचे॥ ५४॥

सांगे श्रवणीं ऐकावें ठेलें। कीं नेत्रींचें तेज गेलें।
हें नासारंध्र बुझालें। परिमळु नेघे॥ ५५॥

ना तरी प्राणापानगति। कीं निर्विकल्प जाहली मति।
कीं क्षुधातृषादि आर्ति। खुंटलिया॥ ५६॥

हे स्वप्नावबोधु ठेले। कीं चरण चालों विसरले।
हें असो काय निमाले। जन्ममृत्यू॥ ५७॥

हें न ठकेचि जरी काहीं तरी सांडिलें तें कायी।
म्हणोनि कर्मत्यागु नाहीं। प्रकृतिमंतां॥ ५८॥

कर्म पराधीनपणें। निपजतसे प्रकृतिगुणें।
येरीं धरीं मोकलीं अंतःकरणें। वाहिजे वायां॥ ५९॥

देखें रथीं आरूढिजे। मग जरी निश्चळ बैसिजे।
तरी चळ होऊन हिंडिजे। परतंत्रा॥ ६०॥

कां उचलिलें वायुवशें। चळे शुष्क पत्र जैसें।
निचेष्ट आकाशे। परिभ्रमे॥ ६१॥

तैसें प्रकृतिआधारें। कर्मेंद्रियविकारें।
निष्कर्मुही व्यापारे। निरंतर॥ ६२॥

म्हणऊनि संगु जंव प्रकृतीचा। तंव त्यागु न पडे कर्माचा।
ऐसियाहि करूं म्हणती तयांचा। आग्रहचि उरे॥ ६३॥

कर्मेन्द्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन्।
इन्द्रियार्थान्विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते॥ ३.६॥

जे उचित कर्म सांडिती। मग नैष्कर्म्य होऊं पाहती।
परी कर्मेंद्रियप्रवृत्ती। निरोधुनी॥ ६४॥

तयां कर्मत्यागु न घडे। जें कर्तव्य मनीं सांपडे।
वरी नटती तें फुडें। दरिद्र जाण॥ ६५॥

ऐसे ते पार्था। विषयासक्त सर्वथा।
ओळखावे तत्त्वता। येथ भ्रांति नाहीं॥ ६६॥

यस्त्विन्द्रियाणि मनसा नियम्यारभतेऽर्जुन।
कर्मैन्द्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते॥ ३.७॥

आतां देई अवधान। प्रसंगें तुज सांगेन।
या नैराश्याचें चिन्ह। धनुर्धरा॥ ६७॥

जो अंतरीं दृढु। परमात्मरूपीं गूढु
बाह्य तरी रूढु। लौकिकु जैसा॥ ६८॥

तो इंद्रियां आज्ञा करी। विषयांचें भय न धरी।
प्राप्त कर्म न अव्हेरी। उचित जें जें॥ ६९॥

तो कर्मेंद्रियें कर्मीं। राहटतां तरी न नियमी।
परी तेथेचेनि ऊर्मी। झांकोळेना॥ ७०॥

तो कामनामात्रें न घेपे। मोहमळे न लिंपे।
जैसें जळीं जळें न शिंपे। पद्मपत्र॥ ७१॥

तैसा संसर्गामाजि असे। सकळांसारिखा दिसे।
जैसें तोयसंगें आभासे। भानुबिंब॥ ७२॥

तैसें सामान्यत्वें पाहिजे। तरी साधारणचि देखिजे।
येरवीं निर्धारितां नेणिजे। सोय जयाची॥ ७३॥

ऐशा चिन्हीं चिन्हितु। देखसी तोचि मुक्तु।
आशापाशरहितु। वोळख पां॥ ७४॥

अर्जुना तोचि योगी। विशेषिजे जो जगीं।
म्हणोनि ऐसा होय यालागीं। म्हणिपे तूतें॥ ७५॥

नियतं कुरु कर्म त्वं ज्यायो ह्यकर्मणः।
शरीरयात्राऽपि च ते न प्रसिद्ध्येदकर्मणः॥ ३.८॥

तूं मानसा नियमु करीं। निश्चळु होयें अंतरीं।
मग कर्मेंद्रियें हीं व्यापारीं। वर्ततु सुखें॥ ७६॥

म्हणसी नैष्कर्म्य होआवें। तरी एथ ते न संभवे।
आणि निषिद्ध केवीं राहाटावें। विचारीं पां॥ ७७॥

म्हणोनि जें जें उचित। आणि अवसरेंकरूनि प्राप्त।
तें कर्म हेतुरहित। आचरें तूं॥ ७८॥

पार्था आणिकही एक। नेणसी तूं हें कवतिक।
जें ऐसें कर्म मोचक। आपैसें असे॥ ७९॥

देखें अनुक्रमाधारें। स्वधर्मु जो आचरे।
तो मोक्षु तेणें व्यापारें। निश्चित पावे॥ ८०॥

यज्ञाथात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबन्धनः।
तदर्थं कर्म कौन्तेय मुक्तसंगः समाचार॥ ३.९॥

स्वधर्मु जो बापा। तोचि नित्ययज्ञ जाण पां।
म्हणोनि वर्ततां तेथ पापा। संचारु नाहीं॥ ८१॥

हा निजधर्मु जैं सांडे। आणि कुकर्मीं रति घडे।
तैंचि बंधु पडे। संसारिकु॥ ८२॥

म्हणोनि स्वधर्मानुष्ठान। तें अखंड यज्ञ याजन।
जो करी तया बंधन। कंहींच नाहीं॥ ८३॥

हा लोकु कर्में बांधिला। जो परतंत्रा भुलला।
तो नित्य यज्ञातें चुकला। म्हणोनियां॥ ८४॥

सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः।
अनेन प्रसविष्यध्वमेष वोऽस्त्विष्टकामधुक्॥ ३.१०॥

आतां येचि विषयीं पार्था। तुज सांगेन एक मी कथा।
जैं सृष्ट्यादि संस्था। ब्रह्मेनि केली॥ ८५॥

तैं नित्ययागसहितें। सृजिलीं भूतें समस्तें।
परी नेणतीचि तियें यज्ञातें। सूक्ष्म म्हणउनी॥ ८६॥

ते वेळीं प्रजीं विनविला ब्रह्मा। देवा आश्रयो काय एथ आम्हां।
तंव म्हणे तो कमळजन्मा। भूतांप्रति॥ ८७॥

तुम्हां वर्णविशेषवशें। आम्हीं हा स्वधर्मुचि विहिला असे।
यातें उपासा मग आपैसे। काम पुरती॥ ८८॥

तुम्हीं व्रतें नियमु न करावे। शरीरातें न पीडावें।
दुरी केंही न वचावें। तीर्थासी गा॥ ८९॥

योगादिकें साधनें। साकांक्ष आराधनें।
मंत्रयंत्रविधानें। झणीं करा॥ ९०॥

देवतांतरा न भजावें। हें सर्वथा काहीं न करावें।
तुम्हीं स्वधर्मयज्ञीं यजावें। अनायासें॥ ९१॥

अहेतुकें चित्तें। अनुष्ठा पां ययातें।
पतिव्रता पतीतें। जियापरी॥ ९२॥

तैसा स्वधर्मरूप मखु। हाचि सेव्यु तुम्हां एकु।
ऐसें सत्यलोकनायकु। बोलता जाहला॥ ९३॥

देखा स्वधर्मातें भजाल। तरी कामधेनु हा होईल।
मग प्रजाहो न सांडील। तुमतें कदा॥ ९४॥

देवान्भावयताऽनेन ते देवा भावयन्तु वः।
परस्परं भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ॥ ३.११॥

जें येणेकरूनि समस्तां। परितोषु होईल देवतां।
मग ते तुम्हां ईप्सिता। अर्थातें देती॥ ९५॥

या स्वधर्मपूजा पूजितां। देवतागणां समस्तां।
योगक्षेमु निश्चिता। करिती तुमचा॥ ९६॥

तुम्ही देवतांतें भजाल। देव तुम्हां तुष्टतील।
ऐसी परस्परें घडेल। प्रीति जेथ॥ ९७॥

तेथ तुम्ही जें करू म्हणाल। तें आपैसें सिद्धी जाईल।
वांच्छितही पुरेल। मानसींचें॥ ९८॥

वाचासिद्धी पावाल। आज्ञापक होआल।
म्हणिये तुमतें मागतील। महाऋद्धि॥ ९९॥

जैसें ऋतुपतीचें द्वार। वनश्री निरंतर।
वोळगे फळभार। लावण्येंसी॥ १००॥

इष्टान्भोगान्हि वो देवा दास्यन्ते यज्ञभाविताः।
तैर्दत्तानप्रदायैभ्यो यो भुंक्ते स्तेन एव सः॥ ३.१२॥

तैसें सर्व सुखेसहित। दैवचि मूर्तिमंत।
येईल देखा काढत। तुम्हांपाठीं॥ १०१॥

ऐसे समस्त भोगभरित। होआल तुम्ही अनार्त।
जरी स्वधर्मैकनिरत। वर्ताल बापा॥ १०२॥

कीं जालिया सकळ संपदा। जो अनुसरेल इंद्रियमदा।
लुब्ध होऊनियां स्वादा। विषयांचिया॥ १०३॥

तिहीं यज्ञभाविकीं सुरीं। जे हे संपत्ति दिधली पुरी।
तयां स्वधर्मीं सर्वेश्वरीं। न भजेल जो॥ १०४॥

अग्निमुखीं हवन। न करील देवतापूजन।
प्राप्तवेळे भोजन। ब्राह्मणाचें॥ १०५॥

विमुखु होईल गुरुभक्ती। आदरु न करील अतिथी।
संतोषु नेदील ज्ञाती। आपुलिये॥ १०६॥

ऐसा स्वधर्मुक्रियारहितु। आथिलेपणे गर्वितु।
केवळ भोगासक्तु। होईल जो॥ १०७॥

तया मग अपावो थोरु आहे। जेणें ते हातीचें सकळ जाये।
देखा प्राप्तही न लाहे। भोग भोगूं॥ १०८॥

जैसें गतायुशरीरीं। चैतन्य वासु न करी।
कां निदैवाच्या घरीं। न राहे लक्ष्मी॥ १०९॥

तैसा स्वधर्मु जरी लोपला। तरी सर्व सुखांचा थारा मोडला।
जैसा दीपासवें हरपला। प्रकाशु जाय॥ ११०॥

तैसी निजवृत्ति जेथ सांडे। तेथ स्वतंत्रते वस्ती न घडे।
आइका प्रजाहो हें फुडें। विरंचि म्हणे॥ १११॥

म्हणऊनि स्वधर्मु जो सांडील। तयातें काळु दंडील।
चोरु म्हणुनि हरील। सर्वस्व तयाचें॥ ११२॥

मग सकळ दोष भंवते। गिंवसोनि घेती तयातें।
रात्रिसमयीं स्मशानातें। भूतें जैशीं॥ ११३॥

तैशीं त्रिभुवनींचीं दुःखें। आणि नानाविध पातकें।
दैन्यजात तितुकें। तेथेंचि वसे॥ ११४॥

ऐसें होय तया उन्मत्ता। मग न सुटे बापा रुदतां।
परी कल्पांतींही सर्वथा। प्राणिगण हो॥ ११५॥

म्हणऊनि निजवृत्ति हे न सांडावी। इंद्रियें बरळों नेदावीं।
ऐसें प्रजांतें शिकवी। चतुराननु॥ ११६॥

जैसें जळचरा जळ सांडे। आणि तत्क्षणीं मरण मांडे।
हा स्वधर्मु तेणें पाडें। विसंबों नये॥ ११७॥

म्हणोनि तुम्हीं समस्तीं। आपुलालिया कर्मी उचितीं।
निरत व्हावें पुढतपुढती। म्हणिपत असे॥ ११८॥

यज्ञशिष्टाशिनः सन्तो मुच्यन्ते सर्वकिल्बिषैः।
भुञ्जते ते त्वघं पापा ये पचन्त्यात्मकारणात्॥ ३.१३॥

देखा विहित क्रियाविधि। निर्हेतुका बुद्धि।
जो असतिये समृद्धि। विनियोगु करी॥ ११९॥

गुरु गोत्र अग्नि पूजी। अवसरीं भजे द्विजीं।
निमित्तादिकीं यजी। पितरोद्देशें॥ १२०॥

या यज्ञक्रिया उचिता। यज्ञेशीं हवन करितां।
हुतशेष स्वभावतः। उरे जें जें॥ १२१॥

तें सुखें आपुले घरीं। कुटुंबेसीं भोजन करी।
कीं भोग्यचि तें निवारी। कल्मषातें॥ १२२॥

तें यज्ञावशिष्ट भोगी। म्हणोनि सांडिजे तो अघीं।
जयापरीं महा रोगी। अमृतसिद्धि॥ १२३॥

कीं तत्त्वनिष्ठु जैसा। नागवे भ्रांतिलेशा जैसा।
तो शेषभोगी तैसा। नाकळे दोषा॥ १२४॥

म्हणोनि स्वधर्में जे अर्जे। तें स्वधर्मेंचि विनियोगिजे।
मग उरे तें भोगिजे। संतोषेसीं॥ १२५॥

हें वांचूनि पार्था। राहाटों नये अन्यथा।
ऐसी आद्य हे कथा। श्रीमुरारि सांगे॥ १२६॥

जे देहचि आपणपें मानिती। आणि विषयांतें भोग्य म्हणती।
यापरतें न स्मरती। आणिक कांहीं॥ १२७॥

हें यज्ञोपकरण सकळ। नेणतसांते बरळ।
अहंबुद्धी केवळ। भोगूं पाहती॥ १२८॥

इंद्रियरुचीसारखे। करविती पाक निके।
तें पापिये पातकें। सेविती जाण॥ १२९॥

जे संपत्तिजात आघवें। हें हवनद्रव्य मानावें।
मग स्वधर्मयज्ञें अर्पावें। आदिपुरुषीं॥ १३०॥

हें सांडोनिया मूर्ख। आपणपेंयालागीं देख।
निपजविती पाक। नानाविध॥ १३१॥

जिहीं यज्ञ सिद्धी जाये। परेशा तोषु होये।
तें हें सामान्य अन्न न होये। म्हणोनियां॥ १३२॥

हें न म्हणावें साधारण। अन्न ब्रह्मरूप जाण।
जे जीवनहेतु कारण। विश्वा यया॥ १३३॥

अन्नाद्भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसम्भवः।
यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः॥ ३.१४॥

अन्नास्तव भूतें। प्ररोह पावति समस्तें।
मग पर्जन्य या अन्नातें। सर्वत्र प्रसवे॥ १३४॥

तया पर्जन्या यज्ञीं जन्म। यज्ञातें प्रगटी कर्म।
कर्मासि आदि ब्रह्म। वेदरूप॥ १३५॥

कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम्।
तस्मात्सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम्॥ ३.१५॥

मग वेदांतें परापर। प्रसवतसे अक्षर।
म्हणऊनि हें चराचर। ब्रह्मबद्ध॥ १३६॥

परी कर्माचिये मूर्तिं। यज्ञीं अधिवासु श्रुति।
ऐकें सुभद्रापति। अखंड गा॥ १३७॥

एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह यः।
अघायुरिन्द्रियारामो मोघं पार्थ स जीवति॥ ३.१६॥

ऐशी हे आदि परंपरा। संक्षेपें तुज धर्नुधरा।
सांगितली या अध्वरा। लागूनिया॥ १३८॥

म्हणूनि समूळ हा उचितु। स्वधर्मरूपक्रतु।
नानुष्ठी जो मत्तु। लोकीं इये॥ १३९॥

तो पातकांची राशी। जाण भार भूमीसी।
जो कुकर्मे इंद्रियांसी। उपेगा गेला॥ १४०॥

तें जन्म कर्म सकळ। अर्जुना अति निष्फळ।
जैसें कीं अभ्रपटळ। अकाळींचें॥ १४१॥

कां गळा स्तन अजेचे। तैसें जियालें देखें तयाचें।
जया अनुष्ठान स्वधर्माचें। घडेचि ना॥ १४२॥

म्हणोनि ऐकें पांडवा। हा स्वधर्मु कवणें न संडावा।
सर्वभावें भजावा। हाचि एकु॥ १४३॥

हां गा शरीर जरी जाहलें। तरी कर्तव्य वोघें आलें।
मग उचित कां आपुलें। वोसंडावें॥ १४४॥

परिसें पां सव्यसाची। मूर्ति लाहोनि देहाची।
खंती करिती कर्माची। ते गांवढे गा॥ १४५॥

यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानवः।
आत्मन्येव च संतुष्टस्तस्य कार्यं न विद्यते॥ ३.१७॥

देखें असतेनि देहधर्मे। एथ तोचि एकु न लिंपे कर्मे।
जो अखंडित रमे। आपणपें॥ १४६॥

जे तो आत्मबोधें तोषला। तरी कृतकार्यु देखें जाहला।
म्हणोनि सहजें सांडवला। कर्मसंगु॥ १४७॥

नैव तस्य कृतेनार्थो नाकृतेनेह कश्चन॥
न चास्य सर्वभूतेषु कश्चिदार्थव्यपाश्रयः॥ ३.१८॥

तृप्ति जालिया जैसीं। साधनें सरती आपैसीं।
देखें आत्मतुष्टी तैसीं। कर्मे नाहीं॥ १४८॥

जंववरी अर्जुना। तो बोध भेटेना मना।
तंवचि यया साधना। भजावें लागे॥ १४९॥

तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर॥
असक्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पूरुषः॥ ३.१९॥

म्हणऊनि तूं नियतु। सकळ कामरहितु।
होऊनियां उचितु। स्वधर्मे रहाटें॥ १५०॥

जे स्वकर्मे निष्कामता। अनुसरले पार्था।
ते कैवल्यपद तत्त्वता। पातले जगीं॥ १५१॥

कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः॥
लोकसंग्रहमेवापि सम्पश्यन्कर्तुमर्हसि॥ ३.२०॥

देख पां जनकादिक। कर्मजात अशेख।
न सांडितां मोक्षसुख। पावते जाहले॥ १५२॥

याकारणें पार्था। होआवी कर्मी आस्था।
हे आणिकाहि एका अर्था। उपकारेल॥ १५३॥

यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः॥
स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते॥ ३.२१॥

जे आचरतां आपणपेयां। देखी लागेल लोका यया।
तरी चुकेल हा अपाया। प्रसंगेंचि॥ १५४॥

देखें प्राप्तार्थ जाहले। जे निष्कामता पावले।
तयाही कर्तव्य असे उरलें। लोकांलागीं॥ १५५॥

मार्गीं अंधासरिसा। पुढें देखणाही चाले जैसा।
अज्ञाना प्रकटावा धर्मु तैसा। आचरोनि॥ १५६॥

हां गा ऐसें जरी न कीजे। तरी अज्ञानां काय उमजे।
तिहीं कवणेपरी जाणिजे। मार्गातें या॥ १५७॥

एथ वडील जें जें करिती। तया नाम धर्मु ठेविती।
तेंचि येर अनुष्ठिती। सामान्य सकळ॥ १५८॥

हें ऐसें असे स्वभावें। म्हणोनि कर्म न संडावें।
विशेषें आचरावें। लागे संतीं॥ १५९॥

न मे पार्थाऽस्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन॥
नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि॥ ३.२२॥

आतां आणिकाचिया गोठी। तुज सांगों काई किरीटी।
देखें मीचि इये राहाटी। वर्तत असें॥ १६०॥

काय सांकडें कांहीं मातें। कीं कवणें एकें आर्तें।
आचरें मी धर्मातें। म्हणसी जरी॥ १६१॥

तरी पुरतेपणालागीं। आणिकु दुसरा नाहीं जगीं।
ऐसी सामुग्री माझ्या अंगीं। जाणसी तूं॥ १६२॥

मृत गुरुपुत्र आणिला। तो तुवां पवाडा देखिला।
तोही मी उगला। कर्मीं वर्ते॥ १६३॥

परी स्वधर्मीं वर्ते कैसा। साकांक्षु कां होय जैसा।
तयाचि एका उद्देशा। लागोनियां॥ १६४॥

यदि ह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतन्द्रितः॥
मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः॥ ३.२३॥

जे भूतजात सकळ। असे आम्हां आधीनचि केवळ।
तरी न व्हावें बरळ। म्हणोनिया॥ १६५॥

आम्ही पूर्णकाम होउनी। जरी आत्मस्थिती राहुनी।
तरी प्रजा हे कैसेनि। निस्तरेल॥ १६६॥

इहीं आमुची वास पाहावी। मग वर्तती परी जाणावी।
तै लौकिक स्थिति आघवी। नासिली होईल॥ १६७॥

उत्सीदेयुरिमे लोका न कुर्यां कर्म चेदहम्॥
सङ्करस्य च कर्ता स्यामुपहन्यामिमाः प्रजाः॥ ३.२४॥

म्हणोनि समर्थु जो एथें। आथिला सर्वज्ञते।
तेणें विशेषें कर्मातें। त्यजावें ना॥ १६८॥

सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वन्ति भारत॥
कुर्याद्विद्वांस्तथाऽसक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम॥ ३.२५॥

देखें फळाचिया आशा। आचरे कामुकु जैसा।
कर्मीं भरु होआवा तैसा। निराशाही॥ १६९॥

जे पुढतपुढती पार्था। हे सकळ लोकसंस्था।
रक्षणीय सर्वथा। म्ह्णऊनिया॥ १७०॥

मार्गाधारें वर्तावें। विश्व हें मोहरें लावावें।
अलौकिक नोहावें। लोकांप्रति॥ १७१॥

जें सायासें स्तन्य सेवी। ते पक्वान्नें केवीं जेवी।
म्हणोनि बाळका जैशीं नेदावीं। धनुर्धरा॥ १७२॥

न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम्॥
जोषयेत्सर्वकर्माणि विद्वान्युक्तः समाचरन्॥ ३.२६॥

तैशीं कर्मीं जया अयोग्यता। तयाप्रति नैष्कर्म्यता।
न प्रगटावी खेळतां। आदिकरुनी॥ १७३॥

तेथें सत्क्रियाचि लावावी। तेचि एकी प्रशंसावी।
नैष्कर्मींही दावावी। आचरोनी॥ १७४॥

तया लोकसंग्रहालागीं। वर्ततां कर्मसंगीं।
तो कर्मबंधु आंगीं। वाजेल ना॥ १७५॥

जैसी बहुरूपियांची रावो राणी। स्त्रीपुरुषभावो नाही मनीं।
परी लोकसंपादणी। तैशीच करिती॥ १७६॥

प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः॥
अहंकारविमूढात्मा कर्ताऽहमिति मन्यते॥ ३.२७॥

देखे पुढिलांचें वोझें। जरी आपुलां माथां घेईजे।
तरी सांगें कां न दाटिजे। धनुर्धरा॥ १७७॥

तैसीं शुभाशुभें कर्में। जियें निपजती प्रकृतिधर्में।
तियें मूर्ख मतिभ्रमें। मी कर्ता म्हणे॥ १७८॥

ऐसा अहंकाराधिरूढ। एकदेशी मूढ।
तया हा परमार्थ गूढ। प्रगटावा ना॥ १७९॥

हें असो प्रस्तुत। सांगिजेल तुज हित।
तें अर्जुना देऊनि चित्त। अवधारीं पां॥ १८०॥

तत्त्ववित्तु महाबाहो गुणकर्मविभागयोः॥
गुणा गुणेषु वर्तन्त इति मत्वा न सज्जते॥ ३.२८॥

जें तत्त्वज्ञानियांच्या ठायीं। तो प्रकृतिभावो नाहीं।
जेथ कर्मजात पाहीं। निपजत असे॥ १८१॥

ते देहाभिमानु सांडुनी। गुणकर्में वोलांडुनी।
साक्षीभूत होउनी। वर्तती देहीं॥ १८२॥

म्हणूनि शरीरी जरी होती। तरी कर्मबंधा नाकळती।
जैसा कां भूतचेष्टा गभस्ती। घेपवेना॥ १८३॥

प्रकृतेर्गुणसंमूढाः सज्जन्ते गुणकर्मसु॥
तानकृत्स्नविदो मन्दान्कृत्स्नविन्न विचालयेत॥ ३.२९॥

एथ कर्मी तोचि लिंपे। जो गुणसंभ्रमें घेपे।
प्रकृतीचेनि आटोपें। वर्ततु असे॥ १८४॥

इंद्रियें गुणाधारें। राहाटती निजव्यापारें।
तें परकर्म बलात्कारें। आपादी जो॥ १८५॥

मयि सर्वाणि कर्माणि सन्यस्याध्यात्मचेतसा॥
निराशीर्निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः॥ ३.३०॥

तरी उचितें कर्में आघवीं। तुवां आचरोनि मज अर्पावीं।
परी चित्तवृत्ति विन्यसावीं। आत्मरूपीं॥ १८६॥

हें कर्म मी कर्ता। कां आचरेन या अर्था।
ऐसा अभिमानु झणें चित्ता। रिघों देसी॥ १८७॥

तुवां शरीरपरा नोहावें। कामनाजात सांडावें।
मग अवसरोचित भोगावे। भोग सकळ॥ १८८॥

आतां कोदंड घेऊनि हातीं। आरूढ पां इये रथीं।
देई आलिंगन वीरवृत्ती। समाधानें॥ १८९॥

जगीं कीर्ति रूढवीं। स्वधर्माचा मानु वाढवीं।
इया भारापासोनि सोडवीं। मेदिनी हे॥ १९०॥

आतां पार्था निःशंकु होई। या संग्रामा चित्त देई।
एथ हें वांचूनि कांहीं। बोलों नये॥ १९१॥

ये मे मतमिदं नित्यमनुतिष्ठन्ति मानवाः॥
श्रद्धावन्तोऽनसूयन्तो मुच्यन्ते तेऽपि कर्मभिः॥ ३.३१॥

हें अनुपरोध मत माझें। जिहीं परमादरें स्वीकारिजे।
श्रद्धापूर्वक अनुष्ठिजे। धनुर्धरा॥ १९२॥

तेही सकळ कर्मी वर्ततु। जाण पां कर्मरहितु।
म्हणोनि हें निश्चितु। करणीय गा॥ १९३॥

ये त्वेतदभ्यसूयन्तो नानुतिष्ठन्ति मे मतम॥
सर्वज्ञानविमूढांस्तान्विद्धि नष्टानचेतसः॥ ३.३२॥

नातरी प्रकृतिमंतु होउनी। इंद्रिया लळा देउनी।
जे हें माझें मत अव्हेरुनी। वोसंडिती॥ १९४॥

जे सामान्यत्वें लेखिती। अवज्ञा करूनि देखिती।
कां हा अर्थवादु म्हणती। वाचाळपणें॥ १९५॥

ते मोहमदिरा भ्रमले। विषयविषें घेरिले।
अज्ञानपंकीं बुडाले। निभ्रांत मानीं॥ १९६॥

देखें शवाच्या हातीं दिधलें। जैसें कां रत्न वायां गेलें।
नातरी जात्यंधा पाहलें। प्रमाण नोहे॥ १९७॥

कां चंद्राचा उदयो जैसा। उपयोगा नवचे वायसा।
मूर्खा विवेकु हा तैसा। रुचेल ना॥ १९८॥

तैसे जे पार्था। विमुख या परमार्था।
तयांसी संभाषण सर्वथा। करावेना॥ १९९॥

म्हणोनि ते न मानिती। आणि निंदाही करूं लागती।
सांगें पतंग काय साहती। प्रकाशाते॥ २००॥

पतंगा दीपीं आलिंगन। तेथ त्यासी अचुक मरण।
तेवीं विषयाचरण। आत्मघाता॥ २०१॥

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि॥
प्रकृतिं यान्ति भूतानि निग्रहः किं करिष्यति॥ ३.३३॥

म्हणोनि इंद्रियें एकें। जाणतेनि पुरुखें
लाळावीं ना कौतुकें। आदिकरुनी॥ २०२॥

हां गा सर्पेंसी खेळों येईल। कीं व्याघ्रसंसर्ग सिद्धि जाईल।
सांगें हाळाहाळ जिरेल। सेविलिया काई॥ २०३॥

देखें खेळतां अग्नि लागला। मग तो न सांवरे जैसा उधवला।
तैसा इंद्रियां लळा दिधला। भला नोहे॥ २०४॥

एऱ्हवीं तरी अर्जुना। या शरीरा पराधीना।
कां नाना भोगरचना। मेळवावी॥ २०५॥

आपण सायासेंकरूनि बहुतें। सकळहि समृद्धिजातें।
उदोअस्तु या देहातें। प्रतिपाळावें कां॥ २०६॥

सर्वस्वें शिणोनि एथें। अर्जवावीं संपत्तिजातें।
तेणें स्वधर्मु सांडूनि देहातें। पोखावें काई॥ २०७॥

मग हें तंव पांचमेळावा। शेखीं अनुसरेल पंचत्वा।
ते वेळीं केला कें गिंवसावा। शीणु आपुला॥ २०८॥

म्हणूनि केवळ देहभरण। ते जाणें उघडी नागवण।
यालागीं एथ अंतःकरण। देयावे ना॥ २०९॥

इन्द्रियस्येंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ॥
तयोर्न वशमागच्छेत्तौ ह्यस्य परिपन्थिनौ॥ ३.३४॥

एऱ्हवीं इंद्रियांचियां अर्था। सारिखा विषयो पोषितां।
संतोषु कीर चित्ता। आपजेल॥ २१०॥

परी तो संवचोराचा सांगातु। जैसा नावेक स्वस्थु।
जंव नगराचा प्रांतु। सांडिजेना॥ २११॥

बापा विषाची मधुरता। झणें आवडी उपजे चित्ता।
परी तो परिणाम विचारितां। प्राणु हरी॥ २१२॥

देखें इंद्रियीं कामु असे। तो लावी सुखदुराशे।
जैसा गळीं मीनु आमिषें। भुलविजे गा॥ २१३॥

परी तयामाजी गळु आहे। जो प्राणातें घेऊनि जाये।
तो जैसा ठाउवा नोहे। झांकलेपणें॥ २१४॥

तैसे अभिलाषें येणें कीजेल। जरी विषयांची आशा धरिजेल।
तरी वरपडा होईजेल। क्रोधानळा॥ २१५॥

जैसा कवळोनियां पारधी। घातेचिये संधी।
आणी मृगातें बुद्धी। साधावया॥ २१६॥

एथ तैसीची परी आहे। म्हणूनि संगु हा तुज नोहे।
पार्था दोन्ही काम क्रोध हे। घातुक जाणें॥ २१७॥

म्हणऊनि हा आश्रयोचि न करावा। मनींही आठवो न धरावा।
एकु निजवृत्तीचा वोलावा। नासों नेदीं॥ २१८॥

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात्॥
स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः॥ ३.३५॥

अगा स्वधर्मु हा आपुला। जरी कां कठिणु जाहला।
तरी हाचि अनुष्ठिला। भला देखें॥ २१९॥

येरु आचारु जो परावा। तो देखतां कीर बरवा।
परी आचरतेनि आचरावा। आपुलाचि॥ २२०॥

सांगें शूद्रघरीं आघवीं। पक्वान्नें आहाति बरवीं।
तीं द्विजें केवीं सेवावीं। दुर्बळु जरी जाहला॥ २२१॥

हें अनुचित कैसेनि कीजे। अप्राप्य केवीं इच्छिजे।
अथवा इच्छिलेंही पाविजे। विचारी पां॥ २२२॥

तरी लोकांची धवळारें। देखोनियां मनोहरें।
असतीं आपुलीं तणारें। मोडावीं केवीं॥ २२३॥

हें असो वनिता आपुली। कुरूप जरी जाहली।
तऱ्ही भोगितां तेचि भली। जियापरी॥ २२४॥

तेवीं आवडे तैसा सांकडु। आचरतां जऱ्ही दुवाडु।
तऱ्ही स्वधर्मुचि सुरवाडु। पारत्रिकीचा॥ २२५॥

हां गा साकर आणि दूध। हें गौल्यें कीर प्रसिद्ध।
परी कृमिदोषीं विरुद्ध। घेपे केवीं॥ २२६॥

ऐसेनिही जरी सेविजेल। तरी ते आळुकीचि उरेल।
जे तें परिणामीं पथ्य नव्हेल। धनुर्धरा॥ २२७॥

म्हणोनि आणिकांसी जें विहित। आणि आपणपेयां अनुचित।
तें नाचरावें जरी हित। विचारिजे॥ २२८॥

या स्वधर्मातें अनुष्ठितां। वेचु होईल जीविता।
तोही निका वर उभयतां। दिसत असे॥ २२९॥

अर्जुन उवाच।
अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पूरुषः॥
अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः॥ ३.३६॥

ऐसें समस्त सुरशिरोमणी। बोलिले जेथ श्रीशार्ङ्गपाणी।
तेथ अर्जुन म्हणे विनवणी। असे देवा॥ २३०॥

हें जें तुम्हीं सांगितलें। तें सकळ कीर म्यां परिसलें।
परी आतां पुसेन कांहीं आपुलें। अपेक्षित॥ २३१॥

तरी देवा हें ऐसें कैसें। जे ज्ञानियांचीही स्थिति भ्रंशे।
मार्गु सांडुनि अनारिसे। चालत देखों॥ २३२॥

सर्वज्ञही जे होती। हे उपायही जाणती।
तेही परधर्में व्यभिचरति। कवणें गुणें॥ २३३॥

बीजा आणि भुसा। अंधु निवाडु नेणे जैसा।
नावेक देखणाही तैसा। बरळे कां पां॥ २३४॥

जे असता संगु सांडिती। तेचि संसर्गु करितां न धाती।
वनवासीही सेविती। जनपदातें॥ २३५॥

आपण तरी लपती। सर्वस्वें पाप चुकविती।
परी बलात्कारें सुइजती। तयाचि माजीं॥ २३६॥

जयांची जीवें घेती विवसी। तेचि जडोनि ठाके जीवेंसीं।
चुकवितां ते गिंवसी। तयातेंचि॥ २३७॥

ऐसा बलात्कारु एकु दिसे। तो कवणाचा एथ आग्रहो असे।
हें बोलावें हृषीकेशें। पार्थु म्हणे॥ २३८॥

श्रीभगवानुवाच।
काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः॥
महाशनो महापाप्मा विध्द्येनमिह वैरिणम्॥ ३.३७॥

तंव हृदयकमळआरामु। जो योगियांचा निष्काम कामु।
तो म्हणतसे पुरुषोत्तमु। सांगेन आइक॥ २३९॥

तरी हे काम क्रोधु पाहीं। जयांतें कृपेची सांठवण नाहीं।
हे कृतांताच्या ठायीं। मानिजती॥ २४०॥

हे ज्ञाननिधीचे भुजंग। विषयदरींचे वाघ।
भजनमार्गींचे मांग। मारक जे॥ २४१॥

हे देहदुर्गींचे धोंड। इंद्रियग्रामींचे कोंड।
यांचे व्यामोहादिक बंड। जगावरी॥ २४२॥

हे रजोगुण मानसाचे। समूळ आसुरियेचे।
धायपण ययांचे। अविद्या केलें॥ २४३॥

हे रजाचे कीर जाहले। तरी तमासी पढियंते भले।
तेणें निजपद यां दिधलें। प्रमादमोह॥ २४४॥

हे मृत्यूच्यानगरीं। मानिजती निकियापरी।
जे जीविताचे वैरी। म्हणऊनियां॥ २४५॥

जयांसि भुकेलियां आमिषा। हें विश्व न पुरेचि घांसा।
कुळवाडी यांची आशा। चाळीत असे॥ २४६॥

कौतुकें कवळितां मुठी। जिये चवदा भुवनें थेंकुटी।
तिये भ्रांति ही धाकुटी। वाल्हीदुल्ही॥ २४७॥

जे लोकत्रयाचें भातुकें। खेळतांचि खाय कवतिकें।
तिच्या दासीपणाचेनि बिकें। तृष्णा जिये॥ २४८॥

हें असो मोहें मानिजे। यांते अहंकारें घेपे दीजे।
जेणें जग आपुलेनि भोजें। नाचवीत असे॥ २४९॥

जेणें सत्याचा भोकसा काढिला। मग असत्य तृणकुटा भरिला।
तो दंभु रूढविला। जगीं इहीं॥ २५०॥

साध्वी शांति नागविली। मग माया मांगी शृंगारिली।
तियेकरवीं विटाळविलीं। साधुवृंदें॥ २५१॥

इहीं विवेकाची त्राय फेडिली। वैराग्याची खाल काढिली।
जितया मान मोडिली। उपशमाची॥ २५२॥

इहीं संतोषवन खांडिलें। धैर्यदुर्ग पाडिले।
आनंदरोप सांडिले। उपडूनियां॥ २५३॥

इहीं बोधाचीं रोपें लुंचिली। सुखाची लिपिही पुसली।
जिव्हारीं आगी सूदली। तापत्रयाची॥ २५४॥

हे आंगा तंव घडले। जीवींचि आथी जडले।
परी नातुडती गिंवसले। ब्रह्मादिकां॥ २५५॥

हे चैतन्याचे शेजारीं। वसती ज्ञानाच्या एका हारीं।
म्हणोनि प्रवर्तती महामारी। सांवरती ना॥ २५६॥

हे जळेंवीण बुडविती। आगीवीण जाळिती।
न बोलता कवळिती। प्राणियांते॥ २५७॥

हे शस्त्रेंवीण साधिती। दोरेंवीण बांधिती।
ज्ञानियासी तरी वधिती। पैज घेउनी॥ २५८॥

हे चिखलेंवीण रोंविती। पाशेंवीण गोंविती।
हे कवणाजोगें न होती। आंतुवटपणें॥ २५९॥

धूमेनाव्रियते वह्निः यथाऽऽदर्शो मलेन च॥
यथोल्बेनावृतो गर्भस्तथा तेनेदमावृतम्॥ ३.३८॥

जैसी चंदनाची मुळी। गंवसूनि घेपे व्याळीं।
नातरी उल्बाची खोळी। गर्भस्थासी॥ २६०॥

कां प्रभावीण भानु। धूमेवीण हुताशनु।
जैसा दर्पण मळहीनु। कहींच नसे॥ २६१॥

तैसें इहींवीण एकलें। आम्हीं ज्ञान नाहीं देखिलें।
जैसें कोंडोनि पां गुंतलें। बीज निपजे॥ २६२॥

आवृतं ज्ञानमेतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा॥
कामरूपेण कौन्तेय दुष्पूरेणाऽनलेन च॥ ३.३९॥

तैसें ज्ञान तरी शुद्ध। परी इहीं असे प्ररुद्ध।
म्हणोनि तें अगाध। होऊनि ठेलें॥ २६३॥

आधी यातें जिणावें। मग तें ज्ञान पावावें।
तंव पराभवो न संभवे। रागद्वेषां॥ २६४॥

यांतें साधावयालागीं। जें बळ आणिजे आंगीं।
तें इंधन जैसें आगी। सावावो होय॥ २६५॥

इन्द्रियाणि मनो बुद्धिरस्याधिष्ठानमुच्यते॥
एतैर्विमोहयत्येष ज्ञानमावृत्य देहिनम्॥ ३.४०॥

तैसे उपाय कीजती जे जे। ते यांसीचि होती विरजे।
म्हणोनि हटियांते जिणिजे। इहींचि जगीं॥ २६६॥

ऐसियांही सांकडां बोला। एक उपायो आहे भला।
तो करितां जरी आंगवला। तरी सांगेन तुज॥ २६७॥

तस्मात्त्वमिन्द्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ॥
पाप्मानं प्रजहि ह्येनं ज्ञानविज्ञाननाशनम्॥ ३.४१॥

इयांचा पहिला कुरुठा इंद्रियें। एथूनि प्रवृत्ति कर्मातें विये।
आधीं निर्दळूनि घालीं तियें। सर्वथैव॥ २६८॥

इन्द्रियाणि पराण्याहुरिन्द्रियेभ्यः परं मनः॥
मनसस्तु परा बुद्धिर्यो बुद्धेः परतस्तु सः॥ ३.४२॥

मग मनाची धांव पारुषेल। आणि बुद्धीची सोडवण होईल।
इतुकेनि थारा मोडेल। या पापियांचा॥ २६९॥

एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्यात्मानमात्मना॥
जहि शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदम्॥ ३.४३॥

हे अंतरीहूनि जरी फिटले। तरी निभ्रांत जाण निवटले।
जैसें रश्मीवीण उरलें। मृगजळ नाहीं॥ २७०॥

तैसे रागद्वेष जरी निमाले। तरी ब्रह्मीचें स्वराज्य आलें।
मग तो भोगी सुख आपुलें। आपणचि॥ २७१॥

ते गुरुशिष्याची गोठी। पदपिंडाची गांठी।
तेथ स्थिर राहोनि नुठीं। कवणे काळीं॥ २७२॥

ऐसें सकळ सिद्धांचा रावो। देवी लक्ष्मीयेचा नाहो।
राया ऐकें देवदेवो। बोलता जाहला॥ २७३॥

आतां पुनरपि तो अनंतु। आद्य एकी मातु।
सांगेल तेथ पंडुसुतु। प्रश्नु करील॥ २७४॥

तया बोलाचा हन पाडु। का रसवृत्तीचा निवाडु।
येणें श्रोतयां होईल सुरवाडु। श्रवणसुखाचा॥ २७५॥

ज्ञानदेवो म्हणे निवृत्तीचा। चांग उठावा करूनि उन्मेषाचा।
मग संवादु श्रीहरिपार्थाचा। भोगावा बापा॥ २७६॥

॥ इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे कर्मयोगोनाम तृतीयोऽध्यायः॥

इति श्रीज्ञानदेवविरिचितायां भावार्थदीपिकायां
तृतीयोऽध्यायः॥ ३ ॥
ओंव्या २७६। श्लोक ४३।

# 4 Transcendental Knowledge ज्ञानकर्मसंन्यासयोग

श्रीमद्भगवद्गीता चतुर्थोध्यायः
ज्ञानेश्वरी अध्याय चवथा

---

आजि श्रवणेंद्रिया पिकलें। जे येणे गीतानिधान देखिलें।
आतां स्वप्नचि हें तुकलें। साचासरिसे ॥ १॥

आधींचि विवेकाची गोठी। वरी प्रतिपादी श्रीकृष्ण जगजेठी।
आणि भक्तराजु किरीटी। परिसत असे ॥ २॥

जैसा पंचमालापु सुगंधु। कीं परिमळु आणि सुस्वादु।
तै भला जाहला विनोदु। कथेचा इये ॥ ३॥

कैसी आगळिक दैवाची। जे गंगा वोळली अमृताची।
हो कां जपतपें श्रोतयांचीं। फळा आली ॥ ४॥

आतां इंद्रियजात आघवें। तिहीं श्रवणाचें घर रिघावें।
मग संवादसुख भोगावें। गीताख्य हें ॥ ५॥

हा अतिसो अतिप्रसंगें। सांडूनि कथाचि ते सांगें।
जे कृष्णार्जुनु दोघे। बोलत होते ॥ ६॥

ते वेळीं संजयो रायातें म्हणे। अर्जुनु अधिष्ठिला दैवगुणें।
जे अतिप्रीति नारायणें। बोलिजतु असे ॥ ७॥

जें न सांगेचि पितया वसुदेवासी। जें न सांगेचि माते देवकीसी।
जें न सांगेचि बळिभद्रासी। तें गुह्य अर्जुनेंशीं बोलत ॥ ८॥

देवी लक्ष्मी येवढी जवळिक। तेही न देखे या प्रेमाचें सुख।
आजि कृष्णप्रेमाचें बिक। यातेंचि आथी ॥ ९॥

सनकादिकांचिया आशा। वाढीनल्या होतिया कीर बहुवसा।
परी त्याही येणें मानें यशा। येतीचिना ॥ १०॥

या श्रीजगदीश्वराचें प्रेम। एथ दिसतसे निरुपम।
कैसें पार्थें येणें सर्वोत्तम। पुण्य केलें ॥ ११॥

हो कां जयाचिया प्रीती। अमूर्त हा आला व्यक्ती।
मज एकवंकी याची स्थिती। आवडतु असे ॥ १२॥

एऱ्हवीं हा योगियां नाडळे। वेदार्थासी नाकळे।
जेथ ध्यानाचेही डोळे। पावतीना। ॥ १३॥

तो हा निजस्वरूप। अनादि निष्कंप।
परी कवणें मानें सकृप। जाहला आहे। ॥ १४॥

हा त्रैलोक्यपटाची घडी। आकाराची पैलथडी।
कैसा याचिये आवडी। आवरला असे। ॥ १५॥

श्रीभगवानुवाच।
इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम् ॥
विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत् ॥ ४.१॥

मग देव म्हणे अगा पंडुसुता। हाचि योगु आम्हीं विवस्वता।
कथिला परी ते वार्ता। बहुवां दिवसांची। ॥ १६॥

मग तेणे विवस्वतें रवी। हे योगस्थिति आघवी।
निरूपिली बरवी। मनूप्रती ॥ १७॥

मनूनें आपण अनुष्ठिली। मग इक्ष्वाकुवा उपदेशिली।
ऐसी परंपरा विस्तारिली। आद्य हे गा ॥ १८॥

एवं परंपरा प्राप्तमिमं राजर्षयो विदुः ॥
स कालेनेह महता योगो नष्टः परंतप ॥ ४.२॥

मग आणिकहि या योगातें। राजर्षि जाहले जाणते।
परी तेथोनि आतां सांप्रतें। नेणिजे कोणी ॥ १९॥

जे प्राणिया कामीं भरु। देहाचिवरी आदरु।
म्हणोनि पडिला विसरु। आत्मबोधाचा ॥ २०॥

अव्हांटलिया आस्था बुद्धि। विषय सुखचि परमावधि।
जीवु तैसा उपाधि। आवडे लोकां ॥ २१॥

एऱ्हवीं तऱ्ही खवणेयांच्या गांवीं। पाटाउवें काय करावीं।
सांगें जात्यंधा रवी। काय आथी ॥ २२॥

कां बहिरयांच्या आस्थानीं। कवण गीतातें मानी।
कीं कोल्हेया चांदणीं। आवडी उपजे ॥ २३॥

पैं चंद्रोदया आरौतें। जयांचे डोळे फुटती असते।
ते कावळे केवीं चंद्रातें। वोळखती ॥ २४॥

तैसे वैराग्याची शिंव न देखती। जे विवेकाची भाष नेणती।
ते मूर्ख केंवीं पावती। मज ईश्वरातें ॥ २५॥

कैसा नेणों मोहो वाढीनला। तेणें बहुतेक काळु व्यर्थ गेला।
म्हणोनि योगु हा लोपला। लोकीं इये ॥ २६॥

स एवाऽयं मया तेऽद्य योगः प्रोक्तः पुरातनः ॥
भक्तोऽसि मे सखा चेति रहस्यं ह्येतदुत्तमम् ॥ ४.३॥

तोचि हा आजि आतां। तुजप्रती कुंतीसुता।
सांगितला आम्हीं तत्त्वता। भ्रांति न करीं ॥ २७॥

हें जीवींचें निज गुज। परी केवीं राखों तुज।
जे पढियेसी तूं मज। म्हणऊनियां ॥ २८॥

तूं प्रेमाचा पुतळा। भक्तीचा जिव्हाळा।
मैत्रियेची चित्कळा। धनुर्धरा ॥ २९॥

तूं अनुसंगाचा ठावो। आतां तुज काय वंचूं जावों।
जऱ्ही संग्रामारूढ आहों। जाहलों आम्ही ॥ ३०॥

तरी नावेक हें साहावें। गाजाबज्यही न धरावें।
परी तुझें अज्ञानत्व हरावें। लागे आधीं ॥ ३१॥

अर्जुन उवाच।
अपरं भवतो जन्म परं जन्म विवस्वतः ॥
कथमेतद्विजानीयां त्वमादौ प्रोक्तवानिति ॥ ४.४॥

तंव अर्जुन म्हणे श्रीहरी। माय आपलेयाचा स्नेहो करी।
एथ विस्मयो काय अवधारीं। कृपानिधी ॥ ३२॥

तूं संसारश्रांतांची साउली। अनाथा जीवांची माउली।
आमुतें कीर प्रसवली तुझीच कृपा ॥ ३३॥

देवा पांगुळ एखादें विइजे। तरी जन्मौनि जोजारु साहिजे।
हें बोलों काय तुझें। तुजचि पुढां ॥ ३४॥

आतां पुसेन जें मी कांहीं। तेथ निकें चित्त देईं।
तेवींचि देवें कोपावें ना कांहीं। बोला एका ॥ ३५॥

तरी मागील जे वार्ता। तुवां सांगितली होती अनंता।
ते नावेक मज चित्ता। मानेचिना ॥ ३६॥

जे तो विवस्वतु म्हणजे कायी। ऐसें हें वडिलां ठाउवें नाहीं।
तरी तुवांचि केवीं पाहीं। उपदेशिला ॥ ३७॥

तो तरी आइकजे बहुतां काळांचा। आणि तूं तंव श्रीकृष्ण सांपेचा।
म्हणोनि गा इये मातुचा। विसंवादु ॥ ३८॥

तेवींचि देवा चरित्र तुझें। आपण कांहींचि काय जाणिजे।
हें लटिकें केवीं म्हणिजे। एकिहेळां ॥ ३९॥

परी हेचि मातु आघवी। मी परियेसें तैशी सांगावी।
जे तुवांचि तया रवि केवीं। उपदेशु केला ॥ ४०॥

श्रीभगवानुवाच।
बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन ॥
तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परन्तप ॥ ४.५॥

तंव श्रीकृष्ण म्हणे पंडुसुता। तो विवस्वतु जैं होता।
तैं आम्हीं नसों ऐसी चित्ता। भ्रांति जरी तुज ॥ ४१॥

तरी तूं गा हें नेणसी। पैं जन्में आम्हां तुम्हांसी।
बहुतें गेलीं परी तियें न स्मरसी। आपुलीं तूं ॥ ४२॥

मी जेणें जेणें अवसरें। जें जें होऊनि अवतरें।
तें समस्तही स्मरें। धनुर्धरा ॥ ४३॥

अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन् ।
प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया ॥ ४.६॥

म्हणोनि हें आघवें। मागील मज आठवें।
मी अजुही परि संभवें। प्रकृतियोगें ॥ ४४॥

माझें अव्ययत्व तरी न नसे। परी होणें जाणें एक दिसे।
तें प्रतिबिंबे मायावशें। माझ्यांचि ठायीं ॥ ४५॥

माझी स्वतंत्रता तरी न मोडे। परी कर्माधीनु ऐसा आवडे।
तेंही भ्रांतिबुद्धि तरी घडे। एऱ्हवीं नाहीं ॥ ४६॥

कीं एकचि दिसे दुसरें। तें दर्पणाचेनि आधारें।
एऱ्हवीं काय वस्तुविचारें। दुजें आहे ॥ ४७॥

तैसा अमूर्तचि मी किरीटी। परी प्रकृति जैं अधिष्ठीं।
तैं साकारपणें नट नटीं। कार्यालागीं ॥ ४८॥

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ॥
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहं ॥ ४.७॥

जें धर्मजात आघवें। युगायुगीं म्यां रक्षावें।
ऐसा ओघु हा स्वभावें। आद्य असे ॥ ४९॥

म्हणोनि अजत्व परतें ठेवीं। मी अव्यक्तपणही नाठवीं।
जे वेळीं धर्मातें अभिभवी। अधर्मु हा ॥ ५०॥

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम ॥
धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे ॥ ४.८॥

ते वेळीं आपुल्याचेनि कैवारें। मी साकारु होऊनि अवतरें।
मग अज्ञानाचें आंधारें। गिळूनि घालीं ॥ ५१॥

अधर्माची अवधी तोडीं। दोषांचीं लिहिलीं फाडीं।
सज्जनांकरवीं गुढी। सुखाची उभवीं ॥ ५२॥

दैत्यांचीं कुळें नाशीं। साधूंचा मानु गिंवशीं।
धर्मासीं नीतीशीं। शेंज भरीं ॥ ५३॥

मी अविवेकाची काजळी। फेडूनि विवेकदीप उजळीं।
तैं योगियां पाहे दिवाळी। निरंतर ॥ ५४॥

स्वसुखें विश्व कोंदे। धर्मचि जगीं नांदें।
भक्तां निघती दोंदें। सात्त्विकाचीं ॥ ५५॥

तैं पापाचा अचळु फिटे। पुण्याची पहाट फुटे।
जैं मूर्ति माझी प्रगटे। पंडुकुमरा ॥ ५६॥

ऐसेया काजालागीं। अवतरें मी युगीं युगीं।
परी हेंचि वोळखे जो जगीं। तो विवेकिया ॥ ५७॥

जन्म कर्म च मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्वतः ॥
त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन ॥ ४.९॥

माझें अजत्वें जन्मणें। अक्रियताचि कर्म करणें।
हें अविकार जो जाणे। तो परममुक्त ॥ ५८॥

तो चालिला संगे न चळे। देहींचा देहा नाकळे।
मग पंचत्वीं तंव मिळे। माझ्यांचि रूपीं ॥ ५९॥

वीतरागभयक्रोधा मन्मया मामुपाश्रिताः ॥
बहवो ज्ञानतपसा पूता मद्भावमागताः ॥ ४.१०॥

एऱ्हवीं परापर न शोचिती। जे कामनाशून्य होती।
वाटा केंवेळीं न वचती। क्रोधाचिया ॥ ६०॥

जे सदा मियाचि आथिले। माझिया सेवा जियाले।
कां आत्मबोधें तोषले। वीतराग जे ॥ ६१॥

जे तपोतेजाचिया राशी। कीं एकायतन ज्ञानासी।
जे पवित्रता तीर्थांसी। तीर्थरूप ॥ ६२॥

ते मद्भावा सहजें आले। मी तेचि ते होऊनि ठेले।
जे मज तयां उरले। पदर नाहीं ॥ ६३॥

सांगे पितळेचि गंधिकाळिक। जैं फिटली होय निःशेख।
तैं सुवर्ण काई आणिक। जोडूं जाईजे ॥ ६४॥

तैसे यमनियमीं कडसले। जे तपोज्ञानीं चोखाळले।
मी तेचि ते जाहले। एथ संशयो कायसा ॥ ६५॥

ये यथा मां प्रपद्यन्ते तान्स्तथैव भजाम्यहम् ॥
मम वर्त्माऽनुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥ ४.११॥

एऱ्हवीं तरी पाहीं। जे जैसे माझ्या ठायीं।
भजती तयां मीही। तैसाचि भजें ॥ ६६॥

देखें मनुष्यजात सकळ। हें स्वभावता भजनशीळ।
जाहलें असे केवळ। माझ्यां ठायीं ॥ ६७॥

कांक्षन्तः कर्मणां सिद्धिं यजन्त इह देवताः ॥
क्षिप्रं हि मानुषे लोके सिद्धिर्भवति कर्मजा ॥ ४.१२॥

परी ज्ञानेंवीण नाशिले। जे बुद्धिभेदासी आले।
त्यांनी एकाचि यया कल्पिलें। अनेकत्व ॥ ६८॥

म्हणऊनि अभेदीं भेदु देखती। यया अनामया नामें ठेविती।
देवी देवो म्हणती। अचर्चातें ॥ ६९॥

जें सर्वत्र सदा सम। तेथ विभाग अधमोत्तम।
मतिवशें संभ्रम। विवंचिती ॥ ७०॥

मग नाना हेतुप्रकारें। यथोचितें उपचारें।
मानिलीं देवतांतरें। उपासिती ॥ ७१॥

तेथ जें जें अपेक्षित। तें तैसेंचि पावती समस्त।
परी तें कर्मफळ निश्चित। वोळख तूं ॥ ७२॥

वांचूनि देतें घेतें आणिक। निभ्रांत नाहीं सम्यक।
एथ कर्मचि फळसूचक। मनुष्यलोकीं ॥ ७३॥

जैसें क्षेत्रीं जें पेरिजे। तेंवाचूनि आन न निपजे।
कां पाहिजे तेंचि देखिजे। दर्पणाधारें ॥ ७४॥

नातरी कडेयातळवटीं। जैसा आपुलाचि बोलु किरीटी।
पडिसादु होऊनि उठी। निमित्तयोगें ॥ ७५॥

तैसा समस्तां यां भजनां। मी साक्षिभूतु पैं अर्जुना।
एथ प्रतिफळे भावना। आपुलाली ॥ ७६॥

चातुर्वर्ण्यं मया सृष्टम गुणकर्मविभागशः ॥
तस्य कर्तारमपि मां विद्ध्यकर्तारमव्ययम् ॥ ४.१३॥

आतां याचिपरी जाण। चाऱ्ही आहेती हे वर्ण।
सृजिले म्यां गुण। कर्मविभागे ॥ ७७॥

हें मजचिस्तव जाहलें। परी म्यां नाहीं केलें।
ऐसें जेणें जाणितलें। तो सुटला गा ॥ ७८॥

न मां कर्माणि लिंपंति न मे कर्मफल स्पृहा ॥
इति माम योऽभिजानाति कर्मभिर्न स बद्ध्यते ॥ ४.१४॥

जे प्रकृतीचेनि आधारें। गुणाचेनि व्यभिचारें।
कर्मं तदनुसारें। विवंचिलीं ॥ ७९॥

एथ एकचि हे धनुष्यपाणी। परी जाहले गा चहूं वर्णीं।
ऐसी गुणकर्मी कडसणी। केली सहजें ॥ ८०॥

म्हणोनि आइकें पार्था। हे वर्णभेदसंस्था।
मी कर्ता नव्हे सर्वथा। याचिलागीं ॥ ८१॥

एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभिः ।
कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम् ॥ ४.१५॥

मागील मुमुक्षु जे होते। तिहीं ऐशियाचि जाणोनि मातें।
कर्में केलीं समस्तें। धनुर्धरा ॥ ८२॥

पेरितां बीजें जैसीं दग्धलीं। नुगवतीचि पेरिलीं।
तैशीं कर्मेंचि परि तयां जाहलीं। मोक्षहेतु ॥ ८३॥

एथ आणिकही एक अर्जुना। हे कर्माकर्म विवंचना।
आपुलिये चाडे सज्ञाना। योग्य नोहे ॥ ८४॥

किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः ॥
तत्ते कर्म प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ॥ ४.१६॥

कर्म म्हणिजे तें कवण। अथवा अकर्मा काय लक्षण।
ऐसें विचारितां विचक्षण। गुंफोनि ठेले ॥ ८५॥

जैसें कां कुडें नाणें। खऱ्याचेनि सारखेपणें।
डोळ्याचेंहि देखणें। संशयीं घाली ॥ ८६॥

तैसें नैष्कर्म्यतेचेनि भ्रमें। गिंवसिजत आहाती कर्मे।
जे दुजी सृष्टी मनोधर्मे। करूं सकती ॥ ८७॥

वांचूनि मूर्खाची गोठी कायसी। एथ मोहले गा क्रांतदर्शी।
म्हणोनि आतां तेचि परियेसीं। सांगेन तुज ॥ ८८॥

कर्मणो ह्यपि बोद्धव्यं बोद्धव्यं च विकर्मणः ॥
अकर्मणश्च बोद्धव्यं गहना कर्मणो गतिः ॥ ४.१७॥

तरी कर्म म्हणजे स्वभावें। जेणें विश्वाकारु संभवे।
तें सम्यक आधीं जाणावें। लागे एथ ॥ ८९॥

मग वर्णाश्रमासि उचित। जे विशेष कर्म विहित।
तेंही वोळखावें निश्चित। उपयोगेंसीं ॥ ९०॥

पाठीं जें निषिद्ध म्हणिपे। तेंही बुझावें स्वरूपें।
येतुलेंनि येथ कांहीं न गुंफे। आपैसेंचि ॥ ९१॥

एऱ्हवीं जग हें कर्माधीन। ऐसी याची व्याप्ती गहन।
परी तें असो आइकें चिन्ह। प्राप्ताचें गा ॥ ९२॥

कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः ॥
स बुद्धिमान्मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत् ॥ ४.१८॥

जो सकळकर्मी वर्ततां। देखे आपुली नैष्कर्म्यता।
कर्मसंगें निराशता। फळाचिया ॥ ९३॥

आणि कर्तव्यतेलागीं। जया दुसरें नाहीं जगीं।
ऐसिया नैष्कर्म्यता तरी चांगी। बोधला असे ॥ ९४॥

परी क्रियाकलापु आघवा। आचरतु दिसे बरवा।
तरी तो इहीं चिन्हीं जाणावा। ज्ञानिया गा ॥ ९५॥

जैसा कां जळापाशीं उभा ठाके। तो जरी आपणपें जळामाजिं देखे।
तरि तो निभ्रांत वोळखे। म्हणे मी वेगळा आहें ॥ ९६॥

अथवा नावे हन जो रिगे। तो थडियेचे रुख जातां देखे वेगें।
तेचि साचोकारें जों पाहों लागे। तंव रुख म्हणे अचळ ॥ ९७॥

तैसें सर्व कर्मीं असणें। तें फुडें मानूनि वायाणें।
मग आपणपें जो जाणे। नैष्कर्म्यु ऐसा ॥ ९८॥

आणि उदोअस्ताचेनि प्रमाणें। जैसें न चलतां सूर्याचें चालणें।
तैसें नैष्कर्म्यतत्त्व जाणे। कर्मीचि असतां ॥ ९९॥

तो मनुष्यासारिखा तरी आवडे। परी मनुष्यत्व तया न घडे।
जैसें जळामाजीं न बुडे। भानुबिंब ॥ १००॥

तेणें न पाहतां विश्व देखिलें। न करितां सर्व केलें।
न भोगितां भोगिलें। भोग्यजात ॥ १०१॥

एकेचि ठायीं बैसला। परि सर्वत्र तोचि गेला।
हें असो विश्व जाहला। आंगेंचि तो ॥ १०२॥

यस्य सर्वे समारंभाः कामसंकल्पवर्जिताः ॥
ज्ञानाग्निदग्धकर्माणं तमाहुः पण्डितं बुधाः ॥ ४.१९॥

जया पुरुषाच्या ठायीं। कर्माचा तरी खेदु नाहीं।
परी फळापेक्षा कांहीं। संचरेना ॥ १०३॥

आणि हें कर्म मी करीन। अथवा आदरिलें सिद्धी नेईन।
येणें संकल्पेंही जयाचें मन। विटाळेना ॥ १०४॥

ज्ञानाग्नीचेनि मुखें। जेणें जाळिलीं कर्मे अशेखें।
तो परब्रह्मचि मनुष्यवेखें वोळख तूं ॥ १०५॥

त्यक्त्वा कर्मफलासंगं नित्यतृप्तो निराश्रयः ॥
कर्मण्यभिप्रवृत्तोऽपि नैव किंचित्करोति सः ॥ ४.२०॥

जो शरीरीं उदासु। फळभोगीं निरासु।
नित्यता उल्हासु। होऊनि असे ॥ १०६॥

जो संतोषाचां गाभारां । आत्मबोधाचिया वोगरा।
पुरे न म्हणेचि धनुर्धरा। आरोगितां ॥ १०७॥

निराशीर्यतचित्तात्मा त्यक्तसर्वपरिग्रहः ॥
शारीरं केवलं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥ ४.२१॥

कैसी आधिकाधिक आवडी। घेत महासुखाची गोडी।
सांडोनियां आशा कुरोंडी। अहंभावेंसीं ॥ १०८॥

म्हणोनि अवसरें जें जें पावे। कीं तेणेंचि तो सुखावे।
जया आपुलें आणि परावें। दोन्हीं नाहीं ॥ १०९॥

तो दिठी जें पाहे। तें आपणचि होऊनि जाये।
आइके तें आहे। तोचि जाहाला ॥ ११०॥

चरणीं हन चाले। मुखें जें जें बोले।
ऐसें चेष्टाजात तेतुलें। आपणचि जो ॥ १११॥

हें असो विश्व पाहीं। जयासि आपणपेंवांचूनि नाहीं।
आतां कवण तें कर्म कायी। बाधी तयातें ॥ ११२॥

यदृच्छालाभसन्तुष्टो द्वन्द्वातीतो विमत्सरः ॥
समः सिद्धावसिद्धौ च कृत्वापि न निबद्ध्यते ॥ ४.२२॥

हा मत्सरु जेथ उपजे। तेतुलें नुरेचि जया दुजें ।
तो निर्मत्सरु काइ म्हणिजे। बोलवरी ॥ ११३॥

म्हणोनि सर्वांपरी मुक्तु। तो सकर्मुचि कर्मरहितु।
सगुण परि गुणातीतु। एथ भ्रांति नाहीं ॥ ११४॥

गतसङ्गस्य मुक्तस्य ज्ञानावस्थितचेतसः ॥
यज्ञायाचरतः कर्म समग्रं प्रविलीयते ॥ ४.२३॥

तो देहसंगें तरी असे। परी चैतन्यासारिखा दिसे।
पाहतां परब्रह्माचेनि कसें। चोखाळु भला ॥ ११५॥

ऐसाही परी कौतुकें। जरी कर्में करी यज्ञादिकें।
तरी तियें लया जाती निःशेखें। तयाचांचि ठायीं ॥ ११६॥

अकाळींचीं अभ्रें जैशीं। उर्मीवीण आकाशीं।
हारपती आपैशीं। उदयलीं सांतीं ॥ ११७॥

तैशीं विधिविधान विहितें। जरी आचरे तो समस्तें।
तरी तियें ऐक्यभावें ऐक्यातें। पावतीचि गा ॥ ११८॥

ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ॥
ब्रह्मैव तेन गंतव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥ ४.२४॥

जें हें हवन मी होता। कां इयें यज्ञीं हा भोक्ता।
ऐसिया बुद्धीसि नाहीं भंगता। म्हणऊनियां ॥ ११९॥

जे इष्टयज्ञ यजावे। तें हविर्मंत्रादि आघवें।
तो देखतसे अविनाशभावें। आत्मबुद्धि ॥ १२०॥

म्हणऊनि ब्रह्म तेंचि कर्म। ऐसें बोधा आलें जया सम।
तया कर्तव्य तें नैष्कर्म्य। धनुर्धरा ॥ १२१॥

आतां अविवेक कुमारत्वा मुकले। जयां विरक्तीचें पाणिग्रहण जाहलें।
मग उपासन जिहीं आणिलें। योगाग्नीचें ॥ १२२॥

दैवमेवापरे यज्ञं योगिनः पर्युपासते ॥
ब्रह्माग्नावपरे यज्ञं यज्ञेनैवोपजुह्वति ॥ ४.२५॥

जे यजनशील अहर्निशी। जिहीं अविद्या हविली मनेसीं।
गुरुवाक्यहुताशीं। हवन केलें ॥ १२३॥

तिहीं योगाग्निकीं यजिजे। तो दैवयज्ञ म्हणिजे।
जेणें आत्मसुख कामिजे। पंडुकुमरा ॥ १२४॥

दैवास्तव देहाचें पाळण। ऐसा निश्चयो परिपूर्ण।
जो चिंतीना देहभरण। तो महायोगी जाण। दैवयोगें॥ १२५॥

आतां अवधारीं सांगेन आणिक। जे ब्रह्माग्नी साग्निक।
तयांतें यज्ञेंचि यज्ञ देख। उपासिजे ॥ १२६॥

श्रोत्रादीनीन्द्रियाण्यन्ये संयमाग्निषु जुह्वति ॥
शब्दादीन्विषयानन्य इन्द्रियाग्निषु जुह्वति ॥ ४.२६॥

एक संयमाग्निहोत्री। ते युक्तित्रयाच्या मंत्रीं।
यजन करिती पवित्रीं। इंद्रियद्रव्यीं ॥ १२७॥

एकां वैराग्य रवि विवळे। तंव संयती विहार केले।
तेथ अपावृत जाहलें। इंद्रियानळ ॥ १२८॥

तिहीं विरक्तीची ज्वाळा घेतली। तंव विकारांचीं इंधनें पळिपलीं।

तेथ आशाधूमें सांडिली। पांचही कुंडें ॥ १२९ ॥

मग वाक्यविधीचिया निरवडी। विषय आहुती उदंडी।
हवन केलें कुंडीं। इंद्रियाग्नीच्या ॥ १३० ॥

सर्वाणीन्द्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे ॥
आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते ॥ ४.२७ ॥

एकीं ययापरी पार्था। दोषु क्षाळिले सर्वथा।
आणिकीं हृदयारणीं मंथा। विवेकु केला ॥ १३१ ॥

तो उपशमें निहटिला। धैर्यभारीं दाटला।
गुरुवाक्यें काढिला। बळकटपणें ॥ १३२ ॥

ऐसें समरसें मंथन केलें। तेथ झडकरी काजा आलें।
जे उज्जीवन जहालें ज्ञानाग्नीचें ॥ १३३ ॥

पहिला ऋद्धिसिद्धीचा संभ्रमु। तो निवर्तोनि गेला धूमु।
मग प्रगटला सूक्ष्मु। विस्फुलिंगु ॥ १३४ ॥

तया मनाचें मोकळें। तेंचि पेटवण घातलें।
जें यमदमीं हळुवारलें। आइतें होतें ॥ १३५ ॥

तेणें सादुकपणें ज्वाळा समृद्धा। मग वासनांतराचिया समिधा।
स्नेहेंसि नानाविधा। जाळिलिया ॥ १३६ ॥

तेथ सोहंमंत्रें दीक्षितीं। इंद्रियकर्मांचिया आहुती।
तिये ज्ञानानळीं प्रदीप्तीं। दिधलिया ॥ १३७ ॥

पाठीं प्राणक्रियेचेनि स्रुवेनिशीं। पूर्णाहुती पडली हुताशीं।
तेथ अवभ्रुथ समरसीं। सहजें जाहलें। ॥ १३८ ॥

मग आत्मबोधींचें सुख। जें संयमाग्नीचें हुतशेष।
तोचि पुरोडाशु देख। घेतला तिहीं ॥ १३९ ॥

एक ऐशिया इहीं यजनीं मुक्त ते जाहले त्रिभुवनीं।
या यज्ञक्रिया तरी आनानी। परि प्राप्य तें एक ॥ १४० ॥

द्रव्ययज्ञास्तपोयज्ञा योगयज्ञास्तथाऽपरे ॥
स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च यतयः संशितव्रताः ॥ ४.२८ ॥

एक द्रव्ययज्ञ म्हणिपती। एक तपसामग्रिया निपजविती।
एक योगयागुही आहाती। जे सांगितले ॥ १४१ ॥

एकीं शब्दीं शब्दु यजिजे। तो वाग्यज्ञ म्हणिजे।
ज्ञानें ज्ञेय गमिजे। तो ज्ञानयज्ञ ॥ १४२ ॥

हें अर्जुना सकळ कुवाडें। जे अनुष्ठितां अतिसांकडे।
परी जितेंद्रियासीचि घडे। योग्यतावशें ॥ १४३ ॥

ते प्रवीण तेथ भले। आणि योगसमृद्धि आथिले।
म्हणोनि आपणपां तिहीं केलें। आत्महवन ॥ १४४ ॥

अपाने जुह्वति प्राणं प्राणेऽपानं तथाऽपरे ॥
प्राणापानगती रुद्ध्वा प्राणायामपरायणाः ॥ ४.२९ ॥

मग अपानाग्नीचे मुखीं। प्राणद्रव्यें देखीं।
हवन केलें एकीं। अभ्यासयोगें ॥ १४५ ॥

एक अपानु प्राणीं अर्पिती। एक दोहींतेंही निरुंधिती।
ते प्राणायामी म्हणिपती। पंडुकुमरा ॥ १४६ ॥

अपरे नियताहाराः प्राणान्प्राणेषु जुह्वति ॥
सर्वेऽप्येते यज्ञविदो यज्ञक्षपितकल्मषाः ॥ ४.३० ॥

एक वज्रयोगक्रमें। सर्वाहारसंयमें।
प्राणीं प्राणु संभ्रमें। हवन करिती ॥ १४७ ॥

ऐसें मोक्षकाम सकळ। समस्त हे यजनशीळ।
जिहीं यज्ञद्वारा मनोमळ। क्षाळण केले ॥ १४८ ॥

जया अविद्याजात जाळितां। जें उरलें निजस्वभावता।
जेथ अग्नि आणि होता। उरेचि ना ॥ १४९ ॥

जेथ यजितयाचा कामु पुरे। यज्ञींचें विधान सरे।
मागुतें जेथूनि वोसरे। क्रियाजात ॥ १५० ॥

विचार जेथ न रिगे। हेतु जेथ न निगे।
जे द्वैतदोषसंगें। लिंपेचि ना ॥ १५१ ॥

यज्ञशिष्टामृतभुजो यान्ति ब्रह्म सनातनम् ॥
नायं लोकोऽस्त्ययज्ञस्य कुतोऽन्यः कुरुसत्तम ॥ ४.३१ ॥

ऐसें अनादिसिद्ध चोखट। जें ज्ञान यज्ञावशिष्ट।
तें सेविती ब्रह्मनिष्ठ। ब्रह्माहंमंत्रें ॥ १५२॥

ऐसे शेषामृतें धाले। कीं अमर्त्यभावा आले।
म्हणोनि ब्रह्म ते जाहले। अनायासें ॥ १५३॥

येरां विरक्ति माळ न घालीचि। जयां संयमाग्नीची सेवा न घडेचि।
जे योगुयागु न करितीचि। जन्मले सांते ॥ १५४॥

जयां ऐहिक धड नाहीं। तयांचे परत्र पुससी काई।
म्हणोनि सांगों कां वांई। पंडुकुमरा ॥ १५५॥

एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे ॥
कर्मजान्विद्धि तान्सर्वानेवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे ॥ ४.३२॥

ऐसें बहुतीं परी अनेग। जे सांगितले तुज कां याग।
ते विस्तारूनि वेदेंचि चांग। म्हणितले आहाती ॥ १५६॥

परि तेणें विस्तारें काय करावें। हेंचि कर्मसिद्ध जाणावें।
येतुलेनि कर्मबंधु स्वभावें। पावेल ना ॥ १५७॥

श्रेयान् द्रव्यमयात् यज्ञात् ज्ञानयज्ञः परंतप ॥
सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ॥ ४.३३॥

अर्जुना वेदु जयांचे मूळ। जे क्रियाविशेषे स्थूळ।
जयां नव्हाळियेचें फळ। स्वर्गसुख ॥ १५८॥

ते द्रव्यादियागु कीर होती। परी ज्ञानयज्ञाची सरी न पवती।
जैशी तारातेजसंपत्ती। दिनकरापाशीं ॥ १५९॥

देखें परमात्मसुखनिधान। साधावया योगीजन।
जें न विसंबिती अंजन। उन्मेषनेत्रीं ॥ १६०॥

जें धांवतया कर्माची लाणी। नैष्कर्म्यबोधाची खाणी।
जें मुकेलिया धणी। साधनाची ॥ १६१॥

जेथ प्रवृत्ति पांगुळ जाहली। तर्काची दृष्टी गेली।
जेणें इंद्रियें विसरलीं। विषयसंगु ॥ १६२॥

मनाचें मनपण गेलें। जेथ बोलाचें बोलपण ठेलें।
जयामाजि सांपडलें। ज्ञेय दिसे ॥ १६३॥

जेथ वैराग्याचा पांगु फिटे। विवेकाचाही सोसु तुटे।
जेथ न पाहतां सहज भेटे। आपणपें ॥ १६४॥

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया॥
उपदेक्षन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥ ४.३४॥

तें ज्ञान पैं गा बरवें। जरी मनीं आथि आणावें।
तरी संतातें यां भजावें। सर्वस्वेंसीं ॥ १६५॥

जे ज्ञानाचा कुरुठा। तेथ सेवा हा दारवंटा।
तो स्वाधीन करिती सुभटा। वोळगोनी ॥ १६६॥

तरी तनुमनुजीवें। चरणासीं लागावें।
आणि अगर्वता करावें। दास्य सकळ ॥ १६७॥

मग अपेक्षित जें आपुलें। तेंही सांगतील पुसिलें।
जेणें अंतःकरण बोधलें। संकल्पा न ये ॥ १६८॥

यज्ज्ञात्वा न पुनर्मोहमेवं यास्यसि पांडव ॥
येन भूतान्यशेषेण द्रक्ष्यस्यात्मन्यथो मयि ॥ ४.३५॥

जयाचेनि वाक्य उजिवडें। जाहलें चित्त निधडें।
ब्रह्माचेनि पाडें। निःशंकु होय ॥ १६९॥

ते वेळीं आपणपेया सहितें। इयें अशेषेंही भूतें।
माझ्या स्वरुपीं अखंडितें। देखसी तूं ॥ १७०॥

ऐसें ज्ञानप्रकाशें पाहेल। तैं मोहांधकारु जाईल।
जैं गुरुकृपा होईल। पार्था गा ॥ १७१॥

अपि चेदसि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः ॥
सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि ॥ ४.३६॥

जरी कल्मषांचा आगरु। तूं भ्रांतीचा सागरु।
व्यामोहाचा डोंगरु। होउनी अससी ॥ १७२॥

तऱ्ही ज्ञानशक्तिचेनि पाडें। हें आघवेंचि गा थोकडें।
ऐसें सामर्थ्य असे चोखडें। ज्ञानीं इये ॥ १७३॥

देखें विश्वसंभ्रमा ऐसा। जो अमूर्ताचा कवडसा।
तो जयाचिया प्रकाशा। पुरेचिना ॥ १७४॥

तया कायसे हे मनोमळ। हें बोलतांचि अति किडाळ।
नाहीं येणें पाडें ढिसाळ। दुजें जगीं ॥ १७५ ॥

यथैधांसि समिद्धोऽग्निर्भस्मसात्कुरुतेऽर्जुन॥
ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते तथा ॥ ४.३७ ॥

सांगें भुवनत्रयाची काजळी। जे गगनामाजि उधवली।
तिये प्रळयींचे वावटुळी। काय अभ्र पुरे ॥ १७६ ॥

कीं पवनाचेनि कोपें। पाणियेंचि जो पळिपे।
तो प्रळयानळु दडपे। तृणें काष्टें काई ॥ १७७ ॥

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ॥
तत्स्वयं योगसंसिद्धः कालेनात्मनि विन्दति ॥ ४.३८ ॥

म्हणोनि असो हें न घडे। तें विचारितांचि असंगडे।
पुढती ज्ञानाचेनि पाडें। पवित्र न दिसे ॥ १७८ ॥

एथ ज्ञान हें उत्तम होये। आणिकही एक तैसें कें आहे।
जैसें चैतन्य कां नोहे। दुसरें गा ॥ १७९ ॥

या महातेजाचेनि कसें। जरी चोखाळु प्रतिबिंब दिसे।
कां गिंवसिलें गिंवसे। आकाश हें ॥ १८० ॥

नातरी पृथ्वीचेनि पाडें। कांटाळें जरी जोडे।
तरी उपमा ज्ञानीं घडे। पंडुकुमरा ॥ १८१ ॥

म्हणूनि बहुतीं परीं पाहतां। पुढतपुढती निर्धारिता।
हे ज्ञानाची पवित्रता। ज्ञानींचि आथि ॥ १८२ ॥

जैसी अमृताची चवी निवडिजे। तरी अमृताचिसारिखी म्हणिजे।
तैसें ज्ञान हें उपमिजे। ज्ञानेंसींचि ॥ १८३ ॥

आतां यावरि जें बोलणें। तें वायांचि वेळ फेडणें।
तंव साचचि जी हें पार्थु म्हणे। जें बोलत असां ॥ १८४ ॥

परि तेंचि ज्ञान केवीं जाणावें। ऐसें अर्जुनें जंव पुसावें।
तंव तें मनोगत देवें। जाणितलें ॥ १८५ ॥

मग म्हणतसे किरीटी। आतां चित्त देयीं इये गोठी।
सांगेन ज्ञानाचिये भेटी। उपाय तुज ॥ १८६ ॥

श्रद्धावान् लभते ज्ञानं तत्परः संयतेन्द्रियाः ॥
ज्ञानं लब्ध्वा परां शांतिम् अचिरेण अधिगच्छति ॥ ४.३९ ॥

तरी आत्मसुखाचिया गोडिया। विटे जो कां सकळ विषयां।
जयाच्या ठायीं इंद्रियां। मानु नाहीं ॥ १८७ ॥

जो मनासी चाड न सांगे। जो प्रकृतिचें केलें नेघे।
जो श्रद्धेचेनि संभोगें। सुखिया जाहला ॥ १८८ ॥

तयातेंचि गिंवसित। हें ज्ञान पावे निश्चित।
जयामाजि अचुंबित। शांति असे ॥ १८९ ॥

तें ज्ञान हृदयीं प्रतिष्ठे। आणि शांतीचा अंकुर फुटे।
मग विस्तार बहु प्रकटे। आत्मबोधाचा ॥ १९० ॥

मग जेउती वास पाहिजे। तेउती शांतीचि देखिजे।
तेथ आप पर नेणिजे। निर्धारितां ॥ १९१ ॥

ऐसा हा उत्तरोत्तरु। ज्ञानबीजाचा विस्तारु।
सांगतां असे अपारु। परि असो आतां ॥ १९२ ॥

अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति ॥
नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः ॥ ४.४० ॥

ऐकें जया प्राणियाच्या ठायीं। इया ज्ञानाची आवडी नाहीं।
तयाचें जियालें म्हणों काई। वरी मरण चांग ॥ १९३ ॥

शून्य जैसें गृह। कां चैतन्येंवीण देह।
तैसें जीवित तें संमोह। ज्ञानहीन ॥ १९४ ॥

अथवा ज्ञान कीर आपु नोहे। परी ते चाड एकी जरी वाहे।
तरी तेथ जिव्हाळा कांहीं आहे। प्राप्तीचा पैं ॥ १९५ ॥

वांचूनि ज्ञानाची गोठी कायसी। परी ते आस्थाही न धरी मानसीं।
तरी तो संशयरूप हुताशीं। पडिला जाण ॥ १९६ ॥

जे अमृतही परी नावडे। ऐसें सावियाचि आरोचकु जैं पडे।
तैं मरण आलें असे फुडें। जाणों ये कीं ॥ १९७ ॥

तैसा विषयसुखे रंजे। जो ज्ञानेंसींचि माजे।
तो संशयें अंगिकारिजे। एथ भ्रांति नाहीं ॥ १९८ ॥

मग संशयी जरी पडला। तरी निभ्रांत जाणें नासला।
तो ऐहिकपरत्रा मुकला। सुखासि गा ॥ १९९ ॥

जया काळज्वरु आंगीं बाणे। तो शीतोष्णें जैशीं नेणे।
आगी आणि चांदिणे। सरिसेंचि मानी ॥ २०० ॥

तैसें साच आणि लटिकें। विरुद्ध आणि निकें।
संशयी तो नोळखे। हिताहित ॥ २०१ ॥

हा रात्री दिवसु पाहीं। जैसा जात्यंधा ठाउवा नाहीं।
तैसें संशयीं असतां कांहीं। मना नये ॥ २०२ ॥

म्हणऊनि संशयाहूनि थोर। आणिक नाहीं पाप घोर।
ह विनाशाची वागुर। प्राणियांसी ॥ २०३ ॥

येणें कारणें तुवां त्यजावा। आधीं हाचि एकु जिणावा।
जो ज्ञानाचिया अभावा। माजि असे ॥ २०४ ॥

जैं अज्ञानाचें गडद पडे। तैं हा बहुवस मनीं वाढे।
म्हणोनि सर्वथा मार्गु मोडे। विश्वासाचा ॥ २०५ ॥

हृदयीं हाचि न समाये। बुद्धीतें गिंवसूनि ठाये।
तेथ संशयात्मक होये। लोकत्रय ॥ २०६ ॥

योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसंछिन्न संशयम ॥
आत्मवन्तं न कर्माणि निबध्नन्ति धनंजय ॥ ४.४१ ॥

ऐसा जरी थोरावे। तरी उपायें एकें आंगवे।
जरी हातीं होय बरवें। ज्ञानखड्ग ॥ २०७ ॥

तरी तेणें ज्ञानशस्त्रें तिखटें। निखळु हा निवटे।
मग निःशेष खता फिटे। मानसींचा ॥ २०८ ॥

तस्मादज्ञानसम्भूतं हृत्स्थं ज्ञानासिनात्मनः ॥
छित्त्वैनं संशयं योगम् आतिष्ठोत्तिष्ठ भारत ॥ ४.४२ ॥

याकारणें पार्था। उठीं वेगीं वरौता।
नाशु करोनि हृदयस्था। संशयासी ॥ २०९ ॥

ऐसें सर्वज्ञानाचा बापु। जो श्रीकृष्णु ज्ञानदीपु।
तो म्हणतसे सकृपु। ऐकें राया ॥ २१० ॥

तंव या पूर्वापार बोलाचा। विचार करूनि कुमरु पंडूचा।
कैसा प्रश्नु हन अवसरींचा। करिता होईल ॥ २११ ॥

ते कथेची संगति। भावाची संपत्ति।
रसाची उन्नति। म्हणिपेल पुढां ॥ २१२ ॥

जयाचिया बरवेपणीं। कीजे आठां रसांची ओवाळणी।
जो सज्जनाचिये आयणी। विसांवा जगीं ॥ २१३ ॥

तो शांतचि आभिनवेल। ते परियसा मऱ्हाटे बोल।
जे समुद्राहूनि खोल। अर्थभरित ॥ २१४ ॥

जैसें बिंब तरी बचकें एवढें। परि प्रकाशासि त्रैलोक्य थोकडें।
शब्दाची व्याप्ति तेणें पाडें। अनुभवावी ॥ २१५ ॥

ना तरी कामितयाचिया इच्छा। फळे कल्पवृक्षु जैसा।
बोलु व्यापकु होय तैसा। तरी अवधान द्यावें ॥ २१६ ॥

हें असो काय म्हणावें। सर्वज्ञ जाणती स्वभावें।
तरी निकें चित्त द्यावें। हे विनंति माझी ॥ २१७ ॥

जेथ साहित्य आणि शांति। हे रेखा दिसे बोलती।
जैसी लावण्यगुण कुळवती। आणि पतिव्रता ॥ २१८ ॥

आधींचि साखर आवडे। आणि तेचि जरी ओखदीं जोडे।
तरी सेवावी ना कां कोडें। नावानावा ॥ २१९ ॥

सहजें मलयानिलु मंदु सुगंधु। तया अमृताचा होय स्वादु।
आणि तेथेंचि जोडे नादु। जरी दैवगत्या ॥ २२० ॥

तरी स्पर्शें सर्वांग निववी। स्वादें जिव्हेतें नाचवी।
तेवींचि कानाकरवीं। म्हणवी बापु माझा ॥ २२१ ॥

तैसें कथेचे इये ऐकणें। एक श्रवणासि होय पारणें।
आणि संसारदुःख मूळवणें। विकृतीविणें ॥ २२२ ॥

जरी मंत्रेंचि वैरी मरे। तरी वायांचि कां बांधावीं कटारें।
रोग जाय दुधें साखरें। तरी निंब कां पियावा ॥ २२३ ॥

तैसा मनाचा मार न करितां। आणि इंद्रियां दुःख न देतां।
एथ मोक्ष असे आयता। श्रवणाचिमाजी ॥ २२४॥

म्हणोनि आथिलिया आराणुका। गीतार्थु हा निका।
ज्ञानदेवो म्हणे आइका। निवृत्तिदासु ॥ २२५॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे ज्ञानकर्मसंन्यासयोगो नाम चतुर्थोऽध्यायः ।

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायाम् चतुर्थोऽध्यायः ॥ ४॥

ओंव्या २२५ श्लोक ४२

## 5 Action in Krishna Consciousness कर्मसंन्यासयोग

श्रीमद्भगवद्गीता पञ्चमोऽध्यायः।
ज्ञानेश्वरी अध्याय पांचवा

---

अर्जुन उवाच।
संन्यासं कर्मणां कृष्ण पुनर्योगं च शंससि।
यच्छ्रेयं एतयोरेकं तन्मे ब्रूहि सुनिश्चितं॥ ५.१॥

मग पार्थु श्रीकृष्णाते म्हणे। हां हो हें कैसें तुमचें बोलणें।
एक होय तरी अंतःकरणें। विचारूं ये॥ १॥

मागां सकळ कर्माचा संन्यासु। तुम्हींचि निरोपिला होता बहुवसु।
तरी कर्मयोगीं केवीं अतिरसु। पोखीतसां पुढती॥ २॥

ऐसें व्यर्थ हें बोलतां। आम्हां नेणतयांच्या चित्ता।
आपुलिये चाडे श्रीअनंता। उमजु नोहे॥ ३॥

ऐकें एकसारातें बोधिजे। तरी एकनिष्ठाचि बोलिजे।
हें आणिकीं काय संगिजे। तुम्हांप्रति॥ ४॥

तरी याचिलागीं तुमतें। म्यां राउळासि विनविलें होतें।
जे हा परमार्थु ध्वनितें। न बोलावा॥ ५॥

परी मागील असो देवा। आतां प्रस्तुतीं उकलु देखावा।
सांगें दोहींमाजि बरवा। मार्गु कवण॥ ६॥

जो परिणामींचा निर्वाळा। अचुंबितु ये फळा।
आणि अनुष्ठितां प्रांजळा। सावियाचि॥ ७॥

जैसें निद्रेचें सुख न मोडे। आणि मार्गु तरी बहुसाल सांडे।
तैसें सुखासना सांगडें। सोहपें होय॥ ८॥

येणें अर्जुनाचेनि बोलें। देवो मनीं रिझले।
मग होईल ऐकें म्हणितलें। संतोषोनियां॥ ९॥

देखा कामधेनु ऐसी माये। सदैव जया होये।
तो चंदुही परी लाहे। खेळावया॥ १०॥

पाहें पां शंभूची प्रसन्नता। तया उपमन्यूचिया आर्ता।
काय क्षीराब्धि दूधभाता। देइजेचिना॥ ११॥

तैसा औदार्याचा कुरुठा। कृष्ण आपु जाहलिया सुभटा।
कां सर्व सुखांचा वसौटा। तोचि नोहावा॥ १२॥

एथ चमत्कारु कायसा। गोसावी श्रीलक्ष्मीकांताऐसा।
आतां आपुलिया सवेसा। मागावा कीं॥ १३॥

म्हणोनि अर्जुनें म्हणितलें। तें हांसोनि येरें दिधलें।
तेंचि सांगेन बोलिलें। काय कृष्णें॥ १४॥

श्रीभगवानुवाच।
संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ।
तयोस्तु कर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यते॥ ५.२॥

तो म्हणे गा कुंतिसुता। हे संन्यास योग विचारितां।
मोक्षकर तत्त्वता। दोनीही होती॥ १५॥

तरी जाणां नेणां सकळा। हा कर्मयोगु कीर प्रांजळा।
जैसी नाव स्त्रियां बाळां। तोयतरणीं॥ १६॥

तैसें सारासार पाहिजे। तरी सोहपा हाचि देखिजे।
येणें संन्यासफळ लाहिजे। अनायासें॥ १७॥

आतां याचिलागीं सांगेन। तुज संन्यासियाचें चिन्ह।
मग सहजें हे अभिन्न। जाणसी तूं॥ १८॥

ज्ञेयः स नित्यसंन्यासि यो न द्वेष्टि न कांक्षति।
निर्द्वन्द्वो हि महाबाहो सुखं बन्धात्प्रमुच्यते॥ ५.३॥

तरी गेलियाची से न करी। न पवतां चाड न धरी।
जो सुनिश्चळु अंतरीं। मेरु जैसा॥ १९॥

आणि मी माझें ऐसी आठवण। विसरलें जयाचें अंतःकरण।
पार्था तो संन्यासी जाण। निरंतर॥ २०॥

जो मनें ऐसा जाहला। संगीं तोचि सांडिला।
म्हणोनि सुखें सुख पावला। अखंडित॥ २१॥

आतां गृहादिक आघवें। तें कांहीं नलगे त्यजावें।
जे घेते जाहलें स्वभावें। निःसंगु म्हणऊनि॥ २२॥

देखे अग्नि विझोनि जाये। मग जे रखोंडी केवळु होये।
तैं ते कापुसें गिंवसूं ये। जियापरी॥ २३॥

तैसा असतेनि उपाधी। नाकळिजे तो कर्मबंधीं।
जयाचिये बुद्धी। संकल्पु नाही॥ २४॥

म्हणोनि कल्पना जैं सांडे। तैंचि गा संन्यासु घडे।
इयें कारणे दोनी सांगडे। संन्यासयोगु॥ २५॥

सांख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदन्ति न पण्डिताः।
एकमप्यास्थितः सम्यक् उभयोर्विन्दते फलम॥ ५.४॥

एऱ्हवीं तरी पार्था। जे मूर्ख होती सर्वथा।
ते सांख्यकर्मसंस्था। जाणती केवीं॥ २६॥

सहजें ते अज्ञान। म्हणोनि म्हणती हे भिन्न।
एऱ्हवी दीपाप्रति काई आनान। प्रकाशु आहाती॥ २७॥

पै सम्यक् एकें अनुभवें। जिहीं देखिलें तत्त्व आघवें।
ते दोन्हीं तेंही ऐक्यभावें। मानिती गा॥ २८॥

यत्सांख्यैः प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते।
एकं सांख्यं च योगं च यः पश्यति स पश्यति॥ ५.५॥

आणि सांख्यीं जे पाविजे। तेंचि योगीं जे गमिजे।
म्हणोनि ऐक्यता दोहींतें सहजें। इयापरी॥ २९॥

देखें आकाशा आणि अवकाशा। भेदु नाहीं जैसा।
तैसें ऐक्य योगसंन्यासा। वोळखे जो॥ ३०॥

तयासींचि जगीं पाहलें। आपणपें तेणेंचि देखिलें।
जया सांख्ययोग जाणवले। भेदेंविण॥ ३१॥

संन्यासस्तु महाबाहो दुःखमाप्तुमयोगतः।
योगयुक्तो मुनिर्ब्रह्म न चिरेणाऽधिगच्छति॥ ५.६॥

जो युक्तिपंथें पार्था। चढे मोक्षपर्वता।
तो महासुखाचा निमथा। वहिला पावे॥ ३२॥

येरा योगस्थिति जया सांडे। तो वायांचि गा हव्यासीं पडे।
परि प्राप्ति कहीं न घडे। संन्यासाची॥ ३३॥

योगयुक्तो विशुद्धात्मा विजितात्मा जितेन्द्रियः।
सर्वभूतात्मभूतात्मा कुर्वन्नपि न लिप्यते॥ ५.७॥

जेणें भ्रातीपासूनि हिरतलें। गुरुवाक्यें मन धुतलें।
मग आत्मस्वरूपीं घातलें। हिरोनियां॥ ३४॥

जैसें समुद्रीं लवण न पडे। तंव वेगळें अल्प आवडे।
मग होय सिंधूचि एवढें। मिळे तेव्हां॥ ३५॥

तैसें संकल्पोनि काढिलें। जयाचें मनचि चैतन्य जाहलें।
तेणें एकदेशियें परी व्यापिलें। लोकत्रय॥ ३६॥

आतां कर्ता कर्म करावें। हें खुंटलें तया स्वभावें।
आणि करी जऱ्हीं आघवें। तऱ्हीं अकर्ता तो॥ ३७॥

नैव किंचित् करोमीति युक्तो मन्येत तत्त्ववित।
पश्यन् शृण्वन् स्पृशन् जिघ्रन् अश्नन् गच्छन् स्वपन् श्वसन्॥ ५.८॥

प्रलपन् विसृजन् गृह्णन् उन्मिषन् निमिषन् अपि।
इन्द्रियाणीन्द्रियार्थेषु वर्तन्त इति धारयन्॥ ५.९॥

जे पार्था तया देहीं। मी ऐसा आठऊ नाहीं।
तरी कर्तृत्व कैचें काई। उरे सांगें॥ ३८॥

ऐसे तनुत्यागेवीण। अमूर्ताचे गुण।
दिसती संपूर्ण। योगयुक्ता॥ ३९॥

एऱ्हवीं आणिकांचिये परी। तोही एक शरीरी।
अशेषींही व्यापारीं। वर्तत असे॥ ४०॥

तोही नेत्रीं पाहे। श्रवणीं ऐकतु आहे।
परि तेथींचा सर्वथा नोहे। नवल देखें॥ ४१॥

स्पर्शासि तरी जाणे। परिमळु सेवी घ्राणें।
अवसरोचित बोलणें। तयाहि आथी॥ ४२॥

आहारातें स्वीकारी। त्यजावें तें परिहरी।
निद्रेचिया अवसरीं। निदिजे सुखें॥ ४३॥

आपुलेनि इच्छावशें। तोही गा चालतु दिसे।
पैं सकळ कर्म ऐसें। राहाटे कीर॥ ४४॥

हें सांगो काई एकैक। देखें श्वासोच्श्वासादिक।
आणि निमिषोन्निमिष। आदिकरूनि॥ ४५॥

पार्था तयाचे ठायीं। हें आघवेंचि पाहीं।
परी तो कर्ता नव्हे काहीं। प्रतीतिबळें॥ ४६॥

जैं भ्रांतिसेजे सुतला। तैं स्वप्नसुखें भुतला।
मग तो ज्ञानोदयीं चेइला। म्हणोनियां॥ ४७॥

ब्रह्मण्याधाय कर्माणि सङ्गं त्यक्त्वा करोति यः।
लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवाम्भसा॥ ५.१०॥

आतां अधिष्ठानसंगती। अशेषाही इंद्रियवृत्ती।
आपुललिया अर्थी। वर्तत आहाती॥ ४८॥

दीपाचेनि प्रकाशें। गृहींचे व्यापार जैसे।
देहीं कर्मजात तैसें। योगयुक्ता॥ ४९॥

तो कर्में करी सकळें। परी कर्मबंधा नाकळे।
जैसें न सिंपे जळीं जळें। पद्मपत्र॥ ५०॥

कायेन मनसा बुद्ध्या केवलैरिन्द्रियैरपि।
योगिनः कर्मं कुर्वंति सङ्गं त्यक्त्वाऽत्मशुद्धये॥ ५.११॥

देखें बुद्धीची भाषा नेणिजे। मनाचा अंकुर नुदैजे।
ऐसा व्यापारु तो बोलिजे। शारीरु गा॥ ५१॥

हेंच मराठें परियेसीं। तरी बाळकाची चेष्टा जैसी।
योगियें कर्में करिती तैसीं। केवळा तनु॥ ५२॥

मग पांचभौतिक संचलें। जेव्हां शरीर असे निदेलें।
तेथ मनचि राहाटे एकलें। स्वप्नीं जेवीं॥ ५३॥

नवल ऐकें धर्नुधरा। कैसा वासनेचा संसारा।
देहा होऊं नेदी उजगरा। परी सुखदुःखें भोगी॥ ५४॥

इंद्रियांच्या गांवीं नेणिजे। ऐसा व्यापारु जो निपजे।
तो केवळ गा म्हणिजे। मानसाचा॥ ५५॥

योगिये तोही करिती। परी कर्में तेणें न बंधिजती।
जे सांडिली आहे संगती। अहंभावाची॥ ५६॥

आतां जाहालिया भ्रमहत। जैसें पिशाचाचें चित्त।
मग इंद्रियाचें चेष्टित। विकळु दिसे॥ ५७॥

स्वरूप तरी देखे। आळविलें आइके।
शब्दु बोले मुखें। परी ज्ञान नाहीं॥ ५८॥

हें असो काजेंविण। जें जें कांहीं कारण।
तें केवळ कर्म जाण। इंद्रियांचें॥ ५९॥

मग सर्वत्र जें जाणतें। तें बुद्धीचें कर्म निरुतें।
वोळख अर्जुनातें। म्हणे श्रीहरी॥ ६०॥

ते बुद्धि धुरे करुनी। कर्म करिती चित्त देउनी।
परी ते नैष्कर्म्यापासुनी। मुक्त दिसती॥ ६१॥

जे बुद्धीचिये ठावूनि देहीं। तयां अहंकाराची सेचि नाहीं।
म्हणोनि कर्में करितां पाहीं। चोखाळले॥ ६२॥

अगा कर्तेनवीण कर्म। तेंचि तें निष्कर्म।
हें जाणती सुवर्म। गुरुगम्य जें॥ ६३॥

आतां शांतरसाचें भरितें। सांडीत आहे पात्रातें।
जें बोलणें बोलापरौतें। बोलवलें॥ ६४॥

एथ इंद्रियांचा पांगु। जया फिटला आहे चांगु।
तयासीचि आथि लागु। परिसावया॥ ६५॥

हा असो अतिप्रसंगु। न संडीं पां कथालागु।
होईल श्लोकसंगतिभंगु। म्हणऊनिया॥ ६६॥

जें मना आकळितां कुवाडें। घाघुसितां बुद्धी नातुडे।
तें दैवाचेनि सुरवाडें। सांगवलें तुज॥ ६७॥

जें शब्दातीत स्वभावें। तें बोलींचि जरी फावे।
तरी आणिकें काय करावें। कथा सांगें॥ ६८॥

हा आर्तिविशेषु श्रोतयांचा। जाणोनि दास निवृत्तीचा।
म्हणे संवादु तया दोघांचा। परिसोनि परिसा॥ ६९॥

युक्तं कर्मफलं त्यक्त्वा शान्तिमाप्नोति नैष्ठिकीम्।
अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबद्ध्यते॥ ५.१२॥

मग श्रीकृष्ण म्हणे पार्थातें। आतां प्राप्ताचें चिन्ह पुरतें।
सांगेन तुज निरुतें। चित्त देईं॥ ७०॥

तरी आत्मयोगें आथिला। जो कर्मफळांशीं विटला।
तो घर रिघोनि वरिला। शांती जगीं॥ ७१॥

येरु कर्मबंधें किरीटी। अभिलाषाचिया गांठी।
कळासला खुंटीं। फळभोगाच्या॥ ७२॥

सर्वकर्माणि मनसा संन्यस्यास्ते सुखं वशी।
नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन्॥ ५.१३॥

जैसा फळाचिये हावे। ऐसें कर्म करी आघवें।
मग न कीजेचि येणें भावें। उपेक्षी जो॥ ७३॥

तो जयाकडे वास पाहे। तेउती सुखाची सृष्टि होये।
तो म्हणे तेथ राहे। महाबोधु॥ ७४॥

नवद्वारे देहीं। तो असतुचि परि नाहीं।
करितुचि न करी कांहीं। फळत्यागी॥ ७५॥

न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः।
न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते॥ ५.१४॥

जैसा का सर्वेश्वरु। पाहिजे तंव निर्व्यापारु।
परि तोचि रची विस्तारु। त्रिभुवनाचा॥ ७६॥

आणि कर्ता ऐसें म्हणिपे। तरी कवणें कर्मीं न शिंपे।
जे हातुपावु न लिंपे। उदासवृत्तीच्या॥ ७७॥

योगनिद्रा तरी न मोडे। अकर्तेपणा सळु न घडे।
परी महाभूतांचें दळवाडें। उभारीं भलें॥ ७८॥

जगाच्या जीवीं आहे। परि कवणाचा कहीं नोहे।
जगचि हें होय जाये। तो शुद्धीही नेणे॥ ७९॥

नाऽदत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभुः।
अज्ञानेनाऽवृतं ज्ञानं तेन मुह्यंति जंतवः॥ ५.१५॥

पापपुण्यें अशेषें। पासींचि असतु न देखे।
आणि साक्षीही होऊं न ठके। येरी गोष्टी कायसी॥ ८०॥

पैं मूर्तीचेनि मेळें। तो मूर्तचि होऊनि खेळे।
परि अमूर्तपण न मैळे। दादुलयाचें॥ ८१॥

तो सृजी पाळी संहारी। ऐसें बोलती जें चराचरीं।
तें अज्ञान गा अवधारीं। पंडुकुमरा॥ ८२॥

ज्ञानेन तु तदज्ञानं येषां नाशितमात्मनः।
तेषाम् आदित्यवत् ज्ञानं प्रकाशयति तत्परम॥ ५.१६॥

तें अज्ञान जैं समूळ तुटे। तैं भ्रांतीचें मसैरें फिटे।
मग अकर्तृत्व प्रगटे। ईश्वराचें॥ ८३॥

एथ ईश्वरु एकु अकर्ता। ऐसें मानलें जरी चित्ता।
तरी तोचि मी हें स्वभावता। आदीचि आहे॥ ८४॥

ऐसेनि विवेकें उदो चित्तीं। तयासि भेदु कैंचा त्रिजगतीं।
देखे आपुलिया प्रतीती। जगचि मुक्त॥ ८५॥

जैशी पूर्वदिशेच्या राउळीं। उदया येताची सूर्यें दिवाळी।
कीं येरींही दिशा तियेचि काळीं। काळिमा नाहीं॥ ८६॥

तद् बुधयस्तदात्मानः तन्निष्ठाः तत्परायणाः।
गच्छन्त्यपुनरावृतिं ज्ञाननिर्धूत्कल्मषाः॥ ५.१७॥

बुद्धिनिश्चयें आत्मज्ञान। ब्रह्मरूप भावी आपणा आपण।
ब्रह्मनिष्ठा राखे पूर्ण। तत्परायण अहर्निशीं॥ ८७॥

ऐसें व्यापक ज्ञान भलें। जयांचिया हृदयातें गिंवसित आलें।
तयांचि समतादृष्टि बोलें। विशेषुं काई॥ ८८॥

एक आपणपेंचि पां जैसें। ते देखती विश्व तैसें।
हें बोलणें कायसें। नवलु एथ॥ ८९॥

परी दैव जैसें कवतिकें। कहींचि दैन्य न देखे।
कां विवेकु हा नोळखे। भ्रांतीतें जेवीं॥ ९०॥

नातरी अंधकाराची वानी। जैसा सूर्यो न देखे स्वप्नीं।
अमृत नायके कानी। मृत्युकथा॥ ९१॥

हें असो संतापु कैसा। चंद्रु न स्मरे जैसा।
भूतीं भेदु नेणती तैसा। ज्ञानिये ते॥ ९२॥

विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि।
शुनि चैव श्वपाके च पंडिताः समदर्शिनः॥ ५.१८॥

मग हा मशकु हा गजु। कीं श्वपचु हा द्विजु।
पैल इतरु हा आत्मजु। हें उरेल कें॥ ९३॥

ना तरी हे धेनु हें श्वान। एक गुरु एक हीन।
हें असो कैचें स्वप्न। जागतया॥ ९४॥

एथ भेदु तरी कीं देखावा। जरी अहंभाव उरला होआवा।
तो आधींचि नाही आघवा। आतां विषम काई॥ ९५॥

इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः।
निर्दोषं हि समं ब्रह्म तस्माद् ब्रह्मणि ते स्थिताः॥ ५.१९॥

म्हणोनि सर्वत्र सदा सम। तें आपणचि अद्वय ब्रह्म।
हें संपूर्ण जाणे वर्म। समदृष्टीचें॥ ९६॥

जिहीं विषय संगु न सांडितां। इंद्रियांतें न दंडितां।
परि भोगिली निःसंगता। कामेंविण॥ ९७॥

जिहीं लोकांचेनि आधारें लैकिकेंचि व्यापारें।
परी सांडिलें निदसुरें। लौकिकु हें॥ ९८॥

जैसा जनामाजि खेचरु। असतूचि जना नोहे गोचरु।
तैसा शरीरीं परी संसारु। नोळखें तयांतें॥ ९९॥

हें असो पवनाचेनि मेळें। जैसें जळींचि जळ लोळे।
तें आणिकें म्हणती वेगळे। कल्लोळ हे॥ १००॥

तैसें नाम रूप तयांचें। एऱ्हवीं ब्रह्मचि तो साचें।
मन साम्या आलें जयाचें। सर्वत्र गा॥ १०१॥

ऐसेनि समदृष्टी जो होये। तया पुरुषा लक्षणही आहे।
अर्जुना संक्षेपें सांगेन पाहें। अच्युत म्हणे॥ १०२॥

न प्रहृष्येत्प्रियं प्राप्य नोद्विजेत्प्राप्य चाऽप्रियम्।
स्थिरबुद्धिरसंमूढो ब्रह्मविद् ब्रह्मणि स्थितः॥ ५.२०॥

जरी मृगजळाचेनि पूरें। जैसें न लोटिजे कां गिरिवरें।
तैसा शुभाशुभीं न विकरे। पातलियां जो॥ १०३॥

तोचि तो निरुता। समदृष्टि तत्त्वता।
श्रीहरि म्हणे पंडूसुता। तोचि ब्रह्म॥ १०४॥

बाह्यस्पर्शेष्वसक्तात्मा विन्दत्यात्मनि यत्सुखम्।
स ब्रह्मयोगयुक्तात्मा सुखमक्षय्यमश्नुते॥ ५.२१॥

जया आपणपें सांडूनि कांहीं। इंद्रियग्रामावरी येणें नाहीं।
तो विषय न सेवी हें काई। विचित्र येथ॥ १०५॥

सहजें स्वसुखाचेनि अपारें। सुरवाडलें अंतरें।
रचिला म्हणऊनि बाहिरें। पाऊल न घाली॥ १०६॥

सांगें कुमुददळाचेनि ताटें। जो जेविला चंद्रकिरणें चोखटें।
तो चकोरु काई वाळुवंटें। चुंबितु असे॥ १०७॥

तैसें आत्मसुख उपाइलें। जयांसि आपणपेंचि फावलें।
तया विषय सहज सांडवले। सांगों काई॥ १०८॥

एऱ्हवीं तरी कौतुकें। विचारूनि पाहें पां निकें।
या विषयांचेनि सुखें। झकविजती कवण॥ १०९॥

ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते।
आद्यन्तवंत कौन्तेय न तेषु रमते बुधः॥ ५.२२॥

जिहीं आपणपें नाहीं देखिलें। तेचि इहीं इंद्रियार्थी रंजले।
जैसें रंक कां आळुकैलें। तुषांतें सेवी॥ ११०॥

नातरी मृगें तृषापीडितें। संभ्रमें विसरोनि जळांतें।
मग तोयबुद्धी बरडीते। ठाकूनि येती॥ १११॥

तैसें आपणपें नाहीं दिठे। जयातें स्वसुखाचे सदा खरांटे।
तयासीचि विषय हे गोमटे। आवडती॥ ११२॥

एऱ्हवीं विषयीं काइ सुख आहे। हें बोलिणेंचि सारिखें नोहे।
तरी विद्युत्स्फुरणें कां न पाहे। जगामाजीं॥ ११३॥

सांगें वातवर्षआतपु धरे। ऐसें अभ्रच्छायाचि जरी सरे।
तरी त्रिमाळिकें धवळारें। करावीं कां॥ ११४॥

म्हणोनि विषयसुख जें बोलिजे। तें नेणतां गा वायां जल्पिजे।
जैसें महूर कां म्हणिजे। विषकंदातें॥ ११५॥

नातरी भौमा नाम मंगळु। रोहिणीतें म्हणती जळु।
तैसा सुखप्रवादु बरळु। वैषयिकु हा॥ ११६॥

हे असो आघवी बोली। सांग पां सर्पफणीची साउली।
ते शीतल होईल केतुली। मूषकासी॥ ११७॥

जैसा आमिषकवळु पांडवा। मीनु न सेवी तंवचि बरवा।
तैसा विषयसंगु आघवा। निभ्रांत जाणें॥ ११८॥

हें विरक्ताचिये दृष्टी। जैं न्याहाळिजे किरीटी।
तैं पांडुरोगाचिये पुष्टी। सारिखें दिसे॥ ११९॥

म्हणोनि विषयभोगीं जे सुख। ते साद्यंतचि जाण दुःख।
परि काय करिती मूर्ख। न सेवितां न सरे॥ १२०॥

ते अंतर नेणती बापुडे। म्हणोनि अगत्य सेवणें घडे।
सांगें पूयपंकींचे किडे। काय चिळसी घेती॥ १२१॥

तयां दुःखियां दुःखचि जिव्हार। ते विषयकर्दमींचे दर्दुर।
ते भोगजळींचें जलचर। सांडिती केवीं॥ १२२॥

आणि दुःखयोनि जिया आहाती। तिया निरर्थका तरी नव्हती।
जरी विषयांवरी विरक्ती। धरिती जीव॥ १२३॥

नातरी गर्भवासादि संकट। कां जन्ममरणींचे कष्ट।
हे विसांवेवीण वाट। वाहावी कवणें॥ १२४॥

जरी विषयीं विषयो सांडिजेल। तरी महादोषीं कें वसिजेल।
आणि संसारु हा शब्दु नव्हेल। लटिका जगीं॥ १२५॥

म्हणोनि अविद्याजात नाथिलें। ते तिहींचि साच दाविलें।
जिहीं सुखाबुद्धी घेतलें। विषयदुःख॥ १२६॥

या कारणें गा सुभटा। हा विचारितां विषय वोखटा।
तूं झणें कहीं या वाटा। विसरोनि जाशी॥ १२७॥

पैं यातें विरक्त पुरुष। त्यजिती कां जैसें विष।
निराशां तयां दुःख। दाविलें नावडे॥ १२८॥

शक्नोतीहैव यः सोढुं प्राक् शरीरविमोक्षणात।
कामक्रोधोद्भवं वेगं स युक्तः स सुखी नरः॥ ५.२३॥

ज्ञानियांच्या हन ठायीं। यांची मातुही कीर नाहीं।
देहीं देहभावो जिहीं। स्ववश केले॥ १२९॥

जयांतें बाह्याची भाष। नेणिजेचि निःशेष।
अंतरीं सुख। एक आथि॥ १३०॥

परी ते वेगळेपणें भोगिजे। जैसें पक्षियें फळ चुंबिजे।
तैसें नव्हे तेथ विसरिजे। भोगितेपणही॥ १३१॥

भोगीं अवस्था एक उठी। ते अहंकाराचा अंचळु लोटी।
मग सुखेंसि घे आंठी। गाढेपणें॥ १३२॥

तिये आलिंगनमेळीं। होय आपेंआप कवळी।
तेथ जळ जैसें जळीं। वेगळें न दिसे॥ १३३॥

कां आकाशीं वायु हरपे। तेथ दोन्ही हे भाष लोपे।
तैसें सुखचि उरे स्वरूपें। सुरतीं तिये॥ १३४॥

ऐशी द्वैताची भाष जाय। मग म्हणों जरी एकचि होय।
तरी तेथ साक्षी कवणु आहे। जाणतें जें॥ १३५॥

योऽन्तःसुखोऽन्तरारामः तथान्तर्ज्योतिरेव यः।
स योगी ब्रह्मनिर्वाणं ब्रह्मभूतोऽधिगच्छति॥ ५.२४॥

म्हणोनि असो हें आघवें। एथ न बोलणें काय बोलावें।
ते खुणाचि पावेल स्वभावें। आत्माराम॥ १३६॥

जे ऐसेनि सुखें मातले। आपणपांचि आपण गुंतले।
ते मीं जाणें निखळ वोतले। सामरस्याचे॥ १३७॥

ते आनंदाचे अनुकार। सुखाचे अंकुर।
कीं महाबोधें विहार। केले जैसे॥ १३८॥

ते विवेकाचे गांव। कीं परब्रह्मींचे स्वभाव।
नातरी अळंकारले अवयव। ब्रह्मविद्येचे॥ १३९॥

ते सत्त्वाचे सात्त्विक। कीं चैतन्याचे आंगिक।
हें बहु असो एकैक। वानिसी काई॥ १४०॥

तूं संतस्तवनी रचिसी। तरी कथेची से न करिसी।
कीं निराळीं बोल देखसी। सनागर॥ १४१॥

परि तो रसातिशयो मुकुळीं। मग ग्रंथार्थदीपु उजळीं।
करीं साधुहृदयराउळीं। मंगळ उखा॥ १४२॥

ऐसा गुरूचा उवायिला। निवृत्तीदासासी पातला।
मग म्हणे तो श्रीकृष्ण बोलिला। तेंचि आइका॥ १४३॥

अर्जुना अनंत सुखाच्या डोहीं। एकसरा तळुचि घेतला जिहीं।
मग स्थिरावूनि तेही। तेंचि जाहले॥ १४४॥

लभन्ते ब्रह्मनिर्वाणमृषयः क्षीणकल्मषाः।
छिन्नद्वैधा यतात्मानः सर्वभूतहिते रताः॥ ५.२५॥

अथवा आत्मप्रकाशें चोखें। जो आपणपेंचि विश्व देखे।
तो देहींचि परब्रह्म सुखें। मानूं येईल॥ १४५॥

जें साचोकारें परम। ना तें अक्षर निःसीम।
जियें गांवींचे निष्काम। अधिकारिये॥ १४६॥

जें महर्षी वाटलें। विरक्तां भागा फिटलें।
जें निःसंशया पिकलें। निरंतर॥ १४७॥

कामक्रोधवियुक्तानां यतीनां यतचेतसाम्।
अमितो ब्रह्मनिर्वाणं वर्तते विदितात्मनाम्॥ ५.२६॥

जिहीं विषयापासोनि हिरतलें। चित्त आपुलें आपण जिंतिलें।
ते निश्चित जेथ सुतले। चेतीचिना॥ १४८॥

तें परब्रह्म निर्वाण। जें आत्मविदांचें कारण।
तेंचि ते पुरुष जाण। पंडुकुमरा॥ १४९॥

ते ऐसे कैसेंनि जाहले। जे देहींचि ब्रह्मत्वा आले।
हें ही पुससी तरी भलें। संक्षेपें सांगो॥ १५०॥

स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्यान् चक्षुश्चैवान्तरे भ्रुवोः।
प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यन्तरचारिणौ॥ ५.२७॥

तरी वैराग्याचेनि आधारें। जिहीं विषय दवडूनि बाहिरें।
शरीरीं एकंदरें। केलें मन॥ १५१॥

सहजें तिहीं संधी भेटी। जेथ भ्रूपल्लवां पडे गांठी।
तेथ पाठिमोरी दिठी। पारुखोनियां॥ १५२॥

सांडूनि दक्षिण वाम। प्राणापानसम।
चित्तेंसीं व्योम। गामिये करिती॥ १५३॥

यतेन्द्रियमनोबुद्धिः मुनिर्मोक्षपरायणः।
विगतेच्छाभयक्रोधो यः सदा मुक्त एव सः॥ ५.२८॥

तेथ जैसी रथ्योदकें सकळें। घेऊनि गंगा समुद्रीं मिळे।
मग एकेक वेगळें। निवडूं नये॥ १५४॥

तैसी वासनांतरांची विवंचना। मग आपैसी पारुखे अर्जुना।
जे वेळीं गगनीं लयो मना। पवनें कीजे॥ १५५॥

जेथ हें संसारचित्र उमटे। तो मनोरूपु पटु फाटे।
जैसें सरोवर आटे। मग प्रतिभा नाहीं॥ १५६॥

तैसें मनपण मृदुल जाय। मग अहंभावादिक कें आहे।
म्हणोनि शरीरेंचि ब्रह्म होये। अनुभवी तो॥ १५७॥

भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरम्।
सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शान्तिमृच्छति॥ ५.२९॥

आम्हीं मागा हन सांगितलें। जे देहींचि ब्रह्मत्व पावले।
ते येणें मार्गें आले। म्हणऊनिया॥ १५८॥
आणि यमनियमांचे डोंगर। अभ्यासाचे सागर।
क्रमोनि हे पार। पातले ते॥ १५९॥

तिहीं आपणपें करूनि निर्लेप। प्रपंचाचें घेतलें माप।
मग साचाचेंचि रूप। होऊनि ठेले॥ १६०॥

ऐसा योगयुक्तीचा उद्देशु। जेथ बोलिला श्रीहृषीकेशु।
तेथ अर्जुनु सुदंशु। म्हणोनि चमत्कारला॥ १६१॥

तें देखिलिया कृष्णें जाणितलें। मग हांसोनि पार्थातें म्हणितलें।
तें काई पां चित्त उवाइलें। इये बोलीं तुझें॥ १६२॥

तंव अर्जुन म्हणे देवो। परचित्तलक्षणांचा रावो।
भला जाणितला जी भावो। मानसु माझा॥ १६३॥

म्यां जे कांहीं विवरूनि पुसावें। तें आधींचि कळिलें देवें।
तरी बोलिलें तेंचि सांगावें। विवळ करूनि॥ १६४॥

एऱ्हवीं तरी अवधारा। जो दाविला तुम्हीं अनुसारा।
तो पव्हण्याहूनि पायउतारा। सोहपा जैसा॥ १६५॥

तैसा सांख्याहूनि प्रांजळा। परी आम्हांसारिखियां आभोळां।
एथ काहीं परि काळा। तो साहों ये वर॥ १६६॥

म्हणोनि एक वेळ देवा। तोचि पडताळा घेयावा।
विस्तारेल तरी सांगावा। साद्यंतुचि॥ १६७॥

तंव श्रीकृष्ण म्हणती हो कां। तुज हा मार्गु गमला निका।
तरी काय जाहलें आइकें जो कां। सुखें बोलों॥ १६८॥

अर्जुना तूं परिससी। परिसोनि अनुष्ठिसी।
तरी आम्हांसीचि वाणी कायसी। सांगावयाची॥ १६९॥

आधींच चित्त मायेचें। वरी मिष जाहलें पढियंतयाचें।
आतां तें अद्भुतपण स्नेहाचें। कवण जाणे॥ १७०॥

तें म्हणो कारुण्यरसाची वृष्टी। कीं नवया स्नेहाची सृष्टी।
हें असो नेणिजे दृष्टी। हरीची वानूं॥ १७१॥

जे अमृताची वोतली। कीं प्रेमचि पिऊन मातली।
म्हणोनि अर्जुनमोहें गुंतली। निघो नेणे॥ १७२॥

हें बहु जें जें जल्पिजेल। तेथें कथेसि फांकु होईल।
परी तें स्नेह रूपा न येल। बोलवरी॥ १७३॥

म्हणोनि विसुरा काय येणें। तो ईश्वरु आकळावा कवणें।
जो आपुलें मान नेणे। आपणचि॥ १७४॥

तरी मागील ध्वनीआंतु। मज गमला सावियाचि मोहितु।
जे बळात्कारें असे म्हणतु। परिस बापा॥ १७५॥

अर्जुना जेणें जेणें भेदें। तुझें कां चित्त बोधें
तैसें तैसें विनोदें। निरूपिजेल॥ १७६॥

तो काइसया नाम योगु। तयाचा कवण उपेगु।
अथवा अधिकारप्रसंगु। कवणा येथ॥ १७७॥

ऐसें जें जें काहीं। उक्त असे इये ठाई।
तें आघवेंचि पाहीं। सांगेन आतां॥ १७८॥

तूं चित्त देऊनि अवधारीं। ऐसें म्हणोनि श्रीहरी।
बोलिजेल ते पुढारी। कथा आहे॥ १७९॥

श्रीकृष्ण अर्जुनासी संगु। न सांडोनि सांगेल योगु।
तो व्यक्त करूं प्रसंगु। म्हणे निवृत्तिदासु॥ १८०॥

इति ज्ञानदेवविरचितायां श्रीभावार्थदीपिकायां पञ्चमोऽध्यायः।
ओंव्या १८०, श्लोक २९
इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे कर्मसंन्यासयोगो नाम पञ्चमोऽध्यायः।

## 6 Control of Mind and Senses आत्मसंयमयोग

श्रीमद्भगवद्गीता षष्टोऽध्यायः
ज्ञानेश्वरी अध्याय सहावा

---

मग रायातें म्हणे संजयो। तोचि अभिप्राय अवधारिजो।
श्रीकृष्ण सांगती आतां जो। योगरूप॥ १॥

सहजें ब्रह्मरसाचें पारणें। केलें अर्जुनालागीं नारायणें।
कीं तेंचि अवसरीं पाहुणे। पातलों आम्ही॥ २॥

कैसी दैवाची थोरी नेणिजे। जैसें तान्हेलिया तोय सेविजे।
कीं तेंचि चवी करूनि पाहिजे। तंव अमृत आहे॥ ३॥

तैसें आम्हां तुम्हां जाहलें। जें आडमुठीं तत्त्व फावलें।
तंव धृतराष्ट्रें म्हणितले। हें न पुसों तूंतें॥ ४॥

तया संजया येणें बोलें। रायाचें हृदय चोजवलें।
जें अवसरीं आहे घेतलें। कुमरांचिया॥ ५॥

हें जाणोनि मनीं हांसिला। म्हणें म्हातारा मोहें नाशिला।
एऱ्हवीं बोल तरी भला जाहला। अवसरीं इये॥ ६॥

परि तें तैसें कैसेनि होईल। जात्यंधा कैसें पाहेल।
तेवींचि येरु रोष घेईल। म्हणोनि बिहे॥ ७॥

परि आपण चित्तीं आपुलां। निकियापरी संतोषला।
जे तो संवादु फावला। श्रीकृष्णार्जुनांचा॥ ८॥

तेणें आनंदाचेनि धालेपणें। साभिप्राय अंतःकरणें।
आतां आदरेंसीं बोलणें। घडेल तया॥ ९॥

तो गीतेमाजि षष्ठींचा। प्रसंगु असे आयणीचा।
जैसा क्षीरार्णवीं अमृताचा। निवाडु जाहला॥ १०॥

तैसें गीतार्थाचें सार। जें विवेकसिंधुचें पार।
नाना योगविभवभांडार। उघडलें कां॥ ११॥

जें आदिप्रकृतिचें विसवणें। जें शब्दब्रह्मासि न बोलणें।
जेथूनि गीतावल्लीचें ठाणें। प्ररोहो पावे॥ १२॥

तो अध्याय हा सहावा। वरि साहित्याचिया बरवा।
सांगिजेल म्हणोनि परिसावा। चित्त देउनी॥ १३॥

माझा मऱ्हाठाचि बोल कौतुकें। परि अमृतातेंही पैजा जिंके।
ऐसी अक्षरें रसिकें। मेळवीन॥ १४॥

जिये कोंवळिकेचेनि पाडें। दिसती नादींचे रंग थोडे।
वेधें परिमळाचें बीक मोडे। जयाचेनि॥ १५॥

ऐका रसाळपणाचिया लोभा। कीं श्रवणींचि होती जिभा।
बोलें इंद्रिया लागे कळंभा। एकमेकां॥ १६॥

सहजें शब्दु तरी विषो श्रवणाचा। परि रसना म्हणे हा रसु आमुचा।
घ्राणासि भावो जाय परिमळाचा। हा तोचि होईल॥ १७॥

नवल बोलतीये रेखेची वाहणी। देखतां डोळ्यांही पुरों लागे धणी।
ते म्हणती उघडली खाणी। रूपाची हे॥ १८॥

जेथ संपूर्ण पद उभारे। तेथ मनचि धांवे बाहिरें।
बोलु भुजाही आविष्करे। आलिंगावयां॥ १९॥

ऐसीं इंद्रियें आपुलालिया भावीं। झोंबती परि तो सरिसेपणेंचि बुझावी।
जैसा एकला जग चेववी। सहस्रकरु॥ २०॥

तैसें शब्दाचें व्यापकपण। देखिजे असाधारण।
पाहातयां भावज्ञां फावती गुण। चिंतामणीचे॥ २१॥

हें असो तयां बोलाचीं ताटें भलीं। वरी कैवल्यरसें वोगरलीं।
ही प्रतिपत्ति मियां केली। निष्कामासी॥ २२॥

आतां आत्मप्रभा नित्य नवी। तेचि करूनि ठाणदिवी।
जो इंद्रियांतें चोरूनि जेवी। तयासीचि फावे॥ २३॥

येथ श्रवणाचेनि पांगेंवीण। श्रोतयां व्हावें लागे।
हे मनाचेनि निजांगें। भोगिजे गा॥ २४॥

आहाच बोलाची वालीफ फेडिजे। आणि ब्रह्माचियाचि आंगा घडिजे।
मग सुखेंसी सुरवाडिजे। सुखाचिमाजि॥ २५॥

ऐसें हळुवारपण जरी येईल। तरीच हें उपेगा जाईल।
एऱ्हवीं आघवी गोष्टी होईल। मुकयाबहिरयाची॥ २६॥

परी तें असो आतां आघवें। नलगे श्रोतयांतें कडसावें।
जे एथ अधिकारिये स्वभावें। निष्कामकाम॥ २७॥

जिहीं आत्मबोधाचिया आवडी। केली स्वर्गसंसाराची कुरोंडी।
तेवांचूनि एथींची गोडी। नेणती आणिक॥ २८॥

जैसा वायसीं चंद्र नोळखिजे। तैसा ग्रंथु हा प्राकृतीं नेणिजे।
आणि तो हिमांशुचि जेविं खाजें। चकोराचें॥ २९॥

तैसा सज्ञानासी तरी हा ठावो। आणि अज्ञानासी आन गांवो।
म्हणोनि बोलावया विषय पहा हो। विशेष नाहीं॥ ३०॥

परि अनुवादला मी प्रसंगे। तें सज्जनीं उपसाहावें लागे।
आतां सांगेन काय श्रीरंगें। निरोपिलें जें॥ ३१॥

तें बुद्धीही आकळितां सांकडे। म्हणऊनि बोलीं विपायें सापडे।
परी श्रीनिवृत्तिकृपादीप उजियेडें। देखेन मी॥ ३२॥

जें दिठीहि न पविजे। तें दिठीविण देखिजे।
जरी अतींद्रिय लाहिजे। ज्ञानबळ॥ ३३॥

ना तरी जें धातुवादाही न जोडे। तें लोहींचि पंधरें सांपडे।
जरी दैवयोगें चढे। परिसु हातां॥ ३४॥

तैसी सद्गुरुकृपा होये। तरी करितां काय आपु नोहे।
म्हणऊनि ते अपार मातें आहे। ज्ञानदेवो म्हणे॥ ३५॥

तेणें कारणें मी बोलेन। बोलीं अरूपाचें रूप दावीन।
अतींद्रिय परी भोगवीन। इंद्रियांकरवीं॥ ३६॥

श्रीभगवानुवाच।
अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः॥
स संन्यासी च योगी च न निरग्निर्न चाक्रिया॥ ६.१॥

आइका यश श्री औदार्य। ज्ञान वैराग्य ऐश्वर्य।
हे साही गुणवर्य। वसति जेथ॥ ३७॥

म्हणोनि तो भगवंतु। जो निःसंगाचा सांगातु।
तो म्हणे पार्था दत्तचितु। होईं आतां॥ ३८॥

आइकें योगी आणि संन्यासी जनीं। हे एकचि सिनाने झणीं मानीं।
एऱ्हवीं विचारिजती जंव दोन्ही। तंव एकचि ते॥ ३९॥

सांडिजे दुजया नावाचा आभासु। तरी योगु तोचि संन्यासु।
पहातां ब्रह्मीं नाहीं अवकाशु। दोहींमाजी॥ ४०॥

जैसें नामाचेनि अनारिसेपणें। एका पुरुषातें बोलावणें।
कां दोहींमार्गीं जाणें। एकाचि ठायां॥ ४१॥

नातरी एकचि उदक सहजें। परि सिनानां घटीं भरिजे।
तैसें भिन्नत्व हे जाणिजे। योगसंन्यासांचें॥ ४२॥

आइकें सकळ संमतें जगीं। अर्जुना गा तोचि योगी।
जो कर्मे करूनि रागी। नोहेचि फळीं॥ ४३॥

जैसी मही हे उद्भिजें। जनी अहंबुद्धीवीण सहजें।
आणि तेथिंचीं तियें बीजें। अपेक्षीना॥ ४४॥

तैसा अन्वयाचेनि आधारें। जातीचेनि अनुकारें।
जें जेणें अवसरें। करणें पावे॥ ४५॥

तें तैसेंचि उचित करी। परी साटोपु नोहे शरीरीं।
आणि बुद्धिही करोनि फळवेरीं। जायेचिना॥ ४६॥

ऐसा तोचि संन्यासी। पार्था गा परियेसीं।
तोचि भरंवसेनिसीं। योगीश्वरु॥ ४७॥

वांचूनि उचित कर्म प्रासंगिक। तयातें म्हणे हें सांडी न बद्धक।
तरी टांकोटांकीं आणिक एक। मांडीचि तो॥ ४८॥

जैसा क्षाळूनियां लेपु एकु। सवेंचि लाविजे आणिकु।
तैसेनि आग्रहाचा पाइकु। विचंबे वायां॥ ४९॥

गृहस्थाश्रमाचे ओझें। कपाळीं आधींचि आहे सहजें।
कीं तेंचि संन्यासें वाढविजे। सरिसें पुढती॥ ५०॥

म्हणोनि अग्निसेवा न सांडितां। कर्माची रेखा नोलांडितां।
आहे योगसुख स्वभावता। आपणपांचि॥ ५१॥

यं संन्यासमिति प्राहुर्योगं तं विद्धि पांडव॥
न ह्यसंन्यस्तसंकल्पो योगी भवति कश्चन॥ ६.२॥

ऐकें संन्यासी तोचि योगी। ऐसी एकवाक्यतेची जे जगीं।
गुढी उभविली अनेगीं। शास्त्रांतरीं॥ ५२॥

जेथ संन्यासिला संकल्पु तुटे। तेथेचि योगाचे सार भेटे।
ऐसें हें अनुभवाचेनि धटें। साचें जया॥ ५३॥

आरुरुक्षोर्मुनेर्योगं कर्म कारणमुच्यते॥
योगारूढस्य तस्यैव शमः कारणमुच्यते॥ ६.३॥

आतां योगचळाचा निमथा। जरी ठाकावा आथि पार्था।
तरी सोपाना या कर्मपथा। चुका झणीं॥ ५४॥

येणें यमनियमांचेनि तळवटें। रिगे आसनाचिये पाउलवाटे।
येई प्राणायामाचेनि आडकाठें। वरौता गा॥ ५५॥

मग प्रत्याहाराचा आधाडा। जो बुद्धीचियाही पाया निसरडा।
जेथ हटिये सांडिती होडा। कडेलग॥ ५६॥

तरी अभ्यासाचेनि बळें। प्रत्याहारीं निराळे।
नखी लागेल ढाळें ढाळें। वैराग्याची॥ ५७॥

ऐसा पवनाचेनि पाठारें। येतां धारणेचेनि पैसारें।
क्रमी ध्यानाचें चवरें। सांडे तंव॥ ५८॥

मग तया मार्गाची धांव। पुरेल प्रवृत्तीची हांव।
जेथ साध्यसाधना खेंव। समरसें होय॥ ५९॥

जेथ पुढील पैस पारुखे। मागील स्मरावें तें ठाके।
ऐसिये सरसीये भूमिके। समाधी राहे॥ ६०॥

येणें उपायें योगारूढु। जो निरवधि जाहला प्रौढु।
तयांचिया चिन्हांचा निवाडु। सांगेन आइकें॥ ६१॥

यदा हि नेन्द्रियार्थेषु न कर्मस्वनुषज्जते।
सर्वसंकल्पसंन्यासी योगारूढस्तदोच्यते॥ ६.४॥

तरी जयाचिया इंद्रियांचिया घरा। नाहीं विषयांचिया येरझारा।
जो आत्मबोधाचिया वोवरां। पहुडला असे॥ ६२॥

जयाचें सुखदुःखाचेनि आंगें। झगटलें मानस चेवो नेघे।
विषय पासींही आलिया से न रिघे। हें काय म्हणऊनि॥ ६३॥

इंद्रिये कर्माच्यां ठायीं। वाढीनलीं परी कहीं।
फळहेतूची चाड नाहीं। अंतःकरणी॥ ६४॥

असतेनि देहें एतुला। जो चेतुचि दिसे निदेला।
तोचि योगारूढु भला। वोळखें तूं॥ ६५॥

तेथ अर्जुन म्हणे अनंता। हें मज विस्मो बहु आइकतां।
सांगें तया ऐसी हे योग्यता। कवणें दीजे॥ ६६॥

उद्धरेदात्मनात्मानं नात्मानम् अवसादयेत॥
आत्मैव हि आत्मनो बंधुः आत्मैव रिपुरात्मनः॥ ६.५॥

तंव हांसोनि श्रीकृष्ण म्हणे। तुझें नवल ना हें बोलणें।
कवणासि काय दीजेल कवणें। येथ अद्वैतीं इये॥ ६७॥

पैं व्यामोहाचिया शेजे। बळिया अविद्या निद्रित होइजे।
ते वेळीं दुःस्वप्न हा भोगिजे। जन्ममृत्यूंचा॥ ६८॥

पाठीं अवसांत ये चेवो। तैं तें अवघेंचि होय वावो।
ऐसा उपजे नित्य सद्भावो। तोहि आपणापांचि॥ ६९॥

म्हणऊनि आपणचि आपणपेया। घातु कीजतु असे धनंजया।
चित्त देऊनि नाथिलिया। देहाभिमाना॥ ७०॥

बंधुरात्मात्मनस्तस्य येनात्मैवात्मना जितः॥
अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत्॥ ६.६॥

हा विचारूनि अहंकारु सांडिजे। मग असतीच वस्तु होइजे।
तरी आपली स्वस्ति सहजें आपण केली॥ ७१॥

एऱ्हवीं कोशकीटकाचिया परी। तो आपणपया आपण वैरी।
जो आत्मबुद्धि शरीरीं। चारुस्थळीं॥ ७२॥

कैसे प्राप्तीचिये वेळे। निदैवा आंधळेपणाचे डोहळे।
कीं असते आपुले डोळे। आपण झांकी॥ ७३॥

कां कवण एकु भ्रमलेपणें। मी तीं नव्हे गा चोरलों म्हणे।
ऐसा नाथिला छंदु अंतःकरणें। घेऊनि ठाके॥ ७४॥

एऱ्हवीं होय तें तोचि आहे। परि काई कीजे बुद्धि तैशी नोहे।
देखा स्वप्नींचेनि घायें। कीं मरे साचें॥ ७५॥

जैसी ते शुकाचेनि आंगभारें। नळिका भोविन्नली एरी मोहरे।
तरी तेणें उडावें परि न पुरे। मनशंका॥ ७६॥

वायांचि मान पिळी। अटुवें हियें आवळी।
टिटांतु नळी। धरूनि ठाके॥ ७७॥

म्हणे बांधला मी फुडा। ऐसिया भावनेचिया पडे खोडां।
कीं मोकळिया पायांचा चवडा। गोंवीं अधिकें॥ ७८॥

ऐसा काजेंवीण आंतुडला। तो सांग पां काय आणिकें बांधला।
मग न सोंडीच जऱ्ही नेला। तोडूनि अर्धा॥ ७९॥

म्हणऊनि आपणपया आपणचि रिपु। जेणें वाढविला हा संकल्पु।
येर स्वयंबुद्धी म्हणे बापु। जो नाथिलें नेघे॥ ८०॥

जितात्मनः प्रशान्तस्य परमात्मा समाहितः॥
शीतोष्णसुखदुःखेषु तथा मानापमानयोः॥ ६.७॥

तया स्वांतःकरणजिता। सकळकामोपशांता।
परमात्मा परौता। दूरी नाहीं॥ ८१॥

जैसा किडाळाचा दोषु जाये। तरी पंधरें तेंचि होये।
तैसें जीवा ब्रह्मत्व आहे। संकल्पलोपीं॥ ८२॥

हा घटाकारु जैसा। निमालिया तया अवकाशा।
नलगे मिळों जाणें आकाशा। आना ठाया॥ ८३॥

तैसा देहाहंकारु नाथिला। हा समूळ जयाचा नाशिला।
तोचि परमात्मा संचला। आधींचि आहे॥ ८४॥

आतां शीतोष्णाचिया वाहणी। तेथ सुखदुःखाची कडसणी।
इयें न समाती कांहीं बोलणीं। मानापमानाचीं॥ ८५॥

जे जया वाटा सूर्य जाये। तेउतें तेजाचें विश्व होये।
तैसें तया पावे तें आहे। तोचि म्हणउनी॥ ८६॥

देखें मेघौनि सुटती धारा। तिया न रुपती जैसिया सागरा।
तैशीं शुभाशुभें योगीश्वरा। नव्हती आनें॥ ८७॥

ज्ञानविज्ञानतृप्तात्मा कूटस्थो विजितेन्द्रियः॥
युक्त इत्युच्यते योगी समलोष्टाश्मकाञ्चनः॥ ६.८॥

जो हा विज्ञानात्मकु भावो। तया विवरितां जाहला वावो।
मग लागला जंव पाहों। तंव ज्ञान तें तोचि॥ ८८॥

आतां व्यापकु कीं एकदेशी। हे उहापोही जे ऐसी।
ते करावी ठेली आपैसी। दुजेनेवीण॥ ८९॥

ऐसा शरीरीचि परि कौतुकें। परब्रह्माचेनि पाडें तुके।
जेणें जिंतलीं एकें। इंद्रियें गा॥ ९०॥

तो जितेंद्रियु सहजें। तोचि योगयुक्तु म्हणिजे।
जेणें सानें थोर नेणिजे। कवणे काळीं॥ ९१॥

देखें सोनियाचें निखळ। मेरुयेसणें ढिसाळ।
आणि मातियेचें डिखळ। सरिसेंचि मानी॥ ९२॥

पाहतां पृथ्वीचें मोल थोडें। ऐसें अनर्घ्य रत्न चोखडें।
देखे दगडाचेनि पाडें। निचाडु ऐसा॥ ९३॥

सुहृन्मित्रार्य उदासीन मध्यस्थद्वेष्य बन्धुषु॥
साधुष्वपि च पापेषु समबुद्धिर्विशिष्यते॥ ६.९॥

तेथ सुहृद आणि शत्रु। कां उदासु आणि मित्रु।
हा भावभेदु विचित्रु। कल्पूं कैंचा॥ ९४॥

तया बंधु कोण काह्याचा। द्वेषिया कवणु तयाचा।
मीचि विश्व ऐसा जयाचा। बोधु जाहला॥ ९५॥

मग तयाचिये दृष्टी। अधमोत्तम असे किरीटी।
काय परिसाचिये कसवटी। वानिया कीजे॥ ९६॥

ते जैशी निर्वाण सुवर्णुचि करी। तैशी जयाची बुद्धि चराचरीं।
होय साम्याची उजरी। निरंतर॥ ९७॥

जे तें विश्वाळंकाराचे विसुरे। जरी आहाती आनानें आकारें।
तरी घडले एकेंचि भांगारें। परब्रह्में॥ ९८॥

ऐसें जाणणें जें बरवें। तें फावलें तया आघवें।
म्हणोनि आहाचवाहाचे न झकवे। येणें आकारचित्रें॥ ९९॥

घापे पटामाजीं दृष्टी। दिसे तंतूंची सैंघ सृष्टी।
परि तो एकवांचूनि गोष्टी। दुजी नाहीं॥ १००॥

ऐसेंनि प्रतीती हे गवसे। ऐसा अनुभव जयातें असे।
तिचि समबुद्धि हें अनारिसें। नव्हे जाणें॥ १०१॥

जयाचें नांव तीर्थरावो। दर्शनें प्रशस्तीसि ठावो।
जयाचेनि संगें ब्रह्मभावो। भ्रांतासही॥ १०२॥

जयाचेनि बोलें धर्मु जिये। दिठी महासिद्धीतें विये।
देखें स्वर्गसुखादि इयें। खेळु जयाचा॥ १०३॥

विपायें जरी आठवलें चित्ता। तरी दे आपुली योग्यता।
हें असो तयातें प्रशंसितां। लाभु आथी॥ १०४॥

पुढती अस्तवेना ऐसें। जया पाहलें अद्वैतदिवसें।
मग आपणपांचि आपण असे। अखंडित॥ १०५॥

योगी युञ्जीत सततमात्मानं रहसि स्थितः॥
एकाकी यतचित्तात्मा निराशीरपरिग्रहः॥ ६.१०॥

ऐसिया दृष्टी जो विवेकी। पार्था तो एकाकी।
सहजें अपरिग्रही जे तिहीं लोकीं। तोचि म्हणऊनी॥ १०६॥

ऐसियें असाधारणें। निष्पन्नाचीं लक्षणें।
आपुलेनि बहुवसपणें। श्रीकृष्ण म्हणे॥ १०७॥

तो ज्ञानियांचा बापु। देखणेयांचे दिठीचा दीपु।
जया दादुलयाचा संकल्पु। विश्व रची॥ १०८॥

प्रणवाचिये पेठे। जाहलें शब्दब्रह्म माजिठें।
तें जयाचिये यशा धाकुटें। वेढूं न पुरे॥ १०९॥

जयाचेनि आंगिकें तेजें। आवो रविशशीयेचे वणिजे।
म्हणऊनि जग हें। वेसजेवीण असे तया॥ ११०॥

हां गा नांवचि एक जयाचें। पाहतां गगनहीं दिसे टांचें।
गुण एकैक काय तयाचे। कळिशील तूं॥ १११॥

म्हणोनि असो हें वानणें। सांगों नेणों कवणाचीं लक्षणें।
दावावीं मिषें येणें। कां बोलिलों तें॥ ११२॥

ऐकें द्वैताचा ठावोचि फेडी। ते ब्रह्मविद्या कीजेल उघडी।
तरि अर्जुनु पढिये हे गोडी। नासेल हन॥ ११३॥

म्हणोनि तें तैसें बोलणें। नव्हे सपातळ आड लावणें।
केलें मनचि वेगळवाणें। भोगावया॥ ११४॥

जया सोहंभाव हा अटकु। मोक्षसुखालागोनि रंकु।
तयाचिये दिठीचा झणें कळंकु। लागेल तुझिया प्रेमा॥
११५॥

विपायें अहंभाव ययाचा जाईल। मी तेंचि हा जरी होईल।
तरि मग काय कीजेल। एकलेया॥ ११६॥

दिठीचि पाहतां निविजे। कां तोंड भरोनि बोलिजे।
नातरी दाटूनि खेंव दीजे। ऐसें कोण आहे॥ ११७॥

आपुलिया मना बरवी। असमाई गोठी जीवीं।
ते कवणेंसि चावळावी। जरी ऐक्य जाहले॥ ११८॥

इया काकुळती जनार्दनें। अन्योपदेशाचेनि हातासनें।
बोलामाजीं मन मनें। आलिंगूं सरलें॥ ११९॥

हें परिसतां जरी कानडें। तरी जाणपां पार्थ उघडें।
श्रीकृष्णसुखाचेचि रूपडें। वोतलें गा॥ १२०॥

हे असो वयसेचिये शेवटीं। जैसें एकचि विये वांझोटी।
मग ते मोहाची त्रिपुटी। नाचों लागे॥ १२१॥

तैसें जाहलें श्रीअनंता। ऐसें तरी मी न म्हणतां।
जरी तयाचा न देखतां। अतिशयो एथ॥ १२२॥

पाहा पां नवलकैसें चोज। कें उपदेशु केउतें झुंज।
परि पुढें वालभाचें भोज। नाचत असे॥ १२३॥

आवडी आणि लाजवी। व्यसन आणि शिणवी।
पिसें आणि न भुलवी। तरी तेंचि काई॥ १२४॥

म्हणऊनि भावार्थु तो ऐसा। अर्जुन मैत्रियेचा कुवासा।
कीं सुखें शृंगारलिया मानसा। दर्पणु तो॥ १२५॥

यापरी बाप पुण्यपवित्र। जगीं भक्तिबीजासि सुक्षेत्र।
तो श्रीकृष्णकृपे पात्र। याचिलागीं॥ १२६॥

हो कां आत्मनिवेदनातळींची जे पीठिका आहे सख्याची।
पार्थु अधिष्ठात्री तेथिंची। मातृका गा॥ १२७॥

पासींचि गोसावी वर न वानिजे। मग पाइकाचा गुण
घेईजे।
ऐसा अर्जुनुचि तो सहजें। पढिये हरी॥ १२८॥

पाहा पां अनुरागें भजे। जे प्रियोत्तमें मानिजे।
ते पतीहीहूनि काय वर्णिजे। पतिव्रता॥ १२९॥

तैसा अर्जुनुचि विशेषें स्तवावा। ऐसें आवडलें मज जीवा।
जे तो त्रिभुवनींचियां दैवां। एकायतनु जाहला॥ १३०॥

जयाचिया आवडीचेनि पांगे। अमूर्तुही मूर्ति आवगे।
पूर्णाहि परी लागे। अवस्था जयाची॥ १३१॥

तंव श्रोते म्हणती दैव। कैसी बोलाची हवाव।
काय नादातें हन बरव। जिणोनि आली॥ १३२॥

हां हो नवल नोहे देशी। मऱ्हाटी बोलिजे तरी ऐशी।
वाणें उमटताहे आकाशीं। साहित्य रंगाचे॥ १३३॥

कैसें उन्मेखचांदिणें तार। आणि भावार्था पडे गार।
हेचि श्लोकार्थकुमुदी तरी फार। साविया होती॥ १३४॥

चाडचि निचाडां करी। ऐसी मनोरथीं ये थोरी।
तेणें विवळले अंतरीं। तेथ डोलु आला॥ १३५॥

तें निवृत्तिदासें जाणितलें। मग अवधान द्या म्हणितलें।
नवल पांडवकुळीं पाहलें। कृष्णदिवसें॥ १३६॥

देवकीया उदरीं वाहिला। यशोदा सायासें पाळिला।
कीं शेखीं उपेगा गेला। पांडवांसी॥ १३७॥

म्हणऊनि बहुदिवस वोळगावा। कां अवसरु पाहोनि विनवावा।
हाही सोसु तया सदैवा। पडेचिना॥ १३८॥

हें असो कथा सांगें वेगीं। मग अर्जुन म्हणे सलगी।
देवा इयें संतचिन्हें हन आंगीं। न ठकती माझ्यां॥ १३९॥

एऱ्हवीं या लक्षणांचिया निजसारा। मी अपाडें कीर अपुरा।
परि तुमचेनि बोलें अवधारा। थोरावें जरी॥ १४०॥

जी तुम्ही चित्त देयाल। तरी ब्रह्म माझें होईल।
काय जाहलें अभ्यासिजेल। सांगाल तें॥ १४१॥

हां हो नेणों कवणाची काहाणी। आइकोनि श्लाघिजत असों अंतःकरणीं।
ऐसी जाहलेपणाची शिरयाणी। कायसी देवा॥ १४२॥

हें आंगें म्यां होइजो कां। येतुलें गोसावी आपुलेपणें कीजो कां।
तंव हांसोनि श्रीकृष्ण हो कां। करूं म्हणती॥ १४३॥

देखा संतोषु एक न जोडे। तंवचि सुखाचे सैंघ सांकडें।
मग जोडलिया कवणेकडे। अपुरें असे॥ १४४॥

तैसा सर्वेश्वरु बळिया सेवकें। म्हणोनि ब्रह्महीं होय कौतुकें।
परि कैसा भारें आतला पिके। दैवाचेनि॥ १४५॥

जो जन्मसहस्रांचियांसाठी। इंद्रादिकांही महागु भेटी।
तो आधीनु केतुला किरीटी। जे बोलुही न साहे॥ १४६॥

मग ऐका जें पांडवें। म्हणितलें ब्रह्मम्यां होआवें।
तें अशेषही देवें। अवधारिलें॥ १४७॥

तेथ ऐसेंचि एक विचारिलें। जे या ब्रह्मत्वाचे डोहळे जाहले।
परि उदरा वैराग्य आहे आलें। बुद्धीचिया॥ १४८॥

एऱ्हवीं दिवस तरी अपुरे। परी वैराग्यवसंताचेनि भरें।
जे सोहंभाव महुरें। मोडोनि आला॥ १४९॥

म्हणोनि प्राप्तिफळें फळतां। ययासि वेळु न लागेल आतां।
होय विरक्तु ऐसा अनंता। भरंवसा जाहला॥ १५०॥

म्हणें जें जें हा अधिष्ठील। तें आतां आरंभीच यया फळेल।
म्हणोनि सांगितला न वचेल। अभ्यासु वायां॥ १५१॥

ऐसें विवरोनियां श्रीहरी। म्हणितलें तिये अवसरीं।
अर्जुना हा अवधारीं। पंथराजु॥ १५२॥

तेथ प्रवृत्तितरुच्या बुडीं। दिसती निवृत्तिफळाचिया कोडी।
जिये मार्गींचा कापडी। महेशु आझुनी॥ १५३॥

पै योगिवृंदें वहिलीं। आडवी आकाशीं निघालीं।
कीं तेथु अनुभवाच्या पाउलीं। धोरणु पडिला॥ १५४॥

तिहीं आत्मबोधाचेनि उजुकारें। धांव घेतली एकसरें।
कीं येर सकळ मार्ग निदसुरे। सांडूनिया॥ १५५॥

पाठीं महर्षी येणें आले। साधकांचे सिद्ध जाहाले।
आत्मविद थोरावले। येणेंचि पंथें॥ १५६॥

हा मार्गु जैं देखिजे। तैं तहान भूक विसरिजे।
रात्रिदिवसु नेणिजे। वाटे इये॥ १५७॥

चालतां पाउल जेथ पडे। तेथ अपवर्गाची खाणी उघडे।
आव्हांटलिया तरी जोडे। स्वर्गसुख॥ १५८॥

निगिजे पूर्वीलिया मोहरा। कीं येइजे पश्चिमेचिया घरा।
निश्चळपणें धनुर्धरा। चालणें एथिंचें॥ १५९॥

येणें मार्गें जया ठाया जाइजे। तो गांवो आपणचि होईजे।
हें सांगों काय सहजें। जाणसी तूं॥ १६०॥

तेथ म्हणितलें देवा। तरि तेंचि मग केव्हां।
कां आर्तिसमुद्रौनि न काढावा। बुडतु जी मी॥ १६१॥

तंव श्रीकृष्ण म्हणती ऐसें। हें उत्संखळ बोलणें कायसें।
आम्ही सांगतसों आपैसें। वरी पुशिलें तुवां॥ १६२॥

शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मनः॥
नात्युच्छ्रितं नातिनीचं चैलाजिनकुशोत्तरम॥ ६.११॥

तरी विशेषें आतांचि बोलिजेल। परि तें अनुभवें उपेगा जाईल।
म्हणोनि तैसें एक लागेल। स्थान पाहावें॥ १६३॥

जेथ आराणुकेचेनि कोडें। बैसलिया उठों नावडे।
वैराग्यासी दुणीव चढे। देखिलिया जें॥ १६४॥

जो संतीं वसविला ठावो। संतोषासि सावावो।
मना होय उत्सावो। धैर्याचा॥ १६५॥

अभ्यासुचि आपणयातें करी। हृदयातें अनुभव वरी।
ऐसी रम्यपणाची थोरी। अखंड जेथ॥ १६६॥

जया आड जातां पार्था। तपश्चर्या मनोरथा।
पाखांडियाही आस्था। समूळ होय॥ १६७॥

स्वभावें वाटे येतां। जरी वरपडा जाहला अवचितां।
तरी सकामुही परि माघौता। निघों विसरे॥ १६८॥

ऐसेंनि न राहतयातें राहवी। भ्रमतयातें बैसवी।
थापटूनि चेववी। विरक्तीतें॥ १६९॥

हें राज्य वर सांडिजे। मग निवांता एथेंचि असिजे।
ऐसें श्रृंगारियांहि उपजे। देखतखेंवों॥ १७०॥

जें येणेंमानें बरवंट। आणि तैसेंचि अति चोखट।
जेथ अधिष्ठान प्रगट। डोळां दिसे॥ १७१॥

आणिकही एक पहावें। जें साधकीं वसतें होआवें।
आणि जनाचेनि पायरवें। रुळेचिना॥ १७२॥

जेथ अमृताचेनि पाडें। मुळांहीसकट गोडें।
जोडती दाटें झाडें। सदा फळती॥ १७३॥

पाउला पाउला उदकें। वर्षाकाळीही अतिचोखें।
निर्झरें कां विशेखें। सुलभे जेथ॥ १७४॥

हा आतपाही अळुमाळु। जाणिजे तरी शीतळु।
पवनु अति निश्चळु। मंद झुळके॥ १७५॥

बहुतकरूनि निःशब्द। दाट न रिघे श्वापद।
शुक हन षट्पद। तेउतें नाहीं॥ १७६॥

पाणिलगें हंसें। दोनी चारी सारसें।
कवणे एके वेळे बैसे। तरी कोकिळही हो कां॥ १७७॥

निरंतर नाहीं। तरि आलीं गेलीं कांहीं।
होतु कां मयूरेंही। आम्ही ना न म्हणों॥ १७८॥

परि अवश्यक पांडवा। ऐसा ठावो जोडावा।
तेथ निगूढ मठ होआवा। कां शिवालय॥ १७९॥

दोहीं माजि आवडे तें। जें मानवलें होय चित्तें।
बहुतकरूनि एकांते। बैसिजे गा॥ १८०॥

म्हणोनि तैसें तें जाणावें। मन राहतें पाहावें।
राहेल तेथ रचावें। आसन ऐसें॥ १८१॥

वरी चोखट मृगसेवडी। माजी धूतवस्त्राची घडी।
तळवटीं अमोडी। कुशांकुर॥ १८२॥

सकोमळ सरिसे। सुबद्ध राहती आपैसे।
एकें पाडें तैसे। वोजा घालीं॥ १८३॥

परी सावियाचि उंच होइल। तरी आंग हन डोलेल।
नीच तरी पावेल। भूमिदोषु॥ १८४॥

ह्मणोनि तैसें न करावें। समभावें धरावें।
हें बहु असो होआवें। आसन ऐसें॥ १८५॥

तत्रैकाग्रं मनः कृत्वा यतचित्तेन्द्रियक्रियः॥
उपविश्यासने युञ्ज्याद्योगमात्मविशुद्धये॥ ६.१२॥

मग तेथ आपण। एकाग्र अंतःकरण।
करूनि सद्गुरुस्मरण। अनुभविजे॥ १८६॥

तैसें स्मरतेनि आदरें। सबाह्य सात्विकें भरे।
जंव काठिण्यपण विरे। अहंभावाचे॥ १८७॥

विषयांचा विसरु पडे। इंद्रियांची कसमस मोडे।
मनाची घडी घडे। हृदयामाजीं॥ १८८॥

ऐसें ऐक्य हें सहजें। फावे तंव राहिजे।
मग तेणेंचि बोधें बैसिजे। आसनावरी॥ १८९॥

समं कायशिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिरः॥
संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन्॥ ६.१३॥

आतां आंगातें आंग वरी। पवनातें पवनुचि धरी।
ऐसी अनुभवाची उजरी। होंचि लागे॥ १९०॥

प्रवृत्ति माघौति मोहरे। समाधि ऐलाडी उतरे।
आघवें अभ्यासू सरे। बैसतखेवो॥ १९१॥

मुद्रेची प्रौढी ऐशी। तेचि सांगिजेल आतां परियेसीं।
तरी उरु या जघनासी। जडोनि घालीं॥ १९२॥

चरणतळें देव्हडीं। आधारद्रुमाच्या बुडीं।
सुघटितें गाढीं। संचरीं पां॥ १९३॥

सव्य तें तळीं ठेविजे। तेणें सिवणीमध्यु पीडिजे।
वरी बैसे तो सहजें। वामचरणु॥ १९४॥

गुदमेंढ्रा आंतौतीं। चारी अंगुळें निगुतीं।
तेथ सार्ध सार्ध प्रांती। सांडुनिया॥ १९५॥

माजि अंगुळ एक निगे। तेथ टांचेचेनि उत्तरभागें।
नेहेटिजे वरि आंगें। पेललेनी॥ १९६॥

उचलिलें कां नेणिजे। तैसें पृष्ठांत उचलिजे।
गुल्फद्वय धरिजे। तेणेंचि मानें॥ १९७॥

मग शरीर संचु पार्था। अशेषही सर्वथा।
पार्ष्णींचा माथा। स्वयंभु होय॥ १९८॥

अर्जुना हें जाण। मूळबंधाचें लक्षण।
वज्रासन गौण। नाम यासी॥ १९९॥

ऐसी आधारीं मुद्रा पडे। आणि आधींचा मार्गु मोडे।
तेथ अपानु आंतलीकडे। वोहोटों लागे॥ २००॥

तंव करसंपुट आपैसें। वामचरणीं बैसे।
बाहुमूळीं दिसे। थोरीव आली॥ २०१॥

माजि उभारलेनि दंडें। शिरकमळ होय गाढें।
नेत्रद्वारींची कवाडें। लागूं पाहती॥ २०२॥

वरचिलें पातीं न ढळती। तळींचीं तळीं पुंजाळती।
तेथ अर्धोन्मीलित स्थिती। उपजे तया॥ २०३॥

दिठी राहोनी आंतुलीकडे। बाहेर पाउल घाली कोडें।
ते ठायीं ठावो पडे। नासाग्रपीठीं॥ २०४॥

ऐसें आंतुच्या आंतुचि रचे। बाहेरी मागुतें न वचे।
ह्मणोनि राहणें आधिये दिठीचें। तेथेंचि होय॥ २०५॥

आतां दिशांची भेटी घ्यावी। कां रूपाची वाट पहावी।
हे चाड सरे आघवी। आपैसया॥ २०६॥

मग कंठनाळ आटे। हनुवटी हे हडौती दाटे।
ते गाढी होऊनि नेहटे। वक्षःस्थळीं॥ २०७॥

माजि घंटिका लोपे। वरी बंधु जो आरोपे।
तो जालंधरु ह्मणिपे। पंडुकुमरा॥ २०८॥

नाभी वरी पोखे। उदर हें थोके।
अंतरीं फांकें। हृदयकोशु॥ २०९॥

स्वाधिष्ठानावरीचिले कांठीं। नाभिस्थानातळवटीं।
बंधु पडे किरीटी। वोढियाणा तो॥ २१०॥

ऐसी शरीराबाहेरलीकडे। अभ्यासाची पाखर पडे।
तंव आंतु त्राय मोडे। मनोधर्माची॥ २११॥

कल्पना निमे। प्रवृत्ती शमे।
आंग मन विरमे। सावियाचि॥ २१२॥

क्षुधा काय जाहाली। निद्रा केउती गेली।
हे आठवणही हारपली। न दिसे वेगां॥ २१३॥

जो मूळबंधें कोंडला। अपानु माघौता मुरडला।
तो सवेंचि वरी सांकडला। फुगू धरी॥ २१४॥

क्षोभलेपणें माजे। उवाइला ठायीं गाजे।
मणिपूरेंसि झुंजे। राहोनियां॥ २१५॥

मग थांबली ये वाहटुळी। सैंघ घेऊनि घर डहुळी।
बाळपणींची कुहीटुळी। बाहेर घाली॥ २१६॥

भीतरीं वळी न धरे। कोठ्यामाजी संचरे।
कफपित्तंचे थारे। उरों नेदी॥ २१७॥

धातूंचे समुद्र उलंडी। मेदाचे पर्वत फोडी।
आंतली मज्जा काढी। अस्थिगत॥ २१८॥

नाडीतें सोडवी। गात्रांतें विघडवी।
साधकातें भेडसावी। परि बिहावें ना॥ २१९॥

प्रशान्तात्मा विगतभीर्ब्रह्मचारिव्रते स्थितः॥
मनः संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्परः॥ ६.१४॥

व्याधीतें दावी। सवेंचि हारवी।
आप पृथ्वी कालवी। एकवाट॥ २२०॥

तंव येरीकडे धनुर्धरा। आसनाचा उबारा।
शक्ती करी उजगरा। कुंडलिनीये॥ २२१॥

नागिणीचें पिलें। कुंकुमें नाहलें।
वळण घेऊनि आलें। सेजे जैसें॥ २२२॥

तैशी ते कुंडलिनी। मोटकी औट वळणी।
अधोमुख सर्पिणी। निजैली असे॥ २२३॥

विद्युल्लतेची विडी। वन्हिज्वाळांची घडी।
पंधरेयाची चोखडी। घोंटीव जैशी॥ २२४॥

तैशी सुबद्ध आटली। पुटीं होती दाटली।
ते वज्रासनें चिमुटली। सावध होय॥ २२५॥

तेथ नक्षत्र जैसें उलंडलें। कीं सूर्याचें आसन मोडलें।
तेजाचें बीज विरूढलें। अंकुरेंशीं॥ २२६॥

तैशी वेढियातें सोडिती। कवतिकें आंग मोडिती।
कंदावरी शक्ती। उठली दिसे॥ २२७॥

सहजें बहुतां दिवसांचि भूक। वरी चेवविली तें होय मिष।
मग आवेशें पसरी मुख। ऊर्ध्व उजू॥ २२८॥

तेथ हृदयकोशातळवटीं। जो पवनु भरे किरीटी।
तया सगळेयाचि मिठी। देऊनि घाली॥ २२९॥

मुखींच्या ज्वाळीं। तळीं वरी कवळी।
मांसाची वडवाळी। आरोगूं लागे॥ २३०॥

जे जे ठाय समांस। तेथ आहाच जोडे घाउस।
पाठी एक दोनी घांस। हियाही भरी॥ २३१॥

मग तळवे तळहात शोधी। उर्ध्वींचे खंड भेदी।
झाडा घे संधी। प्रत्यंगाचा॥ २३२॥

आधार तरी न सांडी। परि नखींचेंही सत्व काढी।
त्वचा धुवूनि जडी। पांजरेंशी॥ २३३॥

अस्थींचे नळे निरपे। शिरांचे हीर वोरपे।
तंव बाहेरी विरूढी करपे। रोमबीजांची॥ २३४॥

मग सप्तधातूंच्या सागरीं। ताहानेली घोंट भरी।
आणि सवेंचि उन्हाळा करी। खडखडित॥ २३५॥

नासापुटौनि वारा। जो जातसे अंगुळें बारा।
तो गचीये धरूनि माघारा। आंतु घाली॥ २३६॥

तेथ अध वरौतें आकुंचे। ऊर्ध्व तळौतें खाचे।
तया खेवामाजि चक्रांचे। पदर उरती॥ २३७॥

एऱ्हवीं तरी दोन्ही तेव्हांचि मिळती। परी कुंडलिनी नावेक दुच्चित्त होती।

ते तयातें म्हणे परौती। तुम्हीचि काय एथें॥ २३८॥

आइकें पार्थिव धातु आघवी। आरोगितां कांहीं नुरवी।
आणि आपातें तंव ठेवी। पुसोनियां॥ २३९॥

ऐसी दोनी भूतें खाये। ते वेळीं संपूर्ण धाये।
मगसौम्य होऊनि राहे। सुषुम्नेपाशीं॥ २४०॥

तेथ तृप्तीचेनि संतोषें। गरळ जें वमी मुखें।
तेणें तियेचेनि पीयूषें। प्राणु जिये॥ २४१॥

तो आगी आंतूनि निघे। परि सबाह्य निववूंचि लागे।
ते वेळीं कसु बांधिती आंगें। सांडिला पुढती॥ २४२॥

मार्ग सोडिती नाडीचे। नवविधपण वायूचें।
जाय म्हणऊनि शरीराचे। धर्मु नाहीं॥ २४३॥

इडा पिंगळा एकवटती। गांठी तिन्ही सुटती।
साही पदर फुटती। चक्रांचे हे॥ २४४॥

मग शशी आणि भानु। ऐसा कल्पिजे जो अनुमानु।
तो वातीवरी पवनु। गिंवसितां न दिसे॥ २४५॥

बुद्धीची पुळिका विरे। परिमळु घ्राणीं उरे।
तोही शक्तीसवें संचरे। मध्यमेमाजी॥ २४६॥

तंव वरिलेकडोनि ढाळें। चंद्रामृताचें तळें।
कानवडोनि मिळे। शक्तिमुखीं॥ २४७॥

तेणें नाळकें रस भरे। तो सर्वांगामाजीं संचरे।
जेथिंचा तेथ मुरे। प्राणपवनु॥ २४८॥

तातलिये मुसे। मेण निघोनि जाय जैसें।
मग कोंदली राहे रसें। वोतलेंनि॥ २४९॥

तैसें पिंडाचेनि आकारें। ते कळाचि कां अवतरे।
वरी त्वचेचेनि पदरें। पांगुरली असे॥ २५०॥

जैशी आभाळाची बुंथी। करुनि राहे गभस्ती।
मग फिटलिया दीप्ति। धरूंन ये॥ २५१॥

तैसा आहाचवरि कोरडा। त्वचेचा लसे पातवडा।
तो झडोनि जाय कोंडा। जैसा होय॥ २५२॥

मग काश्मीरीचे स्वयंभ। कां रत्नबीजा निघाले कोंभ।
अवयवकांतीची भांब। तैसी दिसे॥ २५३॥

ना तरी संध्यारागींचे रंग। काढूनि वळिलें तें आंग।
कीं अंतर्ज्योतीचें लिंग। निर्वाळिलें॥ २५४॥

कुंकुमाचें भरींव। सिद्धरसाचें वोतींव।
मज पाहतां सावेव। शांतिचि ते॥ २५५॥

तें आनंदचित्रींचे लेप। ना तरी महासुखाचें रूप।
कीं संतोषतरूचें रोप। थांवलें जैसें॥ २५६॥

तो कनकचंपकाचा कळा। कीं अमृताचा पुतळा।
नाना सासिंनला मळा। कोंवळिकेचा॥ २५७॥

हो कां जे शारदियेचेनि वोले। चंद्रबिंब पाल्हेलें।
कां तेजचि मूर्त बैसलें। आसनावरी॥ २५८॥

तैसें शरीर होये। जे वेळीं कुंडलिनी चंद्र पिये।
मग देहाकृती बिहे। कृतांतु गा॥ २५९॥

वार्धक्य तरी बहुडे। तारुण्याची गांठी विघडे।
लोपली उघडे। बाळदशा॥ २६०॥

वयसा तरी येतुलेवरी। एऱ्हवीं बळाचा बळार्थु करी।
धैर्याची थोरी। निरुपम॥ २६१॥

कनकद्रुमाच्या पालवीं। रत्नकळिका नित्य नवी।
नखें तैसीं बरवीं। नवीं निघती॥ २६२॥

दांतही आन होती। परि अपाडें सानेजती।
जैसी दुबाहीं बैसे पांती। हिरेयांची॥ २६३॥

माणिकुलियांचिया कणिया। सावियाचि अणुप्रमाणिया।
तैसिया सर्वांगीं उधवती अणिया। रोमांचिया॥ २६४॥

करचरणतळें। जैसीं कां रातोत्पलें।
पाखाळींव होती डोळे। काय सांगो॥ २६५॥

निडाराचेनि कोंदाटें। मोतियें नावरती संपुटें।
मग शिवणी जैशी उतटे। शुक्तिपल्लवांची॥ २६६॥

तैशी पातियांचिये कवळिये न समाये। दिठी जाकळोनि
निघों पाहे।

आधिलीचि परी होये। गगना कळिती॥ २६७॥

आइकें देह होय सोनियाचें। परि लाघव इये वायूचें।
जे आप आणि पृथ्वीचे। अंशु नाहीं॥ २६८॥

मग समुद्रापैलाडी देखे। स्वर्गीचा आलोचु आइके।
मनोगत वोळखे। मुंगियेचें॥ २६९॥

पवनाचा वारिका वळघे। चाले तरी उदकीं पाउल न लागे।
येणें येणें प्रसंगें। येती बहुता सिद्धि॥ २७०॥

आइकें प्राणाचा हात धरुनी। गगनाची पाउटी करूनी।
मध्यमेचेनि दादराहुनी। हृदया आली॥ २७१॥

ते कुंडलिनी जगदंबा। जे चैतन्यचक्रवर्तीची शोभा।
जिया विश्वबिजाचिया कोंभा। साउली केली॥ २७२॥

जे शून्यलिंगाची पिंडी। जे परमात्मया शिवाची करंडी।
जे प्राणवाची उघडी। जन्मभूमी॥ २७३॥

हें असो ते कुंडलिनीबाळी। हृदयाआंतु आली।
तंव अनाहताचीं बोलीं। चावळे ते॥ २७४॥

शक्तीचिया आंगा लागलें। बुद्धीचें चैतन्य होतें जाहलें।
तें तेणें आइकले। अळुमाळु॥ २७५॥

घोषाच्या कुंडी। नादचित्रांची रूपडीं।
प्रणवाचिया मोडी। रेखिलीं ऐसीं॥ २७६॥

हेंचि कल्पावें तरी जाणिजे। परी आतां कल्पितें कैचें आणिजे।
परी नेणों काय गाजे। तिये ठायीं॥ २७७॥

विसरोनि गेलों अर्जुना। जंव नाशु नाहीं पवना।
तंव वाचा आथी गगना। म्हणऊनि घुमे॥ २७८॥

तया अनाहिताचेनि मेघें। मग आकाश दुमदुमों लागे।
तंव ब्रह्मस्थानींचें बेगें। फिटलें सहजें॥ २७९॥

आइके कमळगर्भाकारें। जें महदाकाश दुसरें।
जेथ चैतन्यें आधातुरें। करूनि असिजे॥ २८०॥

तया हृदयाच्या परिवरीं कुंडलिनिया परमेश्वरी।
तेजाची शिदोरी। विनियोगिली॥ २८१॥

बुद्धीचेनि शाकें। हातबोनें निकें।
द्वैत जेथ न देखे। तैसें केलें॥ २८२॥

ऐसी निजकांती हारविली। मग प्राणुचि केवळ जाहाली।
ते वेळीं कैसी गमली। म्हणावी पां॥ २८३॥

हो कां जे पवनाची पुतळी। पांघुरली होती सोनेसळी।
ते फेडूनियां वेगळी। ठेविली तिया॥ २८४॥

नातरी वायूचेनि आंगे झगटली। दीपाची दृष्टी निमटली।
कां लखलखोनि हारपली। वीजु गगनीं॥ २८५॥

तैशी हृदयकमळवेऱ्हीं। दिसे सोनियाची जैशी सरी।
नातरी प्रकाशजळाची झरी। वाहत आली॥ २८६॥

मग तिये हृदयभूमी पोकळे। जिराली कां एके वेळे।
तैसें शक्तीचें रूप मावळे। शक्तीचिमाजी॥ २८७॥

तेव्हां तरी शक्तीचि म्हणिजे। एऱ्हवीं तो प्राणु केवळ जाणिजे।
आतां नाद बिंदु नेणिजे। कळाज्योती॥ २८८॥

मनाचा हन मारु। कां पवनाचा आधारु।
ध्यानाचा आदरु। नाहीं परी॥ २८९॥

हे कल्पना घे सांडी। ते नाहीं इये परवडी।
हे महाभूतांची फुडी। आटणी देखा॥ २९०॥

पिंडें पिंडाचा ग्रासु। तो हा नाथसंकेतींचा दंशु।
परी दाऊनि गेला उद्देशु। श्रीमहाविष्णु॥ २९१॥

तया ध्वनियाचे केणें सोडुनी। यथार्थाची घडी झाडुनी।
उपलविली म्यां जाणुनी। ग्राहीक श्रोते॥ २९२॥

ऐके शक्तीचें तेज लोपे। तेथ देहींचें रूप हारपे।
मग तो डोळियांचि माजि लपे। जगाचिया॥ २९३॥

एऱ्हवीं आधिलाचि ऐसें। सावयव तरी दिसे।
परी वायूचें कां जैसें। वळिलें होय॥ २९४॥

नातरी कर्दळीचा गाभा। बुंथी सांडोनि उभा।
कां अवयवचि नभा। उदयला तो॥ २९५॥

तैसें होय शरीर। तैं तें म्हणिजे खेचर।
हें पद होतां चमत्कार। पिंडजनीं॥ २९६॥

देखें साधकु निघोनि जाये। मागां पाउलांची वोळ राहे।
तेथ ठायीं ठायीं होये। हे अणिमादिक॥ २९७॥

परि तेणें काय काज आपणपयां। अवधारीं ऐसा धनंजया।
लोप आथी भूतत्रया। देहींचा देहीं॥ २९८॥

पृथ्वीतें आप विरवी। आपातें तेज जिरवी।
तेजातें पवनु हरवी। हृदयामाजीं॥ २९९॥

पाठीं आपण एकला उरे। परि शरीराचेनि अनुकारें।
मग तोही निगे अंतरें। गगना मिळे॥ ३००॥

ते वेळीं कुंडलिनी हे भाष जाये। मारुत ऐसें नाम होये।
परि शक्तिपण तें आहे। जंव न मिळे शिवीं॥ ३०१॥

मग जालंधर सांडी। ककारांत फोडी।
गगनाचिये पाहाडीं। पैठी होय॥ ३०२॥

ते ॐकाराचिये पाठी। पाय देत उठाउठी।
पश्यंतीचिये पाउठी। मागां घाली॥ ३०३॥

पुढां तन्मात्रा अर्धवरी। आकाशाच्या अंतरी।
भरती गमे सागरीं। सरिता जैसी॥ ३०४॥

युञ्जन्नेवं सदात्मानं योगी नियतमानसः॥
शान्तिं निर्वाणपरमां मत् संस्थामधिगच्छति॥ ६.१५॥

मग ब्रह्मरंध्रीं स्थिरावोनी। सोहंभावाच्या बाह्या पसरूनी।
परमात्मलिंगा धांवोनी। आंगा घडे॥ ३०५॥

तंव महाभूतांची जवनिक फिटे। मग दोहींसि होय झटें।
तेथ गगनासकट आटे। समरसीं तिये॥ ३०६॥

पैं मेघाचेनि मुखीं निवडला। समुद्र कां वोघीं पडिला।
तो मागुता जैसा आला। आपणपेयां॥ ३०७॥

तेवीं पिंडाचेनि मिषें। पदीं पद प्रवेशे।
तें एकत्व होय तैसें। पंडुकुमरा॥ ३०८॥

आतां दुजें हन होतें। कीं एकचि हें आइतें।
ऐसिये विवंचनेपुरते। उरेचिना॥ ३०९॥

गगनीं गगन लया जाये। ऐसें जें कांहीं आहे।
तें अनुभवें जो होये। तो होऊनि ठाके॥ ३१०॥

म्हणोनि तेथिंची मातु। नचढेचि बोलाचा हातु।
जेणें संवादाचिया गांवाआंतु। पैठी कीजे॥ ३११॥

अर्जुना एऱ्हवीं तरी। इया अभिप्रायाचा जे गर्वु धरी।
ते पाहें पां वैखरी। दुरी ठेली॥ ३१२॥

भ्रूलता मागलीकडे। तेथ मकाराचेंचि आंग न मांडे।
सडेया प्राणा सांकडें। गगना येतां॥ ३१३॥

पाठीं तेथेंचि तो भेसळला। तैं शब्दा दिवो मावळला।
मग तयाहि वरी आटु भविन्नला। आकाशाचा॥ ३१४॥

आतां महाशून्याचिया डोहीं। जेथ गगनासीचि ठावो नाहीं।
तेथ तागा लागेल काई। बोलाचा इया॥ ३१५॥

म्हणूनि आखरामाजि सांपडे। कीं कानावरी जोडे।
हें तैसें नव्हे फुडें। त्रिशुद्धी गा॥ ३१६॥

जैं काहीं दैवें। अनुभविलें फावे।
तैं आपणचि हें ठाकावें। होऊनियां॥ ३१७॥

पुढती जाणणें तें नाहींचि। म्हणोनि असो किती हेंचि।
बोलावें आतां वायांचि। धनुर्धरा॥ ३१८॥

ऐसें शब्दजात माघौतें सरे। तेथ संकल्पाचें आयुष्य पुरे।
वाराही जेथ न शिरे। विचाराचा॥ ३१९॥

जें उन्मनियेचें लावण्य। जें तुर्येचें तारुण्य।
अनादि जें नगण्य। परमतत्त्व॥ ३२०॥

जें आकाराचा प्रांतु। जो मोक्षाचा एकांतु।
जेथ आदि आणि अंतु। विरोनी गेले॥ ३२१॥

जें विश्वाचें मूळ। जें योगद्रुमाचें फळ।
जें आनंदाचें केवळ। चैतन्य गा॥ ३२२॥

जें महाभूतांचें बीज। जें महातेजाचें तेज।
एवं पार्था जें निज। स्वरूप माझें॥ ३२३॥

ते हे चतुर्भुज कोंभेली। जयाची शोभा रूपा आली।
देखोनि नास्तिकीं नोकिलीं। भक्तवृंदें॥ ३२४॥

तें अनिर्वाच्य महासुख। पैं आपणचि जाहले ते पुरुष।
जयांचे कां निष्कर्ष। प्राप्तिवेरीं॥ ३२५॥

आम्हीं साधन हें जें सांगितलें। तेंचि शरीरा जिहीं केलें।
ते आमुचेनि पाडें आले। निर्वाळलेया॥ ३२६॥

परब्रह्माचेनि रसें। देहाकृतीचिये मुसे।
वोतींव जाहले तैसे। दिसती आंगें॥ ३२७॥

जरि हे प्रतीति हन अंतरीं फांके। तरी विश्वचि हें अवघें झांके।
तंव अर्जुन म्हणे निकें। साचचि जी हें॥ ३२८॥

कां जे आपण आतां देवो। हा बोलिले जो उपावो।
तो प्राप्तीचा ठावो। म्हणोनि घडे॥ ३२९॥

इये अभ्यासीं जे दृढ होती। ते भरवसेंनि ब्रह्मत्वा येती।
हें सांगतियाचि रीती। कळलें मज॥ ३३०॥

देवा गोठीचि हे ऐकतां। बोधु उपजतसे चित्ता।
मा अनुभवें तल्लीनता। नव्हेल केवीं॥ ३३१॥

म्हणऊनि एथ कांहीं। अनारिसें नाहीं।
परी नावभरी चित्त देईं। बोला एका॥ ३३२॥

आतां श्रीकृष्णा तुवां सांगितला योगु। तो मना तरी आला चांगु।
परि न शके करूं पांगु। योग्यतेचा॥ ३३३॥

सहजें आंगिक जेतुली आहे। तेतुलियाची जरी सिद्धि जाये।
तरी हाचि मार्गु सुखोपायें। अभ्यासीन॥ ३३४॥

नातरी देवो जैसें सांगतील। तैसें आपणपां जरी न ठकेल।
तरी योग्यतेवीण होईल। तेंचि पुसों॥ ३३५॥

जीवींचिये ऐसी धारण। म्हणोनि पुसावया जाहलें कारण।
मग म्हणे तरी आपण। चित्त देइजो॥ ३३६॥

हां हो जी अवधारिलें। हें जें साधन तुम्हीं निरूपिलें।
तें आवडतयाहि अभ्यासिलें। फावों शके॥ ३३७॥

कीं योग्यतेवीण नाहीं। ऐसें हन आहे कांहीं।
तेथ श्रीकृष्ण म्हणती तरी काई। धनुर्धरा॥ ३३८॥

हें काज कीर निर्वाण। परी आणिकही जें कांहीं साधारण।
तेंही अधिकाराचे वोडवेविण। काय सिद्धि जाय॥ ३३९॥

पैं योग्यता जे म्हणिजे। ते प्राप्तीची अधीन जाणिजे।
कां जें योग्य होउनि कीजे। तें आरंभिलें फळे॥ ३४०॥

तरी तैसी एथ कांहीं। सावियाचि केणी नाहीं।
आणि योग्यतेची काई। खाणी असे॥ ३४१॥

नावेक विरक्तु। जाहला देहधर्मी नियतु।
तरि तोचि नव्हे व्यवस्थितु। अधिकारिया॥ ३४२॥

येतुलालिये आयणीमाजि येवढें। योग्यपण तूंतेंही जोडे।
ऐसें प्रसंगें सांकडें। फेडिलें तयाचें॥ ३४३॥

मग म्हणे गा पार्था। ते हे ऐसी व्यवस्था।
अनियतासि सर्वथा। योग्यता नाहीं॥ ३४४॥

नात्यश्नतस्तु योगोऽस्ति न चैकान्तमनश्नतः॥
न चातिस्वप्नशीलस्य जाग्रतो नैव चार्जुन॥ ६.१६॥

जो रसनेंद्रियाचा अंकिला। कां निद्रेसी जीवे विकला।
तो नाहीं एथ म्हणितला। अधिकारिया॥ ३४५॥

अथवा आग्रहाचिये बांदोडी। क्षुधा तृषा कोंडी।
आहारातें तोडी। मारूनियां॥ ३४६॥

निद्रेचिया वाटा न वचे। ऐसा दृढिवेचेनि अवतरणें नाचे।
तें शरीरचि नव्हे तयाचें। मग योगु कवणाचा॥ ३४७॥

म्हणोनि अतिशयें विषय सेवावा। ऐसा बोध न व्हावा।
कां सर्वथा निरोधु करावा। हेंही नको॥ ३४८॥

युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु॥
युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा॥ ६.१७॥

आहार तरी सेविजे। परी युक्तीचेनि मापें मविजे।
क्रियाजात आचरिजे। तयाचि स्थिती॥ ३४९॥

मापितला बोल बोलिजे। मितलियां पाउलीं चालिजे।
निद्रेही मानु दीजे। अवसरें एकें॥ ३५०॥

जागणें जरी जाहलें। तरी व्हावें तें मितलें।
येतुलेनि धातुसाम्य संचलें। असेल सुखें॥ ३५१॥

ऐसें युक्तिचेनि हातें। जैं इंद्रियां वोपिजे भातें।
तैं संतोषासी वाढते। मनचि करी॥ ३५२॥

बाहेर युक्तीची मुद्रा पडे। तंव आंत सुख वाढे।
तेथें सहजेंचि योगु घडे। नाभ्यासितां॥ ३५३॥

जैसें भाग्याचिये भडसें। उद्यमाचेनि मिषें।
मग समृद्धिजात आपैसें। घर रिघे॥ ३५४॥

यदा विनियतं चित्तमात्मन्येवावतिष्ठते॥
निःस्पृहः सर्वकामेभ्यो युक्त इत्युच्यते तदा॥ ६.१८॥

तैसा युक्तिमंतु कौतुकें। अभ्यासाचिया मोहरा ठाके।
आणि आत्मसिद्धीचि पिके। अनुभवु तयाचा॥ ३५५॥

म्हणोनि युक्ति हे पांडवा। घडे जया सदैवा।
तो अपवर्गीचिये राणिवा। अळंकरिजे॥ ३५६॥

युक्ति योगाचें आंग पावे। ऐसें प्रयाग होय जे बरवें।
तेथ क्षेत्रसंन्यासें स्थिरावे। मानस जयाचे॥ ३५७॥

यथा दीपो निवातस्थो नेङ्गते सोपमा स्मृता॥
योगिनो यतचित्तस्य युञ्जतो योगमात्मनः॥ ६.१९॥

तयातें योगयुक्त म्हण। हेंहीं प्रसंगें जाण।
तें दीपाचें उपलक्षण। निर्वातींचिया॥ ३५८॥

आतां तुझें मनोगत जाणोनी। कांहीं एक आम्ही म्हणोनि।
तें निकें चित्त देऊनि। परिसावें गा॥ ३५९॥

तूं प्राप्तीची चाड वाहसी। परी अभ्यासीं दक्ष न होसी।
तें सांग पां काय बिहसी। दुवाडपणें॥ ३६०॥

तरी पार्था हें झणें। सायास घेशी हो मनें।
वायां बागूल इये दुर्जनें। इंद्रियें करिती॥ ३६१॥

पाहें पां आयुष्यातें अढळ करी। जें सरतें जीवित वारी।
तया औषधातें वैरी। काय जिव्हा न म्हणे॥ ३६२॥

ऐसें हितासि जें जें निकें। तें सदाचि या इंद्रियां दुखे।
एऱ्हवीं सोपें योगासारिखें। कांहीं आहे॥ ३६३॥

म्हणोनि आसनाचिया गाढिका। जो आम्हीं अभ्यासु सांगितला निका।
तेणें होईल तरी हो कां ।निरोधु यया॥ ३६४॥

यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया॥
यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति॥ ६.२०॥

एऱ्हवीं तरी येणें योगें। जैं इंद्रियां विंदाण लागे।
तैं चित्त भेटों रिगे। आपणपेयां॥ ३६५॥

परतोनि पाठिमोरें ठाके। आणि आपणियांतें आपण देखे।
देखतखेंवो वोळखे। म्हणे तत्त्व तें मी॥ ३६६॥

सुखमात्यन्तिकं यत्तद् बुद्धिग्राह्यमतीन्द्रियम॥
वेत्ति यत्र न चैवायं स्थितश्चलति तत्त्वतः॥ ६.२१॥

तिये वोळखीचि सरिसें। सुखाचियां साम्राज्यीं बैसे।
तेथें चित्तपण समरसें। विरोनि जाय॥ ३६७॥

जयापरतें आणिक नाहीं। जयातें इंद्रियें नेणती कहीं।
तें आपणचि आपुलां ठायीं होऊनि ठाके॥ ३६८॥

यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः॥
यस्मिन्स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते॥ ६.२२॥

मग मेरूपासूनि थोरें। देह दुःखाचेनि डोंगरें।
दाटिजो पां परी भारें। चित्त न दाटे॥ ३६९॥

कां शस्त्रेंवरी तोडलिया। देह आगीमाजीं पडलिया।
चित्तमहासुखीं पहुडलिया। चेवोचि न ये॥ ३७०॥

ऐसें आपणपां रिगोनि ठाये। मग देहाची वास न पाहे।
आणिकचि सुख होऊनि जाये। म्हणूनि विसरे॥ ३७१॥

तं विद्याद्दुःखसंयोगवियोगं योगसंज्ञितम्॥
स निश्चयेन योक्तव्यो योगोऽनिर्विण्णचेतसा॥ ६.२३॥

जया सुखाचिया गोडी। मन आर्तीची सेचि सोडी।
संसाराचिया तोंडी। गुंतलें जे॥ ३७२॥

जें योगाची बरव। संतोषाची राणिव।
ज्ञानाची जाणिव। जयालागी॥ ३७३॥

तें अभ्यासिलेनि योगे। सावयव देखावें लागे।
देखिलें तरी आंगे। होइजेल गा॥ ३७४॥

संकल्पप्रभवान्कामांस्त्यक्त्वा सर्वानशेषतः॥
मनसैवेन्द्रियग्रामं विनियम्य समन्ततः॥ ६.२४॥

परि तोचि योगु बापा। एके परी आहे सोपा।
जरी पुत्रशोकु संकल्पा। दाखविजे॥ ३७५॥

हा विषयांते निमालिया आइके। इंद्रियें नेमाचिया धारणीं देखे।
तरी हियें घालूनि मुके। जीवित्वासी॥ ३७६॥

ऐसें वैराग्य हें करी। तरी संकल्पाची सरे वारी।
सुखें धृतीचिया धवळारीं। बुद्धि नांदे॥ ३७७॥

शनैः शनैरुपरमेद्बुद्ध्या धृतिगृहीतया॥
आत्मसंस्थं मनः कृत्वा न किन्चिदपि चिन्तयेत्॥ ६.२५॥

बुद्धी धैर्या होय वसौटा। तरी मनातें अनुभवाचिया वाटा।
हळु हळु आणूनि करी प्रतिष्ठा। आत्मभुवनीं॥ ३७८॥

याही एके परी। प्राप्ति आहे विचारीं।
हें न ठके तरी सोपारी। आणिक ऐकें॥ ३७९॥

यतो यतो निश्चलति मनश्चञ्चलमस्थिरम्॥
ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत्॥ ६.२६॥

आतां नियमुचि हा एकला। जीवें करावा आपुला।
जैसा कृतनिश्चयाचिया बोला। बाहेरा नोहे॥ ३८०॥

जरी येतुलेनि चित्त स्थिरावे। तरी काजा आलें स्वभावें।
न राहे तरी घालावें। मोकलोनी॥ ३८१॥

मग मोकलिलें जेथ जेथ जाईल। तेथूनि नियमूचि घेऊनि येईल।
ऐसेनि स्थैर्याची होईल। सवेचि यया॥ ३८२॥

प्रशान्तमनसं ह्येनं योगिनं सुखमुत्तमम्॥
उपैति शान्तरजसं ब्रह्मभूतमकल्मषम्॥ ६.२७॥

पाठीं केतुलेनि एके वेळे। तया स्थैर्याचेनि मेळें।
आत्मस्वरूपा जवळें। येईल सहजें॥ ३८३॥

तयातें देखोनि आंगा घडेल। तेथ अद्वैतीं द्वैत बुडेल।
आणि ऐक्यतेजें उघडेल। त्रैलोक्य हें॥ ३८४॥

आकाशीं दिसे दुसरें। तें अभ्र जैं विरे।
तैं गगनचि कां भरे। विश्व जैसें॥ ३८५॥

तैसें चित्त लया जाये। आणि चैतन्यचि आघवें होये।
ऐसी प्राप्ति सुखोपायें। आहे येणें॥ ३८६॥

युंजन्नेवं सदात्मानं योगी विगतकल्मषः॥
सुखेन ब्रह्मसंस्पर्शमत्यन्तं सुखमश्नुते॥ ६.२८॥

या सोपिया योगस्थिती। उकलु देखिला गा बहुतीं।
संकल्पाचिया संपत्ती। रुसोनिया॥ ३८७॥

ते सुखाचेनि सांगातें। अआले परब्रह्मा आंतौतें।
तेथ लवण जैसें जळातें। सांडूं नेणे॥ ३८८॥

तसें होय तिये मेळीं। मग सामरस्याचिया राउळीं।
महासुखाची दिवाळी। जगेंसि दिसे॥ ३८९॥

ऐसें आपले पायवरी। चालिजे आपुले पाठीवरी।
हें पार्था नागवे तरी। आन ऐकें॥ ३९०॥

सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि॥
ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः॥ ६.२९॥

तरि मी तंव सकळ देहीं। असें एथ विचारु नाहीं।
आणि तैसेंचि माझां ठायीं। सकळ असे॥ ३९१॥

हें ऐसेंचि संचलें। परस्परें मिसळलें।
बुद्धी घेपे एतुलें। होआवें गा॥ ३९२॥

यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति॥
तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणणयति॥ ६.३०॥

एऱ्हवीं तरी अर्जुना। जो एकवटलिया भावना।
सर्वभूतीं अभिन्ना। मातें भजे॥ ३९३॥

भूतांचेनि अनेकपणें। अनेक नोहे अंतःकरणें।
केवळ एकत्वचि माझें जाणे। सर्वत्र जो॥ ३९४॥

सर्वभूतस्थितं यो मां भजत्येकत्वमास्थितः॥
सर्वथा वर्तमानोऽपि स योगी मयि वर्तते॥ ६.३१॥

मग तो एक हा मियां। बोलतां दिसतसे वायां।
एऱ्हवीं न बोलिजे तरी धनंजया। तो मीचि आहें॥ ३९५॥

दीपा आणि प्रकाशा। एकवंकीचा पाडु जैसा।
तो माझां ठायीं तैसा। मी तयामाजीं॥ ३९६॥

जैसा उदकाचेनि आयुष्यें रसु। कां गगनाचेनि मानें अवकाशु।
तैसा माझेनि रूपें रूपसु। पुरुषु तो गा॥ ३९७॥

जेणें ऐक्याचिये दिठी। सर्वत्र मातेंचि किरीटी।
देखिला जैसा पटीं। तंतु एकु॥ ३९८॥

कां स्वरूपें तरी बहुतें आहाती। परी तैसीं सोनीं बहुवें न होती।
ऐसी ऐक्याचळाची स्थिती। केली जेणें॥ ३९९॥

नातरी वृक्षांची पानें जेतुली। तेतुलीं रोपें नाहीं लाविलीं।
ऐसी अद्वैतदिवसें पाहली। रात्री जया॥ ४००॥

तो पंचात्मकीं सांपडे। मग सांग पां कैसेनि अडे।
जो प्रतीतीचेनि पाडें। मजसीं तुके॥ ४०१॥

माझें व्यापकपण आघवें। गवसलें तयाचेनि अनुभवें।
तरी न म्हणतां स्वभावें। व्यापकु जाहला॥ ४०२॥

आतां शरीरीं तरी आहे। परी शरीराचा तो नोहे।
ऐसें बोलवरी होये। तें करूं ये काई॥ ४०३॥

आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन॥
सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः॥ ६.३२॥

म्हणोनि असो तें विशेषें। आपणपेंयासारिखे।
जो चराचर देखे। अखंडित॥ ४०४॥

सुखदुःखादि वर्मे। कां शुभाशुभें कर्मे।
दोनी ऐसीं मनोधर्मे। नेणेचि जो॥ ४०५॥

हे समविषम भाव। आणिकही विचित्र जें सर्व।
तें मानी जैसे अवयव। आपुले होती॥ ४०६॥

हें एकैक काय सांगावें। जया त्रैलोक्यचि आघवें।
मी ऐसें स्वभावें। बोधा आलें॥ ४०७॥

तयाही देह एकु कीर आथी। लौकिकीं सुखदुःखी तयातें म्हणती।
परी आम्हांतें ऐसीचि प्रतीती। परब्रह्मचि हा॥ ४०८॥

म्हणोनि आपणपां विश्व देखिजे। आनि आपण विश्व होईजे।
ऐसें साम्यचि एक उपासिजे। पांडवा गा॥ ४०९॥

हें तूतें बहुतीं प्रसंगीं। आम्ही म्हणों याचिलागीं।
जे साम्यापरौती जगीं। प्राप्ति नाहीं॥ ४१०॥

अर्जुन उवाच।
योऽयं योगस्त्वया प्रोक्तः साम्येन मधुसूदन॥
एतस्याहं न पश्यामि चंचलत्वात्स्थितिं स्थिराम्॥ ६.३३॥

तंव अर्जुन म्हणे देवा। तुम्ही सांगा कीर आमुचिया कणवा।
परी न पुरों जी स्वभावा। मनाचिया॥ ४११॥

हें मन कैसें केवढें। ऐसें पाहों म्हणों तरी न सांपडे।
एऱ्हवीं राहाटावया थोडें। त्रैलोक्य यया॥ ४१२॥

म्हणोनि ऐसें कैसें घडेल। जे मर्कट समाधी येईल।
कां राहे म्हणतलिया राहेल। महावातु॥ ४१३॥

चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद दृढम॥
तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम्॥ ६.३४॥

जें बुद्धीतें सळी। निश्चयातें टाळी।
धैर्येंसी हातफळी। मिळऊनि जाय॥ ४१४॥

जें विवेकातें भुलवी। संतोषासी चाड लावी।
बैसिजे तरी हिंडवी। दाही दिशा॥ ४१५॥

जें निरोधले घे उवावो। जया संयमुचि होय सावावो।
तें मन आपुला स्वभावो। सांडील काई॥ ४१६॥

म्हणोनि मन एक निश्चळ राहेल। मग आम्हांसि साम्य येईल।
हें विशेषेंहि न घडेल। तयालागीं॥ ४१७॥

श्रीभगवानुवाच।
असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम्॥
अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते॥ ६.३५॥

तंव श्रीकृष्ण म्हणती साचचि। बोलत आहासि तें तैसेंचि।
यया मनाचा कीर चपळचि। स्वभावो गा॥ ४१८॥

परी वैराग्याचेनि आधारें। जरी लाविलें अभ्यासाचिये मोहरे।
तरी केतुलेनि एकें अवसरें। स्थिरावेल॥ ४१९॥

कां जें यया मनाचें एक निकें। जे हें देखिले गोडीचिया ठाया सोके।
म्हणोनि अनुभवसुखचि कवतिकें। दावीत जाइजे॥ ४२०॥

असंयतात्मना योगो दुष्प्राप इति मे मतिः॥
वश्यात्मना तु यतता शक्योऽवाप्तुमुपायतः॥ ६.३६॥

एऱ्हवीं विरक्ति जयांसि नाहीं। जे अभ्यासीं न रिघती कहीं।
तयां नाकळे हें आम्हीही। न मनूं कायी॥ ४२१॥

परी यमनियमांचिया वाटा न वचिजे। कहीं वैराग्याची से न करिजे।
केवळ विषयजळीं ठाकिजे। बुडी देऊनी॥ ४२२॥

यया जालिया मानसा कहीं। युक्तीची कांबी लागली नाहीं।
तरी निश्चल होईल काई। कैसेनि सांगें॥ ४२३॥

म्हणोनि मनाचा निग्रहो होये। ऐसा उपाय जो आहे।
तो आरंभीं मग नोहे। कैसा पाहों॥ ४२४॥

तरी योग साधन जितुकें। तें अवघेंचि काय लटिकें।
परि आपणपयां अभ्यासूं न ठाके। हेंचि म्हणें॥ ४२५॥

आंगीं योगाचें होय बळ। तरि मन केतुलें चपळ।
काय महदादि हें सकळ। आपु नोहे॥ ४२६॥

अर्जुन उवाच।
अयतिः श्रद्धयोपेतो योगाच्चलितमानसः॥
अप्राप्य योगसंसिद्धिं कां गतिं कृष्ण गच्छति॥ ६.३७॥

तेथ अर्जुन म्हणे निकें। देवो बोलती तें न चुके।
साचचि योगबळेंसि न तुके। मनोबळ॥ ४२७॥

तरि तोचि योगु कैसा केवीं जाणों। आम्ही येतुले दिवस मातुही नेणों।
म्हणोनि मनातें जी म्हणों। अनावर हें॥ ४२८॥

हा आतां आघवेया जन्मा। तुझेनि प्रसादें पुरुषोत्तमा।
योग परिचयो आम्हां। जाहला आजी॥ ४२९॥

परि आणिक एक गोसांविया। मज संशयो असे साविया।
तो तूंवांचूनि फेडावया। समर्थु नाहीं॥ ४३०॥

ह्मणोनि सांगे श्रीगोविंदा। कवण एकु मोक्षपदा।
झोंबत होता श्रद्धा। उपायेंविण॥ ४३१॥

इंद्रियग्रामोनि निगाला। आस्थेचिया वाटा लागला।
आत्मसिद्धीचिया पुढिला। नगरा यावया॥ ४३२॥

कच्चिन्नोभयविभ्रष्टश्छिन्नाभ्रमिव नश्यति॥
अप्रतिष्ठो महाबाहो विमूढो ब्रह्मणः पथि॥ ६.३८॥

तंव आत्मसिद्दि न ठकेचि। आणि मागुतें न येववेचि।
ऐसा अस्तु गेला माझारींचि। आयुष्यभानु॥ ४३३॥

जैसें अकाळीं आभाळ। अळुमाळु सपातळ।
विपायें आलें केवळ। वसे ना वर्षे॥ ४३४॥

एतन्मे संशयं कृष्ण छेत्तुमर्हस्यशेषतः॥
त्वदन्यः संशयस्यास्य छेत्ता न ह्युपपद्यते॥ ६.३९॥

तैसीं दोन्ही दुरावलीं। जे प्राप्ति तव अलग ठेली।
आणि अप्राप्तिही सांडवली। श्रद्धा तया॥ ४३५॥

ऐसा दोहोंला अंतरला कां जी। जो श्रद्धेच्या समाजीं।
बुडाला तया हो जी। कवण गति॥ ४३६॥

श्रीभगवानुवाच।
पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते॥
न हि कल्याणकृत्कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति॥ ६.४०॥

तंव कृष्ण म्हणती पार्था। जया मोक्षसुखीं आस्था।
मोक्षावांचुनि अन्यथा। गति आहे गा ॥ ४३७॥

परी एतुलेंचि एक घडे। जें माझारीं विसवावे पडे।
तेंही परी ऐसेनि सुरवाडें। जो देवां नाहीं॥ ४३८॥

एऱ्हवीं अभ्यासाचां उचलतां। पाउलीं जरी चालता।
तरी दिवसा आधीं ठाकिता। सोहंसिद्धीतें॥ ४३९॥

परी तेतुला वेगु नव्हेचि। ह्मणौनि विसावा तरी निकाचि।
पाठीं मोक्षु तंव तिअसाचि। ठेविला असे॥ ४४०॥

प्राप्य पुण्यकृतां लोकान् उषित्वा शाश्वतीः समाः॥
शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते॥ ६.४१॥

ऐकें कवतिक हें कैसें। जे शतमखा लोक सायासें।
ते तो पावे आनायासें। कैवल्यकामु॥ ४४१॥

मग तेथिंचे जे अमोघ। अलौकिक भोग।
भोगितां सांग। कांटाळे मन॥ ४४२॥

हा अंतरायो अवचितां। कां वोढवला भगवंता।
दिविभोग भोगितां। अनुतापी नित्य॥ ४४३॥

पाठीं जन्मे संसारीं। परी सकळ धर्मांचिया माहेरीं।
लांबा उगवे आगरीं। विभवश्रियेचा॥ ४४४॥

जयातें नीतिपंथें चालिजे। सत्यधूत बोलिजे।
देखावें तें देखिजे। शास्त्रदृष्टी॥ ४४५॥

वेद तो जागेश्वरु। जया व्यवसाय निजाचारु।
सारासारविचारु। मंत्री जयातें॥ ४४६॥

जयाचां कुळीं चिंता। जाली ईश्वराची पतिव्रता।
जयातें गृहदेवता। आदि ऋद्धि॥ ४४७॥

ऐसी निजपुण्याचिया जोडी। वाढिन्नली सर्वसुखाची कुळवाडी।
तिये जन्मे तो सुरवाडी। योगच्युत॥ ४४८॥

अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम्।
एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम्॥ ६.४२

अथवा ज्ञानाग्निहोत्री। जे परब्रह्म श्रोत्री।
महासुखक्षेत्रीं। आदिवंत॥ ४४९॥

जे सिद्धांताचियां सिंहासनीं। राज्य करिती त्रिभुवनीं।
जे कूंजती कोकिल वनीं। संतोषाच्या॥ ४५०॥

जे विवेकग्रामींचे मुळीं। बैसले आहाति नित्य फळीं।
तया योगियांचियां कुळीं। जन्म पावे॥ ४५१॥

तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम्।
यतते च ततो भूयः संसिद्धौ कुरुनन्दन॥ ६.४३॥

मोटकी देहाकृति उमटे। आणि निजज्ञानाची पांहाट फुटे।
सूर्यपुढें प्रगटे। प्रकाशु जैसा॥ ४५२॥

तैशी दशेची वाट न पाहतां। वयसेचिया गांवा न येतां।
बालपणींच सर्वज्ञता। वरी तयातें॥ ४५३॥

तिये सिद्धप्रज्ञेचेनि लाभें। मनचि सारस्वतें दुभे।
मग सकळ शास्त्रें स्वयंभें। निघती मुखें॥ ४५४॥

ऐसें जें जन्म। जयालागीं देव सकाम।
स्वर्गीं ठेले जप होम। करिती सदा॥ ४५५॥

अमरीं भाट होईजे। मग मृत्युलोकातें वानिजे।
ऐसें जन्म पार्था गा जें। तें तो पावे॥ ४५६॥

पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोऽपि सः।
जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते॥ ६.४४॥

आणि मागील जे सद्बुद्धि। जेथ जीवित्वा जाहाली होती अवधि।
मग तेचि पुढती निरवधि। नवी लाहे॥ ४५७॥

तेथ सदैवा आणि पायाळा। वरी दिव्यांजन होय डोळां।
मग देखे जैसी अवलीळा। पाताळधनें॥ ४५८॥

वरी तैसे दुर्भेद जे अभिप्राय। कां गुरुगम्य हन ठाय।
तेथ सौरसेंवीण जाय। बुद्धि तयाची॥ ४५९॥

बळियें इंद्रियें येती मना। मन एकवटे पवना।
पवन सहजें गगना। मिळोंचि लागे॥ ४६०॥

ऐसें नेणो काय आपैसें। तयातेंचि कीजे अभ्यासें।
समाधि घर पुसें। मानसाचें॥ ४६१॥

जाणिजे योगपीठीचा भैरवु। काय हा आरंभरंभेचा गौरवु।
कीं वैराग्यसिद्धीचा अनुभवु। रूपा आला॥ ४६२॥

हा संसार उमाणितें माप। कां अष्टांगसामग्रीचे दीप।
जैसे परिमळेंचि धरिजे रूप। चंदनाचें॥ ४६३॥

तैसा संतोषाचा काय घडिला। की सिद्धभांडारींहूनि काढिला।
दिसे तेणें मानें रूढला। साधकदशे॥ ४६४॥

जे वर्षशतांचिया कोडी। जन्मसहस्रांचिया आडी।
लंघिता पातला थडी। आत्मसिद्धीची॥ ४६५॥

म्हणोनि साधनजात आघवें। अनुसरे तया स्वभावें।
मग आयतिये बैसे राणिवे। विवेकाचिये॥ ४६६॥

पाठीं विचारितया वेगा। तो विवेकुही ठाके मागां।
मग अविचारणीय ते आंगा। घडोनि जाय॥ ४६७॥

तेथ मनाचें मेहुडें विरे। पवनाचें पवनपण सरे।
आपणपां आपण मुरे। आकाशही॥ ४६८॥

प्रणवाचा माथा बुडे। येतुलेनि अनिर्वाच्य सुख जोडे।
म्हणोनि आधींचि बोलु बहुडे। तयालागीं॥ ४६९॥

ऐसी ब्रह्मींची स्थिती। जे सकळा गतींसी गती।
तया अमूर्ताची मूर्ती। होऊनि ठाके॥ ४७०॥

प्रयत्नाद्यतमानस्तु योगी संशुद्धकिल्बिषः।
अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम्॥ ६.४५॥

तेणें बहुतीं जन्में मागिलीं। विक्षेपांचीं पाणिवळें झाडिलीं।
म्हणोनि उपजतखेंवो बुडाली। लग्नघटिका॥ ४७१॥

आणि तद्रूपतेसीं सुलग्न। लागोनि ठेलें अभिन्न।
जैसें लोपलें अभ्र गगन। होऊनि ठाके॥ ४७२॥

तैसें विश्व जेथ होये। मागौतें जेथ लया जाये।
तें विद्यमानेंचि देहें। जाहला तो गा॥ ४७३॥

जया लाभाचिया आशा। करूनि धैर्यबाहूंचा भरंवसा।
घालीत षट्कर्मांचा धारसा। कर्मनिष्ठ॥ ४७४॥

कां जिये एकी वस्तुलागीं। बाणोनि ज्ञानाची वज्रांगी।
झुंजत प्रपंचेंशीं समरंगी। ज्ञानिये गा॥ ४७५॥

अथवा निलागें निसरडा। तपोदुर्गाचा आडकडा।
झोंबती तपिये चाडा। जयाचिया॥ ४७६॥

जें भजतियांसी भज्य। याज्ञिकांचें याज्य।
एवं जें पूज्य। सकळां सदा॥ ४७७॥

तेंचि तो आपण। स्वयें जाहला निर्वाण।
जें साधकांचें कारण। सिद्ध तत्त्व॥ ४७८॥

तपस्विभ्योऽधिको योगी ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिकः।
कर्मिभ्यश्चाऽधिको योगी तस्माद्योगी भवाऽर्जुन॥ ६.४६॥

म्हणोनि कर्मनिष्ठां वंद्यु। तो ज्ञानियांसि वेद्यु।
तापसांचा आद्यु। तपोनाथु॥ ४७९॥

पैं जीवपरमात्मसंगमा। जयाचें येणें जाहलें मनोधर्मा।
तो शरीरिचि परी महिमा। ऐसी पावे॥ ४८०॥

म्हणोनि या कारणें। तूंतें मी सदा म्हणें।
योगी होई अंतःकरणें। पंडुकुमरा॥ ४८१॥

योगिनामपि सर्वेषां मद्गतेनान्तरात्मना॥
श्रद्धावान्भजते यो मां स मे युक्ततमो मतः॥ ६.४७॥

अगा योगी जो म्हणिजे। तो देवांचा देव जाणिजे।
आणि सुखसर्वस्व माझें। चैतन्य तो॥ ४८२॥

जया भजता भजन भजावें। हें भक्तिसाधन जें आघवें।
तें मीचि जाहलों अनुभवें। अखंडित॥ ४८३॥

मग तया आम्हां प्रीतीचें। स्वरूप बोलीं निर्वचे।
ऐसें नव्हे गा तो साचें। सुभद्रापती॥ ४८४॥

तया एकवटलिया प्रेमा। जरी पाडें पाहिजे उपमा।
तरी मी देह तो आत्मा। हेचि होय॥ ४८५॥

ऐसें भक्तचकोरचंद्रें। तेथ त्रिभुवनैकनरेंद्रें।
बोलिलें गुणसमुद्रें। संजयो म्हणे॥ ४८६॥

तेथ आदिलापासूनि पार्था। ऐकिजे ऐसीचि आस्था।
दुणावली हें यदुनाथा। पावों सरलें॥ ४८७॥

कीं सावियाचि मनीं संतोषला। जे बोला आरिसा जोडला।
तेणें हरिखें आतां उपलवला। निरूपील॥ ४८८॥

तो प्रसंगु आहे पुढां। जेथ शांतु दिसेल उघडा।
तो पालविजेल मुडा। प्रमेयबीजांचा॥ ४८९॥

जे सात्विकाचेनि वडपें। गेलें आध्यात्मिक खरपें।
सहजें निर्वाळिले वाफे। चतुरचित्ताचे॥ ४९०॥

वरी अवधानाचा वाफसा। लाधला सोनया ऐसा।
म्हणोनि पेरावया धिंवसा। श्रीनिवृत्तीसी॥ ४९१॥

ज्ञानदेव म्हणे मी चाडें। सद्गुरूंनीं केलें कोडें।
माथां हात ठेविला तें फुडें। बीजचि वाइलें॥ ४९२॥

म्हणऊनि येणें मुखें जें जें निगे। तें संतांचें हृदयीं साचेंचि लागे।
हें असो सांगों श्रीरंगें। बोलिलें जें॥ ४९३॥

परी तें मनाच्या कानीं ऐकावें। बोल बुद्धीच्या डोळां देखावे।
हे साटोवाटीं घ्यावे। चित्ताचिया॥ ४९४॥

अवधानाचेनि हातें। नेयाचे हृदया आंतौते।
हे रिझवितील आयणीतें। सज्जनाचिये॥ ४९५॥

हे स्वहितातें निववितील। परिणामातें जीववितील।
सुखाची वाहवितील। लाखोली जीवा॥ ४९६॥

आतां अर्जुनेंसी श्रीमुकुंदे। नागर बोलिजेल विनोदें।
तें वोंवियेचेनि प्रबंधे। सांगेन मी॥ ४९७॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु
ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
आत्मसंयमयोगो नाम षष्ठोऽध्यायः॥

इति ज्ञानेश्वरकृतायां भावार्थदीपिकायां
षष्ठोऽध्यायः॥ ६॥
ओंव्या ४९७ श्लोक ४७

## 7 Knowledge of the Absolute ज्ञानविज्ञानयोग

श्रीमद्भगवद्गीता सप्तमोऽध्यायः
ज्ञानेश्वरी अध्याय सातवा

---

श्रीभगवानुवाच।
मय्यासक्तमनाः पार्थ योगं युञ्जन् मदाश्रयः।
असंशयं समग्रं मां यथा ज्ञास्यसि तच्छृणु॥ ७.१॥

ज्ञानं तेऽहं सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषतः।
यत् ज्ञात्वा नेह भूयोऽन्यत् ज्ञातव्यमवशिष्यते॥ ७.२॥

आइकां मग तो श्रीअनंतु। पार्थातें असे म्हणतु।
पैं गा तूं योगयुक्तु। जालासि आतां॥ १॥

मज समग्रातें जाणसी ऐसें। आपुलिया तळहातीचें रत्न जैसें।
तुज ज्ञान सांगेन तैसें। विज्ञानेंसीं॥ २॥

एथ विज्ञानें काय करावें। ऐसें घेसी जरी मनोभावें।
तरी पैं आधीं जाणावें। तेंचि लागे॥ ३॥

मग ज्ञानाचिये वेळे। झांकती जाणिवेचे डोळे।
जैसी तीरीं नाव न ढळे। टेकली सांती॥ ४॥

तैसी जाणीव जेथ न रिघे। विचार मागुतां पाउलीं निघे।
तर्कु आयणी नेघे। आंगीं जयाच्यां॥ ५॥

अर्जुना तया नांव ज्ञान। येर प्रपंचु हें विज्ञान।
तेथ सत्यबुद्धि तें अज्ञान। हेंही जाण॥ ६॥

आतां अज्ञान अवघें हरपे। विज्ञान निःशेष करपे।
आणि ज्ञान तें स्वरूपें। होऊनि जाइजे॥ ७॥

ऐसें वर्म जें गूढ। तें कीजेल वाक्यारूढ।
जेणें थोडेनि पुरे कोड। बहुत मनींचें॥ ८॥

जेणें सांगतयाचें बोलणें खुंटे। ऐकतयाचें व्यसन तुटे।
हें जाणणें सानें मोठें। उरों नेदी॥ ९॥

मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद् यतति सिद्धये।
यततामपि सिद्धानां कश्चिन् मां वेत्ति तत्त्वतः॥ ७.३॥

पैं गा मनुष्यांचिया सहस्रशां। माजि विपाइलेचिया येथ धिंवसा।
तैसेयां धिंवसेकरां बहुवसां। माजि विरळा जाणे॥ १०॥

जैसा भरले या त्रिभुवना। आंतु एक एकु चांगु अर्जुना।
निवडूनि कीजे सेना। लक्षवरी॥ ११॥

कीं तयाही पाठीं। जे वेळीं लोह मांसातें घांटी।
ते वेळीं विजयश्रियेचां पाटीं। एकुचि बैसे॥ १२॥

तैसे आस्थेच्यां महापुरीं। रिघताती कोटिवरी।
परी प्राप्तीच्यां पैलतीरीं। विपाइला निगे॥ १३॥

म्हणऊनि सामान्य गा नोहे। हें सांगतां वडिल गोठी गा आहे।
परी तें बोलों येईल पाहें। आतां प्रस्तुत ऐकें॥ १४॥

भूमिरापोऽनलो वायुः खं मनो बुद्धिरेव च।
अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा॥ ७.४॥

तरी अवधारीं गा धनंजया। हे महदादिक माझी माया।
जैसी प्रतिबिंबे छाया। निजांगाची॥ १५॥

आणि इयेतें प्रकृति म्हणिजे। जे अष्टधा भिन्न जाणिजे।
लोकत्रय निपजे। इयेस्तव॥ १६॥

हे अष्टधा भिन्न कैसी। ऐसा ध्वनि धरिसी जरी मानसीं।
तरी तेचि गा आतां परियेसीं। विवंचना॥ १७॥

आप तेज गगन। मही मारुत मन।
बुद्धि अहंकार हे भिन्न। आठै भाग॥ १८॥

अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम्।
जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत्॥ ७.५॥

आणि या आठांची जे साम्यावस्था। ते माझी परम प्रकृति पार्था।
तिये नाम व्यवस्था। जीवु ऐसी॥ १९॥

जे जडातें जीववी। चेतनेतें चेतवी।
मनाकरवीं मानवी। शोक मोहो॥ २०॥

पैं बुद्धीच्यां अंगीं जाणणें। तें जियेचिये जवळिकेचें करणें।
जिया अहंकाराचेनि विंदाणें। जगचि धरिजे॥ २१॥

एतद्योनीनि भूतानि सर्वाणीत्युपधारय।
अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथा॥ ७.६॥

ते सूक्ष्म प्रकृति कोडें। जैं स्थूळाचिया आंगा घडे।
तैं भूतसृष्टीची पडे। टांकसाळ॥ २२॥

चतुर्विधु ठसा। उमटों लागे आपैसा।
मोला तरी सरिसा। परी थरचि आनान॥ २३॥

होती चौऱ्यांशी लक्ष थरा। येरा मिति नेणिजे भांडारा।
भरे आदिशून्यांचा गाभारा। नाणेयांसी॥ २४॥

ऐसे एकतुके पांचभौतिक। पडती बहुवस टांक।
मग तिये समृद्धीचे लेख। प्रकृतीचि धरी॥ २५॥

जें आंखूनि नाणें विस्तारी। पाठीं तयांची आटणी करी।
माजी कर्माकर्मांचिया व्यवहारीं। प्रवर्तु दावी॥ २६॥

हें रूपक परी असो। सांगों उघड जैसें ये परियेसों।
तरी नामरूपाचा अतिसो। प्रकृतीच कीजे॥ २७॥

आणि प्रकृति तंव माझ्यां ठायीं। बिंबें येथ आन नाहीं।
म्हणोनि आदि मध्य अवसान पाहीं। जगासि मी॥ २८॥

मत्तः परतरं नान्यत् किंचिदस्ति धनंजय।
मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव॥ ७.७॥

हें रोहिणीचें जळ। तयाचें पाहतां येईजे मूळ।
तैं रश्मि नव्हती केवळ। होय तो भानु॥ २९॥

तयाचिपरी किरीटी। इया प्रकृति जालिये सृष्टी।
जैं उपसंहरूनि कीजेल ठी। तैं मीचि आहें॥ ३०॥

ऐसें होय दिसे न दिसे। हें मजचिमाजी असे।
मियां विश्व धरिजे जैसें। सूत्रें मणि॥ ३१॥

सुवर्णाचे मणी केले। ते सोनियाचें सुतीं वोविले।
तैसें म्यां जग धरिलें। सबाह्याभ्यंतरीं॥ ३२॥

रसोऽहमप्सु कौन्तेय प्रभास्मि शशिसूर्ययोः।
प्रणवः सर्ववेदेषु शब्दः खे पौरुषं नृषु॥ ७.८॥
पुण्यो गन्धः पृथिव्यां च तेजश्चास्मि विभावसौ।
जीवनं सर्वभूतेषु तपश्चास्मि तपस्विषु॥ ७.९॥

म्हणोनि उदकीं रसु। कां पवनीं जो स्पर्शु।
शशिसूर्यी जो प्रकाशु। तो मीचि जाण॥ ३३॥

तैसाचि नैसर्गिकु शुद्धु। मी पृथ्वीच्यां ठायीं गंधु।
गगनीं मी शब्दु। वेदीं प्रणवु॥ ३४॥

नराच्यां ठायीं नरत्व। जें अहंभाविये सत्त्व।
तें पौरुष मी हें तत्त्व। बोलिजत असे॥ ३५॥

अग्नि ऐसें आहाच। तेजीं नामाचें आहे कवच।
तें परौतें केलिया साच। निजतेज तें मी॥ ३६॥

आणि नानाविध योनीं। जन्मोनि भूतें त्रिभुवनीं।
वर्ततें आहाति जीवनीं। आपुलाल्यां॥ ३७॥

एकें पवनेचि पिती। एकें तृणास्तव जिती।
एकें अन्नाधारें राहती। जळें एकें॥ ३८॥

ऐसें भूतांप्रति आनान। जें प्रकृतिवशें दिसे जीवन।
तें आघवाठायीं अभिन्न। मीचि एक॥ ३९॥

बीजं मां सर्वभूतानां विद्धि पार्थ सनातनम्।
बुद्धिर्बुद्धिमतामस्मि तेजस्तेजस्विनामहम्॥ ७.१०॥
बलं बलवतां चाहं कामरागविवर्जितम्।
धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ॥ ७.११॥

पैं आदिचेनि अवसरें। विरूढे गगनाचेनि अंकुरें।
जें अंती गिळी अक्षरें। प्रणवपीठींचीं॥ ४०॥

जंव हा विश्वाकार असे। तंव जें विश्वाचिसारखें दिसे।
मग महाप्रळयदशे। कैसेंही नव्हे॥ ४१॥

ऐसें अनादि जें सहज। तें मी गा विश्वबीज।
हें हातातळीं तुज। देइजत असे॥ ४२॥

मग उघड करूनि पांडवा। जैं हें आणिसील सांख्याचिया
गांवा।
तैं तयाचा उपेगु बरवा। देखशील॥ ४३॥

परी हे अप्रासंगिक आलाप। आतां असतु न बोलों संक्षेप।
जाण तपियांच्यां ठायीं तप। तें स्वरूप माझें॥ ४४॥

बळियांमाजीं बळ। तें मी जाणें अढळ।
बुद्धिमंतीं केवळ। बुद्धि ते मी॥ ४५॥

भूतांच्यां ठायीं कामु। तो मी म्हणे आत्मारामु।
जेणें अर्थास्तव धर्मु। थोरु होय॥ ४६॥

एर्‍हवीं विकाराचेनि पैसें। करी कीर इंद्रियांच्याचि ऐसें।
परी धर्मासि वेखासें। जावों नेदी॥ ४७॥

जे अप्रवृत्तीचा अव्हांटा। सांडूनि विधीचिया निघे वाटा।
तेवींचि नियमाचा दिवटा। सवें चाले॥ ४८॥

कामु ऐशिया वोजा प्रवर्ते। म्हणोनि धर्मासि होय पुरतें।
मोक्षतीर्थींचें मुक्तें। संसारु भोगी॥ ४९॥

जो श्रुतिगौरवाच्यां मांडवीं। काम सृष्टीचा वेलु वाढवी।
जंव कर्मफळेंसीं पालवी। अपवर्गीं टेके॥ ५०॥

ऐसा नियतु कां कंदर्पु। जो भूतां यां बीजरूपु।
तो मी म्हणे बापु। योगियांचा॥ ५१॥

हें एकैक किती सांगावें। आतां वस्तुजातचि आघवें।
मजपासूनि जाणावें। विकरलें असे॥ ५२॥

ये चैव सात्त्विका भावा राजसास्तामसाश्च ये।
मत्त एवेति तान् विद्धि न त्वहं तेषु ते मयि॥ ७.१२॥

जे सात्त्विक हन भाव। कां रजतमादि सर्व।
ते ममरूपसंभव। वोळखें तूं॥ ५३॥

हें जाले तरी माझ्यां ठायीं। परी तयामाजीं मी नाहीं।
जैसी स्वप्नींच्यां डोहीं। जागृति न बुडे॥ ५४॥

ना तरी रसाचीचि सुघट। जैशी बीजकणिका घनवट।
परी तियेस्तव होय काष्ठ। अंकुरद्वारें॥ ५५॥

मग तया काष्ठाच्यां ठायीं। सांग पां बीजपण असे काई।
तैसा मी विकारीं नाहीं। जरी विकारला दिसे॥ ५६॥

पैं गगनीं उपजे आभाळ। परी तेथ गगन नाहीं केवळ।
अथवा आभाळीं होय सलिल। तेथ अभ्र नाहीं॥ ५७॥

मग तया उदकाचेनि आवेशें। प्रगटलें तेज जें लखलखीत दिसे।
तिये विजूमाजीं असे। सलिल कायी॥ ५८॥

सांगें अग्नीस्तव धूम होये। तिये धूमीं काय अग्नी आहे।
तैसा विकारु हा मी नोहें। जरी विकारला असें॥ ५९॥

त्रिभिर्गुणमयैर्भावैः एभिः सर्वमिदं जगत्।
मोहितं नाभिजानाति मामेभ्यः परमव्ययम्॥ ७.१३॥

परी उदकीं झाली बाबुळी। ते उदकातें जैसी झांकोळी।
कां वायांचि आभाळीं। आकाश लोपे॥ ६०॥

हां गा स्वप्न हें लटिकें म्हणों ये। परी निद्रावशें बाणलें होये।
तंव आठवुं काय देत आहे। आपणपेयां॥ ६१॥

हें असो डोळ्यांचें। डोळांचि पडळ रचे।
तेणें देखणेपण डोळ्यांचें। न गिळिजे कायि॥ ६२॥

तैसी हे माझीच बिंबली। त्रिगुणात्मक साउली।
कीं मजचि आड वोडवली। जवनिका जैसी॥ ६३॥

म्हणऊनि भूतें मातें नेणती। माझींच परी मी नव्हती।
जैसीं जळींचीं जळीं न विरती। मुक्ताफळें॥ ६४॥

पैं पृथ्वीयेचा घटु कीजे। सवेंचि पृथ्वीसि मिळे जरी मेळविजे।
एऱ्हवीं तोचि अग्निसंगें सिजे। तरी वेगळा होय॥ ६५॥

तैसें भूतजात सर्व। हे माझेचि कीर अवयव।
परी मायायोगें जीव। दशे आले॥ ६६॥

म्हणोनि माझेचि मी नव्हती। माझेचि मज नोळखती।
अहंममताभ्रांती। विषयांध झाले॥ ६७॥

दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया।
मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते॥ ७.१४॥

आतां महदादि हे माझी माया। उतरोनियां धनंजया।
मी होईजे हें आया। कैसेनि ये॥ ६८॥

जिये ब्रह्माचळाचां आधाडां। पहिल्या संकल्पजळाचा उभडा
सवेंचि महाभूतांचा बुडबुडा। साना आला॥ ६९॥

जे सृष्टिविस्ताराचेनि वोघें। चढत काळकलनेचेनि वेगें।
प्रवृत्तिनिवृत्तीचीं तुंगें। तटें सांडी॥ ७०॥

जे गुणघनाचेनि वृष्टिभरें। भरली मोहाचेनि महापुरें।
घेऊनि जात नगरें। यमनियमांचीं॥ ७१॥

जे द्वेषाच्यां आवर्तीं दाटत। मत्सराचे वळसे पडत।
माजि प्रमदादि तळपत। महा मीन॥ ७२॥

जेथ प्रपंचाचीं वळणें। कर्माकर्मांचीं बोभाणें।
वरी तरताती वोसाणें। सुखदुःखांचीं॥ ७३॥

रतीचिया बेटा। आदळती कामाचिया लाटा।
जेथ जीवफेन संघाटा। सैंघ दिसे॥ ७४॥

अहंकाराचिया चळिया। वरी मदत्रयाचिया उकळिया।
जेथ विषयोर्मीचिया आकळिया। उल्लाळ घेती॥ ७५॥

उदोअस्तांचे लोंढे। पाडीत जन्ममृत्यूचे चोंढे।
तेथ पांचभौतिक बुडबुडे। होती जाती॥ ७६॥

संमोह विभ्रम भासे। गिळिताति धैर्याचीं आमिषें।
तेथ देव्हडे भोंवत वळसे। अज्ञानाचे॥ ७७॥

भ्रांतीचेनि खडुळें। रेवले आस्थेचे अवगाळे।
रजोगुणाचेनि खळाळें। स्वर्गु गाजे॥ ७८॥

तमाचे धारसे वाड। सत्त्वाचें स्थिरपण जाड।
किंबहुना हे दुवाड। मायानदी॥ ७९॥

पैं पुनरावृत्तीचेनि उभडें। झळंबती सत्यलोकींचे हुडे।
घायें गडबडती धोंडे। ब्रह्मगोळकाचे॥ ८०॥

तया पाणियाचेनि वहिलेपणें। अझुनी न धरिती वोभाणें।
ऐसा मायापूर हा कवणें। तरिजेल गा॥ ८१॥

येथ एक नवलावो। जो जो कीजे तरणोपावो।
तो तो अपावो। होय तें ऐक॥ ८२॥

एक स्वयंबुद्धीच्यां बाहीं। रिगाले तयांची शुद्धीचि नाहीं।
एक जाणिवेचें डोहीं। गर्वेंचि गिळिले॥ ८३॥

एकीं वेदत्रयाचिया सांगडी। घेतलिया अहंभावाचिया धोंडी।
ते मदमीनाचां तोंडीं। सगळेचि गेले॥ ८४॥

एकीं वयसेचें जाड बांधले। मग मन्थाचिये कासे लागले।
ते विषयमगरीं सांडिले। चघळूनियां॥ ८५॥

आतां वार्धक्याचिया तरंगा। माजीं मतिभ्रंशाचा जरंगा।
तेणें कवळिजताती पैं गा। चहूंकडे॥ ८६॥

आणि शोकाचां कडां उपडत। क्रोधाच्यां आवर्तीं दाटत।
आपदागिधीं चुंबिजत। उधवलां ठायीं॥ ८७॥

मग दुःखाचेनि बरबटें बोंबलें। पाठीं मरणाचे रेवे रेवले।
ऐसे कामाचे कासे लागले। ते गेले वायां॥ ८८॥

एकीं यजनक्रियेची पेटी। बांधोनि घातली पोटीं।
ते स्वर्गसुखाच्यां कपाटीं। शिरकोनि ठेले॥ ८९॥

एकीं मोक्षीं लागावयाचिया आशा। केला कर्मबाह्यांचा भरंवसा।
परी ते पडिले वळसां। विधिनिषेधांच्यां॥ ९०॥

जेथ वैराग्याची नाव न रिगे। विवेकाचा तागा न लगे।
वरी कांहीं तरों ये योगें। तरी विपायें तो॥ ९१॥

ऐसें जीवाचिये आंगवणें। इये मायानदीचें उतरणें।
हें कासयासारिखें बोलणें। म्हणावें पां॥ ९२॥

जरी अपथ्यशीळा व्याधी। आकळे साधूसी दुर्जनाची बुद्धि।
कीं रागी सांडी रिद्धी। आली सांती॥ ९३॥

जरी चोरां सभा दाटे। अथवा मीना गळु घोटे।
नातरी भेडा उलटे। विबसी जरी॥ ९४॥

पाडस वांगुर कराडी। जरी मुंगी मेरु वोलांडी।
तरी मायेची पैलथडी। देखती जीव॥ ९५॥

म्हणऊन गा पांडुसुता। जैसी सकामा न जिणवेचि वनिता।
तैसी मायामय हे सरिता। न तरवे जीवां॥ ९६॥

येथ एकचि लीला तरले। जे सर्वभावेज मज भजले।
तयां ऐलीच थडिये सरलें। मायाजळ॥ ९७॥

जयां सद्गुरु तारु पुढें। जे अनुभवाचिये कासे गाढे।
जयां आत्मनिवेदन तरांडें। आकळलें॥ ९८॥

जे अहंभावाचें वोझें सांडुनी। विकल्पाचिया झुळका चुकाउनि।
अनुरागाचा निरुता होउनी। पाणीढाळु॥ ९९॥

जया ऐक्याचिया उतारा। बोधाचा जोडला तारा।
मग निवृत्तीचिया पैल तीरा। झेंपावले जे॥ १००॥

ते उपरतीचां वांवीं सेलत। सोहंभावाचेनि थावें पेलत।
मग निघाले अनकळित। निवृत्ति तटीं॥ १०१॥

येणें उपायें मज भजले। ते हे माझी माया तरले।
परी ऐसे भक्त विपाइले। बहुवस नाहीं॥ १०२॥

न मां दुष्कृतिनो मूढाः प्रपद्यन्ते नराधमाः।
माययापहृतज्ञाना आसुरं भावमाश्रिताः॥ ७.१५॥
चतुर्विधा भजन्ते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन।
आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ॥ ७.१६॥

जे बहुतां एका अवांतरु। अहंकाराचा भूतसंचारु।
जाहला म्हणोनि विसरू। आत्मबोधाचा॥ १०३॥

ते वेळीं नियमाचें वस्त्र नाठवे। पुढील अधोगतीची लाज नेणवे।
आणि करितात जें न करावें। वेदु म्हणे॥ १०४॥

पाहें पां शरीराचिया गांवा। जयालागीं आले पांडवा।
तो कार्यार्थु आघवा। सांडूनियां॥ १०५॥

इंद्रियाग्रामींचें राजबिदीं। अहंममतेचियां जल्पवादीं।
विकारांतरांची मांदी। मेळविताती॥ १०६॥

दुःखशोकांच्यां घाई। मारिलियाची सेचि नाहीं।
हें सांगावया कारण काई। जे ग्रासिले माया॥ १०७॥

म्हणोनि ते मातें चुकले। एकं चतुर्विध मज भजले।
जिहीं आत्महित केलें। वाढतें गा॥ १०८॥

तो पहिला आर्तु म्हणिजे। दुसरा जिज्ञासु बोलिजे।
तिजा अर्थार्थी जाणिजें। ज्ञानिया चौथा॥ १०९॥

तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते।
प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थमहं स च मम प्रियः॥ ७.१७॥

तेथ आर्तु तो आर्तीचेनि व्याजें। जिज्ञासु तो जाणावयाचिलागीं भजे।
तिजेनि तेणें इच्छिजे। अर्थसिद्धि॥ ११०॥

मग चौथियाच्यां ठायीं। कांहींचि करणें नाहीं।
म्हणोनि भक्तु एक पाहीं। ज्ञानिया जो॥ १११॥

जे तया ज्ञानाचेनि प्रकाशें। फिटलें भेदाभेदांचें कवडसें।
मग मीचि जाहला समरसें। आणि भक्तुही तेवींचि॥ ११२॥

परि आणिकांचिये दिठी नावेक। जैसा स्फटिकुचि भासे उदक।
तैसा ज्ञानी नव्हे कौतुक। सांगतां तो॥ ११३॥

जैसा वारा कां गगनीं विरे। मग वारेपण वेगळें नुरे।
तेवि भक्त हे पैज न सरे। जरी ऐक्या आला॥ ११४॥

जरी पवन हालवूनि पाहिजे। तरी गगनावेगळा देखिजे।
एऱ्हवीं गगन तो सहजें। असे जैसें॥ ११५॥

तैसें शरीरें हन कर्म। तो भक्त ऐसा गमे।
परी अंतरें प्रतीतिधर्में। मीचि जाहला॥ ११६॥

आणि ज्ञानाचेनि उजिडलेपणें। मी आत्मा ऐसें तो जाणे।
म्हणऊनि मीहि तैसेंचि म्हणें। उचंबळला सांता॥ ११७॥

हा गां जीवापैलीकडिलिये खुणे। जो पावोनि वावरोंही जाणे।
तो देहाचेनि वेगळेपणें। काय वेगळा होय॥ ११८॥

उदाराः सर्व एवैते ज्ञानी त्वात्मैव मे मतम्।
आस्थितः स हि युक्तात्मा मामेवानुत्तमां गतिम्॥ ७.१८॥

म्हणोनि आपुलालिया हिताचेनि लोभें। मज आवडे तोही भक्त झोंबे।
परी मीचि करी वालभें। ऐसा ज्ञानिया एकु॥ ११९॥

पाहें पां दुभतेयाचिया आशा। जगचि धेनूसि करीताहे फांसा।
परि दोरेविण कैसा। वत्साचा बळी॥ १२०॥

कां जे तनुमनुप्राणें। तें आणिक कांहींचि नेणे।
देखे तयातें म्हणे। हे मायाचि कीं माझी॥ १२१॥

तें येणें मानें अनन्यगती। म्हणऊनि धेनूही तैसीचि प्रीती।
यालागीं लक्ष्मीपती। बोलिले साच॥ १२२॥

हें असो मग म्हणितलें। जे कां तुज सांगितले।
तेही भक्त भले। पढियंते आम्हां॥ १२३॥

परी जाणोनियां मातें। जो पाहों विसरला माघौतें।
जैसें सागरा येऊनि सरिते। मुरडावे ठेलें॥ १२४॥

तैसी अंतःकरणकुहरीं उपजली। जयाची प्रतीतिगंगा मज मिनली।
तो मी हें काय बोली। फार करूं॥ १२५॥

एऱ्हवीं ज्ञानिया जो म्हणिजे। तो चैतन्यचि केवळ माझें।
हें न म्हणावें परि काय कीजे। न बोलणे बोलों॥ १२६॥

बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान् मां प्रपद्यते।
वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः॥ ७.१९॥

जे तो विषयांची दाट झाडी । माजीं कामक्रोधांची साकडीं ।
चुकवूनि आला पाडी । सद्वासनेचिया ॥ १२७ ॥

मग साधुसंगें सुभटा । उजू सत्कर्मांचिया वाटा ।
अप्रवृत्तीचा अव्हांटा । डावलूनी ॥ १२८ ॥

आणि जन्मशतांचा वाहतवणा । तेविंचि आस्थेचिया न लेचि वाहणा ।
तेथ फलहेतूचा उगाणा । कवणु चाळी ॥ १२९ ॥

ऐसा शरीरसंयोगाचिये राती । माजीं धावतां सडियां आयती ।
तंव कर्मक्षयाची पाहती । पाहांट जाली ॥ १३० ॥

तैसी गुरुकृपा उखा उजळली । ज्ञानाची वोतपली पडली ।
तेथ साम्याची ऋद्धि उघडली । तयाचिये दृष्टी ॥ १३१ ॥

ते वेळीं जयाकडे वास पाहे । तेउतां मीचि तया एक आहे ।
अथवा निवांत जरी राहे । तरी मीचि तया १३२ ॥

हें असो आणिक कांहीं । तया सर्वत्र मीवांचूनि नाहीं ।
जैसें सबाह्य जळ डोहीं । बुडालिया घटा ॥ १३३ ॥

तैसा तो मजभीतरीं । मी तया आंतुबाहेरीं ।
हें सांगिजेल बोलवरी । तैसे नव्हे ॥ १३४ ॥

म्हणोनि असो हें इयापरी । तो देखे ज्ञानाची वाखारी ।
तेणें संसरलेनि करी । आपु विश्व ॥ १३५ ॥

हें समस्तही श्रीवासुदेवो । ऐसा प्रतीतिरसाचा वोतला भावो ।
म्हणोनि भक्तांमाजीं रावो । आणि ज्ञानिया तोचि ॥ १३६ ॥

जयाचिये प्रतीतीचां वाखारां । पवाडु होय चराचरा ।
तो महात्मा धनुर्धरा । दुर्लभु आथी ॥ १३७ ॥

येर बहु जोडती किरीटी । जयांचीं भजनें भोगासाठीं ।
जे आशातिमिरें दृष्टी । मंद जाले ॥ १३८ ॥

कामैस्तैस्तैर्हृतज्ञानाः प्रपद्यन्तेऽन्यदेवताः ।
तं तं नियममास्थाय प्रकृत्या नियताः स्वया ॥ ७.२० ॥

आणि फळाचिया हांवा । हृदयीं कामा जाला रिगावा ।
कीं तयाचिये घसणी दिवा । ज्ञानाचा गेला ॥ १३९ ॥

ऐसे उभयतां अंधारीं पडले । म्हणोनि पासींचि मातें चुकले ।
मग सर्वभावें अनुसरले । देवतांतरां ॥ १४० ॥

आधींच प्रकृतीचे पाइक । वरी भोगालागीं तंव रंक ।
मग तेणें लोलुप्यें कौतुक । कैसे भजती ॥ १४१ ॥

कवणी तिया नियमबुद्धि । कैसिया हन उपचारसमृद्धि ।
कां अर्पण यथाविधि । विहित करणें ॥ १४२ ॥

यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति ।
तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ॥ ७.२१ ॥

पैं जो जिये देवतांतरीं । भजावयाची चाड करी ।
तयाची ते चाड पुरी । पुरविता मी ॥ १४३ ॥

देवोदेवी मीचि पाहीं । हाही निश्चय त्यासि नाहीं ।
भाव ते ते ठायीं । वेगळाला धरी ॥ १४४ ॥

स तया श्रद्धया युक्तः तस्य आराधनमीहते ।
लभते च ततः कामान् मयैव विहितान् हि तान ॥ ७.२२ ॥

मग तया श्रद्धायुक्त । तेथिंचें आराधन जें उचित ।
तें सिद्धीवरी समस्त । वर्तों लागे ॥ १४५ ॥

ऐसें जेणें जें भाविजे । तें फळ तेणें पाविजे ।
परी तेंही सकळ निपजे । मजचिस्तव ॥ १४६ ॥

अन्तवत् तु फलं तेषां तद् भवत्यल्पमेधसाम ।
देवान् देवयजो यान्ति मद्भक्ता यान्ति मामपि ॥ ७.२३ ॥

परी ते भक्त मातें नेणती । जे कल्पनेबाहेरी न निघती ।
म्हणोनि कल्पित फळ पावती । अंतवंत ॥ १४७ ॥

किंबहुना ऐसें जें भजन । तें संसाराचेंनि साधन ।
येर फळभोग तो स्वप्न । नावभरी दिसे ॥ १४८ ॥

हें असो परौतें । मग हो का आवडे तें ।
परि यजी जो देवतांतें । तो देवत्वासीचि ये ॥ १४९ ॥

येर तनुमनप्राणीं। जे निरंतर माझेयाचि वाहणीं।
ते देहाच्यां निर्वाणीं। मीचि होती॥ १५०॥

अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यन्ते मामबुद्धयः।
परं भावमजानन्तो ममाव्ययमनुत्तयम्॥ ७.२४॥

परी तैसें न करिती प्राणिये। वायां आपुल्यां हितीं वाणिये।
जे पोहताती पाणिये। तळहातींचेनि॥ १५१॥

नाना अमृताचां सागरीं बुडिजे। मग तोंडा कां वज्रमिठी पाडिजे।
आणि मनीं तरी आठविजे। थिल्लरोदकातें॥ १५२॥

हें ऐसें काइसेया करावें। जें अमृतींही रिगोनि मरावें।
तें सुखें अमृत होऊनि का नसावें। अमृतामाजीं॥ १५३॥

तैसा फळहेतूचा पांजरा। सांडूनिया धर्नुर्धरा।
कां प्रतीतिपाखीं चिदंबरा। गोसाविया नोहावें॥ १५४॥

जेथ उंचावलेनि पवाडें। सुखाचा पैसारु जोडे।
आपुलेनि सुरवाडें। उडों ये ऐसा॥ १५५॥

तया उमपा माप कां सुवावें। मज अव्यक्ता व्यक्त कां मानावें।
सिद्ध असतां कां निमावें। साधनवरी॥ १५६॥

परि हा बोल आघवा। जरी विचारीजतसे पांडवा।
तरी विशेषें या जीवां। न चोजवे गा॥ १५७॥

नाहं प्रकाशः सर्वस्य योगमायासमावृत्तः।
मूढोऽयं नाभिजानाति लोको मामजमव्ययम्॥ ७.२५॥

कां जे योगमायापडळें। हे जाले आहाती आंधळे।
म्हणोनि प्रकाशाचेनिहि देहबळें। न देखती मातें॥ १५८॥

एऱ्हवीं मी नसे ऐसें। काहीं वस्तुजात असे।
पाहें पां कवण जळ रसें। रहित आहे॥ १५९॥

पवन कवणातें न शिवेचि। आकाश कें न समायेचि।
हें असो एक मीचि। विश्वीं असे॥ १६०॥

वेदाहं समतीतानि वर्तमानानि चार्जुन।
भविष्याणि च भूतानि मां तु वेद न कश्चन॥ ७.२६॥

येथें भूतें जियें अतीतलीं। तियें मीचि होऊनि ठेलीं।
आणि वर्तत आहाति जेतुलीं। तींहि मीचि॥ १६१॥

कां भविष्यमाणें जियें ही। तीहि मजवेगळीं नाहीं।
हा बोलचि एऱ्हवीं कांहीं। होय ना जाय॥ १६२॥

दोराचिया सापासी। डोंबा बडीया गव्हाळा ऐसी।
संख्या न करवे कोण्हासी। तेवीं भूतांसि मिथ्यत्वें॥ १६३॥

ऐसा मी पंडुसुता। अनुस्यूत सदा असतां।
यां संसार जो भूतां। तो आनें बोलें॥ १६४॥

तरी आतां थोडी ऐसी। गोठी सांगिजेल परियेसीं।
जैं अहंकारतनूंसी। वालभ पडिलें॥ १६५॥

इच्छाद्वेषसमुत्थेन द्वन्द्वमोहेन भारत।
सर्वभूतानि संमोहं सर्गे यान्ति परंतप॥ ७.२७॥

तैं इच्छा हे कुमारी जाली। मग ते कामाचिया तारुण्या आली।
तेथ द्वेषेंसी मांडिली। वराडिक॥ १६६॥

तया दोघांस्तव जन्मला। ऐसा द्वंद्वमोह जाला।
मग तो आजेयाने वाढविला। अहंकारें॥ १६७॥

जो धृतीसि सदां प्रतिकूळु। नियमाही नागवे स्थूळु।
आशारसें दोंदिलु। जाला सांता॥ १६८॥

असंतुष्टीचिया मदिरा। मत्त होवोनी धनुर्धरा।
विषयांच्यां वोवरां। विकृतीसी असे॥ १६९॥

तेणें भावशुद्धीचिया वाटे। विखुरले विकल्पाचे कांटे।
मग चिरिले अव्हांटे। अप्रवृत्तीचे॥ १७०॥

तेणें भूतें भांबावलीं। म्हणोनि संसाराचिया आडवामाजीं पडिलीं।
मग महादुःखाच्यां घेतलीं। दांडेवरी॥ १७१॥

येषां त्वन्तगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम्॥
ते द्वन्द्वमोहनिर्मुक्ता भजन्ते मां दृढव्रताः॥ ७.२८॥

ऐसे विकल्पाचे वांयाणे। कांटे देखोनि सणाणे।
जे मतिभ्रमाचें पासवणें। घेतीचिना॥ १७२॥

उजू एकनिष्ठतेच्यां पाउलीं। रगडूनि विकल्पाचिया भालीं।
महापातकांची सांडिली। अटवीं जिहीं॥ १७३॥

मग पुण्याचे धांवा घेतले। आणि माझी जवळीक पातले।
किंबहुना ते चुकले। वाटवधेयां॥ १७४॥

जरामरणमोक्षाय मामाश्रित्य यतन्ति ये॥
ते ब्रह्म तद्विदुः कृत्स्नमध्यात्मं कर्म चाखिलम्॥ ७.२९॥

एऱ्हवीं तरी पार्था। जन्ममरणाची निमे कथा।
ऐसिया प्रयत्नातें आस्था। विये जयांची॥ १७५॥

तयां तो प्रयत्नुचि एके वेळे। मग समग्रें परब्रह्में फळे।
जया पिकलेया रसु गळे। पूर्णतेचा॥ १७६॥

ते वेळीं कृतकृत्यता जग भरे। तेथ अध्यात्माचें नवलपण पुरे।
कर्माचें काम सरे। विरमे मन॥ १७७॥

ऐसा अध्यात्मलाभ तया। होय गा धनंजया।
भांडवल जया। उद्यमीं मी॥ १७८॥

तयातें साम्याचिये वाढी। ऐक्याची सांदे कुळवाडी।
तेथ भेदाचिया दुबळवाडी। नेणिजे जो॥ १७९॥

साधिभूताधिदैवं मां साधियज्ञं च ये विदुः।
प्रयाणकालेऽपि च मां ते विदुर्युक्तचेतसः॥ ७.३०॥

जिहीं साधिभूता मातें। प्रतीतीचेनि हातें।
धरूनि अधिदैवातें। शिवतलें गा॥ १८०॥

जया जाणिवेचेनि वेगें। मी अधियज्ञ दृष्टी रिगे।
ते तनूचेनि वियोगें। विरहे नव्हती॥ १८१॥

एऱ्हवीं आयुष्याचें सूत्र स्मल्ल्हडतां। भूतांची उमटे खडाडता।
काय न मरतयाहि चित्ता। युगांतु नोहे॥ १८२॥

परी नेणों कैसें पैं गा। जे जोडोनि गेले माझिया आंगा।
ते प्रयाणींचिया लगबगा। न सांडितीच मातें॥ १८३॥

एऱ्हवीं तरी जाण। ऐसे जे निपुण।
तेचि अंतःकरण। युक्त योगी॥ १८४॥

तंव इये शब्दकुपिकेतळीं। नोडवेचि अवधानाची अंजुळी।
जे नावेक अर्जुन तये वेळीं। मागांचि होता॥ १८५॥

जेथ तद्ब्रह्मवाक्यफळें। जियें नानार्थरसें रसाळें।
बहकतें आहाती परिमळें। भावाचेनि॥ १८६॥

सहज कृपामंदानिळें। श्रीकृष्णद्रुमाची वचनफळें।
अर्जुनश्रवणाचिये खोळे। अवचित पडिलीं॥ १८७॥

तियें प्रमेयाचींच हो कां वळलीं। कीं ब्रह्मरसाच्यां सागरीं चुबुकाळिलीं।
मग तैसीच कां घोळिलीं। परमानंदें॥ १८८॥

तेणें बरवेपणें निर्मळें। अर्जुना उन्मेषाचे डोहळे।
घेताति गळाळे। विस्मयामृताचे॥ १८९॥

तिया सुखसंपत्ति जोडलिया। मग स्वर्गा वाये वांकुलिया।
हृदयाच्यां जीवीं गुतकुलिया। होत आहाती॥ १९०॥

ऐसें वरचिलाचि बरवा। सुख जावों लागलें फावा।
तंव रसस्वादाचिया हांवा। लाहो केला ॥ १९१॥

झडकरी अनुमानाचेनि करतळें। घेऊनि तियें वाक्यफळें।
प्रतीतिमुखीं एकेंवेळे। घालूं पाहे॥ १९२॥

तंव विचाराचिया रसना न दाटती। परी हेतूच्यांहि दशनीं न फुटती।
ऐसें जाणोनि सुभद्रापती। चुंबीचिना॥ १९३॥

मग चमत्काररला म्हणे। इयें जळीं मा तारांगणें।
कैसा झकविलों असलगपणें। अक्षरांचेनि॥ १९४॥

इयें पदें नव्हती फुडिया। गगनाचिया घडिया।
येथ आमुचि मति बुडालिया। थाव न निघे॥ १९५॥

वांचुनि जाणावयाची कें गोठी। ऐसें जीवीं कल्पूनि किरीटी।
तिये पुनरपि केली दृष्टी। यादवेंद्रा॥ १९६॥

मग विनविलें सुभटें। हां हो जी यें एकवाटें।
सातही पदें अनुच्छिष्टें। नवलें आहाती॥ १९७॥

एऱ्हवीं अवधानाचेनि वहिलेपणें। नाना प्रमेयांचे उगाणे।
काय श्रवणाचेनि आंगवणें। बोलों राहाती॥ १९८॥

परी तैसें हें नोहेचि देवा। देखिला अक्षरांचा मेळावा।
आणि विस्मयाचिया जीवा। विस्मयो जाला॥ १९९॥

कानाचेनि गवाक्षद्वारें। बोलाचे रश्मी अभ्यंतरें।
पाहेना तंव चमत्कारें। अवधान ठाकलें॥ २००॥

तेविंचि अर्थाची चाड मज आहे। ते सांगताही वेळु न साहे।
म्हणूनि निरूपण लवलाहें। कीजो देवा॥ २०१॥

ऐसा मागील पडताळा घेउनी। पुढां अभिप्रावो दृष्टी सूनी।
तेविंचि माजि शिरवुनी। आर्ती आपुली॥ २०२॥

कैसी पुसती पाहें पां जाणिव। भिडेचि तरी लंघों नेदी शिंव।
एऱ्हवीं श्रीकृष्ण हृदयासि खेंव। देवों सरला॥ २०३॥

अगा गुरूतें जैं पुसावें। तैं येणें मानें सावध होआवें।
हें एकचि जाणे आवघें। सव्यसाची॥ २०४॥

आतां तयाचें तें प्रश्न करणें। वरी सर्वज्ञ श्रीहरीचें बोलणें।
हें संजयो आवडलेपणें। सांगेल कैसें॥ २०५॥

तिये अवधान द्यावें गोठी। बोलिजेल नीट मऱ्हाठी।
जैसी कानाचे आधीं दृष्टी। उपेगा जाये॥ २०६॥

बुद्धीचिया जिभा। बोलाचा न चाखतां गाभा।
अक्षरांचिया भांबा। इंद्रियें जिती॥ २०७॥

पहा पां मालतीचे कळे। घ्राणासि कीर वाटले परिमळें।
परी वरचिया बरवा काइ डोळे। सुखिये नव्हती॥ २०८॥

तैसें देशियेचिया हवावा। इंद्रियें करिती राणिवा।
मग प्रमेयाचिया गांवा। लेसा जाइजे॥ २०९॥

ऐसेनि नागरपणें। बोलु निमे तें बोलणें।
ऐका ज्ञानदेव म्हणे। निवृइत्तीचा॥ २१०॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु
ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे
ज्ञानविज्ञायोगोनाम सप्तमोऽध्यायः॥

इति श्रीज्ञानेश्वरविरचितायां
भावार्थदीपिकायां सप्तमोऽध्यायः॥ ७॥
श्लोक। ३० ओव्या। २१०

# 8 Attaining the Supreme अक्षरब्रह्मयोग

श्रीमद्भगवद्गीता अष्टमोऽध्यायः
ज्ञानेश्वरी अध्याय आठवा

---

अर्जुन उवाच।
किं तद् ब्रह्म किमध्यात्मं किं कर्म पुरुषोत्तम॥
अधिभूतं च किं प्रोक्तमधिदैवं किमुच्यते॥ ८.१॥

मग अर्जुनें म्हणितलें। हां हो जी अवधारिलें।
जें म्यां पुसिलें। तें निरूपिजो॥ १ ॥

सांगा कवण तें ब्रह्म। कायसया नाम कर्म।
अथवा अध्यात्म। काय म्हणिपे॥ २॥

अधिभूत तें कैसें। एथ अधिदैवत तें कवण असे।
हें उघड मी परियेसें। तैसें बोला॥ ३॥

अधियज्ञः कथं कोऽत्र देहेस्मिन् मधुसूदन॥
प्रयाणकाले च कथं ज्ञेयोऽसि नियतात्मभिः॥ ८.२॥

देवा अधियज्ञ तो काई। कवण पां इये देहीं।
हें अनुमानसि कंहीं। दिठी न भरे॥ ४॥

आणि नियता अंतःकरणीं। तूं जाणिजसी देहप्रयाणीं।
तें कैसेनि हें शार्ङ्गपाणी। परिसवा मातें॥ ५॥

देखा धवळारीं चिंतामणीचां। जरी पहुडला होय दैवाचा।
तरी वोसणतांही बोलु तयाचा। परी सोपु न वचे॥ ६॥

तैसें अर्जुनाचिया बोलासवें। आलें तेंचि म्हणितलें देवें।
परियेसें गा बरवें। जें पुसिलें तुवां॥ ७॥

किरीटी कामधेनूचा पाडा। परी कल्पतरूचा आहे मांदोडा।

म्हणोनि मनोरथसिद्धीचिया चाडा। तो नवल नोहे॥ ८॥

कृष्ण कोपोनि ज्यासी मारी। तो पावे ब्रह्मसाक्षात्कारीं।
मा कृपेनें उपदेशु करी। तो कैशापरी न पवेल॥ ९॥

जैं कृष्णाचिया होईजें आपण। तैं कृष्ण होय आपुलें अंतःकरण।
तेधवां संकल्पाचें आंगण। वोळंगती सिद्धी॥ १०॥

परि ऐसें जें प्रेम। तें अर्जुनींचि आथि निस्सीम।
म्हणऊनि तयाचे काम। सदा सफल॥ ११॥

या कारणें अनंतें। तें मनोगत तयाचें पुसतें।
होईल जाणूनि आइतें। वोगरूनि ठेविलें॥ १२॥

जें अपत्य थानींहूनि निगे। तयाची भूक ते मायेसीचि लागे।
एऱ्हवीं तें शब्दें काय सांगे। मग स्तन्य दे येरी॥ १३॥

म्हणोनि कृपाळुवा गुरूचिया ठायीं। हें नवल नोहें कांहीं।
परि तें असो आइका काई। जें देवो बोलते झाले॥ १४॥

श्रीभगवानुवाच।
अक्षरं ब्रह्म परमं स्वभावोऽध्यात्ममुच्यते॥
भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसंज्ञितः॥ ८.३॥

मग म्हणितलें सर्वेश्वरें। जें आकारीं इये खोंकरे।
कोंदलें असत न खिरे। कवणे काळीं॥ १५॥

एऱ्हवीं सपूरपण तयाचें पहावें। तरि शून्यचि नव्हे स्वभावें।
वरी गगनाचेनि पालवें। गाळूनि घेतलें॥ १६॥

जें ऐसेंही परि विरुळें। इये विज्ञानाचिये खोळे।
हालवलेंही न गळे। तें परब्रह्म॥ १७॥

आणि आकाराचेनि जालेपणें। जन्मधर्मातें नेणे।
आकारलोपीं निमणें। नाहीं कंहीं॥ १८॥

ऐशिया आपुलियाची सहजस्थिती। जया ब्रह्माची नित्यता असती।
तया नाम सुभद्रापती। अध्यात्म गा॥ १९॥

मग गगनीं जेविं निर्मळे। नेणों केंचीं एके वेळे।
उठती घनपटळें। नानावर्णें॥ २०॥

तैसें अमूर्ती तिये विशुद्धे। महदादि भूतभेदें।
ब्रह्मांडाचे बांधे। होंचि लागती॥ २१॥

पैं निर्विकल्पाचिये बरडी। कीं आदिसंकल्पाची फुटे विरूढी।
आणि ते सवेंचि मोडोनि ये ढोंढी। ब्रह्मगोळकांची॥ २२॥

तया एकैकाचे भीतरीं पाहिजे। तंव बीजाचाचि भरिला देखिजे।
माजीं होतियां जातियां नेणिजे। लेख जीवां॥ २३॥

मग तया गोळकांचे अंशांश। प्रसवती आदिसंकल्प असमहास।
हें असो ऐसी बहुवस। सृष्टि वाढे॥ २४॥

परि दुजेनविण एकला। परब्रह्मचि संचला।
अनेकत्वाचा आला। पूर जैसा॥ २५॥

तैसें सविषमत्व नेणों कैचें। वायांचि चराचर रचे।
पाहतां प्रसवतिया योनींचे। लक्ष दिसती॥ २६॥

येरी जीवाभावाचिये पालविये। कांहीं मर्यादाच करूं नये।
पाहिजे कवण हें आघवें विये। तंव मूळ तें शून्य॥ २७॥

म्हणोनि कर्ता मुदल न दिसे। आणि शेखीं कारणही कांहीं नसे।
माजीं कार्यचि आपैसें। वाढों लागे॥ २८॥

ऐसा करितेनवीण गोचरु। अव्यक्तीं हा आकारु।
निपजे जो व्यापारु। तया नाम कर्म॥ २९॥

अधिभूतं क्षरो भावः पुरुषश्चाधिदैवतम्॥
अधियज्ञोऽहमेवात्र देहे देहभृतां वर॥ ८.४॥

आतां अधिभूत जे म्हणिपे। तेंहि सांगों संक्षेपें।
तरी होय आणि हारपे। अभ्र जैसें॥ ३०॥

तैसें असतेपण आहाच। नाहीं होईजें हें साच।
जयांतें रूपा आणिती पांचपांच। मिळोनियां॥ ३१॥

भूतांतें अधिकरूनि असे। आणि भूतसंयोगें तरी दिसे।
जें वियोगवेळे भ्रंशे। नामरूपादिक॥ ३२॥

तयातें अधिभूत म्हणिजे। मग अधिदैव पुरुष जाणिजे।
जेणें प्रकृतीचें भोगिजे। उपार्जिलें॥ ३३॥

जो चेतनेचा चक्षु। जो इंद्रियदेशींचा अध्यक्षु।
जो देहास्तमानीं वृक्षु। संकल्पविहंगमाचा॥ ३४॥

जो परमात्माचि परि दुसरा। जे अहंकारनिद्रा निदसुरा।
म्हणोनि स्वप्नींचिया वोरबारा। संतोषे शिणे॥ ३५॥

जीव येणें नांवें। जयातें आळविजे स्वभावें।
तें अधिदैवत जाणावें। पंचायतनींचें॥ ३६॥

आतां इयेचि शरीरग्रामीं। जो शरीरभावातें उपशमी।
तो अधियज्ञ एथ गा मी। पंडुकुमरा॥ ३७॥

येर अधिदैवाधिभूत। तेहि मीचि कीर समस्त।
परी पंधरें किडाळा मिळत। काय ते साकें नोहे॥ ३८॥

तरि तें पंधरेपण न मैळे। आणि किडाळाचियाही अंशा न मिळे।
परि जंव असे जयाचेनि मेळें। तंव साकेंचि म्हणिजे॥ ३९॥

तैसें अधिभूतादि आघवें। हें अविद्येचेनि पालवें।
झाकलें तंव मानावें। वेगळें ऐसें॥ ४०॥

तेचि अविद्येची जवनिक फिटे। आणि भेदभावाची अवधि तुटे।
मग म्हणों एक होऊनि जरी आटे। तरी काय दोनी होती॥ ४१॥

पैं केशांचा गुंडाळा। वरी ठेविली स्फटिकशिळा।
ते जेंवीं पाहिली डोळां। तंव भेदली गमली॥ ४२॥

पाठीं केश परौते नेले। आणि भेदलेपण काय नेणों जाहालें।
तरि डांक देऊनि सांदिलें। शिळेतें काई॥ ४३॥

ना ते अखंडचि आयती। परी संगे भिन्न गमली होती।
ते सारीलिया मागौती। जैसी का तैसी॥ ४४॥

तेवींचि अहंभावो जाये। तरी ऐक्य तें आधींचि आहे।
हेंचि साचें जेथ होये। तो अधियज्ञु मी॥ ४५॥

पैं गा आम्हीं तुज। सकळ यज्ञ कर्मज।
सांगितलें कां जें काज। मनीं धरूनि॥ ४६॥

तो हा सकळ जीवांचा विसांवा। नैष्कर्म्यसुखाचा ठेवा।
परी उघड कऊनि पांडवा। दाविजत असे॥ ४७॥

पहिलें वैराग्य इंधन परिपूर्ती। इंद्रियानळीं प्रदीप्तीं।
विषयद्रव्याचिया आहुती। देऊनिया॥ ४८॥

मग वज्रासन तेचि उर्वी। शोधूनि आधारमुद्रा बरवी।
वेदिका रचे मांडवी। शरीराच्यां॥ ४९॥

तेथ संयमाग्नीचीं कुंडें। इंद्रियद्रव्याचेनि पवाडें।
पूजिजती उदंडें। युक्तिघोषें॥ ५०॥

मग मनप्राण आणि संयमु। हाचि हवनसंपदेचा संभ्रमु।
येणें संतोषविजे निर्धूमु। ज्ञानानळु॥ ५१॥

ऐसेनि हें सकळ ज्ञानीं समर्पे। मग ज्ञान तें ज्ञेयीं हारपे।
पाठीं ज्ञेयचि स्वरूपें। निखिल उरे॥ ५२॥

तयां नांव गा अधियज्ञु। ऐसें बोलला जंव सर्वज्ञु।
तव अर्जुन अतिप्राज्ञु। तया पातलें तें॥ ५३॥

हें जाणोनि म्हणितलें देवें। पार्था परिसतु आहासि बरवें।
या कृष्णाचिया संतोषासवें। येरु सुखाचा जाहला॥ ५४॥

देखा बालकाचिया धणी धाइजे। कां शिष्याचेनि जाहलेपणें होईजे।
हें सद्गुरुचि एकलेनि जाणिजे। कां प्रसवतिया॥ ५५॥

म्हणोनि सात्विक भावांची मांदी। कृष्णाआंगीं अर्जुनाआधीं।
न समातसे परी बुद्धी। सांवरोनि देवें॥ ५६॥

मग पिकलिया सुखाचा परिमळु। कां निवालिया अमृताचा कल्लोळु।
तैसा कोंवळा आणि सरळु। बोलु बोलिला॥ ५७॥

म्हणे परिसणेयांच्या राया। आइकें बापा धनंजया।
ऐसी जळों सरलिया माया। तेथ जाळितें तेंही जळे॥ ५८॥

अन्तकाले च मामेव स्मरन् मुक्त्वा कलेवरम्॥
यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः॥ ८.५॥

जें आतांचि सांगितलें होतें। अगा अधियज्ञ म्हणितला जयातें।
जे आदींचि तया मातें। जाणोनि अंतीं॥ ५९॥

ते देह झोळ ऐसें मानुनी। ठेले आपणपें आपणचि होउनी।
जैसा मठ गगना भरुनी। गगनींचि असे॥ ६०॥

ये प्रतीतीचिया माजघरीं। तयां निश्चयाची वोवरी।
आली म्हणोनि बाहेरी। नव्हेचि से॥ ६१॥

ऐसें सबाह्य ऐक्य संचले। मीचि होऊनि असतां रचिलें।
बाहेरी भूतांचीं पांचही खवले। नेणतांचि पडिलीं॥ ६२॥

आतां उभयां उभेपण नाहीं जयाचें। मा पडिलिया गहन कवण तयाचें।
म्हणोनि प्रतीतीचिये पोटींचे। पाणी न हाले॥ ६३॥

ते ऐक्याची आहे वोतिली। कीं नित्यतेचिया हृदयीं घातली।
जैसी समरससमुद्रीं धुतली। रुळेचिना॥ ६४॥

पैं अथावीं घट बुडाला। तो आंतबाहेरी उदकें भरला।
पाठीं दैवगत्या जरी फुटला। तरी उदक काय फुटे॥ ६५॥

नातरी सर्पें कवच सांडिलें। कां उबारेने वस्त्र फेडिले।
तरी सांग पां कांहीं मोडलें। अवेवामाजीं॥ ६६॥

तैसा आकारु हा आहाच भ्रंशे। वांचूनि वस्तु ते सांचलीचि असे।
तेचि बुद्धि जालिया विसुकुसे। कैसेनि आतां॥ ६७॥

म्हणोनि यापरी मातें। अंतकाळीं जाणतसाते।
जे मोकलिती देहातें। ते मीचि होती॥ ६८॥

एऱ्हवीं तरी साधारण। उरीं आदळलिया मरण।
जो आठवु धरी अंतःकरण। तेंचि होईजे॥ ६९॥

जैसा कवणु एकु काकुळती। पळतां पवनगती।
दुपाउलीं अवचितीं। कुहामाजीं पडिला॥ ७०॥

आतां तया पडणयाआरौतें। पडण चुकवावया परौतें।
नाहीं म्हणोनि तेथें। पडावेंचि पडे॥ ७१॥

तेविं मृत्युचेनि अवसरें एकें। जें येऊनि जीवासमोर ठाके।
तें होणें मग न चुके। भलतयापरी॥ ७२॥

आणि जागता जंव असिजे। तंव जेणें ध्यानें भावना भाविजे।
डोळां लागतखेंवो देखिजे। तेंचि स्वप्नीं॥ ७३॥

यं यं वापि स्मरन् भावं त्यजत्यन्ते कलेवरम्॥
तं तमेवैति कौन्तेय सदा तद्भावभावितः॥ ८.६॥

तेविं जितेनि अवसरें। जें आवडोनि जीवीं उरे।
तेंचि मरणाचिये मेरे। फार हो लागे॥ ७४॥

आणि मरणीं जया जें आठवे। तो तेचि गतीतें पावे।

तस्मात् सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्य च॥
मय्यर्पितमनोबुद्धिः मामेवैष्यस्यसंशयः॥ ८.७॥

म्हणोनि सदां स्मरावें। मातेंचि तुवां॥ ७५॥

डोळां जें देखावें। कां कानीं हन ऐकावें।
मनीं जें भावावें। बोलावें वाचे॥ ७६॥

तें आंत बाहेरी आघवें। मीचि करूनि घालावें।
मग सर्वी काळीं स्वभावें। मीचि आहें॥ ७७॥

अगा ऐसिया जरी जाहालिया। मग न मरिजे देह गेलिया।
मा संग्रामु केलिया। भय काय तुज॥ ७८॥

तूं मन बुद्धि सांचेंसी। जरी माझिया स्वरूपीं अर्पिसी।
तरी मातेंचि गा पावसी। हे माझी भाक॥ ७९॥

हेंचि कायिसया वरी होये। ऐसा जरी संदेहो वर्तत आहे।
तरी अभ्यासूनि आदीं पाहें। मग नव्हे तरी कोपें॥ ८०॥

अभ्यासयोगयुक्तेन चेतसा नान्यगामिना॥
परमं पुरुषं दिव्यं याति पार्थानुचिन्तयन्॥ ८.८॥

येणेंचि अभ्यासेंसि योगु। चित्तासि करीं पां चांगु।
अगा उपायबळें पंगु। पहाड ठाकी॥ ८१॥

तेविं सदभ्यासें निरंतर। चित्तासि परमपुरुषाची मोहर।
लावीं मग शरीर। राहो अथवा जावो॥ ८२॥

जें नाना गतीते पावविते। तें चित्त वरील आत्मयातें।
मग कवण आठवी देहातें। गेलें कीं आहे॥ ८३॥

पैं सरितेचेनि ओघें। सिंधुजळा मीनलें घोघें।
तें काय वर्तत आहे मागें। म्हणोनि पाहों येती॥ ८४॥

ना तें समुद्रचि होऊन ठेलें। तेविं चित्ताचें चैतन्य जाहालें।
जेथ यातायात निमालें। घनानंद जें॥ ८५॥

कविं पुराणमनुशासितारम्
अणोरणीयांसमनुस्मरेद्यः॥
सर्वस्य धातारमचिन्त्यरूपम्
आदित्यवर्णं तमसः परस्तात्॥ ८.९॥

जयाचें आकारावीण असणें। जया जन्म ना निमणें।
जें आघवेंचि आघवेपणें। देखत असे॥ ८६॥

जें गगनाहून जुनें। जें परमाणुहूनि सानें।
जयाचेनि संन्निधानें। विश्व चळे॥ ८७॥

जें सर्वांतें यया विये। सर्व जेणें जिये।
हेतु जया बिहे। अचिंत्य जें॥ ८८॥

देखें वोळंबा इंगळु न चरे। तेजीं तिमिर जेथ न सरे।
जें देहाचें आंधारें। चर्मचक्षूसीं॥ ८९॥

सुसडा सूर्यकणांचा राशी। जो नित्य उदो ज्ञानियांसी।
अस्तमानाचें जयासी। आडनांव नाहीं॥ ९०॥

प्रयाणकाले मनसाऽचलेन
भक्त्या युक्तो योगबलेन चैव॥
भ्रुवोर्मध्ये प्राणमावेश्य सम्यक्
स तं परं पुरुषमुपैति दिव्यम्॥ ८.१०॥

तया अव्यंगवाणेया ब्रह्मातें। प्रयाणकाले प्राप्ते।
जो स्थिरावलेनि चित्तें। जाणोनि स्मरे॥ ९१॥

बाहेरी पद्मासन रचुनी। उत्तराभिमुख बैसोनि।
जीवीं सुख सूनि। कर्मयोगाचें॥ ९२॥

आंतु मीनलेनि मनोधर्में। स्वरूपप्राप्तीचेनि प्रेमें।
आपेंआप संभ्रमें। मिळावया॥ ९३॥

आकळलेनि योगें। मध्यमा मध्यमार्गें।
अग्निस्थानौनि निगे। ब्रह्मरंध्रा॥ ९४॥

तेथ अचेत चित्ताचा सांगातु। आहाचवाणा दिसे मांडतु।
तेथ प्राणु गगनाआंतु। संचरे कां॥ ९५॥

परी मनाचेनि स्थैर्यें धरिला। भक्तीचिया भावना भरला।
योगबळें आवरला। सज्ज होउनी॥ ९६॥

तो जडाजडातें विरवितु। भ्रूलतामाजीं संरचतु।
जैसा घंटानाद लयस्थु। घंटेसीच होय॥ ९७॥

कां झांकलिये घटींचा दिवा। नेणिजे काय जाहला केव्हां।
या रीती जो पांडवा। देह ठेवी॥ ९८॥

तो केवळ परब्रह्म। जया परमपुरुष ऐसें नाम।
तें माझें निजधाम। होऊनि ठाके॥ ९९॥

यदक्षरं वेदविदो वदन्ति
विशन्ति यद्यतयो वीतरागाः॥
यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति
तत्ते पदं संग्रहेण प्रवक्ष्ये॥ ८.११॥

सकळां जाणणेयां जे लाणी। तिये जाणिवेची जे खाणी।
तयां ज्ञानियांचिये आयणी। जयातें अक्षर म्हणिपें॥ १००॥

चंडवातेंही न मोडे। तें गगनचि कीं फुडें।
वांचूनि जरी होईल मेहुडें। तरी उरेल कैचें॥ १०१॥

तेवीं जाणणेया जे आकळलें। तें जाणवलेपणेंचि उमाणलें।
मग नेणवेचि तयातें म्हणितलें। अक्षर सहजे॥ १०२॥

म्हणोनि वेदविद नर। म्हणती जयातें अक्षर।
जें प्रकृतीसी पर। परमात्मरूप॥ १०३॥

आणि विषयांचे विष उलंडूनि। जें सर्वेंद्रियां प्रायश्चित्त देऊनि।
आहाति देहाचिया बैसोनि। झाडातळीं॥ १०४॥

ते यापरी विरक्त। जयाची निरंतर वाट पहात।
निष्कामासि अभिप्रेत। सर्वदा जें॥ १०५॥

जयाचिया आवडी। न गणिती ब्रह्मचर्याचीं सांकडीं।
निष्ठुर होऊनि बापुडीं। इंद्रियें करिती॥ १०६॥

ऐसें जें पद। दुर्लभ आणि अगाध।
जयाचिये थडिये वेद। चुबुकळिले ठेले॥ १०७॥

तें ते पुरुष होती। जे यापरी लया जाती।
तरी पार्था हेचि स्थिती। एक वेळ सांगों॥ १०८॥

तेथें अर्जुनें म्हणितलें स्वामी। हेंचि म्हणावया होतों पां मी।
तंव सहजें कृपा केली तुम्हीं। तरी बोलिजो कां जी॥ १०९॥

परी बोलावें तें अति सोहोपें। तेथें म्हणितलें त्रिभुवनदीपें।
तुज काय नेणों संक्षेपें। सांगेन ऐक॥ ११०॥

तरी मना या बाहेरिलीकडे। यावयाची साविया सवें मोडे।
हें हृदयाचियां डोहीं बुडे। तैसे कीजे॥ १११॥

सर्वद्वाराणि संयम्य मनो हृदि निरुध्य च॥
मूर्ध्न्याधायात्मनः प्राणम् आस्थितो योगधारणाम्॥ ८.१२॥

परी हें तरीच घडे। जरी संयमाचीं अखंडे।
सर्वद्वारीं कवाडें। कळासती॥ ११२॥

तरी सहजें मन कोंडलें। हृदयींचि असेल उगलें।
जैसें करचरणीं मोडलें। परिवरु न संडी॥ ११३॥

तैसें चित्त राहिलिया पांडवा। प्राणांचा प्रणवुचि करावा।
मग अनुवृत्तिपंथें आणावा। मूर्ध्निवरी॥ ११४॥

तेथ आकाशीं मिळे न मिळे। तैसा धरावा धारणाबळें।
जंव मात्रात्रय मावळे। अर्धबिंबीं॥ ११५॥

तंववरी तो समीरु। निराळीं कीजे स्थिरु।
मग लग्नीं जेवीं ॐकारु। बिंबींचि विलसे॥ ११६॥

ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन् मामनुस्मरन्॥
यः प्रयाति त्यजन् देहं स याति परमां गतिम्॥ ८.१३॥

तैसें ॐ हें स्मरों सरे। आणि तेथेंचि प्राणु पुरे।
मग प्रणवांतीं उरे। पूर्णधन जें॥ ११७॥

म्हणोनि प्रणवैकनाम। हें एकाक्षर ब्रह्म।
जो माझें स्वरूप परम। स्मरतसांता॥ ११८॥

यापरी त्यजी देहातें। तो त्रिशुद्धी पावे मातें।
जया पावणया परौतें। आणिक पावणें नाहीं॥ ११९॥

येथ अर्जुना जरी विप्यें। तुझ्यां जीवीं हन ऐसें जाये।
ना हें स्मरण मग होये। कायसयावरी अंतीं॥ १२०॥

इंद्रियां अनुघडु पडलिया। जीविताचें सुख बुडालिया।
आंतुबाहेरी उघडलिया। मृत्युचिन्हें॥ १२१॥

ते वेळीं बैसावेंचि कवणें। मग कवण निरोधी करणें।
तेथ काह्याचेनि अंतःकरणें। प्रणव स्मरावा॥ १२२॥

तरि अगा ऐसिया ध्वनी। झणें थारा देशी हो मनी।
पैं नित्य सेविला मी निदानीं। सेवकु होय॥ १२३॥

अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः॥
तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः॥ ८.१४॥

मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम्॥
नाप्नुवन्ति महात्मानः संसिद्धिं परमां गताः॥ ८.१५॥

जे विषयांसि तिळांजळी देऊनि। प्रवृत्तीवरी निगड वाऊनि।
मातें हृदयीं सूनि। भोगिताती॥ १२४॥

परि भोगितया नाराणुका। भेटणें नाहीं क्षुधादिकां।
तेथ चक्षुरादि रंकां। कवण पाड॥ १२५॥

ऐसे निरंतर एकवटले। जे अंतःकरणीं मजसी लिगटले।
मीचि होऊनि आटले। उपासिती॥ १२६॥

तयां देहावसान जैं पावे। तैं तिहीं मातें स्मरावें।
मग म्यां जरी पावावे। तरी उपास्ति ते कायसी॥ १२७॥

पैं रंकु एक आडलेपणें। काकुळती अंतीं धांवां गा धांवां म्हणे।
तरी तयाचिये ग्लानी धावणें। काय न घडे मज॥ १२८॥

आणि भक्तांही तेचि दशा। तरी भक्तीचा सोसु कायसा।
म्हणऊनि हा ध्वनि ऐसा। न वाखाणावा॥ १२९॥

तिहीं जे वेळीं मी स्मरावा। ते वेळीं स्मरला कीं पावावा।
तो आभारुही जीवा। साहवेचि ना॥ १३०॥

तें ऋणवैपण देखोनि आंगीं। मी आपुलियाचि उत्तीर्णत्वालागीं।
भक्तांचियां तनुत्यागीं। परिचर्या करीं॥ १३१॥

देहवैकल्याचा वारा। झणें लागेल या सुकुमारा।
म्हणोनि आत्मबोधाच्यां पांजिरां। सूयें तयातें॥ १३२॥

वरि आपुलिया स्मरणाची उवाइली। हींव ऐसी करीं साउली।
ऐसेनि नित्यबुद्धि संचली। मी आणीं तयातें॥ १३३॥

म्हणोनि देहांतींचे सांकडें। माझिया कहींचि न पडे।
मी आपुलियातें आपुलीकडे। सुखेंचि आणीं॥ १३४॥

वरचील देहाची गंवसणी फेडुनि। आहाच अहंकाराचे रज झाडुनी।
शुद्ध वासना निवडुनी। आपणपां मेळवीं॥ १३५॥

आणि भक्तां तरी देहीं। विशेष एकवंकीचा ठाव नाहीं।
म्हणऊनि अव्हेरु करितां कांहीं। वियोगु ऐसा न वाटे॥ १३६॥

ना तरी देहांतींचि मियां यावें। मग आपणपें यातें न्यावें।
हेंही नाहीं स्वभावें। जे आधीचि मज मीनले॥ १३७॥

येरी शरीराचियां या सलिलीं। असतेपण हेंचि साउली।
वांचूनि चंद्रिका ते ठेली। चंद्रींच आहे॥ १३८॥

ऐसे जे नित्ययुक्त। तयासि सुलभ मी सतत।
म्हणऊनि देहांतीं निश्चित। मीचि होती॥ १३९॥

मग क्लेशतरूची वाडी। जे तापत्रयाग्नीची सगडी।
जे मृत्युकाकासि कुरोंडी। सांडिली आहे॥ १४०॥

जें दैन्याचें दुभतें। जें महाभयातें वाढवितें।
जें सकळ दुःखाचें पुरतें। भांडवल॥ १४१॥

जें दुर्मतीचें मूळ। जें कुकर्माचें फळ।
जें व्यामोहाचें केवळ। स्वरूपचि॥ १४२॥

जें संसाराचें बैसणें। जें विकाराचें उद्यानें।
जें सकळ रोगांचें भाणें। वाढिलें आहे॥ १४३॥

जें काळाचा खिच उशिटा। जें आशेचा आंगवठा।
जन्ममरणाचा वोलिंवटा। स्वभावें जें॥ १४४॥

जें भुलीचें भरींव। जें विकल्पाचें वोतींव।
किंबहुना पेंव। विंचुवाचें॥ १४५॥

जें व्याघ्राचे क्षेत्र। जें पण्यांगनेचें मैत्र।
जें विषयविज्ञानयंत्र। सुपूजित॥ १४६॥

जें लावेचा कळवळा। निवालिया विषोदकाचा गळाळा।
जें विश्वासु आंगवळा। संवचोराचा॥ १४७॥

जें कोढियाचें खेंव। जें काळसर्पाचें मार्दव।
जें गोरियाचें स्वभाव। गायन जें॥ १४८॥

जें वैरियाचा पाहुणेरु। जें दुर्जनाचा आदरु।
हें असो जें सागरु। अनर्थाचा॥ १४९॥

जें स्वप्नीं देखिलें स्वप्न। जें मृगजळें सासिन्नलें वन।
जें धूम्ररजांचें गगन। ओतलें आहे॥ १५०॥

ऐसें जें हें शरीर। तें ते न पवतीची पुढती नर।
जे होऊनि ठेले अपार। स्वरूप माझें॥ १५१॥

आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन।
मामुपेत्य तु कौन्तेय पुनर्जन्म न विद्यते॥ ८.१६॥

एऱ्हवी ब्रह्मपणाचिये भडसे। न चुकतीचि पुनरावृत्तीचे वळसे।
परी निवटलियांचे जैसें। पोट न दुखे॥ १५२॥

ना तरी चेइलियानंतरे। न बुडिजे स्वप्नींचेनि महापूरें।
तेवीं मातें पावले ते संसारें। लिंपतीचि ना॥ १५३॥

एऱ्हवीं जगदाकाराचें सिरें। जें चिरस्थायीयांचे धुरे।
ब्रह्मभुवन गा चवरे। लोकाचळाचें॥ १५४॥

जिये गांवींचा पहारु दिवोवरी। एका अमरेंद्राचें आयुष्य न धरी।
विळोनि पांती उठी एकसरी। चवदा जणांची॥ १५५॥

सहस्रयुगपर्यन्तम् अहर्यद् ब्रह्मणो विदुः॥
रात्रीं युगसहस्रां तां तेऽहोरात्रविदो जनाः॥ ८.१७॥

जैं चोकडिया सहस्र जाये। तैं ठायेठावो विळुचि होये।
आणि तेसेंचि सहस्रे वरियें पाहें। रात्री जेथ॥ १५६॥

येवढे अहोरात्र जेथिंचे। तेणें न लोटती जे भाग्याचे।
देखती ते स्वर्गींचे। चिरंजीव॥ १५७॥

येरां सुरगणाची नवाई। विशेष सांगावी येथ कांई।
मुदल इंद्राचीचि दशा पाहीं। जे दिहाचे चौदा॥ १५८॥

परी ब्रह्मयाचियाहि आठां प्रहारातें। आपुलियां डोळां देखते।
जे आहातीइ गा तयांतें। अहोरात्रविद म्हणिपे॥ १५९॥

अव्यक्ताद् व्यक्तयः सर्वाः प्रभवन्त्यहरागमे॥
रात्र्यागमे प्रलीयन्ते तत्रैवाव्यक्तसंज्ञके॥ ८.१८॥

भूतग्रामः स एवायं भूत्वा भूत्वा प्रलीयते॥
रात्र्यागमेऽवशः पार्थ प्रभवत्यहरागमे॥ ८.१९॥

तिये ब्रह्मभुवनीं दिवसें पाहे। ते वेळीं गणना केंही न समाये।
ऐसें अव्यक्ताचें होये। व्यक्त विश्व॥ १६०॥

पुढती दिहाची चौपाहारी फिटे। आणि हा आकारसमुद्र आटे।
पाठीं तैसाचि मग पाहांटे। भरों लागे॥ १६१॥

शारदीयेचिये प्रवेशीं। अभ्रें जिरती आकाशीं।
मग ग्रीष्मांतीं जैशीं। निगती पुढती॥ १६२॥

तैशी ब्रह्मदिनाचिये आदी। हे भूतसृष्टीची मांदी।
मिळे जंव सहस्रावधी। निमित्त पुरे॥ १६३॥

पाठीं रात्रींचा अवसरु होये। आणि विश्व अव्यक्तीं लया जाये।
तोही युगसहस्र मोटका पाहे। आणि तैसेंचि रचे॥ १६४॥

हें सांगावया काय उपपत्ती। जे जगाचा प्रळयो आणि संभूती।
इये ब्रह्मभुवनींचिया होती। अहोरात्रामाजीं॥ १६५॥

कैसें थोरिवेचें मान पाहें पां। तो सृष्टिबीजाचा साटोपा।
परी पुनरावृत्तीचिया मापा। शीग जाहला॥ १६६॥

एऱ्हवीं त्रैलोक्य हें धनुर्धरा। तिये गांवींचा गा पसारा।
तो हा दिनोदयीं एकसरां। मांडत असे॥ १६७॥

पाठीं रात्रींचा समो पावे। आणि अपैसाचि सांठवे।
म्हणिये जेथींचें तेथ स्वभावें। साम्यासि ये॥ १६८॥

जैसें वृक्षपण बीजासि आलें। कीं मेघ हें गगन जाहालें।
तैसें अनेकत्व जेथ सामावलें। ते साम्य म्हणिपे॥ १६९॥

परस्तस्मात्तु भावोऽन्योऽव्यक्तोऽव्यक्तात्सनातनः॥
यः स सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति॥ ८.२०॥

तेथ समविषम न दिसे कांहीं। म्हणोनि भूतें हे भाष नाहीं।
जेविं दूधचि जाहालिया दहीं। नामरूप जाय॥ १७०॥

तेविं आकारलोपासरिसें। जगाचें जगपण भ्रंशे।
परी जेथें जाहालें तें जैसें। तैसेंचि असे॥ १७१॥

तैं तया नांव सहज अव्यक्त। आणि आकारा ये तेंचि व्यक्त।
हें एकास्तव एक सूचित। एऱ्हवीं दोनी नाहीं॥ १७२॥

जैसें आटलिया रूपें। आटलेपण ते खोटी म्हणिपे।
पुढती तो घनाकारु हारपे। जे वेळीं अळंकार होती॥ १७३॥

इयें दोन्ही जैसीं होणीं। एकीं साक्षीभूत सुवर्णीं।
तैसी व्यक्ताव्यक्ताची कडसणी। वस्तूंच्यां ठायीं॥ १७४॥

तें तरी व्यक्त ना अव्यक्त। नित्य ना नाशवंत।
या दोहीं भावातीत। अनादिसिद्ध॥ १७५॥

जें हें विश्वचि होऊनि असे। परी विश्वपण नासिलेनि न नासे।
अक्षरें पुसिल्या न पुसे। अर्थु जैसा॥ १७६ ॥

पाहें पां तरंग होत जात। परि तेथ उदक तें अखंड असत।
तेवीं भूतभावीं नाशिवंत। अविनाश जें॥ १७७ ॥

नातरी आटतियें अळंकारीं। नाटतें कनक असे जयापरी।
तेवीं मरतिये जीवाकारीं। अमर जें आहें॥ १७८ ॥

अव्यक्तोऽक्षर इत्युक्तस्तम् आहुः परमां गतिम्॥
यं प्राप्य न निवर्तन्ते तद्धाम परमं मम॥ ८.२१॥

पुरुषः स परः पार्थ भक्त्या लभ्यस्त्वनन्यया॥
यस्यान्तःस्थानि भूतानि येन सर्वमिदं ततम्॥ ८.२२॥

जयातें अव्यक्त म्हणों ये कोडें। म्हणतां स्तुति हे ऐसे नावडे।
जे मना बुद्धी न सापडे। म्हणऊनियां॥ १७९ ॥

आणि आकारा आलिया जयाचें। निराकारपण नवचे।
आकारलोपें न विसंचे। नित्यता गा॥ १८०॥

म्हणोनि अक्षर जें म्हणिजे। तेवींचि म्हणतां बोधुही उपजे।
जयापरौता पैसु न देखिजे। या नाम परमगती॥ १८१॥

पैं आघवां इहीं देहपुरीं। आहे निजेलियाचे परी।
जे व्यापारु करवी ना करी। म्हणऊनियां॥ १८२॥

एऱ्हवीं जे शरीरचेष्टा। त्यांमाजी एकही न ठके गा सुभटा।
दाहीं इंद्रियांचिया वाटा। वाहतचि आहाती॥ १८३॥

उकलूंनि विषयांचा पेटा। होत मनाचां चोहटां।
तो सुखदुःखाचा राजवांटा। भीतराहि पावे॥ १८४॥

परी रावो पहुडलिया सुखें। जैसा देशींचा व्यापारु न ठके।
प्रजा आपुलालेनि अभिलाखें। करितचि असती॥ १८५॥

तैसें बुद्धीचें हन जाणणें। कां मनाचें घेणें देणें।
इंद्रियांचें करणे। स्फुरण वायूचें॥ १८६॥

हे देहक्रिया आघवी। न करवितां होय बरवी।
जैसा न चलवितेनि रवी। लोकु चाले॥ १८७॥

अर्जुना तया परी। सुतला ऐसा आहे शरीरीं।
म्हणोनि पुरुषु गा अवधारीं। म्हणिपे जयातें॥ १८८॥

आणि प्रकृति पतिव्रते। पडिला एकपत्नीव्रतें।
येणेंही कारणें जयातें। पुरुषु म्हणों ये॥ १८९॥

पैं वेदांचें बहुवसपण। देखेचिना जयाचें आंगण।
हें गगनाचें पांघरूण। होय देखा॥ १९०॥

ऐसें जाणूनि योगीश्वर। जयातें म्हणती परमपर।
जें अनन्यगतीचें घर। गिंवसीत ये॥ १९१॥

जें तनू वाचा चित्तें। नाइकती दुजिये गोष्टीतें।
तयां एकनिष्ठेचें पिकतें। सुक्षेत्र जें॥ १९२॥

हें त्रैलोक्यचि पुरुषोत्तमु। ऐसा साचु जयांचा मनोधर्मु।
तयां आस्तिकांचा आश्रमु। पांडवा गा॥ १९३॥

जें निगर्वाचें गौरव। जें निर्गुणाची जाणीव।
जें सुखाची राणिव। निराशांसी॥ १९४॥

जें संतोषियां वाढिलें ताट। जें अचिंतां अनाथांचे मायपोट।
भक्तीसी उजू वाट। जया गांवा॥ १९५॥

हें एकैक सांगोनि वाया। काय फार करूं धनंजया।
पैं गेलिया जया ठाया। तो ठावोचि होइजे॥ १९६॥

हिंवाचिया झुळुका। जैसें हिंवचि पडे उष्णोदका।
कां समोरा जालिया अर्का। तमचि प्रकाशु होय॥ १९७॥

तैसा संसारु जया गांवा। गेला सांता पांडवा।
होऊनि ठाके आघवा। मोक्षाचाचि॥ १९८॥

तरी अग्नीमाजीं आलें। जैसें इंधनचि अग्नि जाहले।
पाठीं न निवडेचि कांहीं केलें। काष्ठपण॥ १९९॥

नातरी साखरेचा माघौता। बुद्धिमंतपणेंही करिता।
परी ऊंस नव्हे पंडुसुता। जियापरी॥ २००॥

लोहाचें कनक जहालें। हें एकें परिसेंचि केलें।
आतां आणिक कैचें तें गेलें। लोहत्व आणी॥ २०१॥

म्हणोनि तूप होऊनि माघौतें। जेवीं दूधपणा न येचि निरुतें।
तेवि पावोनियां जयातें। पुनरावृत्ति नाहीं॥ २०२॥

तें माझें परम। साचोकारें निजधाम।
हें आंतुवट तुज वर्म। दाविजत असे॥ २०३॥

यत्र काले त्वनावृत्तिम् आवृत्तिं चैव योगिनः॥
प्रयाता यान्ति तं कालं वक्ष्यामि भरतर्षभ॥ ८.२३॥

तेवींचि आणिकेंही एकें प्रकारे। हें जाणतां आहे सोपारे।
तरी देह सांडितेनि अवसरें। जेथ मिळती योगी॥ २०४॥

अथवा अवचटें ऐसें घडे। जे अनवसरें देह सांडे।
तरि माघौतें येणें घडे। देहासीचि॥ २०५॥

म्हणोनि काळशुद्धी जरी देह ठेविती। तरी ठेवितखेवीं ब्रह्मचि होती।
एऱ्हवीं अकाळीं तरी येती। संसारा पुढती॥ २०६॥

तैसें सायुज्य आणि पुनरावृत्ती। ये दोन्ही अवसराधीन आहाती।
तो अवसरु तुजप्रती। प्रसंगें सांगों॥ २०७॥

तरि ऐकें गा सुभटा। पातलिया मरणाचा माजिवटा।
पांचैं आपुलालिया वाटा। निघती अंती॥ २०८॥

ऐसां वरि पडिलां प्रयाणकाळीं। बुद्धीतें भ्रमु न गिळी।
स्मृति नव्हे आंधळी। न मरे मन॥ २०९॥

हा चेतनावर्गु आघवा। मरणीं दिसे टवटवा।
परी अनुभविलिया ब्रह्मभावा। गंवसणी होऊनि॥ २१०॥

ऐसा सावध हा समवावो। आणि निर्वाणवेऱ्हीं निर्वाहो।
हें तरीच घडे जरी सावावो। अग्नीचा आथी॥ २११॥

पाहा पां वारेनें कां उदकें। जै दिवियाचें दिवेपण झाकें।
तैं असतीच काय देखे। दिठी आपुली॥ २१२॥

तैसें देहांतींचेनि विषमवातें। देह आंत बाहेरि श्लेष्मा आते।
तैं विझोनि जाय उजितें। अग्नीचें जेव्हां॥ २१३॥

ते वेळीं प्राणासीचि प्राणु नाहीं। तेथ बुद्धि असोनि करील काई।
म्हणोनि अग्निवीण देहीं। चेतना न थारे॥ २१४॥

अगा देहींचा अग्नि जरी गेला। तरी देह नव्हे चिखलु वोला।
वायां आयुष्यवेळु आपुला। आंधारें गिंवसी॥ २१५॥

आणि मागील स्मरण आघवें। तें तेणें अवसरें सांभाळावें।
मग देह त्यजोनि मिळावें। स्वरूपीं कीं॥ २१६॥

तंव तया देहश्लेष्माचें चिखलीं। चेतनाचि बुडोनि गेली।
तेथ मागिली पुढिली ही ठेली। आठवण सहजें॥ २१७॥

म्हणोनि आधीचि अभ्यासु जो केला। तो मरण न येतांचि निमोनि गेला।
जैसें ठेवणें न दिसतां मालवलां। दीपु हातींचा॥ २१८॥

आतां असो हें सकळ। जाण पां ज्ञानासि अग्नि मूळ।
तया अग्नीचें प्रयाणीं बळ। संपूर्ण आथी॥ २१९॥

अग्निर्ज्योतिरहः शुक्लः षण्मासा उत्तरायणम्॥
तत्र प्रयाता गच्छन्ति ब्रह्म ब्रह्मविदो जनाः॥ ८.२४॥

आंत अग्निज्योतींचा प्रकाशु। बाहेरी शुक्लपक्षु आणि दिवसु।
आणि सामासांमाजीं मासु। उत्तरायण॥ २२०॥

ऐसिया समायोगाची निरुती। लाहोनि जे देह ठेवती।
ते ब्रह्मविद होती। परब्रह्म॥ २२१॥

अवधारीं गा धनुर्धरा। येथवरी सामर्थ्य यया अवसरा।
तेवींचि हा उजू मार्ग स्वपुरा। यावयासी॥ २२२॥

एथ अग्नी हें पहिलें पायतरें। ज्योतिर्मय हें दुसरें।
दिवस जाणें तिसरें। चौथें शुक्लपक्ष॥ २२३॥

आणि सामास उत्तरायण। तें वरचील गा सोपान।
येणें सायुज्यसिद्धिसदन। पावती योगी॥ २२४॥

हा उत्तम काळु जाणिजे। यातें अर्चिरादि मार्गु म्हणिजे।
आतां अकाळु तोही सहजें। सांगेन आईक॥ २२५॥

धूमो रात्रिस्तथा कृष्णः षण्मासा दक्षिणायनम्॥
तत्र चान्द्रमसं ज्योतिर्योगी प्राप्य निवर्तते॥ ८.२५॥

तरि प्रयाणाचेनि अवसरें। वातुश्लेष्मु सुभरे।
तेणें अंतःकरणी आंधारें। कोंदलें ठाके॥ २२६॥

सर्वेंद्रियां लांकुड पडे। स्मृति भ्रमामाजीं बुडे।
मन होय वेडें। कोंडे प्राण॥ २२७॥

अग्नीचें अग्निपण जाये। मग तो धूमचि अवघा होये।
तेणें चेतना गिंवसली ठाये। शरीरींची॥ २२८॥

जैसें चंद्राआड आभाळ। सदट दाटे सजळ।
मग गडद ना उजाळ। ऐसें झांबळें होय॥ २२९॥

कां मरे ना सावध। ऐसें जीवितासि पडे स्तब्ध।
आयुष्य मरणाची मर्याद। वेळु ठाकी॥ २३०॥

ऐसी मनबुद्धिकरणीं। सभोंवतीं धूमाकुळाची कोंडणी।
जेथ जन्में जोडलिये वाहणी। युगचि बुडे॥ २३१॥

हां गा हातींचे जे वेळीं जाये। ते वेळीं आणिका लाभाची गोठी कें आहे।
म्हणऊनि प्रयाणीं तंव होये। येतुली दशा॥ २३२॥

आणि देहाआंतु ऐसी स्थिती। बाहेरी कृष्णपक्षु वरि राती।
आणि सामासही ते वोडवती। दक्षिणायन॥ २३३॥

इये पुनरावृत्तीचीं घराणीं। आघवीं एकवटती जयाचिया प्रयाणीं।
तो स्वरूपसिद्धीची काहाणी। कैसेनि आइके॥ २३४॥

ऐसा जयाचा देह पडे। तया योगी म्हणोनि चंद्रवेरीं जाणें घडे।
मग तेथूनि मागुता बहुडे। संसारा ये॥ २३५॥

आम्हीं अकाळु जो पांडवा। म्हणितला तो हा जाणावा।
आणि हाचि धूम्रमार्गु गांवा। पुनरावृत्तीचिया॥ २३६॥

येर तो अर्चिरादि मार्गु। तो वसता आणि असलगु।
साविया स्वस्त चांगु। निवृत्तीवेरी॥ २३७॥

शुक्लकृष्णे गती ह्येते जगतः शाश्वते मते॥
एकया यात्यनावृत्तिम् अन्ययावर्तते पुनः॥ ८.२६॥

ऐसिया अनादि या दोन्ही वाटा। एकी उजू एकी अव्हांटा।
म्हणऊनि बुद्धिपूर्वक सुभटा। दाविलिया तुज॥ २३८॥

कां जे मार्गामार्ग देखावे। साच लटिकें वोळखावें।
हिताहित जाणावें। हिताचिलागीं॥ २३९॥

पाहें पां नाव देखतां बरवी। कोणी आड घाली काय अथावीं।
कां सुपंथ जाणोनिया अडवीं। रिगवत असे॥ २४०॥

जो विष अमृत वोळखे। तो अमृत काय सांडू शके।
तेविं जो उजू वाट देखे। तो अव्हांटा न वचे॥ २४१॥

म्हणोनि फुडें। पारखावें खरें कुडें।
पारखिलें तरी न पडे। अनवसरें काहीं॥ २४२॥

एऱ्हवीं देहांतीं थोर विषम। या मार्गाचें आहे संभ्रम।
जन्में अभ्यासिलियाचें हन काम। जाईल वायां॥ २४३॥

जरी अर्चिरादि मार्गु चुकलिया। अवचटे धूम्रपंथें पडलिया।
तरी संसारपांथीं जुंतलिया। भंवतचि असावें॥ २४४॥

हे सायास देखोनि मोठे। आतां कैसेनि पां एक वेळ फिटे।
म्हणोनि योगमार्ग गोमटे। शोधले दोन्ही॥ २४५॥

तंव एकें ब्रह्मत्वा जाइजे। आणि एकें पुनरावृत्ती येइजे।
परि दैवगत्या जो लाहिजे। देहांतीं जेणें॥ २४६॥

नैते सृती पार्थ जानन् योगी मुह्यति कश्चन॥
तस्मात्सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन॥ ८.२७॥

ते वेळीं म्हणितलें हें नव्हे। वायां अवचटें काय पावे।
देह त्यजूनि वस्तु होआवे। मार्गेंचि कीं॥ २४७॥

तरी आतां देह असो अथवा जावो। आम्ही तों केवळ वस्तूचि आहों।

कां जे दोरीं सर्पत्व वावो। दोराचिकडुनि॥ २४८॥

मज तरंगपण असे का नसे। ऐसें उदकासी कहीं प्रतिभासे।
तें भलतेव्हां जैसें तैसें। उदकचि कीं॥ २४९॥

तरंगाकारें न जन्मेचि। ना तरंगलोपें निमेचि।
तेविं देहीं जे देहेंचि। वस्तु जाहले॥ २५०॥

आतां शरीराचें तयचिया ठाई। आडनांवही उरलें नाहीं।
तरी कोणें काळें काई। निमे तें पाहें पां ॥ २५१॥

मग मार्ग तैं कायसा शोधावे। कोणें कोठूनि कें जावें।
जरी देशकालादि आघवें। आपणचि असिजे॥ २५२॥

आणि हां गा घटु जे वेळीं फुटे। ते वेळीं तेथिंचें आकाश लागे नीटे वाटे।
वाटा लागलें तरी गगना भेटे। एऱ्हवी काय चुके॥ २५३॥

पाहें पां ऐसें हन आहे। कीं तो आकारुचि म्हणों जाये।
येर गगन तें गगनींचि आहे। घटत्वाहि आधीं॥ २५४॥

ऐसिया बोधाचेनि सुरवाडें। मार्गामार्गाचें सांकडें।
तया सोऽहंसिद्धां न पडे। योगियांसी॥ २५५॥

याकारणें पंडुसुता। तुवां होआवें योगयुक्ता।
येतुलेनि सर्वकाळीं साम्यता। आपैसया होईल॥ २५६॥

मग भलतेथ भलतेव्हां। देहबंधु असो अथवा जावा।
परि अबंधा नित्य ब्रह्मभावा। विघड नाहीं॥ २५७॥

तो कल्पादि जन्मा नागवे। कल्पांतीं मरणें नाप्लवे।
माजि स्वर्गसंसारांचेनि लाघवें। झकवेना॥ २५८॥

येणें बोधें जो योगी होये। तयासी या बोधाचेंचि नीटपण आहे।
कां जे भोगातें पेलूनि पाहे। निजरूपा ये॥ २५९॥

पैं गा इंद्रादिका देवां। जयां सर्वस्वें स्वर्गीं गाजती राणिवा।
तें सांडणें मानूनि पांडवा। डावली जो॥ २६०॥

वेदेषु यज्ञेषु तपःसु चैव
दानेषु यत्पुण्यफलं प्रदिष्टम्।
अत्येति तत्सर्वमिदं विदित्वा
योगी परं स्थानमुपैति चाद्यम॥ ८.२८॥

जऱ्ही वेदाध्ययनाचें जालें। अथवा यज्ञाचें शेतचि पिकलें।
कां तपोदानांचें जोडलें। सर्वस्व हन जें॥ २६१॥

तया आघवांचि पुण्याचा मेळा। भारु आंतौनि जया ये फळा।
जें परब्रह्मा निर्मळा। सांठि न सरे॥ २६२॥

जें नित्यानंदाचेनि मानें। उपमेचां कांटाळां न दिसे सानें।
पाहा पां वेदयज्ञादि साधनें। जया सुखा॥ २६३॥

जें विटे ना सरे। भोगितयाचेनि पवाडें पुरे।
पुढती महासुखाचें सोयरें। भावंडचि॥ २६४॥

ऐसें दृष्टीचेनि सुखपणें। जयासी अदृष्टाचें बैसणें।
जें शतमखांहि आंगवणें। नोहेंचि एका॥ २६५॥

तयातें योगीश्वर अलौकिकें। दिठीचेनि हाततुकें।
अनुमानिती कौतुकें। तंव हळुवट आवडे॥ २६६॥

मग तया सुखाची किरीटी। करूनिया गा पाउटी।
परब्रह्माचिये पाठीं। आरूढती॥ २६७॥

ऐसें चराचरैकभाग्य। जें ब्रह्मेशां आराधनायोग्य।
योगियांचे भोग्य। भोगधन जें॥ २६८॥

जो सकळ कळांची कळा। जो परमानंदाचा पुतळा।
जो जिवाचा जिव्हाळा। विश्वाचिया॥ २६९॥

जो सर्वज्ञतेचा वोलावा। जो यादव कुळींचा कुळदिवा।
तो श्रीकृष्ण जी पांडवा। प्रती बोलिला॥ २७०॥

ऐसा कुरुक्षेत्रींचा वृत्तांतु। संजयो रायासी असे सांगतु।
तेचि परियसा पुढां मातु। ज्ञानदेव म्हणे निवृत्तीचा॥ २७१॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु
ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे अक्षरब्रह्मयोगोनाम अष्टमोऽध्यायः॥

इति श्रीज्ञानेश्वरकृतायां
भावार्थदीपिकायां अष्टमोऽध्यायः॥ ८॥
श्लोक २८ ओव्या २७१

# 9 The most confidential Knowledge राजविद्या राजगुह्ययोग

श्रीमद्भगवद्गीता नवमोऽध्यायः
ज्ञानेश्वरी अध्याय नववा

---

तरि अवधान एकवेळें दीजे। मग सर्वसुखासि पात्र होइजे।
हें प्रतिज्ञोत्तर माझें। उघड ऐका॥ १॥

परी प्रौढी न बोलें हो जी। तुम्हां सर्वज्ञांचां समाजीं।
देयावें अवधान हे माझी। विनवणी सलगीची॥ २॥

कां जे लळेयांचे लळे सरती। मनोरथांचे मनौरे पुरती।
जरी माहेरें श्रीमंते होती। तुम्हां ऐसी॥ ३॥

तुमचे या दिठिवेयाचिये वोले। सासिन्नले प्रसन्नतेचे मळे।
ते साउली देखोनि लोळें। श्रांतु जी मी॥ ४॥

प्रभू तुम्ही सुखामृताचे डोहो। म्हणोनि आम्ही आपुलिया स्वेच्छा बोलावों लाहों।
येथही जरी सलगी करूं बिहों। तरी निवों कें पां॥ ५॥

नातरी बालक बोबडां बोलीं। कां वांकुडां विचुकां पाउलीं।
तें चोज करूनि माउली। रिझे जेवीं॥ ६॥

तेवीं तुम्हां संतांचा पढियावो। कैसेनि तरी आम्हांवरी हो।
याबहुवा आळुकिया जी आहों। सलगी करीत॥ ७॥

वांचूनि माझिये बोलतिये योग्यते। सर्वज्ञ भवादृश श्रोते।
काय धड्यावरि सारस्वतें। पढों सिकिजे॥ ८॥

अवधारां आवडे तेसणा धुंधुरु। परी महातेजीं न मिरवे काय करूं।
अमृताचिया ताटीं वोगरूं। ऐसी रससोय कैंची॥ ९॥

हां हो हिमकरासी विंजणें। कीं नादापुढें आइकविणें।
लेणियासी लेणें। हें कहीं आथी॥ १०॥

सांगा परिमळें काय तुरंबावें। सागरें कवणे ठायीं नाहावें।
हें गगनचि आडे आघवें। ऐसा पवाडु कैंचा॥ ११॥

तैसें तुमचें अवधान धाये। आणि तुम्ही म्हणा हें होये।
ऐसें वक्तृत्व कवणा आहे। जेणें रिझा तुम्ही॥ १२॥

तरि विश्वप्रगटितया गभस्ती। काय हातिवेनि न कीजे आरती।
कां चुळोदकें अपांपती। अर्घ्यु नेदिजे॥ १३॥

प्रभु तुम्हीं महेशाचिया मूर्ती। आणि मी दुबळा अर्चितसे भक्ती।
म्हणोनि बोल जऱ्ही गंगावती। तऱ्ही स्वीकाराल कीं॥ १४॥

बाळक बापाचिये ताटीं रिगे। रिगौनि बापातेंच जेववूं लागे।
की तो संतोषलेनि वेगें। मुखचि वोडवी॥ १५॥

तैसा मी जरी तुम्हांप्रती। चावटी करीतसें बाळमती।
तरी तुम्हीं तोषिजे ऐसी जाती। प्रेमाचिया॥ १६॥

आणि तेणें आपुलेपणाचेनि मोहें। तुम्ही संत घेतले असा बहुवे।
म्हणोनि केलिये सलगीचा नोहे। आभारु तुम्हां॥ १७॥

अहो तान्हयाची लागतां झटे। तेणें अधिकचि पान्हा फुटे।
रोषें प्रेम दुणवटे। पढियंतयाचेनि॥ १८॥

म्हणऊनि मज लेंकुरवाचेनि बोलें। तुमचें कृपाळूपण निदैलें।
तें चेइलें हें जी जाणवलें। यालागी बोलिलों मी॥ १९॥

एऱ्हवीं चांदिणें पिकविजत आहे चेपणीं। कीं वारया धापत आहे वाहणी।
हां हो गगनासि गंवसणी। घालिजे केवीं॥ २०॥

आइकां पाणी वोथिजावें न लगे। नवनीतीं माथुला न रिगे।
तेविं लाजिलें व्याख्यान न निगे। देखोनि जयांतें॥ २१॥

हें असो शब्दब्रह्म जिये बाजे। शब्द मावळलेया निवांतु निजे।
तो गीतार्थु मऱ्हाटिया बोलिजे। हा पाडु काई॥ २२॥

परी ऐसियाही मज धिंवसा। तो पुढती याचि येकी आशा।
जे धिटींवा करूनि भवादृशां। पढियंतया होआवें॥ २३॥

परी आतां चंद्रापासोनि निववितें। जें अमृताहूनि जीववितें।
तेणें अवधानें कीजे वाढतें। मनोरथा माझिया॥ २४॥

कां जैं दिठिवा तुमचा वरुषे। तैं सकळार्थसिद्धि मती पिके।
एऱ्हवीं कोंमेला उन्मेषु सुके। जरी उदास तुम्ही॥ २५॥

सहजें तरी अवधारा। वक्तृत्वा अवधानाचा होय चारा।
तरी दोंदें पेलती अक्षरां। प्रमेयाचीं॥ २६॥

अर्थ बोलाची वाट पाहे। तेथ अभिप्रावोचि अभिप्रायातें विये।
भावाचा फुलौरा होत जाये। मतिवरी॥ २७॥

म्हणूनि संवादाचा सुवावो ढळे। तरीं हृदयाकाश सारस्वतें वोळे।
आणि श्रोता दुश्चिता तरि वितुळे। मांडला रसु॥ २८॥

अहो चंद्रकांतु द्रवता कीर होये। परी ते हातवटी चंद्रीं कीं आहे।
म्हणऊनि वक्ता तो वक्ताचि नोहे। श्रोतेनिविण॥ २९॥

परी आतां आमुतें गोड करावें। ऐसें हें तांदुळीं कासया विनवावें।
साइखडियानें काइ प्रार्थावें। सूत्रधारातें॥ ३०॥

काय तो बाहुलियांचिया काजा नाचवी। कीं आपुलिये जाणिवेची कळा वाढवी।
म्हणऊनि आम्हां या ठेवाठेवी। काय काज॥ ३१॥

तंव गुरु म्हणती काइ जाहलें। हें समस्तही आम्हां पावलें।
आतां सांगें जें निरोपिलें। श्रीनारायणें॥ ३२॥

येथ संतोषोनि निवृत्तिदासें। जी जी म्हणऊनि उल्हासें।
अवधारां श्रीकृष्ण ऐसे। बोलते जाहले॥ ३३॥

श्रीभगवानुवाच।
इदं तु ते गुह्यतमं प्रवक्ष्याम्यनसूयवे॥
ज्ञानं विज्ञानसहितं यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात्॥ ९.१॥

नातरि अर्जुना हें बीज। पुढती सांगिजेल तुज।
जें हें अंतःकरणींचें गुज। जीवाचिये॥ ३४॥

येणें मानें जीवाचें हियें फोडावें। मग गुज कां पां मज सांगावें।
ऐसें कांहीं स्वभावें। कल्पिशी जरी॥ ३५॥

तरी परियेसीं प्राज्ञा। तूं आस्थेचीच संज्ञा।
बोलिलिये गोष्टींची अवज्ञा। नेणसी करूं॥ ३६॥

म्हणोनि गूढपण आपुलें मोडो। वरी न बोलावेंही बोलावें घडो।
परी आमुचिये जीवींचे पडो। तुझ्यां जीवीं॥ ३७॥

अगा थानीं कीर दूध गूढ। परी थानासीचि नव्हे कीं गोड।
म्हणोनि सरो कां सेवितयाची चाड। जरी अनन्य मिळे॥ ३८॥

मुडांहूनि बीज काढिलें। मग निर्वाळलिये भूमी पेरिलें।
तरि तें सांडीविखुरीं गेलें। म्हणों ये कायी॥ ३९॥

यालागीं सुमनु आणि शुद्धमती। जो अनिंदकु अनन्यगती।
पैं गा गौप्यही परी तयाप्रती। चावळिजे सुखें॥ ४०॥

तरी प्रस्तुत आतां गुणीं इहीं। तूं वांचूनि आणिक नाहीं।
म्हणोनि गुज तरी तुझां ठायीं। लपवूं नये॥ ४१॥

आतां किती नावानावा गुज। म्हणतां कानडें वाटेल तुज।
तरि ज्ञान सांगेन सहज। विज्ञानेंसी॥ ४२॥

परी तेंचि ऐसेनि निवाडें। जैसें भेसळलें खरें कुडें।
मग काढिजे फाडोवाडें। पारखूनिया॥ ४३॥

कां चांचूचेनि सांडसें। सांडिजे पय पाणी राजहंसें।
तुज ज्ञान विज्ञान तैसें। वांटूनि देऊं॥ ४४॥

मग वारयाचियां धारसां। पडिला कोंडा कां नुरेचि जैसा।
आणि अन्नकणाचा आपैसा। राशिवा जोडे॥ ४५॥

तैसेंजें जाणितलेयासाठीं। संसार संसाराचिये गांठीं।
लाऊनि बैसवी पाटीं। मोक्षश्रियेच्यां॥ ४६॥

राजविद्या राजगुह्यं पवित्रमिदमुत्तमम्॥
प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम्॥ ९.२॥

जें जाणणेयां सुविद्येच्यां गांवीं। गुरुत्वाची आचार्यपदवी।
जें सकळ गुह्यांचा गोसावी। पवित्रां रावो॥ ४७॥

आणि धर्माचें निजधाम। तेविंचि उत्तमाचें उत्तम।
पैं जया येतां नाहीं काम। जन्मांतराचें॥ ४८॥

मोटकें गुरुमुखें उदैजत दिसे। आणि हृदयीं स्वयंभचि असे।
प्रत्यक्ष फावो लागे तैसें। आपैसयाचि॥ ४९॥

तेविंचि पैं गा सुखाचां पाउटीं। चढतां येइजे जयाचिया भेटी।
मग भेटल्या कीर मिठी। भोगणेयाहि पडे॥ ५०॥

परी भोगाचिया ऐलीकडिलिये मेरे। चित्त उभें ठेलेंचि सुखा भरे।
ऐसें सुलभ आणि सोपारें। वरि परब्रह्म॥ ५१॥

पैं गा आणिकही एक याचें। जें हाता आलें तरी न वचे।
आणि अनुभवितां कांहीं न वेचे। वरी विटेहि ना॥ ५२॥

येथ जरी तूं तार्किका। ऐसी हन घेसी शंका।
ना येवढी वस्तु हे लोकां। उरली केविं पां॥ ५३॥

जे एकोत्तरेयाचिया वाढी। जे जळतिये आगीं घालिती उडी।
ते अनायासें स्वगोडी। सांडिती केविं॥ ५४॥

तरि पवित्र आणि रम्य। तेवींचि सुखोपायेंचि गम्य।
आणि स्वसुख वरि धर्म्य। वरि आपणपां जोडे॥ ५५॥

ऐसा अवघाचि सुरवाडु आहे। तरी जनाहातीं केवीं उरों लाहे।
हा शंकेचा ठाव कीर होये। परी न धरावी तुवां॥ ५६॥

अश्रद्दधानाः पुरुषा धर्मस्यास्य परंतप॥
अप्राप्य मां निवर्तन्ते मृत्युसंसारवर्त्मनि॥ ९.३॥

पाहें पां दूध पवित्र आणि गोड। पासीं त्वचेचिया पदराआड।
परी तें अव्हेरूनि गोचिड। अशुद्धचि सेवीं॥ ५७॥

कां कमलकंदा आणि दर्दुरीं। नांदणूक एकेची घरीं।
परी परागु सेविजे भ्रमरीं। जवळिलां चिखलुचि उरे॥ ५८॥

नातरी निदैवाचां परिवरीं। लोह्या रुतलिया आहाति सहस्रवरी।
परी तेथ बैसोनि उपवासु करी। कां दरिद्रें जिये॥ ५९॥

तैसा हृदयामध्यें मी रामु। असतां सर्वसुखाचा आरामु।
कीं भ्रांतासि कामु। विषयावरी॥ ६०॥

बहु मृगजळ देखोनि डोळां। थुंकिजे अमृताचा गिळितां गळाळा।
तोडिला परिसु बांधिला गळा। शुक्तिकालाभें॥ ६१॥

तैसीं अहंममतेचिये लवडसवडी। मातें न पवती बापुडीं।
म्हणोनि जन्ममरणाचिये दुथडी। डहुळितें ठेलीं॥ ६२॥

एऱ्हवीं मी तरी कैसा। मुखाप्रति भानु जैसा।
कहीं नसे न दिसे ऐसा। वाणीचा नव्हें॥ ६३॥

मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना ॥
मत्स्थानि सर्वभूतानि न चाहं तेष्ववस्थितः॥ ९.४॥

माझिया विस्तारलेपणाचेनि नांवें। हें जगचि नोहे आघवें।
जैसें दूध मुरालें स्वभावें। तरि तेंचि दहीं॥ ६४॥

कां बीजचि जाहलें तरु। अथवा भांगारचि अळंकारु।
तैसा मज एकाचा विस्तारु। तें हें जग॥ ६५॥

हें अव्यक्तपणें थिजलें। तेंचि मग विश्वाकारें वोथिजलें।
तैसें अमूर्त मूर्तिमय विस्तारलें। त्रैलोक्य जाणें॥ ६६॥

महदादि देहांतें। इयें अशेषेंही भूतें।
परी माझ्यां ठायीं बिंबिते। जैसें जळीं फेण॥ ६७॥

परी तया फेणाआंतु पाहतां। जेवीं जळ न दिसे पंडुसुता।
ना तरी स्वप्नींची अनेकता। चेइलिया नोहिजे॥ ६८॥

तैसीं भूतें इयें माझ्यां ठायीं। बिंबती तयामाजि मी नाहीं।
इया उपपत्ती तुज पाहीं। सांगितलिया मागां॥ ६९॥

म्हणऊनि बोलिलिया बोलाचा अतिसो। न कीजे यालागीं हें असो।
तरी मज आंत पैसो। दिठी तुझी॥ ७०॥

न च मत्स्थानि भूतानि पश्य मे योगमैश्वरम्॥
भूतभृन्न च भूतस्थो ममात्मा भूतभावनः॥ ९.५ ॥

आमुच्या प्रकृतीपैलीकडील भावो। जरी कल्पनेवीण लागसी पाहों।
तरी मजमाजि भूतें हेंही वावो।जे मी सर्व म्हणउनी॥ ७१॥

एऱ्हवीं संकल्पाचिये सांजवेळे। नावेक तिमिरेजती बुद्धीचे डोळे।
म्हणोनि अखंडित परी झावळें। भूतभिन्न ऐसें देखें॥ ७२॥

तेचि संकल्पाची सांज जैं लोपे। तैं अखंडितचि आहे स्वरूपें।
जैसें शंका जातखेंवो लोपे। सापपण माळेचें॥ ७३॥

एऱ्हवीं तरी भूमीआंतूनि स्वयंभ। काय घडे या गाडगे यांचे निघती कोंभ।
परी ते कुलालमतीचे गर्भ। उमटले कीं॥ ७४॥

ना तरी सागरींच्यां पाणीं। काय तरंगाचिया आहाती खाणी।
ते अवांतर करणी। वारियाची नव्हे॥ ७५॥

पाहें पां कापसाच्यां पोटीं। काय कापाडाची होती पेटी।
तो वेढितयाचिया दिठी। कापड जाहला॥ ७६॥

जरी सोनें लेणें होऊनि घडे। तरी तयाचें सोनेपण न मोडे।
येर अळंकार हे वरचिलीकडे। लेतयाचेनि भावें॥ ७७॥

सांगें पडिसादाचीं प्रत्युत्तरें। कां आरिसां जें आविष्करे।
तें आपलें कीं साचोकारें। तेथेंचि होतें॥ ७८॥

तैसी इये निर्मळे माझ्यां स्वरूपीं। जो भूतभावना आरोपी।
तयासि तयाच्यां संकल्पीं। भूताभासु असे॥ ७९॥

तेचि कल्पिती प्रकृती पुरे। आणि भूताभासु आधींच सरे।
मग स्वरूप उरे एकसरें। निखळ माझें॥ ८०॥

हें असो आंगी भरलिया भवंडीं। जैशा भोंवत दिसती अरडीदरडी।
तैशीं आपुलिया कल्पना अखंडीं। गमती भूतें॥ ८१॥

तेचि कल्पना सांडूनि पाहीं। तरि मी भूतीं भूतें माझ्यां ठायीं।
हें स्वप्नींहीं परी नाहीं। कल्पावयाजोगें॥ ८२॥

आतां मी एक भूतांतें धर्ता। अथवा भूतांमाजि मी असता।
या संकल्पसन्निपाता। आंतुलिया बोलिया॥ ८३॥

म्हणोनि परियेसीं गा प्रियोत्तमा। यापरी मी विश्वेंसीं विश्वात्मा।
जो इया लटकिया भूतग्रामा। भाव्यु सदा॥ ८४॥

रश्मीचेनि आधारें जैसें। नव्हतेंचि मृगजळ आभासे।
माझ्यां ठायीं भूतजात तैसें। आणि मातेंही भावीं॥ ८५॥

मी ये परीचा भूतभावनु। परी सर्व भूतांसि अभिन्नु।
जैसी प्रभा आणि भानु। एकचि ते॥ ८६॥

हा आमुचा ऐश्वर्ययोगु। तुवां देखिला कीं चांगु।
आतां सांगें कांहीं एथ लागु। भूतभेदाचा असे॥ ८७॥

यालागीं मजपासूनि भूतें। आनें नव्हती हें निरुतें।
आणि भूतांवेगळिया मातें। कहींच न मनीं हो॥ ८८॥

यथाकाशस्थितो नित्यं वायुः सर्वत्रगो महान्॥
तथा सर्वाणि भूतानि मत्स्थानीत्युपधारय॥ ९.६॥

पैं गगन जेवढें जैसें। पवनु गगनीं तेवढाचि असे।
सहजे हालविलिया वेगळा दिसे। एऱ्हवीं गगन तेंचि तो॥ ८९॥

तैसें भूतजात माझ्यां ठायीं। कल्पिजे तरी आभासे कांहीं।
निर्विकल्पीं तरी नाहीं। तेथ मीच मी आघवें॥ ९०॥

म्हणऊनि नाहीं आणि असे। हें कल्पनेचेनि सौरसें।
जे कल्पनालोपें भ्रंशे। आणि कल्पनेसवें होय॥ ९१॥

तेंचि कल्पितें मुदल जाये। तैं असे नाहीं हें कें आहे।
म्हणऊनि पुढती तूं पाहें। हा ऐश्वर्य योगु॥ ९२॥

ऐसिया प्रतीतिबोधसागरीं। तूं आपणेयातें कल्लोळु एक करीं।
मज जंव पाहासी चराचरीं। तंव तूंचि आहासी॥ ९३॥

या जाणणेयाचा चेवो। तुज आला ना म्हणती देवो।
तरी आतां द्वैतस्वप्न वावो। जालें कीं ना॥ ९४॥

तरी पुढती जरी विपायें। बुद्धीसि कल्पनेची झोंप ये।
तरी अभेदबोधु जाये। जैं स्वप्नीं पडिजे॥ ९५॥

म्हणोनि ये निद्रेची वाट मोडे। निखिळ उद्बोधाचेंचि आपणपें घडे।
ऐसें वर्म जें आहे फुडें। तें दावों आतां॥ ९६॥

तरी धनुर्धरा धैर्या। निकें अवधान देई बा धनंजया।
पैं सर्व भूतांतें माया। करी हरी गा॥ ९७॥

सर्वभूतानि कौन्तेय प्रकृतिं यान्ति मामिकाम्॥
कल्पक्षये पुनस्तानि कल्पादौ विसृजाम्यहम्॥ ९.७॥

जिये नांव गा प्रकृती। जे द्विविध सांगितली तुजप्रती।
एकी अष्टधा भेदव्यक्ती। दुजी जीवरूपा॥ ९८॥

हा प्रकृतीविखो आघवा। तुवां मागां परिसलासे पांडवा।
म्हणोनि असो काइ सांगावा। पुढतपुढती॥ ९९॥

तरी ये माझिये प्रकृती। महाकल्पाच्यां अंती।
सर्व भूतें अव्यक्तीं। ऐक्यासि येती॥ १००॥

ग्रीष्माच्यां अतिरसीं। सबीजें तृणें जैसीं।
मागुती भूमीसी। सुलीनें होती॥ १०१॥

कां वार्षिये ढेंढें फिटे। जेव्हां शारदियेचा अनुघडु फुटे।
तेव्हां घनजात आटे। गगनींचें गगनीं॥ १०२॥

नातरी आकाशाचिये खोंपे। वायु निवांतुचि लोपे।
कां तरंगता हारपे। जळीं जेवीं॥ १०३॥

अथवा जागिनलिये वेळे। स्वप्न मनींचें मनीं मावळे।
तैसें प्राकृत प्रकृती मिळे। कल्पक्षयीं॥ १०४॥

मग कल्पादीं पुढती। मीचि सृजीं ऐसी वदंती।
तरी इयेविषयीं निरुती। उपपत्ती आइक॥ १०५॥

प्रकृतिं स्वामवष्टभ्य विसृजामि पुनः पुनः॥
भूतग्राममिमं कृत्स्नम् अवशं प्रकृतेर्वशात्॥ ९.८॥

तरी हेचि प्रकृति किरीटी। मी स्वकीया सहजें अधिष्ठीं।
तेथ तंतूसमवाय पटीं। जेविं विणावणी दिसे॥ १०६॥

मग तिये विणावणीचेनि आधारें। लहानां चौकडियां पटत्व भरे।
तैसी पंचात्मकें आकारें। प्रकृतीचि होये॥ १०७॥

जैसें विरजणियाचेनि संगे। दूधचि आटेजों लागे।
तैसी प्रकृति आंगा रिगे। सृष्टिपणाचिया॥ १०८॥

बीज जळाची जवळीक लाहे। आणि तेंचि शाखोपशाखीं होये।
तैसें मज करणें आहे। भूतांचें हें॥ १०९॥

अगा नगर हें रायें केलें। या म्हणणया साचपण कीर आलें।
परी निरुतें पाहतां काय शिणलें। रायाचे हात॥ ११०॥

आणि मी प्रकृति अधिष्ठीं तें कैसें। जैसा स्वप्नीं जो असे।
मग तोचि प्रवशे। जागृतावस्थे॥ १११॥

तरी स्वप्नौनि जागृती येतां। काय पाय दुखती पंडुसुता।
कीं स्वप्नामाजी असतां। प्रवासु होय॥ ११२॥

या आघवियाचा अभिप्रावो कायी। जे हें भूतसृष्टीचें कांहीं।
मज एकही करणें नाहीं। ऐसाचि अर्थु॥ ११३॥

जैसी रायें अधिष्ठिली प्रजा। व्यापारे आपुलालिया काजा।
तैसा प्रकृतिसंगु माझा। येर करणें तें इयेचें॥ ११४॥

पाहें पां पूर्णचंद्राचिये भेटी। समुद्र भरतें अपार दाटी।
तेथ चंद्रासि काय किरीटी। उपखा पडे॥ ११५॥

जड परी जवळिका। लोह चळे तरी चळो कां।
तरी कवण शीण भ्रामका। सन्निधानाचा॥ ११६॥

किंबहुना यापरी। मी निजप्रकृति अंगिकारीं।
आणि भूतसृष्टी एकसरी। प्रसवोंचि लागे॥ ११७॥

जो हा भूतग्रामु आघवा। असे प्रकृतिआधीन पांडवा।
जैसी बीजाचिया वेलपालवा। समर्थ भूमि॥ ११८॥

ना तरी बाळादिकां वयसा। गोसावी देहसंगु जैसा।
अथवा घनावळी आकाशा। वार्षियें जेवीं॥ ११९ ॥

कां स्वप्नासि कारण निद्रा। तैशी प्रकृति हे नरेंद्रा।
या अशेषाहि भूतसमुद्रा। गोसाविणी गा॥ १२० ॥

स्थावरा आणि जंगमा। स्थूळा अथवा सूक्ष्मा।
हें असो भूतग्रामा। प्रकृतिचि मूळ॥ १२१ ॥

म्हणोनि भूतें हन सृजावीं। कां सृजिलीं प्रतिपाळावीं।
इयें करणीं न येती आघवीं। आमुचिया आंगा॥ १२२ ॥

जळीं चंद्रिकेचिया पसरती वेली। ते वाढी चंद्रें नाहीं वाढवली।
तेंविं मातें पावोनि ठेलीं। दूरी कर्में॥ १२३ ॥

न च मां तानि कर्माणि निबध्नन्ति धनंजय॥
उदासीनवदासीनम् असक्तं तेषु कर्मसु॥ ९.९ ॥

आणि सुटलिया सिंधुजळाचा लोटु। न शके धरूं सैंधवाचा घाटु।
तेवीं सकळ कर्मा मीच शेवटु। तें काइ बांधती मातें॥ १२४ ॥

धूम्ररजांची पिंजरी। वाजतिया वायूतें जरी होकारी।
कां सूर्यबिंबामाघारीं। आंधारें रिगे॥ १२५ ॥

हें असो पर्वताचिये हृदयींचें। जेवीं पर्जन्यधारास्तव न खोंचे।
तेवीं कर्मजात प्रकृतीचें। न लगे मज॥ १२६ ॥

एऱ्हवीं इये प्रकृतीं विकारीं। एकु मीचि आहें अवधारीं ।
परी उदासीनाचिया परी। करीं न करवीं॥ १२७ ॥

जैसा दीपु ठेविला परिवरीं। कवणातें नियमी ना निवारी।
आणि कवण कवणिये व्यापारीं। राहाटे तेंहि नेणे॥ १२८ ॥

तो जैसा कां साक्षिभूतु। गृहव्यापारप्रवृत्तिहेतु।
तैसा भूतकर्मीं अनासक्तु। मी भूतीं असें॥ १२९ ॥

हा एकचि अभिप्रावो पुढतपुढती। काय सांगों बहुतां उपपत्तीं।
येथ एकवेळां सुभद्रापती। येतुलें जाणपां॥ १३० ॥

मयाध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम्॥
हेतुनानेन कौन्तेय जगद्विपरिवर्तते॥ ९.१० ॥

जे लोकचेष्टां समस्तां। जैसा निमित्तमात्र कां सविता।
तैसा जगत्प्रभवीं पंडुसुता। मी जाणें॥ १३१ ॥

कां जे मियां अधिष्ठिलिया प्रकृती। होती चराचराचिया संभूती।
म्हणोनि मी हेतु हे उपपत्ती। घडे यया॥ १३२ ॥

आतां येणें उजियेडें निरुतें। न्याहाळीं पां ऐश्वर्ययोगातें।
जे माझ्यां ठायीं भूतें। परी भूतीं मी नसें॥ १३३ ॥

अथवा भूतें ना माझ्यां ठायीं। आणि भूतांमाजि मी नाहीं।
या खुणा तूं कहीं। चुकों नको॥ १३४ ॥

हें सर्वस्व आमचें गूढ। परी दाविलें तुज उघड।
आतां इंद्रियां देऊनि कवाड। हृदयीं भोगीं॥ १३५ ॥

हा दंशु जंव न ये हातां। तंव माझें साचोकारेपण पार्था।
न सांपडे गा सर्वथा। जेविं भुसीं कणु॥ १३६ ॥

एऱ्हवीं अनुमानाचेनि पैसें। आवडे कीर कळलें ऐसें।
परी मृगजळाचेनि वोलांशें। काय भूमि तिमे॥ १३७ ॥

जे जाळ जळीं पांगिलें। तेथ चंद्रबिंब दिसे आंतुडलें।
परी थडिये काढूनि झाडिलें। तेव्हां बिंब कें सांगे॥ १३८ ॥

तैसें बोलवरी वाचाबळें। वायांचि झकविजती प्रतीतीचे डोळे।
मग साचोकारें बोधावेळे। आथि ना होईजे॥ १३९ ॥

अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुमाश्रितम्॥
परं भावमजानन्तो मम भूतमहेश्वरम्॥ ९.११

किंबहुना भवा बिहा या। आणि साचें चाड आथि जरी मियां।
तरी तूं गा उपपत्ती इया। जतन कीजे॥ १४० ॥

एऱ्हवीं वेधली दिठी कवळें। ते चांदणियातें म्हणे पिवळें।
तेविं माझ्यां स्वरूपीं निर्मळें। देखाल दोष॥ १४१ ॥

ना तरी ज्वरें विटाळलें मुख। तें दुधातें म्हणे कडू विख।
तेविं अमानुषा मानुष। मानाल मातें॥ १४२॥

म्हणऊनि पुढती तूं धनंजया । झणें विसंबसी या अभिप्राया।
जे इया स्थूलदृष्टी वायां। जाइजेल गा॥ १४३॥

पैं स्थूलदृष्टी देखती मातें। तेंचि न देखणें जाण निरुतें।
जैसें स्वप्नींचेनि अमृतें। अमर नोहिजे॥ १४४॥

एऱ्हवीं स्थूळदृष्टी मूढ। मातें जाणती कीर दृढ।
परी तें जाणणेंचि जाणणेया आड। रिगोनि ठाके॥ १४५॥

जैसा नक्षत्राचिया आभसा। साठीं घातु झाला तया हंसा।
माजीं रत्नबुद्धीचिया आशा। रिगोनियां॥ १४६॥

सांगें गंगा या बुद्धी मृगजळ। ठाकोनि आलियाचें कवण फळ।
काय सुरतरु म्हणोनि बाबुळ। सेविली करी॥ १४७॥

हा निळयाचा दुसरा। या बुद्धी हातु घातला बिखारा।
कां रत्नें म्हणोनि गारा। वेंचि जेविं॥ १४८॥

अथवा निधान हें प्रगटलें। म्हणोनि खदिरांगार खोळे भरिले।
कां साउली नेणतां घातलें। कुहां सिंहें॥ १४९॥

तेविं मी म्हणोनि प्रपंचीं। जिहीं बुडी दिधली कृतनिश्चयाची।
तिहीं चंद्रासाठीं जेविं जळींची। प्रतिमा धरिली॥ १५०॥

तैसा कृतनिश्चय वायां गेला। जैसा कोण्ही एकु कांजी प्याला।
मग परिणाम पाहों लागला। अमृताचा॥ १५१॥

तैसें स्थूळाकारीं नाशिवंतें। भरंवसा बांधोनि चित्तें।
पाहती मज अविनाशातें। तरी कैंचा दिसे॥ १५२॥

अगा काइ पश्चिमसमुद्राचिया तटा। निघिजत आहे पूर्विलिया वाटा।
कां कोंडा कांडतां सुभटा। कणू आतुडे॥ १५३॥

तैसें विकारलें हें स्थूळ। जाणितलेया मी जाणवतसें केवळ।
काइ फेण पितां जळ। सेविलें होय॥ १५४॥

म्हणोनि मोहिलेनि मनोधएमें। हेंचि मी मानूनि संभ्रमें।
मग येथिचीं जियें जन्मकर्में। तियें मजचि म्हणती॥ १५५॥

येतुलेनि अनामा नाम। मज अक्रियासि कर्म।
विदेहासि देहधर्म। आरोपिती॥ १५६॥

मज आकारशून्या आकारु। निरुपाधिका उपचारु।
मज विधिविवर्जिता व्यवहारु। आचारादिक॥ १५७॥

मज वर्णहीना वर्णु। गुणातीतासि गुणु।
मज अचरणा चरणु। अपाणिया पाणी॥ १५८॥

मज अमेया मान। सर्वगतासी स्थान।
जैसें सेजेमाजी वन। निदेला देखे॥ १५९॥

तैसें अश्रवणा श्रोत्र। मज अचक्षूसी नेत्र।
अगोत्रा गोत्र। अरूपा रूप॥ १६०॥

मज अव्यक्तासि व्यक्ती। अनार्तासी आर्ती।
स्वयंतृप्ता तृप्ती। भाविती गा॥ १६१॥

मज अनावरणा प्रावरण। भूषणातीतासि भूषण।
मज सकळ करणा कारण। देखती ते॥ १६२॥

मज सहजातें करिती। स्वयंभातें प्रतिष्ठिती।
निरंतरातें आव्हानिती। विसर्जिती गा॥ १६३॥

मी सर्वदा स्वतःसिद्धु। तो कीं बाळ तरुण वृद्धु।
मज एकरूपा संबंधु। जाणती ऐसें॥ १६४॥

मज अद्वैतासि दुजें। मज अकर्तयासि काजें।
मी अभोक्ता कीं भुंजें। ऐसें म्हणती॥ १६५॥

मज अकुळाचें कुळ वानिती। मज नित्याचेनि निधनें शिणती।
मज सर्वांतरानें कल्पिती। अरि मित्र गा॥ १६६॥

मी स्वानंदाभिरामु। तया मज अनेकां सुखांचा कामु।
आघवाचि मी असें समु। कीं म्हणती एकदेशी॥ १६७॥

मी आत्मा एक चराचरीं। म्हणती एकाचा कैंपक्ष करीं।
आणि कोपोनि एकातें मारी। हेंचि वाढविती॥ १६८॥

किंबहुना ऐसे समस्त। जे हे मनुष्यधर्म प्राकृत।
तयाचि नांव मी ऐसें विपरीत। ज्ञान तयांचें॥ १६९॥

जंव आकारु एक पुढां देखती। तंव हा देव येणें भावें भजती।
मग तोचि विघडलिया टाकिती। नाहीं म्हणोनि॥ १७०॥

मातें येणें येणें प्रकारें। जाणती मनुष्य ऐसेनि आकारें।
म्हणऊनि ज्ञानचि तें आंधारें। ज्ञानासि करी॥ १७१॥

मोघाशा मोघकर्माणो मोघज्ञाना विचेतसः॥
राक्षसीमासुरीं चैव प्रकृतिं मोहिनीं श्रिताः॥ ९.१२॥

यालागीं जन्मलेचि ते मोघ। जैसे वार्षियेवीण मेघ।
कां मृगजळाचे तरंग। दुरूनीचि पाहावे॥ १७२॥

अथवा कोल्हेरीचे असिवार। ना तरी वोडंबरीचे अळंकार।
कीं गंधर्वनगरीचे आवार। आभासती कां॥ १७३॥

सांवरी वाढिन्नल्या सरळा। वरी फळ नाहीं आंतु पोकळा।
कां स्तन जाले गळां। शेळिये जैसे॥ १७४॥

तैसें मूर्खांचें तयां जियालें। आणि धिक् कर्म तयांचे निपजलें।
जैसें सांवरीं फळ आलें। घेपे ना दीजे॥ १७५॥

मग जें कांहीं ते पढिन्नले। तें मर्कटें नारळ तोडिले।
कां आंधळ्या हातीं पडिलें। मोतीं जैसें॥ १७६॥

किंबहुना तयांचीं शास्त्रें। जैशीं कुमारीहातीं दिधलीं शस्त्रें।
कां अशौच्या मंत्रें। बीजें कथिलीं॥ १७७॥

तैसें ज्ञानजात तया। आणि जें कांहीं आचरलें गा धनंजया।
तें आघवेंचि गेलें वायां। जे चित्तहीन॥ १७८॥

पैं तमोगुणाची राक्षसी। जे सद्बुद्धीतें ग्रासी।
विवेकाचा ठावोचि पुसी। निशाचरी जे॥ १७९॥

तिये प्रकृति वरपडे जाले। म्हणऊनि चिंतेचेनि कपाटें गेले।
वरि तामसीयेचिये पडिले। मुखामाजीं॥ १८०॥

जेथ आशेचिये लाळे। आंतु हिंसा जीभ लोळे।
तेवींचि संतोषाचे चाकळे। अखंड चघळी॥ १८१॥

जे अनर्थाचे कानवेरी। आवाळुवें चाटीत निघे बाहेरी।
जे प्रमादपर्वतींची दरी। सदाचि मातली॥ १८२॥

जेथ द्वेषाचिया दाढा। खसखसां ज्ञानाचा करिती रगडा।
जे त्वगस्ती गवसणी मूढां। स्थूळबुद्धी॥ १८३॥

ऐसें आसुरिये प्रकृतीचें तोंडीं। जे जाले गा भूतोंडीं।
ते बुडोनि गेले कुंडीं। व्यामोहाचां॥ १८४॥

एवं तमाचिये पडिले गर्ते। न पविजतीचि विचाराचेनि हातें।
हें असो ते गेले जेथें। ते शुद्धीचि नाहीं॥ १८५॥

म्हणोनि असोतु इयें वायाणीं। कायसीं मूर्खंचीं बोलणीं।
वायां वाढवितां वाणी। शिणेल हन॥ १८६॥

ऐसें बोलिलें देवें। तेथ जी जी म्हणितले पांडवें।
आइके जेथ वाचा विसवे। ते साधुकथा॥ १८७॥

महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिमाश्रिताः॥
भजन्त्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम्॥ ९.१३॥

तरी जयांचिये चोखटे मानसीं। मी होऊनि असें क्षेत्रसंन्यासी।
जयां निजेलियातें उपासी। वैराग्य गा॥ १८८॥

जयांचिया आस्थेचिया सद्भावा। आंतु धर्मु करी राणिवा।
जयांचे मन ओलावा। विवेकासी॥ १८९॥

जे ज्ञानगंगे नाहाले। पूर्णता जेऊनि धाले।
जे शांतीसि आले। पल्लव नवे॥ १९०॥

जे परिणामा निघाले कोंभ। जे धैर्यमंडपाचे स्तंभ।
जे आनंदसमुद्रीं कुंभ। चुबकळोनि भरिले॥ १९१॥

जयां भक्तीची येतुली प्राप्ती। जे कैवल्यातें परौतें सर म्हणती।

जयांचिये लीलेमाजीं नीति। जियाली दिसे॥ १९२॥

जे आघवांचि करणीं। लेइलें शांतीचीं लेणीं।
जयांचें चित्त गवसणी। व्यापका मज॥ १९३॥

ऐसें जे महानुभाव। जे दैविये प्रकृतीचें दैव।
जे जाणोनियां सर्व। स्वरूप माझें॥ १९४॥

मग वाढतेनि प्रेमें। मातें भजती जे महात्मे।
परी दुजेपण मनोधर्में। शिवतलें नाहीं॥ १९५॥

ऐसे मीच होऊन पांडवा। करिती माझी सेवा।
परी नवलावो तो सांगावा। असे आइक॥ १९६॥

सततं कीर्तयन्तो मां यतन्तश्च दृढव्रताः॥
नमस्यन्तश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते॥ ९.१४॥

तरी कीर्तनाचेनि नटनाचें। नाशिले व्यवसाय प्रायश्चितांचे।
जे नामचि नाहीं पापाचे। ऐसें केलें॥ १९७॥

यमदमा अवकळा आणिली। तीर्थें ठायावरूनि उठविलीं।
यमलोकींची खुंटिली। राहाटी आघवी॥ १९८॥

यमु म्हणे काय यमावें। दमु म्हणे कवणातें दमावें।
तीर्थें म्हणती काय खावें। दोष औषधासि नाहीं॥ १९९॥

ऐसें माझेनि नामघोषें। नाहीं करिती विश्वाचीं दुःखें।
अवघें जगचि महासुखें। दुमदुमित भरलें॥ २००॥

ते पाहांटेवीण पाहावित। अमृतेंवीण जीववीत।
योगेंवीण दावित। कैवल्य डोळां॥ २०१॥

परी राया रंका पाड धरूं। नेणती सानेया थोरां कडसणी करूं।
एकसरें आनंदाचें आवारु। होत जगा॥ २०२॥

कहीं एखादेनि वैकुंठा जावें। तें तिहीं वैकुंठचि केलें आघवें।
ऐसें नामघोषगौरवें। धवळलें विश्व ॥ २०३॥

तेजें सूर्य तैसे सोज्वळ। परी तोहि अस्तवे हें किडाळ।
चंद्र संपूर्ण एखादे वेळ। हे सदा पुरते॥ २०४॥

मेघ उदार परी वोसरे। म्हणऊनि उपमेसी न पुरे।
हे निःशंकपणे सपांखरे। पंचानन॥ २०५॥

जयांचे वाचेपुढां भोजें। नाम नाचत असे माझें।
जें जन्मसहस्रीं वोळगिजे। एक वेळ मुखासि यावया॥ २०६॥

तो मी वैकुंठीं नसें। एक वेळ भानुबिंबींही न दिसे।
वरी योगियांचींही मानसें। उमरडोनी जाय॥ २०७॥

परी तयांपाशीं पांडवा। मी हारपला गिंवसावा।
जेथ नामघोषु बरवा। करिती ते माझे॥ २०८॥

कैसे माझ्यां गुणीं धाले। देशकाळातें विसरले।
कीर्तनसुखें झाले। आपणपांची॥ २०९॥

कृष्ण विष्णु हरि गोविंद। या नामाचे निखिल प्रबंध।
माजी आत्मचर्चा विशद। उदंड गाती॥ २१०॥

हें बहु असो यापरी। कीर्तित मातें अवधारीं।
एक विचरती चराचरीं। पांडुकुमरा॥ २११॥

मग आणिक ते अर्जुना। साविया बहुवा जतना।
पंचप्राणा मना। पाढाऊ घेऊनी॥ २१२॥

बाहेरी यमनियमांची कांटी लाविली। आंतु वज्रासनाची पौळी पन्नासिली।
वरी प्राणायामांची मांडिलीं। वाहाती यंत्रें॥ २१३॥

तेथ उल्हाटशक्तीचेनि उजिवडें। मनपवनाचेनि सुरवाडें।
सतरावियेचे पाणियाडें। बळियाविले॥ २१४॥

तेव्हां प्रत्याहारें ख्याति केली। विकारांची संपिली बोहलीं।
इंद्रियें बांधोनि आणिलीं। हृदयाआंतु॥ २१५॥

तंव धारणावारू दाटिले। महाभूतांतें एकवटिलें।
मग चतुरंग सैन्य निवटिलें। संकल्पाचें॥ २१६॥

तयावरी जैत रे जैत। म्हणोनि ध्यानाचें निशाण वाजत।
दिसे तन्मयाचें झळकत। एकछत्र॥ २१७॥

पाठीं समाधिश्रियेचा अशेखा। आत्मानुभवराज्यसुखा।
पट्टाभिषेकु देखां। समरसें जाहला॥ २१८॥

ऐसें हें गहन। अर्जुना माझें भजन।
आतां ऐकें सांगेन। जे करिती एक॥ २१९॥

तरी दोन्हीं पालववेरी। जैसा एक तंतू अंबरीं।
तैसा मीवांचूनि चराचरीं। जाणती ना॥ २२०॥

आदि ब्रह्मा करूनी। शेवटी मशक धरूनी।
माजी समस्त हें जाणोनी। स्वरूप माझें॥ २२१॥

मग वाड धाकुटें न म्हणती। सजीव निर्जीव नेणती।
देखिलिये वस्तू उजू लुंटिती। मीचि म्हणोनि॥ २२२॥

आपुलें उत्तमत्व नाठवे। पुढील योग्यायोग्य नेणवे।
एकसरें व्यक्तिमात्राचेनि नांवें। नमूंचि आवडे॥ २२३॥

जैसें उंची उदक पडिलें। तें तळवटवरी ये उगेलें।
तैसें नमिजे भूतजात देखिलें। ऐसा स्वभावोचि तयांचा॥ २२४॥

कां फळलिया तरूची शाखा। सहजें भूमीसी उतरे देखा।
तैसें जीवमात्रां अशेखां। खालावती ते॥ २२५॥

अखंड अगर्वता होऊनि असती। तयांतें विनयो हेचि संपत्ती।
जे जयजयमंत्रें अर्पिती। माझ्यांचि ठायीं॥ २२६॥

नमितां मानाभिमान गळाले। म्हणोनि अवचितें ते मीचि जाहले।
ऐसे निरंतर मिसळले। उपासिती॥ २२७॥

अर्जुना हे गुरुवी भक्ती। सांगितली तुजप्रती।
आतां ज्ञानयज्ञें यजिती। ते भक्त आइकें॥ २२८॥

परी भजन करिती हातवटी। तूं जाणत आहासि किरीटी।
जे मागां इया गोष्टी। केलिया आम्हीं॥ २२९॥

तंव आथि जी अर्जुन म्हणे। तें दैविकिया प्रसादाचें करणें।
तरी काय अमृताचें आरोगणें। पुरे म्हणवेल॥ २३०॥

या बोला श्रीअनंतें। लागटा देखिलें तयातें।
कीं सुखावलेनि चित्तें। डोलतु असे॥ २३१॥

म्हणे भलें केलें पार्था। एऱ्हवीं हा अनवसरु सर्वथा।
परी बोलवीतसे आस्था। तुझी मातें॥ २३२॥

तंव अर्जुन म्हणे कायी। चकोरेंवीण चांदणेंचि नाहीं।
जग निवविजे हा तयाच्यां ठायीं। स्वभावो कीं जी॥ २३३॥

येरें चकोरें तियें आपुलिये चाडे। चांचू करिती चंद्राकडे।
तेवीं आम्ही विनवूं तें थोकडें। देवो कृपासिंधु॥ २३४॥

जी मेघ आपुलिये प्रौढी। जगाची आर्ती दवडी।
वांचूनि चातकाची ताहान केवढी। तो वर्षावो पाहुनी॥ २३५॥

परी चुळा एकाचिया चाडे। जेवीं गंगेतेंचि ठाकावें पडे।
तेवीं आर्त बहु कां थोडे। तरी सांगावें देवा॥ २३६॥

तेथें देवें म्हणितलें राहें। जो संतोषु आम्हां जाहला आहे।
तयावरी स्तुति साहे। ऐसें उरलें नाहीं॥ २३७॥

पें परिसतु आहासि निकियापरी। तेंचि वक्तृत्वा वऱ्हाडी करी।
ऐसें पुरस्करोनि श्रीहरी। आदरिलें बोलों॥ २३८॥

ज्ञानयज्ञेन चाप्यन्ये यजन्तो मामुपासते॥
एकत्वेन पृथक्त्वेन बहुधा विश्वतोमुखम॥ ९.१५॥

तरी ज्ञानयज्ञ तो एवंरूपु। तेथ आदि संकल्पु हा यूपु।
महाभूतें मंडपु। भेदु तो पशु॥ २३९॥

मग पांचांचे जे विशेष गुण। अथवा इंद्रियें आणि प्राण।
हेचि यज्ञोपचारभरण। अज्ञान घृत॥ २४०॥

तेथ मनबुद्धीचिया कुंडा। आंतु ज्ञानाग्नि धडफुडा।
साम्य तेचि सुहाडा। वेदिका जाणें॥ २४१॥

सविवेकमतिपाटव। तेचि मंत्रविद्यागौरव।
शांति स्रुक्स्रुव। जीव यज्वा॥ २४२॥

तो प्रतीतीचेनि पात्रें। विवेकमहामंत्रें।
ज्ञानाग्निहोत्रें। भेदु नाशी॥ २४३॥

तेथ अज्ञान सरोनि जाये। आणि यजिता यजन हें ठाये।
आत्मसमरसीं न्हाये। अवभृथीं जेव्हां॥ २४४॥

तेव्हां भूतें विषय करणें। हें वेगळालें कांहीं न म्हणे।
आघवें एकचि ऐसें जाणे। आत्मबुद्धि॥ २४५॥

जैसा चेइला तो अर्जुना। म्हणे स्वप्नींची हे विचित्र सेना।
मीचि जाहालों होतों ना। निद्रावशें॥ २४६॥

आतां सेना ते सेना नव्हे। हें मीच एक आघवें।
ऐसें एकत्वें मानवे। विश्व तया॥ २४७॥

मग तो जीवु हे भाष सरे। आब्रह्म पर्मात्मबोधें भरे।
ऐसें भजती ज्ञानाध्वरें। एकत्वें येणें॥ २४८॥

अथवा अनादि हें अनेक। जें आनासारिखें एका एक।
आणि नामरूपादिक। तेंही विषम॥ २४९॥

म्हणोनि विश्व भिन्न भिन्न। परी न भेदे तयांचें ज्ञान।
जैसें अवयव तरी आन आन। परी एकेचि देहींचे॥ २५०॥

कां शाखा सानिया थोरा। परी आहाति एकाचिये तरुवरा।
बहु रश्मि परी दिनकरा। एकाचे जेवीं॥ २५१॥

तेविं नानाविधा व्यक्ती। आनानें नामें आनानी वृत्ती।
ऐसें जाणती भेदलां भूतीं। अभेदा मातें॥ २५२॥

येणें वेगळालेपणें पांडवा। करिती ज्ञानयज्ञुबरवा।
जे न भेदती जाणिवा। जाणते म्हणउनि॥ २५३॥

ना तरी जेधवां जिये ठायीं। देखती कां जें जें कांहीं।
तें मीवांचूनि नाहीं। ऐसाचि बोधु॥ २५४॥

पाहें पां बुडबुडां जेउता जाये। तेउतें जळचि एक तया आहे।
मग विरे अथवा राहे। तऱ्ही जळाचिमाजि॥ २५५॥

कां पवनें परमाणु उचलले। ते पृथ्वीपणावेगळे नाहीं गेले।
आणि माघौतें जरी पडले। तरी पृथ्वीचिवरी॥ २५६॥

तैसें भलतेथ भलतेणें भावें। भलतेंही न हो अथवा होआवें।
परी तें मी ऐसें आघवें। होऊनि ठेलें॥ २५७॥

अगा हें जेव्हडी माझी व्याप्ति। तेव्हडीचि तयांचि प्रतीति।
ऐसें बहुधाकारीं वर्तती। बहूचि होउनि॥ २५८॥

हें भानुबिंब आवडेतया। सन्मुख जैसें धनंजया।
तैसे ते विश्वा या। समोर सदा॥ २५९॥

अगा तयांचिया ज्ञाना। पाठी पोट नाहीं अर्जुना।
वायु जैसा गगना। सर्वांगीं असे॥ २६०॥

तैसा मी जेतुला आघवा। तेंचि तुक तयांचिया सद्भावा।
तरी न करितां पांडवा। भजन जाहलें॥ २६१॥

एऱ्हवीं तरी सकळ मीचि आहें। तरी कवणीं कें उपासिला नोहें।
एथ एकें जाणणेवीण ठाये। अप्राप्तासी॥ २६२॥

परी तें असो येणें उचितें। ज्ञानयज्ञें यजितसांते।
उपासिती मातें। ते सांगितले॥ २६३॥

अखंड सकळ हें सकळां मुखीं। सहज अर्पत असे मज एकीं।
नेणणे या साठीं मूर्खीं। न पविजेचि मातें॥ २६४॥

अहं क्रतुरहं यज्ञः स्वधाहमहमौषधम्॥
मन्त्रोऽहमहमेवाज्यम् अहमग्निरहं हुतम्॥ ९.१६॥

तोचि जाणिवेचा उदयो जरी होये। तरी मुदल वेदु मीचि आहें।
आणि तो विधानातें जया विये। तो क्रतुही मीचि॥ २६५॥

मग तया कर्मापासूनि बरवा। जो सांगोपांगु आघवा।
यज्ञु प्रगटे पांडवा। तोही मी गा॥ २६६॥

स्वाहा मी स्वधा। सोमादि औषधी विविधा।
आज्य मी समिधा। मंत्रु मी हवि॥ २६७॥

होता मी हवन कीजे। तेथ अग्नि तो स्वरूप माझें।
आणिक हुतक जें जें। तेंही मीचि॥ २६८॥

पिताऽहमस्य जगतो माता धाता पितामहः॥
वेद्यं पवित्रमोंकार ऋक् साम यजुरेव च॥ ९.१७॥

पैं जयाचेनि अंगसंगें। इये प्रकृतीस्तव अष्टांगे।
जन्म पाविजत असे जगें। तो पिता मी गा॥ २६९॥

अर्धनारीनटेश्वरीं। जो तोचि पुरुष नारी।
तेविं मी चराचरीं। माताही होय॥ २७०॥

आणि जाहालें जग जेथ राहे। जेणें जीवित वाढत आहे।
तें मीचि वाचूनि नोहे। आन निरुतें॥ २७१॥

इयें प्रकृतिपुरुषें दोन्ही। उपजलीं जयाचिया अमनमनीं।
तो पितामह त्रिभुवनीं। विश्वाचा मी॥ २७२॥

आणि आघवेयां जाणणेयांचिया वाटा। जया गांवा येती गा सुभटा।
जें वेदांचिया चोहटां। वेद्य जें म्हणिजे॥ २७३॥

जेथ नानामतां बुझावणी जाहली। एकमेकां शास्त्रांची अनोळखी फिटली।
चुकलीं ज्ञानें जेथ मिळों आलीं। जें पवित्र म्हणिजे॥ २७४॥

पैं ब्रह्मबीजा जाहला अंकुरु। घोषध्वनीनादाकारु।
तयांचें गा भुवन जो ॐकारु। तोही मी गा॥ २७५॥

जया ॐकाराचिये कुशी। अक्षरें होती ॐकारेंसी।
जियें उपजत वेदेंसीं। उठलीं तिन्हीं॥ २७६॥

म्हणोनि ऋग् यजुः सामु। हे तिन्ही म्हणे मी आत्मरामु।
एवं मीचि कुलक्रमु। शब्दब्रह्माचा॥ २७७॥

गतिर्भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणां सुहृत्॥
प्रभवः प्रलयः स्थानं निधानं बीजमव्ययम्॥ ९.१८॥

हें चराचर आघवें। जिये प्रकृती आंत सांठवे।
ते शिणली जेथ विसवे। ते परमगती मी॥ २७८॥

आणि जयाचेनि प्रकृति जिये। जेणें अधिष्ठिली विश्व विये।
जो घेऊनि प्रकृती इये। गुणातें भोगी॥ २७९॥

तो विश्वश्रियेचा भर्ता। मीचि गा एथ पंडुसुता।
मी गोसावी समस्ता। त्रैलोक्याचा॥ २८०॥

आकाशें सर्वत्र वसावें। वायूनें नावभरी उगें नसावें।
पावकें दहावें। वर्षावें जळें॥ २८१॥

पर्वतीं बैसका न संडावी। समुद्रीं रेखा नोलांडावी।
पृथ्वीया भूतें वाहावीं। हे आज्ञा माझी॥ २८२॥

म्यां बोलाविल्या वेदु बोले। म्यां चालविल्या सूर्यु चाले।
म्यां हालविल्या प्राणु हाले। जो जगातें चाळिता॥ २८३॥

मियांचि नियमिलासांता। काळु ग्रासितसे भूतां।
इयें म्हणियागतें पंडुसुता। सकळें जयाचीं॥ २८४॥

ऐसा जो समर्थु। तो मी जगाचा नाथु।
आणि गगना ऐसा साक्षिभूतु। तोहि मीचि॥ २८५॥

इहीं नामरूपीं आघवा। जो भरला असे पांडवा।
आणि नामरूपांचाहि वोल्हावा। आपणचि जो॥ २८६॥

जैसे जळाचे कल्लोळ। आणि कल्लोळीं आथी जळ।
ऐसेनि वसवीतसे सकळ। तो निवासु मी॥ २८७॥

जो मज होय अनन्य शरण। त्याचें निवारीं मी जन्म मरण।
यालागीं शरणागता शरण्य। मीचि एकु॥ २८८॥

मीचि एक अनेकपणें। वेगळालेनि प्रकृतिगुणें।
जीत जगाचेनि प्राणें। वर्तत असे॥ २८९॥

जैसा समुद्र थिल्लर न म्हणतां। भलतेथ बिंब सविता।
तैसा ब्रह्मादि सर्वां भूतां। सुहृद तो मी॥ २९०॥

मीचि गा पांडवा। या त्रिभुवनासि वोलावा।
सृष्टिक्षयप्रभावा। मूळ तें मी॥ २९१॥

बीज शाखातें प्रसवे। मग तें रुखेपण बीजीं सामावे।
तैसें संकल्पें होय आघवें। पाठीं संकल्पीं मिळे॥ २९२॥

ऐसें जगाचें बीज जो संकल्पु। अव्यक्त वासनारूपु।
तया कल्पांतीं जेथ निक्षेपु। होय तें मी॥ २९३॥

इयें नामरूपें लोटती। वर्णव्यक्ती आटती।
जातींचे भेद फिटती। जैं आकार नाहीं॥ २९४॥

तैं संकल्पु वासनासंस्कार। माघौतें रचावया आकार।
जेथ राहोनि असती अमर। तें निधान मी॥ २९५॥

तपाम्यहमहं वर्षं निगृह्णाम्युत्सृजामि च॥
अमृतं चैव मृत्युश्च सदसच्चाहमर्जुन॥ ९.१९ ॥

मी सूर्याचेनि वेषें। तपें तै हें शोषे।
पाठीं इंद्र होऊनि वर्षें। तैं पुढती भरे॥ २९६॥

अग्नि काष्टें खाये। तें काष्ठचि अग्नि होये।
तैसें मरतें मारितें पाहें। स्वरूप माझें॥ २९७॥

यालागीं मृत्यूच्यां भागीं जें जें। तेंही पैं रूप माझें।
आणि न मरतें तंव सहजें। अविनाशु मी॥ २९८॥

आतां बहु बोलोनि सांगावें। तें एकेंहेळा घे पां आघवें।
तरी सतासतही जाणावे। मीचि पैं गा॥ २९९॥

म्हणोनि अर्जुना मी नसें। ऐसा कवणु ठाव असे।
परी प्राणियांचें दैव कैसें। जे न देखती मातें॥ ३००॥

तरंग पाणियेंविण सुकती। रश्मि वातीवीण न देखती।
तैसे मीचि ते मी नव्हती। विस्मो देखें॥ ३०१॥

हें आंतबाहेर मियां कोंदलें। जग निखिल माझेंचि वोतिलें।
कीं कैसें कर्म तयां ओढवलें। जे मीचि नाहीं म्हणती॥ ३०२॥

परी अमृतकुहां पडिजे। कां आपणपयातें कडिये काढिजे।
ऐसें अर्थी काय कीजे। अप्राप्तासी॥ ३०३॥

ग्रासा एका अन्नासाठीं। अंधु धांवताहे किरीटी।
आडळला चिंतामणि पायें लोटी। आंधळेपणें॥ ३०४॥

तैसें ज्ञान जैं सांडूनि जाये। तैं ऐसी हे दशा आहे।
म्हणोनि कीजे तें केलें नोहे। ज्ञानेंविण॥ ३०५॥

आंधळेया गरुडाचें पांख आहाती। ते कवणा उपेगा जाती।
तैसे सत्कर्माचे उपखे ठाती। ज्ञानेंवीण॥ ३०६॥

त्रैविद्या मां सोमपाः पूतपापा
यज्ञैरिष्ट्वा स्वर्गतिं प्रार्थयन्ते॥
ते पुण्यमासाद्य सुरेन्द्रलोकम्
अश्नन्ति दिव्यान् दिवि देवभोगान्॥ ९.२०॥

देख पां गा किरीटी। आश्रमधर्माचिया राहाटी।
विधिमार्गा कसवटी। जे आपणचि होती॥ ३०७॥

यजन करितां कौतुकें। तिहीं वेदांचा माथा तुके।
क्रिया फळेंसि उभी ठाके। पुढां जयां॥ ३०८॥

ऐसे दीक्षित जे सोमप। जे आपणचि यज्ञाचें स्वरूप।
तिहीं तया पुण्याचेनि नांवें पाप। जोडिलें देखें॥ ३०९॥

जे श्रुतित्रयातें जाणोनि। शतवरी यज्ञ करूनि।
यजिलिया मातें चुकोनि। स्वर्गु वरिती॥ ३१०॥

जैसें कल्पतरुतळवटीं। बैसोनि झोळिये पाडी गांठी।
मग निदैव निघे किरीटी। दैन्यचि करूं॥ ३११॥

तैसें शतक्रतु यजिलें मातें। कीं ईप्सिताति स्वर्गसुखांतें।
आतां पुण्य कीं हें निरुतें। पाप नोहे॥ ३१२॥

म्हणोनि मजवीण पाविजे स्वर्गु। तो अज्ञानाचा पुण्यमार्गु।
ज्ञानिये तयातें उपसर्गु। हानि म्हणती॥ ३१३॥

एऱ्हवीं तरी नरकींचें दुःख। पावोनि स्वर्गा नाम कीं सुख।
वांचूनि नित्यानंद गा निर्दोष। तें स्वरूप माझें॥ ३१४॥

मज येता पैं सुभटा। या द्विविधा गा आव्हांटा।
स्वर्गु नरकु या वाटा। चोरांचिया॥ ३१५॥

स्वर्गा पुण्यात्मकें पापें येइजे। पापात्मकें पापें नरका जाइजे।
मग मातें जेणें पाविजे। तें शुद्ध पुण्य॥ ३१६॥

आणि मजचिमाजीं असतां। जेणें मी दूऱ्हावें पांडुसुता।
तें पुण्य ऐसें म्हणतां। जीभ न तुटे काई॥ ३१७॥

परी हें असो आतां प्रस्तुत। ऐकें यापरी ते दीक्षित।
यजुनि मातें याचित। स्वर्गभोगु॥ ३१८॥

मग मी न पविजे ऐसें। जें पापरूप पुण्य असे।
तेणें लाधलेनि सौरसें। स्वर्गा येती॥ ३१९॥

जेथ अमरत्व हेंचि सिंहासन। ऐरावतासारिखे वाहन।
राजधानीभुवन। अमरावती॥ ३२०॥

जेथ महासिद्धीचीं भांडारें। अमृताची कोठारें।
जियें गांवीं खिल्लारें। कामधेनूंची॥ ३२१॥

जेथ वोळगे देव पाइका। सैंध चिंतामणीचिया भूमिका।
विनोदवनवाटिका। सुरतरूंचिया॥ ३२२॥

गंधर्व गात गाणीं। जेथ रंभेऐशिया नाचणी।
उर्वशी मुख्य विलासिनी। अंतौरिया॥ ३२३॥

मदन वोळगे शेजारें। जेथ चंद्र शिंपे सांवरें।
पवना ऐसें म्हणियारें। धावणें जेथ॥ ३२४॥

पैं बृहस्पति मुख्य आपण। ऐसे स्वस्तीश्रियेचे ब्राह्मण।
ताटियेचे सुरगण। बहुवस जेथें॥ ३२५॥

लोकपाळरांगेचे। राउत जिये पदींचे।
उच्चैःश्रवा खांचे। खोलणिये॥ ३२६॥

हें बहु असो जे ऐसे। भोग इंद्रसुखासरिसे।
ते भोगिजती जंव असे। पुण्यलेशु॥ ३२७॥

ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं
क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति॥
एवं त्रयीधर्ममनुप्रपन्ना
गतागतं कामकामा लभन्ते॥ ९.२१॥

मग तया पुण्याची पाउटी सरे। सवेंचि इंद्रपणाची उटी उतरे।
आणी येऊं लागती माघारें। मृत्युलोका॥ ३२८॥

जैसा वेश्याभोगीं कवडा वेंचे। मग दारही चेपूं न ये तियेचें।
तैसें लाजिरवाणें दीक्षितांचें। काय सांगों॥ ३२९॥

एवं थितिया मातें चुकले। जिहीं पुण्यें स्वर्ग कामिले।
तया अमरपण तें वावों जालें। आतां मृत्युलोकु॥ ३३०॥

मातेचिया उदरकुहरीं। पचूनि विष्ठेच्यां दाथरी।
उकडूनि नवमासवरी। जन्मजन्मोनि मरती॥ ३३१॥

अगा स्वप्नीं निधान फावे। परी चेइलिया हारपे आघवें।
तैसें स्वर्गसुख जाणावें। वेदज्ञाचें॥ ३३२॥

अर्जुना वेदवेदु जऱ्ही जाहला। तरी मातें नेणतां वायां गेला।
कणु सांडुनि उपणिला। कोंडा जैसा॥ ३३३॥

म्हणऊनि मज एकेंविण। हे त्रयीधर्म अकारण।
आतां मातें जाणोनि कांहीं नेण। तूं सुखिया होसी॥ ३३४॥

अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते॥
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम्॥ ९.२२॥

पैं सर्वभावेंसी उखितें। जे वोपिले मज चित्तें।
जैसा गर्भगोळु उद्यमातें। कोण्याही नेणे॥ ३३५॥

तैसा मीवाचूनि कांहीं। आणिक गोमटेंचि नाहीं।
मजचि नाम पाहीं। जिणेया ठेविलें॥ ३३६॥

ऐसे अनन्यगतिकें चित्तें। चिंतितसांते मातें।
जे उपासिती तयातें। मीचि सेवीं॥ ३३७॥

ते एकवटूनि जिये क्षणीं। अनुसरले गा माझिये वाहणी।
तेव्हांचि तयांची चिंतवणी। मजचि पडली॥ ३३८॥

मग तिहीं जें जें करावें। तें मजचि पडिलें आघवें।
जैशी अजातपक्षांचेनि जीवें। पक्षिणी जिये॥ ३३९॥

आपुली तहानभूक नेणे। तान्हया निकें तें माउलीसीचि करणें।
तैसे अनुसरले जे मज प्राणें। तयांचे करण्या न लजें मी॥ ३४०॥

तया माझिया सायुज्याची चाड। तरि तेंचि पुरवीं कोड।
कां सेवा म्हणती तरी आड। प्रेम सुयें॥ ३४१॥

ऐसा मनीं जो जो धरिती भावो। तो तो पुढां पुढां लागें तयां देवों।
आणि दिधलियाचा निर्वाहो। तोही मीचि करीं॥ ३४२॥

हा योगक्षेमु आघवा। तयांचा मजचि पडिला पांडवा।
जयांचिया सर्वभावां। आश्रयो मी॥ ३४३॥

येऽप्यन्यदेवताभक्ता यजन्ते श्रद्धयान्विताः॥
तेऽपि मामेव कौन्तेय यजन्त्यविधिपूर्वकम्॥ ९.२३॥

आतां आणिकही संप्रदायें। परी मातें नेणती समवायें।
जे अग्निस्इंद्रस्सूर्यस्सोमाये। म्हणऊनि यजिती॥ ३४४॥

तेंही कीर मातेंचि होये। कां जे हें आघवें मीचि आहें।
परी ते भजती उजरी नव्हे। विषम पडे॥ ३४५॥

पाहें पां शाखा पल्लव वृक्षाचे। हे काय नव्हती एकचि बीजाचे।
परी पाणी घेणें मुळाचें। तें मुळींचि घापे॥ ३४६॥

कां दहाही इंद्रियें आहाती। इयें जरी एकेचि देहींचीं होती।
आणि इहीं सेविले विषयो जाती। एकाचि ठाया॥ ३४७॥

तरि करोनि रससोय बरवी। कानीं केविं भरावी।
फुलें आणोनि बांधावीं। डोळां केविं॥ ३४८॥

तेथ रसु तो मुखेंचि सेवावा। परिमळु तो घ्राणेंचि घ्यावा।
तैसा मी तो यजावा। मीचि म्हणोनि॥ ३४९॥

येर मातें नेणोनि भजन। तें वायांचि गा आनेंआन।
म्हणोनि कर्माचे डोळे ज्ञान। तें निर्दोष होआवें॥ ३५०॥

अहं हि सर्वयज्ञानां भोक्ता च प्रभुरेव च॥
न तु मामभिजानन्ति तत्त्वेनातश्च्यवन्ति ते॥ ९.२४॥

एऱ्हवीं पाहें पां पंडुसुता। या यज्ञोपहारां समस्तां।
मीवांचूनि भोक्ता। कवणु आहे॥ ३५१॥

मी सकळां यज्ञांचा आदि। आणि यजना यया मीचि अवधि।
कीं मातें चुकोनि दुर्बुद्धि। देवां भजले॥ ३५२॥

गंगेचे उदक गंगे जैसें। अर्पिजे देवपितरोद्देशें।
माझें मज देती तैसें। परी आनानीं भावीं॥ ३५३॥

म्हणऊनि ते पार्था। मातें न पवतीचि सर्वथा।
मग मनीं वाहिली जे आस्था। तेथ आले॥ ३५४॥

यान्ति देवव्रता देवान्
पितृन् यान्ति पितृव्रताः॥
भूतानि यान्ति भूतेज्या
यान्ति मद्याजिनोऽपि माम्॥ ९.२५॥

मनें वाचा करणीं। जयांचीं भजनें देवांचिया वाहणी।
ते शरीर जातियेक्षणीं। देवचि जाले॥ ३५५॥

अथवा पितरांचीं व्रतें। वाहती जयांचीं चित्तें।
जीवित सरलिया तयांतें। पितृत्व वरी॥ ३५६॥

कां क्षुद्रदेवतादि भूतें। तियेचि जयांचीं परमदैवतें।
जिहीं अभिचारिकीं तयातें। उपासिलें॥ ३५७॥

तयां देहाची जवनिका फिटली। आणि भूतत्वाची प्राप्ति जाहली।
एवं संकल्पवशें फळलीं। कर्मे तयां॥ ३५८॥

मग मीचि डोळां देखिला। जिहीं कानीं मीचि ऐकिला।
मनीं मी भाविला। वानिला वाचा॥ ३५९॥

सर्वांगीं सर्वांठायीं। मीचि नमस्कारिला जिहीं।
दानपुण्यादिकें जें कांहीं। तें माझियाचि मोहरा॥ ३६०॥

जिहीं मातेंचि अध्ययन केलें। जे आंतबाहेरि मियांचि धाले।
जयांचें जीवित्व जोडलें। मजचिलागीं॥ ३६१॥

जे अहंकारु वाहत आंगीं। आम्ही हरीचे भूषावयालागीं।
जे लोभिये एकचि जगीं। माझेनि लोभें॥ ३६२॥

जे माझेनि कामें सकाम। जे माझेनि प्रेमें सप्रेम।
जे माझिया भुली सभ्रम। नेणती लोक॥ ३६३॥

जयांचीं जाणती मजचि शास्त्रें। मी जोडें जयांचेनि मंत्रें।
ऐसे जे चेष्टामात्रें। भजले मज॥ ३६४॥

ते मरणा ऐलीचकडे। मज मिळोनि गेले फुडे।
मग मरणीं आणिकीकडे। जातील केविं॥ ३६५॥

म्हणोनि मद्याजि जे जाहले। ते माझिया सायुज्या आले।
जिहीं उपचारमिषें दिधलें। आपणपें मज॥ ३६६॥

पैं अर्जुना माझ्यां ठायीं। आपणपेनवीण सौरसु नाहीं।
मी उपचारीं कवणाही। नाकळें गा॥ ३६७॥

एथ जाणीव करी तोचि नेणे। आथिलेपण मिरवी तेंचि उणें।
आम्ही जाहलों ऐसें जो म्हणे। तो कांहींचि नव्हे॥ ३६८॥

अथवा यज्ञदानादि किरीटी। कां तपें हन जे हुटहुटी।
ते तृणा एकासाठीं। न सरे एथ॥ ३६९॥

पाहें पां जाणिवेचेनि बळें। कोण्ही वेदापासूनि असे आगळे।
कीं शेषाहूनि तोंडागळें। बोलकें आथी॥ ३७०॥

तोही आंथरुणातळवटी दडे। येरु नेति नेति म्हाणोनि बहुडे।
एथ सनकादिक वेडे। पिसे जाहले॥ ३७१॥

करितां तापसांची कडसणी। कवणु जवळां थेविजैल शूळपाणी।
तोही अभिमानु सांडूनि पायवणी। माथां वाहे॥ ३७२॥

ना तरी आथिलेपणें सरिसी। कवणी आहे लक्ष्मिये ऐसी।
श्रियेसारिखिया दासी। घरीं जियेतें॥ ३७३॥

तियां खेळतां करिती घरकुलीं। तयां नामें अमरपुरें जरी ठेविलीं।
तरि न होती काय बाहुलीं। इंद्रादिक तयांचीं॥ ३७४॥

तियां नावडोनि जेव्हां मोडती। तेव्हां महेंद्राचे रंक होती।
तियां झाडां येउते जयां पाहती। ते कल्पवृक्ष॥ ३७५॥

ऐसें जियेचियां जवळिकां । सामर्थ्य घरींचियां पाइकां।
ते लक्ष्मी मुख्यनायका। न मनेचि एथ॥ ३७६॥

मग सर्वस्वें करूनि सेवा। अभिमान सांडूनि पांडवा।
ते पाय धुवावयाचिया दैवा। पात्र जाहाली॥ ३७७॥

म्हणोनि थोरपण पऱ्हांचि सांडिजे। व्युत्पत्ति आघवी विसरिजे।
जैं जगा धाकुटें होइजे। तैं जवळीक माझी॥ ३७८॥

अगा सहस्रकिरणाचिये दिठी। पुढां चंद्रही लोपे किरीटी।
तेथ खद्योत गा हुटहुटी। आपुलेनि तेजें॥ ३७९॥

तैसें लक्ष्मियेचें थोरपण न सरे। जेथ शंभूचेंही तप न पुरे।
तेथ येर प्राकृत हेंदरें। केविं जाणों लाहे॥ ३८०॥

यालागीं शरीरसांडोवा कीजे। सकळ गुणांचें लोण उतरिजे।
संपत्तिमदु सांडिजे। कुरवंडी करूनि॥ ३८१॥

पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति॥
तदहं भक्त्युपहृतम् अश्नामि प्रयतात्मनः॥ ९.२६॥

मग निःसीमभावउल्हासें। मज अर्पावयाचेनि मिसें।
फळ आवडे तैसे। भलतयाचें हो॥ ३८२॥

भक्तु माझियाकडे दावी। आणि मा दोन्हीं हात वोडवी।
मग देंठु न फेडितां सेवीं। आदरेंसीं॥ ३८३॥

पैं गा भक्तीचेनि नांवें। फूल एक मज द्यावें।
तें लेखें तरी म्यां तुरंबावें। परी मुखींचि घालीं॥ ३८४॥

हें असो कायसीं फुलें। पानचि एक आवडे तें जाहलें।
तें साजुकही न हो सुकलें। भलतैसें॥ ३८५॥

परी सर्वभावें भरलें देखें। आणि भुकेला अमृतें तोखे।
तैसें पत्रचि परी तेणें सुखें। आरोगूं लागें॥ ३८६॥

अथवा ऐसेंही एक घडे। जे पालाही परी न जोडे।
तरि उदकाचें तंव सांकडें। नव्हेल कीं॥ ३८७॥

तें भलतेथ निमोलें। न जोडितां आहे जोडलें।
तेंचि सर्वस्व करूनि अर्पिलें। जेणें मज॥ ३८८॥

तेणें वैकुंठांपासोनि विशाळें। मजलागीं केली राउळें।
कौस्तुभाहूनि निर्मळें। लेणीं दिधलीं॥ ३८९॥

दुधाचीं शेजारें। क्षीराब्धी ऐसीं मनोहरे।
मजलागीं अपारें। सृजिलीं तेणें॥ ३९०॥

कर्पूर चंदन अगरु। ऐसेया सुगंधाचा महामेरु।
मज हातीं लाविला दिनकरु। दीपमाळे॥ ३९१॥

गरुडासारिखी वाहनें। मज सुरतरूंचीं उद्यानें।
कामधेनूंचीं गोधनें। अर्पिलीं तेणें॥ ३९२॥

मज अमृताहूनि सुरसें। बोनीं वोगरिलीं बहुवसें।
ऐसा भक्ताचेनि उदकलेशें। परितोषें गा॥ ३९३॥

हें सांगावें काय किरीटी। तुवांचि देखिलें आपुलिया दिठी।
मी सुदामयाचिया सोडीं गाठीं। पव्हयालागीं॥ ३९४॥

पैं भक्ति एकी मी जाणें। तेथ सानें थोर न म्हणें।
आम्ही भावाचे पाहुणे। भलतेया॥ ३९५ ॥

येर पत्र पुष्प फळ। तें भजावया मिस केवळ।
वांचूनि आमुच्या लागी निष्कळ। भक्तितत्त्व॥ ३९६ ॥

म्हणोनि अर्जुना अवधारीं। तूं बुद्धि एकी सोपारी करीं।
तरी सहजें आपुल्यां मनोमंदिरीं। न विसंबें मातें॥ ३९७ ॥

यत् करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत्॥
यत् तपस्यसि कौन्तेय तत् कुरुष्व मदर्पणम॥ ९.२७ ॥

जे जे कांहीं व्यापार करिसी। कां भोग हन भोगिसी।
अथवा यज्ञीं यजसी। नानाविधीं॥ ३९८ ॥

ना तरी पात्रविशेषीं दानें। कां सेवकां देसी जीवनें।
तपादि हन साधनें। व्रतें करिसी॥ ३९९ ॥

तें क्रियाजात आघवें। जें जैसें निपजेल स्वभावें।
तें भावना करोनि करावें। माझिया मोहरा॥ ४०० ॥

परी सर्वथा आपुल्यां जीवीं। केलियाची शंका कांहींचि नुरवीं।
ऐसीं धुवोनि कर्में द्यावीं। माझ्यां हातीं॥ ४०१ ॥

शुभाशुभफलैरेवं मोक्ष्यसे कर्मबन्धनैः॥
संन्यासयोगयुक्तात्मा विमुक्तो मामुपैष्यसि॥ ९.२८ ॥

मग अग्निकुंडीं बीजें घातलीं। तियें अंकुरदशे जेवीं मुकलीं।
तेवीं न फळतीचि मज अर्पिलीं। शुभाशुभें॥ ४०२ ॥

अगा कर्में जैं उरावें। तैं तिहीं सुखदुःखीं फळावें।
आणि तयातें भोगावया यावें। देहा एका॥ ४०३ ॥

ते उगाणिलें मज कर्म। तेव्हांचि पुसिलें मरण जन्म।
जन्मासवें श्रम। वरचिलही गेले॥ ४०४ ॥

म्हणऊनि अर्जुना यापरी। पाहेचा वेळु नव्हेल भारी।
हे संन्यासयुक्ति सोपारी। दिधली तुज॥ ४०५ ॥

या देहाचिया बांदोडी न पडिजे। सुखदुःखाच्यां सागरीं न बुडिजे।
सुखें सुखरूपा घडिजे। माझियाचि अंगा॥ ४०६ ॥

समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः॥
ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम्॥ ९.२९ ॥

तो मी पुससी कैसा। तरि जो सर्वभूतीं सदा सरिसा।
जेथ आपपरु ऐसा। भागु नाहीं॥ ४०७ ॥

जे ऐसिया मातें जाणोनि। अहंकाराचा कुरुठा मोडोनि।
जे जीवें कर्में करूनि। भजती मातें॥ ४०८ ॥

ते वर्तत दिसती देहीं। परी ते देहीं ना माझ्यां ठायीं।
आणि मी तयांच्यां हृदयीं। समग्र असे॥ ४०९ ॥

सविस्तर वटत्व जैसें। बीजकणिकेमाजीं असे।
आणि बीजकणु वसे। वटीं जेवीं॥ ४१० ॥

तेवीं आम्हां तयां परस्परें। बाहेरी नामाचींचि अंतरें।
वांचूनि आंतुवट वस्तुविचारें। मी तेचि ते॥ ४११ ॥

आतां जायांचें लेणें। जैसें आंगावरी आहाचवाणें।
तैसें देह धरणें। उदास तयाचें॥ ४१२ ॥

परिमळु निघालिया पवनापाठीं। मागें वोस फूल राहे देठीं।
तैसें आयुष्याचिये मुठी। केवळ देह॥ ४१३ ॥

येर अवष्टंभु जो आघवा। तो आरूढोनि मद्भावा।
मजचि आंतु पांडवा। पैठा जाहला॥ ४१४ ॥

अपि चेत सुदुराचारो भजते मामनन्यभाक्॥
साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः॥ ९.३० ॥

ऐसे भजतेनि प्रेमभावें। जया शरीरही पाठीं न पवे।
तेणें भलतया व्हावें। जातीचिया॥ ४१५ ॥

आणि आचरण पाहतां सुभटा। तो दुष्कृताचा कीर सेल वांटा।
परी जीवित वेचिलें चोहटां। भक्तीचिया कीं॥ ४१६ ॥

अगा अंतीचिया मती। साचपण पुढिले गती।
म्हणोनि जीवित जेणें भक्ती। दिधलें शेखीं॥ ४१७ ॥

तो आधीं जरी अनाचारी। तरी सर्वोत्तमुचि अवधारीं।
जैसा बुडाला महापूरीं। न मरतु निघाला॥ ४१८ ॥

तयाचें जीवित ऐलथडिये आलें। म्हणोनि बुडालेपण जेवीं वायां गेलें।
तेवीं नुरेचि पाप केलें। शेवटलिये भक्ती॥ ४१९ ॥

यालागीं दुष्कृती जऱ्ही जाहला। तरि अनुतापतीर्थीं न्हाला।
न्हाऊनि मज आंतु आला। सर्वभावें॥ ४२० ॥

तरी आतां पवित्र तयाचेंचि कुळ। अभिजात्य तेंचि निर्मळ।
जन्मलेया फळ। तयासीच जोडिलें॥ ४२१ ॥

तो सकळही पढिन्नला। तपें तोचि तपिन्नला।
अष्टांग अभ्यासिला। योगु तेणें॥ ४२२ ॥

हें असो बहुत पार्था। तो उतरला कर्में सर्वथा।
जयाची अखंड आस्था। मजचिलागीं॥ ४२३ ॥

अवघिया मनोबुद्धीचिया राहटी। भरोनि एकनिष्ठेचिया पेटी।
जेणें मजमाजीं किरीटी। निक्षेपिली॥ ४२४ ॥

क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छान्तिं निगच्छति॥
कौन्तेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति॥ ९.३१ ॥

तो आतां अवसरें मजसारिखा होईल। ऐसाही भाव तुज जाईल।
हां गा अमृताअंत राहील। तया मरण कैचें॥ ४२५ ॥

पैं सूर्य जो वेळु नुदैजे। तया वेळा कीं रात्रि म्हणिजे।
तेवीं माझिये भक्तीविण जें कीजे। तें महापाप नोहे॥ ४२६ ॥

म्हणोनि तयाचिया चित्ता। माझी जवळिक पांडुसुता।
तेव्हांचि तो तत्त्वता। स्वरूप माझें॥ ४२७ ॥

जैसा दीपें दीपु लाविजे। तेथ आदील कोण हें नोळखिजे।
तैसा सर्वस्वें जो मज भजे। तो मी होऊनि ठाके॥ ४२८ ॥

मग माझी नित्य शांती। तया दशा तेचि कांती।
किंबहुना जिती। माझेनि जीवें॥ ४२९ ॥

एथ पार्था पुढतपुढती। तेंचि तें सांगों किती।
जरी मियां चाड तरी भक्ती। न विसंबिजे गा॥ ४३० ॥

अगा कुळाचिया चोखटपणा नलगा। आभिजात्य झणीं श्लाघा।
व्युत्पत्तीचा वाउगा। सोसु कां वाहावा॥ ४३१ ॥

कां रूपें वयसा माजा। आथिलेपणें कां गाजा।
एक भाव नाहीं माझा। तरी पाल्हाळ तें॥ ४३२ ॥

कणेंविण सोपटें। कणसें लागलीं घनदाटें।
काय करावें गोमटें। वोस नगर॥ ४३३ ॥

ना तरी सरोवर आटलें। रानीं दुःखिया दुःखी भेटलें।
कां वांझ फुलीं फुललें। झाड जैसें॥ ४३४ ॥

तैसें सकळ तें वैभव। अथवा कुळजाति गौरव।
जैसें शरीर आहे सावेव। परी जीवचि नाहीं॥ ४३५ ॥

तैसेण माझिये भक्तीविण। जळो तें जियालेपण।
अगा पृथ्वीवरी पाषाण। नसती काई॥ ४३६ ॥

पैं हिवराची दाट साउली। सज्जनीं जैसी वाळिली।
तैसीं पुण्यें डावलूनि गेली। अभक्तातें॥ ४३७ ॥

निंब निंबोळियां मोडोनि आला। तरी तो काउळियांसीचि सुकाळु जाहला।
तैसा भक्तिहीनु वाढिन्नला। दोषांचिलागीं॥ ४३८ ॥

कां षड्रस खापरीं वाढिले। वाढूनि चोहटां रात्रीं सांडिले।
ते सुणियांचेचि उपेगा आले। जियापरी॥ ४३९ ॥

तैसें भक्तिहीनाचें जिणें। जो स्वप्नींहि परी सुकृत नेणे।
संसारदुःखासि आवंतणें। वोगरिले गा॥ ४४० ॥

म्हणोनि कुळ उत्तम नोहावें। जाती अंत्याहि व्हावें।
वरी देहाचेनि नांवें। पशूचेंहि लाभो॥ ४४१ ॥

पाहें पां सावजें हातिरूं धरिलें। तेणें तया काकुळती मातें स्मरिलें।
कीं तयाचें पशुत्व वावो जाहलें। पावलिया मातें॥ ४४२ ॥

मां हि पार्थ व्यपाश्रित्य
येऽपि स्युः पापयोनयः॥
स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्
तेऽपि यान्ति परां गतिम्॥ ९.३२॥

अगा नांवें घेतां वोखटीं। जे आघवेया अधमांचिये शेवटीं।
तिये पापयोनीही किरीटी। जन्मले जे॥ ४४३॥

ते पापयोनि मूढ। मूर्ख ऐसे जे दगड।
परी माझ्यां ठायीं दृढ। सर्वभावें॥ ४४४॥

जयांचिये वाचे माझे आलाप। दृष्टि भोगी माझेंचि रूप।
जयांचें मन संकल्प। माझाचि वाहे॥ ४४५॥

माझिया कीर्तीविण। जयांचे रिते नाहीं श्रवण।
जयां सर्वांगीं भूषण। माझी सेवा॥ ४४६॥

जयांचे ज्ञान विषो नेणे। जाणीव मज एकातेंचि जाणे।
जया ऐसें लाभे तरी जिणें। एऱ्हवीं मरण॥ ४४७॥

ऐसा आघवाचि परी पांडवा। जिहीं आपुलिया सर्वभावा।
जियावयालागीं वोलावा। मीचि केला॥ ४४८॥

ते पापयोनीही होतु कां। ते श्रुताधीतही न होतु कां।
परी मजसी तुकितां तुका। तुटी नाहीं॥ ४४९॥

पाहें पां भक्तीचेनि आथिलेपणें। दैत्यीं देवां आणिलें उणें।
माझें नृसिंहत्व लेणें। जयाचिये महिमे॥ ४५०॥

तो प्रल्हादु गा मजसाठीं। घेतां बहुतें सदा किरीटी।
कां जें मियां द्यावें ते गोष्टी। तयाचिया जोडे॥ ४५१॥

एऱ्हवीं दैत्यकुळ साचोकारें। परी इंद्रही सरी न लाहे उपरें।
म्हणोनि भक्ति गा एथ सरे। जाति अप्रमाण॥ ४५२॥

राजाज्ञेचीं अक्षरें आहाती। तियें चामा एका जया पडती।
तया चामासाठीं जोडती। सकळ वस्तु॥ ४५३॥

वांचूनि सोनें रुपें प्रमाण नोहे। एथ राजाज्ञाचि समर्थ आहे।
तेचि चाम एक जैं लाहे। तेणें विकती आघवीं॥ ४५४॥

तैसें उत्तमत्व तैंचि तरे। तैंचि सर्वज्ञता सरे।
जैं मनोबुद्धि भरे। माझेनि प्रेमें॥ ४५५॥

म्हणोनि कुळ जाति वर्ण। हें आघवेंचि गा अकारण।
एथ अर्जुना माझेपण। सार्थक एक॥ ४५६॥

तेंचि भलतेणें भावें। मन मज आंतु येतें होआवें।
आलें तरी आघवें। मागील वावो॥ ४५७॥

जैसें तंवचि वहाळ वोहळ। जंव न पवती गंगाजळ।
मग होऊनि ठाकती केवळ। गंगारूप॥ ४५८॥

कां खैर चंदन काष्ठें। हे विवंचना तंवचि घटे।
जंव न घापती एकवटें। अग्नीमाजीं॥ ४५९॥

तैसे क्षत्री वैश्य स्त्रिया। कां शूद्र अंत्यादि इया।
जाती तंवचि वेगळालिया। जंव न पवती मातें॥ ४६०॥

मग जातीं व्यक्ती पडे बिंदुलें। जेव्हां भावें होती मज मीनले।
जैसे लवणकण घातले। सागरामाजीं॥ ४६१॥

तंववरी नदानदींचीं नांवें। तंवचि पूर्वपश्चिमेचे यावे।
जंव न येती आघवे। समुद्रामाजीं॥ ४६२॥

हेंचि कवणें एकें मिसें। चित्त माझ्यां ठायीं प्रवेशे।
येतुलें हो मग आपैसें। मीचि होणें असे॥ ४६३॥

अगा वरी फोडावयाचि लागीं। लोहो मिळो कां परिसाचें आंगीं।
कां जे मिळतिये प्रसंगीं। सोनेंचि होईल॥ ४६४॥

पाहें पां वालभाचेनि व्याजें। तिया व्रजांगनाचीं निजें।
मज मीनलिया काय माझें। स्वरूप नव्हतीचि॥ ४६५॥

ना तरी भयाचेनि मिसें। मातें न पविजेचि काय कंसें।
कीं अखंड वैरवशें। चैद्यादिकीं॥ ४६६॥

अगा सोयरेपणेंचि पांडवा। माझें सायुज्य यादवां।
कीं ममत्वें वसुदेवा। दिकां सकळां॥ ४६७॥

नारदा ध्रुवा अक्रूरा। शुका हन सनत्कुमारा।
इयां भक्ती मी धनुर्धरा। प्राप्यु जैसा॥ ४६८॥

तैसाचि गोपीसि कामें। तया कंसा भयसंभ्रमें।
येरां घातकें मनोधर्में। शिशुपालादिकां॥ ४६९॥

अगा मी एकुलाणीचें खागें। मज येवों ये भलतेनि मार्गें।
भक्ती कां विषयें विरागें। अथवा वैरें॥ ४७०॥

म्हणोनि पार्था पाहीं। प्रवेशावया माझ्यां ठायीं।
उपायांची नाहीं। उणीव एथ॥ ४७१॥

आणि भलतिया जाती जन्मावें। मग भजिजे कां विरोधावें।
परी भक्ता कां वैरिया व्हावें। माझियाचि॥ ४७२॥

अगा कवणें एकें बोलें। माझेपण जऱ्ही जाहालें।
तरी मी होणें आलें। हाता निरुतें॥ ४७३॥

यापरी पापयोनीही अर्जुना। कां वैश्य शूद्र अंगना।
मातें भजतां सदना। माझिया येती॥ ४७४॥

किं पुनर्ब्राह्मणाः पुण्या भक्ता राजर्षयस्तथा॥
अनित्यमसुखं लोकम् इमं प्राप्य भजस्व मां॥ ९.३३॥

मग वर्णामाजीं छत्रचामर। स्वर्ग जयांचें अग्रहार।
मंत्रविद्येसि माहेर। ब्राह्मण जे॥ ४७५॥

जेथ अखंड वसिजे यागीं। जे वेदांची वज्रांगी।
जयाचिये दिठीचियां उत्संगीं। मंगळ वाढे॥ ४७६॥

जे पृथ्वीतळींचे देव। जे तपोवतार सावयव।
सकळ तीर्थांसि दैव। उदयलें जे॥ ४७७॥

जयांचिये आस्थेचिये वोले। सत्कर्म पाल्हाळीं गेलें।
संकल्पें सत्य जियालें। जयांचेनि॥ ४७८॥

जयांचेनि गा बोलें। अग्नीसि आयुष्य जाहालें।
म्हणोनि समुद्रें पाणी आपुलें। दिधलें यांचिया प्रीती॥ ४७९॥

मियां लक्ष्मी डावलोनि केली परौती। फेडोनि कौस्तुभ घेतला हातीं।
मग वोढविली वक्षस्थळाची वाखती। चरणरजां॥ ४८०॥

अजूनि पाउलाची मुद्रा। मी हृदयीं वाहें गा सुभद्रा।
जे आपुलिया दैवसमुद्रा। जतनेलागीं॥ ४८१॥

जयांचा कोप सुभटा। काळाग्निरुद्राचा वसौटा।
जयांच्यांप्रसादीं फुकटा। जोडती सिद्धी॥ ४८२॥

ऐसे पुण्यपूज्य जे ब्राह्मण। आणि माझ्यां ठायीं अतिनिपुण।
आतां मातें पावती हें कवण। समर्थणें॥ ४८३॥

पाहें पां चंदनाचेनि अंगानिळें। शिवतिले निंब होते जे जवळे।
तिहीं निर्जीवींही देवांचीं निडळें। बैसणीं केली॥ ४८४॥

मग तो चंदनु तेथ न पवे। ऐसें मनीं कैसेनि धरावें।
अथवा पातला हें समर्थावें। तेव्हां कायि साच॥ ४८५॥

जेथ निववील ऐसिया आशा। हरें चंद्रमा आधा ऐसा।
वाहिजत असे शिरसा। निरंतर॥ ४८६॥

तेथ निवविता आणि सगळा। परिमळें चंद्राहूनि आगळा।
तो चंदनु केविं अवलीळा। सर्वांगीं न बैसे॥ ४८७॥

कां रथ्योदकें जियेचिये कासे। लागलिया समुद्र जालीं अनायासें।
तिये गंगेसि काय अनारिसें। गत्यंतर असे॥ ४८८॥

म्हणोनि राजर्षि कां ब्राह्मण। जयां गति मति मीचि शरण।
तया त्रिशुद्धी मीचि निर्वाण। स्थितिही मीचि॥ ४८९॥

यालागीं शतजर्जरे नावे। रिगोनि केविं निश्चिंत होआवें।
कैसेनि उघडिया असावें। शस्त्रवर्षीं॥ ४९०॥

अंगावरी पडतां पाषाण। न सुवावें केविं वोडण।
रोगें दाटलिया आणि उदासपण। वोखदेंसीं॥ ४९१॥

जेथ चहूंकडे जळत वणवा। तेथूनि न निगिजे केविं पांडवा।
तेविं लोकां येउनिया सोपद्रवां। केविं न भजिजे मातें॥ ४९२॥

अगा मातें न भजावयालागीं। कवण बळ पां आपुलियां आंगीं।
काइ घरीं कीं भोगीं। निश्चिंती केली॥ ४९३॥

ना तरी विद्या कीं वसया। ययां प्राणियांसि हा ऐसा।
मज न भजतां भरंवसा। सुखाचा कोण॥ ४९४॥

तरी भोग्यजात जेतुलें। तें एका देहाचिया निकिया लागलें।
आणि येथ देह तंव असे पडिलें। काळाचियां तोंडीं॥ ४९५॥

बाप दुःखाचें केणें सुटलें। जेथ मरणाचे भरे लोटले।
तिये मृत्युलोकींचिये शेवटिले। येणें जाहालें हाटवेळे॥ ४९६॥

आतां सुखेंसि जीविता। कैंची ग्राहिकी कीजेल पांडुसुता।
काय राखोंडी फुंकितां। दीपु लागे॥ ४९७॥

अगा विषाचे कांदे वाटुनी। जो रस घेइजे पिळुनी।
तया नाम अमृत ठेउनी। जैसे अमर होणें॥ ४९८॥

तेविं विषयांचें जें सुख। तें केवळ परम दुःख।
परी काय कीजे मूर्ख। न सेवितां न सरे॥ ४९९॥

कां शीस खांडुनि आपुलें। पायींच्यां खतीं बांधिलें।
तैसें मृत्युलोकींचें भलें। आहे आघवें॥ ५००॥

म्हणोनि मृत्युलोकीं सुखाची कहाणी। ऐकिजेल कवणाचियां श्रवणीं।
कैंची सुखनिद्रा आंथरुणीं। इंगळांचां॥ ५०१॥

जिये लोकींचा चंद्र क्षयरोगी। जेथ उदयो होय अस्तालागीं।
दुःख लेऊनि सुखाची आंगी। सळित जगातें॥ ५०२॥

जेथें मंगळाचियां अंकुरीं। सवेंचि अमंगळाची पडे पोरी।
मृत्यु उदराच्यां परिवरीं। गर्भु गिंवसी॥ ५०३॥

जें नाहीं तयांतें चिंतवी। तंव तेंचि नेईजे गंधर्वीं।
गेलियाची कवणे गांवीं। शुद्धी न लभे॥ ५०४॥

अगा गिंवसितां आघवियां वाटीं। परतलें पाउलचि नाहीं किरीटी।
सैंध निमालियांचिया गोष्टी। तियें पुराणें जेथिंची॥ ५०५॥

जेथींचिये अनित्यतेची थोरी। करितया ब्रह्मयाचें आयुष्यवेरी।
कैसें नाहीं होणें अवधारीं। निपटूनियां॥ ५०६॥

ऐसी लोकींची जिये नांदणुक। तेथ जन्मले आथि जे लोक।
तयांचिये निश्चिंतीचें कौतुक। दिसत असे॥ ५०७॥

पैं दृष्टादृष्टींचिये जोडी। लागीं भांडवल न सुटे कवडी।
जेथ सर्वस्वें हानि तेथ कोडी। वेंचिती गा॥ ५०८॥

जो बहुवें विषायविलासें गुंफे। तो म्हणती उवायें पडिला सापें।
जो अभिलाषभारें दडपे। तयातें सज्ञान म्हणती॥ ५०९॥

जयाचें आयुष्य धाकुटें होय। बळ प्रज्ञा जिरोनि जाय।
तयाचे नमस्कारिती पाय। वडिल म्हणोनि॥ ५१०॥

जंव जंव बाळ बळिया वाढे। तंव तंव भोजें नाचती कोडें।
आयुष्य निमालें आंतुलियेकडे। ते ग्लानीचि नाहीं॥ ५११॥

जन्मलिया दिवसदिवसें। हों लागे काळाचियाचि ऐसें।
कीं वाढती करिती उल्हासें। उभविती गुढिया॥ ५१२॥

अगा मर हा बोलु न साहती। आणि मेलिया तरी रडती।
परी असतें जात न गणिती। गहिंसपणें॥ ५१३॥

दर्दुर सापें गिळिजतु आहे उभा। कीं तो मासिया वेटाळी जिभा।
तैसे प्राणिये कवणा लोभा। वाढविती तृष्णा॥ ५१४॥

अहा कटकटा हें वोखटें। इये मृत्युलोकींचें उफराटें।
एथ अर्जुना जरी अवचटें। जन्मलासी तूं॥ ५१५॥

तरि झडझडोनि वहिला निघ। इये भक्तीचिये वाटे लाग।
जिया पावसी अव्यंग। निजधाम माझें॥ ५१६॥

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु॥
मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः॥ ९.३४॥

तूं मन हें मीचि करीं। माझियां भजनीं प्रेम धरीं।
सर्वत्र नमस्कारीं। मज एकातें॥ ५१७॥

माझेनि अनुसंधानें देख। संकल्पु जाळणें निःशेख।
मद्याजी चोख। याचि नांव॥ ५१८॥

ऐसा मियां आथिला होसी। तेथ माझियाचि स्वरूपा पावसी।
हें अंतःकरणींचें तुजपासीं। बोलिजत असे॥ ५१९॥

अगा अवघिया चोरिया आपुलें। जें सर्वस्व आम्हीं असे ठेविलें।
तें पावोनि सुख संचलें। होऊनि ठासी॥ ५२०॥

ऐसें सांवळेनि परब्रह्में। भक्तकामकल्पद्रुमें।
बोलिलें श्रीआत्मारामें। संजयो म्हणे॥ ५२१॥

अहो ऐकिजत असे कीं अवधारा। तंव इया बोला निवांत म्हातारा।
जैसा म्हैसा नुठी कां पुरा। तैसा उगाचि असे॥ ५२२॥

तेथ संजयें माथा तुकिला। अहो अमृताचा पाऊस वर्षला।
कीं हा एथ असतुचि गेला। सेजिया गांवा॥ ५२३॥

तऱ्ही दातारु हा आमुचा। म्हणोनि हें बोलतां मैळेल वाचा।
काइ झालें ययाचा। स्वभावोचि ऐसा॥ ५२४॥

परी बाप भाग्य माझें। जे वृत्तांतु सांगावयाचेनि व्याजें।
कैसा रक्षिलों मुनिराजें। श्रीव्यासदेवें॥ ५२५॥

येतुलें हें वाडें सायासें। जंव बोलत असे दृढें मानसें।
तंव न धरवेचि आपुलिया ऐसें। सात्त्विकें केलें॥ ५२६॥

चित्त चाकाटलें आटु धेत। वाचा पांगुळली जेथिंची तेथ।
आपादकंचुकित। रोमांच आले॥ ५२७॥

अर्धोन्मीलित डोळे। वर्षताति आनंदजळें।
आंतुलिया सुखोर्मीचेनि बळें। बाहेरि कांपे॥ ५२८॥

पैं आघवांचि रोममूळीं। आली स्वेदकणिका निर्मळी।
लेइला मोतियांचीं कडियाळीं। आवडे तैसा॥ ५२९॥

ऐसा महासुखाचेनि अतिरसें। जेथ आटणी होईल जीवदशे।
तेथे निरोविलें व्यासें। तें नेदीच हों॥ ५३०॥

आणि श्रीकृष्णार्जुनाचें बोलणें। घों करी आलें श्रवणें।
कीं देहस्मृतीचा तेणें। वापसा केला॥ ५३१॥

तेव्हां नेत्रींचे जळ विसर्जी। सर्वांगींचा स्वेदु परिमार्जी।
तेवींच अवधान म्हणे हो जी। धृतराष्ट्रातें॥ ५३२॥

आतां श्रीकृष्णवाक्यबीजा निवाडु। आणि संजय सात्त्विकाचा बिवडु।
म्हणोनि श्रोतया होईल सुरवाडु। प्रमेयपिकाचा॥ ५३३॥

अहो अळुमाळ अवधान देयावें। येतुलेनि आनंदाचिया राशीवरी बैसावें।
बाप श्रवणेंद्रिया दैवें। घातली माळ॥ ५३४॥

म्हणोनि विभूतींचा जो ठावो। अर्जुना दावील सिद्धांचा रावो।
तो ऐका म्हणे ज्ञानदेवो। निवृत्तीचा॥ ५३५॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु
ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
राजविद्या राजगुह्यो नाम नवमोऽध्यायः॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां
भावार्थदीपिकायां नवमोऽध्यायः ॥ ९॥
श्लोक ३४ ओव्या ५३५।

# 10 The Opulence of the Absolute विभूतियोग

श्रीमद्भगवद्गीता दशमोऽध्यायः
ज्ञानेश्वरी अध्याय दहावा

---

नमो विशदबोधविदग्धा। विद्यारविंदप्रबोधा।
पराप्रमेयप्रमदा। विलासिया॥ १॥

नमो संसारतमसूर्या। अप्रतिमपरमवीर्या।
तरुणतरतूर्या। लालनलीला॥ २॥

नमो जगदखिलपालना। मंगळमणिनिधाना।
स्वजनवनचंदना। आराध्यलिंगा॥ ३॥

नमो चित्तचकोरचन्द्रा। आत्मानुभवनरेंद्रा।
श्रुतिगुणसमुद्रा। मन्मथमन्मथा॥ ४॥

नमो सुभावभजनभाजना। भवेभकुम्भभंजना।
विश्वोद्भवभुवना। श्रीगुरुराया॥ ५॥

तुमचा अनुग्रहो गणेशु। जैं दे आपुला सौरसु।
तैं सारस्वतीं प्रवेशु। बाळकाही आथी॥ ६॥

जी दैविकी उदार वाचा। जैं उद्देशु दे नाभिकाराचा।
तैं नवरससुधाब्धीचा। थावो लाभे॥ ७॥

जी आपुलिया स्नेहाची वागेश्वरी। जरी मुकेयातें अंगीकारी।
तो वाचस्पतीशीं करी। प्रबंधुहोडा॥ ८॥

हें असो दिठी जयावरी झळके। कीं हा पद्मकरु माथां पारुखे।
तो जीवचि परी तुके। महेशेंसी॥ ९॥

एवढें जिये महिमेचें करणें। ते वाचाळपणें वानूं मीं कवणें।
का सूर्याचिया आंगा उटणें। लागत असे॥ १०॥

केउता कल्पतरूवरी फुलौरा। कायसेनि पाहुणेरु क्षीरसागरा।
ऐसा कवणें वासीं कापुरा। सुवासु देवों॥ ११॥

चंदनातें कायसेनि चर्चावें। अमृतातें केउतें रांधावें।
गगनावरी उभवावें। घडे केवीं॥ १२॥

तैसें श्रीगुरुचें महिमान। आकळितें कें असे साधन।
हें जाणोनि मियां नमन। निवांत केलें॥ १३॥

जरी प्रज्ञेचेनि आथिलेपणें। श्रीगुरु सामर्थ्य रूप करूं म्हणें।
तरी तें मोतियांसी भिंग देणें। तैसें होईल॥ १४॥

कां साडेपंधरया रजतवणी। तैशीं स्तुतीचीं बोलणीं।
उगियाचि माथां ठेविजे चरणीं। हेंचि भलें॥ १५॥

मग म्हणितलें जी स्वामी। भलेनि ममत्वें देखिलें तुम्हीं।
म्हणोनि श्रीकृष्णार्जुनसंगमीं। प्रयागवटु जाहलो॥ १६॥

मागा दूध दे म्हणतलियासाठीं। आघवियाचि क्षीराब्धीची करूनि वाटी।
उपमन्यूपुढें धूर्जती। ठेविली जैसी॥ १७॥

ना तरी वैकुंठपीठनायकें। रुसला ध्रुव कवतिकें।
बुझाविला देऊनि भातुके। धृवपदाचें॥ १८॥

तैसी जे ब्रह्मविद्यारावो। सकळ शास्त्रांचा विसंबता ठावो।
ते भगवद्गीता वोविये गावों। ऐसें केलें॥ १९॥

जे बोलणियाचें रानीं हिंडतां। नायकिजे फळलिया अक्षरांची वार्ता।
परी ते वाचाचि केली कल्पलता। विवेकाची॥ २०॥

होती देहबुद्धि एकसरी। ते आनंदभांडारा केली वोवरी।
मन गीतार्थसागरीं। जळशयन जालें॥ २१॥

ऐसें एकैक देवांचें करणें। तें अपार बोलों केवीं मी जाणें।
तऱ्ही अनुवादलों धीटपणें। तें उपसाहिजो जी॥ २२॥

आतां आपुलेनि कृपाप्रसादें। मिया भगवद्गीता वोवीप्रबंधें।
पूर्वखंड विनोदें। वाखाणिलें॥ २३॥

प्रथमीं अर्जुनाचा विषादु। दुजीं बोलिला योगु विशदु।
परी सांख्यबुद्धीसि भेदु। दावूनियां॥ २४॥

तिजीं केवळ कर्म प्रतिष्ठिलें। तेंचि चतुर्थी ज्ञानेंशीं प्रगटिलें।
पंचमीं गव्हरिलें। योगतत्त्व॥ २५॥

तेंचि षष्ठामाजी प्रगट। आसनालागोनि स्पष्ट।
जीवात्मभाव एकवट। होती जाण॥ २६॥

तैसीचि जे योगस्थिति। आणि योगभ्रष्टां जे गति।
ते आघवीचि उपपत्ती। षष्ठी सांगितली॥ २७॥

तयावरी सप्तमीं। प्रकृतिपरिहार उपक्रमीं।
भजती जे पुरुषोत्तमीं। ते बोलिले चाऱ्ही॥ २८॥

पाठीं सप्तमींच्या प्रश्नसिद्धी। बोलोनि प्रयाण समयसिद्धी।
एवं ते सकळवाक्यावधि। अष्टमाध्यायीं॥ २९॥

आतां शब्दब्रह्मीं असंख्याके। जेतुला कांहीं अभिप्राय पिके।
तेतुला महाभारतें एकें। लक्षें जोडे॥ ३०॥

आतां अठरा पर्वीं भारतीं। तें लाभे श्रीकृष्णार्जुन वाचनोक्तीं।
आणि जो अभिप्रावो गीते सातें शतीं। तो एकलाचि नवमीं॥ ३१॥

म्हणोनि नवमींचिया अभिप्राया। सहसा मुद्रा लावावया।
बिहाला वेद मी वायां। गर्व कां करूं॥ ३२॥

अहो गूळा साखरे मालेयाचे। हे बांधे तरी एकाचि रसाचे।
परी स्वाद गोडियेचे। आन आन जैसे॥ ३३॥

एक जाणोनियां बोलती। एक ठायेंठायो जाणविती।
एक जाणों जातां हारपती। जाणते गुणेंसीं॥ ३४॥

हे ऐसे अध्याय गीतेचे। परी अनिर्वाच्यपण नवमाचें।
तो अनुवादलों हें तुमचें। सामर्थ्य प्रभो॥ ३५॥

कां एकाचि काठी तपिन्नली। एकीं सृष्टीवरी सृष्टी केली।
एकीं पाषाणीं वाऊनि उतरलीं। समुद्रीं कटकें॥ ३६॥

एकीं आकाशीं सूर्यातें धरिलें। एकीं समुद्रा चुळीं भरिलें।
तैसें मज नेणतयाकरवीं बोलविलें। अनिर्वाच्य तुम्हीं॥ ३७॥

परी हें असो एथे ऐसें। श्रीरामरावण झुंजिन्नले कैसे।
श्रीरामरावण जैसे। मीनले समरीं॥ ३८॥

तैसें नवमीं कृष्णाचें बोलणें। तें नवमीचियाचि ऐसें मी म्हणें।
या निवाडा तत्त्वज्ञु जाणे। जया गीतार्थु हातीं॥ ३९॥

एवं नवही अध्याय पहिले। मियां मतीसारिखे वाखाणिले।
आतां उत्तरखंड उपाइलें। ग्रंथाचें ऐका॥ ४०॥

येथ विभूती प्रतिविभूती। प्रस्तुत अर्जुना सांगिजेती।
ते विदग्धा रसवृत्ती। म्हणिपैल कथा॥ ४१॥

देशियेचेनि नागरपणें। शांतु शृंगारातें जिणे।
तरी ओंविया होती लेणें। साहित्यासी॥ ४२॥

मूळग्रंथीचिया संस्कृता। वरि मऱ्हाटी नीट पढतां।
अभिप्राय मानलिया उचिता। कवण भूमी हें न चोजवे॥ ४३॥

जैसें अंगाचेनि सुंदरपणें। लेणियासि आंगचि होय लेणें।
तेथ अळंकारिलें कवण कवणें। हें निर्वचेना॥ ४४॥

तैसी देशी आणि संस्कृत वाणी। एका भावार्थाचां सुखासनीं।
शोभती आयणी। चोखट आइका॥ ४५॥

उठावलिया भावा रूप। करितां रसवृत्तीचें वडप।
चातुर्य म्हणे पडप। जोडलें आम्हां॥ ४६॥

तैसें देशियेचें लावण्य। हिरोनि रसां आणिलें तारुण्य।
मग रचिलें अगण्य। गीतातत्त्व॥ ४७॥

तैसा चराचरपरमगुरु। चतुरचित्तचमत्कारु।
तो ऐका यादवेश्वरु। बोलता जाहला॥ ४८॥

ज्ञानदेव निवृत्तीचा म्हणे। ऐसें बोलिलें श्रीहरी तेणें।
अर्जुना आघवियाचि मातू अंतःकरणें। धडौता आहासि॥ ४९॥

श्रीभगवानुवाच।
भूय एव महाबाहो शृणु मे परमं वचः।
यत्तेऽहं प्रीयमाणाय वक्ष्यामि हितकाम्यया॥ १०.१

आम्ही मागील जें निरूपण केलें। तें तुझें अवधानचि पाहिलें।
तंव टांचें नव्हे भलें। पुरतें आहे॥ ५०॥

घटीं थोडेसें उदक घालिजे। तेणें न गळे वरिता भरिजे।
तैसा परिसौनि पाहिलासि तंव परिसविजे। ऐसेंचि होतसे॥ ५१॥

अवचितयावरी सर्वस्व सांडिजे। मग चोख तरी तोचि भांडारी कीजे।
तैसा किरिटी तूं आतां माझें। निजधाम कीं॥ ५२॥

तैसें अर्जुना येउतें सर्वेश्वरें। पाहोनि बोलिलें आदरें।
गिरी देखोनि सुभरें। मेघु जैसा॥ ५३॥

तैसा कृपाळुवांचा रावो। म्हणे आइकें गा महाबाहो।
सांगितलाचि अभिप्रावो। सांगेन पुढती॥ ५४॥

प्रतिवर्षीं क्षेत्र पेरिजे। पिके तरी वाहो नुबगिजे।
पिकासी निवाडु देखिजे। अधिकाधिक॥ ५५॥

पुढतपुढती पुटें देतां। जोडे वानियेची अधिकता।
तें सोनें पांडुसुता। शोधूंचि आवडे॥ ५६॥

तैसें एथ पार्था। तुज आभार नाहीं सर्वथा।
आम्ही आपुलियाचि स्वार्था। बोलौनि आहो॥ ५७॥

अगा बाळका लेवविजे लेणें। तयाप्रमाणें तें काय जाणें।
तो सोहळा भोगणें। माउलिये दृष्टी॥ ५८॥

तैसें तुझें हित आघवें। जंव जंव कां तुज फावे।
तंव तंव आमुचें सुख दुणावे। ऐसें असे॥ ५९॥

आतां असो हे विकडी। मज उघड तुझी आवडी।
म्हणोनि तृप्तीची सवडी। बोलतां न पडे॥ ६०॥

आम्हां येतुलियाचि कारणें। तेंचि तें तुजशीं बोलणें।
परी असो हें अंतःकरणें। अवधान देईं॥ ६१॥

ऐकें ऐकें गा सुवर्म। वाक्य माझें परम।
जें अक्षरें लेऊनि परब्रह्म। तुज खेंवासि आलें॥ ६२॥

तरी किरीटी तूं मातें। नेणसी ना निरुतें।
तरी गा जो मी येथें। तें विश्वचि हें॥ ६३॥

न मे विदुः सुरगणाः प्रभवं न महर्षयः।
अहमादिर्हि देवानां महर्षीणां च सर्वशः॥ १०.२॥

एथ वेद मुके जाहाले। मन पवन पांगुळले।
रातीविण मावळले। रवि शशी॥ ६४॥

अगा उदरींचा गर्भु जैसा। नेणें आपुलिये मायेची वयसा।
आघवेया देवांसी मी तैसा। चोजवेना॥ ६५॥

आणि जळचरां उदधीचें मान। मशकां नोलांडवे गगन।
तैसें महर्षींचें ज्ञान। नेणे मातें॥ ६६॥

मी कवण केतुला। कवणाचा कैं जाहला।
निरुती या करितां बोला। युगें गेलीं॥ ६७॥

महर्षी आणि या देवां। येरां भूतजातां सर्वां।
मी आदि म्हणोनि पांडवा। जाणतां अवघड॥ ६८॥

उतरलें उदक पर्वत वळघे। कां वाढतें झाड मुळीं लागे।
तरी मियां जालेनि जगें। जाणिजे मातें॥ ६९॥

कां गाभेवनें वटु गिंवसवे। तरंगीं सागरु सांठवे।
कां परमाणूमाजीं सामावे। भूगोलु हा॥ ७०॥

तरी मियां जालियां जीवां। महर्षी अथवा देवां।
मातें जाणावया होआवा। अवकाशु गा॥ ७१॥

ऐसाही जरी विपायें। सांडुनि पुढील पाये।
सर्वेंद्रियासि होये। पाठिमोरा जो॥ ७२॥

प्रवर्तलाही वेगीं बहुडे। देह सांडुनि मागलीकडे।
महाभूतांचिया चढे। माथयावरी॥ ७३॥

यो मामजमनादिं च वेत्ति लोकमहेश्वरम्।
असंमूढः स मर्त्येषु सर्वपापैः प्रमुच्यते॥ १०.३॥

तैसा राहोनि ठायठिके। स्वप्रकाशे चोखें।
अजत्व माझें देखे। आपुलिये डोळां॥ ७४॥

मी आदीसि परु। सकळ लोकमहेश्वरु।
ऐसिया मातें जो नरु। यापरी जाणे॥ ७५॥

तो पाषाणामाजि परिसु। रसांमाजी सिद्धरसु।
तैसा मनुष्याकृति अंशु। तो माझाचि जाण॥ ७६॥

तो चालतें ज्ञानाचें बिंब। तयाचे अवयव ते सुखाचें कोंभ।
परी माणुसपणाची भांब। लौकिक भागु॥ ७७॥

अगा अवचिता कापुरा। माजीं सांपडला हिरा ।
वरी पडलिया नीरा। न निगे केवीं॥ ७८॥

तैसा मनुष्यलोकाआंतु। तो जरी जाहला प्राकृतु।
तऱ्ही प्रकृतिदोषाची मातु। नेणिजे तेथ॥ ७९॥

तो आपसयेंचि सांडिजे पापीं। जैसा जळत चंदनु सर्पीं।
तैसा मातें जाणे तो संकल्पीं। वर्जूनि घालिजे॥ ८०॥

तेंचि मातें कैसें जाणिजे। ऐसें संकल्पी जरी चित्त तुझें।
तरी मी ऐसा हे माझे। भाव ऐकें॥ ८१॥

जे वेगळालियां भूतीं। सारिखे होऊनि प्रकृती।
विखुरले आहेति त्रिजगतीं। आघवियें॥ ८२॥

बुद्धिर्ज्ञानसंमोहः क्षमा सत्यं दमः शमः।
सुखं दुःखं भवोऽभावो भयं चाभयमेव च॥ १०.४॥
अहिंसा समता तुष्टिस्तपो दानं यशोऽयशः।
भवन्ति भावा भूतानां मत्त एव पृथग्विधाः॥ १०.५॥

ते प्रथम जाण बुद्धि। मग ज्ञान जें निरवधि।
असंमोह सहनसिद्धि। क्षमा सत्य॥ ८३॥

मग शम दम दोन्ही। सुख दुःख वर्तत जनीं।
अर्जुना भावाभाव मानीं। भावाचिमाजीं॥ ८४॥

आतां भय आणि निर्भयता। अहिंसा आणि समता।
हे मम रूपचि पांडुसुता। ओळख तूं॥ ८५॥

दान यश अपकीर्ति। हे जे भाव सर्वत्र वसती।
ते मजचि पासूनि होती। भूतांचियां ठायीं॥ ८६॥

जैसीं भूतें आहातीं सिनानीं। तैसेचि हे वेगळाले मानीं।
एक उपजती माझ्यां ज्ञानीं। एक नेणती मातें॥ ८७॥

अगा प्रकाश आणि कडवसें। हें सूर्याचिस्तव जैसें।
प्रकाश उदयीं दिसे। तम अस्तूसीं॥ ८८॥

आणि माझें जें जाणणें नेणणें। तें तंव भूतांचिया भावांचें करणें।
म्हणोनि भूतीं भावाचियें होणें। विषम पडे॥ ८९॥

यापरीं माझियां भावीं। हें जीवसृष्टि आहे आघवीं।
गुंतली असे जाणावीं। पंडुकुमरा॥ ९०॥

आतां इये सृष्टीचे पालक। जयां आधीन वर्तती लोक।
ते अकरा भाव आणिक। सांगेन तुज॥ ९१॥

महर्षयः सप्त पूर्वे चत्वारो मनवस्तथा।
मद्भावा मानसा जाता येषां लोक इमाः प्रजाः॥ १०.६॥

तरी आघवांचि गुणीं वृद्ध। जे महर्षींमाजि प्रबुद्ध।
कश्यपादि प्रसिद्ध। सप्त ऋषी॥ ९२॥

आणिकही सांगिजतील। जे चौदा आंतील।
स्वयंभू मुख्य मुदल। चारी मनु॥ ९३॥

ऐसे हे अकरा। माझियां मनीं जाहाले धनुर्धरा।
सृष्टीचिया व्यापारा। लागोनिया॥ ९४॥

जैं लोकांची ये व्यवस्था न पडे। जैं या त्रिभुवनाचें काहीं न मांडे।
तैं महाभूतांचें दळवाडें। अचुंबित असे॥ ९५॥

तैंचि जे जाहाले। इहीं लोकपाळ केले।
अध्यक्ष रचुनि ठेविले। इहीं जन॥ ९६॥

म्हणोनि अकरा हे राज। मग येर लोक यांचिया प्रजा।
ऐसा हा विस्तारु माझा। ओळख तूं॥ ९७॥

पाहें पां आरंभीं बीज एकलें। मग तेंचि विरूढलिया बुड जाहलें।
बुडीं कोंभ निघाले। खांदियांचे॥ ९८॥

खांदियांपासूनि अनेका। पसरलिया शाखोपशाखा।
शाखास्तव देखा। पल्लव पानें॥ ९९॥

पल्लवीं फूल फळ। एवं वृक्षत्व जाहालें सकळ।
तें निर्धारितां केवळ। बीजचि ते॥ १००॥

ऐसें मी एकचि पहिलें। मग मी तें मनातें व्यालें।
तेथ सप्त ऋषि जाहाले। आणि चारी मनु॥ १०१॥

इहीं लोकपाळ केले। लोकपाळीं विविध लोक स्रजिले।
लोकांपासूनि निपजले। प्रजाजात॥ १०२॥

ऐसेनि हें विश्व येथें। मीचि प्रसवलोसें निरुतें।
परी भावाचेनि हातें। माने जया॥ १०३॥

एतां विभूतिं योगं च मम यो वेत्ति तत्त्वतः।
सोऽविकम्पेन योगेन युज्यते नात्र संशयः॥ १०.७॥

यालागीं सुभद्रापती। हे भाव इया माझिया विभूति।
आणि यांचिया व्याप्ती। व्यापिलें विश्व॥ १०४॥

म्हणोनि गा यापरि। ब्रह्मादिपिपीलिकावरी।
मीवांचूनि दुसरी। गोष्टचि नाहीं॥ १०५॥

ऐसें जाणे जो साचें। तया चेईरें जाहालें ज्ञानाचें।
म्हणोनि उत्तममध्यम भेदाचें। स्वप्न न देखें॥ १०६॥

मी माझिया विभूती। आणि विभूतीं अधिष्ठिलिया व्यक्ती।
हें आघवें योगप्रतीती। एकचि मानी॥ १०७॥

म्हणोनि निःशंकें येणें महायोगें। मज मीनला मनाचेनि आंगें।
एथ संशय करणें न लगे। तो त्रिशुद्धी जाहला॥ १०८॥

कां जे ऐसें किरीटी। मातें भजे जो अभेदा दिठी।
तयाचिये भजनाचिये नातीं। सूती मज॥ १०९ ॥

म्हणऊनि अभेदें जो भक्तियोगे। तेथ शंका नाहीं न ये खंगु।
करितां ठेला तरी चांगु। तें सांगितलें षष्ठीं॥ ११०॥

तोचि अभेदु कैसा। हें जाणावया मानसा।
साद जाली तरी परियेसा। बोलिजेल॥ १११॥

अहं सर्वस्य प्रभवो मत्तः सर्वं प्रवर्तते।
इति मत्वा भजन्ते मां बुधा भावसमन्विताः॥ १०.८॥

तरी मीचि एक सर्वा। या जगा जन्म पांडवा।
आणि मजपासूनि आघवा। निर्वाहो यांचा॥ ११२॥

कल्लोळमाळा अनेगा। जन्म जळींचि पैं गा।
आणि तयां जळचि आश्रयो तरंगा। जीवनही जळ॥ ११३॥

ऐसें आघवांचि ठायीं। तया जळचि जेविं पाहीं।
तैसा मी वांचूनि नाहीं। विश्वीं इये॥ ११४॥

ऐसिया व्यापकामातें। मानूनि जे भजती भलतेथें।
परी साचोकारें उदितें। प्रेमभावें॥ ११५॥

देश काळ वर्तमान। आघवें करूनि अभिन्न।
जैसा वायु होऊनि गगन। गगनीचि विचरे॥ ११६॥

ऐसिनि जे निजज्ञानीं। खेळत सुखें त्रिभुवनीं।
जगद्रूपा मनीं। सांठवूनि मातें॥ ११७॥

जें जें भेटे भूत। तें तें मानिजे भगवंत।
हा भक्तियोगु निश्चित। जाण माझा॥ ११८॥

मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयन्तः परस्परम्।
कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च॥ १०.९॥

चित्तें मीचि जाहाले। मियेंचि प्राणें धाले।
जीवों मरों विसरले। बोधाचिया भुली॥ ११९॥

मग तया बोधाचेनि माजें। नाचती संवादसुखाचीं भोजें।
आतां एकमेकां घेपे दीजे। बोधचि वरी॥ १२०॥

जैशीं जवळिकेंची सरोवरें। उचंबळलिया कालवती परस्परें।
मग तरंगासि धवळारें। तरंगचि होती १२१॥

तैसी येरयेरांची मिळणी। पडत आनंदकल्लोळांची वेणी।
तेथ बोध बोधाची लेणीं। बोधेंचि मिरवी॥ १२२॥

जैसें सूर्यें सूर्यातें वोवाळिले। कीं चंद्रें चंद्रम्या क्षेम दिधलें।
नातरी सरिसेनि पाडें मीनले। दोनी वोघ॥ १२३॥

तैसे प्रयाग होत सामरस्याचें। वरी वोसाण तरत सात्त्विकाचें।
ते संवाद चतुष्पथींचे। गणेश जाहले॥ १२४॥

तेव्हां तया महासुखाचेनि भरें। धांवोनि देहाचिये गांवाहेरें।
मियां धाले तेणें उद्गारें। लागती गाजों॥ १२५॥

पैं गुरुशिष्यांचियां एकांतीं। जे अक्षरा एकाची वदंती।
ते मेघाचियापरी त्रिजगतीं। गर्जती सैंघ॥ १२६॥

जैसी कमळकळिका जालेपणें। हृदयाचिया मकरंदातें राखों नेणे।
दे राया रंका पारणें। आमोदाचें॥ १२७॥

तैसेनि मातें विश्वीं कथित। कथिचेनि तोषें कथूं विसरत।
मग तया विसरामाजीं विरत। आंगें जीवें॥ १२८॥

ऐसें प्रेमाचेनि बहुवसपणें। नाहीं राती दिवो जाणणें।
केलें माझें सुख अव्यंगवाणें। आपणपेयां जिहीं॥ १२९॥

तेषां सततयुक्तानां भजताम् प्रीतिपूर्वकम्।
ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते॥ १०.१०॥

तयां मग जें आम्हीं कांहीं। द्यावें अर्जुना पाहीं।
ते ठायींचीच तिहीं। घेतली सेल॥ १३०॥

कां जे ते जया वाटा। निगाले गा सुभटा।
ते सोय पाहोनि अव्हांटा। स्वर्गापवर्ग॥ १३१॥

म्हणोनि तिहीं जें प्रेम धरिलें। तेंचि आमुचें देणें उपाइलें।
परी आम्हीं देयावें हेंहि केलें। तिहींचि म्हणियें॥ १३२॥

आतां यावरी येतुलें घडे। जें तेंचि सुख आगळें वाढे।
आणि काळाची दिठी न पडे। हें आम्हां करणें॥ १३३॥

लळेयाचिया बाळका किरीटी। गवसणी करूनि स्नेहाचिया दिठी।
जैसी खेळतां पाठोपाठीं। माउली धांवे॥ १३४॥

तें जो जो खेळ दावी। तो तो पुढें सोनयाचा करूनि ठेवी।
तैसी उपास्तीची पदवी। पोषित मी जायें॥ १३५॥

जिये पदवीचेनि पोषकें। ते मातें पावती यथासुखें।
हे पाळती मज विशेखें। आवडे करूं॥ १३६॥

पैं गा भक्तासि माझें कोड। मज तयाचे अनन्यगतीची चाड।
कां जे प्रेमळांचें सांकड। आमुचियां घरीं॥ १३७॥

पाहें पां स्वर्ग मोक्ष उपायिले। दोन्ही मार्ग तयांचिये वाहणी केले।
आम्हीं आंगही शेषा वेंचिले। लक्ष्मीयेसीं॥ १३८॥

परी आपणपेंवीण जें एक। तें तैसेंचि सुख साजुक।
सप्रेमळांलागीं देख। ठेविलें जतन॥ १३९॥

हा ठायवरी किरीटी। आम्ही प्रेमळु घेवों आपणपयासाठीं।
या बोलीं बोलिजत गोष्टी। तैसिया नव्हती गा॥ १४०॥

तेषामेवानुकम्पार्थम् अहमज्ञानजं तमः।
नाशयात्म्यात्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता॥ १०.११॥

म्हणोनि मज आत्मयाचा भावो। जिहीं जियावया केला ठावो।
एक मीवांचोनि वावो। येर मानिलें॥ १४१॥

तयां तत्त्वज्ञान चोखटां। दिवी पोतासाची सुभटा।
मग मीचि होऊनि दिवटा। पुढां पुढां चाले॥ १४२॥

अज्ञानाचिये राती। माजीं तमाची मिळणी दाटती।
ते नाशूनि घालीं परौती। करीं नित्योदयो॥ १४३॥

ऐसे प्रेमळाचेनि प्रियोत्तमें। बोलिलें जेथ पुरुषोत्तमें।
तेथ अर्जुन मनोधर्में। निवालों म्हणतसे॥ १४४॥

अहो जी अवधारा। भला केरु फेडिला संसारा।
जाहलों जननीजठरजोहरा। वेगळा प्रभू॥ १४५॥

जी जन्मलेपण आपुलें। हें आजि मियां डोळां देखिलें।
जीवित हाता चढलें। मज आवडे तैसें॥ १४६॥

आजि आयुष्या उजवण जाहली। माझिया दैवा दशा उदयली।
जे वाक्यकृपा लाधली। दैविकेनि मुखें॥ १४७॥

आतां येणें वचनतेजाकारें। फिटलें आंतील बाहेरील आंधारें।
म्हणोनि देखतसें साचोकारें। स्वरूप तुझें॥ १४८॥

अर्जुन उवाच।
परं ब्रह्म परं धाम पवित्रं परमं भवान्।
पुरुषं शाश्वतं दिव्यम् आदिदेवमजं विभुम्॥ १०.१२॥

तरी होसी गा तूं परब्रह्म। जें या महाभूतां विसंबतें धाम।
पवित्र तूं परम। जगन्नाथा॥ १४९॥

तूं परम दैवत तिहीं देवां। तूं पुरुष जी पंचविसावा।
दिव्य तूं प्रकृतिभावा। पैलीकडील॥ १५०॥

अनादिसिद्ध तूं स्वामी। जो नाकळिजसी जन्मधर्मी।
तो तूं हें आम्हीं। जाणितलें आतां॥ १५१॥

तूं या कालयंत्रासि सूत्री। तूं जीवकळेची अधिष्ठात्री।
तूं ब्रह्मकटाहधात्री। हें कळलें फुडें॥ १५२॥

आहुस्त्वामृषयः सर्वे देवर्षिर्नारदस्तथा।
असितो देवलो व्यासः स्वयं चैव ब्रवीषि मे॥ १०.१३॥

पैं आणिकही एके परी। इये प्रतीतीची येतसे थोरी।
जे मागें ऐसेंचि ऋषीश्वरीं। सांगितलें तूंतें॥ १५३॥

परी तया सांगितलियाचें साचपण। हें आतां देखतसे अंतःकरण।
जे कृपा केली आपण। म्हणोनि देवा॥ १५४॥

एऱ्हवीं नारदु अखंड जवळां ये। तोहीं ऐसींचि वचनें गाये।
परी अर्थ न बुजोनि ठायें। गीतसुखचि ऐकों॥ १५५॥

हां गा आंधळ्यांचां गांवीं। आपणपें प्रगटले रवी।
तरी तिहीं वोतपलीचि घ्यावी। वाचूनि प्रकाशु कैंचा॥ १५६॥

येरवीं देवर्षिही अध्यात्म गातां। आहाच रागांगें सीं जे मधुरता।
तेचि फावे येर चित्ता। नलगेचि कांहीं॥ १५७॥

पैं असितदेवलाचेनिही मुखें। मी एवंविधा तूंतें आइकें।
परी तैं बुद्धि विषयविखें। घेरिली होती॥ १५८॥

विषयविषाचा पडिपाडू। गोड परमार्थु लागे कडू।
विषय तो गोडू। जीवासी जाहला॥ १५९॥

आणि हें आणिकांचें काय सांगावें। राउळा आपणचि येऊनि व्यासदेवें।
तुझें स्वरूप आघवें। सर्वदा सांगिजे॥ १६०॥

परी तो अंधारीं चिंतामणि तो देखिला। जेवीं नव्हे या बुद्धी उपेक्षिला।
पाठीं दिनोदयीं वोळखिला। होय म्हणोनि॥ १६१॥

तैसीं व्यासादिकांचीं बोलणीं। तिया मजपाशीं चिद्रत्नांचिया खाणी।
परी उपेक्षिल्या जात होतिया तरणी। तुजवीण कृष्णा॥ १६२॥

सर्वमेतदृतं मन्ये यन्मां वदसि केशव।
न हि ते भगवन् व्यक्तिं विदुर्देवा न दानवाः॥ १०.१४॥

ते आतां वाक्यसूर्यकर तुझे फाकले। आणि ऋषीं मार्ग होते जे कथिले।
तयां आघवयांचेंचि फिटलें। अनोळखपण॥ १६३॥

जी ज्ञानाचें बीज तंव तयांचे बोल। माझिये हृदयभूमिके पडिले सखोल।
वरी इये कृपेची जाहाली वोल। म्हणोनि संवादफळेंशीं उठले॥ १६४॥

अहो नारदादिका संतां। त्यांचिया युक्तिरूप सरिता।
मी महोदधि जाहलों अनंता। संवादसुखाचा॥ १६५॥

प्रभु आघवोनि येणें जन्में। जियें पुण्यें केलीं मियां उत्तमें।
तयांचीं न ठकतीचि अंगीं कामें। सद्गुरु तुवां॥ १६६॥

एऱ्हवीं वडिलवडिलांचेनि मुखें। मी सदा तूंतें कानीं आइकें।
परी कृपा न किजेचि तुवा एकें। तंव नेणवेचि कांहीं॥ १६७॥

म्हणोनि भाग्य जैं सानकूळ। जालिया केले उद्यम सदां सफळ।
तैसें श्रुताधीत सकळ। गुरुकृपा साच॥ १६८॥

जी बनकरू झाडें शिंपी जीवेंसाटीं। पाडूनि जन्में काढी आटी।
परी फळेंसीं तैंचि भेटी। जैं वसंतु पावे॥ १६९॥

अहो विषमा जैं वोहट पडे। तैं मधुर तें मधुर आवडे।
पैं रसायनें तैं गोडे। जेहीं आरोग्य देहीं॥ १७०॥

कां इंद्रियें वाचा प्राण। यां जालियांचें तैंचि सार्थकपण।
जैं चैतन्य येउनि आपण। संचरे माजीं॥ १७१॥

तैसें शब्दजात आलोडिले। अथवा योगादिक अभ्यासिलें।
तें तैंचि म्हणों ये आपुलें। जैं सानकूळ श्रीगुरु॥ १७२॥

ऐसिये जालिये प्रतीतीचेनि माजें। अर्जुन निश्चयाचीं नाचतुसे भोजें।
तेवींचि म्हणे देवा तुझें। वाक्य मज मानलें॥ १७३॥

तरी साचचि हे कैवल्यपती। मज त्रिशुद्धी आली प्रतीती।
जे तूं देवदानवाचिये मती। जोगा नव्हसी॥ १७४॥

तुझें वाक्य व्यक्ती न येतां देवा। आपुलिया जाणे जाणिवा।
तैंसा कहींचि नाहीं हें मझावा। भरंवसेनि आलें॥ १७५॥

स्वयमेवात्मनात्मानं वेथ त्वं पुरुषोत्तम।
भूतभावन भूतेश देवदेव जगत्पते॥ १०.१५॥

एथ आपुलें वाडपण जैसें। आपणचि जाणिजे आकाशें।
कां मी येतुली घनवट ऐसें। पृथ्वीचि जाणे॥ १७६॥

तैसा आपुलिये सर्वशक्ती। तुज तूंचि जाणीं लक्ष्मीपती।
येर वेदादिक मती। मिरवती वायां॥ १७७॥

हां गा मनातें मागां सांडावें। पवनातें वावीं मवावें।
आदिशून्य उतरोनि जावें। केउतें बाहीं॥ १७८॥

तैसें हें तुझें जाणणें आहे। म्हणोनि कोणाही ठाकतें नोहे।
आतां तुझें ज्ञान होये। तुजचिजोगें॥ १७९॥

जी आपणपयातें तूंचि जाणसी। आणिकातें सांगावयाही तूं समर्थ होसी।
तरी आतां एक वेळ घाम पुसीं। आर्तीचिये निडळींचा॥ १८०॥

हें आइकिलें कीं भूतभावना। भवगजपंचानना।
सकलदेवदेवतार्चना। जगन्नायका॥ १८१॥

जरी थोरी तुझी पाहत आहों। तरी पासीं उभे ठाकावयाही योग्य नोहों।
या शोच्यता विनवूं बिहों। तरी आन उपायो नाहीं॥ १८२॥

भरले सरिता समुद्र चहूंकडे। परी ते बापियासि कोरडे।
कां जैं मेघौनि थेंबुटा पडे। तें पाणी कीं तया॥ १८३॥

तैसें श्रीगुरु जी सर्वत्र आथी। परी कृष्णा आम्हां तूंचि गती।
हें असो मजप्रती। विभूती सांगें॥ १८४॥

वक्तुमर्हस्यशेषेण दिव्या ह्यात्मविभूतयः।
याभिर्विभूतिभिर्लोकान् इमांस्त्वं व्याप्य तिष्ठसि॥ १०.१६॥

जी तुझिया विभूती आघविया। परी व्यापिती या शक्ती दिव्या जिया।
तिया आपुलिया दावाविया। आपण मज॥ १८५॥

जिहीं विभूतीं ययां समस्तां। लोकांतें व्यापूनि आहाती अनंता।
तिया प्रधाना नामांकिता। प्रगटा करीं॥ १८६॥

कथं विद्यामहं योगिंस्त्वां सदा परिचिन्तयन्।
केषु केषु च भावेषु चिन्त्योऽसि भगवन्मया॥ १०.१७॥

जी कैसें मियां तूंतें जाणावें। काय जाणोनि सदा चिंतावें।
जरी तूंचि म्हणों आघवें। तरी चिंतनचि न घडे॥ १८७॥

म्हणोनि मागां भाव जैसे। आपुले सांगितले तुवां उद्देशें।
आतां विस्तारोनि तैसे। एक वेळ बोलें॥ १८८॥

जयां जयां भावांचां ठायीं। तूंतें चिंतितां मज सायासु नाहीं।
तो विवळ करूनि देई। योगु आपुला॥ १८९॥

विस्तरेणात्मनो योगं विभूतिं च जनार्दन।
भूयः कथय तृप्तिर्हि शृण्वतो नास्ति मेऽमृतम्॥ १०.१८॥

आणि पुसलिया जिया विभूती। त्याही बोलाविया भूतपती।
एथ म्हणसी जरी पुढतीं। काय सांगों॥ १९०॥

तरी हा भाव मना। झणें जाय हो जनार्दना।
पैं प्राकृताही अमृतपाना। ना न म्हणवे जेवीं॥ १९१॥

जें काळकूटाचें सहोदर। हें मृत्युभेणें प्याले अमर।
तरी दिहाचे पुरंदर। चौदा जाती॥ १९२॥

ऐसा कवण एक क्षीराब्धीचा रसु। जया वायांचि अमृतपणाचा आभासु।
तयाचाही मिठांशु। जे पुरे म्हणों नेदी॥ १९३॥

तया पाबळेयाही येतुलेवरी। गोडियेची आथि थोरी।
मग हें तंव अवधारीं। परमामृत साचें॥ १९४॥

जें मंदराचळु न ढाळितां। क्षीरसागरु न डहुळितां।
अनादि स्वभावता। आइतें आहे॥ १९५॥

जें स्रवें ना द्रवे नव्हे बद्ध। जेथ नेणिजती रस गंध।
जें भलतयांही सिद्ध। आठवलेंचि फावे॥ १९६॥

जयाचि गोठीचि ऐकतखेंवो। आघवा संसारु होय वावो।
बळिया नित्यता लागे येवों। आपणपेयां॥ १९७॥

जन्ममृत्यूंची भाख। हारपोनी जाय निःशेख।
आंत बाहेरी महासुख। वाढोंचि लागे॥ १९८॥

मग दैवगत्या जरी सेविजे। तरी तें आपणचि होऊनि ठाकिजे।
ते तुज देतां चित्त माझें। पुरे म्हणों न शके॥ १९९॥

तंव तुझें नामचि जी आम्हां आवडे। वरी भेटी होय आणि जवळिक जोडे।

पाठीं गोठी सांगसी सुरवाडें। आनंदाचेनि॥ २००॥

आतां हें सुख कायिसयासारिखें। कांहीं निर्वचेना मज परितोखें।
तरी येतुलें जाणें जें येणें मुखें। पुनरुक्तही हो॥ २०१॥

हां गा सूर्य काय शिळा।अग्नि म्हणों येत आहे वोंविळा।
कां नित्य वाहातया गंगाजळा। पारसेपण असे॥ २०२॥

तुवां स्वमुखें जें बोलिलें। हें आम्हीं नादासि रूप देखिलें।
आजि चंदनतरूची फुलें। तुरंबीत आहों मा॥ २०३॥

या पार्थाचिया बोला। सर्वांगें श्रीकृष्ण डोलला।
म्हणे भक्तिज्ञानासि जाहला। आगरु हा॥ २०४॥

ऐसा पतकराचिया तोषा आंतु। प्रेमाचा वेग उचंबळतु।
तो सायासें सांवरूनि अनंतु। काय बोले॥ २०५॥

श्री भगवानुवाच।
हन्त ते कथयिष्यामि दिव्या ह्यात्मविभूतयः।
प्राधान्यतः कुरुश्रेष्ठ नास्त्यन्तो विस्तरस्य मे॥ १०.१९॥

मी पितामहाचा पिता। हें आठवतांही नाठवे चित्ता।
कीं म्हणतसे बा पांडुसुता। भलें केलें॥ २०६॥

अर्जुनातें बा म्हणे एथ कांहीं। आम्हां विस्मो करावया कारण नाहीं।
अंगें तो लेकरूं काई। नव्हेचि नंदाचें॥ २०७॥

परी प्रस्तुत ऐसें असो। हें करवी आवडीचा अतिसो।
मग म्हणे आइकें सांगतसों। धनुर्धरा॥ २०८॥

तरी तुवां पुसलिया विभूती।तयांचें अपारपण सुभद्रापती।
ज्या माझियाचि परी माझिये मती। आकळती ना॥ २०९॥

अंगींचिया रोमा किती। जयाचिया तयासि न गणवती।
तैसिया माझिया विभूती। असंख्य मज॥ २१०॥

एऱ्हवी तरी मी कैसा केवढा। म्हणोनि आपणपयाही नव्हेचि फुडा।
यालागीं प्रधाना जिया नामीं रूढा।तिया विभूती आइकें॥ २११॥

जिया जाणितलियासाठी।आघविया जाणवतील किरीटी।
जैसें बीज आलिया मुठीं। तरूचि आला होय॥ २१२॥

कां उद्यान हातां चढिले। तरी आपैसीं सांपडलीं फळें फुलें।
तेवीं देखिलिया जिया देखवलें। विश्व सकळ॥ २१३॥

एऱ्हवीं साचचि गा धनुर्धरा। नाही शेवटु माझिया विस्तारा।
पैं गगना ऐसिया अपारा। मजमाजीं लपणें॥ २१४॥

अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थितः।
अहमादिश्च मध्यं च भूतानामन्त एव च॥ १०.२०॥

आइकें कुटिलालकमस्तका। धनुर्वेदत्र्यंबका।
मी आत्मा असें एकैका। भूतमात्राच्यां ठायीं॥ २१५॥

आंतुलीकडे मीचि यांचें अंतःकरणीं। भूताबाहेरी माझीच गवसणी।
आदि मी निर्वाणीं। मध्यही मीचि॥ २१६॥

जैसें मेघां या तळीं वरी। एक आकाशचि आंत बाहेरी।
आणि आकाशींचि जाले अवधारीं। असणेंही आकाशीं॥ २१७॥

पाठीं लया जे वेळीं जाती। ते वेळीं आकाशचि होऊनि ठाती।
तेवीं आदि स्थिती अंतगती। भूतांसि मी॥ २१८॥

ऐसें बहुवस आणि व्यापकपण। माझें विभूतियोगें जाण।
तरी जीवचि करूनि श्रवण। आइकोनि आइक॥ २१९॥

याहीवरी त्या विभूती। सांगणें ठेलें सुभद्रापती।
सांगेन म्हणितलें तुजप्रती। त्या प्रधाना आइकें॥ २२०॥

आदित्यानामहं विष्णुः ज्योतिषाम् रविरंशुमान्॥
मरीचिर्मरुतामस्मि नक्षत्राणाम् अहं शशी॥ १०.२१॥

हें बोलोनि तो कृपावंतु। म्हणे विष्णु मी आदित्या आंतु।
रवी मी रश्मिवंतु। सुप्रभामाजीं॥ २२१॥

मरुद्गणांच्या वर्गीं। मरीचि म्हणे मी शार्ङ्गी।
चंद्र मी गगनरंगीं। तारांमाजीं॥ २२२॥

वेदानां सामवेदोऽस्मि देवानामस्मि वासवः॥
इन्द्रियाणां मनश्चास्मि भूतानामस्मि चेतना॥ १०.२२॥

वेदा आंतु सामवेदु। तो मी म्हणे गोविंदु।
देवामाजीं मरुद्बंधु। महेंद्र तो मी॥ २२३॥

इंद्रियांमाजि अकरावें। मन ते मी जाणावें।
भूतांमाजीं स्वभावें। चेतना ते मी॥ २२४॥

रुद्राणां शंकरश्चास्मि वित्तेशो यक्षरक्षसाम्॥
वसूनां पावकश्चास्मि मेरुः शिखरिणामहम्॥ १०.२३॥

अशेषांहिई रुद्रामाझारीं। शंकर जो मदनारी।
तो मी येथ न धरीं। भ्रांति कांहीं॥ २२५॥

यक्षरक्षोगणांआंतु। शंभूचा सखा जो धनवंतु।
तो कुबेरु मी हें अनंतु। म्हणता जाहला॥ २२६॥

मग आठांही वसूंमाझारीं। पावकु तो मी अवधारीं।
शिखराथिलियां सर्वोपरी। मेरु तो मी॥ २२७॥

पुरोधसा च मुख्यं मां विद्धि पार्थ बृहस्पतिम्॥
सेनानीनामहं स्कन्दः सरसामस्मि सागरः॥ १०.२४॥

महर्षीणां भृगुरहं गिरामस्म्येकमक्षरम्॥
यज्ञानां जपयज्ञोऽस्मि स्थावराणां हिमालयः॥ १०.२५॥

जो स्वर्गसिंहासना सावावो। सर्वज्ञते आदीचा ठावो।
तो पुरोहितांमाजीं रावो। बृहस्पती मी॥ २२८॥

त्रिभुवनींचिया सेनापती। आंत स्कंदु तो मी महामती।
जो हरवीर्यें अग्निसंगती। कृत्तिकांतु जाहला॥ २२९॥

सकळिकां सरोवरांसी। माझारि समुद्र तो मी जळराशी।
महर्षीआंतु तपोराशी। भृगु तो मी॥ २३०॥

अशेषाही वाचा। आंतु नटनाच सत्याचा।
तें अक्षर एक मी वैकुंठींचा। वेल्हाळु म्हणे॥ २३१॥

समस्तांही यज्ञांचियां पैकीं। जपयज्ञु तो मी ये लोकीं।
जो कर्मत्यागें प्रणवादिकीं। निपजविजे॥ २३२॥

नामजपयज्ञु तो परम। बांधू न शके स्नानादि कर्म।
नामें पावन धर्माधर्म। नाम परब्रह्म वेदार्थें॥ २३३॥

स्थावरां गिरिवरां आंतु। पुण्यपुंज जो हिमवंतु।
तो मी म्हणे कांतु। लक्ष्मीयेचा॥ २३४॥

अश्वत्थः सर्ववृक्षाणां देवर्षीणां च नारदः॥
गन्धर्वाणां चित्ररथः सिद्धानां कपिलो मुनिः॥ १०.२६॥

उच्चैःश्रवसमश्वानां विद्धि माममृतोद्भवम्॥
ऐरावतं गजेन्द्राणां नराणां च नरधिपम्॥ १०.२७॥

कल्पद्रुम हन पारिजातु। गुणे चंदनुही वाड विख्यातु।
तरी ययां वृक्षजातां आंतु। अश्वत्थु तो मी॥ २३५॥

देवऋषी आंतु पांडवा। नारदु तो मी जाणावा।
चित्ररथु मी गंधर्वां। सकळिकांमाजीं॥ २३६॥

ययां अशेषांही सिद्धां। माजीं कपलाचार्यु मी प्रबुद्धा।
तुरंगजातां प्रसिद्धां। आंत उच्चैःश्रवा मी॥ २३७॥

राजभूषण गजां आंतु। अर्जुना मी गा ऐरावतु।
पयोराशी सुरमथितु। अमृतांशु तो मी॥ २३८॥

ययां नरां माजीं राजा। तो विभूतिविशेष माझा।
जयातें सकळ प्रजा। होऊनि सेविती॥ २३९॥

आयुधानांअहं वज्रं धेनूनामस्मि कामधुक्।
प्रजनश्चास्मि कन्दर्पः सर्पाणामस्मि वासुकिः॥ १०.२८॥

अनन्तश्चास्मि नागानां वरुणो यादसामहम्।
पितॄणामर्यमा चास्मि यमः संयमतामहम्॥ १०.२९॥

पैं आघवेयां हातियेरां। आंत वज्र तें मी धनुर्धरा।
जें शतमखोत्तीर्णकरा। आरूढोनि असे॥ २४०॥

धेनुमध्यें कामधेनु। ते मी म्हणे विष्वक्सेनु।
जन्मवितयां आंत मदनु। तो मी जाणें॥ २४१॥

सर्पकुळाआंतु अधिष्ठाता। वासुकी गा मी कुंतीसुता।
नागांमाजी समस्तां। अनंतु तो मी॥ २४२॥

अगा यादसां आंतु। जो पश्चिमप्रमदेचा कांतु।
तो वरुण मी हें अनंतु। सांगत असे॥ २४३॥

आणि पितृगणां समस्तां। माजीं अर्यमा जो पितृदेवता।
तो मी हें तत्त्वतां। बोलत अहें॥ २४४॥

जगाचीं शुभाशुभें लिहिती। प्राणियांचिया मानसाचा झाडा घेती।
मग केलियानुरूप होती। भोगनियम जे॥ २४५॥

तया नियमितयांमाजीं यमु। जो कर्मसाक्षी धर्मु।
तो मी म्हणे आत्मारामु। रमापती॥ २४६॥

प्रल्हादश्चास्मि दैत्यानां कालः कलयतामहम्॥
मृगाणां च मृगेन्द्रोऽहं वैनतेयश्च पक्षिणाम्॥ १०.३०॥

अगा दैत्यांचियां कुळीं। प्रल्हादु तो मी न्याहाळीं।
म्हणोनि दैत्यभावादिमेळीं। लिंपेचिना॥ २४७॥

पैं कळितयांमाजीं महाकाळु। तो मी म्हणे गोपाळु।
श्वापदां आंतु शार्दूळु। तो मी जाण॥ २४८॥

पक्षिजातीमाझारीं। गरुड तो मी अवधारीं।
यालागीं जो पाठीवरी। वाहों शके मातें॥ २४९॥

पवनः पवतामस्मि रामः शस्त्रभृतामहम्।
झषाणां मकरश्चास्मि स्रोतसामस्मि जाह्नवी॥ १०.३१॥

पृथ्वीचिया पैसारा। माजीं घडी न लगतां धनुर्धरा।
एकेंचि उड्डाणें सातांही सागरां। प्रदक्षिणा करी जो॥ २५०॥

तयां वहिलियां गतिमंतां। आंतु पवनु तो मी पांडुसुता।
शस्त्रधरां समस्तां। माजीं श्रीराम तो मी॥ २५१॥

जेणें सांकडलिया धर्माचेनि कैवारें। आपणपयां धनुष्य करुनि दुसरें।
विजयलक्ष्मीये एक मोहरें। केलें त्रेतीं॥ २५२॥

पाठीं उभें ठाकूनि सुवेळीं। प्रतापलंकेश्वराचीं सिसाळीं।
गगनीं उदो म्हणतया हस्तबळी। दिधलीं भूतां॥ २५३॥

जेणें देवांचा मानु गिंवसिला। धर्मासि जीर्णोद्धार केला।
सूर्यवंशीं उदेला। सूर्य जो कां॥ २५४॥

तो हातियेरु परजितयां आंतु। रामचंद्र मी जानकीकांतु।
मकर मी पुच्छवंतु। जळचरांमाजीं॥ २५५॥

पैं समस्तांही वोघां। मध्यें जे भगीरथें आणितां गंगा।
जन्हूनें गिळिली मग जंघा। फाडूनि दिधली॥ २५६॥

ते त्रिभुवनैकसरिता। जान्हवी मी पांडुसुता।
जळप्रवाहां समस्तां। माझारीं जाणें॥ २५७॥

ऐसेनि वेगळालां सृष्टीपैकीं। विभूति नाम ठेवितां एकेकी।
सगळेन जन्मसहस्रें अवलोकीं। अर्ध्या नव्हती॥ २५८॥

सर्गाणामादिरन्तश्च मध्यं चैवाहमर्जुन॥
अध्यात्मविद्या विद्यानां वादः प्रवदतामहम्॥ १०.३२॥

अक्षराणामकारोऽस्मि द्वन्द्वः सामासिकस्य च॥
अहमेवाक्षयः कालो धाताऽहं विश्वतोमुखः॥ १०.३३॥

जैसी अवघींचि नक्षत्रें वेचावीं। ऐसी चाड उपजेल जैं जीवीं।
तैं गगनाची बांधावी। लोथ जेवी॥ २५९॥

कां पृथ्वीये परमाणूंचा उगाणा घ्यावा। तरी भूगोलुचि काखे सुवावा।
तैसा विस्तारु माझा पहावा। तरी जाणावें मातें॥ २६०॥

जैसें शाखांसी फूल फळ। एकिहेळां वेटाळूं म्हणिजे सकळ।
तरी उपडुनियां मूळ। जेवीं हातीं घेपे॥ २६१॥

तेवीं माझे विभूतिविशेष। जरी जाणों पाहिजेती अशेष।
तरी स्वरूप एक निर्दोष। जाणिजे माझें ॥ २६२॥

एऱ्हवीं वेगळलिया विभूती। कायिएक परिससी किती।
म्हणोनि एकिहेळां महामती। सर्व मी जाण॥ २६३॥

मी आघवियेचि सृष्टी। आदिमध्यांतीं किरीटी।
ओतप्रोत पटीं। तंतु जेवीं॥ २६४॥

ऐसिया व्यापका मातें जैं जाणावें। तैं विभूतिभेदें काय करावें।
परी हे तुझी योग्यता नव्हे। म्हणोनि असो॥ २६५॥

कां जे तुवां पुसलिया विभूती। म्हणोनि तिया आईक सुभद्रापती।

तरी आतां विद्यांमाजीं प्रस्तुती। अध्यात्मविद्या ते मी॥ २६६॥

अगा बोलतयांचिया ठायीं। वादु तो मी पाहीं।
जो सकलशास्त्रसंमतें कहीं। सरेचिना॥ २६७॥

जो निर्वचूं जातां वाढे। आइकलियां उत्प्रेक्षे सळु चढे।
जयावरी बोलतयांचीं गोडें। बोलणीं होतीं॥ २६८॥

ऐसा प्रतिपादनामाजीं वादु। तो मी म्हणे गोविंदु।
अक्षरां आंतु विशदु। अकारु तो मी॥ २६९॥

पैं गा समासांमाझारीं। द्वंद्व तो मी अवधारीं।
मशकालागोनि ब्रह्मावेरीं। ग्रासिता तो मी॥ २७०॥

मेरुमंदरादिकीं सर्वीं। सहित पृथ्वीतें विरवी।
जो एकार्णवातेंही जिरवी। जेथिंचा तेथें॥ २७१॥

जो प्रळयतेजा देत मिठी। सगळिया पवनातें गिळी किरीटी।
आकाश जयाचिया पोटीं। सामावलें॥ २७२॥

ऐसा अपार जो काळु। तो मी लक्ष्मीलीळु।
मग पुढती सृष्टीचा मेळु। सृजिता तो मी॥ २७३॥

मृत्युः सर्वहरश्चाहम् उद्भवश्च भविष्यताम्॥
कीर्तिः श्रीर्वाक्च नारीणां स्मृतिर्मेधा धृतिः क्षमा॥ १०.३४॥

आणि सृजिलिया भूतांतें मीचि धरी। सकळां जीवनही मीचि अवधारीं।
शेखीं सर्वांतें या संहारी। तेव्हां मृत्युही मीचि॥ २७४॥

आतां स्त्रीगणांचां पैकीं। माझिया विभूती सात आणिकी।
तिया ऐक कवतिकीं। सांगिजतील॥ २७५॥

तरी नित्य नवी जे कीर्ति। अर्जुना ते माझी मूर्ती।
आणि औदार्येंसी जे संपत्ती। तेही मीचि जाणें॥ २७६॥

आणि ते गा मी वाचा। जे सुखासनीं न्यायाच्यां।
आरूढोनि विवेकाच्यां। मार्गीं चाले॥ २७७॥

देखिलेनि पदार्थें। जे आठवूनि दे मातें।
ते स्मृतिही पैं एथें। त्रिशुद्धि मी॥ २७८॥

पैं स्वहिता अनुयायिनी। मेधा ते गा मी इये जनीं।
धृती मी त्रिभुवनीं। क्षमा ते मी॥ २७९॥

एवं नारींमाझारीं। या सातही शक्ति मीचि अवधारीं।
ऐसें संसारगजकेसरी। म्हणता जाहला॥ २८०॥

बृहत साम तथा साम्नां गायत्री छन्दसामहम्॥
मासानां मार्गशीर्षोऽहमृतूनां कुसुमाकरः॥ १०.३५॥

वेदराशीचिया सामा। आंत बृहत्साम जे प्रियोत्तमा।
तें मी म्हणे रमा। प्राणेश्वरु॥ २८१॥

गायत्री छंद जें म्हणिजे। तें सकळां छंदांमाजि माझें।
स्वरूप हें जाणिजे। निभ्रांत तुवां॥ २८२॥

मासांआंत मार्गशीरु। तो मी म्हणे शार्ङ्गधरु।
ऋतूंमाजीं कुसुमाकरु। वसंतु तो मी॥ २८३॥

द्यूतं छलयतामस्मि तेजस्तेजस्विनामहम्।
जयोऽस्मि व्यवसायोऽस्मि सत्त्वं सत्त्ववतामहम्॥ १०.३६॥

वृष्णीनां वासुदेवोऽस्मि पाण्डवानां धनञ्जयः॥
मुनीनामप्यहं व्यासः कवीनामुशना कविः॥ १०.३७॥

छळितयां विंदाणा। माजी जूं तें मी विचक्षणा।
म्हणोनि चोहटां चोरी परी कवणा। निवारूं न ये॥ २८४॥

अगा अशेषांही तेजसां। आंत तेज तें मी भरंवसा।
विजयो मी कार्योद्देशां। सकळांमाजीं॥ २८५॥

जेणें चोखाळत दिसे न्याय। तो व्यवसायांत व्यवसाय।
माझेंचि स्वरूप हें राय। सुरांचा म्हणे॥ २८६॥

सत्त्वाथिलियांआंतु। सत्त्व मी म्हणे अनंतु।
यादवामाजीं श्रीमंतु। तोचि तो मी॥ २८७॥

जो देवकीवसुदेवास्तव जाहला। कुमारीसाठीं गोकुळीं गेला।
तो मी प्राणासकट पियाला। पूतनेतें॥ २८८॥

नुघडतां बाळपणाची फुली। जेणें मियां अदानवी सृष्टि केली।
करी गिरि धरूनि उमाणिली। महेंद्रमहिमा॥ २८९॥

कालिंदीचें हृदयशल्य फेडिलें। जेणें मियां जळत गोकुळ राखिलें।
वासरुवांसाठीं लाविलें। विरंचीस पिसें॥ २९०॥

प्रथमदशेचिये पहाटें। माजी कंसाऐशीं अचाटें।
महाथेंडीं अवचटें। लीळाचि नासिलीं॥ २९१॥

हें काय कितीएक सांगावें। तुवांही देखिलें ऐकिलें असे आघवें।
तरी यादवामाजी जाणावें। हेंचि स्वरूप माझें॥ २९२॥

आणि सोमवंशी तुम्हीं पांडवां। माजीं अर्जुन तो मी जाणावा।
म्हणोनि एकमेकांचिया प्रेमभावा। विघडु न पडे॥ २९३॥

संन्यासी तुवां होऊनि जनीं। चोरूनि नेली माझी भगिनी।
तऱ्ही विकल्पु नुपजे मनीं। मी तूं दोन्ही स्वरूप एक॥ २९४॥

मुनीं आंत व्यासदेवो। तो मी म्हणे यादवरावो।
कवीश्वरांमाजीं धैर्या ठावो। उशनाचार्य मी॥ २९५॥

दण्डो दमयतामस्मि नीतिरस्मि जिगीषताम्॥
मौनं चैवास्मि गुह्यानां ज्ञानं ज्ञानवतामहम्॥ १०.३८॥

अगा दमितयां माझारीं। अनिवार दंडु तो मी अवधारीं।
जो मुंगियेलागोनि ब्रह्मावेरीं। नियमित पावे॥ २९६॥

पैं सारासार निर्धारितयां। धर्मज्ञानाचा पक्षु धरितया।
सकळशास्त्रांमाजीं ययां। नीतिशास्त्र तें मी॥ २९७॥

आघवियाची गूढां। आंतु मौन तें मी सुहाडा।
म्हणोनि न बोलतयां पुढां। स्रष्टाही नेएणता होय॥ २९८॥

अगा ज्ञानियांचां ठायीं। ज्ञान तें मी पाहीं।
आतां असो हें ययां कांहीं। पार न देखों॥ २९९॥

यच्चापि सर्वभूतानां बीजं तदहमर्जुन॥
न तदस्ति विना यत्स्यान्मया भूतं चराचरम्॥ १०.३९॥

नान्तोऽस्ति मम दिव्यानां विभूतीनां परंतप॥
एष तूद्देशतः प्रोक्तो विभूतेर्विस्तरो मया॥ १०.४०॥

पैं पर्जन्याचिया धारां। वरी लेख करवेल धनुर्धरा।
कां पृथ्वीचिया तृणांकुरां। होईल ठी॥ ३००॥

पैं महोदधीचिया तरंगा। व्यवस्था धरूं न ये जेवीं गा।
तेवीं माझिया विशेष लिंगां। नाहीं मिती॥ ३०१॥

ऐशियाही सातपांच या प्रधाना। विभूती सांगितलिया तुज अर्जुना।
तो हा उद्देशु जो गा मना। आहाच गमला॥ ३०२॥

येरां विभूतिविस्तारांसि कांहीं। एथ सर्वथा लेख नाहीं।
म्हणौनि परिससीं तूं काई। आम्ही सांगों किती॥ ३०३॥

यालागीं एकिहेळां तुज। दाऊं आतां वर्म निज।
सर्वभूतांकुरें बीज। विरूढत असे तें मी॥ ३०४॥

म्हणोनि सानें थोर न म्हणावें। उंच नीच भाव सांडावे।
एक मीचि ऐसें मानावें। वस्तुजातातें॥ ३०५॥

तरी यावरी साधारण। आईक पां आणिकही खूण।
तरी अर्जुना ते तूं जाण। विभूति माझी॥ ३०६॥

यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा॥
तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंशसंभवम्॥ १०.४१॥

जेथ जेथ संपत्ति आणि दया। दोन्ही वसती आलिया जया ठाया।
ते ते जाण धनंजया। विभूती माझी॥ ३०७॥

अथवा बहुनैतेन किं ज्ञातेन तवार्जुन॥
विष्टभ्याहमिदं कृत्स्नम् एकांशेन स्थितो जगत्॥ १०.४२॥

अथवा एकलें एक बिंब गगनीं। तरी प्रभा फांके त्रिभुवनीं।
तेवीं एकाकियाची सकळ जनीं। आज्ञा पाळिजे॥ ३०८॥

तयातें एकलें झणी म्हण। ते निर्धन या भाषा नेण।
काय कामधेनूसवें सर्व साहान। चालत असे॥ ३०९॥

तियेतें जें जेधवां जो मागे। तें ते एकसरेंचि प्रसवो लागे।
तेवीं विश्वविभव तया अंगें। होऊनि आहाति॥ ३१०॥

तयातें वोळखावया हेचि संज्ञा। जे जगें नमस्कारिजे आज्ञा।

ऐसें आथि ते जाण प्राज्ञा। अवतार माझे॥ ३११॥

आतां सामान्य विशेष। हें जाणणें एथ महादोष।
कां जे मीचि एक अशेष। विश्व आहे म्हणोनि॥ ३१२॥

तरी आतां साधारण आणि चांगु। ऐसा कैसेनि पां कल्पावा विभागु।
वायां आपुलियेचि मती वंगु। भेदाचा लावावा॥ ३१३॥

एऱ्हवीं तरी तूप कासया घुसळावें। अमृत का रांधूनि अर्धे करावें।
हां गा वायूसि काय पां डावें। उजवें अंग आहे॥ ३१४॥

पैं सूर्यबिंबासि पोट पाठीं। पाहतां नासेल आपुली दिठी।
तेवीं माझ्यां स्वरूपीं गोठी। सामान्यविशेषाची नाहीं॥ ३१५॥

आणि सिनाना इहीं विभूती। मज अपारातें मविसील किती।
म्हणोनि किंबहुना सुभद्रापती। असो हें जाणणें॥ ३१६॥

आतां पैं माझेनि एकें अंशें। हें जग व्यापिलें असे।
यालागीं भेदु सांडूनि सरिसें। साम्यें भज॥ ३१७॥

ऐसें विबुधवनवसंतें। तेणें विरक्तांचेनि एकांतें।
बोलिले जेथ श्रीमंतें। श्रीकृष्णदेवें॥ ३१८॥

तेथ अर्जुन म्हणे स्वामी। येतुलें हें रहस्य बोलिले तुम्ही।
जे भेदु एक आणि आम्हीं। सांडावा एकीं॥ ३१९॥

हां हो सूर्य म्हणे काय जगातें। अंधारें दवडा कां परौतें।
केवीं धसाळ म्हणे देवा तूंतें। तरी अधिक हा बोलु॥ ३२०॥

तुझें नांवचि एक कोण्ही वेळे। जयाचिये मुखासि कां काना मिळे।
तयांचिया हृदयातें सांडुनि पळे। भेदु जी साच॥ ३२१॥

तो तूं परब्रह्मचि असकें। मज दैवें दिधलासि हस्तोदकें।
तरी आतां भेदु कायसा कें। देखावा कवणें॥ ३२२॥

जी चंद्रबिंबाचां गाभारां। रिगलियावरीही उबारा।
परी राणेपणें शार्ङ्गधरा। बोला हें तुम्हीं॥ ३२३॥

तेथ सावियाचि परितोषोनि देवें। अर्जुनातें आलिंगिलें जीवें।
मग म्हणे तुवां न कोपावें। आमुचिया बोला॥ ३२४॥

आम्हीं तुज भेदाचिया वाहाणीं। सांगितलीं जे विभूतींची कहाणी।
ते अभेदें काय अंतःकरणीं। मानिली कीं न मने॥ ३२५॥

हेंचि पहावयालागीं। नांवेंक बोलिलों बाहेरिसवडिया भंगीं।
तंव विभूती तुज चांगी। आलिया बोधा॥ ३२६॥

येथ अर्जुन म्हणे देवें। हें आपुलें आपण जाणावें।
परी देखसें विश्व आघवें। तुवां भरलें॥ ३२७॥

पैं राया तो पांडुसुतु। ऐसिये प्रतीतीसि जाहला वरितु।
या संजयाचिया बोला निवांतु। धृतराष्ट्र राहे॥ ३२८॥

कीं संजयो दुखवलेनि अंतःकरणें। म्हणतसे नवल नव्हे दैवा दवडणें।
हा जीवें धडासा आहे मी म्हणें। तव आंतुही आंधळा॥ ३२९॥

परी असो हें तो अर्जुनु। स्वहिताचा वाढवीतसे मानु।
कीं याहीवरी तया आनु। धिंवसा उपनला॥ ३३०॥

म्हणे हेचि हृदया आंतुली प्रतीती। बाहेरी अवतरो कां डोळ्यांप्रती। इये आर्तीचियां पाउलीं मती। उठती जाहली॥ ३३१॥

मियां इहींच दोहीं डोळां। झोंबावें विश्वरूपा सकळा।
एवढी हांव तो दैवा आगळा। म्हणऊनि करी॥ ३३२॥

आजि तो कल्पतरूची शाखा। म्हणोनि वांझोळें न लगती देखा।
जें जें येईल तयाचिया मुखा। तें तें साच करीतसे येरु॥ ३३३॥

जो प्रल्हादाचिया बोला। विषाही सकट आपण जाहला।
तो सद्गुरु असे असे जोडला। किरीटीसी॥ ३३४॥

म्हणोनि विश्वरूप पुसावयालागीं। पार्थ रिगता होईल कवणे भंगीं।

तें सांगेन पुढलिये प्रसंगीं। ज्ञानदेव म्हणे निवृत्तीचा॥ ३३५॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु
ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
विभूतियोगो नाम दशमोऽध्यायः॥

इति ज्ञानदेवविरिचितायां भावार्थदीपिकायां
दशमोऽध्यायः॥ १०॥

श्लोक ४२ ओव्या ३३५

## 11 The Universal Form विश्वरूपदर्शन

श्रीमद्भगवद्गीता एकादशोऽध्यायः।
ज्ञानेश्वरी अध्याय अकरावा

---

आतां यावरी एकादशीं। कथा आहे दोन्हीं रसीं।
जेथ पार्था विश्वरूपेंसीं। होईल भेटी॥ १॥

जेथ शांताचिया घरा। अद्भुत आला आहे पाहुणेरा।
आणि येरांही रसां पांतिकरां। जाहला मानु॥ २॥

अहो वधुवरांचिये मिळणीं। जैसी वराडियांही लुगडीं लेणीं।
तैसे देशियेचां सुखासनीं। मिरविले रस॥ ३॥

परी शांताद्भुत बरवे। जे डोळियांच्यां अंजुळीं घ्यावे।
जैसे हरिहर प्रेमभावें। आले खेंवा॥ ४॥

ना तरी अंवसेच्यां दिवशीं। भेटली बिंबें दोनि जैसी।
तेवीं एकवळा रसीं। केला एथ॥ ५॥

मीनले गंगेयमुनेचे ओघ। तैसें रसां जाहलें प्रयाग।
म्हणोनि सुस्नात होत जग। आघवें एथ॥ ६॥

माजीं गीता सरस्वती गुप्त। आणि दोनी रस ते ओघ मूर्त।
यालागीं त्रिवेणी हे उचित। फावली बापा॥ ७॥

एथ श्रवणाचेनि द्वारें। तीर्थी रिघतां सोपारें।
ज्ञानदेव म्हणे दातारें। माझेनि केलें॥ ८॥

तीरें संस्कृताचीं गहनें। तोडोनि मऱ्हाठियां शब्दसोपानें।
रचिली धर्मनिधानें। श्रीनिवृत्तिदेवें॥ ९॥

म्हणउनि भलतेणें एथ सद्भावें नाहावें। प्रयागमाधव विश्वरूप पहावें।
येतुलेनि संसारासि द्यावें। तिळोदक॥ १०॥

हें असो ऐसे सावयव। जेथ सासिन्नले आथी रसभाव।
जे श्रवणसुखाची राणीव। जोडली जगा॥ ११॥

जेथ शांताद्भुत रोकडे। आणि येरां रसां पडप जोडे।
हें अल्पचि परी उघडें। कैवल्य जेथ॥ १२॥

तो हा अकरावा अध्यायो। जो देवाचा आपणपें विसंवता ठावो।
परी अर्जुन सदैवाचा रावो। जे एथही पातला॥ १३॥

एथ अर्जुनचि काय म्हणों पातला। आजि आवडतयाही सुकाळु जाहला।
जे गीतार्थु हा आला। मऱ्हाठिये॥ १४॥

याचिलागीं माझें। विनविलें तें आइकिजे।
तरी अवधान दीजे। सज्जनीं तुम्हीं॥ १५॥

तेवींचि तुम्हां संतांचिये सभे। ऐसी सलगी कीर करूं नलभे।
परी मानावें जी तुम्हीं लोभें। अपत्या मज॥ १६॥

अहो पुंसा आपणचि पढविजे। मग पढे तरी माथा तुकिजे।
कां करविलेनि चोजें न रिझे। बाळका माय॥ १७॥

तेवीं मी जें जें बोलें। तें प्रभु तुमचेंचि शिकविलें।
म्हणोनि अवधारिजो आपुलें। आपण देवा॥ १८॥

हें सारस्वताचें गोड। तुम्हींचि लाविलेंजी झाड।
तरी आतां अवधानामृतें वाढ। शिंपोनि कीजो॥ १९॥

मग हें रसभावफुलीं फुलेल। नानार्थ फळभारें फळा येईल।
तुमचेनि धर्में होईल। सुकाळ जगा॥ २०॥

या बोला संत रिझले। म्हणती तोषलों गा भलें केलें।
आतां सांगें जें बोलिलें। अर्जुनें तेथ॥ २१॥

तंव निवृत्तिदास म्हणे। जी श्रीकृष्णार्जुनांचें बोलणें।
मी प्राकृत काय सांगों जाणें। परी सांगवा तुम्ही॥ २२॥

अहो रानींचिया पालेखाइरा। नेवाणें करविजे लंकेश्वरा।
एकला अर्जुन परी अक्षौहिणी अकरा। न जिणेचि काई॥ २३॥

म्हणोनि समर्थ जें जें करी। तें न हो न ये चराचरीं।
तुम्ही संत तयापरी। बोलवा मातें॥ २४॥

आतां बोलिजतसे आइका। हा गीताभाव निका।
जो श्रीवैकुंठनायका। मुखौनि निघाला॥ २५॥

बाप बाप ग्रंथ गीता। जो वेदीं प्रतिपाद्य देवता।
तो श्रीकृष्ण वक्ता। जिये ग्रंथीं॥ २६॥

तेथिंचे गौरव कैसें वानावें। जें श्रीशंभूचिये मति नागवे।
तें आतां नमस्कारिजे जीवें भावें। हेंचि भलें॥ २७॥

मग आइका तो किरीटी। घालूनि विश्वरूपिं दिठी।
पहिली कैसी गोठी। करिता जाहला॥ २८॥

हें सर्वही सर्वेश्वरु। ऐसा प्रतीतिगत जो पतिकरु।
तो बाहेरी होआवा गोचरु। लोचनासी॥ २९॥

हे जिवाआंतुली चाड। परी देवासि सांगता सांकड।
कां जे विश्वरूप गूढ। कैसेनि पुसावें॥ ३०॥

म्हणे मागां कवणीं कहीं। जें पढियंतेनि पुसिलें नाहीं।
सहसा कैसें काई। सांगा म्हणों॥ ३१॥

मी जरी सलगीचा चांगु। तरी काय आइसीहुनी अंतरंगु।
परी तेही हा प्रसंगु। बिहाली पुसों॥ ३२॥

माझी आवडे तैसी सेवा जाहली। तरी काय होईल गरुडाचिया येतुली।
परी तोही हे बोली। करीचिना॥ ३३॥

मी काय सनकादिकांहूनि जवळां। परी तयाही नागवेचि हा चाळा।
मी आवडेन काय प्रेमळां। गोकुळींचिया ऐसा॥ ३४॥

तयातेंही लेकुरपणें झकविलें। एकाचे गर्भवासही साहिले।
परी विश्वरूप हें राहविलें। न दावीच कवणा॥ ३५॥

हा ठायवरी गुज। याचिये अंतरीचें हें निज।
केवीं उराउरी मज। पुसों ये पां॥ ३६॥

आणि न पुसेंचि जरी म्हणें। तरी विश्वरूप देखिलियाविणें।
सुख नोहेचि परी जिणें। तेंही विपायें॥ ३७॥

म्हणोनि आतां पुसों अळुमाळसें। मग करूं देवा ठाके तैसें।
येणें प्रवर्तला साध्वसें। पार्थु बोलों॥ ३८॥

परी तेंचि ऐसेनि भावें। जें एका दों उत्तरांसवे।
दावी विश्वरूप आघवें। झाडा देउनि॥ ३९॥

अहो वांसरू देखिलियाचि साठी। धेनु खडबडोनि मोहें उठी।
मग स्तनामुखाचिये भेटी। काय पान्हा न ये॥ ४०॥

पाहा पां तयां पांडवाचेनि नांवें। जो श्रीकृष्ण रानींही प्रतिपाळुं धावे।
तयांतें अर्जुनें जंव पुसावें। तंव साहील काई॥ ४१॥

तो सहजेंचि स्नेहाचें अवतरण। आणि येरु स्नेहा घातलें आहे माजवण।
ऐसिये मिळणी वेगळेपण। उरे हेंचि बहु॥ ४२॥

म्हणोनि अर्जुनाचिया बोलासरिसा। देव विश्वरूप होईल आपैसा।
तोचि पहिला प्रसंगु ऐसा। ऐकिजो तरी॥ ४३॥

अर्जुन उवाच।
मदनुग्रहाय परमं गुह्यमध्यात्मसंज्ञितम्॥
यत्त्वयोक्तं वचस्तेन मोहोऽयं विगतो मम॥ ११.१॥

मग पार्थु देवातें म्हणे। जी तुम्हीं मजकारणें।
वाच्य केलें न बोलणें। कृपानिधे॥ ४४॥

जैं महाभूतें ब्रह्मीं आटती। जीव महदादींचें ठाव फिटती।
तैं जें देव होऊनि ठाकती। तें विसवणें शेषींचें॥ ४५॥

होतें हृदयाचियें परीवरीं। रोंविलें कृपणाचिये परी।

शब्दब्रह्मासिही चोरी। जयाची केली॥ ४६॥

तें तुम्हीं आजि आपुलें। मजपुढां हियें फोडिलें।
जया अध्यात्मा वोवाळिलें। ऐश्वर्य हरें॥ ४७॥

ते वस्तु मज स्वामी। एकिहेळां दिधली तुम्हीं।
हें बोलों तरी आम्ही। तुज पावोनि भिन्न कैंचे॥ ४८॥

परी साचचि महामोहाचियें पुरीं। बुडालेया देखोनि सीसवरी।
तुवां आपणपें घालोनि श्रीहरी। मग काढिलें मातें॥ ४९॥

एक तूं वांचूनि कांहीं। विश्वीं दुजियाची भाष नाहीं।
कीं आमुचें कर्म पाहीं। जे आम्ही आथी म्हणों॥ ५०॥

मी जगीं एक अर्जुनु। ऐसा देहीं वाहें अभिमानु।
आणि कौरवांतें इया स्वजनु। आपुले म्हणें॥ ५१॥

याहीवरी यांतें मी मारीन। म्हणें तेणें पापें कें रिगेन।
ऐसें देखत होतों दुःस्वप्न। तों चेवविला प्रभु॥ ५२॥

देवा गंधर्वनगरीची वस्ती। सोडूनि निघालों लक्ष्मीपती।
होतों उदकाचिया आर्ती। रोहिणी पीत॥ ५३॥

जी किरडूं तरी कापडाचें। परी लहरी येत होतिया साचें।
ऐसें वायां मरतया जीवाचें। श्रेय तुवां घेतलें॥ ५४॥

आपुलें प्रतिबिंब नेणतां। सिंह कुहां घालील देखोनि आतां।
ऐसा धरिजे तेवीं अनंता। राखिले मातें॥ ५५॥

एऱ्हवीं माझा तरीं येतुलेवरी। एथ निश्चय होता अवधारीं।
जें आतांचि सातांही सागरीं। एकत्र मिळिजे॥ ५६॥

हें युगचि आघवें बुडावें। वरी आकाशहि तुटोनि पडावें।
परी झुंजणें न घडावें। गोत्रजेंसीं मज॥ ५७॥

ऐसिया अहंकाराचिये वाढी। मियां आग्रहजळीं दिधली होती बुडी।
चांगचि तूं एऱ्हवीं काढी। कवणु मातें॥ ५८॥

नाथिलें आपणपें एक मानिलें। आणि नव्हतया नाम गोत्र ठेविलें।
थोर पिसें होतें लागलें। परी राखिलें तुम्हीं॥ ५९॥

मागां जळत काढिलें जोहरीं। तैं तें देहासीच भय अवधारीं।
आतां हे जोहरवाहर दुसरी। चैतन्यासकट॥ ६०॥

दुराग्रहें हिरण्याक्षें। माझी बुद्धिवसुंधरा सूदली काखे।
मग मोहार्णव गवाक्षे। रिघोनि ठेला॥ ६१॥

तेथ तुझेनि गोसावीपणें। एकवेळ बुद्धीचिया ठाया येणें।
हें दुसरें वराह होणें। पडिले तुज॥ ६२॥

ऐसें अपार तुझें केलें। एकी वाचा काय मी बोलें।
परी पांचही पालव मोकलिले। मजप्रती॥ ६३॥

तें कांहीं न वचेचि वायां। भलें यश फावलें देवराया।
जे साद्यन्त माया। निरसिली माझी॥ ६४॥

आजि आनंदसरोवरींचीं कमळें। तैसे जे हे तुझे डोळे।
आपुलिया प्रसादाची राउळें। जयालागीं करिती॥ ६५॥

हां हो तयाही आणि मोहाची भेटी। हे कायसी पाबळी गोठी।
केउती मृगजळाची वृष्टी। वडवानळेंसीं॥ ६६॥

आणि मी तंव दातारा। कृपेचियें ये रिघोनि गाभारां।
घेत आहें चारा। ब्रह्मरसाचा॥ ६७॥

तेणें माझा जी मोह जाये। एथ विस्मो कांहीं आहे।
तरी उद्धरलों कीं तुझे पाय। शिवतले आहाती॥ ६८॥

भवाप्ययौ हि भूतानां श्रुतौ विस्तरशो मया।
त्वत्तः कमलपत्राक्ष माहात्म्यमपि चाव्ययम्॥ ११.२॥

पैं कमलायतडोळसा। सूर्यकोटितेजसा।
मियां तुजपासोनि महेशा। परीसिलें आजि॥ ६९॥

इयें भूतें जयापरी होती। अथवा लया हन जैसेनि जाती।
ते मजपुढां प्रकृती। विवंचिली देवें॥ ७०॥

आणि प्रकृति कीर उगाणा दिधला। परी पुरुषाचाही ठावो दाविला।
जयाचा महिमा पांघरोनि जाहला। धडौता वेदु॥ ७१॥

जी शब्दराशी वाढे जिये। कां धर्मा ऐशिया रत्नातें विये।
ते एथिचे प्रभेचे पाये। वोळगे म्हणोनि॥ ७२॥

ऐसें अगाध माहात्म्य। जें सकळमार्गैकगम्य।
जें स्वात्मानुभवरम्य। तें इयापरी दाविलें॥ ७३॥

जैसा केरु फिटलिया आभाळीं। दिठी रिगे सूर्यमंडळीं।
कां हातें सारूनि बाबुळी। जळ देखिजे॥ ७४॥

ना तरी उकलूनियां सापाचे वेढे। जैसें चंदना खेंव देणें घडे।
अथवा विवसी पळे मग चढे। निधान हातां॥ ७५॥

तैसी प्रकृति हे आड होती। ते देवेंचि सारिली परौती।
मग परतत्त्व माझिये मती। शेजार केलें॥ ७६॥

म्हणोनि इयेविषयींचा मज देवा। भरंवसा कीर जाहला जीवा।
परी आणीक एक हेवा। उपनला असे॥ ७७॥

तो भिडां जरी म्हणों राहों। तरी आना कवणा पुसों जावों।
काइ तुंवांचोनि ठावो। जाणत आहों आम्ही॥ ७८॥

जळचरु जळाचा आभारु धरी। बाळक स्तनपानीं उपरोधु करी।
तरी तया जिणयासी श्रीहरी। आन उपायो असे॥ ७९॥

म्हणोनि भीडसांकडी न धरवे। जीवीं आवडे तेंही तुजपुढां बोलावें।
तंव राहें म्हणितलें देवें। चाड सांगें॥ ८०॥

एवमेतद् यथात्थ त्वमात्मानं परमेश्वर॥
द्रष्टुमिच्छामि ते रूपम् ऐश्वरं पुरुषोत्तम॥ ११.३॥

मग बोलिला तो किरीटी। म्हणे तुम्हीं केली जे गोठी।
तिया प्रतीतीची दिठी। निवाली माझी॥ ८१॥

आतां जयाचेनि संकल्पें। हे लोकपरंपरा होय हारपे।
जया ठायातें आपणपें। मी ऐसें म्हणसी॥ ८२॥

तें मुद्दल स्वरूप तुझें। जेथूनि इयें द्विभुजें हन चतुर्भुजें।
सुरकार्याचेनि व्याजें। घेवों घेवों येसी॥ ८३॥

पैं जळशयनाचिया अवगणिया। कां मत्स्य कूर्म इया मिरवणिया।
खेळु सरलिया तूं गुणिया। सांठविसी जेथ॥ ८४॥

उपनिषदें जें गाती। योगिये हृदयीं रिगोनि पाहाती।
जयातें सनकादिक आहाती। पोटाळुनियां॥ ८५॥

ऐसें अगाध जें तुझें। विश्वरूप कानीं ऐकिजे।
तें देखावया चित्त माझें। उतावीळा देवा॥ ८६॥

देवें फेडूनियां सांकड। लोभें पुसिली जरी चाड।
तरी हेचि एकी वाड। आर्ती जी मज॥ ८७॥

तुझें विश्वरूपपण आघवें। माझिये दिठीसि गोचर होआवें।
ऐसी थोर आस जीवें। बांधोनि आहें॥ ८८॥

मन्यसे यदि तच्छक्यं मया द्रष्टुमिति प्रभो॥
योगेश्वर ततो मे त्वं दर्शयामानमव्ययम्॥ ११.४॥

परी आणीक एक एथ शार्ङ्गी। तुज विश्वरूपातें देखावयालागीं।
योग्यता माझां अंगीं। असे कीं नाहीं॥ ८९॥

हें आपलें आपण मी नेणें। तें कां नेणसी जरी देव म्हणे।
तरी रोगिया काय जाणे। निदान रोगाचें॥ ९०॥

आणि जी आर्तीचेनि पडिभरें। आर्तु आपुली ठाकी पैं विसरे।
जैसा तान्हेला म्हणे न पुरे। समुद्र मज॥ ९१॥

ऐसी सचाडपणाचिये भुली। न सांभाळवे समस्या आपुली।
यालागीं योग्यता जेवीं माउली। बाळकाची जाणे॥ ९२॥

तयापरी श्रीजनार्दना। विचारिजो माझी संभावना।
मग विश्वरूपदर्शना। उपक्रम कीजे॥ ९३॥

तरी तैसी ते कृपा करा। एऱ्हवीं नव्हे हें म्हणां अवधारा।
वायां पंचमालापें बधिरा। सुख केउतें देणें॥ ९४॥

एऱ्हवीं येकल्या बापियाचिया तृषे। मेघ जगापुरतें काय न वर्षे।
परी जाहलीही वृष्टि उपखे। जऱ्ही खडकीं होय॥ ९५॥

चकोरा चंद्रामृत फावले। येरा आण वाहुनि काय वारिलें।
परी डोळ्यांवीण पाहलें। वाया जाय॥ ९६॥

म्हणोनि विश्वरूप तूं सहसा। दाविसी हा कीर भरवंसा।
कां जे कडाडां आणि गहिंसां। माजी नित्य नवा तूं कीं॥ ९७॥

तुझें औदार्य जाणों स्वतंत्र। देतां न म्हणसी पात्रापात्र।
पैं कैवल्य ऐसें पवित्र। कीं वैरियांहीं दिधलें॥ ९८॥

मोक्षु दुराराध्यु कीर होय। परी तोही आराधी तुझे पाय।
म्हणोनि धाडिसी तेथ जाय। पाइकु जैसा॥ ९९॥

तुवां सनकादिकांचेनि मानें। सायुज्यीं सौरसु दिधला पूतने।
जे विषाचेनि स्तनपानें। मारूं आली॥ १००॥

हां गा राजसूयाच्यां सभासदीं। देखतां त्रिभुवनाची मांदी।
कैसा शतधा दुर्वाक्य शब्दीं। निस्तेजिलासी॥ १०१॥

ऐशिया अपराधिया शिशुपाळा। आपणपयां ठावो दिधला गोपाळा।
आणि उत्तानचरणाचिया बाळा। काय ध्रुवपदीं चाड॥ १०२॥

तो वना आला याचिलागीं। जे बैसावें पितयाचां उत्संगीं।
कीं तो चंद्रसूर्यादिकांपरीस जगीं। श्लाघ्यु केला॥ १०३॥

ऐसा वनवासियां सकळां। देतां एकचि तूं धसाळा।
पुत्रा आळवितां अजामिळा। आपणपें देसी॥ १०४॥

जेणें उरीं हाणितलासि पांपरा। तयाचा चरणु वाहासी दातारा।
अझुनि वैरियांचिया कलेवरा। विसंबसीना॥ १०५॥

ऐसा अपकारियां तुझा उपकारु। तूं अपात्रींही परी उदारु।
दान मागोनि दारवंटेकरु। जाहलासी बळीचा॥ १०६॥

तूंतें आराधी ना आयके। होती पुंसा बोलावित कौतुकें।
तिये वैकुंठीं तुवां गणिके। सुरवाडु केला॥ १०७॥

ऐसीं पाहूनि वायाणीं मिषें। लागलासी आपणपें देवों वानिवसें।
तो तूं कां अनारिसें। मजलागीं करिसी॥ १०८॥

हां गा दुभतयाचेनि पवाडें। जे जगाचें फेडी साकडें।
तिये कामधेनूचे पाडे। काय भुकेले ठाती॥ १०९॥

म्हणोनि मियां जें विनविलें कांहीं। तें देव न दाखविती हें कीर नाहीं।
परी देखावयालागीं देई। पात्रता मज॥ ११०॥

तुझें विश्वरूप आकळे। ऐसे जरी जाणसी माझे डोळे।
तरी आर्तीचे डोहळे। पुरवीं देवा॥ १११॥

ऐसी ठायेंठावो विनंती। जंव करूं सरैल सुभद्रापती।
तंव तया षड्गुणचक्रवर्ती। साहवेचिना॥ ११२॥

तो कृपापीयुषसजळु। आणि येरु जवळां आला वर्षाकाळु।
नाना कृष्ण कोकिळु। अर्जुन वसंतु॥ ११३॥

नातरी चंद्रबिंब वाटोळें। देखोनि क्षीरसागर उचंबळे।
तैसा दुणेंही वरी प्रेमबळें। उल्लसितु जाहला॥ ११४॥

मग तिये प्रसन्नतेचेनि आटोपें। गाजोनि म्हणितलें सकृपें।
पार्था देख देख अमुपें। स्वरूपें माझीं॥ ११५॥

एकचि विश्वरूप देखावें। ऐसा मनोरथु केला पांडवें।
कीं विश्वरूपमय आघवें। करूनि घातलें॥ ११६॥

बाप उदार देवो अपरीमितु। याचक स्वेच्छा सदोदितु।
असे सहस्रवरी देतु। सर्वस्व आपुलें॥ ११७॥

अहो शेषाचेहि डोळे चोरिले। वेद जयालागीं झकविले।
लक्ष्मीयेही परी राहिलें। जिव्हार जें॥ ११८॥

तें आतां प्रगटुनी अनेकधा। करीत विश्वरूपदर्शनाचा धांदा।
बाप भाग्या अगाधा। पार्थाचिया॥ ११९॥

जो जागता स्वप्नावस्थे जाये। तो जेवीं स्वप्नींचें आघवें होये।
तेवीं अनंत ब्रह्मकटाह आहे। आपणचि जाहला॥ १२०॥

तेथिंची सहसा मुद्रा सोडिली। आणि स्थूळ दृष्टीची जवनिका फाडिली।
किंबहुना उघडिली। योगऋद्धि॥ १२१॥

परी हा हें देखेल कीं नाहीं। ऐसी सेचि न करी कांहीं।
एकसरां म्हणतसे पाहीं। स्नेहातुर॥ १२२॥

श्रीभगवानुवाच।
पश्य मे पार्थ रूपाणि शतशोऽथ सहस्रशः॥
नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतीनि च॥ ११.५॥

अर्जुना तुवां एक दावा म्हणितलें। आणि तेंचि दावूं तरी काय दाविलें।
आतां देखें आघवें भरिलें। माझ्यांचि रूपीं॥ १२३॥

एकें कृशें एकें स्थूळें। एकें ऱ्हस्वें एकें विशाळें।
पृथुतरें सरळें। अप्रांतें एकें॥ १२४॥

एकें अनावरें प्रांजळें। सव्यापारें निश्चळें।
उदासीनें स्नेहाळें। तीव्रें एकें॥ १२५॥

एके घूर्णितें सावधें। असलगें एकें अगाधें।
एकें उदारें अतिबद्धें। क्रुद्धें एकें॥ १२६॥

एकें शांतें सन्मदें। स्तब्धें एकें सानंदें।
गर्जितें निःशब्दें। सौम्यें एकें॥ १२७॥

एकें साभिलाषें विरक्तें। उन्निद्रितें एकें निद्रितें।
परीतुष्टें एकें आर्तें। प्रसन्नें एकें॥ १२८॥

एकें अशस्त्रें सशस्त्रें। एकें रौद्रें अति मित्रें।
भयानकें एकें पवित्रें। लयस्थें एकें॥ १२९॥

एकें जननलीलाविलासें। एकें पालनशीलें लालसें।
एकें संहारकें सावेशें। साक्षिभूतें एकें॥ १३०॥

एवं नानाविधें परी बहुवसें। आणि दिव्यतेजप्रकाशें।
तेवींचि एक एका ऐसें। वर्णेंही नव्हे॥ १३१॥

एकें तातलें साडेपंधरें। तैसीं कपिलवर्णें अपारें।
एकें सरागें जैसें सिंदुरें। डवरलें नभ॥ १३२॥

एकें सावियाचि चुळुकी। जैसें ब्रह्मकटाह खचिलें माणिकीं।
एकें अरुणोदयासारिखीं। कुंकुमवर्णें॥ १३३॥

एकें शुद्धस्फटिक सोज्वळें। एकें इंद्रनीळ सुनीळें।
एकें अंजनाचल सकाळें। रक्तवर्णें एकें॥ १३४॥

एकें लसत्कांचनसम पिवळीं। एकें नवजलदश्यामळीं।
एकें चांपेगौरीं केवळीं। हरितें एकें॥ १३५॥

एकें तप्तताम्र तांबडीं। एकें श्वेतचंद्र चोखडीं।
ऐसीं नानावर्णें रूपडीं। देख माझीं॥ १३६॥

हे जैसे कां आनान वर्ण। तैसें आकृतींही अनारिसेपण।
लाजा कंदर्प रिघाला शरण। तैसें सुंदरें एकें॥ १३७॥

एकें अतिलावण्य साकारें। एकें स्निग्धवपु मनोहरें।
शृंगारश्रियेचीं भांडारें। उघडिलीं जैसीं॥ १३८॥

एकें पीनावयव मांसाळें। एकें शुष्कें अतिविक्राळें।
एकें दीर्घकंठें विताळें। विकटें एकें॥ १३९॥

एवं नानाविधाकृती। इयां पाहतां पारु नाहीं सुभद्रापती।
जयाचां एकेकीं अंगप्रांतीं। देख पां जग॥ १४०॥

पश्यादित्यान् वसून् रुद्रान् अश्विनौ मरुतस्तथा॥
बहून्यदृष्टपूर्वाणि पश्याश्चर्याणि भारत॥ ११.६॥

जेथ उन्मीलन होत आहे दिठी। तेथ पसरती आदित्यांचिया सृष्टी।
पुढती निमीलनीं मिठी। देत आहाती॥ १४१॥

वदनींचिया वाफेसवें। होत ज्वाळामय आघवें।
जेथ पावकादिक पावे। समूह वसूंचे॥ १४२॥

आणि भ्रूलतांचे शेवट। कोपें मिळों पाहती एकवाट।
तेथ रुद्रगणांचे संघाट। अवतरत देखें॥ १४३॥

पैं सौम्यतेचां बोलावां। मिती नेणिजे अश्विनौदेवां।
श्रोत्रीं होती पांडवा। अनेक वायु॥ १४४॥

यापरी एकेकाचिये लीळे। जन्मती सुरसिद्धांचीं कुळें।
ऐसीं अपारें आणि विशाळें। रूपें इयें पाहीं॥ १४५॥

जयातें सांगावया वेद बोबडे। पहावया काळाचेंही आयुष्य थोडें।
धातयाही परी न सांपडे। ठाव जयांचा॥ १४६॥

जयांतें देवत्रयी कहीं नायके। तियें इयें प्रत्यक्ष देख अनेकें।
भोगीं आश्चर्याची कवतिकें। महासिद्धी॥ १४७॥

इहैकस्थं जगत्कृत्स्नं पश्याद्य सचराचरम॥
मम देहे गुडाकेश यच्चान्यद्द्रष्टुमिच्छसि॥ ११.७ ॥

इया मूर्तीचिया किरीटी। रोममूळीं देखें पां सृष्टी।
सुरतरुतळवटीं। तृणांकुर जैसे॥ १४८ ॥

आणि वाताचेनि प्रकाशें। उडतां परमाणु दिसती जैसे।
भ्रमत ब्रह्मकटाह तैसें। अवयवसंधीं॥ १४९ ॥

एथ एकैकाचिया प्रदेशीं। विश्व देख विस्तारेंशी।
आणि विश्वाही परौतें मानसी। जरी देखावें वर्ते॥ १५०॥

तरी तियेही विषयींचें कांहीं। एथ सर्वथा सांकडें नाहीं।
सुखें आवडे तें माझ्यां देहीं। देखसी तूं॥ १५१॥

ऐसें विश्वमूर्ती तेणें। बोलिलें कारुण्यपूर्णें।
तंव देखत आहे कीं नाहीं न म्हणें। निवांतुचि येरु॥ १५२॥

एथ कां पां हा उगला। म्हणोनि श्रीकृष्णें जंव पाहिला।
तंव आर्तीचें लेणें लेइला। तैसाचि आहे॥ १५३॥

न तु मां शक्यसे द्रष्टुम् अनेनैव स्वचक्षुषा॥
दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगमैश्वरम्॥ ११.८ ॥

मग म्हणें उत्कंठे वोहट न पडे। अझुनी सुखाची सोय न सांपडे।
परी दाविलें तें फुडें। नाकळेचि यया॥ १५४ ॥

हे बोलोनि देवो हांसिले। हांसोनि देखणिया म्हणितलें।
आम्हीं विश्वरूप तरी दाविलें। परी न देखसीच तूं॥ १५५ ॥

यया बोला येरें विचक्षणें। म्हणितलें हां जी कवणासी तें उणें।
तुम्ही बकाकरवीं चांदिणें। चरवूं पहा मा॥ १५६ ॥

हां हो उटोनियां आरिसा। आंधळिया दऊँ बैसा।
बहिरियापुढें हृषीकेशा। गाणीव करा॥ १५७ ॥

मकरंदकणाचा चारा। जाणतां घालूनि दर्दुरा।
वायां धाडा शार्ङ्गधरा। कोपा कवणा॥ १५८ ॥

जें अतींद्रिय म्हणोनि व्यवस्थिलें। केवळ ज्ञानदृष्टीचिया विभागा फिटलें।
तें तुम्हीं चर्मचक्षूंपुढें सूदलें। मी कैसेनि देखों॥ १५९ ॥

परी हें तुमचें उणें न बोलावें। मीचि साहें तेंचि बरवें।
एथ आथि म्हणितलें देवें। मानूं बापा॥ १६०॥

साच स्वरूप जरी आम्हीं दावावें। तरी आधीं देखावया सामर्थ्य कीं द्यावें।
परी बोलत प्रेमभावें। धसाळ गेलों॥ १६१॥

काय जाहलें न वाहतां भुई पेरिजे। तरी तो वेळु विलया जाइजे।
तरी आतां माझें निजरूप देखिजे। ते दृष्टी देवों तुज॥ १६२॥

मग तिया दृष्टी पांडवा। आमुचा ऐश्वर्ययोगु आघवा।
देखोनियांअनुभवा। माजिवडा करीं॥ १६३॥

ऐसें तेणें वेदांतवेद्यें। सकळलोकैक आद्यें।
बोलिलें आराध्यें। जगाचेनि॥ १६४ ॥

संजय उवाच।
एवमुक्त्वा ततो राजन् महायोगेश्वरो हरिः॥
दर्शयामास पार्थाय परमं रूपमैश्वरम्॥ ११.९ ॥

पैं कौरवकुळचक्रवर्ती। मज हाचि विस्मयो पुढतपुढती।
जे श्रियेहुनि त्रिजगतीं। सदैव असे कवणी॥ १६५ ॥

ना तरी खुणेचें वानावयालागीं। श्रुतीवांचूनि दावा पां जगीं।
ना सेवकपण तरी अंगीं। शेषाच्यांचि आथी॥ १६६ ॥

हां हो जयाचेनि सोसें। शिणत आठही पाहार योगी जैसे।
अनुसरलें गरुडा ऐसें। कवण आहे॥ १६७ ॥

परी तें आघवेंचि एकीकडे ठेलें। सापें कृष्णसुख एकंदरें जाहलें।
जिये दिवसीहूनि जन्मले। पांडव हे॥ १६८॥

परी पांचांही आंतु अर्जुना। श्रीकृष्ण सावियाचि जाहला अधीना।
कामुक कां जैसा अंगना। आपैता कीजे॥ १६९ ॥

पढविलें पाखिरूं ऐसें न बोले। यापरी क्रीडामृगही तैसा न चले।

कैसें दैव एथ सुरवाडलें। तें जाणों न ये॥ १७०॥

आजि परब्रह्म हें सगळें। भोगावया सदैव याचेचि डोळे।
कैसें वाचेचे हन लळे। पाळीत असे॥ १७१॥

हा कोपे कीं निवांतु साहे। हा रुसे तरी बुझावीत जाये।
नवल पिसें लागलें आहे। पार्थाचें देवा॥ १७२॥

एऱ्हवीं विषय जिणोनि जन्मले। जे शुकादिक दादुले।
ते विषयोचि वानितां जाहले। भाट ययाचे॥ १७३॥

हा योगियांचें समाधिधन। कीं होऊनि ठेलें पार्था अधीन।
यालागीं विस्मयो माझें मन। करीतसे राया॥ १७४॥

तेवींचि संजय म्हणे कायसा। विस्मयो एथ कौरवेशा।
कृष्णें स्वीकारिजे तया ऐसा। भाग्योदय होय॥ १७५॥

म्हणोनि तो देवांचा रावो। म्हणे पार्था ते तुज दृष्टि देवों।
जया विश्वरूपाचा ठावो। देखसी तूं॥ १७६॥

ऐसीं श्रीमुखौनि अक्षरें। निघती ना जंव एकसरें।
तंव अविद्येचें आंधारें। जावोंचि लागे॥ १७७॥

तीं अक्षरें नव्हती देखा। ब्रह्मसाम्राज्यदीपिका।
अर्जुनालागीं चित्कळिका। उजळलिया श्रीकृष्णें॥ १७८॥

मग दिव्यचक्षु प्रगटला। तया ज्ञानदृष्टी फाटा फुटला।
ययापरी दाविता जाहला। ऐश्वर्य आपुलें॥ १७९॥

हे अवतार जे सकळ। ते जिये समुद्रींचे कां कल्लोळ।
विश्व हें मृगजळ। जया रश्मीस्तव दिसे॥ १८०॥

जिये अनादिभूमिके निटे। चराचर हें चित्र उमटे।
आपणपें वैकुंठें। दाविलें तया॥ १८१॥

मागां बाळपणीं येणें श्रीपती। जैं एक वेळ खादली होती माती।
तैं कोपोनियां हातीं। यशोदा धरिला॥ १८२॥

मग भेणें भेणें जैसें। मुखीं झाडा द्यावयाचेनि मिसें।
चवदाही भुवनें सावकाशें। दाविलीं तिये॥ १८३॥

ना तरी मधुवनीं ध्रुवासि केलें। जैसें कपोल शंखें शिवतलें।
आणि वेदांचियेही मती ठेले। तें लागला बोलों॥ १८४॥

तैसा अनुग्रहो पैं राया। श्रीहरी केला धनंजया।
आतां कवणेकडे ही माया। ऐसी भाषा नेणेचि तो॥ १८५॥

एकसरें ऐश्वर्यतेजें पाहलें। तया चमत्काराचे एकार्णव जाहलें।
चित्त समाजीं बुडोनि ठेलें। विस्मयाचियां॥ १८६॥

जैसा आब्रह्म पूर्णोदकीं। पोहे मार्कंडेय एकाकी।
तैसा विश्वरूपकौतुकीं। पार्थु लोळे॥ १८७॥

म्हणे केवढें गगन एथ होतें। तें कवणें नेलें पां केउतें।
तीं चराचर महाभूतें। काय जाहलीं॥ १८८॥

दिशांचे ठावही हारपले। अधोर्ध्व काय नेणों जाहले।
चेइलिया स्वप्न तैसे गेले। लोकाकार॥ १८९॥

नाना सूर्यतेजप्रतापें। सचंद्र तारांगण जैसें लोपे।
तैसी गिळिली विश्वरूपें। प्रपंचरचना॥ १९०॥

तेव्हां मनासी मनपण न स्फुरे। बुद्धि आपणपें न सावरे।
इंद्रियांचे रश्मी माघारे। हृदयवरी भरले॥ १९१॥

तेथ ताटस्थ्या ताटस्थ्य पडिलें। टकासी टक लागलें।
जैसें मोहनास्त्र घातलें। विचारजातां॥ १९२॥

तैसा विस्मितु पाहे कोडें। तंव पुढां होतें चतुर्भुज रूपडें।
तेंचि नानारूप चहूंकडे। मांडोनि ठेलें॥ १९३॥

जैसें वर्षाकाळींचें मेघौडें। का महाप्रळयींचें तेज वाढे।
तैसें आपणेनवीण कवणीकडे। नेदीचि उरों॥ १९४॥

प्रथम स्वरूपसमाधान। पावोनि ठेला अर्जुन।
सवेचि उघडी लोचन। तंव विश्वरूप देखे॥ १९५॥

इहींचि दोहीं डोळां। पाहावें विश्वरूपा सकळा।
तोहि श्रीकृष्णें सोहळा। पुरविला ऐसा॥ १९६॥

अनेकवक्त्रनयनम् अनेकाद्भुतदर्शनम्॥
अनेकदिव्याभरणं दिव्यानेकोद्यतायुधम्॥ ११.१०॥

मग तेथ सैंघ देखे वदनें। जैसी रमानायकाची राजभुवनें।
नाना प्रगटलीं निधानें। लावण्यश्रियेचीं॥ १९७॥

कीं आनंदाचीं वनें सासिन्नलीं। जैसी सौंदर्या राणीव जोडली।
तैसीं मनोहरें देखिलीं। हरीचीं वक्त्रें तेणें॥ १९८॥

तयांही माजीं एकैकें। सावियाचि भयानकें।
काळरात्रीचीं कटकें। उठावलीं जैसीं॥ १९९॥

कीं यें मृत्यूसीचि मुखें जाहलीं। हो कां जें भयाचीं दुर्गें पन्नासिलीं।
कीं महाकुंडे उघडलीं। प्रळयानळाचीं॥ २००॥

तैसीं अद्भुतें भयासुरें। तेथ वदनें देखिलीं वीरें।
आणिकें असाधारणें साळंकारें। सौम्यें बहुतें॥ २०१॥

पैं ज्ञानदृष्टीचेनि अवलोकें। परी वदनांचा शेवटु न टके।
मग लोचन तें कवतिकें। लागला पाहों॥ २०२॥

तंव नानावर्णें कमळवनें। कीं विकसिलीं तैसे अर्जुनें।
डोळे देखिले पालिंगनें। आदित्यांची॥ २०३॥

तेथेंचि कृष्णमेघाचिया दाटी। माजीं कल्पांत विजूंचिया स्फुटी।
तैसिया वन्हि पिंगळा दिठी। भ्रूभंगातळीं॥ २०४॥

हें एकेक आश्चर्य पाहतां। तिये एकेचि रूपीं पांडुसुता।
दर्शनाची अनेकता। प्रतिफळली॥ २०५॥

मग म्हणे चरण ते कवणेकडे। केउते मुकुट कें दोर्दंडें।
ऐसी वाढविताहे कोडें। चाड देखावयाची॥ २०६॥

तेथ भाग्यनिधि पार्था। कां विफलत्व होईल मनोरथा।
काय पिनाकपाणीचियां भातां। वायकांडीं आहाती॥ २०७॥

ना तरी चतुराननाचिये वाचे। काय आहाती लटिकिया अक्षरांचे सांचे।
म्हणोनि साद्यंतपण अपारांचे। देखिलें तेणें॥ २०८॥

जयाची सोय वेदा नाकळे। तयाचे सकळावयव एकेचि वेळे।
अर्जुनाचेदोन्ही डोळे। भोगिते जाहले॥ २०९॥

चरणौनि मुकुटवरी। देखत विश्वरूपाची थोरी।
जे नाना रत्न अलंकारीं। मिरवत असे॥ २१०॥

परब्रह्म आपुलेनि आंगें। ल्यावया आपणचि जाहला अनेगें।
तियें लेणीं मी सांगें। काइसयासारिखीं॥ २११॥

जिये प्रभेचिये झळाळा। उजाळु चंद्रादित्यमंडळा।
जे महातेजाचा जिव्हाळा। जेणें विश्व प्रकटे॥ २१२॥

तो दिव्यतेज शृंगारु। कोणाचिये मतीसी होय गोचरु।
देव आपणपेंचि लेइले ऐसें वीरु। देखत असे॥ २१३॥

आपण आंग आपण अलंकार। आपण हात आपण हातियार।
आपण जीव आपण शरीर। देखें चराचर कोंदलें देवे॥ २१४॥

मग तेथेंचि ज्ञानाचां डोळां। पहात करपल्लवां जंव सरळा।
तंव तोडित कल्पांतीचिया ज्वाळा। तैसीं शस्त्रें झळकत देखे॥ २१५॥

जयांचिया किरणांचेनि निखरेपणें। नक्षत्रांचे होत फुटाणे।
तेजें खिरडला वन्हि म्हणे। समुद्रीं रिघों॥ २१६॥

मग कालकूटकल्लोळीं कवळिलें। नाना महाविजूंचें दांग उमटलें।
तैसे अपार कर देखिले। उद्यितायुधीं॥ २१७॥

दिव्यमाल्याम्बरधरं दिव्यगन्धानुलेपनम्॥
सर्वाश्चर्यमयं देवम् अनन्तं विश्वतोमुखम्॥ ११.११॥

कीं भेणें तेथूनि काढिली दिठी। मग कंठ मुगुट पहातसे किरीटी।
तंव सुरतरूंची सृष्टी। जयापासोनि कां जाहली॥ २१८॥

जिये महासिद्धींचीं मूळपीठें। शिणली कमळा जेथ वावटे।
तैसीं कुसुमें अति चोखटें। तुरंबिलीं देखिलीं॥ २१९॥

मुगुटावरी स्तबक। ठायीं ठायीं पूजाबंध अनेक।
कंठीं रुळताति अलौकिक। माळादंड॥ २२०॥

स्वर्गीं सूर्यतेज वेढिलें। जैसें पंधरेनें मेरूतें मढिलें।
तैसें नितंबावरी गाढिलें। पीतांबरु झळके॥ २२१॥

श्रीमहादेवो कापुरें उटिला। कां कैलासु पारदें डवरिला।
नाना क्षीरोदकें पांघरविला। क्षीरार्णवो जैसा॥ २२२॥

जैसी चंद्रमयाची घडी उपलविली। मग गगनाकरवीं बुंथी घालविली।
तैसी चंदनपिंजरीदेखिली। सर्वांगीं तेणें॥ २२३॥

जेणें स्वप्रकाशा कांतीं चढे। ब्रह्मानंदाचा निदाघु मोडे।
जयाचेनि सौरभ्यें जीवित जोडे। वेदवतीये॥ २२४॥

जयाचे निर्लेप अनुलेपु करी। जे अनंगुही सर्वांगीं धरी।
तया सुगंधाची थोरी। कवण वानी॥ २२५॥

ऐसी एकैक शृंगारशोभा। पाहतां अर्जुन जातसे क्षोभा।
तेवींचि देवो बैसला कीं उभा। का सेयांतु हें नेणवे॥ २२६॥

बाहेर दिठी उघडोनि पाहे। तरी आघवें मूर्तिमय देखतु जाये।
मग आतां न पाहे म्हणोनि उगा राहे। तरी आंतुही तैसेंचि॥ २२७॥

अनावरें मुखें समोर देखे। तयाभेणें पाठीमोरा जंव ठाके।
तंव तयाहीकडे श्रीमुखें। कर चरण तैसेचि॥ २२८॥

अहो पाहतां कीर प्रतिभासे। एथ कांहीं नवलावो काई असे।
परी न पाहतांही दिसे। चोज आइका॥ २२९॥

कैसें अनुग्रहाचें करणें। पार्थाचें पाहणें आणि न पाहणें।
तयाही सकट नारायणें। व्यापूनि घातलें॥ २३०॥

म्हणोनि आश्चर्याचियां पुरीं एकीं। पडिला ठायेठाव थडी ठाकी।
तंव चमत्काराचियां आणिकीं। महार्णवीं पडे॥ २३१॥

ऐसा अर्जुनु असाधारणें। आपुलिया दर्शनाचेनि विंदाणें।
कवळूनि घेतला तेणें। अनंतरूपें॥ २३२॥

तो विश्वतोमुख स्वभावें। आणि तेंचि दाखवावयालागीं पांडवें।
प्रार्थिला आतां आघवें। होऊनि ठेला॥ २३३॥

आणि दीपें कां सूर्यें प्रगटे। अथवा निमुटलिया देखावेंचि खुंटे।
तैसी दिठी नव्हे जे वैकुंठें। दिधली आहे॥ २३४॥

म्हणोनि किरीटीसि दोहीं परी। तें देखणें देखे आंधारी।
हें संजयो हस्तिनापुरीं। सांगतसे राया॥ २३५॥

म्हणे किंबहुना अवधारिलें। पार्थें विश्वरूप देखिलें।
नाना आभरणीं भरलें। विश्वतोमुख॥ २३६॥

दिवि सूर्य सहस्रस्य भवेद्युगपदुत्थिता॥
यदि भाः सदृशी सा स्याद् भासस्तस्य महात्मनः॥ ११.१२॥

तिये अंगप्रभेचा देवा। नवलावो काइसया सारिखा सांगावा।
कल्पांतीं एकुचि मेळावा। द्वादशादित्यांचा होय॥ २३७॥

तैसे ते दिव्यसूर्य सहस्रवरी। जरी उदयजती कां एकेचि अवसरीं।
तऱ्ही तया तेजाची थोरी। उपमूं न ये॥ २३८॥

आघवयाचि विजूंचा मेळावा कीजे। आणि प्रळयाग्नीची सर्व सामग्री आणिजे।
तेवींचि दशकुही मेळविजे। महातेजांचा॥ २३९॥

तऱ्ही तिये अंगप्रभेचेनि पाडें। हें तेज कांहीं होईल थोडें।
आणि तया ऐसें कीर चोखडें। त्रिशुद्धी नोहे॥ २४०॥

ऐसें महात्म्य या श्रीहरीचें सहज। फांकतसे सर्वांगींचें तेज।
तें मुनिकृपा जी मज। दृष्टी जाहलें॥ २४१॥

तत्रैकस्थंजगत् कृत्स्नम् प्रविभक्तमनेकधा॥
अपश्यद्देवदेवस्य शरीरे पाण्डवस्तदा॥ ११.१३॥

आणि तिये विश्वरूपीं एकीकडे। जग आघवें आपुलेनि पवाडें।
जैसे महोदधीमाजी बुडबुडे। सिनाने दिसती॥ २४२॥

कां आकाशीं गंधर्वनगर। भूतळीं पिपीलिका बांधे घर।
नाना मेरूवरी सपूर। परमाणु जैसे॥ २४३॥

विश्व आघवेंचि तयापरी। तया देवचक्रवर्तीचिया शरीरीं।
अर्जुन तिये अवसरीं। देखता जाहला॥ २४४॥

ततः स विस्मयाविष्टो हृष्टरोमा धनञ्जयः॥
प्रणम्य शिरसा देवं कृताञ्जलिरभाषत॥ ११.१४॥

तेथ एक विश्व एक आपण। ऐसें अळुमाळ होतें जें दुजेपण।
तेंही आटोनि गेलें अंतःकरण। विरालें सहसा॥ २४५॥

आंतुला महानंदा चेइरें जाहलें। बाहेरि गात्रांचें बळ हारपोनि गेलें।
आपाद पां गुंतलें। पुलकांचलें॥ २४६॥

वार्षिये प्रथमदशे। वोहळलया शैलाचें सर्वांग जैसें।
विरूढे कोमलांकुरीं तैसे। रोमांच आले॥ २४७॥

शिवतला चंद्रकरीं। सोमकांतु द्रावो धरी।
तैसिया स्वेदकणिका शरीरीं। दाटलिया॥ २४८॥

माजीं सापडलेनि अलिकुळें। जळावरी कमळकळिका जेवीं आंदोळे।
तेवीं आंतुलिया सुखोर्मीचेनि बळें। बाहेरि कांपे॥ २४९॥

कर्पूर केळीचीं गर्भपुटें। उकलतां कापुराचेनि कोंदाटें।
पुलिका गळती तेवीं थेंबुटें। नेत्रोनि पडती॥ २५०॥

ऐसा सात्त्विकांही आठां भावां। परस्परें वर्ततसे हेवा।
तेथ ब्रह्मानंदाची जीवा। राणीव फावली॥ २५१॥

उदयलेनि सुधाकरें। जैसा भरलाचि समुद्र भरे।
तैसा वेळोवेळां उर्मीभरें। उचंबळत असे॥ २५२॥

तैसाचि तया सुखानुभवापाठीं। केला द्वैताचा सांभाळु दिठी।
मग उससौनि किरीटी। वास पाहिली॥ २५३॥

तेथ बैठला होता जिया सवा। तयाचिकडे मस्तक खालविला देवा।
मग जोडूनि करसंपुट बरवा। बोलतु असे॥ २५४॥

अर्जुन उवाच।
पश्यामि देवांस्तव देव देहे
सर्वांस्तथा भूतविशेषसङ्घान्॥
ब्रह्माणमीशं कमलासनस्थम्
ऋषींश्च सर्वानुरगांश्च दिव्यान्॥ ११.१५॥

म्हणे जय जयाजि स्वामी। नवल कृपा केली तुम्हीं।
जे हें विश्वरूप कीं आम्हीं। प्राकृत देखों॥ २५५॥

परी साचचि भलें केलें गोसाविया। मज परीतोषु जाहला साविया।
जी देखलासि जो इया। सृष्टीसी तूं आश्रयो॥ २५६॥

देवा मंदराचेनि अंगलगें। ठायीं ठायीं श्वापदांचीं दांगें।
तैसीं इये तुझ्यां देहीं अनेगें। देखतसें भुवनें॥ २५७॥

अहो आकाशचिये खोळे। दिसती ग्रहगणांचीं कुळें।
कां महावृक्षीं अविसाळें। पक्षिजातीचीं॥ २५८॥

तयापरी श्रीहरी। तुझियां विश्वात्मकीं इये शरीरीं।
स्वर्ग देखतसें अवधारीं। सुरगणेंसीं॥ २५९॥

प्रभु महाभूतांचें पंचक। येथ देखत आहें अनेक।
आणि भूतग्राम एकैक। भूतसृष्टीचें॥ २६०॥

जी सत्यलोकु तुजमाजीं आहे। देखिला चतुराननु हा नोहे।
आणि येरीकडे जंव पाहें। तंव कैलासुही दिसे॥ २६१॥

श्रीमहादेव भवानियेशीं। तुझियां दिसतसे एके अंशी।
आणि तूंतेंही गा हृषीकेशी। तुजमाजीं देखें॥ २६२॥

पैं कश्यपादि ऋषिकुळें। इयें तुझियां स्वरूपीं सकळें।
देखतसें पाताळें। पन्नगेंशीं॥ २६३॥

किंबहुना त्रैलोक्यपति। तुझिया एकेकाचि अवयवाचिये भिंती।
इयें चतुर्दशभुवनें चित्राकृती। अंकुरलीं जाणों॥ २६४॥

आणि तेथिंचे जे जे लोक। ते चित्ररचना जी अनेक।
ऐसें देखतसें अलौकिक। गांभीर्य तुझें॥ २६५॥

अनेकबाहूदरवक्त्रनेत्रम्
पश्यामि त्वां सर्वतोऽनन्तरूपम्॥
नांतं न मध्यं न पुनस्तवादिम्
पश्यामि विश्वेश्वर विश्वरूपम्॥ ११.१६॥

तया दिव्यचक्षूंचेनि पैसें। चहुंकडे जंव पाहत असे।
तंव दोर्दंडीं जैसें। आकाश कोंभैलें॥ २६६॥

तैसे एकचि निरंतर। देवा देखतसें तुझे कर।
करीत आघवेचि व्यापार। एकेंचि काळीं॥ २६७॥

मग महाशून्याचेनि पैसारें। उघडलीं ब्रह्मकटाहाचीं भांडारें।
तैसीं देखतसें अपारें। उदरें तुझीं॥ २६८॥

जी सहस्रशीर्षयाचें देखिलें। कोटिवरी होताति एकीवेळें।
कीं परब्रह्मचि वदनफळें। मोडोनि आलें॥ २६९॥

तैसीं वक्त्रें जी जेउतीं तेउतीं। तुझीं देखितसे विश्वमूर्ती।
आणि तयाचिपरी नेत्रपंक्ति। अनेका सैंघ॥ २७०॥

हें असो स्वर्ग पाताळ। कीं भूमी दिशा अंतराळ।
हे विवक्षा ठेली सकळ। मूर्तिमय देखतसें॥ २७१॥

तुजवीण एकादियाकडे। परमाणूहि एतुला कोडें।
अवकाशु पाहतसें परी न सांपडे। ऐसें व्यापिलें तुवां॥ २७२॥

इहीं ना ना भूतीं सहितें। जेतुलीं साठविलीं होतीं महाभूतें।
तेतुलाहि पवाडु तुवा अनंतें। कोंदला देखतसें॥ २७३॥

ऐसा कवणे ठायाहूनि आलासी। एथ बैसलासि कीं उभा आहासि।
आणि तूं कवणिये मायेचिये पोटीं होतासी। तुझें ठाण केवढें॥ २७४॥

तुझें रूप वय कैसें। तुजपैलीकडे काय असे।
तूं काइसयावरी आहासि ऐसें। पाहिलें मियां॥ २७५॥

तंव देखिलें जी आघवेंचि। तरी आतां तुज ठावो तूंचि।
तूं कवणाचा नव्हेसि ऐसाचि। अनादि आयता॥ २७६॥

तूं उभा ना बैठा। दिघडु ना खुजटा।
तुज तळीं वरी वैकुंठा। तूंचि आहासी॥ २७७॥

तूं रूपें आपणयांचि ऐसा। देवा तुझी तूंचि वयसा।
पाठीं पोट परेशा। तुझें तूं गा॥ २७८॥

किंबहुना आतां। तुज तूंचि आघवें अनंता।
हें पुढत पुढती पाहतां। देखिलें मियां॥ २७९॥

परी या तुझिया रूपाआंतु। जी उणीव एक असें देखतु।
जे आदि मध्य अंतु। तिन्हीं नाहीं॥ २८०॥

एऱ्हवीं गिंवसिलें आघवां ठायीं। परी सोय न लाहेचि कहीं।
म्हणोनि त्रिशुद्धी हे नाहीं। तिन्ही एथ॥ २८१॥

एवं आदि मध्यांत रहिता। तूं विश्वेश्वरा अपरिमिता।
तूं देखिलासि जी तत्त्वतां। विश्वरूपा॥ २८२॥

तुज महामूर्तीचियां आंगी। उमटलिया पृथक् मूर्ती अनेगी।
लेइलासि वानें परींचीं आंगीं। ऐसा आवडतु आहासी॥ २८३॥

नाना पृथक् मूर्ती तिया द्रुमवेली। तुझियां स्वरूप महाचळीं।
दिव्यालंकार फुलीं फळीं। सासिन्नलिया॥ २८४॥

हो कां जे महोदधी तूं देवा। जाहलासि तरंगीं मूर्ती हेलावा।
कीं तूं वृक्षु एक बरवा। मूर्तिफळीं फळलासि॥ २८५॥

जी भूतीं भूतळ मांडिलें। जैसें नक्षत्रीं गगन गुढारलें।
तैसें मूर्तिमय भरलें। तुझें देखतसें रूप॥ २८६॥

जी एकेकीचियां अंगप्रांतीं। होय जाय हें त्रिजगतीं।
एवढियाही तुझियां आंगीं मूर्ती। कीं रोमां जालिया॥ २८७॥

ऐसा पवाडु मांडूनि विश्वाचा। तूं कवण पां एथ कैचा।
हें पाहिलें तंव आमुचा। सारथी तोचि तूं॥ २८८॥

तरी मज पाहता मुकुंदा। तूं ऐसाचि व्यापकु सर्वदा।
भक्तानुग्रहें तया मुग्धा। रूपातें धरिसी॥ २८९॥

कैसें चहूं भुजांचें सांवळें। पाहतां वोल्हावती मन डोळे।
खेंव देऊं जाइजे तरी आकळे। दोहींचि बाहीं॥ २९०॥

ऐसी मूर्ति कोडिसवाणी कृपा। करूनि होसी विश्वरूपा।
कीं अमुचियाचि दिठी सलेपा। जे सामान्यत्वें देखती॥

२९१॥

तरी आतां दिठीचा विटाळु गेला। तुवां सहजें दिव्यचक्षु केला।
म्हणोनि यथारूपें देखवला। महिमा तुझा॥ २९२॥

परी मकरतुंडामागिलेकडे। होतासि तोचि तूं एवढें।
रूप जाहलासि हें फुडें। वोळखिलें मियां॥ २९३॥

किरीटिनं गदिनं चक्रिणं च
तेजोराशिं सर्वतो दीप्तिमन्तम्॥
पश्यामि त्वां दुर्निरीक्ष्यं समन्ताद्
दीप्तानलार्कद्युतिमप्रमेयम्॥ ११.१७॥

नोहे तोचि हा शिरीं। मुकुट लेइलासि श्रीहरी।
परी आतांचें तेज आणि थोरी। नवल कीं बहुवें॥ २९४॥

तेंचि हें वरिलिये हातीं। चक्र परीजितया आयती।
सांवरतासि विश्वमूर्ती। ते न मोडे खुण॥ २९५॥

येरीकडे तेचि हे नोहे गदा। आणि तळिलिया दोनी भुजा निरायुधा।
वागोरे सांवरावया गोविंदा। संसरिलिया॥ २९६॥

आणि तेणेंचि वेगें सहसा। माझिया मनोरथासरिसा।
जाहलासि विश्वरूपा विश्वेशा। म्हणोनि जाणें॥ २९७॥

परी कायसें बा हें चोज। विस्मयो करावयाहि पवाडु नाहीं मज।
चित्त होऊनि जात आहे निर्बुज। आश्चर्यें येणें॥ २९८॥

हें एथ आथि कां येथ नाहीं। ऐसें विवरोंही न ये कांहीं।
नवल अंगप्रभेची नवाई। कैसी कोंदली सैंघ॥ २९९॥

एथ अग्नीचीही दिठी करपत। सूर्य खद्योतु तैसे हारपत।
ऐसें तीव्रपण अद्भुत। तेजाचें यया॥ ३००॥

हो कां जे महातेजचियां महार्णवीं। बुडोनि गेली सृष्टि आघवी।
कीं युगांतविजूंचियां पालवीं। झांकलें गगन॥ ३०१॥

नातरी संहारतेजाचिया ज्वाळा। तोडोनि माचु बांधला अंतराळां।
आतां दिव्य ज्ञानाचियांहि डोळां। पाहवेना॥ ३०२॥

उज्वळु अधिकाधिक बहुवसु। धडधडिईत आहे अतिदाहसु।
पडत दिव्यचक्षूंही त्रासु। न्याहाळितां॥ ३०३॥

हो कां जे महाप्रळयींचा भडाडु। होता काळाग्निरुद्राचियां ठायीं गूढु।
तो तृतीयनयनाचा मढु। फुटला जैसा॥ ३०४॥

तैसें पसरलेनि प्रकाशें। सैंघ पांचवनिया ज्वाळांचे वळसे।
पडतां ब्रह्मकटाह कोळिसे। होत आहाती॥ ३०५॥

ऐसा अद्भुत तेजोराशी। जन्मा नवल म्यां देखिलासी।
नाहीं व्याप्ती आणि कांतीसी। पारु जी तुझिये॥ ३०६॥

त्वमक्षरं परमं वेदितव्यम्
त्वमस्य विश्वस्य परं निधानम्॥
त्वमव्ययः शाश्वतधर्मगोप्ता
सनातनस्त्वं पुरुषो मतो मे॥ ११.१८॥

देवा तूं अक्षर। औटाविये मात्रेसि पर।
श्रुति जयाचें घर। गिंवसीत आहाती॥ ३०७॥

जें आकाराचें आयतन। जें विश्वनिक्षेपैकनिधान।
तें अव्यय तूं गहन। अविनाश जी॥ ३०८॥

तूं धर्माचा वोलावा। अनादिसिद्ध तूं नीच नवा।
जाणें मी सदतिसावा। पुरुष विश्वेश तूं॥ ३०९॥

अनादिमध्यान्तमनन्तवीर्यम्
अनन्तबाहुं शशिसूर्यनेत्रम्॥
पश्यामि त्वां दीप्तहुताशवक्त्रम्
स्वतेजसा विश्वमिदं तपन्तम्॥ ११.१९॥

तूं आदिमध्यांत रहितु। स्वसामर्थ्यें तूं अनंतु।
विश्वबाहु अपरिमितु। विश्वचरण तूं॥ ३१०॥

पैं चंद्रचंडांशु डोळां। दावितासि कोपप्रसाद लीळा।
एकां रुससी तमाचियां डोळां। एकां पाळितोसि कृपादृष्टी॥ ३११॥

जी एवंविधा तूंतें। मी देखतसें हें निरुतें।

पेटलें प्रळयाग्नीचें उजितें। तैसें वक्त्र हें तुझें॥ ३१२॥

वणिवेनि पेटले पर्वत। कवळूनि ज्वाळांचे उभड उठत।
तैसी चाटीत दाढा दांतां आंत। जीभ लोळे॥ ३१३॥

इये वदनींचिया उबा। आणि जी सर्वांगकांतिचिया प्रभा।
विश्व तातलें अति क्षोभा। जात आहे॥ ३१४॥

द्यावापृथिव्योरिदमन्तरं हि
व्याप्तं त्वयैकेन दिशश्च सर्वाः॥
दृष्ट्वाऽद्भुतं रूपमुग्रं तवेदम्
लोकत्रयं प्रव्यथितं महात्मन्॥ ११.२०॥

कां जे द्यौलोक पाताळ। पृथिवी आणि अंतराळ।
अथवा दशदिशा समाकुळ। दिशाचक्र॥ ३१५॥

तें आघवेंचि तुंवा एकें। भरलें देखत आहें कौतुकें।
परी गगनाही सकट भयानकें। आप्लविजे जेवीं॥ ३१६॥

ना तरी अद्भुत रसाचियां कल्लोळीं। जाहली चवदाही भुवनांसि कढियाळी।
तैसें आश्चर्यचि मग मी आकळीं। काय एक॥ ३१७॥

नावरे व्याप्ती हे असाधारण। न साहवे रूपाचें उग्रपण।
सुख दूरी गेलें परी प्राण। विपायें धरी जग॥ ३१८॥

देवा ऐसें देखोनियां तूंतें। नेणों कैसें आलें भयाचें भरितें।
आतां दुःखकल्लोळीं झळंबतें। तिन्हीं भुवनें॥ ३१९॥

एऱ्हवीं तुज महात्मयाचें देखणें। तरी भयदुःखासि कां मेळवणें।
परी हें सुख नव्हेचि जेणें गुणें। तें जाणवत आहे मज॥ ३२०॥

जंव तुझें रूप नोहे दिठें। तंव जगासि संसारिक गोमटें।
आतां देखिलासि तरी विषयविटे। उपनला त्रासु॥ ३२१॥

तेवींचि तूंतें देखिलियासाठीं। काइ सहसा तुज देवों येईल मिठी।
आणि नेदीं तरी शोक संकटीं। राहों केवीं॥ ३२२॥

म्हणोनि मागां सरों तंव संसारु। आडवीत येतसे अनिवारु।
आणि पुढां तूं तंव अनावरु। न येसि घेवों॥ ३२३॥

ऐसा माझारिलीं सांकडां। बापुड्या त्रैलोक्याचा होतसे हुरडा।
हा ध्वनि जी फुडा। चोजवला मज॥ ३२४॥

जैसा आरंबळला आगी। समुद्रा ये निवावयालागीं।
तंव कल्लोळपाणियाचियां तरंगीं। आगळा बिहे॥ ३२५॥

तैसें या जगासि जाहलें। तूंतें देखोनि तळमळित ठेलें।
यामाजीं पैल भले। ज्ञानसुरांचे मेळावे॥ ३२६॥

अमी हि त्वां सुरसङ्घा विशन्ति
केचिद्भीताः प्राञ्जलयो गृणन्ति॥
स्वस्तीत्युक्त्वा महर्षिसिद्धसङ्घाः
स्तुवन्ति त्वां स्तुतिभिः पुष्कलाभिः॥ ११.२१॥

हे तुझेनि आंगिकें तेजें। जाळूनि सर्व कर्मांचीं बीजें।
मिळत तुजआंतु निजें। सद्भावेंसीं॥ ३२७॥

आणिक एक सावियाचि भयभीरु। सर्वस्वें धरूनि तुझी मोहरु।
तुज प्रार्थितातिं करु। जोडोनियां॥ ३२८॥

देवा अविद्यार्णवीं पडिलों। जी विषयवागुरें आंतुडलों।
स्वर्गसंसाराचियां सांकडलों। दोन्हीं भागीं॥ ३२९॥

ऐसें आमुचें सोडवणें। तुजवांचोनि कीजेल कवणें।
तुज शरण गा सर्वप्राणें। म्हणत देवा॥ ३३०॥

आणि महर्षी अथवा सिद्ध। कां विद्याधरसमूह विविध।
हे बोलत तुज स्वस्तिवाद। करिती स्तवन॥ ३३१॥

रुद्रादित्या वसवो ये च साध्या
विश्वेऽश्विनौ मरुतश्चोश्मपाश्च॥
गन्धर्वयक्षासुरसिद्धसङ्घा
वीक्ष्यन्ते त्वां विस्मिताश्चैव सर्वे॥ ११.२२॥

हे रुद्रादित्यांचे मेळावे। वसु हन साध्य आघवे।
अश्विनौ देव विश्वेदेव विभवें। वायुहि हे जी॥ ३३२॥

अवधारा अग्नि हन गंधर्व। पैल यक्षरक्षोगण सर्व।
जी महेंद्रमुख्य देव। कां सिद्धादिक॥ ३३३॥

हे आघवेची आपुलालियां लोकीं। सोत्कंठित अवलोकीं।
हे महामूर्ती दैविकी। पाहत आहाती॥ ३३४॥

मग पहात पहात प्रतिक्षणीं। विस्मित होऊनि अंतःकरणीं।
करित निजमुकटीं वोवाळणी। प्रभुजी तुज॥ ३३५॥

ते जय जय घोष कलरवें। स्वर्ग गाजविताती आघवे।
ठेवित ललाटावरी बरवे। करसंपुट॥ ३३६॥

तिये विनयद्रुमाचिये अटवीं। सुरवाडली सात्त्विकांची माधवी।
म्हणोनि करसंपुटपल्लवीं। तूं होतासि फळ॥ ३३७॥

रूपं महत ते बहुवक्त्रनेत्रम्
महाबाहो बहुबाहूरुपादम्॥
बहूदरं बहुदंष्ट्राकरालम्
दृष्ट्वा लोकाः प्रव्यथितास्तथाहम्॥ ११.२३॥

जी लोचना भाग्य उदेलें। जीवा सुखाचें सुयाणें पाहलें।
जे अगाध तुझें देखिलें। विश्वरूप इहीं॥ ३३८॥

हें लोकत्रय व्यापक रूपडें। पाहतां देवाही वचकु पडे।
याचें सन्मुखपण जोडें। भलतयाकडूनी॥ ३३९॥

ऐसें एकचि परी विचित्रें। आणि भयानकें तेवींचि बहु वक्त्रें।
बहुलोचन हे सशस्त्रे। अनंतभुजा॥ ३४०॥

हे अनंत ऊरु बाहु चारु चरण। बहु उदर आणि नानावर्ण।
कैसें प्रतिवदनीं मातलेपण। आवेशाचें॥ ३४१॥

हो कां जे महाकल्पाचियां अंतीं। तवकलेनि यमें जेउतें तेउतीं।
प्रळयाग्नीचीं उजिती। आंबुखिलीं जैसीं॥ ३४२॥

ना तरी संहार त्रिपुरारीचीं यंत्रें। कीं प्रळयभैरवांचीं क्षेत्रें।
ना ना युगांतशक्तीची पात्रें। भूतखिचा वोढविलीं॥ ३४३॥

तैसीं जियेतियेकडे। तुझीं वक्त्रें जीं प्रचंडें।
न समाती दरीमाजीं सिंहाडे। तैसे दांत दिसती रागिट॥ ३४४॥

जैसें काळरात्रीचेनि अंधारें। उल्हासत निघती संहारखेंचरें।
तैसिया वदनीं प्रळयरुधिरें। काटलिया दाढा॥ ३४५॥

हें असो काळें अवंतिलें रण। कां सर्वसंहारें मातलें मरण।
तैसें अतिभिंगुळवाणेपण। वदनीं तुझिये॥ ३४६॥

हे बापडी लोकसृष्टी। मोटकीये विपाइली दिठी।
आणि दुःखकालिंदीचियां तटीं। झाड होऊनि ठेली॥ ३४७॥

तुज महामृत्यूचियां सागरीं। हे त्रैलोक्यजीविताची तरी।
शोक दुर्वातलहरी। आंदोळत असे॥ ३४८॥

एथ कोपोनि जरी वैकुंठें। ऐसें हन म्हणिपैल अवचटें।
जें तुज लोकांचें काइ वाटे। तूं ध्यानसुख हें भोगीं॥ ३४९॥

वरी जी लोकांचें कीर साधारण। वायां आड सूतसें वोडण।
केवीं सहसा म्हणें प्राण। माझेचि कांपती॥ ३५०॥

ज्या मज संहाररुद्र वासिपे। ज्या मजभेणें मृत्यु लपे।
तो मी अहाळबाहळी कांपें। ऐसें तुवां केलें॥ ३५१॥

परी नवल बापा हे महामारी। इया नाम विश्वरूप जरी।
हे भ्यासुरपणें हारी। भयासि आणी॥ ३५२॥

नभःस्पृशं दीप्तमनेकवर्णम्
व्यात्ताननं दीप्तविशालनेत्रम्॥
दृष्ट्वा हि त्वां प्रव्यथितान्तरात्मा
धृतिं न विन्दामि शमं च विष्णो॥ ११.२४॥

ठेलीं महाकाळेंसि हटतटें। तैसीं कितीएकें मुखें रागिटें।
इहीं वाढोनियां धाकुटें। आकाश केलें॥ ३५३॥

गगनाचेनि वाडपणें नाकळे। त्रिभुवनींचिया वारिया न वेंटाळे।
ययाचेनि वाफा आगी जळे। कैसें धडाडीत असे॥ ३५४॥

तेवींचि एकसारिखें एक नोहे। एथ वर्णावर्णाचा भेदु आहे।
हो कां जे प्रळयीं सावावो लाहे। वह्नि ययाचा॥ ३५५॥

जयाचिये आंगींची दीप्ती येवढी। जे त्रैलोक्य कीजे राखोंडी।
कीं तयाही तोंडें आणि तोंडीं। दांत दाढा॥ ३५६॥

कैसा वारया धनुर्वात चढला। समुद्र कीं महापुरीं पडिला।
विषाग्नि मारा प्रवर्तला। वडवानळासी॥ ३५७॥

हळाहळ आगीं पियालें। नवल मरण मारा पेटलें।
तैसें संहारतेजा या जाहलें। वदन देखा॥ ३५८॥

परी कोणें मानें विशाळ। जैसें तुटलिया अंतराळ।
आकाशासि कव्हळ। पडोनि ठेलें॥ ३५९॥

ना तरी काखे सूनि वसुंधरी। जैं हिरण्याक्षु रिगाला विवरीं।
तैं उघडले हाटकेश्वरीं। जेवीं पाताळकुहर॥ ३६०॥

तैसा वक्त्रांचा विकाशु। माजीं जिव्हांचा आगळाचि आवेशु।
विश्व नपुरे म्हणोनि घांसु। न भरीचि कोंडें॥ ३६१॥

आणि पातालव्याळांचियां फूत्कारीं। गरळज्वाला लागती अंबरीं।
तैसी पसरलिये वदन दरी। माजीं हे जिव्हा॥ ३६२॥

काढूनि प्रळय विजूंचीं जुंबाडें। जैसे पन्नासिले गगनाचे हुडे।
तैसे आवाळुवांवरी आंकडे। धगधगित दाढांचे॥ ३६३॥

आणि ललाटपटाचिये खोळे। कैसें भयातें भेडविताती डोळे।
हो कां जे महामृत्युचे उमाळे। कडवसां राहिले॥ ३६४॥

ऐसें वाऊनि महाभयाचें भोज। एथ काय निपजवूं पाहतोसि काज।
तें नेणें परी मज। मरणभय आलें॥ ३६५॥

देवा विश्वरूप पहावयाचे डोहाळे। केले तियें पावलों प्रतिफळें।
बा देखलासि आतां डोळे। निवावे तैसे निवाले॥ ३६६॥

अहो देहो पार्थिव कीर जाये। ययाची काकुळती कवणा आहे।
परी आतां चैतन्य माझें विपायें। वांचेल कीं न वांचे॥ ३६७॥

एऱ्हवीं भयास्तव आंग कांपे। नावेक आगळें तरी मन तापे।
अथवा बुद्धिही वासिपे। अभिमानु विसरिजे॥ ३६८॥

परी येतुलियाही वेगळा। जो केवळ आनंदैककळा।
तया अंतरात्मयाही निश्चळा। शियारी आली॥ ३६९॥

बाप साक्षात्काराचा वेधु। कैसा देशधडी केला बोधु।
हा गुरुशिष्यसंबंधु। विपायें नांदे॥ ३७०॥

देवा तुझियां ये दर्शनीं। जें वैकल्य उपजलें आहे अंतःकरणी।
तें सावरावयालागीं गंवसणी। धैर्याची करितसें॥ ३७१॥

तंव माझेनि नामें धैर्य हारपलें। कीं तयाहीवरी विश्वरूपदर्शन जाहलें।
हें असो परी मज भलें आतुडविलें। उपदेशासी॥ ३७२॥

जीव विसंवावयाचिया चाडा। सैंघ धांवाधांवी करितसे बापुडा।
परी सोय ही कवणेकडा। न लभे एथ॥ ३७३॥

ऐसें विश्वरूपाचिया महामारी। जीवित्व गेलें आहें चराचरीं।
जी न बोलें तरी काय करीं। कैसेनि राहें॥ ३७४॥

दंष्ट्राकरालानि च ते मुखानि
दृष्ट्वैव कालानलसन्निभानि॥
दिशो न जाने न लभे च शर्म
प्रसीद देवेश जगन्निवास॥ ११.२५॥

पैं अखंड डोळ्यांपुढें। फुटलें जैसें महाभयाचें भांडें।
तैशीं तुझीं मुखें वितंडें। पसरलीं देखें॥ ३७५॥

असो दांतदाढांची दाटी। न झांकवे मा दोंहीं वोठीं।
सैंघ प्रळयशस्त्राचिया दाट कांटी। लागलिया जैशा॥ ३७६॥

जैसें तक्षका विष भरलें। हो कां जे काळरात्रीं भूत संचरलें।
कीं अग्नेयास्त्र परजिलें। वज्राग्नि जैसें॥ ३७७॥

तैशीं तुझीं वक्त्रें प्रचंडें। वरी आवेश हा बाहेरी वोसंडे।
आले मरणरसाचे लोंढे। आम्हांवरी॥ ३७८॥

संहार समयींचा चंडानिळु। आणि महाकल्पांत प्रळयानिळु।

या दोहीं जैं होय मेळु। तैं काय एक न जळे॥ ३७९॥

तैसीं संहारकें तुझीं मुखें। देखोनि धीरु कां आम्हां पारुखे।
आतां भुललों मी दिशा न देखें। आपणपें नेणें॥ ३८०॥

मोटकें विश्वरूप डोळां देखिलें। आणि सुखाचें अवर्षण पडिलें।
आतां जापाणिं जापाणिं आपुलें। अस्ताव्यस्त हें॥ ३८१॥

ऐसें करिसी म्हणोनि जरी जाणें। तरी हे गोष्टि सांगावी कां मी म्हणें।
आतां एक वेळ वाचवीं जी प्राणें। यां स्वरूपप्रळयापासोनि॥ ३८२॥

जरी तूं गोसावी आमुचा अनंता। तरी सुई वोडण माझिया जीविता।
सांठवीं पसारा हा मागुता। महामारीचा॥ ३८३॥

आइकें सकळ देवांचिये परदेवते। तुवां चैतन्यें गा विश्व वसतें।
तें विसरलासी हें उपरतें। संहारूं आदरिलें॥ ३८४॥

म्हणोनि वेगीं प्रसन्न होईं देवराया। संहरीं संहरीं आपुली माया।
काढीं मातें महाभया। पासोनियां॥ ३८५॥

हा ठायवरी पुढतपुढती। तूंतें म्हणिजे बहुवा काकुळती।
ऐसा मी विश्वमूर्ती। भेडका जाहलों॥ ३८६॥

जें अमरावतीये आला धाडा। तैं म्यां एकलेनि केला उवेडा।
जो मी काळाचियाही तोंडा। वासिपु न धरीं॥ ३८७॥

परी तया आंतुल नव्हे हे देवा। एथ मृत्यूसही करूनि चढावा।
तुवां आमुचाचि घोटु भरावा। या सकळ विश्वेंसीं॥ ३८८॥

कैसा नव्हता प्रळयाचा वेळु। गोखा तूंचि मिनलासि काळु।
बापुडा हा त्रिभुवनगोळु। अल्पायु जाहला॥ ३८९॥

अहा भाग्या विपरीता। विघ्न उठिलें शांति करितां।
कटकटा विश्व गेलें आतां। तूं लागलासि ग्रासूं॥ ३९०॥

हे नव्हे मा रोकडें। सैंघ पसरूनिया तोंडें।
कवळितासि चहूंकडे। सैन्यें इयें॥ ३९१॥

अमी च त्वां धृतराष्ट्रस्य पुत्राः
सर्वे सहैवावनिपालसंघैः॥
भीष्मो द्रोणः सूतपुत्रस्तथासौ
सहास्मदीयैरपि योधमुख्यैः॥ ११.२६॥

नोहेति हे कौरवकुळींचे वीर। आंधळिया धृतराष्ट्राचे कुमर।
हे गेले गेले सहपरिवार। तुझियां वदनीं॥ ३९२॥

आणि जे जे यांचेनि सांवायें। आले देशोदेशींचे राये।
तयांचें सांगावया जावों न लाहे। ऐसें सरकटितु आहासी॥ ३९३॥

मदमुखाचिया संघटा। घेत आहासि घटघटां।
आरणीं हन थाटा। देतोसि मिठी॥ ३९४॥

जंत्रावरिचील मार। पदातींचे मोगर।
मुखाआंत भार। हारपताति मा॥ ३९५॥

कृतांताचिया जावळी। जें एकचि विश्वातें गिळी।
तियें कोटीवरील सगळीं। गिळितासि शस्त्रें॥ ३९६॥

चतुरंगा परिवारा। संजोडियां रहंवरां।
दांत न लाविसी मा परमेश्वरा। कसा तुष्टलासि बरवा॥ ३९७॥

हां गा भीष्मा ऐसा कवणु। सत्यशौर्यनिपुणु।
तोही आणि ब्राह्मण द्रोणु। ग्रासिलासि कटकटा॥ ३९८॥

अहा सहस्रकराचा कुमरु। एथ गेला गेला कर्णवीरु।
आणि आमुचिया आघवयांचा केरु। फेडिला देखें॥ ३९९॥

कटकटा धातया। कसें जाहलें अनुग्रहा यया।
मियां प्रार्थूनि जगा बापुडिया। आणिलें मरण॥ ४००॥

मागां थोडिया बहुवा उपपत्ती। येणें सांगितलिया विभूती।
तैसा नसेचि मा पुढती। बैसलों पुसों॥ ४०१॥

म्हणोनि भोग्य तें त्रिशुद्धी न चुके। आणि बुद्धिही होणारासारिखी ठाके।

माझां कपाळीं पिटावें लोकें। तें लोटेल काह्या॥ ४०२॥

पूर्वी अमृतही हातां आलें। परी देव नसतीचि उगले।
मग काळकूट उठविलें। शेवटीं जैसें॥ ४०३॥

परी तें एकबगीं थोडें। केलिया प्रतिकारामाजिवडें।
आणि तिये अवसरींचे तें सांकडें। निस्तरविलें शंभू॥ ४०४॥

आतां हा जळता वारा कें वेंटाळे। कोणा हें विषा भरलें गगन गिळे।
महाकाळेंसि कें खेळें। आंगवत असे॥ ४०५॥

ऐसा अर्जुन दुःखें शिणतु। शोचित असे जिवाआंतु।
परी न देखे तो प्रस्तुतु। अभिप्रावो देवाचा॥ ४०६॥

जे मी मारिता हे कौरव मरते। ऐसेनि वेंटाळिला होता मोहें बहुतें।
तो फेडावयालागीं अनंतें। हें दाखविलें निज॥ ४०७॥

अरे कोण्ही कोणातें न मारी। एथ मीचि हो सर्व संहारी।
हें विश्वरूपव्याजें हरी। प्रकटित असे॥ ४०८॥

परी वायांचि व्याकुळता। ते न चोजवेचि पंडुसुता।
मग अहा कंपु नव्हता। वाढवित असे॥ ४०९॥

वक्त्राणि ते त्वरमाणा विशन्ति
दंष्ट्राकरालानि भयानकानि॥
केचिद्विलग्ना दशनान्तरेषु
संदृश्यन्ते चूर्णितैरुत्तमाङ्गैः॥ ११.२७॥

तेथ म्हणे पाहा हो एके वेळे। सासिकवचेंसि दोन्ही दळें।
वदनीं गेलीं आभाळें। गगनीं कां जैसीं॥ ४१०॥

कां महाकल्पाचियां शेवटीं। जैं कृतांतु कोपला होय सृष्टी।
तैं एकविसाही स्वर्गा मिठी। पाताळासकट दे॥ ४११॥

ना तरी उदासीनें दैवें। संचकाचीं वैभवें।
जेथिचीं तेथ स्वभावें। विलया जाती॥ ४१२॥

तैसीं सांचलीं सैन्यें एकवाटें। इये मुखीं जाहलीं प्रविष्टें।
परी एकही तोंडौनि न सुटे। कैसें कर्म देखा॥ ४१३॥

अशोकाचे अंगवसे। चघळिले कऱ्हेनि जैसे।
लोक वक्त्रामाजीं तैसे। वायां गेले॥ ४१४॥

परी सिसाळें मुकुटेंसीं। पडिली दाढांचियां सांडसीं।
पीठ होत कैसीं। दिसत आहाती॥ ४१५॥

तियें रत्नें दांताचिये सवडी। कूट लागलें जिभेचियां बुडीं।
कांहीं कांहीं आगरडीं। द्रंष्ट्रांचीं माखलीं॥ ४१६॥

हो कां जे विश्वरूपें काळें। ग्रासिलीं लोकांचीं शरीरें बळें।
परी जीवदेहींचीं सिसाळें। अवश्य कीं राखिलीं॥ ४१७॥

तैसीं शरीरामाजीं चोखडीं। होतीं उत्तमांगें इयें फुडीं।
म्हणोनि महाकाळाचियांहि तोंडीं। परी उरलीं शेखीं॥ ४१८॥

मग म्हणे हें काई। जन्मलयां आन मोहरचि नाहीं।
जग अपैसेंचि वदनडोहीं। संचरताहे॥ ४१९॥

या आघवियाचि सृष्टी। लागलिया आहाति वदनाचियां वाटीं।
आणि हा जेथिंचिया तेथ मिठी। देतसे उगला॥ ४२०॥

ब्रह्मादिक समस्त। उंचां मुखामाजीं धांवत।
येर सामान्य हे भरत। ऐलीच वदनीं॥ ४२१॥

आणीकही भूतजात। तें उपजलेचि ठायीं ग्रासित।
परी याचिया मुखा निभ्रांत। न सुटेचि कांहीं॥ ४२२॥

यथा नदीनाम् बहवोऽम्बुवेगाः
समुद्रमेवाभिमुखा द्रवन्ति ॥
तथा तवामी नरलोकवीरा
विशन्ति वक्त्राण्यभिविज्वलन्ति॥ ११.२८॥

जैसे महानदीचे वोघ। वहिले ठाकिती समुद्राचें आंग।
तैसें अघवांचिकडूनि जग। प्रवेशत मुखीं॥ ४२३॥

आयुष्यपंथें प्राणिगणीं करोनि। अहोरात्रांची सोवाणी।
वेगें वक्त्रामिळणीं। साधिजत आहाती॥ ४२४॥

यथा प्रदीप्तं ज्वलनं पतङ्गा
विशन्ति नाशाय समृद्धवेगाः॥
तथैव नाशाय विशन्ति लोकाः

तवापि वक्त्राणि समृद्धवेगाः॥ ११.२९॥

जळतया गिरीचिया गवखा। माजीं घापती पतंगाचिया झाका।
तैसे समग्र लोक देखा। इये वदनीं पडत॥ ४२५॥

परी जेतुलें येथ प्रवेशलें। तेतुलया लोहें पाणीचि पां गिळिलें।
वहवटींहि पुसिलें। नामरूप तयांचें॥ ४२६॥

लेलिह्यसे ग्रसमानः समन्ता
ल्लोकान् समग्रान् वदनैर्ज्वलद्भिः॥
तेजोभिरापूर्य जगत्समग्रं
भासस्तवोग्राः प्रतपन्ति विष्णो॥ ११.३०॥

आणि येतुलाही आरोगण। करितां भुके नाहीं उणेपण।
कैसें दीपन असाधारण। उदयलें यया॥ ४२७॥

जैसा रोगिया ज्वराहूनि उठिला। का भणंगा दुष्काळु पाहला।
तैसा जिभांचा लळलळाटु देखिला। आवाळुवें चाटितां॥ ४२८॥

तैसें आहाराचे न नांवें कांहीं। तोंडापासूनि उरलेंचि नाहीं।
कैसी समसमित नवाई। भुकेलेपणाची॥ ४२९॥

काय सागराचा घोंटु भरावा। कीं पर्वताचा घांसु करावा।
ब्रह्मकटाहो घालावा। आघवाचि दाढे॥ ४३०॥

दिशा सगळियाचि गिळाविया। चांदिणिया चाटूनि घ्याविया।
ऐसें वर्तत आहे साविया। लोलुप्य बा तुझें॥ ४३१॥

जैसा भोगीं कामु वाढे। कां इंधनें अगीसि हाकाक चढे।
तैसी खात खातांचि तोंडें। खा खातें ठेलीं॥ ४३२॥

कैसें एकचि केवढें पसरलें। त्रिभुवन जिव्हाग्रीं आहे टेकलें।
जैसें कां कविंठ घातलें। वडवानळीं॥ ४३३॥

ऐसीं अपारें वदनें। आतां येतुलीं कैचीं त्रिभुवनें।
कां आहारु न मिळतां येणें मानें। वाढविलीं सैंघ॥ ४३४॥

अगा हा लोकु बापुडा। जाहला वदनज्वाळां वरपडा।
जैसीं वणवेयाचिया वेढां। सांपडती मृगें॥ ४३५॥

आतां तैसें या विश्वासि जाहलें। देवो नव्हे हें कर्म आलें।
कां जगजळचरां पांगिले। जाळे काळें ॥ ४३६॥

आतां इये अंगप्रभेचिये वागुरे। कोणीकडूनि निगिजैल चराचरें।
वक्त्रें नव्हती जोहारें। वोडवलीं जगा॥ ४३७॥

आगी आपुलेनि दाहकपणें। कैसेनि पोळिजे तें नेणे।
परी जया लागे तया प्राणें। सुटिका नाहीं॥ ४३८॥

ना तरी माझेनि तिखटपणें। कैसें निवटे हें शस्त्र कायि जाणे।
कां आपुलिया मारा नेणे। विष जैसें॥ ४३९॥

तैसी तुज काहीं। आपुलिया उग्रपणाची सेचि नाहीं।
परी ऐलीकडे मुखीं खाई। हों सरली जगाची॥ ४४०॥

अगा आत्मा तूं एकु। सकळ विश्वव्यापकु।
तरी का आम्हां अंतकु। ऐसा वोडवलासी॥ ४४१॥

तरी मियां सांडिली जीविताची चाड। आणि तुवांही न धरावी भीड।
मनीं आहे तें उघड। बोल पां सुखें॥ ४४२॥

किती वाढविसी या उग्ररूपा। अंगींचें भगवंतपण आठवीं बापा।
नाहीं तरी कृपा। मजपुरती पाहीं॥ ४४३॥

आख्याहि मे को भवानुग्ररूपो।
नमोऽस्तु ते देववर प्रसीद॥
विज्ञातुमिच्छामि भवन्तमाद्यं
न हि प्रजानामि तव प्रवृत्तिम्॥ ११.३१॥

तरी एक वेळ वेदवेद्या। जी त्रिभुवनाचिया आद्या।
विनवणी विश्ववंद्या। आइकें माझी॥ ४४४॥

ऐसें बोलोनि वीरें। चरण नमस्कारिले शिरें।
मग म्हणे तरी सर्वेश्वरें। अवधारिजो॥ ४४५॥

मियां होआवया समाधान। जी पुसिलें विश्वरूपध्यान।
आणि एकेंचि काळें त्रिभुवन। गिळितुचि उठिलासी॥

४४६॥

तरी तूं कोण कां येतुलीं। इयें भ्यासुरें मुखें कां मेळविलीं।
आघवांचि करीं परीजिलीं। शस्त्रें काह्या॥ ४४७॥

जी जंव तंव रागीटपणें। वाढोनि गगना आणितोसि उणें।
कां डोळे करूनि भिंगुळवाणे। भेडसावीत आहासी॥ ४४८॥

एथ कृतांतेसीं देवा। कासया किजतसे हेवा।
आपुला तुवां सांगावा। अभिप्राय मज॥ ४४९॥

या बोला म्हणे अनंतु। मी कोण हें आहासी पुसतु।
आणि कायिसयालागीं असे वाढतु। उग्रतेसीं॥ ४५०॥

श्रीभगवानुवाच।
कालोऽस्मि लोकक्षयकृत् प्रवृद्धो
लोकान् समाहर्तुमिह प्रवृत्तः॥
ऋतेऽपि त्वां न भविष्यन्ति सर्वे
येऽवस्थिताः प्रत्यनीकेषु योधाः॥ ११.३२॥

तरी मी कालु गा हें फुडें। लोक संहारावयालागीं वाढें।
सैंघ पसरिली आथि तोंडें। आतां ग्रासीन हें आघवें॥
४५१॥

तेथ अर्जुन म्हणे कटकटां। उबगिलों मागिल्या संकटा।
म्हणोनि आळविला तंव वोखटा। उधाइला हा॥ ४५२॥

तेवींचि कठिण बोलें आसतुटी। अर्जुन होईल हिंपुटी।
म्हणोनि सवेंचि म्हणे किरीटी। परी आन एक असे॥ ४५३॥

तरी आतांचि ये संहारबाहरे। तुम्हीं पांडव असा बाहिरे।
तेथ जातजात धनुर्धरें। सांवरिले प्राण॥ ४५४॥

होता मरणमहामारीं गेला। तो मागुता सावधु जाहला।
मग लागला बोला। चित्त देऊं॥ ४५५॥

ऐसें म्हणिजत आहे देवें। अर्जुना तुम्ही माझे हें जाणावें।
येर जाण मी आघवें। सरलों ग्रासूं॥ ४५६॥

वज्रानळीं प्रचंडीं। जैसी घापे लोणियाची उंडी।
तैसें जग हें माझां तोंडीं। तुवां देखिलें जें॥ ४५७॥

तरी तयामाझारीं कांहीं। भरंवसेनि उणें नाहीं।
इयें वायांचि सैन्यें पाहीं। वल्गिजत आहाती॥ ४५८॥

हे जे मिळोनियां मेळे। कुंथती वीरवृत्तीचेनि बळें।
जयांवरि गजदळें। वाखाणिजताती॥ ४५९॥

म्हणती सृष्टीवरी सृष्टी करूं। आण वाहूनि मृत्यूतें मारूं।
आणि जगाचा भरूं। घोटु यया॥ ४६०॥

पृथ्वी सगळीचि गिळूं। आकाश वरिच्यावरि जाळूं।
काई बाणवरी खिळूं। वारयातें॥ ४६१॥

ऐशा चतुरंगाचिया संपदा। करित महाकाळेंसीं स्पर्धा।
वांटिवेचिया मदा। वघळले जे॥ ४६२॥

बोल हतियेराहूनि तिखट। दिसती अग्निपरीस दासट।
मारकपणें काळकूट। महुर म्हणत॥ ४६३॥

तरी हे गंधर्वनगरींचे उमाळे। जाण पोकळीचे पेंडवळे।
अगा चित्रींचीं फळें। वीर हे देखे॥ ४६४॥

हा मृगजळाचा पूर आला। दळ नव्हे कापडाचा साप
केला।
इया शृंगारूनियां खाला। मांडिलिया पैं॥ ४६५॥

तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व
जित्वा शत्रून् भुङ्क्ष्व राज्यं समृद्धम्॥
मयैवैते निहताः पूर्वमेव
निमित्तमात्रं भव सव्यसाचिन्॥ ११.३३॥

येर चेष्टवितें जे बळ। तें मियां मागांचि ग्रासिलें सकळ।
जातां कोल्हेरीचे वेताळ। तैसे निर्जीव हे आहाती॥ ४६६॥

हालविती दोरी तुटली। तरी तिये खांबावरील बाहुलीं।
भलतेणें लोटिलीं। उलथोनि पडती॥ ४६७॥

तैसा सैन्याचा यया बगा। मोदतां वेळु न लगेल पैं गा।
म्हणोनि उठीं उठीं वेगा। शाहणा होईं॥ ४६८॥

तुवां गोग्रहणाचेनि अवसरें। घातलें मोहनास्त्र एकसरें।
मग विराटाचेनि महाभेडें उत्तरें। आसडूनि नागाविलें॥
४६९॥

आतां हें त्याहूनि निपटारें जाहलें। निवटीं आयितें रण पडिलें।
घेई यश रिपु जिंतिले। एकलेनि अर्जुनें॥ ४७०॥

आणि कोरडें यशचि नोहे। समग्र राज्यही आलें आहे।
तूं निमित्तमात्रचि होये। सव्यसाची॥ ४७१॥

द्रोणं च भीष्मं च जयद्रथं च
कर्णं तथान्यानपि योधवीरान्॥
मया हतास्त्वं जहि मा व्यथिष्ठा
युध्यस्व जेतासि रणे सपत्नान्॥ ११.३४॥

द्रोणाचा पाडु न करीं। भीष्माचे भय न धरी।
कैसेनि कर्णावरी। परजूं हें न म्हणें॥ ४७२॥

कोण उपायो जयद्रथा कीजे। हें न चिंतू चित्त तुझें।
आणिकही आथि जे जे। नावणिगे वीर॥ ४७३॥

तेही एक एक आघवे। चित्रींचे सिंहाडे मानावे।
जैसे वोलेनि हातें घ्यावे। पुसोनियां॥ ४७४॥

यावरी पांडवा। काइसा झुंजाचा मेळावा।
हा आभासु गा आघवा। येर ग्रासिलें मियां॥ ४७५॥

जेव्हां तुवां देखिले। हे माझां वदनीं पडिले।
तेव्हांचि यांचें आयुष्य सरलें। आतां रितीं सोपें॥ ४७६॥

म्हणोनि वहिला उठीं। मियां मारिलें तूं निवटीं।
न रिगे शोकसंकटीं। नाथिलिया॥ ४७७॥

आपणचि आडखिळा कीजे। तो कौतुकें जैसा विंधोनि पाडिजे।
तैसें देखें गा तुझें। निमित्त आहे॥ ४७८॥

बापा विरुद्ध जें जाहलें। तें उपजतांचि वाघें नेलें।
आतां राज्येंशीं संचलें। यश तूं भोगीं॥ ४७९॥

सावियाचि उतत होते दायाद। आणि बळिये जगीं दुर्मद।
ते वधिले विशद। सायासु न लागतां॥ ४८०॥

ऐसिया इया गोष्टी। विश्वाचियां वाक्पटीं।
लिहूनि घाली किरीटी। जगामाजीं॥ ४८१॥

संजय उवाच।
एतच्छ्रुत्वा वचनं केशवस्य
कृताञ्जलिर्वेपमानः किरीटी॥
नमस्कृत्वा भूय एवाह कृष्णं
सगद्गदं भीतभीतः प्रणम्य॥ ११.३५॥

ऐसी आघवीचि हे कथा। तया अपूर्ण मनोरथा।
संजयो सांगे कुरुनाथा। ज्ञानदेवो म्हणे॥ ४८२॥

मग सत्यलोकौनि गंगाजळ। सुटलिया वाजत खळाळ।
तैशी वाचा विशाळ। बोलतां तया॥ ४८३॥

ना तरी महामेघांचे उमाळे। घडघडीत एके वेळे।
घुमघुमिला मंदराचळें। क्षीराब्धी जैसा॥ ४८४॥

तैसें गंभीरें महानादें। हें वाक्य विश्वकंदें।
बोलिलें अगाधें। अनंतरूपें॥ ४८५॥

तें अर्जुनें मोटकें ऐकिलें। आणि सुख कीं भय दुणावलें।
हें नेणों परी कापिन्नलें। सर्वांग तयाचें॥ ४८६॥

सखोलपणें वळली मोट। आणि तैसेचि जोडले करसंपुट।
वेळोवेळां ललाट। चरणीं ठेवी॥ ४८७॥

तेवींचि कांहीं बोलों जाये। तंव गळा बुजालाचि ठाये।
हें सुख कीं भय होये। हें विचारा तुम्ही॥ ४८८॥

परी तेव्हां देवाचेनि बोलें। अर्जुना हें ऐसें जाहलें।
मियां पदांवरुनि देखिलें। श्लोकींचिया॥ ४८९॥

मग तैसाचि भेणभेण। पुढती जोहारूनि चरण।
मग म्हणे जी आपण। ऐसें बोलिलेति॥ ४९०॥

अर्जुन उवाच।
स्थाने हृषीकेश तव प्रकीर्त्या
जगत् प्रहृष्यत्यनुरज्यते च॥
रक्षांसि भीतानि दिशो द्रवन्ति
सर्वे नमस्यन्ति च सिद्धसङ्घाः॥ ११.३६॥

ना तरी अर्जुना मी काळु। आणि ग्रासिजे तो माझा खेळु।
हा बोलु कीर अढळु। मानूं आम्ही॥ ४९१॥

परी तुवां जी काळें। आजि स्थितीचिये वेळे।

ग्रासिजे हें न मिळे। विचारासी॥ ४९२॥

ऐसेनि आंगींचें तारुण्य मोडावें। कैचें नव्हे तें वार्धक्य काढावें।
म्हणोनि करूं म्हणसी ती नव्हे। बहुतकरुनि॥ ४९३॥

हां जी चौपाहारी न भरतां। कोणेही वेळे श्रीअनंता।
काय माध्यान्हीं सविता। मावळतु आहे॥ ४९४॥

पैं तुज अखंडिता काळा। तिन्ही आहाती जी वेळा।
त्या तिन्ही परी सबळा। आपुलालियां समयीं॥ ४९५॥

जे वेळीं हो लागे उत्पत्ती। ते वेळीं स्थिती प्रळयो हारपती।
आणि स्थितीकाळीं न मिरविती। उत्पत्ति प्रळयो॥ ४९६॥

पाठीं प्रळयाचिये वेळे। उत्पत्ति स्थिति मावळे।
हें कायसेनही न ढळे। अनादि ऐसें॥ ४९७॥

म्हणोनि आजि तरी भरें भोगें। स्थिति वर्तिजत आहे जगें।
एथ ग्रसिसी तूं हें नलगे। माझां जीवीं॥ ४९८॥

तंव संकेतें देव बोले। अगा या दोन्ही सैन्यांसीचि मरण पुरलें।
तें प्रत्यक्ष तुज दाविलें। येर यथाकाळें जाण॥ ४९९॥

हा संकेतु जंव अनंता। वेळु लागला बोलतां।
तंव अर्जुनें लोकु मागुता। देखिला यथास्थिति॥ ५००॥

मग म्हणतसे देवा। तूं सूत्री विश्वलाघवा।
जग आला मा आघवा। पूर्वस्थितीपुढती॥ ५०१॥

परी पडिलिया दुःखसागरीं। तूं काढिसी कां जयापरी।
ते कीर्ती तुझी श्रीहरी। आठवीत असें॥ ५०२॥

कीर्ती आठवितां वेळोवेळां। भोगितसें महासुखाचा सोहळा।
तेथ हर्षामृतकल्लोळा। वरी लोळत आहों ॥ ५०३॥

देवा जियालेपणें जग। धरी तुझियां ठायीं अनुराग।
आणि दुष्टां तयां भंग। अधिकाधिक॥ ५०४॥

पैं त्रिभुवनींचिया राक्षसा। महाभय तूं हृषीकेशा।
म्हणोनि पळताती दिशां। पैलीकडे॥ ५०५॥

येर सुर नर सिद्ध किन्नर। किंबहुना चराचर।
ते तुज देखोनि हर्षनिर्भर। नमस्कारित असती॥ ५०६॥

कस्माच्च ते न नमेरन् महात्मन्
गरीयसे ब्रह्मणोऽप्यादिकर्त्रे॥
अनन्त देवेश जगन्निवास
त्वमक्षरं सदसत्तत्परं यत्॥ ११.३७॥

एथ गा कवणा कारणा। राक्षस हे नारायणा।
न लगतीची चरणा। पळते जाहले॥ ५०७॥

आणि हें तूतें काइ पुसावें। येतुलालें आम्हांसिही जाणवे।
तरी सूर्योदयीं राहावें। कैसेनि तमें॥ ५०८॥

जी तूं स्वप्रकाशाचा आगरु। आणि जाहला आहासि गोचरु।
म्हणोनिया निशाचरां केरु। फिटला सहजे॥ ५०९॥

हें येतुले दिवस आम्हां। कांहीं नेणवेचि श्रीरामा।
आतां देखतसों महिमा। गंभीर तुझा॥ ५१०॥

जेथूनि नाना सृष्टीचिया वोळी। पसरती भूतग्रामाचिया वेली।
तया महद् ब्रह्मातें व्याली। दैविकी इच्छा॥ ५११॥

देवो निःसीम तत्त्व सदोदितु। देवो निःसीम गुण अनंतु।
देवो निःसीम साम्य सततु। नरेंद्र देवांचा॥ ५१२॥

जी तूं त्रिजगतिये बोलावा। अक्षर तूं सदाशिवा।
तूंचि सदसत् देवा। तयाही अतीत तें तूं॥ ५१३॥

त्वमादिदेवः पुरुषः पुराणः
त्वमस्य विश्वस्य परं निधानम्॥
वेत्ताऽसि वेद्यं च परं च धाम
त्वया ततं विश्वमनन्तरूप॥ ११.३८॥

तूं प्रकृतिपुरुषांचिया आदी। जी महत्तत्वा तूंचि अवधी।
स्वयें तूं अनादि। पुरातनु॥ ५१४॥

सकळ विश्वजीवन। जीवांसि तूंचि निधान।

भूतभविष्याचें ज्ञान। तुझियांचि हातीं॥ ५१५॥

जी श्रुतीचिया लोचना। स्वरूपसुख तूं अभिन्न।
त्रिभुवनाचिया आयतना। आयतन तूं॥ ५१६॥

म्हणोनि जी परम। तूंतें म्हणिजे महाधाम।
कल्पांतीं महद्ब्रह्म। तुझियां अंकीं रिगे॥ ५१७॥

किंबहुना तुवां देवें। विश्व विस्तारिलें आहे आघवें।
अनंतरूपा वानावें। कवणें तूंतें॥ ५१८॥

वायुर्यमोऽग्निर्वरुणः शशाङ्कः
प्रजापतिस्त्वं प्रपितामहश्च॥
नमो नमस्तेऽस्तुसहस्रकृत्वः
पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते॥ ११.३९॥

नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते
नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व॥
अनन्तवीर्यामितविक्रमस्त्वं
सर्वं समाप्नोषि ततोऽसि सर्वः॥ ११.४०॥

जी काय एक तूं नव्हसी। तूं कवणे ठायीं गा नससी।
हें असो जैसा आहासी। तैसिया नमो॥ ५१९॥

वायु तूं श्रीअनंता। यम तूं नियमिता।
प्राणिगणीं वसता। अग्नि जी तूं॥ ५२०॥

वरुण तूं सोम। स्रष्टा तूं ब्रह्म।
पितामहाचाही परम। आदिजनक तूं॥ ५२१॥

आणिकही जें जें कांहीं। रूप आथि अथवा नाहीं।
तया नमो तुज तैसियाही। श्रीजगन्नाथा॥ ५२२॥

ऐसें सानुरागें चित्तें। स्तवन केलें पांडुसुतें।
मग पुढती म्हणे नमस्ते। नमस्ते प्रभो॥ ५२३॥

पाठी तिये साद्यंते। न्याहाळी श्रीमूर्तीतें।
आणि पुढती म्हणे नमस्ते। नमस्ते प्रभो॥ ५२४॥

पाहतां पाहतां प्रांतें। समाधान पावे चित्तें।
आणि पुढती म्हणे नमस्ते। नमस्ते प्रभो॥ ५२५॥

इये चराचरीं जी भूतें। अखंडित देखे तयांतें
आणि पुनःपुनः म्हणे नमस्ते। नमस्ते प्रभो॥ ५२६॥

ऐसीं रूपें तियें अद्भुतें। आश्चर्यें स्फुरती अनंतें।
तंव तंव नमस्ते। नमस्तेचि म्हणे॥ ५२७॥

आणिक स्तुति नाठवे। आणि निवांताही नसवे।
नेणों कैसा प्रेमभावें। गाजोंचि लागे॥ ५२८॥

किंबहुना इयापरी। नमन केलें सहस्रावरी।
कीं पुढती म्हणे श्रीहरी। तुज सन्मुखा नमो॥ ५२९॥

देवासि पाठी पोट आथि कीं नाहीं। येणें उपयोगु आम्हां काई।
तरी तुज पाठिमोरेयाही। नमो स्वामी॥ ५३०॥

उभा माझिये पाठीसीं। म्हणोनि पाठीमोरें म्हणावें तुम्हांसी।
सन्मुख विन्मुख जगेंसीं। न घडें तुज॥ ५३१॥

आतां वेगळालिया अवयवां। नेणें रूप करूं देवा।
म्हणोनि नमो तुज सर्वा। सर्वात्मका॥ ५३२॥

जी अनंतबळसंभ्रमा। तुज नमो अमितविक्रमा।
सकळकाळीं समा। सर्वरूपा॥ ५३३॥

आघवां आकाशीं जैसें। अवकाशचि होऊनि आकाश असे।
तूं सर्वपणें तैसें। पातलासि सर्व॥ ५३४॥

किंबहुना केवळ। सर्व हें तूंचि निखिळ।
परी क्षीरार्णवीं कल्लोळ। पयाचे जैसे॥ ५३५॥

म्हणोनिया देवा। तूं वेगळा नव्हसी सर्वां।
हें आलें मज सद्भावा। आतां तूंचि सर्व॥ ५३६॥

सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं
हे कृष्ण हे यादव हे सखेति॥
अजानता महिमानं तवेदं
मया प्रमादात् प्रणयेन वापि॥ ११.४१॥

परी ऐसिया तूतें स्वामी। कहींच नेणों जी आम्ही।
म्हणोनि सोयरे संबंधधर्मीं। राहाटलों तुजसीं॥ ५३७॥

अहा थोर वाउर जाहलें। अमृतें संमार्जन म्यां केलें।
वारिकें घेऊनि दिधलें। कामधेनूतें॥ ५३८॥

परीसाचा खडवाचि जोडला। कीं फोडोनि गाडोरा आम्हीं घातला।
कल्पतरू तोडोनि केला। कुंपु शेता॥ ५३९॥

चिंतामणीची खाणी लागली। तेणेंवरी वोढाळें वोल्हांटिली।
तैसी तुझी जवळिक धाडिली। सांगातीपणें॥ ५४०॥

हें आजिचेंचि पाहें पां रोकडें। कवण झुंज हें केवढें।
परी परब्रह्म तूं उघडें। सारथी केलासी॥ ५४१॥

यया कौरवांचिया घरा। शिष्टाई धाडिलासि दातारा।
ऐसा वणिजेसाठीं जगेश्वरा। विकलासि आम्हीं॥ ५४२॥

तूं योगियांचें समाधिसुख। कैसा जाणेचिना मी मूर्ख।
उपरोधु जी सन्मुख। तुजसीं करूं॥ ५४३॥

यच्चावहासार्थमसत्कृतोऽसि
विहारशय्यासनभोजनेषु॥
एकोऽथवाप्यच्युत तत् समक्षं
तत्क्षामये त्वामहमप्रमेयम्॥ ११.४२॥

तूं या विश्वाची अनादि आदी। बैससी जियें सभासदीं।
तेथें सोयरीकीचिया शब्दीं। रळीं बोलों॥ ५४४॥

विपायें राउळा येवों। तरी तुझेंनि अंगें मानु पावों।
मानसी तरी जावों। रुसोनि सलगी॥ ५४५॥

पायां लागोनि बुझावणी। तुझियां ठायीं शार्ङ्गपाणी।
पाहिजे ऐशी करणी। बहु केली आम्हीं॥ ५४६॥

सज्जनपणाचिया वाटा। तुजपुढें बैसें उफराटा।
हा पाडु काय वैकुंठा। परी चुकलों जी॥ ५४७॥

देवेंसि कोलकाठी धरूं। आखाडां झोंबाझोंबी करूं।
सारी खेळतां तस्करूं। निकरेंही भांडों॥ ५४८॥

चांग तें उराउरीं मागों। देवासि कीं बुद्धि सांगों।
तेवींचि म्हणों काय लागों। तुझें आम्ही॥ ५४९॥

ऐसा अपराधु हा आहे। जो त्रिभुवनीं न समाये।
जी नेणेंचि कां पाये। शिवतिले तुझे॥ ५५०॥

देवो बोनयाचियां अवसरीं। लोभें कीर आठवण करी।
परी माझा निसुग गर्व अवधारीं। जे फुगूनिचि बैसें॥ ५५१॥

देवाचिया भोगायतनीं। खेळतां आशंकेना मनीं।
जी रिगोनिया शयनीं। सरिसा पहुडें॥ ५५२॥

'कृष्णा' म्हणोनि हाकारिजे। यादवपणें तूतें लेखिजे।
आपली आण घालिजे। जातां तुज ॥ ५५३॥

मज एकासनीं बैसणें। कां तुझा बोलु न मानणें।
हें वोळखीचेनि दाटपणें। बहुत घडलें॥ ५५४॥

म्हणोनि काय काय आतां। निवेदिजेल अनंता।
मी राशि आहें समस्तां। अपराधांची॥ ५५५॥

यालागीं पुढां अथवा पाठीं। जियें राहाटलों बहुवें वोखटीं।
तियें मायेचिया परी पोटीं। सामावीं प्रभो॥ ५५६॥

जी कोण्ही एके वेळे। सरिता घेउनि येती खडुळें।
तियें सामाविजेति सिंधुजळें। आन उपायो नाहीं॥ ५५७॥

तैसीं प्रीती कां प्रमादें। देवेंसीं मज विरुद्धें।
बोलविलीं तियें मुकुंदें। उपसाहावीं जी॥ ५५८॥

आणि देवाचेनि क्षमत्वें क्षमा। आधारु जाली आहे या भूतग्रामा।
म्हणोनि पुरुषोत्तमा। विनवूं तें थोडें॥ ५५९॥

तरी आतां अप्रमेया। मज शरणागता आपुलिया।
क्षमा कीजो की यया। अपराधांसी॥ ५६०॥

पितासि लोकस्य चराचरस्य
त्वमस्य पूज्यश्च गुरुर्गरीयान्।
न त्वत्समोऽस्त्यभ्यधिकः कुतोऽन्यो
लोकत्रयेऽप्यप्रतिमप्रभाव॥ ११.४३॥

जी जाणितलें मियां साचें। महिमान आतां देवाचें।
देवो होय चराचराचें। जन्मस्थान॥ ५६१॥

हरिहरादि समस्तां। देवा तूं परम देवता।
वेदांतेंही पढविता। आदिगुरु तूं ॥ ५६२॥

गंभीर तूं श्रीरामा। नानाभूतैकसमा।
सकळगुणीं अप्रतिमा। अद्वितीया॥ ५६३॥

तुजसी नाहीं सरिसें। हें प्रतिपादनचि कायसें।
तुवां जालेनि आकाशें। सामाविलें जग॥ ५६४॥

तया तुझेनि पाडें दुजें। ऐसें बोलतांचि लाजिजे।
तेथ अधिकचि कीजे। गोष्टी केवीं॥ ५६५॥

म्हणोनि त्रिभुवनीं तूं एकु। तुजसरिसा न अधिकु।
तुझा महिमा अलौकिकु। नेणिजे वानूं॥ ५६६॥

तस्मात प्रणम्य प्रणिधाय कायं
प्रसादये त्वामहमीशमीड्यम॥
पितेव पुत्रस्य सखेव सख्युः
प्रियः प्रियायार्हसि देव सोढुम्॥ ११.४४॥

ऐसें अर्जुनें म्हणितलें। मग पुढती दंडवत घातलें।
सात्त्विकाचें आलें। भरतें तया॥ ५६७॥

मग म्हणतसे प्रसीद प्रसीद। वाचा होतसे सद्गद।
काढीं जी अपराध। समुद्रौनि मातें॥ ५६८॥

तुज विश्वसुहृदातें कंही। सोयरपणें न मनूंचि पाहीं।
तुज ईश्वरेश्वराचियां ठायीं। ऐश्वर्य केलें॥ ५६९॥

तूं वर्णनीय परी लोभें। मातें वर्णिसी पां सभे।
तरी मियां वल्गिजे क्षोभें। अधिकाधिक॥ ५७०॥

आतां ऐसिया अपराधां। मर्यादा नाहीं मुकुंदा।
म्हणोनि रक्ष रक्ष प्रमादा। पसावो म्हणुनी॥ ५७१॥

जी हेंचि विनवावयालागी।कैंची योग्यता माझियां आंगीं।
परी अपत्य जैसें सलगीं। बापेंसि बोलें॥ ५७२॥

पुत्राचे अपराध। जरी जाहले अगाध।
तरी पिता साहे निर्द्वंद्व। तैसें साहिजो जी॥ ५७३॥

सख्याचें उद्धत। सखा साहे निवांत।
तैसें तुवां समस्त। साहिजो जी॥ ५७४॥

प्रियाचियां ठायीं सन्मान। प्रिय न पाहे समर्था जाण।
तेवीं उच्छिष्ट काढिलें आपण। ते क्षमा कीजो॥ ५७५॥

ना तरी प्राणाचें सोयरें भेटे। मग जीवें भूतलीं जियें संकटें।
तियें निवेदितां न वाटे। संकोचु कांहीं॥ ५७६॥

कां उखितें आंगें जीवें। आपणपें दिधलें जिया मनोभावें।
तिये कांतु मिनलिया न राहवें। हृदय जेवीं॥ ५७७॥

तयापरी जी मियां। हें विनविलें तुमतें गोसाविया।
आणि कांहीं एक म्हणावया। कारण असे॥ ५७८॥

अदृष्टपूर्वं हृषितोऽस्मि दृष्ट्वा
भयेन च प्रव्यथितं मनो मे
तदेव मे दर्शय देव रूपं
प्रसीद देवेश जगन्निवास॥ ११.४५॥

तरी देवेंसीं सलगी केली। जे विश्वरूपाची आळी घेतली।
ते मायबापें पुरविली। स्नेहाळाचेनि॥ ५७९॥

सुरतरूंचीं झाडें। आंगणीं लावावीं कोडें।
देयावें कामधेनुचें पाडें। खेळावया॥ ५८०॥

मियां नक्षत्रीं डाव पाडावा। चंद्र चेंडूवालागीं देयावा।
हा छंदु सिद्धी नेला आघवा। माउलिये तुवां॥ ५८१॥

जया अमृतलेशालागीं सायास। तयाचा पाऊस केला चारी मास।
पृथ्वी वाहून चासेचास। चिंतामणि पेरिले॥ ५८२॥

ऐसा कृतकृत्य केला स्वामी। बहुवे लळा पाळिला तुम्हीं।
दाविलें जें हरब्रह्मीं। नायकिजे कानीं॥ ५८३॥

मग देखावयाची केउती गोठी। जयाची उपनिषदां नाहीं भेटी।
ते जिव्हारींची गांठी। मजलागीं सोडिली॥ ५८४॥

जी कल्पादि लागोनी। आजिची घडी धरुनी।
माझीं जेतुलीं होउनी। गेलीं जन्में॥ ५८५॥

तयां आघवियांचिआंतु। घरडोळी घेऊनि असें पाहतु।
परी ही देखिली ऐकिली मातु। आतुडेचिना॥ ५८६॥

बुद्धीचें जाणणें। कहीं न वचेचि याचेनि आंगणें।
हे सादही अंतःकरणें। करवेचिना॥ ५८७॥

तेथ डोळ्यां देखी होआवी। ही गोष्टीचि कायसया करावी।
किंबहुना पूर्वी। दृष्ट ना श्रुत॥ ५८८॥

तें हें विश्वरूप आपुलें। तुम्हीं मज डोळां दाविलें।
तरी माझें मन झालें। हृष्ट देवा॥ ५८९॥

परी आतां ऐसी चाड जीवीं। जे तुजसी गोठी करावी।
जवळीक हे भोगावी। आलिंगयावासी॥ ५९०॥

ते इयेचि स्वरूपीं करूं म्हणिजे। तरी कोणे एके मुखेंसी चावळिजे।
आणि कोणा खेंव देइजे। तुज लेख नाहीं॥ ५९१॥

म्हणोनि वारियासवें धावणें। नठके गगना खेंव देणें।
जळकेली खेळणें। समुद्रीं केउतें॥ ५९२॥

यालागीं जी देवा। एथिंचें भय उपजतसे जीवा।
म्हणोनि येतुला लळा पाळावा। जे पुरे हें आतां॥ ५९३॥

पैं चराचर विनोदें पहिजे। मग तेणें सुखें घरीं राहिजे।
तैसें चतुर्भुज रूप तुझें। तो विसावा आम्हां॥ ५९४॥

आम्हीं योगजात अभ्यासावें। तेणें याचि अनुभवा यावें।
शास्त्रांतें आलोडावें। परी सिद्धांतु तो हाचि॥ ५९५॥

आम्हीं यजनें किजती सकळें। परी तियें फळावीं येणेंचि फळें।
तीर्थें होतु सकळें। याचिलागीं॥ ५९६॥

आणीकही कांहीं जें जें। दान पुण्य आम्हीं कीजे।
तया फळीं फळ हेंचि तुझें। चतुर्भुज रूप॥ ५९७॥

ऐसी तेथिंची जीवा आवडी। म्हणोनि तेंचि देखावया लवडसवडी।
वर्तत असे ते सांकडी। फेडीं वेगां॥ ५९८॥

अगा जीवींचें जाणतेया। सकळ विश्ववसवितेया।
प्रसन्न होई पूजितया। देवांचिया देवा॥ ५९९॥

किरीटिनं गदिनं चक्रहस्तम्
इच्छामि त्वां द्रष्टुमहं तथैव॥
तेनैव रूपेण चतुर्भुजेन।
सहस्रबाहो भव विश्वमूर्ते॥ ११.४६॥

कैसें नीलोत्पलातें रांवित। आकाशाही रंगु लावित।
तेजाची वोज दावित। इंद्रनीळा॥ ६००॥

जैसा परिमळ जाहला मरगजा। कां आनंदासीचि निघालिया भुजा।
ज्याचें जानुवरी मकरध्वजा। जोडली बरव॥ ६०१॥

मस्तकीं मुकुटातें ठेविलें। कीं मुकुटा मुकुट मस्तक झालें।
शृंगारा लेणें लाधलें। आंगाचेनि जया॥ ६०२॥

इंद्रधनुष्याचिये आडणी। माजीं मेघ गगनरंगणीं।
तैसें आवरिलें शार्ङ्गपाणी। वैजयंतिया॥ ६०३॥

कवणी ते उदार गदा। असुरां देत कैवल्य सदा।
कैसें चक्र हन गोविंदा। सौम्य तेजें मिरवे॥ ६०४॥

किंबहुना स्वामी। तें देखावया उत्कंठित पां मी।
म्हणोनि आतां तुम्हीं। तैसया होआवें॥ ६०५॥

हे विश्वरूपाचे सोहळे। भोगूनि निवाले जी डोळे।
आतां होताति आधले। कृष्णमूर्तीलागीं॥ ६०६॥

तें साकार कृष्णरूपडें। वांचूनि पाहों नावडे।
तें न देखतां थोडें। मानिताती हे॥ ६०७॥

आम्हां भोगमोक्षाचियां ठायीं। श्रीमूर्तीवांचूनि नाहीं।
म्हणोनि तैसाचि साकारु होई। हें सांवरीं आतां॥ ६०८॥

श्रीभगवानुवाच।
मया प्रसन्नेन तवार्जुनेदं
रूपं परं दर्शितमात्मयोगात्।
तेजोमयं विश्वमनन्तमाद्यं
यन्मे त्वदन्येन न दृष्टपूर्वम्॥ ११.४७॥

या अर्जुनाचिया बोला। विश्वरूपा विस्मयो जाहला।
म्हणे ऐसा नाहीं देखिला। धसाळ कोणी॥ ६०९॥

कोण हे वस्तु पावला आहासी। तया लाभाचा तोषु न घेसी।
मा भेणें काय नेणों बोलसी। हेकाडु ऐसा॥ ६१०॥

आम्हीं सावियाची जैं प्रसन्न होणें। तैं आंगचिचिवरी म्हणे देणें।
वांचोनि जीव असे वेचणें। कवणासि गा॥ ६११॥

तें हें तुझिये चाडे। आजि जिवाचेंचि दळवाडें।
कामऊनियां येवढें। रचिलें ध्यान॥ ६१२॥

ऐसी काय नेणों तुझिये आवडी। जाहली प्रसन्नता आमुची वेडी।
म्हणोनि गौप्याचीही गुढी। उभविली जगीं॥ ६१३॥

तें हें अपरां अपार। स्वरूप माझें परात्पर।
एथूनि ते अवतार। कृष्णादिक॥ ६१४॥

हें ज्ञानतेजाचें निखिळ। विश्वात्मक केवळ।
अनंत हे अढळ। आद्य सकळां॥ ६१५॥

हें तुजवांचोनि अर्जुना। पूर्वीं श्रुत दृष्ट नाहीं आना।
जे जोगें नव्हे साधना। म्हणोनियां॥ ६१६॥

न वेदयज्ञाध्ययनैर्न दानैः
न च क्रियाभिर्न तपोभिरुग्रैः॥
एवं रूपः शक्य अहं नृलोके
द्रष्टुं त्वदन्येन कुरुप्रवीर॥ ११.४८॥

याची सोय पातले। आणि वेदीं मौनचि घेतलें।
यज्ञ की माघौते आले। स्वर्गौनीचि॥ ६१७॥

साधकीं देखिला अभ्यासु। म्हणोनि वाळिला योगाभ्यासु।
आणि अध्ययनें सौरसु। नाहीं एथ॥ ६१८॥

सीगेचीं सत्कर्मे। धाविन्नलीं स्वसंभ्रमें।
तिहीं बहुतेकीं श्रमें। सत्यलोकु ठाकिला॥ ६१९॥

तपीं ऐश्वर्य देखिलें। आणि उग्रपण उभयांचि सांडिलें।
एवं तपसाधन जें ठेलें। अपारांतरीं॥ ६२०॥

तें हें तुवां अनायासें। विश्वरूप देखिलें जैसें।
इये मनुष्यलोकीं तैसें। न फावेचि कवणा॥ ६२१॥

आजि ध्यानसंपत्तीलागीं। तूंचि एकु आथिला जगीं।
हें परमभाग्य आंगीं। विरंचींही नाहीं॥ ६२२॥

मा ते व्यथा मा च विमूढभावो
दृष्ट्वा रूपं घोरमीदृङ्ममेदं
व्यपेतभीः प्रीतमनाः पुनस्त्वं
तदेव मे रूपमिदं प्रपश्य॥ ११.४९॥

म्हणोनि विश्वरूपलाभें श्लाघ। एथिचें भय नेघ नेघ।
हेंवांचूनि चांग। न मनीं कांहीं॥ ६२३॥

हां गा समुद्र अमृताचा भरला। आणि अवसांत वरपडा जाहला।
मग कोणीही आथि वोसंडिला। बुडिजेल म्हणोनि॥ ६२४॥

ना तरी सोनयाचा डोंगरु। येसणा न चले हा थोरु।
ऐसें म्हणोनि अव्हेरु। करणें घडे॥ ६२५॥

दैवें चिंतामणि लेइजे। कीं हें ओझें म्हणोनि सांडिजे।
कामधेनु दवडिजे। न पोसवे म्हणोनि॥ ६२६॥

चंद्रमा आलिया घरा। म्हणिजे निगें करितोसि उबारा।
पडिसायि पाडितोसि दिनकरा। परता सर॥ ६२७॥

तैसें ऐश्वर्य हें महातेज। आजि हातां आलें आहे सहज।
की एथ तुज गजबज। होआवी कां॥ ६२८॥

परी नेणसीच गांवढिया। कयकोपों आतां धनंजया।
आंग सांडोनि छाया। आलिंगितोसि मा॥ ६२९॥

हें नव्हे जो मी साचें। एथ मन करूनियां काचें।
प्रेम धरिसी अवगणियेचें। चतुर्भुज जें॥ ६३०॥

तरी आझुनिवरी पार्था। सांडीं सांडीं हे आस्था।
इयेविषयीं अनस्था। करिसी झणें॥ ६३१॥

हें रूप जरी घोर। विकृति आणी थोर।
तरी कृतनिश्चयाचें घर। हेंचि करी॥ ६३२॥

कृपण चित्तवृत्ति जैसी। रोवोनि घाली ठेवयापासीं।
मग नुसधेनि देहेंसीं। आपण असे॥ ६३३॥

कां अजातपक्षिया जवळा। जीव बैसवूनि अविसाळां।
पक्षिणी अंतराळा। माजीं जाय॥ ६३४॥

ना ना गाय चरे डोंगरीं। परी चित्त बांधिलें वत्सें घरीं।
तैसें प्रेम एथिंचें करीं। स्थानपती॥ ६३५ ॥

येरें वरिचिलेनि चित्तें। चित्त बाह्यसख्य सुखापुरतें।
भोगिजो कां श्रीमूर्तीतें। चतुर्भुज॥ ६३६ ॥

परी पुढतपुढती पांडवा। हा एक बोलु न विसरावा।
जे इये स्वरूपहुनि सद्भावा। नेदावें निघों॥ ६३७ ॥

हें कहीं नव्हतें देखिलें। म्हणोनि भय जें तुज उपजलें।
तें सांडीं एथ संचलें। असों दे प्रेम॥ ६३८ ॥

आतां करूं तुजयासारिखें। म्हणितलें विश्वतोमुखें।
तरी मागील रूप सुखें। न्याहाळीं पां तूं॥ ६३९ ॥

संजय उवाच।
इत्यर्जुनं वासुदेवस्तथोक्त्वा
स्वकं रूपं दर्शयामास भूयः॥
आश्वासयामास च भीतमेनं
भूत्वा पुनः सौम्यवपुर्महात्मा॥ ११.५०॥

ऐसें वाक्य जी बोलतखेंवो। मागुता मनुष्य जाहला देवो।
हें ना परी नवलावो। आवडीचा तिये॥ ६४० ॥

श्रीकृष्णचि कैवल्य उघडें। वरी सर्वस्व विश्वरूपायेवढें।
हातीं दिधलें कीं नावडे। अर्जुनासी॥ ६४१ ॥

वस्तु घेऊनि वाळिजे। जैसें रत्नासि दूषण ठेविजे।
ना तरी कन्या पाहूनियां म्हणिजे। मना न ये हे॥ ६४२ ॥

तया विश्वरूपायेवढी दशा। करितां प्रीतीचा वाढु कैसा।
सेल दीधलीसे उपदेशा। किरीटीसि देवें॥ ६४३ ॥

मोडोनि भांगाराचा रवा। लेणें घडिलें आपुलिया सवा।
मग नवडे जरी जीवा। तरी आटिजे पुढती॥ ६४४ ॥

तैसें शिष्याचिये प्रीती जाहलें। कृष्णत्व होतें तें विश्वरूप केलें।
तें मना न येचि मग आणिले। कृष्णपण मागुतें॥ ६४५ ॥

हा ठाववरी शिष्याची निकसी। साहाते गुरु आहाती कवणे देशीं।
परी नेणिजे आवडी कैशी। संजयो म्हणे॥ ६४६ ॥

मग विश्वरूप व्यापूनी भगवंतें। जें दिव्य योगतेज प्रगटलें होतें।
तेंचि सामावलें मागुतें। कृष्णरूपीं तिये॥ ६४७ ॥

जसें त्वंपद हें आघवें। तत्पदार्थीं सामावे।
अथवा द्रुमाकारु साठवे। बीजकणिके जेवीं॥ ६४८ ॥

ना तरी स्वप्नसंभ्रमु जैसा। गिळी चेइली जीवदशा।
श्रीकृष्णें योगु हा तैसा। संहारिला तो॥ ६४९ ॥

जैसी प्रभा हरती बिंबीं। की जळदसंपत्ती नभीं।
ना ना भरतें सिंधुगर्भीं। रिगालें राया॥ ६५० ॥

हो कां जे कृष्णाकृतीचिये मोडी। होती विश्वरूपपटाची घडी।
ते अर्जुनाचिये आवडी। उकलूनि दाविली॥ ६५१ ॥

तंव परिमाणु वा रंगु। तेणें देखिला साविया चांगु।
तेथ ग्राहकीये नव्हेचि लागु। म्हणोनि घडी केली पुढती॥ ६५२ ॥

तैसें वाढीचेनि बहुवसपणें। रूपें विश्व जिंतिलें जेणें।
तें सौम्य कोडिसवाणें। साकार जाहलें॥ ६५३ ॥

किंबहुना अनंतें। धरिले धाकुटपण मागुतें।
परी आश्वासिलें पार्थातें। बिहालियासी॥ ६५४ ॥

तेथ जो स्वप्नीं स्वर्गा गेला। तो अवसांत जैसा चेइला।
तैसा विस्मयो जाहला। किरीटीसी॥ ६५५ ॥

ना तरी गुरुकृपेसवें। वोसरलेया प्रपंचज्ञान आघवें।
स्फुरे तत्त्व तेवीं पांडवें। श्रीमूर्ति देखिली॥ ६५६ ॥

तया पांडवा ऐसें चित्तीं। आड विश्वरूपाची जवनिका होती।
ते फिटोनि गेली परौती। हें भलें जाहलें॥ ६५७ ॥

काय काळातें जिणोनि आला। कीं महावातु मागां सांडिला।
आपुलिया बाहीं उतरला। सातही सिंधु॥ ६५८ ॥

ऐसा संतोषु बहु चित्तें। घेइजत असे पांडुसुतें।
विश्वरूपापाठीं कृष्णातें। देखोनियां॥ ६५९ ॥

मग सूर्याचियां अस्तमानीं। मागुती तारा उगवती गगनीं।
तैसी देखों लागला अवनी। लोकांसहित॥ ६६०॥

पाहे तंव तेंचि कुरुक्षेत्र। तैसेंचि देखें दोहीं भागीं झालें गोत्र।
वीर वर्षताती शस्त्रास्त्र। संघाटवरी॥ ६६१॥

तया बाणांचिया मांडवाआंतु। तैसाचि रथु आहे निवांतु।
धुरे बैसला लक्ष्मीकांतु। आपण तळीं॥ ६६२॥

अर्जुन उवाच।
दृष्ट्वेदं मानुषं रूपं तव सौम्यं जनार्दन॥
इदानीमस्मि संवृत्तः सचेताः प्रकृउतिं गतः॥ ११.५१॥

एवं मागील जैसें तैसें। तेणें देखिलें वीर्यविलासें।
मग म्हणे जियालों ऐसें। जाहलें आतां॥ ६६३॥

बुद्धीतें सांडोनि ज्ञान। भेणें वळघलें रान।
अहंकारेंसी मन। देशधडी जाहलें॥ ६६४॥

इंद्रियें प्रवृत्ती भुलली। वाचा प्राणा चुकली।
ऐसी आपांपरी होती जाली। शरीरग्रामीं॥ ६६५॥

तियें आघवींचि मागुतीं। जिवंत भेटलीं प्रकृती।
आतां जिताणें श्रीमूर्ती। जाहलें इयां॥ ६६६॥

ऐसें सुख जीवीं घेतलें। मग श्रीकृष्णातें जी म्हणितलें।
मियां तुमचे रूप देखिलें। मानुष हें ॥ ६६७॥

हें रूप दाखवणें देवराया। कीं मज अपत्या चुकलिया।
बुझावोनि तुवां माया। स्तनपान दिधलें॥ ६६८॥

जी विश्वरूपाचियां सागरीं। होतों तरंग मवित वांवेवरी।
तो इयें निजमूर्तीचियां तीरीं। निगालों आतां॥ ६६९॥

आइकें द्वारकापुरसुहाडा। मज सुकतिया जी झाडा।
हे भेटी नव्हे बहुडा। मेघाचा केला॥ ६७०॥

जी सावियाची तृषा फुटला। तया मज अमृतसिंधु हा भेटला।
आतां जिणयाचा फिटला। अभरंवसा॥ ६७१॥

माझियां हृदयरंगणीं। होताहे हरिखलतांची लावणी।
सुखेंसीं बुझावणी। जाहली मज॥ ६७२॥

श्रीभगवानुवाच।
सुदुर्दर्शमिदं रूपं दृष्टवानसि यन्मम
देवा अप्यस्य रूपस्य नित्यं दर्शनकाङ्क्षिणः॥ ११.५२॥

यया पार्थाचिये बोलासवें। हें काय गा म्हणितलें देवें।
तुवां प्रेम ठेवुनि यावें। विश्वरूपीं कीं॥ ६७३॥

मग इये श्रीमूर्ती। भेटावें सडिया आयती।
ते शिकवण सुभद्रापती। विसरलासि॥ ६७४॥

अगा आंधळिया अर्जुना। हाता आलिया मेरूही होय साना।
ऐसा आथी मना। चुकीचा भावो॥ ६७५॥

तरी विश्वात्मक रूपडें। जें दाविलें अम्हीं तुजपुढें।
तें शंभूही परी न जोडे। तपें करितां॥ ६७६॥

आणि अष्टांगादि संकटी। योगी शिणताती किरीटी।
परी अवसरु नाही भेटी। जयाचिये॥ ६७७॥

तें विश्वरूप एकादे वेळ। कैंसेनि देखों अळुमाळ।
ऐसें सरतां काळ। जातसे देवां॥ ६७८॥

आशेचिया अंजुळी। ठेऊनि हृदयाचियां निडळीं।
चातक निराळीं। लागले जैसे॥ ६७९॥

तैसे उत्कंठानिर्भर होउनियां सुरनर।
घोकीत आठही पाहार। भेटी जयाची॥ ६८०॥

परी विश्वरूपासारिखें। स्वप्नींही कोणी न देखे।
तें प्रत्यक्ष तुवां सुखें। देखिलें हें॥ ६८१॥

नहं वेदैर्न तपसा न दानेन न चेज्यया॥
शक्यं एवंविधो द्रष्टुं दृष्टवानसि मां यथा॥ ११.५३॥

पैं उपायासि वाटा। न वाहती एथ सुभटा।
साहिसहित वोहटा। वाहिला वेदीं॥ ६८२॥

मज विश्वरूपाचिया मोहरा। चालावया धनुर्धरा।
तपांचियाही सर्वभारा। नव्हेचि लागु॥ ६८३॥

आणि दानादि कीर कानडें। मी यज्ञींही तैसा न सांपडें।
जैसेनि कां सुरवाडें। देखिला तुवां॥ ६८४॥

तैसा मी एकीचि परी। आंतुडें मा अवधारीं।
जरी भक्ति येउनि वरी। चित्तातें गा॥ ६८५॥

भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवंविधोऽर्जुन।
ज्ञातुं द्रष्टुं च तत्त्वेन प्रवेष्टुं च परंतप॥ ११.५४॥

परी तेचि भक्ति ऐसी। पर्जन्याची सुटिका जैसी।
धरावांचूनि अनारिसी। गतीचि नेणे॥ ६८६॥

कां सकळ जळसंपत्ती। घेऊनि समुद्रातें गिंवसिती।
गंगा जैसी अनन्यगती। मिळालीचि मिळे॥ ६८७॥

तैसे सर्वभावसंभारें। न धरत प्रेम एकसरें।
मजमाजीं संचरे। मीचि होऊनि॥ ६८८॥

आणि तेवींचि मी ऐसा। थडिये माझारीं सरिसा।
क्षीराब्धि कां जैसा। क्षीराचाचि॥ ६८९॥

तैसें मजलागुनि मुंगीवरी। किंबहुना चराचरीं।
भजनासि कां दुसरी। भ्रांति नाहीं॥ ६९०॥

तयाचि क्षणासवें। एवंविधि मी जाणवें।
जाणितला तरी स्वभावें। दृष्टही होय॥ ६९१॥

मग इंधनीं अग्नि उद्दीपे। आणि इंधन हे भाष हारपे।
तें अग्निचि होऊनि आरोपे। मूर्त जेवीं॥ ६९२॥

कां उदय न कीजे तेजाकारें। तंव गगनचि होऊनि असे आंधारें।
मग उदेलियां एकसरें। प्रकाशु होय॥ ६९३॥

तैसें माझां साक्षात्कारीं। सरे अहंकाराची वारी।
अहंकारलोपीं अवधारीं। द्वैत जाय॥ ६९४॥

मग मी तो हें आघवें। एक मीचि आथी स्वभावें।
किंबहुना सामावे। समरसें तो॥ ६९५॥

मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्तः सङ्गवर्जितः॥
निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पाण्डव॥ ११.५५॥

जो मजचि एकालागीं। कर्में वाहातसे आंगीं।
जया मज वांचोनि जगीं। गोमटें नाहीं॥ ६९६॥

दृष्टादृष्ट सकळ। जयाचें मीचि केवळ।
जेणें जिणयाचें फळ। मजचि नाम ठेविलें॥ ६९७॥

भूतें हे भाष विसरला। जे दिठी मीचि आहे बांधला।
म्हणोनि निर्वैर जाहला। सर्वत्र भजे॥ ६९८॥

ऐसा जो भक्तु होये। तयाचें त्रिधातुक हें जैं जाये।
तैं मीचि होउनि ठाये। पांडवा गा॥ ६९९॥

ऐसें जगदुदरदोंदिलें। तेणें करुणारसरसाळें।
संजयो म्हणे बोलिलें। श्रीकृष्णदेवें॥ ७००॥

ययावरी तो पांडुकुमरु। जाहला आनंदसंपदा थोरु।
आणि कृष्णचरणचतुरु। एक तो जगीं॥ ७०१॥

तेणें देवाचिया दोनही मूर्ती। निकिया न्याहाळिलिया चित्तीं।
तंव विश्वरूपाहूनि कृष्णाकृती। देखिला लाभु॥ ७०२॥

परी तयाचिये जाणिवे। मानु न कीजेचि देवें।
जें व्यापकाहूनि नव्हे। एकदेशी॥ ७०३॥

हेंचि समर्थावयालागीं। एक दोन चांगी।
उपपत्ती शार्ङ्गी। दाविता जाहला॥ ७०४॥

तिया ऐकोनी सुभद्राकांतु। चित्तीं आहे म्हणतु।
तरी होय बरवें दोन्हींआंतु। तें पुढती पुसों॥ ७०५॥

ऐसा आलोचु करूनि जीवीं। आतां पुसती वोज बरवी।
आदरील ते परीसावी। पुढें कथा॥ ७०६॥

प्रांजळ ओंवीप्रबंधें। गोष्टी सांगिजेल विनोदें।
निवृत्तिपादप्रसादें। ज्ञानदेवो म्हणे॥ ७०७॥

भरोनि सद्भावाची अंजुळी। मियां वोंवियाफुलें मोकळीं।
अर्पिलीं अंघ्रियुगुळीं। विश्वरूपाचियां॥ ७०८॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां
योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
विश्वरूपदर्शनयोगो नाम एकादशोऽध्यायः॥

इति ज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां
एकादशोऽध्ययः॥ ११॥

श्लोक ५५ ओव्या ७०८

## 12 Devotional Service भक्तियोग

श्रीमद्भगवद्गीता द्वादशोऽध्यायः।
ज्ञानेश्वरी अध्याय बारावा

---

जय जय वो शुद्धे। उदारे प्रसिद्धे।
अनवरत आनन्दे। वर्षतिये॥ १॥

विषयव्याळें मिठी। दिधलिया नुठी ताठी।
ते तुझिये गुरुकृपादृष्टी। निर्विष होय॥ २॥

तरि कवणातें तापु पोळी। कैसेनि वो शोक जाळी।
जरि प्रसादरसकल्लोळीं। पूरें येसी तूं॥ ३॥

योगसुखाचे सोहळे। सेवकां तुझेनि स्नेहाळे।
सोऽहंसिध्दीचे लळे। पाळिसी तूं॥ ४॥

आधारशक्तीचियां अंकीं। वाढविसी कौतुकीं।
हृदयाकाशपालखीं। परिये देसी निजे॥ ५॥

प्रत्यग्ज्योतीची वोवाळणी। करिसी मनपवनांचीं खेळणीं।
आत्मसुखाची बाळलेणीं। लेवविसी॥ ६॥

सतरावियेचें स्तन्य देसी। अनाहताचा हल्लरु गासी।
समाधिबोधें निजविसी। बुझाउनी॥ ७॥

म्हणोनि साधकां तूं माउली। पिके सारस्वत तुझियां पाउलीं।
या कारणें मी साउली। न सोडीं तुझी॥ ८॥

अहो सद्गुरुचिये कृपदृष्टी। तुझें कारुण्य जयातें अधिष्ठी।
तो सकलविद्यांचिये सृष्टीं। धात्रा होय॥ ९॥

म्हणोनि अंबे श्रीमंते। निजजनकल्पलते।
आज्ञापीं मातें। ग्रंथनिरूपणीं॥ १०॥

नवरसीं भरवीं सागरु। करवीं उचित रत्नांचे आगरु।
भावार्थाचे गिरिवरु। निफजवीं माये॥ ११॥

साहित्यसोनियाचिया खाणी। उघडवीं देशियेचिया आक्षोणीं।
विवेकवेलीची लावणी। हों देई सैंघ॥ १२॥

संवादफळनिधानें। प्रमेयाचीं उद्यानें।
लावीं म्हणे गहनें। निरंतर॥ १३॥

पाखांडाचे दरकुते। मोडीं वाग्वाद अव्हांटे।
कुतर्काचीं दुष्टें। सावजें फेडीं॥ १४॥

श्रीकृष्णगुणीं मातें। सर्वत्र करीं वो सरतें।
राणिवे बैसवीं श्रोते। श्रवणाचिये॥ १५॥

मऱ्हाटियेचां नगरीं। ब्रह्मविद्येचा सुकाळु करीं।
घेणें देणें सुखचिवरी। हों देई या जगा॥ १६॥

तूं आपुलेनि स्नेहपल्लवें। मातें पांघरुविशील सदैवें।
तरि आतांचि हें आघवें। निर्मीन माये॥ १७॥

इये विनवणीयेसाठीं। अवलोकिलें गुरु कृपादृष्टी।
म्हणे गीतार्थेंसी उठी। न बोले बहु॥ १८॥

तेथ जी जी महाप्रसादु। म्हणोनि साविया जाहला स्वानन्दु।
आतां निरोपीन प्रबन्धु। अवधान दीजे॥ १९॥

अर्जुन उवाच।

एवं सतत युक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते।
ये चाप्यक्षरमव्यक्तं तेषां के योगवित्तमाः॥ १२.१॥

तरी सकलवीराधिराजु। जो सोमवंशिं विजयध्वजु।
तो बोलता जाहला आत्मजु। पांडुनृपाचा॥ २०॥

श्रीकृष्णातें म्हणे अवधारिलें। आपण विश्वरूप मज दाविलें।
तंव नवल म्हणोनि बिहालें। चित्त माझें॥ २१॥

आणि इये कृष्णमूर्तीची सवे। यालागीं सोय धरिली जीवें।
तंव नको म्हणोनि देवें। वारिलें मातें॥ २२॥

तरि व्यक्त आणि अव्यक्त। तूंचि एक निभ्रांत।
भक्ती पाविजे व्यक्त। अव्यक्त योगें॥ २३॥

या दोनी जी वाटा। तूतें पावावया वैकुंठा।
व्यक्ताव्यक्त दारवंठां। रिगिजे येथ॥ २४॥

पैं जे वानी श्यातुका। तेचि वेगळिया वाला येका।
म्हणोनि एकदेशीया व्यापका। सरिसा पाडु॥ २५॥

अमृताचियां सागरीं। जे लाभे सामर्थ्याची थोरी।
तेचि दे अमृतलहरी। चुळीं घेतलियां॥ २६॥

हे कीर माझियां चित्तीं। प्रतीति आथि जी निरुती।
परि पुसणें योगपती। तें याचिलागीं॥ २७॥

जें देवा तुम्हीं नावेक। अंगीकारिलें व्यापक।
तें साच कीं कवतिक। हें जाणावया॥ २८॥

तरि तुजलागिं कर्म। तूंचि जयांचें परम।
भक्तीसी मनोधर्म। विकोनि घातला॥ २९॥

इत्यादि सर्वी परीं। जे भक्त तूंतें श्रीहरी।
बांधोनियां जिव्हारीं। उपासिती॥ ३०॥

आणि जें प्रणवापैलीकडे। वैखरीयेसि जें कानडें।
काइसयाहि सांगडें। नव्हेचि जें वस्तु॥ ३१॥

तें अक्षर जी अव्यक्त। निर्दोष देशरहित।
सोऽहंभावें उपासित। ज्ञानिये जे॥ ३२॥

तयां आणि जी भक्तां। येरयेरांमाजि अनंता।
कवणें योगु तत्त्वता। जाणितला सांगा॥ ३३॥

इया किरीटीचिया बोला। तो जगद्बंधु संतोषला।
म्हणे हो प्रश्नु भला। जाणसी करूं॥ ३४॥

श्री भगवानुवाच।
मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते।
श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः॥ १२.२॥

तरि अस्तुगिरीचियां उपकंठीं। रिगालिया रविबिंबापाठीं।
रश्मी जैसे किरीटी। संचरती॥ ३५॥

कां वर्षाकाळीं सरिता। जैसी चढों लागें पांडुसुता।
तैसी नीच नवी भजतां। श्रद्धा दिसे॥ ३६॥

परि ठाकिलियाहि सागरु। जैसा मागीलही यावा अनिवारु।
तिये गंगेचिये ऐसा पडिभरु। प्रेमभावा॥ ३७॥

तैसें सर्वेंद्रियासहित सहित। मजमाजिं सूनि चित्त।
जे रात्रिदिवस न म्हणत। उपासिती ॥ ३८॥

इयापरी जे भक्त। आपणपें मज देत।
तेचि मी योगयुक्त। परम मानीं॥ ३९॥

ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते।
सर्वत्रगमचिंत्यं च कूटस्थमचलं ध्रुवम्॥ १२.३॥

आणि येर तेही पांडवा। जे आरूढोनि सोऽहंभावा।
झोंबती निरवयवा। अक्षरासि॥ ४०॥

मनाची नखी न लगे। जेथ बुद्धीची दृष्टी न रिगे।
इंद्रियां कीर जोगें। काइ होईल॥ ४१॥

परि ध्यानाही कुवाडें। म्हणोनि एके ठायीं न सांपडे।
व्यक्तीसि माजिवडें। कवणेही नोहे॥ ४२॥

जया सर्वत्र सर्वपणें। सर्वांही काळीं असणें।
जें पावूनि चिंतवणें। हिंपुटी जाहलें॥ ४३॥

जें होय ना नोहे। जें नाहीं ना आहे।
ऐसें म्हणोनि उपाये। उपजतीचिना ॥ ४४॥

जें चळे ना ढळे। सरे ना मैळे।
तें आपुलेनिचि बळें। आंगविलें जिहीं॥ ४५॥

संनियम्येन्द्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः।
ते प्राप्नुवन्ति मामेव सर्वभूतहिते रताः॥ १२.४॥

पैं वैराग्यमहापावकें। जाळूनि विषयांचीं कटकें।
अधपलीं तवकें। इंद्रियें धरिलीं॥ ४६॥

मग संयमाची धाटी। सूनि मुरडिलीं उफराटीं।
इंद्रियें कोंडिलीं कपाटीं। हृदयाचियां॥ ४७॥

अपानींचिया कवाडा। लावोनि आसनमुद्रा सुहाडा।
मूळबंधाचा हुडा। पन्नासिला। ४८

आशेचे लाग तोडिले। अधैर्याचे कडे झाडिले।
निद्रेचें शोधिलें। काळवखें॥ ४९॥

वज्राग्नीचियां ज्वाळीं। करूनि आपान धातूंची होळी।
व्याधींचियां सिसाळीं। पूजिलीं यंत्रें॥ ५०॥

मग कुंडलिनियेचा टेंभा। आधारीं केला उभा।
तया चोजविलें प्रभा। निमथावरी॥ ५१॥

नवद्वारांचियां चौचकीं। बाणूनि संयतीची आदवंकी।
उघडली खिडकी। ककारांतींची॥ ५२॥

प्राणशक्तिचामुंडे। प्रहारूनि संकल्पमेंढे।
मनोमहिषाचेनि मुंडें। दिधलीं बळी॥ ५३॥

चंद्रसूर्यां बुझावणी। करूनि अनाहताची सुडावणी।
सतरावियेचें पाणी। जिंकिलें वेगें॥ ५४॥

मग मध्यमामध्यविवरें। तेणें कोरिवें दादरें।
ठाकिलें चवरें। ब्रह्मरंध्रींचें॥ ५५॥

वरी मकारांत सोपान। ते सांडोनिया गहन।
काखे सूनियां गगन। भरले ब्रह्मीं॥ ५६॥

ऐसेनि जे समबुद्धि। गिळावया सोऽहंसिद्धि।
आंगविताती निरवधि। योगदुर्गें॥ ५७॥

आपुलिया साटोवाटी। शून्य घेती उठाउठी।
तेही मातेंचि किरीटी। पावती गा॥ ५८॥

वांचूनि योगाचेनि बळें। अधिक कांहीं मिळे।
ऐसें नाहीं आगळें। कष्टचि तया॥ ५९॥

क्लेशोऽधिकतरस्तेषाम् अव्यक्तासक्तचेतसाम्।
अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते॥ १२.५॥

जिहीं सकलभूतांचियां हितीं। निरालंबीं अव्यक्तीं।
पसरलिया आसक्ती। भक्तीवीण॥ ६०॥

तयां महेन्द्रादि पदें। करिताति वाटवधें।
आणि ऋद्धिसिद्धींचीं द्वंद्वं। पाडोनि ठाती॥ ६१॥

कामक्रोधांचे विलग। उठावती अनेग।
आणि शून्येंसीं आंग। झुंझवावें कीं॥ ६२॥

ताहाने ताहानचि पियावी। भुकेलिया भूकचि खावी।
अहोरात्र वावीं। मवावा वारा॥ ६३॥

उनिद्रेयाचें पहुडणें। निरोधाचें वेल्हावणें।
झाडासि साजणें। चावळावें गा॥ ६४॥

शीत वेढावें। ऊष्ण पांघुरावें।
वृष्टीचिया असावें। घराआंतु॥ ६५॥

किंबहुना पांडवा। हा अग्निप्रवेशु नित्य नवा।
भ्रतारेंवीण करावा। तो हा योगु॥ ६६॥

एथ स्वामीचें काज। ना बापिकें व्याज।
परि मरणेसीं झुंज। नित्य नवें॥ ६७॥

ऐसें मृत्यूहूनि तिख। कां घोंटे कढत विख।
डोंगर गिळितां मुख। न फाटे काई॥ ६८॥

म्हणोनि योगाचिया वाटा। जे निगाले गा सुभटा।
तयां दुःखाचाचि वाटा। भागा आला॥ ६९॥

पाहें पां लोहाचे चणे। जैं बोचरिया पडती खाणें।
तैं पोट भरणें कीं मरणें। शुद्धी नेणें॥ ७०॥

म्हणोनि समुद्र बाहीं। तरणे आथि केंही।
कां गगनामाजीं पाई। खोलिजत असें॥ ७१॥

वळघलिया रणाची थाटी। आंगीं न लगतां काठी।
सूर्याची पाउठी। कां होय गा॥ ७२॥

यालागीं पांगुळा हेवा। नव्हे वायूसि पांडवा।
तेविं देहवंतां जीवां। अव्यक्तीं गति॥ ७३॥

ऐसाही जरी धिंवसा। बांधोनियां आकाशा।
झोंबती तरी क्लेशा। पात्र होती॥ ७४॥

म्हणोनि येर ते पार्था। नेणतीचि हे व्यथा।
जे कां भक्तिपंथा। वोठंगले॥ ७५॥

ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः।
अनन्येनैव योगेन मां ध्यायन्त उपासते॥ १२.६॥

कर्मेंद्रियें सुखें। करिती कर्में अशेखें।
जियें कां वर्णविशेखें। भागां आलीं॥ ७६॥

विधीतें पाळित। निषेधातें गाळित।
मज देऊनि जाळित। कर्मफळें॥ ७७॥

ययापरी पाहीं। अर्जुना माझियां ठाईं।
संन्यासूनि नाहीं। करिती कर्में॥ ७८॥

आणीकही जे जे सर्व। कायिक वाचिक मानसिक भाव।
तयां मीवांचूनि धांव। आनौती नाहीं॥ ७९॥

ऐसे जे मत्पर। उपासिती निरंतर।
ध्यानमिषें घर। माझें झाले॥ ८०॥

जयांचिये आवडी। केली मजशीं कुळवाडी।
भोग मोक्ष बापुडीं। त्यजिलीं कुळें॥ ८१॥

ऐसे अनन्ययोगें। विकले जीवें मनें आंगें।
तयांचे कायि एक सांगें। जें सर्व मी करीं॥ ८२॥

तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात्।
भवामि न चिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम्॥ १२.७॥

किंबहुना धनुर्धरा। जो मातेचिया ये उदरा।
तो मातेचा सोयरा। केतुला पां॥ ८३॥

तेवीं मी तयां। जैसे असती तैसियां।
कळिकाळ नोकूनियां। घेतला पटा॥ ८४॥

एरव्हीं तरी माझेयां भक्तां। आणि संसाराची चिंता।
काय समर्थाची कांता। कोरान्न मागे॥ ८५॥

तैसे ते माझें। कलत्र हें जाणिजे।
कायिसेनिही न लजें। तयांचेनि मी॥ ८६॥

जन्ममृत्यूचियां लाटीं। झळंबती इया सृष्टी।
देखोनियां पोटीं। ऐसें जाहलें॥ ८७॥

भवसिन्धूचेनि माजें। कवणासि धाकु नुपजे।
येथ जरी कीं माझे। बिहिती हन॥ ८८॥

म्हणोनि गा पांडवा। मूर्तीचा मेळावा।
करूनि त्यांचिया गांवा। धावतु आलों॥ ८९॥

नामाचिया सहस्रवरी। नावा इया अवधारीं।
सजूनियां संसारीं। तारू जाहलों॥ ९०॥

सडे जे देखिले। ते ध्यानकासे लाविले।
परिग्रही घातले। तरियावरी॥ ९१॥

प्रेमाची पेटी। बांधली एकाचियां पोटीं।
मग आणिले तटीं। सायुज्याचियां॥ ९२॥

परि भक्तांचेनि नावें। चतुष्पदादि आघवे।
वैकुंठीचिये राणिवे। योग्य केले॥ ९३॥

म्हणोनि गा भक्तां। नाहीं एकही चिंता।
तयातें समुद्धर्ता। आथि मी सदा॥ ९४॥

आणि जेव्हांचि कां भक्तीं। दीधली चित्तवृत्ती।
तेव्हांचि मज सूती। तेयांचिये हितीं॥ ९५॥

याकारणें गा भक्तराया। हा मंत्र तुवां धनंजया।
कीजे जे यया। मार्गा भजिजे॥ ९६॥

मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय।
निवसिष्यसि मय्येव अत उर्ध्वं न संशयः॥ १२.८॥

अगा मानस हें एक। माझियां स्वरूपीं सवृत्तिक।
करूनि घाली निष्टंक। बुद्धि निश्चयेंसीं ॥ ९७॥

इयें दोनी सरिसीं। मजमाजीं प्रेमेंसीं।
रिगालीं तरी पावसी। मातें तूं गा॥ ९८॥

जे मन बुद्धि इहीं। घर केलें माझियां ठायीं।
तरी सांगें मग काई। मी तू ऐसें उरे॥ ९९॥

म्हणोनि दिवा पालवे। सवेंचि तेज मालवे।
कां रविबिंबासवें। प्रकाशु जाय॥ १००॥

उचललेल्या प्राणासरिसीं। इंद्रियेंही निगती जैसीं।
तैसा मनोबुद्धिपासीं। अहंकारु ये॥ १०१॥

म्हणोनि माझियां स्वरूपीं। मनबुद्धि इयें निक्षेपीं।
येतुलेनि सर्वव्यापी। मी चि होसी॥ १०२॥

यया बोला कांहीं। अनारिसें नाहीं।
आपली आण पाहीं। वाहतु असें गा॥ १०३॥

अथ चित्तं समाधतुं न शक्नोषि मयि स्थिरम्।
अभ्यासयोगेन ततो माम् इच्छाप्तुं धनञ्जय॥ १२.९॥

अथवा हें चित्त। मनबुद्धि सहित।
माझियां हातीं अचुंबित। न शकसी देवों॥ १०४॥

तरि गा ऐसें करीं। या आठां पाहारां माझारीं।
मोटकें निमिषभरी। देतु जाय॥ १०५॥

मग जें जें कां निमिख। देखेल माझें सुख।
तेतुलें अरोचक। विषयीं घेईल॥ १०६॥

जैसा शरत्कालु रिगे। आणि सरिता वोहटों लागे।
तैसें चित्त काढेल वेगें। प्रपंचौनि॥ १०७॥

मग पुनवेहूनि जैसें। शशिबिंब दिसें दिसें।
हारपत अंवसे। नाहींचि होय॥ १०८॥

तैसें भोगा आंतूनि निगतां। चित्त मजमाजीं रिगतां।
हळूहळू पांडुसुता। मीचि होईल॥ १०९॥

अगा अभ्यासयोगु म्हणिजे। तो हा एकु जाणिजे।
येणें काहीं न निपजे। ऐसें नाहीं॥ ११०॥

पैं अभ्यासाचेनि बळें। एकां गति अंतराळे।
व्याघ्र सर्प प्रांजळे। केले एकीं॥ १११॥

विष कीं आहारीं पडे। समुद्रीं पायवाट जोडे।
एकीं वाग्ब्रह्म थोकडें। अभ्यासें केलें॥ ११२॥

म्हणोनि अभ्यासासि कांहीं। सर्वथा दुष्कर नाहीं।
यालागि माझियां ठायीं। अभ्यासें मिळें॥ ११३॥

अभ्यासेऽप्यसमर्थोऽसि मत्कर्मपरमो भव।
मदर्थमपि कर्माणि कुर्वन् सिद्धिमवाप्स्यसि॥ १२.१०॥

कां अभ्यासाही लागीं। कसु नाहीं तुझियां आंगीं।
तरी आहासी जया भांगीं। तैसाचि अस॥ ११४॥

इंद्रियें न कोंडीं। भोगातें न तोडीं।
अभिमानु न सांडीं। स्वजातीचा॥ ११५॥

कुळधर्मु चाळीं। विधिनिषेध पाळीं।
मग सुखें तुज सरळी। दिधली असे॥ ११६॥

परि मनें वाचा देहें। जैसा जो व्यापारु होये।
तो मी करीतु आहें। ऐसें न म्हणें॥ ११७॥

करणें कां न करणें। हें आघवें तोचि जाणे।
विश्व चळतसे जेणें। परमात्मेनि॥ ११८॥

उणयापुरेयाचें काहीं। उरों नेदी आपुलां ठायीं।
स्वजातीचि करूनि घेई। जीवित हें॥ ११९॥

माळियें जेउतें नेलें। तेउतें निवांतचि गेलें।
तया पाणिया ऐसें केलें। होआवें गा॥ १२०॥

एऱ्हवीं तरी सुभटा। उजू कां अव्हाटां।
रथु काई खटपटा। करितु असे॥ १२१॥

म्हणोनि प्रवृत्ति आणि निवृत्ति। इयें वोझीं नेघे मती।
अखंड चित्तवृत्ती। आठवीं मातें॥ १२२॥

आणि जें जें कर्म निपजे। तें थोडें बहु न म्हणिजे।
निवांतचि अर्पिजे। माझियां ठायीं॥ १२३॥

ऐसिया मद्भावना। तनुत्यागीं अर्जुना।
तूं सायुज्यसदना। माझिया येसी॥ १२४॥

अथैतदप्यशक्तोऽसि कर्तुं मद्योगमाश्रितः।
सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान॥ १२.११॥

ना तरी हेंही तूज। नेदवे कर्म मज।
तरी गा तूं भज। पंडुकुमरा॥ १२५ ॥

बुद्धींचियां पाठीं पोटीं। कर्मा आदि कां शेवटीं।
मातें बांधणें किरीटी। दुवाड जरी॥ १२६ ॥

तरि हेंही असो। सांडीं माझा अतिसो।
परि संयतिसीं वसो। बुद्धि तुझी॥ १२७ ॥

आणि जेणें जेणें वेळें। घडती कर्में सकळें।
तयांचीं तियें फळें। त्यजितु जाय॥ १२८ ॥

वृक्ष कां वेली। लोटती फळें आलीं।
तैसीं सांडीं निपजलीं। कर्में सिद्धें॥ १२९ ॥

परि मातें मनीं धरावें। कां मज उद्देशें करावें।
हें कांहीं नको आघवें। जाऊं दे शून्यीं॥ १३० ॥

खडकीं जैसें वर्षलें। कां आगीमाजिं पेरिलें।
कर्म मानी देखिलें। स्वप्न जैसें॥ १३१ ॥

अगा आत्मजेचियां विषीं। जीवु जैसा निरभिलाषी।
तैसा कर्मीं अशेषीं। निष्कामु होईं॥ १३२ ॥

वन्हीची ज्वाळा जैसी। वायां जाय आकाशीं।
क्रिया जिरों दे तैसी। शून्यामाजी॥ १३३ ॥

अर्जुना हा फलत्यागु। आवडे कीर असलगु।
परि योगामाजिं योगु। धुरेचा हा॥ १३४ ॥

येणें फलत्यागें सांडे। तें तें कर्म न विरूढे।
एकचि वेळे वेळुझाडें। वांझें जैसीं॥ १३५ ॥

तैसें येणेंचि शरीरें। शरीरा येणें सरे।
किंबहुना येरझारे। चिरा पडे॥ १३६ ॥

पैं अभ्यासाचिये पाउटीं। ठाकिजे ज्ञान किरीटी।
ज्ञानें येइजे भेटी। ध्यानाचिये॥ १३७ ॥

मग ज्ञानासि खेंव। देती आघवेचि भाव।
तेव्हां कर्मजात सर्व। दूरी ठाके॥ १३८ ॥

कर्म जेथ दुरावे। तेथ फलत्यागु संभवे।
त्यागास्तव आंगवे। शांति सगळी॥ १३९ ॥

म्हणोनि यावया शांति। हाचि अनुक्रमु सुभद्रापति।
अभ्यासुचि प्रस्तुतीं। कारणें एथ॥ १४० ॥

श्रेयो हि ज्ञानमभ्यासात् ज्ञानात् ध्यानं विशिष्यते।
ध्यानात कर्मफलत्यागः त्यागात् शान्तिनिरन्तरम्॥ १२.१२ ॥

अभ्यासाहूनि गहन। पार्था मग ज्ञान।
ज्ञानापासोनि ध्यान। विशेषिजे॥ १४१ ॥

मग कर्मफलत्यागु। तो ध्यानापासोनि चांगु।
त्यागाहूनि भोगु। शांतिसुखाचा॥ १४२ ॥

ऐसिया यया वाटा। इहींचि पेणा सुभटा।
शांतीचा माजिवटा। ठाकिला जेणें॥ १४३ ॥

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च।
निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी॥ १२.१३ ॥

जो सर्व भूतांचियां ठायीं। द्वेषातें नेणेंचि कांहीं।
आपपरु नाहीं। चैतन्या जैसा॥ १४४ ॥

उत्तमातें धरिजे। अधमातें अव्हेरिजे।
हें काहींचि नेणिजे। वसुधा जेवीं॥ १४५ ॥

कां रायाचें देह चाळूं। रंकातें परौतें गाळूं।
हें नेणेंचि कृपाळू। प्राणु पैं गा॥ १४६ ॥

गाईची तृषा हरूं। कां व्याघ्रा विष होऊनि मारूं।
ऐसें नेणेंचि गा करूं। तोय जैसें॥ १४७ ॥

तैसी आघवियांचि भूतमात्रीं। एकपणें जया मैत्री।
कृपेशीं धात्री। आपणपां जो॥ १४८ ॥

आणि मी तूं हे भाष नेणें। माझें काहींचि न म्हणे।
सुखदुःख जाणणें। नाहीं जया॥ १४९ ॥

तेवींचि क्षमेलागीं। पृथ्वीसि पवाडु आंगीं।
संतोषा उत्संगीं। दिधलें घर॥ १५० ॥

संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः।
मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मद्भक्तः स मे प्रियः॥ १२.१४॥

वार्षियेवीण सागरू। जैसा जळें नित्य निर्भरु।
तैसा निरुपचारु। संतोषी जो॥ १५१॥

वाहूनि आपुली आण। धरी जो अंतःकरण।
निश्चया साचपण। जयाचेनि॥ १५२॥

जीव परमात्मा दोनी। बैसोनिया ऐक्यासनीं।
जयाचियां हृदयभुवनीं। विराजती॥ १५३॥

ऐसा योगसमृद्धि। होऊनि जो निरवधि।
अर्पी मनोबुद्धि। माझियां ठायीं॥ १५४॥

आंतु बाहेरि योगु। निर्वाळलेयाहि चांगु।
तरी माझा अनुरागु। सप्रेम जया॥ १५५॥

अर्जुना गा तो भक्तु। तोचि योगी तोचि मुक्तु।
तो वल्लभा मी कांतु। ऐसा पढिये॥ १५६॥

हें ना तो आवडे। मज जीवाचेनि पाडे।
हेंही एथ थोडें। रूप करणें॥ १५७॥

तरि पढियंतयाची कहाणी। हे भूलीची भारणी।
इयें तंव न बोलणीं। परि बोलवी श्रद्धा॥ १५८॥

म्हणोनि गा आम्हां। वेगा आली उपमा।
एऱ्हवीं काय प्रेमा। अनुवादु असे॥ १५९॥

आतां असो हें किरीटी। पैं प्रियाचिया गोष्टी।
दुणा थांव उठी। आवडी गा॥ १६०॥

तयाही वरी विपायें। प्रेमळु संवादिया होये।
तिये गोडीसी आहे। कांटाळें मग॥ १६१॥

म्हणोनि गा पांडुसुता। तूंचि प्रियु आणि तूंचि श्रोता।
वरी प्रियाची वार्ता। प्रसंगें आली॥ १६२॥

तरी आतां बोलों। भले या सुखां मीनलों।
ऐसें म्हणतखेंवीं डोलों। लागले देवो॥ १६३॥

मग म्हणे जाण। तया भक्तांचे लक्षण।
जया मी अंतःकरण। बैसों घालीं॥ १६४॥

यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः।
हर्षामर्षभयोद्वेगैः मुक्तो यः स च मे प्रियः॥ १२.१५॥

तरी सिंधूचेनि माजें। जळचरां भय नुपजे।
आणि जलचरीं नुबगिजे। समुद्र जैसा॥ १६५॥

तेविं उन्मत्तें जगें। जयासि खंति न लगे।
आणि जयाचेनि आंगें। न शिणे लोकु॥ १६६॥

किंबहुना पांडवा। शरीर जैसें अवयवां।
तैसा नुबगे जीवां। जीवपणें जो॥ १६७॥

जगचि देह जाहलें। म्हणोनि प्रियाप्रिय गेलें।
हर्षामर्ष ठेले। दुजेनविण॥ १६८॥

ऐसा द्वन्द्व निर्मुक्तु। भयोद्वेग रहितु।
याहिवरि भक्तु। माझियां ठायीं॥ १६९॥

तरी तयाचा गा मज मोहो। काय सांगों तो पढियावो।
हें असो जीवें जीवो। माझेनि तो॥ १७०॥

जो निजानंदें धाला। परिणामु आयुष्या आला।
पूर्णते जाहला। वल्लभु जो॥ १७१॥

अनपेक्षः शुचिर्दक्ष उदासीनो गतव्यथः।
सर्वारम्भपरित्यागी यो मद्भक्तः स मे प्रियः १२.१६॥

जयाचियां ठायीं पांडवा। अपेक्षे नाहीं रिगावा।
सुखाचि चढावा। जयाचें असणें॥ १७२॥

मोक्ष देऊनि उदार। काशी होय कीर।
परि वेचणे लागे शरीर। तिये गांवीं॥ १७३॥

हिमवंतु दोष खाये। परि जीविताची हानि होये।
तैसें शुचित्व नोहे। सज्जनाचें॥ १७४॥

शुचित्वें शुचि गंगा होये। आणि पापतापही जाये।
परि तेथें आहे। बुडणें एक॥ १७५॥

खोलिये पारु नेणिजे। तरी भक्तीं न बुडिजे।
रोकडाचि लाहिजे। न मरतां मोक्षु॥ १७६॥

संताचेनि अंगलगें। पापातें जिणणें गंगे।
तेणें संतसंगें। शुचित्व कैसें॥ १७७॥

म्हणोनि असो जो ऐसा। शुचित्वें तीर्थां कुवासा।
जेणें उल्लंघविलें दिशा। मनोमळ॥ १७८॥

आंतु बाहेरु चोखाळु। सूर्य जैसा निर्मळु।
आणि तत्त्वार्थींचा पायाळु। देखणा जो॥ १७९॥

व्यापक आणि उदास। जैसें कां आकाश।
तैसें जयाचें मानस। सर्वत्र गा॥ १८०॥

संसारव्यथे फिटला। जो नैराश्यें विनटला।
व्याधाहातोनि सुटला। विहंगमु जैसा॥ १८१॥

तैसा सतत जो सुखें। कोणीही टवंच न देखे।
नेणिजे गतायुषें। लज्जा जेवीं॥ १८२॥

आणि कर्मारंभालागीं। जया अहंकृती नाही आंगीं।
जैसा निरिंधन आगी। विझोनि जाय॥ १८३॥

तैसा उपशमुचि भागा। जयासि आला पैं गा।
जो मोक्षाचिया आंगा। लिहिला असे॥ १८४॥

अर्जुना हा ठावोवरी। जो सोहंभावो सरोभरीं।
तो द्वैताचियां पैलतीरीं। निगों सरला॥ १८५॥

कीं भक्तिसुखालागीं। आपणपेंचि दोही भागीं।
वांटूनिया आंगीं। सेवकै बाणी॥ १८६॥

येरा नाम मी ठेवी। मग भजती वोज बरवी।
न भजतया दावी। योगिया जो॥ १८७॥

तयांचे आम्हां व्यसन। आमुचें तो निधान।
किंबहुना समाधान। तो मिळे तैं॥ १८८॥

तयालागीं मज रूपा येणें। तयाचेनि मज एथें असणें।
तया लोण कीजे जीवें प्राणें। ऐसा पढिये॥ १८९॥

यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न कांक्षति।
शुभाशुभपरित्यागी भक्तिमान्यः स मे प्रियः॥ १२.१७॥

जो आत्मलाभासारिखें। गोमटें कांहींचि न देखे।
म्हणोनि भोगविशेखें। हरिखेजेना॥ १९०॥

आपणचि विश्व जाहला। तरि भेदभावो सहजचि गेला।
म्हणोनि द्वेषु ठेला। जया पुरुषा॥ १९१॥

पैं आपुलें जें साचें। तें कल्पांतींहीं न वचे।
हें जाणोनि गताचें। न शोची जो॥ १९२॥

आणि जयापरौतें कांहीं नाहीं। तें आपणपेंचि आपुलियां ठायीं।
जाहला या लागीं जो कांहीं। आकांक्षी ना॥ १९३॥

वोखटें कां गोमटें। हें काहींचि तया नुमटें।
रात्रि दिवस न घटे। सूर्यासि जेवीं॥ १९४॥

ऐसा बोधुचि केवळू। जो होऊनि असे निष्कळु।
त्याहीवरी भजनशीळु। माझियां ठायीं॥ १९५॥

तरि तयां ऐसें दुसरें। आम्हां पढियंतें सोयरें।
नाहीं गा साचोकारें। तुझी आण॥ १९६॥

समः शत्रौ च मित्रे च तथामानापमानयोः।
शीतोष्णसुखदुःखेषु समः सङ्गविवर्जितः॥ १२.१८॥

पार्था जयाचियां ठायीं। वैषम्याची वार्ता नाहीं।
रिपुमित्रां दोहीं। सरिसा पाडु॥ १९७॥

कां घरींचियां उजेडु करावा। पारखियां आंधारु पाडावा।
हें नेणेचि गा पांडवा। दीपु जैसा॥ १९८॥

जो खांडावया घावो घाली। कां लावणी जयानें केली।
दोघां एकचि साउली। वृक्ष दे जैसा॥ १९९॥

नातरी इक्षुदंडु। पाळितया गोडु।
गाळितया कडु। नोहेचि जेवीं॥ २००॥

अरिमित्रीं तैसा। अर्जुना जया भावो ऐसा।
मानापमानीं सरिसा। होतु जाये॥ २०१॥

तिहीं ऋतूं समान। जैसें का गगन।
तैसें एकचि मान। शीतोष्णीं जया॥ २०२॥

दक्षिण उत्तर मारुता। मेरु जैसा पांडुसुता।
तैसा सुखदु:खप्राप्ता। मध्यस्थु जो॥ २०३॥

माधुर्यें चंद्रिका। सरिसी रायां रंका।
तैसा जो सकळिकां। भूतां समु॥ २०४॥

आघविया जगा एक। सेव्य जैसें उदक।
तैसें तयांतें तिन्ही लोक। आकांक्षिती॥ २०५॥

जो सबाह्य संगु। सांडोनिया लागु।
एकाकी असे आंगु। आंगीं सूनी॥ २०६॥

तुल्यनिंदास्तुतिर्मौनी संतुष्टो येन केनचित्।
अनिकेतः स्थिरमतिः भक्तिमान्मे प्रियो नरः॥ १२.१९॥

जो निंदेतें नेघे। स्तुति न श्लाघे।
आकाशा न लगे। लेपु जैसा॥ २०७॥

तैसें निंदे आणि स्तुती। मानु करूनि एके पांती।
विचरे प्राणवृत्ती। जनीं वनीं॥ २०८॥

साच लटिकें दोन्ही। बोलोनि न बोले जाहला मौनी।
जो भोगितां उन्मनी। आरायेना॥ २०९॥

जो यथालाभें संतोखे। अलाभें न पारुखे।
पाउसेवीण न सुके। समुद्र जैसा॥ २१०॥

आणि वायूसि एके ठायीं। बिढार जैसें नाहीं।
तैसा न धरीचि केहीं। आश्रयो जो॥ २११॥

आघवाचि आकाशस्थिति। जेवीं वायूसि नित्य वसति।
तेवीं जगचि विश्रांति। स्थान जया॥ २१२॥

हें विश्वचि माझें घर। ऐसी मती जयाची स्थिर।
किंबहुना चराचर। आपण जाहला॥ २१३॥

मग याहीवरी पार्था। माझियां भजनीं आस्था।
तरी तयातें मी माथां। मुकुट करीं॥ २१४॥

उत्तमासि मस्तक। खालवीजे हें काय कौतुक।
परि मानु करिती तिन्ही लोक। पायवणिया॥ २१५॥

तरि श्रद्धावस्तुसि आदरु। करिता जाणिजे प्रकारु।
जरी होय श्रीगुरु। सदाशिवु॥ २१६॥

परि हें असो आतां। महेशातें वानितां।
आत्मस्तुति होतां। संचारु असे॥ २१७॥

ययालागीं हें नोहे। म्हणितलें रमानाथें।
अर्जुना मी वाहें। शिरीं तयातें॥ २१८॥

जे पुरुषार्थसिद्धी चौथी। घेऊनि आपुलियां हातीं।
रिगाला भक्तिपंथीं। जगा देतु॥ २१९॥

कैवल्याचा अधिकारी। मोक्षाची सोडीबांधी करी।
कीं जळाचिये परी। तळवटु घे॥ २२०॥

म्हणोनि गा नमस्कारूं। तयातें आम्ही माथा मुगुट करूं।
तयाची टांच धरूं। हृदयीं आम्ही॥ २२१॥

तयाचिया गुणांची लेणीं। लेववूं आपुलिये वाणी।
तयाची कीर्तिं श्रवणीं। आम्ही लेऊं॥ २२२॥

तो पाहावा हे डोहळे। म्हणोनि अचक्षुसी मज डोळे।
हातिंचेनि लीलाकमळें। पुजूं तयातें॥ २२३॥

दोंवरी दोनी। भुजा आलो घेउनि।
आलिंगावयालागुनि। तयाचें आंग॥ २२४॥

तया संगाचेनि सुरवाडें। मज विदेहा देह धरणें घडे।
किंबहुना आवडे। निरुपमु॥ २२५॥

तेणेंसीं आम्हां मैत्र। एथ कायसें विचित्र।
परि तयाचें चरित्र। आइकती जे॥ २२६॥

तेही प्राणापरौते। आवडती हें निरुतें।
जे भक्तचरित्रातें। प्रशंसिती॥ २२७॥

जें हें अर्जुना साद्यंत। सांगितलें प्रस्तुत।
भक्तियोगु समस्त। योगरूप॥ २२८॥

जे मी प्रीति करीं। कां मनीं शिरसा धरीं।
येवढी थोरी। जया स्थितीये॥ २२९॥

ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते।
श्रद्दधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः॥ १२.२०॥

ते हे गोष्टी रम्य। अमृतधारा धर्म्य।
करिती प्रतीतिगम्य। आइकोनि जे॥ २३०॥

तैसीचि श्रद्धेचेनि आदरें। जयांचा ठायीं विस्तरे।
जीवीं जया थारे। जे अनुष्ठिती॥ २३१॥

परि निरूपली जैसी। तैसीच स्थिति मानसीं।
मग सुक्षेत्रीं जैसी। पेरणी केली॥ २३२॥

परि मातें परम करूनि। इयें अर्थी प्रेम धरूनि।
हेंचि सर्वस्व मानूनि। घेती जे पैं॥ २३३॥

पार्था गा जगीं। तेचि भक्त तेचि योगी।
उत्कंठा तयालागीं। अखंड मज॥ २३४॥

ते तीर्थ ते क्षेत्र। जगीं तेचि पवित्र।
भक्तिकथेसि मैत्र। जयां पुरुषां॥ २३५॥

आम्हीं तयाचें करूं ध्यान। तो आमुचें देवतार्चन।
तेवांचूनि आन। गोमटें नाहीं॥ २३६॥

तयाचें आम्हां व्यसन। ते आमुचें निधिनिधान।
किंबहुना समाधान। ते मिळे तैं॥ २३७॥

पैं प्रेमळाची वार्ता। जे अनुवादती पांडुसुता।
ते मानूं परमदेवता। आपुली आम्ही॥ २३८॥

ऐसे निजजनानंदें। तेणें जगदादिकंदें।
बोलिलें मुकुंदें। संजयो म्हणे॥ २३९॥

राया जो निर्मळु। निष्कलंक लोककृपाळु।
शरणागतं प्रतिपाळु। शरण्यु जो॥ २४०॥

जो धर्मकीर्ति धवळु। आगाध दातृत्वें सरळु।
अतुलबळें प्रबळु। बळिबंधनु॥ २४१॥

जो पैं सुरसहायशीळु। लोकलालनलीळु।
प्रणतप्रतिपाळु। हा खेळु जयाचा॥ २४२॥

जो भक्तजनवत्सळु। प्रेमळजनप्रांजळु।
सत्यसेतु सरळु। कलानिधि॥ २४३॥

तो श्रीकृष्णजी वैकुंठींचा। चक्रवर्ती निजांचा।
सांगतुसे येरू दैवाचा। आइकतु असे॥ २४४॥

आतां ययावरी। निरूपिती परी।
संजयो म्हणे अवधारीं। धृतराष्ट्रातें॥ २४५॥

तेचि रसाळ कथा। मऱ्हाटिया प्रतिपथा।
आणिजेल आतां। अवधारिजो॥ २४६॥

ज्ञानदेव म्हणे तुम्ही। संत वोळगावेति आम्ही।
हें पढविलों जी स्वामी। निवृत्तिदेवें॥ २४७॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे भक्तियोगोनाम द्वादशोऽध्यायः॥

इति ज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां
द्वादशोऽध्यायः॥ १२॥

श्लोक २० ओव्या २४७

## 13 Body and Consciousness
## क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग

श्रीमद्भगवद्गीता त्रयोदशोऽध्यायः।
ज्ञानेश्वरी अध्याय तेरावा

---

आत्मरूप गणेशु स्मरण। सकळ विद्यांचें अधिकरण।
तेचि वंदू श्रीचरण। श्रीगुरूचे॥ १॥

जयांचेनि आठवें। शब्दसृष्टी आंगवे।
सारस्वत आघवें। जिव्हेसि ये॥ २॥

वक्तृत्व गोडपणें। अमृतातें पारुष म्हणे।
रस होती वोळगणें। अक्षरांसी॥ ३॥

भावाचें अवतरण। अवतरविती खूण।
हाता चढे संपूर्ण। तत्त्वबोध॥ ४॥

श्रीगुरूचे पाय। जैं हृदय गिंवसूनि ठाय।
तैं येवढें भाग्य होय। उन्मेषासी॥ ५॥

ते नमस्कारूनि आतां। तो पितामहाचा पिता।
लक्ष्मीयेचा भर्ता। ऐसें म्हणे॥ ६॥

श्रीभगवानुवाच।
इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधीयते॥
एतद्यो वेत्ति तं प्राहुः क्षेत्रज्ञ इति तद्विदः॥ १३.१॥

तरी पार्था परिसिजे। देह हे क्षेत्र म्हणिजे।
हेंचि जाणे तो बोलिजे। क्षेत्रज्ञु एथें॥ ७॥

क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत॥
क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम॥ १३.२॥

तरि क्षेत्रज्ञु जो एथें। तो मीचि जाण निरुतें।
जो सर्व क्षेत्रातें। संगोपोनि असे॥ ८॥

क्षेत्र आणि क्षेत्रज्ञातें। जाणणें जें निरुतें।
ज्ञान ऐसें तयातें। मानूं आम्ही॥ ९॥

तत् क्षेत्रं यच्च यादृक् च यद्विकारि यतश्च यत्॥
स च यो यत्प्रभावश्च तत् समासेन मे श्रुणु॥ १३.३॥

तरि क्षेत्र येणें नावें। हें शरीर जेणें भावें।
म्हणितलें तें आघवें। सांगों आतां॥ १०॥

हें क्षेत्र का म्हणिजे। कैसें कें उपजे।
कवण कवणीं वाढविजे। विकारीं एथ॥ ११॥

हें औट हात मोटकें। कीं केवढें पां केतुकें।
बरड कीं पिके। कोणाचें हें॥ १२॥

इत्यादि सर्व। जे जे याचे भाव।
ते बोलिजती सावेव। अवधान देईं॥ १३॥

पैं याचि स्थळाकारणें। श्रुति सदा बोबाणे।
तर्कु येणेंचि ठिकाणें। तोंडाळु केला॥ १४॥

चाळिता हेचि बोली। दर्शनें शेवटा आलीं।
तेवींचि नाहीं बुझविली। अझुनि द्वंद्वं॥ १५॥

शास्त्रांचिये सोयरिके। विचळिजे येणेंचि एकें।
याचेनि एकवंकें। जगासि वादु॥ १६॥

तोंडेसीं तोंडा न पडे। बोलेंसीं बोला न घडे।
इया युक्ती बडबडे। न्याय जाहली॥ १७॥

नेणों कोणाचें हें स्थळ। परि कैसें अभिलाषाचें बळ।
जे घरोघरीं कपाळ। पिटवीत असे॥ १८॥

नास्तिका द्यावया तोंड। वेदांचें गाढें बंड।
तें देखोनि पाखांड। आनचि वाजे॥ १९॥

म्हणे तुम्ही निर्मूळ। लटिकें हें वाग्जाळ।
ना म्हणसी तरी पोफळ। घातलें आहे॥ २०॥

पाखांडाचे कडे। नागवीं लुंचिती मुंडे।
नियोजिली वितंडें। ताळासि येती॥ २१॥

मृत्युबळाचेनि माजें। हें जाईल वीण काजें।
तें देखोनियां व्याजें। निघाले योगी॥ २२॥

मृत्यूसी आधाधिले। तिहीं निरंजन सेविलें।
यमदमांचे केले। मेळावे पुरे॥ २३॥

येणेंचि क्षेत्राभिमानें। राज्य त्यजिलें ईशानें।
गुंती जाणोनि स्मशानें। वासु केला॥ २४॥

ऐसिया पैजा महेशा। पांघुरणें दाही दिशा।
लांचकरू म्हणोनि कोळसा। कामु केला॥ २५॥

पैं सत्यलोकनाथा। वदनें आलीं बळार्था।
तरी तो सर्वथा। जाणेचिना॥ २६॥

ऋषिभिर्बहुधा गीतं छन्दोभिर्विविधैः पृथक्॥
ब्रह्मसूत्रपदैश्चैव हेतुमद्भिर्विनिश्चितैः॥ १३.४॥

एक म्हणती हें स्थळ। जीवाचेंचि समूळ।
मग प्राण हें कूळ। तयाचें एथ॥ २७॥

जया प्राणाचियं घरी। अंगें राबते भाऊ चारी।
आणि मना ऐसा आवारी। कुळवाडीकरु॥ २८॥

तयातें इंद्रियबैलांची पेटी। न म्हणे अवसीं पाहाटीं।
विषयक्षेत्रीं आटी। काढी भली॥ २९॥

मग विधीची वाफ चुकवी। आणि अन्यायाचें बी वाफवी।
कुकर्माचा करवी। राबु जरी॥ ३०॥

तरी तयाचि सारिखें। असंभाव्य पाप पिके।
मग जन्मकोटी दुःखें। भोगी जीवु॥ ३१॥

ना तरी विधीचिये वाफे। सत्क्रिया बीज आरोपे।
तरी जन्मकोटि मापें। सुखचि मविजे॥ ३२॥

तंव आणिक म्हणती हें नव्हे। हें जिवाचेंचि न म्हणावें।
आमुतें पुसा आघवें। क्षेत्राचें या ॥ ३३॥

अहो जीवु एथ उखिता। वस्तीकरु वाटे जातां।
आणि प्राणु हा बलौता। म्हणोनि जागे॥ ३४॥

अनादि जे प्रकृती। सांख्य जियेतें गाती।
क्षेत्र हे वृत्ती। तियेची जाणा॥ ३५॥

आणि तियेतेंचि आघवा। आथी घरमेळावा।
म्हणोनि ते वाहिवा। घरीं वाहे॥ ३६॥

वाहिव्याचिये राहटी। जे कां मुदल तिघे इये सृष्टी।
ते इयेचांचि पोटीं। जहाले गुण॥ ३७॥

रजोगुण पेरी। तेतुलें सत्त्व सोंकरी।
एकलें तम करी। संवंगणी॥ ३८॥

रचूनि महत्तत्त्वाचें खळें। मळी एकें काळुगेनि पोळें।
तेथ अव्यक्ताची मिळे। सांज भली॥ ३९॥

तंव एकीं मतिवंतीं। या बोलाचिया खंती।
म्हणितलें यया ज्ञप्ती। अर्वाचीना॥ ४०॥

हां हो परतत्त्वाआंतु। कें प्रकृतीची मातु।
हा क्षेत्रवृत्तांतु। उगेंचि आइका॥ ४१॥

शून्यसेज साळिये। सुलीनतेचिये तुळिये।
निद्रा केली होती बळिये। संकल्पें येणें॥ ४२॥

तो अवसांत चेइला। उद्यमीं सदैव भला।
म्हणोनि ठेवा झाला। इच्छेसवें॥ ४३॥

निरालंबींची वाडी। त्रिभुवनायेवढी।
हे तयाचिये जोडी। रूपा आली॥ ४४॥

महाभूतांचें एकवाट। सैरा वेंटाळूनि भाट।
भूतग्रामांचे आघाट। चिरिले चारी॥ ४५॥

यावरी आदी। पांचवटेयाची बांधी।
बांधली प्रभेदीं। पंचभूतिकीं॥ ४६॥

कर्माकर्मांचे गुंडे। बांध घातले दोहींकडे।
नपुंसकें बरडें। रानें केलीं॥ ४७॥

तेथ येरझारेलागीं। जन्ममृत्यूची सुरंगी।
सुहाविली निलागीं। संकल्पें येणें॥ ४८॥

मग अहंकारासि एकलाधी। करूनि जीवितावधी।
वहाविलें बुद्धी। चराचर॥ ४९॥

यापरी निराळीं। वाढे संकल्पाची डाहाळी।
म्हणोनि तो मुळीं। प्रपंचा यया॥ ५०॥

इयापरी मतमुक्तकीं। तेथ पडिघायिलें आणिकीं।
म्हणती हां हो विवेकी। तरी तुम्ही भले॥ ५१॥

परतत्त्वाचियां गांवी। संकल्पसेज देखावी।
तरी का पां न मनावी। प्रकृति तयांची॥ ५२॥

परि हें असो नव्हे। तुम्ही या न लगावें।
आतांचि हें आघवें। सांगिजेल॥ ५३॥

तरि आकाशीं कवणें। केलीं मेघाचीं भरणें।
अंतरिक्षीं तारांगणें। धरी कवण॥ ५४॥

गगनाचा चांडवा। कोणें वोढिला केधवां।
वारा हिंडतु असावा। हें कवणाचें मत॥ ५५॥

रोमां कवण पेरी। कोण समुद्र भरी।
पर्जन्याचिया करी। धारा कवण॥ ५६॥

तैसें क्षेत्र हें स्वभावें। हे वृत्ती कवणाची नव्हे।
हें वाहे तया फावे। येरां तुटे॥ ५७॥

तंव आणिकें एकें। क्षोभें म्हणितलें निकें।
तरि भोगिजे एकें। काळें केवीं हें॥ ५८॥

हें जाणें मृत्यु रागिटा। सिंहाडयाचा दरकुटा।
परी काय कीजे वांजटा। पूरीजत असे॥ ५९॥

तरि ययाचा मारु। देखताति अनिवारु।
परी स्वमतीं भरु। अभिमानियां॥ ६०॥

महाकल्पापरौती। कव घालुनि अवचितीं।
सत्यलोकभद्रजाती। आंगीं वाजे॥ ६१॥

लोकपाळ नीत्य नवे। दिग्गजांचे मेळावे।
स्वर्गीचिये आडवे। रिगोनि मोडी॥ ६२॥

येरें ययाचेनि अंगवातें। जन्ममृत्यूचिये गर्ते।
निर्जीवें होऊनि भ्रमतें। जीवमृगें॥ ६३॥

न्याहाळीं पां केव्हडा। पसरलासे चवडा।
जो करूनियां माजिवडा। आकारगजु॥ ६४॥

हे बहु म्हणोनि काळाची सत्ता। हाचि बोलु निरुता।
ऐसे वादु पांडुसुता। क्षेत्रालागीं॥ ६५॥

हे बहु उखिविखी। ऋषीं केली नैमिषीं।
पुराणें इयेविषीं। मतपत्रिका॥ ६६॥

अनुष्टुभादि छंदें। प्रबंधीं जियें विविधें।
ते पत्रावलंबन मदें। करिताति अझुनी॥ ६७॥

वेदींचें बृहत्सामसूत्र। देखणेपणें पवित्र।
परी तयाही हें क्षेत्र। नेणवेचि॥ ६८॥

आणीक आणीकींही बहुतीं। महाकवीं हेतुमंतीं।
ययालागीं मती। वेंचिलिया॥ ६९॥

परी ऐसें हें एवढें। कीं अमुकेयाचेंचि फुडें।
हें कोणाही वरपडें। होयचिना॥ ७०॥

आतां यावरी जैसें। क्षेत्र हें असे।
तुज सांगों तैसें। साद्यंतु गा॥ ७१॥

महाभूतान्यहङ्कारो बुद्धिरव्यक्तमेव च॥
इन्द्रियाणि दशैकं च पञ्च चेन्द्रियगोचराः॥ १३.५॥

इच्छा द्वेषः सुखं दुःखं सङ्घातश्चेतना धृतिः॥
एतत् क्षेत्रं समासेन सविकारमुदाहृतम्॥ १३.६॥

तरि महाभूतपंचकु। आणि अहंकारु एकु।
बुद्धि अव्यक्त दशकु। इंद्रियांचा॥ ७२॥

आणीकही एकु। विषयांचादशकु।
सुख दुःख द्वेषु। संघात इच्छा॥ ७३॥

आणि चेतना धृती। एवं क्षेत्रव्यक्ती।
सांगितली तुजप्रती। आघवीचि॥ ७४॥

आतां महाभूतें कवणें। कवण विषयो कैसीं करणे।
हें वेगळालेपणें। एकैक सांगों॥ ७५॥

तरी पृथ्वी आप तेज। वायु व्योम इयें तुज।
सांगितलीं बुझ। महाभूतें पांचें॥ ७६॥

आणि जागतिये दशे। स्वप्न लपालें असे।
नातरी अंवसे। चंद्र गूढु॥ ७७॥

ना ना अप्रौढबाळकीं। तारुण्य राहे थोकीं।
कां न फुलतां कळिकीं। आमोदु जैसा॥ ७८॥

किंबहुना काष्ठीं। वह्नि जेवीं किरीटी।
तेवीं प्रकृतिचियां पोटीं। गोप्यु जो असे॥ ७९॥

जैसा ज्वरु धातुगतु। अपथ्याचें मिष पहातु।
मग जालिया आंतु। बाहेरी व्यापी॥ ८०॥

तैसी पांचाहीं गांठी पडे। जैं देहाकारु उघडे।
तैं नाचवी चहूंकडे। तो अहंकारु गा॥ ८१॥

नवल अहंकाराची गोठी। विशेषें न लगे अज्ञानापाठीं।
सज्ञानाचे झोंबे कंठीं। ना ना संकटी नाचवी॥ ८२॥

आतां बुद्धि जे म्हणिजे। ते ऐशियां चिन्हीं जाणिजे।
बोलिलें यदुराजें। तें आइकें सांगों॥ ८३॥

तरी कंदर्पाचेनि बळें। इंद्रियें वृत्तीचेनि मेळें।
विभांडूनि येती पाळे। विषयांचे॥ ८४॥

तो सुखदुःखांचा नागोवा। जेथ उगाणों लागे जीवा।
तेथ दोहींसीही बरवा। पाडु जे धरी॥ ८५॥

हें सुख हें दुःख। हें पुण्य हें दोष।
कां हें मैळ हें चोख। ऐसें निवडी॥ ८६॥

जिये अधमोत्तम सुझे। जिये सानें थोर बुझे।
जिया दिठी पारखिजे। विषो जीवें॥ ८७॥

जे तेजतत्त्वाची आदी। जे सत्त्वगुणाची वृद्धी।
जे आत्मया जीवाची संधी। वसवीत असे॥ ८८॥

अर्जुना ते गा जाण। बुद्धि तूं संपूर्ण।
आतां आइकें वोळखण। अव्यक्ताची॥ ८९॥

पैं सांख्यांचियां सिद्धांतीं। प्रकृती जे महामती।
तेचि एथें प्रस्तुतीं। अव्यक्त गा॥ ९०॥

आणि सांख्ययोगमतें। प्रकृती परिसविली तूंतें।
ऐसी दोहीं परीं जेथें। विवंचिली॥ ९१॥

तेथ दुजी जे जीवदशा। तिये नांव वीरेशा।
येथ अव्यक्त ऐसा। पर्यावो हा॥ ९२॥

तरी पाहालया रजनी। तारा लोपती गगनीं।
कां हारपें अस्तमानीं। भूतक्रिया॥ ९३॥

ना तरी देहो गेलिया पाठीं। देहादिक किरीटी।
उपाधि लपे पोटीं। कृतकर्मांचियां॥ ९४॥

कां बीजमुद्रेआंतु। थोके तरु समस्तु।
कां वस्त्रपण तंतु। दशे राहे॥ ९५॥

तैसे सांडोनियां स्थूळधर्म। महाभूतें भूतग्राम।
लया जाती सूक्ष्म। होऊनि जेथें॥ ९६॥

अर्जुना तया नांवें। अव्यक्त हें जाणावें।
आतां आइकें आघवे। इंद्रियभेद॥ ९७॥

तरि श्रवण नयन। त्वचा घ्राण रसन।
इयें जाणें ज्ञान। करणें पांचें॥ ९८॥

इये तत्त्वमेळापकीं। सुखदुःखाची उखिविखी।
बुद्धि करिते मुखीं। पांचें इहीं॥ ९९॥

मग वाचा आणि कर। चरण आणि अधोद्वार।
पायु हे प्रकार। पांच आणिक॥ १००॥

कर्मेन्द्रियें म्हणिपती। तीं इयें जाणिजती।
आइकें कैवल्यपती। सांगतसे॥ १०१॥

पैं प्राणाची अंतौरी। क्रियाशक्ती जे शरीरीं।
तियेचि रिगिनिगी द्वारीं। पांचे इहीं॥ १०२॥

एवं दाहाही करणें। सांगितलीं देवो म्हणे।
परिस आतां फुडेपणें। मन तें ऐसें॥ १०३॥

जें इंद्रियां आणि बुद्धी। माझारिलिये संधीं।
रजोगुणाचियां खांदीं। तरळत असे॥ १०४॥

नीळिमा अंबरीं। कां मृगतृष्णालहरी।
तैसें वायांचि फरारी। वावो जाहलें॥ १०५॥

आणि शुक्रशोणिताचा सांधा। मिळतां पांचाचियां बांधा।
वायुतत्त्व दशधा। एकचि जाहलें॥ १०६॥

मग तिहीं दाहीभागीं। देहधर्माचियां खैवंगीं।
अधिष्ठिलें आंगीं। आपुलालियां॥ १०७॥

तेथ चांचल्य निखळ। एकलें ठेलें निढाळ।
म्हणोनि रजाचें बळ। धरिलें तेणें॥ १०८॥

तें बुद्धीसि बाहेरी। अहंकाराचिया उरावरी।
ऐसां ठायीं माझारीं। बळियावलें॥ १०९॥

वायां मन हें नांव। एऱ्हवीं कल्पनाचि सावेव।
जयाचेनि संगें जीव। दशा वस्तु॥ ११०॥

जें प्रवृत्तीसि मूळ। कामा जयाचे बळ।
जें अखंड सूये छळ। अहंकारासी॥ १११॥

जें इच्छेतें वाढवी। आशेतें चढवी।
जें पाठी पुरवी। भयासि गा॥ ११२॥

द्वैत जेथें उठी। अविद्या जेणें लाठी।
जें इंद्रियातें लोटी। विषयांमाजी॥ ११३॥

संकल्पें सृष्टी घडी। सवेंचि विकल्पूनि मोडी।
मनोरथांचिया उतरंडी। उतरी रची॥ ११४॥

जें भुलीचें कुहर। वायुतत्त्वाचें अंतर।
बुद्धीचें द्वार। झाकविलें जेणें॥ ११५॥

तें गा किरीटी मन। या बोला नाहीं आन।
आतां विषयाभिधान। भेदु आइकें॥ ११६॥

तरी स्पर्शु आणि शब्दु रूप रस गंधु।
हा विषयो पंचविधु। ज्ञानेंद्रियांचा॥ ११७॥

एहींचि पांचैं द्वारीं। ज्ञानासि धांव बाहेरी।
जैसा कां हिरवे चारीं। भांबावे पशु॥ ११८॥

मग स्वर वर्णु विसर्गु। अथवा स्वीकार त्यागु।
संक्रमण उत्सर्गु। विण्मूत्राचा॥ ११९॥

हे कर्मेंद्रियांचे पांच। विषय गा साच।
जे बांधोनियां माच। क्रिया धांवे॥ १२०॥

ऐसे हे दाही। विषय इये देहीं।
आतां इच्छा तेही। सांगिजैल॥ १२१॥

तरी भूतलें आठवे। कां बोलें कानु झांकवे।
ऐसियावरी चेतवे। जे गा वृत्ती॥ १२२॥

इंद्रियाविषयांचिये भेटी। सरसीच वेगें उठी।
कामाची बाहुटी। धरूनियां॥ १२३॥

जियेचेनि उठिलेपणें। मना सैंघ धावणें।
न रिगावें तेथ करणें। तोंडें सुती॥ १२४॥

जिये वृत्तीचिया आवडी। बुद्धी होय वेडी।
विषयां जिया गोडी। ते गा इच्छा॥ १२५॥

आणी इच्छिलिया सांगडें। इंद्रियां आमिष न जोडे।
तेथ जोडे ऐसा जो डावो पडे। तोचि द्वेषु॥ १२६॥

आतां यावरी सुख। तें एवंविध देख।
जेणें एकेंचि अशेष। विसरे जीवु॥ १२७॥

मना वाचे काये। जें आपुली आण वाये।
देहस्मृतीची त्राये। मोडित जें ये ॥ १२८॥

जयाचेनि जालेपणें। पांगुळा होइजे प्राणें।
सात्त्विकासी दुणें। वरीही लाभु॥ १२९॥

कां आघवियाचि इंद्रियवृत्ती। हृदयाचियां एकांती।
थापटूनि सुषुप्ती। आणी जें गा॥ १३०॥

किंबहुना सोये। जीव आत्मयाची लाहे।
तेथ जे होये। तया नाम सुख॥ १३१॥

आणि ऐसी हे अवस्था। न जोडतां पार्था।
जे जीजे तेंचि सर्वथा। दुःख जाणें॥ १३२॥

तें मनोरथ संगें नव्हे। एऱ्हवीं सिद्धी गेलेंचि आहे।
हे दोनीचि उपाये। सुखदुःखासी॥ १३३॥

आतां असंगा साक्षिभूता। देहीं चैतन्याची जे सत्ता।
तिये नांव पांडुसुता। चेतना येथे ॥ १३४॥

जे नखौनि केशवरी। उभी जागे शरीरीं।
जे तिहीं अवस्थांतरी। पालटेना॥ १३५॥

मनबुद्ध्यादि आघवीं। जियेचेनि टवटवी।
प्रकृतिवनमाधवी। सदांचि जे॥ १३६॥

जडाजडीं अंशीं। राहाटे जे सरिसी।
ते चेतना गा तुजसीं। लटिकें नाहीं ॥ १३७॥

पैं रावो परिवारु नेणे। आज्ञाचि परचक्र जिणें।
कां चंद्राचेनि पूर्णपणें। सिंधु भरती॥ १३८॥

ना ना भ्रामकाचें सन्निधान। लोहो करी सचेतन।
कां सूर्यसंगु जन। चेष्टवी गा॥ १३९॥

अगा मुखमेळेंविण। पिलियाचें पोषण।
करी निरीक्षण। कूर्मी जेवीं॥ १४०॥

पार्था तियापरी। आत्मसंगती इये शरीरीं।
सजीवत्वाचा करी। उपेगु जडा॥ १४१॥

मग तियेतें चेतना। म्हणिपे पैं अर्जुना।
आतां धृतिविवंचना। भेदु आइक॥ १४२॥

तरी तत्त्वां परस्परें। उघड जातिस्वभाववैरें।
नव्हे पृथ्वीतें नीरें। न नाशिजे॥ १४३॥

नीरातें आटी तेज। तेजा वायूंसि जुंझ।
आणि गगन तंव सहज। वायूसि भक्षी॥ १४४॥

तेवींचि कोणेही वेळे। आपण कायिसयाही न मिळे।
आंत रिगोनि वेगळें। आकाश हें॥ १४५॥

ऐसीं हीं पांचही भूतें। न साहती एकमेकांतें।
कीं तियेंही ऐक्यातें। देहासी येती॥ १४६॥

द्वंद्वाची उखिविखी। सोडूनि वसती एकीं।
एकेकातें पोखी। निजगुणें गा॥ १४७॥

ऐसें न मिळे तयां साजणें। चळे धैर्यें जेणें।
तयां नांव म्हणें। धृती गा॥ १४८॥

आणि जीवेंसीं पांडवा। या छत्तिसांचा मेळावा।
तो हा एथ जाणावा। संघातु पैं गा॥ १४९॥

एवं छत्तीसही भेद। सांगितले तुज विशद।
यया येतुलियातें प्रसिद्ध। क्षेत्र म्हणिजे॥ १५०॥

रथांगांचा मेळावा। जेवीं रथु म्हणिजे पांडवा।
कां अधोर्ध्व अवेवां। नांव देहो॥ १५१॥

कां चातुरंग समाजें। सेना नाम निफजे।
कां वाक्यें म्हणिजती पुंजे। अक्षरांचे॥ १५२॥

कां जळधरांचा मेळा। वाच्य होय आभाळा।
ना ना लोकां सकळां। नाम जग॥ १५३॥

कां स्नेह सूत्र वन्ही। मेळु एके स्थानीं।
धरिजे तो जनीं। दीपु होय॥ १५४॥

तैसीं छत्तीसही इयें तत्त्वें। मिळती जेणें एकत्वें।
तेणें समूहपरत्वें। क्षेत्र म्हणिपे॥ १५५॥

आणि वाहतेनि भौतिकें। पाप पुण्य येथें पिके।
म्हणोनि आम्ही कौतुकें। क्षेत्र म्हणों॥ १५६॥

आणि एकाचेनि मतें। देह म्हणती ययातें।
परि असो हें अनंतें। नामें यया॥ १५७॥

पैं परतत्त्वा आरौतें। आणि स्थावरां आंतौतें।
जें कांहीं होतें जातें। तें क्षेत्रचि हें॥ १५८॥

परि सुरनर उरगीं। घडत आहे योनिविभागीं।
तें गुणकर्मसंगीं। पडिलें सातें॥ १५९॥

हेचि गुणविवंचना। पुढां म्हणिपैल अर्जुना।
प्रस्तुत आतां ज्ञाना। रूप दावूं॥ १६०॥

क्षेत्र तंव सविस्तर। सांगितलें सविकार।
म्हणोनि आतां उदार। ज्ञान आइकें॥ १६१॥

जया ज्ञानालागीं। गगन गिळिताती योगी।
स्वर्गाची आडवंगी। उमरडोनि॥ १६२॥

न करिती सिद्धीची चाड। न धरिती ऋद्धीची भीड।
योगा ऐसें दुवाड। हेळसिती॥ १६३॥

तपोदुर्गें वोलांडित। क्रतुकोटि वोवांडित।
उलथूनि सांडित। कर्मवल्ली॥ १६४॥

ना ना भजनमार्गी। धांवत उघडियां आंगीं।
एक रिगताति सुरंगीं। सुषुम्नेचिये॥ १६५॥

ऐसी जिये ज्ञानीं। मुनीश्वरांसी उतान्ही।
वेदतरूचियां पानोवानीं। हिंडताती॥ १६६॥

देईल गुरुसेवा। इया बुद्धी पांडवा।
जन्माचा सांडोवा। टाकित जे॥ १६७॥

जया ज्ञानाची रिगवणी। अविद्ये उणें आणी।
जीवा आत्मया बुझावणी। मांडूनि दे॥ १६८॥

जें इंद्रियांचीं द्वारें आडी। प्रवृत्तीचे पाय मोडी।
जें दैन्यचि फेडी। मानसाचें॥ १६९॥

द्वैताचा दुकाळु पाहे। साम्याचें सुयाणें होये।
जया ज्ञानाची सोये। ऐसें करी॥ १७०॥

मदाचा ठावोचि पुसी। जें महामोहातें ग्रासी।
नेदी आपपरु ऐसी। भाष उरों॥ १७१॥

जें संसारातें उन्मूळी। संकल्पपंकु पाखाळी।
अनावरा वेंटाळी। ज्ञेयातें जें॥ १७२॥

जयाचेनि जालेपणें। पांगुळ होइजे प्राणी।
जयाचेनि विंदाणे। जग हें चेष्टे॥ १७३॥

जयाचेनि उजाळें। उघडती बुद्धीचे डोळे।
जीवु दोंदावरी लोळे। आनंदाचिया॥ १७४॥

ऐसें जें ज्ञान। पवित्रैकनिधान।
जेथ विटाळलें मन। चोख कीजे॥ १७५॥

आत्मया जीवबुद्धी। जे लागली होती क्षयव्याधी।
ते जयाचिया सन्निधी। निरुजा करी॥ १७६॥

तें अनिरूप कीं निरूपिजे। ऐकतां बुद्धी आणिजे।
वांचूनि डोळां देखिजे। ऐसें नाहीं॥ १७७॥

मग तेंच इये शरीरीं। जैं आपुला प्रभावो करी।
तैं इंद्रियांचियां व्यापारीं। डोळांहि दिसे॥ १७८॥

पैं वसंताचें रिगवणें। झाडांचेनि साजेपणें।
जाणिजे तेवीं करणें। सांगती ज्ञान॥ १७९॥

अगा वृक्षासि पाताळीं। जळ सांपडे मुळीं।
तें शाखांचिये बाहाळीं। बाहेर दिसे॥ १८०॥

कां भूमीचें मार्दव। सांगे कोंभाची लवलव।
ना ना आचारगौरव। सुकुलीनाचें॥ १८१॥

अथवा संभ्रमाचिया आयती। स्नेहो जैसा ये व्यक्ति।
कां दर्शनाचिये प्रशस्ती। पुण्यपुरुष॥ १८२॥

ना तरी केळीं कापूर जाहला। जेवीं परिमळें जाणों आला।
कां भिंगारीं दीपु ठेविला। बाहेरी फांके॥ १८३॥

तैसें हृदयींचेनि ज्ञानें। जियें देहीं उमटती चिन्हें।
तियें सांगों आतां अवधानें। चांगें आइक॥ १८४॥

अमानित्वमदम्भित्वमहिंसा क्षान्तिरार्जवम्॥
आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः॥ १३.७॥

तरी कवणेही विषयींचें। साम्य होणें न रुचे।
संभावितपणाचें। वोझें जया॥ १८५॥

आथिलेचि गुण वानितां। मान्यपणें मानितां।
योग्यतेचें येतां। रूप आंगा॥ १८६॥

तैं गजबजों लागे कैसा। व्याधें रुंधला मृगु जैसा।
कां बाहीं तरतां वळसां। दाटला जेवीं॥ १८७॥

पार्था तेणें पाडें। सन्मानें जो सांकडे।
गरिमेतें आंगाकडे। येवोंचि नेदी॥ १८८॥

पूज्यता डोळां न देखावी। स्वकीर्ती कानीं नायकावी।
हा अमुक ऐसी नोहावी। सेचि लोकां॥ १८९॥

तेथ सत्काराची गोठी। कें आदरा देईल भेटी।
मरणेंसीं साटी। नमस्कारिता॥ १९०॥

वाचस्पतीचेनि पाडें। सर्वज्ञता तरी जोडे।
परि वेडिवेमाजीं दडे। महमे भेणें॥ १९१॥

चातुर्य लपवी। महत्त्व हारवी।
पिसेपण मिरवी। आवडोनि॥ १९२॥

लौकिकाचा उद्वेगु। शास्त्रांवरी उबगु।
उगेपणीं चांगु। आथी भरु॥ १९३॥

जगें अवज्ञाचि करावी। संबंधीं सोयचि न धरावी।
ऐसी ऐसी जीवीं। चाड बहु॥ १९४॥

तळवटपण बाणे। आंगीं हिणावो खेवणें।
तें तेंचि करणें। बहुतकरुनी॥ १९५॥

हा जिवंतु ना नोहे। लोक कल्पी येणें भावें।
तैसें जिणें होआवें। ऐसी आशा॥ १९६॥

पैल चालतु कां नोहे। कीं वारेनि जातु आहे।
जना ऐसा भ्रमु जाये। तैसें होइजे॥ १९७॥

माझें असतेपण लोपो। नांवरूप हारपो।
मज झणें वासिपो। भूतजात॥ १९८॥

ऐसीं जयाचीं नवसियें। जो नित्य एकांता जातु जाये।
नांवेंचि जो जिये। विजनाचेनि॥ १९९॥

वायू आणि तया पडे। गगनेसीं बोलों आवडे।
जीवें प्राणें झाडें। पढियंतीं जया॥ २००॥

किंबहुना ऐसीं। चिन्हें जया देखसी।
जाण तया ज्ञानेंसीं। शेज जाहली॥ २०१॥

पैं अमानित्व पुरुषीं। तें जाणावें इहीं मिषीं।
आतां अदंभाचिया वोळखीसी। सौरसु देवों॥ २०२॥

तरि अदंभित्व ऐसें। लोभियाचें मन जैसें।
जीवु जावो परि नुमसे। ठेविला ठावो॥ २०३॥

तया परी किरीटी। पडिलाही प्राणसंकटीं।
परि सुकृत न प्रकटी। आंगें बोलें॥ २०४॥

खडाणे आला पान्हा। पळवी जेवीं अर्जुना।
कां राहे पण्यांगना। वडिलपणें॥ २०५॥

आढ्यु आतुडे आडवीं। मग आढ्यता जेवीं हारवी।
ना तरी कुळवधू लपवी। अवयवांतें॥ २०६॥

ना ना कृषीवळु आपुलें। पांघुरवी पेरिलें।
तैसें झांकी निपजलें। दानपुण्य॥ २०७॥

वरिवरी देह न पूजी। लोकांतें न रंजी।
स्वधर्मु वाग्ध्वजीं। बांधों नेणे॥ २०८॥

परोपकारु न बोले। न मिरवी अभ्यासिलें।
न शके विकूं जोडलें। स्फीतीसाठीं॥ २०९॥

अंगभोगांकडे। पाहतां कृपणु आवडे।
एऱ्हवीं धर्माविषयीं थोडें। बहु न म्हणे॥ २१०॥

घरीं दिसे सांकड। देहींची आयती रोड।
परी दानीं जया होड। सुरतरूसीं॥ २११॥

किंबहुना स्वधर्मी थोरु। अवसरीं उदारु।
आत्मचर्चे चतुरु। एऱ्हवी वेडा॥ २१२॥

केळीचें दळवाडें। हळू पोकळ आवडे।
परि फळोनिया गाढें। रसाळ जैसें॥ २१३॥

कां मेघाचें आंग झील। दिसे वारेनि जैसें जाईल।
परि वर्षती नवल। घनवट तें॥ २१४॥

तैसा जो पूर्णपणीं। पाहतां धाती आयणी।
एऱ्हवीं तरी वाणी। तोचि ठावो॥ २१५॥

हें असो या चिन्हांचा। नटनाचु ठायीं जयाचियां।
जाण ज्ञान तयाचिया। हाता चढलें ॥ २१६॥

पैं गा अदंभपण। म्हणितलें तें हें जाण।
आतां आईक खूण। अहिंसेची॥ २१७॥

तरी अहिंसा बहुतीं परीं। बोलिली असे अवधारीं।
आपुलालियां मनांतरीं। निरूपिली॥ २१८॥

परि ते ऐसी देखा। जैसा खांडूनियां शाखा।
मग तयांचिया बुडुखा। कुंप कीजे॥ २१९॥

कां बाहु तोडोनि विकिजे। मग भूकेची पीडा राखिजे।
ना ना देऊळ मोडूनि कीजे। पौळी देवा॥ २२०॥

तैसी हिंसाचि करूनि अहिंसा। निफजविजे हा ऐसा।
पैं पूर्वमीमांसा। निर्णयो केला॥ २२१॥

जे अवृष्टीचेनि उपद्रवे। गादलें विश्व आघवें।
म्हणोनि पर्जन्येष्टी करावे। ना ना याग॥ २२२॥

तंव तिये इष्टीचियां बुडीं। पशुहिंसा रोकडी।
मग अहिंसेची थडी। कैंची दिसे॥ २२३॥

पेरिजे नुसधी हिंसा। तेथ उगवैल काय अहिंसा।
परि नवल बापा धिंवसा। या याज्ञिकांचा॥ २२४॥

आणि आयुर्वेदुही आघवा। याचि मोहोरा पांडवा।
जे जीवाकारणें करावा। जीवघातु॥ २२५॥

ना ना रोगीं अहाळलीं। लोळतीं भूतें देखिलीं।
ते हिंसा निवारावया केली। चिकित्सा कां॥ २२६॥

तंव ते चिकित्से पहिलें। एकाचे कंद खणविले।
एका उपडविलें। समूळीं सपत्रीं॥ २२७॥

एकें आड मोडविली। अजंगमाची खाल काढविली।
एकें गर्भी उकडविली। पुटामाजीं॥ २२८॥

अजातशत्रु तरुवरां। सर्वांगीं देवविलिया शिरा।
ऐसे जीव घेऊनि धनुर्धरा। कोरडे केले॥ २२९॥

आणि जंगमाही हात। लाऊनि काढिलें पित्त।
मग राखिले शिणत। आणिक जीव॥ २३०॥

अहो वसतीं धवळारें। मोडूनि केले देऊळ देव्हारे।
नागौनि वेव्हारें। गवादी घातली॥ २३१॥

मस्तक पांघुरविलें। तंव तळवटीं उघडें पडलें।
घर मोडोनि केले। मांडव पुढें॥ २३२॥

ना ना पांघुरणें। जाळूनि जैसें तापणें।
जालें आंगधुणें। कुंजराचें॥ २३३॥

बैल विकूनि गोठा। पुंसा लावोनि बांधिजे गांठा।
इया करणी कीं चेष्टा। काइ हंसों॥ २३४॥

एकीं धर्माचिया वाहणी। गाळूं आदरिलें पाणी।
तंव गाळितया आहाळणीं। जीव मेले॥ २३५॥

एक न पचितीचि कण। इये हिंसेचे भेण।
तेथ कदर्थले प्राण। हेचि हिंसा॥ २३६॥

एवं हिंसाचि अहिंसा। कर्मकांडीं हा ऐसा।
सिद्धांतु सुमनसा। वोळखें तूं॥ २३७॥

पहिलें अहिंसेचें नांव। आम्हीं केलें जंव।
तंव स्फूर्ति बांधली हांव। इये मती॥ २३८॥

तरि कैसेनि ययातें गाळावें। म्हणोनि पडिलें बोलावें।
तेवींचि तुवांही जाणावें। ऐसा भावो॥ २३९॥

बहुतकरूनि किरीटी। हाचि विषयो इये गोष्टी।
एऱ्हवी कां आडवाटीं। धाविजैल॥ २४०॥

आणि स्वमताचिया निर्धारा। लागोनियां धनुर्धरा।
प्राप्तां मतांतरां। निर्वेचु कीजे॥ २४१॥

ऐसी हे अवधारीं। निरूपिती परी।
आतां ययावरी। मुख्य जें गा॥ २४२॥

तें स्वमत बोलिजेल। अहिंसे रूप किजैल।
जेणें उठलिया आंतुल। ज्ञान दिसे॥ २४३॥

परि अधिष्ठिलेनि आंगें। जाणिजे आचरतेनि बागें।
जैसी कसवटी सांगे। वानियातें॥ २४४॥

तैसें ज्ञानामनाचिये भेटी। सरिसेंचि अहिंसेचें बिंब उठी।
तेंचि ऐसें किरीटी। परिस आतां॥ २४५॥

तरि तरंगु नोलांडितु। लहरी पायें न फोडितु।
सांचलु न मोडितु। पाणियाचा॥ २४६॥

वेगें आणि लेसा। दिठी घालूनि आंविसा।
जळीं बकु जैसा। पाऊल सुये॥ २४७॥

कां कमळावरी भ्रमर। पाय ठेविती हळुवार।
कुचुंबैल केसर। इया शंका॥ २४८॥

तैसे परमाणु पां गुंतले। जाणूनि जीव सानुले।
कारुण्यामाजीं पाउलें। लपवूनि चाले॥ २४९॥

ते वाट कृपेची करितु। ते दिशाचि स्नेहा भरितु।
जीवातळीं आंथरितु। आपुला जीवु॥ २५०॥

ऐसिया जतना। चालणें जया अर्जुना।
हें अनिर्वाच्य परिमाणा। पुरिजेना॥ २५१॥

पैं मोहाचेनि सांगडें। लासी पिलें धरी तोंडें।
तेथ दांतांचे आरगडे। लागती जैसे॥ २५२॥

कां स्नेहाळु माये। तान्हयाची वास पाहे।
तिये दिठी आहे। हळुवार जें॥ २५३॥

ना ना कमळदळें। डोलविजती ढाळ ढाळें।
तो जेणें पाडें बुबुळें। वारा घेपे॥ २५४॥

तैसेनि मार्दवें पाय। भूमीवरी न्यसीतु जाय।
लागती तेथ होय। जीवां सुख॥ २५५॥

ऐसिया लघिमा चालतां। कृमि कीटक पांडुसुता।
देखे तरि माघौता। हळूचि निघे॥ २५६॥

म्हणे पावो धडफडील। तरि स्वामीची निद्रा मोडैल।
रचलेपणा पडैल। झोती हन॥ २५७॥

इया काकुळती। वाहणी घे माघौती।
कोणेही व्यक्ती। न वचे वरी॥ २५८॥

जीवाचेनि नावें। तृणातेंही नोलांडवे।
मग न लेखितां जावें। हे कें गोठी॥ २५९॥

मुंगिये मेरु नोलांडवे। मशका सिंधु न तरवे।
तैसा भेटलियां न करवे। अतिक्रमु॥ २६०॥

ऐसी जयाची चाली। कृपा फळीं फळा आली।
देखसी जियाली। दया वाचे॥ २६१॥

स्वयें श्वसणेंचि तें सुकुमार। मुख मोहाचें माहेर।
माधुर्या जाहले अंकुर। दशन तैसे॥ २६२॥

पुढां स्नेह पाझरे। मागां चालती अक्षरें।
शब्द पाठीं अवतरे। कृपा आधीं॥ २६३॥

तंव बोलणेंचि नाहीं। बोलों म्हणे जरी कांहीं।
तरि बोल कोणाही। खुपेल कां॥ २६४॥

बोलतां अधिकुही निघे। तरि कोणाचिया वर्मी न लगे।
आणि कोणासि न रिघे। शंका मनीं॥ २६५॥

मांडिली गोठी हन मोडैल। वासिपैल कोणी उडैल।
आइकोनिचि वोवांडिल। कोण्ही जरी॥ २६६॥

तरि दुवाळी कोणा न व्हावी। कवणाची भंवई नुचलावी।
ऐसा भावो जीवीं। म्हणोनि उगा॥ २६७॥

मग प्रार्थिला विपायें। जरि लोभें बोलों जाये।
तरि परिसे तया होये। मायबापु॥ २६८॥

कां नादब्रह्मचि मुसे आलें। कीं गंगापय असळलें।
पतिव्रते आलें। वार्धक्य जैसें॥ २६९॥

तैसे साच आणि मवाळ। मितले परि सरळ।
बोले जैसे कल्लोळ। अमृताचे॥ २७०॥

विरोधु वादुबळु। प्राणितापढाळु।
उपहासु छळु। वर्मस्पर्शु॥ २७१॥

आट्टु वेगु विंदाणु। आशा शंका प्रतारणु।
हे संन्यासिले अवगुणु। जिया वाचा॥ २७२॥

आणि तयाचि परी किरीटी। थाउ जयाचिये दिठी।
सांडिलिया भृकुटी। मोकळिया॥ २७३॥

कां जे भूतीं वस्तु आहे। तियें रुपों शके विपायें।
म्हणोनि वास न पाहे। बहुतकरूनि॥ २७४॥

ऐसाही कोणे एके वेळे। आंतुली कृपेचेनि बळें।
उघडोनियां डोळे। दिठी घाली॥ २७५॥

तरि चंद्रबिंबौनि धारा। निघतां नव्हती गोचरा।
परि एकसरें चकोरां। निघती दोंदें॥ २७६॥

तैसें प्राणियांसि होये। जरी तो वास पाहे।
तया अवलोकनाची सोये। कूर्मींही नेणे॥ २७७॥

किंबहुना ऐसी। दिठी जयाची भूतांसी।
करही देखसी। तैसेचि ते॥ २७८॥

होऊनियां कृतार्थ। राहिले सिद्धाचे मनोरथ।
तैसे जयाचे हात। निर्व्यापार॥ २७९॥

अक्षमें आणि संन्यासिलें। कीं निरिंधन आणि विझालें।
मुकेनि घेतलें। मौन जैसें॥ २८०॥

तयापरी कांहीं। जयां करां करणें नाहीं।
जे अकर्तयाचियां ठायीं। बैसों येती॥ २८१॥

आसुडैल वारा। नख लागेल अंबरा।
इया बुद्धी करा। चळों नेदी॥ २८२॥

तेथ आंगावरिली उडवावीं। कां डोळां रिगतें झाडावीं।
पशुपक्ष्यां दावावी। त्रासमुद्रा॥ २८३॥

इया केउतिया गोठी। नावडे दंडु काठी।
मग शस्त्राचें किरीटी। बोलणें कें॥ २८४॥

लीलाकमळें खेळणें। कां पुष्पमाळा झेलणें।
न करी म्हणे गोफणें। ऐसें होईल॥ २८५॥

हालवतीला रोमावळी। यालागीं आंग न कुरवाळी।
नखांची गुंडाळी। बोटांवरी॥ २८६॥

तंव करणेयाचाचि अभावो। परि ऐसाही पडे ठावो।
तरि हातां हाचि सरावो। जे जोडिजती॥ २८७॥

कां नाभिकारा उचलिजे। हातु पडिलिया देइजे।
ना तरि आर्तातें स्पर्शिजे। अळुमाळु॥ २८८॥

हेंही उपरोधें करणें। तरी आर्तभय हरणें।
नेणती चंद्रकिरणें। जिव्हाळा तो॥ २८९॥

पावोनि तो स्पर्शु। मलयानिळु खरपुसु।
तेणें मानें पशु। कुरवाळणें॥ २९०॥

जे सदा रिते मोकळे। जैशी चंदनांगें निसळें।
न फळतांही निष्फळें। होतीचि ना॥ २९१॥

आतां असो हें वाग्जाळ। जाणें तें करतळ।
सज्जनाचे शीळ। स्वभाव जैसे॥ २९२॥

आतां मन तयाचें। सांगों म्हणों जरी साचें।
तरी सांगितले कोणाचे। विलास हे॥ २९३॥

काइ शाखा नव्हे तरु। जळेंवीण असे सागरु।
तेज आणि तेजाकारु। आन काई॥ २९४॥

अवयव आणि शरीर। हे वेगळाले काइ कीर।
कीं रसु आणि नीर। सिनानीं आथी॥ २९५॥

म्हणोनि हे जे सर्व। सांगितले बाह्य भाव।
ते मनचि सावयव। ऐसें जाणें॥ २९६॥

जें बीज भुई खोंविलें। तेंचि वरी रुख जाहलें।
तैसें इंद्रियाद्वारीं फांकलें। अंतरचि॥ २९७॥

पैं मानसींचि जरी। अहिंसेची अवसरी।
तरी कैंची बाहेरी। वोसंडेल॥ २९८॥

आवडे ते वृत्ती किरीटी। आधीं मनौनीचि उठी।
मग ते वाचे दिठी। करांसि ये॥ २९९॥

वांचूनि मनींचि नाहीं। तें वाचेसि उमटेल काई।
बीजेंवीण भुई। अंकुर असे॥ ३००॥

उगमींचि वाळुइ जाये। तें वोघीं कैचें वाहे।
जीवु गेलिया आहे। चेष्टा देहीं॥ ३०१॥

म्हणोनि मनपण मोडे। तैं इंद्रिया आधींच उंबडें।
सूत्रधारेंवीण साइखडें। वावो जैसें॥ ३०२॥

तैसें मन हें पांडवा। मूळ यया इंद्रियभावा।
हेंचि राहटे आघवां। द्वारीं इहीं॥ ३०३॥

परि जिये वेळीं जैसें। जें होऊनि आंतु असे।
बाहेरि ये तैसें। व्यापाररूपें॥ ३०४॥

यालागी साचोकारें। मनीं अहिंसा थांवे थोरें।
पिकली द्रुती आदरें। बोभात निघे॥ ३०५॥

म्हणोनि इंद्रियें तेचि संपदा। वेचितांही उदावादा।
अहिंसेचा धंदा। करितें आहाती॥ ३०६॥

समुद्रीं दाटे भरितें। तैं समुद्रचि भरी तरियांते।
तैसें स्वसंपत्ती चित्तें। इंद्रियां केलें॥ ३०७॥

हें बहु असो पंडितु। धरुनि बाळकाचा हातु।
वोळी लिही सुव्यक्तु। आपणचि॥ ३०८॥

तैसें दयाळुत्व आपुलें। मनें हातापायां आणिलें।
मग तेथ उपजविलें। अहिंसेतें॥ ३०९॥

याकारणें किरीटी। इंद्रियांचिया गोठी।
मनाचियेचि राहाटी। रूप केलें॥ ३१०॥

ऐसा मनें देहें वाचा। सर्व संन्यासु दंडाचा।
जाहला ठायीं जयाचियां। देखशील॥ ३११॥

तो जाण वेल्हाळ। ज्ञानाचें वेळाउळ।
हें असो निखळ। ज्ञानचि तो॥ ३१२॥

जे अहिंसा कानें ऐकिजे। ग्रंथाधारें निरूपिजे।
ते पाहावी हें उपजे। तैं तोचि पाहावा॥ ३१३॥

ऐसें म्हणितलें देवें। तें बोलें एकें सांगावें।
परि फांकला हें उपसाहावें। तुम्हीं मज॥ ३१४॥

म्हणाल हिरवें चारीं गुरूं। विसरे मागील मोहर धरूं।
कां वारेलगें पांखिरूं। गगनीं भरे॥ ३१५॥

तैसिया प्रेमाचिया स्फूर्ती। फावलिया रसवृत्ती।
वाहविला मती। आकळेना॥ ३१६॥

तरि तैसें नोहे अवधारा। कारण आहे विस्तारा।
एऱ्हवीं पद तरी अक्षरां। तिहींचेंचि॥ ३१७॥

अहिंसा म्हणतां थोडी। परि तेचि होय जी उघडी।
जैं लोटिजती कोडी। मतांचिया॥ ३१८॥

एऱ्हवीं प्राप्तें मतांतरें। थातंबूनि आंगभरें।
बोलिजैल तें न सरे। तुम्हांपाशीं॥ ३१९॥

रत्नपारखियांचियां गांवीं। जाईल गंडकी तरि सोडावी।
काश्मीरीं न करावी। मिडगणे जे॥ ३२०॥

काइसा वासु कापुरा। मंद जेथ अवधारा।
पिठाचा विकरा। तिये सातें॥ ३२१॥

म्हणोनि इये सभे। बोलकेपणाचेनि क्षोभें।
लागसर न लभे। बोला प्रभु॥ ३२२॥

सामान्या आणि विशेषा। सकळे कींजेल देखा।
तरी कानाचेया मुखा। कडे नेयाल ना तुम्ही॥ ३२३॥

शंकेचेनि गदळें। जैं शुद्ध प्रमेय मेळे।
तैं मागुतियां पाउलीं पळे। अवधान येतें॥ ३२४॥

कां करूनि बाबुळियेची बुंथी। जळें जियें ठाती।
तयांचा वास पाहाती। हंस काई॥ ३२५॥

कां अभ्रापैलीकडे। येत चियांदिणें कोडें।
तैं चकोरें चांचुवडें। उचलिती ना॥ ३२६॥

तैसे तुम्ही वास न पाहाल। ग्रंथु नेघा वरि कोपाल।
जरी निर्विवाद नव्हैल। निरूपण॥ ३२७॥

न बुझावितां मतें। न फिटे आक्षेपाचें लागतें।
तें व्याख्यान जी तुमतें। जोडूनि नेदी॥ ३२८॥

आणि माझें तंव आघवें। ग्रथन येणेंचि भावें।
जे तुम्हीं संतीं होआवें। सन्मुख सदा॥ ३२९॥

एऱ्हवीं तरी साचोकारें। तुम्ही गीतार्थाचे सोइरे।
जाणोनि गीता जीवसरें। धरिसी मियां॥ ३३०॥

जें आपुलें सर्वस्व द्याल। मग इयेतें सोडवुनि न्याल।
म्हणोनि ग्रंथु नव्हे बोल। साचचि हे॥ ३३१॥

कां सर्वस्वाचा लोभु धरा। वोलीचा अव्हेरु करा।
तरि गीते मज अवधारा। एकचि गती॥ ३३२॥

किंबहुना मज। तुमचिया कृपा काज।
तियेलागीं व्याज। ग्रंथाचें केलें॥ ३३३॥

तरि तुम्हां रसिकांजोगें। व्याख्यान शोधावें लागे।
म्हणूनि जी मतांगें। बोलों ठेलां॥ ३३४॥

तंव कथेसि पसरु जाहला। श्लोकार्थु दूरी गेला।
कीजो क्षमा यया बोला। अपत्या मज॥ ३३५॥

आणि घांसाआंतिल हरळु। फेडितां लागे वेळु।
ते दूषण नव्हे खडळु। सांडवा कीं॥ ३३६॥

कां संवचोरां चुकवितां। दिवस लागलिया माता।
कोपावें कीं जीविता। जिताणें कीजे॥ ३३७॥

परि यावरील हें नव्हे। तुम्हीं साहिलें तेंचि बरवें।
आतां अवधारिजो देवें। बोलिलें ऐसें॥ ३३८॥

म्हणे उन्मेखसुलोचना। सावध होई अर्जुना।
करूं तुज ज्ञाना। वोळखी आतां॥ ३३९॥

तरि ज्ञान गा तें एथें। वोळख तूं निरुतें।
आक्रोशेंवीण जेथें। क्षमा असे॥ ३४०॥

अगाध सरोवरीं। कमळिणी जियापरी।
कां सदैवाचियां घरीं। संपत्ति जैसी॥ ३४१॥

पार्था तेणें पाडें। क्षमा जयातें वाढे।
तेही लक्षे तें फुडें। लक्षण सांगों॥ ३४२॥

तरि पढियंते तें लेणें। आंगीं भावें जेणें।
धरिजे तेवीं साहणें। सर्वचि जया॥ ३४३॥

त्रिविध मुख्य आघवे। उपद्रवांचे मेळावे।
वरि पडिलिया नव्हे। बांकुडा जो॥ ३४४॥

अपेक्षित पावे। तें जेणें तोषें मानावे।
अनपेक्षिताही करवे। तोचि मानु॥ ३४५॥

जो मानापमानातें साहे। सुखदुःख जेथ सामाये।
निंदास्तुती नोहे। दुखंडु जो॥ ३४६॥

उन्हाळेनि जो न तापे। हिमवंती न कांपे।
कायसेनिही न वासिपे। पातलेया॥ ३४७॥

स्वशिखरांचा भारु। नेणे जैसा मेरु।
कीं धरा यज्ञसुकरु। वोझें न म्हणे॥ ३४८॥

ना ना चराचरीं भूतीं। दाटणी नव्हे क्षिती।
तैसा ना ना द्वंद्वीं प्राप्तीं। घामेजेना॥ ३४९॥

घेउनी जळाचे लोट। आलिया नदीनदांचे संघाट।
करी वाड पोट। समुद्र जेवीं॥ ३५०॥

तैसें जयाचियां ठायीं। न साहणें कांहींचि नाहीं।
आणि साहतु असे ऐसेंही। स्मरण नुरे॥ ३५१॥

आंगा जें पतालें। तें करूनि घाली आपुलें।
येथ साहतेनि नवलें। घेपिजेना॥ ३५२॥

हे अनाक्रोश क्षमा। जयापाशीं प्रियोत्तमा।
जाण तेण महमा। ज्ञानासि गा॥ ३५३॥

तो पुरुषु पांडवा। ज्ञानाचा वोलावा।
आतां परिस आर्जवा। रूप करूं॥ ३५४॥

तरि आर्जव तें ऐसें। प्राणाचें सोजन्य जैसें।
आवडे तयाही दोषें। एकचि पैं गा॥ ३५५॥

कां तोंड पाहूनि प्रकाशु। न करी जेवा चंडांशु।
जगा एकचि अवकाशु। आकाश जैसें॥ ३५६॥

तैसें जयाचें मन। माणुसाप्रति आन आन।
नव्हे आणि वर्तन। ऐसें पैं तें॥ ३५७॥

जे जगचि सनोळख। जगेंसीं जुनाट सोयरिक।
आपपर हें भाख। जाणणें नाहीं॥ ३५८॥

भलतेणेंसींहि मेळु। पाणिया ऐसा ढाळु।
कवणेविखीं आडळु। नेघे चित्त॥ ३५९॥

वारियाची धांव। तैसे सरळ भाव।
शंका आणि हांव। नाहीं जया॥ ३६०॥

मायेपुढें बाळका। रिगतां नाहीं शंका।
तैसें मन देतां लोकां। नालोची जो॥ ३६१॥

फांकलिया इंदीवरा। परिवारु नाहीं धनुर्धरा।
तैसा कोनकोंपरा। नेणे जीव॥ ३६२॥

चोखाळपण रत्नाचें। रत्नावरी किरणाचें।
तैसें पुढां मन जयाचें। करणें पाठीं॥ ३६३॥

आलोचूं जो नेणे। अनुभवचि जोगावणें।
धरी मोकळी अंतःकरणें। नव्हेचि जया॥ ३६४॥

दिठी नोहे मिणधी। बोलणें नाहीं संदिग्धी।
कवणेसीं हीनबुद्धी। राहाटिजे ना॥ ३६५॥

दाहाही इंद्रियें प्रांजळें। निष्प्रपंचें निर्मळें।
पांचही पालव मोकळे। आठही पाहर॥ ३६६॥

अमृताची धार। तैसें उजू अंतर।
किंबहुना जो माहेर। या चिन्हांचें॥ ३६७॥

तो पुरुष सुभटा। आर्जवाचा आंगवठा।
जाण तेथेंचि घरटा। ज्ञानें केला॥ ३६८॥

आतां ययावरी। गुरुभक्तीची परी।
सांगों गा अवधारीं। चतुरनाथा॥ ३६९॥

आघवियांचि दैवा। जन्मभूमि हे सेवा।
जे ब्रह्म करी जीवां। शोच्यातेहीं॥ ३७०॥

ते आचार्योपास्ती। प्रकटिजैल तुजप्रती।
बैसों दे एकपांती। अवधानाची॥ ३७१॥

तरि सकळ जळसमृद्धी। घेऊनि गंगा रिगाली उदधी।
कीं श्रुति हे महापदीं। पैठी जाहाली॥ ३७२॥
ना ना वेंटाळूनि जीवितें। गुणागुण उखितें।
प्राणनाथा उचितें। दिधलें प्रिया॥ ३७३॥

तैसें सबाह्य आपुलें। जेणें गुरुकुळीं वोपिलें।
आपणपें केलें। भक्तीचें घर॥ ३७४॥

गुरुगृह जिये देशीं। तो देशुचि वसे मानसीं।
विरहिणी कां जैसी। वल्लभातें॥ ३७५॥

तियेकडोनि येतसे वारा। देखोनि धांवे सामोरा।
आड पडे म्हणे घरा। बीजें कीजो॥ ३७६॥

साचा प्रेमाचिया भुली। तया दिशेसीचि आवडे बोली।
जीवु थानापती करूनि घाली। गुरुगृहीं जो॥ ३७७॥

परि गुरुआज्ञा धरिलें। देह गांवीं असे एकलें।
वांसरुवा लाविलें। दावें जैसें॥ ३७८॥

म्हणे कैं हें बिरडें फिटेल। कैं तो स्वामी भेटेल।
युगाहिहूनि वडिल। निमिष मानी॥ ३७९॥

ऐसेया गुरुग्रामींचें आलें। कां स्वयें गुरूंनींच धाडिलें।
तरी गतायुष्या जोडलें। आयुष्य जैसें॥ ३८०॥

कां सुकतया अंकुरा। वरि पडिलिया पीयूषधारा।
ना ना अल्पोदकींचा सागरा। आला मासा॥ ३८१॥

ना तरी रंकें निधान देखिलें। कां आंधळिया डोळे उघडले।
भणंगाचिया आंगा आलें। इंद्रपद॥ ३८२॥

तैसें गुरुकुळींचेनि नांवें। महासुखें अति थोरावे।
जे कोडें ही पोटाळावें। आकाश कां॥ ३८३॥

पैं गुरुकुळीं ऐसी। आवडी जया देखसी।
जाण ज्ञान तयापासीं। पाइकी करी॥ ३८४॥

आणि अभ्यंतरिलियेकडे। प्रेमाचेनि पवाडें।
श्रीगुरूंचें रूपडें। उपासी ध्यानीं॥ ३८५॥

हृदयशुद्धीचियां आवारीं। आराध्यु तो निश्चळ धुरु करी।
मग सर्व भावेंसी परिवारीं। आपण होय॥ ३८६॥

कां चैतन्याचिये पोवळी। माजीं आनंदाचियां राउळीं।
गुरुलिंगा ढाळी। ध्यानामृत॥ ३८७॥

उदयिजतां बोधार्का। बुद्धीची डाल सात्त्विका।
भरोनि त्र्यंबका। लाखोली वाहे॥ ३८८॥

काळशुद्धी त्रिकाळीं। जीवदशा धूप जाळीं।
ज्ञानदीप वोंवाळी। निरंतर॥ ३८९॥

सामरस्याची रससोय। अखंड अर्पितु जाय।
आपण भराडा होय। गुरु तो लिंग॥ ३९०॥

ना तरी जीवाचिये सेजे। गुरु कांतु करूनि भुंजे।
ऐसीं प्रेमाचीं भोजें। बुद्धी वाहे॥ ३९१॥

कोणे एके अवसरीं। अनुरागु भरे अंतरीं।
कीं तया नांव करी। क्षीराब्धी॥ ३९२॥

तेथ ध्येय ध्यान बहु सुख। तेचि शेषतुळिका निर्दोख।
वरि जलशयनु देख। भावी गुरु॥ ३९३॥

मग वोगळती पाय। ते लक्ष्मी आपण होय।
गरुड होऊनि उभा राहे। आपणचि॥ ३९४॥

नाभीं आपणचि जन्मे। ऐसें गुरुमूर्तिप्रेमें।
अनुभवी मनोधर्मे। ध्यानसुख॥ ३९५॥

एकाधेनि वेळें। गुरु माय करी भावबळें।
मग स्तन्यसुखे लोळे। अंकावरी॥ ३९६॥

ना तरी गा किरीटी। चैतन्यतरुतळवटीं।
गुरु धेनु आपण पाठीं। वत्स होय॥ ३९७॥

गुरुकृपास्नेहसलिलीं। आपण होय मासोळी।
कोणे एके वेळीं। हेंचि भावी॥ ३९८॥

गुरुकृपामृताचें वडप। आपण सेवावृत्तीचें होय रोप।
ऐसेसे संकल्प। विये मन॥ ३९९॥

चक्षुपक्षेंवीण। पिलूं होय आपण।
कैसें पैं अपारपण। आवडीचें॥ ४००॥

गुरूतें पक्षिणी करी। चारा घे चांचूवरी।
गुरु तारु धरी। आपण कास॥ ४०१॥

ऐसें प्रेमाचेनि थावें। ध्यानचि ध्यानातें प्रसवे।
पूर्णसिंधु हेलावे। फुटती जैसे॥ ४०२॥

किंबहुना यपरी। श्रीगुरुमूर्ती अंतरीं।
भोगी आतां अवधारीं। बाह्यसेवा॥ ४०३॥

तरि जिवों ऐसे आवांके। म्हणे दास्य करीन निकें।
जैसें गुरु कौतुकें। माग म्हणती॥ ४०४॥

तैसिया साचा उपास्ती। गोसावी सुप्रसन्न होती।
तेथ मी विनंती। ऐसी करीन॥ ४०५॥

म्हणेन तुमचा देवा। परिवारु जो आघवा।
तेतुलें रूप होआवा। मीचि एकु॥ ४०६॥

आणि उपकरतीं आपुलीं। उपकरणें आथि जेतुलीं।
माझीं रूपें तेतुलीं। होआवीं जी॥ ४०७॥

ऐसा मागेन वरु। तेथ हो म्हणती श्रिगुरु।
मग तो परिवारु। मीचि होईन॥ ४०८॥

उपकरणजात सकळिक। तेंहि मीचि होईन एकैक।
तेव्हां उपास्तीचें कवतिक। देखिजेल॥ ४०९॥

गुरु बहुतांची माये। परि एकलौती होऊनि ठाये।
तैसें करूनि आण वाये। कृपे तिये॥ ४१०॥

तया अनुरागा वेधु लावीं। एकपत्नीव्रतचि घेववीं।
क्षेत्रसंन्यासु करवीं। लोभाकरवीं॥ ४११॥

चतुर्दिक्षु वारा। न लाहे निघों बाहिरा।
तैसा गुरुकृपे पांजिरा। मीचि होईन॥ ४१२॥

आपुलिया गुणांचीं लेणीं। करीन गुरुसेवे स्वामिणी।
हें असो होईन गंवसणी। मीचि भक्ती॥ ४१३॥

गुरुस्नेहाचिये वृष्टी। मी पृथ्वी होईन तळवटीं।
ऐसिया मनोरथांचिया सृष्टी। अनंता रची॥ ४१४॥

म्हणे श्रीगुरूचें भुवन। आपण मी होईन।
आणि दास होऊनि करीन। दास्य तेथिंचें॥ ४१५॥

निर्गमागमीं दातारें। जे वोलांडिजती उंबरे।
ते मी होईन आणि द्वारें। द्वारपाल॥ ४१६॥

पाउवा मी होईन। तियां मीचि लेववीन।
छत्र मी आणि करीन। वारीपण॥ ४१७॥

मी तळ उपरु जाणविता। चंवर धरु हातु देता।
स्वामीपुढां खोलता। होईन मी॥ ४१८॥

मीचि होईन सागळा। करूं सुईन गुळळां।
सांडिती तो नेपाळा। पडिघा मीचि॥ ४१९॥

हडप मी वोगळेन। मीचि उगाळु घेईन।
उळिग मी करीन। आंघोळीचें॥ ४२०॥

होईन गुरूचें आसन। अलंकार परिधान।
चंदनादि होईन। उपचार ते॥ ४२१॥

मीचि होईन सुआरु। वोगरीन उपहारु।
आपणपेनि श्रीगुरु। वोंवाळीन॥ ४२२॥

जे वेळीं देवो आरोगिती। तेव्हां पांतीकरु मीचि पांती।
मीचि होईन पुढती। देईन विडा॥ ४२३॥

ताट मी काढीन। सेज मी झाडीन।
चरणसंवाहन। करीन मीचि॥ ४२४॥

सिंहासन होईन आपण। वरि श्रीगुरु करिती आरोहण।
होईन पुरेपण। वोळगेचें॥ ४२५॥

श्रीगुरुचें मन। जया देईन अवधान।
तें मी पुढा होईन। चमत्कारु॥ ४२६॥

तया श्रवणाचियां अंगणीं। होईन शब्दाचिया आक्षोणी।
परिसु होईन घसणी। आंगाचिया॥ ४२७॥

श्रीगुरूचे डोळे। अवलोकनें स्नेहाळें।
पाहाती तियें सकळें। होईन रूपें॥ ४२८॥

तिये रसने जो जो रुचेल। तो तो रसु म्यां होईजेल।
गंधरूपें कीजेल। घ्राणसेवा॥ ४२९॥

एवं बाह्यमनोगत। श्रीगुरुसेवा समस्त।
वेंटाळीन वस्तुजात। होऊनियां॥ ४३०॥

जंव देह हें असेल। तंव ऐसी वोळगी कीजेल।
मग देहांतीं नवल। बुद्धि आहे॥ ४३१॥

इये शरीरींची माती। मेळवीन तिये क्षिती।
जेथ श्रीचरण उभे ठाती। आराध्याचे॥ ४३२॥

माझा स्वामी कवतिकें। स्पर्शति जियें उदकें।
तेथ लया नेईन निकें। आपीं आप॥ ४३३॥

श्रीगुरु वोंवाळिजती। कां भुवनीं जे उजळिती।
तयां दीपाचिया दीप्तीं। ठेवीन तेज॥ ४३४॥

चवरी हन विंजणा। तेथ लयो करीन प्राणा।
मग आंगाचा वोळगणा। होईन मी॥ ४३५॥

जिये जिये अवकाशीं। श्रीगुरु असती परिवारेंसीं।
आकाश लया आकाशीं। नेईन तिये॥ ४३६॥

परि जीतु मेला न संडीं। निमेषु लोका न धाडीं।
ऐसेनि गणावया कोडी। कल्पांचिया॥ ४३७॥

येतुलेंवरी धिंवसा। जयाचिया मानसा।
आणि करूनियाहि तैसा। अपारुचि॥ ४३८॥

रात्री दिवो नेणे। थोडें बहु न म्हणे।
म्हणियाचेनि दाटपणें। साजा होय॥ ४३९॥

तो व्यापारु येणें नांवें। गगनाहूनि थोरावे।
एकला करी आघवें। एके काळीं॥ ४४०॥

हृदयवृत्ती पुढां। आंगचि घे दवडा।
काज करी होडा। मानसेंसीं॥ ४४१॥

एकादिया आळामाळा। श्रीगुरुचिया खेळा।
लोण करी सकळा। जीविताचें॥ ४४२॥

जो गुरुदास्यें कृशु। जो गुरुप्रेमें सपोषु।
गुरुआज्ञे निजवासु। आपणचि जो॥ ४४३॥

जो गुरुकुळें सुकुलीनु। जो गुरुबंधुसौजन्यें सुजनु।
जो गुरुसेवाव्यसनें सव्यसनु। निरंतर॥ ४४४॥

गुरुसंप्रदायधर्म। ते जयाचे वर्णाश्रम।
गुरुपरिचर्या नित्यकर्म। जयाचे गा॥ ४४५॥

गुरु क्षेत्र गुरु देवता। गुरु माय गुरु पिता।
जो गुरुपूजेपरौता। मार्गु नेणे॥ ४४६॥

श्रीगुरुचें द्वार। तें जयाचें सर्वस्व सार।
गुरुसेवकां सहोदर। प्रेमें भजे॥ ४४७॥

जयाचें वक्त्र। वाहे गुरुनामाचे मंत्र।
गुरुवाक्यावांचूनि शास्त्र। हातीं न शिवे॥ ४४८॥

शिवतलें गुरुचरणीं। भलतें जें पाणी।
तया तीर्थयात्रें आणी। तीर्थें त्रैलोक्यींचीं॥ ४४९॥

श्रीगुरूचें उशिटें। लाहे जैं अवचटें।
तैं तेणें लाभें विटे। समाधीसी॥ ४५०॥

कैवल्यसुखासाठी। परमाणु घे किरीटी।
उधळती पायांपाठीं। चालतां जे॥ ४५१॥

हें असो सांगों किती। नाहीं पारु गुरुभक्ती।
परी गा उत्क्रांतमती। कारण हें॥ ४५२॥

जया इये भक्तीची चाड। जया इये विषयींचें कोड।
जो हे सेवेवांचून गोड। न मनी कांहीं॥ ४५३॥

तो तत्त्वज्ञाचा ठावो। ज्ञाना तेणेंचि आवो।
हें असो तो देवो। ज्ञान भक्तु॥ ४५४॥

हें जाण पां साचोकारें। तेथ ज्ञान उघडोनि द्वारें।
नांदत असे जगा पुरे। इया रीती॥ ४५५॥

जिये गुरुसेवेविखीं। माझा जीव अभिलाखी।
म्हणोनि सोयचुकी। बोली केली॥ ४५६॥

एऱ्हवीं असतां हातीं खुळा। भजनावधानीं आंधळा।
परिचर्येलागीं पांगुळास्। पासूनि मंदु॥ ४५७॥

गुरुवर्णनीं मुका। आळशी पोशिजे फुका।
परि मनीं आथि निका। सानुरागु॥ ४५८॥

तेणेंचि पैं कारणें। हें स्थळ पोखणें।
पडलें मज म्हणे। ज्ञानदेवो॥ ४५९॥

परि तो बोलु उपसाहावा। आणि वोळगे अवसरु देयावा।
आतां म्हणेन जी बरवा। ग्रंथार्थुचि॥ ४६०॥

परिसा परिसा श्रीकृष्णु। जो भूतभारसहिष्णु।
तो बोलतसे विष्णु। पार्थु ऐके॥ ४६१॥

म्हणे शुचित्व गा ऐसें। जयापाशीं दिसे।
आंग मन जैसें। कापुराचें॥ ४६२॥

कां रत्नाचें दळवाडें। तैसें सबाह्य चोखडें।
आंत बाहेरि एकें पाडें। सूर्यु जैसा॥ ४६३॥

बाहेरीं कर्में क्षाळला। भितरीं ज्ञानें उजळला।
इहीं दोहीं परीं आला। पाखाळा एका॥ ४६४॥

मृत्तिका आणि जळें। बाह्य येणें मेळें।
निर्मळु होय बोलें। वेदाचेनि॥ ४६५॥

भलतेथ बुद्धी बळी। रजें आरिसा उजळी।
सौंदणी फेडी थिगळी। वस्त्रांचिया॥ ४६६॥

किंबहुना इयापरी। बाह्य चोख अवधारीं।
आणि ज्ञानदीपु अंतरीं। म्हणौनि शुद्ध॥ ४६७॥

एऱ्हवीं तरी पांडुसुता। आंत शुद्ध नसतां।
बाहेरि कर्म तो तत्त्वतां। विटंबु गा॥ ४६८॥

मृत जैसा शृंगारिला। गाढव तीर्थीं न्हाणिला।
कडुदुधिया माखिला। गुळें जैसा॥ ४६९॥

वोस गृहीं तोरण बांधिलें। कां उपवासी अन्नें लिंपिलें।
कुंकुसेंदुर केलें। कांतहीनें॥ ४७०॥

कळस ढिमाचे पोकळ। जळो वरीले झळाळ।
काय करूं चित्रींव फळ। आंतु शेण॥ ४७१॥

तैसें कर्मवरिचिले कडां। न सरे थोर मोलें कुडा।
नव्हे मदिरेचा घडा। पवित्र गंगे॥ ४७२॥

म्हणोनि अंतरीं ज्ञान व्हावें। मग बाह्य लाभेल स्वभावें।
वरि ज्ञानकर्में संभवे। ऐसें कें जोडे॥ ४७३॥

यालागी बाह्य विभागु। कर्में धुतला चांगु।
आणि ज्ञानें फेडिला वंगु। अंतरींचा॥ ४७४॥

तेथ अंतर्बाह्य गेले। निर्मळत्व एक जाहलें।
किंबहुना उरलें। शुचित्वचि॥ ४७५॥

म्हणोनि सद्भाव जीवगत। बाहेरि दिसती फांकत।
जे स्फटिकगृहींचे डोलत। दीप जैसे॥ ४७६॥

विकल्प जेणें जेणें उपजे। नाथिली विकृति निपजे।
अप्रवृत्तीचीं बीजें। अंकुर घेती॥ ४७७॥

तें आइके देखे अथवा भेटे। परि मनीं कांहींचि नुमटे।
मेघरंगें न कांटे। व्योम जैसें॥ ४७८॥

एऱ्हवीं इंद्रियांचेनि मेळें। विषयांवरी तरी लोळे।
परि विकाराचेनि विटाळें। लिंपिजेना॥ ४७९॥

भेटलिया वाटेवरी। चोखी आणि माहारी।
तेथ नातळे तियापरी। राहाटो जाणे॥ ४८०॥

कां पतिपुत्रांतें आलिंगी। एकचि ते तरुणांगी।
तेथ पुत्रभावाचियां अंगीं। न लगेचि कामु॥ ४८१॥

तैसें हृदय चोख। संकल्पविकल्पीं सनोळख।
कृत्याकृत्य विशेख। फुडें जाणे॥ ४८२॥

पाणियें हिरा न भिजे। आधणीं हरळु न शिजे।
तैसी विकल्पजातें न लिंपिजे। मनोवृत्ती॥ ४८३॥

तया नांव शुचित्वपण। पार्था गा संपूर्ण।
हें देखसी तेथ जाण। ज्ञान आहे॥ ४८४॥

आणि स्थिरता साचें। घर रिगाली जयाचें।
तो पुरुष ज्ञानाचें। आयुष्य गा॥ ४८५॥

देह तरी वरचिलीकडे। आपुलिया परि हिंडे।
परि बैसका न मोडे। मानसींची॥ ४८६॥

वत्सावरूनि धेनूचें। स्नेह राना न वचे।
नव्हती भोग सतियेचे। प्रेमभोग॥ ४८७॥

कां लोभिया दूर जाये। परि जीव ठेवाचि ठाये।
तैसा देहो चाळितां नव्हे। चळु चित्ता॥ ४८८॥

जातया अभ्रासवें। जैसें आकाश न धांवे।
भ्रमणचक्रीं न भंवे। ध्रुव जैसा॥ ४८९॥

पांथिकाचिया येरझारा। सवें पंथु न वचे धनुर्धरा।
कां नाहीं जेवीं तरुवरा। येणें जाणें॥ ४९०॥

तैसा चळणवळणात्मकीं। असोनि ये पांचभौतिकीं।
भूतोर्मी एकी। चळिजेना॥ ४९१॥

वाहुटळीचेनि बळें। पृथ्वी जैसी न ढळे।
तैसा उपद्रव उमाळें। न लोटे जो॥ ४९२॥

दैन्यदुःखीं न तपे। भवशोकीं न कंपे।
देहमृत्यु न वासिपे। पातलेनि॥ ४९३॥

आर्ति आशा पडिभरें। वय व्याधीगजरें।
उजू असतां पाठिमोरें। नव्हे चित्त॥ ४९४॥

निंदा निस्तेज दंडी। कामलोभा वरपडी।
परी रोमा नव्हे वांकुडी। मानसाची॥ ४९५॥

आकाश हें वोसरो। पृथ्वी वरि विरो।
परी नेणे मोहरों। हृदयवृत्ती॥ ४९६॥

हाती हाला फुलीं। पासवणा जेवीं न घाली।
तैसा नोहोटे दुर्वाक्यशेलीं। शेलिला सांता॥ ४९७॥

क्षीरार्णवाचियां कल्लोळीं। कंपु नाहीं मंदराचळीं।
कां आकाश न जळे जाळीं। वणवियाचियां॥ ४९८॥

तैशा आल्या गेल्या ऊर्मी। नव्हे गजबज मनोधर्मी।
किंबहुना धिरु क्षमी। कल्पांतींही॥ ४९९॥

पैं स्थैर्य ऐशी भाष। बोलिजे जे सविशेष।
ते हे दशा गा देख। देखणेया॥ ५००॥

हें स्थैर्य निधडें। जेथ आंगें जीवें जोडे।
तें ज्ञानाचें उघडें। निधान साचें॥ ५०१॥

आणि इसाळु जैसा घरा। कां दंडिया हातयरा।
न विसंबे भांडारा बद्धकु जैसा॥ ५०२॥

एकलौतिया बाळका। वरि पडौनि ठाके अंबिका।
मधुविषीं मधुमक्षिका। लोभिणी जैसी॥ ५०३॥

अर्जुना जो यापरी। अंतःकरण जतन करी।
नेदी उभें ठाकों द्वारीं। इंद्रियांचियां॥ ५०४॥

म्हणे काम बागुल ऐकेल। हे आशा सियारी देखैल।
तरि जीवा टेंकैल। म्हणोनि बिहे॥ ५०५॥

बाहेरी धीट जैसी। दाटुगा पति कळासी।
करी टेहणी तैसी प्रवृत्तीसीं॥ ५०६॥

सचेतनीं वाणेपणें। देहासकट आटणें।
संयमावरी करणें। बुझूनि घाली॥ ५०७॥

मनाचियां महाद्वारीं। प्रत्याहाराचियां ठाणांतरीं।
जो यम दम शरीरीं। जागवी उभे॥ ५०८॥

आधारीं नाभीं कंठीं। बंधत्रयाचीं घरटीं।
चंद्रसूर्यसंपुटीं। सुये चित्त॥ ५०९॥

समाधीचे शेजेपासीं। बांधोनि घाली ध्यानेंसीं।
चित्त चैतन्य समरसीं। आंतु रते॥ ५१०॥

अगा अंतःकरणनिग्रहो जो। तो हा हें जाणिजो।
हा आथि तेथ विजयो। ज्ञानाचा पैं॥ ५११॥

जयाची आज्ञा आपण। शिरीं वाहे अंतःकरण।
मनुष्याकारें जाण। ज्ञानचि तो॥ ५१२॥

इंद्रियार्थेषु वैराग्यम् अनहङ्कार एव च॥
जन्ममृत्युजराव्याधि दुःखदोषानुदर्शनम॥ १३.८॥

आणि विषयांविखीं। वैराग्याची निकी।
पुरवणी मानसीं कीं। जिती आथी॥ ५१३॥

वमिलेया अन्ना। लाळ न घोंटी जेवीं रसना।
आंग न सूये आलिंगना। प्रेताचिया॥ ५१४॥

विष खाणें नागवे। जळत घरीं न रिघवे।
व्याघ्रविवरां न विचवे। वस्ती जेवीं॥ ५१५॥

धडाडीत लोहरसीं। उडी न घालवे जैसी।
न करवे उशी। अजगराची॥ ५१६॥

अर्जुना तेणें पाडें। जयासी विषयवार्ता नावडे।
नेदी इंद्रियाचेनि तोंडें। कांहींच जावों॥ ५१७॥

जयाचियां मनीं आलस्य। देही अतिकार्श्य।
शमदमीं सामरस्य। जयासि गा॥ ५१७॥

तपोव्रतांचा मेळावा। जयाचियां ठायीं पांडवा।
युगांत जया गांवास्। आंतु येतां॥ ५१९॥

बहु योगाभ्यासीं हांव। विजनाकडे धांव।
न साहे जो नांव। संघाताचें॥ ५२०॥

नाराचाचीं आंथुरणें। पूयपंकीं लोळणें।
तैसें लेखी भोगणें। ऐहिकींचें॥ ५२१॥

स्वर्गातें मानसें। ऐकोनि मानी ऐसें।
कुहिलें पिशित जैसें। श्वानाचें कां॥ ५२२॥

तें हें विषयवैराग्य। जें आत्मलाभाचें भाग्य।
येणें ब्रह्मानंदा योग्य। जीव होती॥ ५२३॥

ऐसा उभयभोगीं त्रासु। देखसी जेथ बहुवसु।
तेथ जाण रहिवासु। ज्ञानाचा तूं॥ ५२४॥

आणि सचाडाचिये परी। इष्टापूर्ते करी।
परि केलेपण शरीरीं। वसों नेदी॥ ५२५॥

वर्णाश्रमपोषकें। कर्में नित्यनैमित्तिकें।
तयामाजीं कांहीं न ठके। आचरतां॥ ५२६॥

परि हें मियां केलें। कीं हें माझेनि जालें।
ऐसें नाहीं ठेविलें। वासनेमाजीं॥ ५२७॥

जैसें अवचितपणें। वायूसि सर्वत्र विचरणें।
कां निरभिमान उदैजणें। सूर्याचें जैसें॥ ५२८॥

कां श्रुति स्वभावता बोले। गंगा काजेंविण चाले।
तैसें अवष्टंभहीन भलें। वर्तणें जयाचें॥ ५२९॥

ऋतुकाळीं तरी फळती। परी फळलीं हें नेणती।
तयां वृक्षाचिये ऐसी वृत्ती। कर्मीं सदा॥ ५३०॥

एवं मनीं कर्मीं बोलीं। जेथ अहंकारा उखी जाहली।
एकावळीची काढिली। दोरी जैसी॥ ५३१॥

संबंधेंवीण जैसीं। अभ्रें असती आकाशीं।
देहीं कर्में तैसीं। जयासि गा॥ ५३२॥

मद्यपाआंगींचें वस्त्र। कां लेपाहातींचें शस्त्र।
बैलावरी शास्त्र। बांधलें अहे॥ ५३३॥

तया पाडें देहीं। जया आहे हे सेचि नाहीं।
निरहंकारता पाहीं। तया नांव॥ ५३४॥

हें संपूर्ण जेथें दिसे। तेथेंचि ज्ञान असे।
इयेविषीं अनारिसें। बोलों नये॥ ५३५॥

आणि जन्म मृत्यु जरा दुःखें। व्याधिवार्ध क्यकलुषें।
इयें आंगा न येतां देखे। दुरूनि जो॥ ५३६॥

साधकु विवसिया। कां उपसर्गु योगिया।
पावे उणेयापुरेया। वोथंबा जेवीं॥ ५३७॥

वैर जन्मांतरीचें। सर्पा मनौनि न वचे।
तेवीं अतीता जन्माचें। उणें जो वाहे॥ ५३८॥

डोळा हरळ न विरे। घायीं कोत न जिरे।
तैसें काळींचें न विसरे। जन्मदुःख॥ ५३९॥

म्हणे पूयगर्तें रिगाला। अहा मूत्ररंध्रें निघाला।
कटा रे मियां चाटिला। कुचस्वेदु॥ ५४०॥

ऐस ऐसियापरी। जन्माचा कांटाळा धरी।
म्हणे आतां तें न करीं। जेणें ऐसें होय॥ ५४१॥

हारी उमजावया। जुंवारी जैसा ये डाया।
कीं वैरा बापाचेया। पुत्र जचे॥ ५४२॥

मारिलियाचेनि रागें। पाठीचा जेवीं सूड मागें।
तेणें आक्षेपें लागे। जन्मापाठीं॥ ५४३॥

परि जन्मती ते लाज। न सांडी जयाचें निज।
संभाविता निस्तेज। न जिरे जेवीं॥ ५४४॥

आणि मृत्यु पुढें आहे। तोचि कल्पांतीं कां पाहे।
परि आजीचि होये। सावधु जो॥ ५४५॥

माजीं अथांव म्हणता। थडियेचि पांडुसुता।
पोहणार आइता। कासेसि जेवीं॥ ५४६॥

कां न पवतां रणाचा ठावो। सांभाळिजे जैसा आवो।
वोडण सुइजे घावो। न लागतांचि॥ ५४७॥

पाहेचा पेणा वाटबंधा। तंव आजीचि होइजे सावधा।
जीव न वाचितां औषधा। धांविजे जेवीं॥ ५४८॥

येऱ्हवीं ऐसें घडे। जो जळतां घरीं सांपडे।
तो मग न पवाडे। कुहा खणों॥ ५४९॥

चोंढिये पाथरु गेला। तैसेनि जो बुडाला।
तो बोंबेहि सकट निमाला। कोण सांगे॥ ५५०॥

म्हणोनि समर्थेंसि वैर। जया पडिलें हाडखाइर।
तो जैसा आठही पाहर। परजूनि असे॥ ५५१॥

ना तरी केळवली नोवरी। का संन्यासी जियापरी।
तैसा न मरतां जो करी। मृत्युसूचना॥ ५५२॥

पैं गा जो ययापरी। जन्मेंचि जन्म निवारी।
मरणें मृत्यु मारी। आपण उरे॥ ५५३॥

तया घरीं ज्ञानाचें। सांकडें नाहीं साचें।
जया जन्ममृत्युचें। हृदयीं शल्य॥ ५५४॥

आणि तयाचिपरी जरा। न टेंकतां शरीरा।
तारुण्याचिया भरा। माजीं देखे॥ ५५५॥

म्हणे आजिचियां अवसरीं। पुष्टि जे शरीरीं।
ते पाहे होईल काचरी। वाळली जैसी॥ ५५६॥

निदैव्याचे व्यवसाय। तैसे ठाकती हातपाय।
अमंत्रिया राज्याची परी आहे। बळा यया॥ ५५७॥

फुलांचिया भोगा। लागीं प्रेम टांगा।
तें करेयाचा गुड्घा। तैसें होईल॥ ५५८॥

वोढाळाचियां खुरीं। आषाढ वातें बुरी।
ते दशा माझ्यां शिरीं। पावेल गा॥ ५५९॥

पद्मदळेंसी इसाळे। भांडताति जे हे डोळे।
ते होती पडवळें। पिकलीं जैसीं॥ ५६०॥

भंवईचीं पडळें। वोमथती सिनसाळे।
उरु कुहिजेल जळें। आंसुवांचेनि॥ ५६१॥

जैसें बाभुळीचें खोड। गिरबडूनि जाती सरड।
तैसें पिचडीं तोंड। सरकटिजेल॥ ५६२॥

रांधवणी चुलीपुढें। पऱ्हे उन्मादती खातवडे।
तैसींचि यें नाकाडें। बिडबिडती॥ ५६३॥

तांबुलें ओठ राऊं। हांसतां दांत दाऊं।
सनागर मिरऊं। बोल जेणें॥ ५६४॥

तयाचि पाहे या तोंडा। येईल जळंबटाचा लोंढा।
इया उमळती दाढा। दातांसींहि॥ ५६५॥

कुळवाडी रिणें दाटली। कां वांकडिया ढोरें बैसलीं।
तैसी नुठील कांहीं केली। जीभचि हे॥ ५६६॥

कुसळें कोरडीं। वारेनि जाती बरडीं।
तैसी आपत्ति तोंडीं। दाढियेसी॥ ५६७॥

आषाढींचेनि जळें। जैसीं झिरपती शैलाचीं मौळें।
तैसें खांडीहूनि लाळे। पडती पूर॥ ५६८॥

वाचेसि अपवाडु। कानीं अनुघडु।
पिंड गरुवा माकडु। होईल हा॥ ५६९॥

तृणाचें बुजवणें। आंदोळे वारेगुणें।
तैसें येईल कांपणें। सर्वांगासी॥ ५७०॥

पायां पडती वेंगडी। हात वळती मुरकुंडी।
बरवपणा बागडी। नाचविजैल॥ ५७१॥

मळमूत्रद्वारें। होऊनि ठाकती खोंकरें।
नवसियें होती इतरें। माझियां निधनीं॥ ५७२॥

देखोनि थुंकील जगु। मरणाचा पडैल पांगु।
सोयरियां उबगु। येईल माझा॥ ५७३॥

स्त्रियां म्हणती विवसी। बाळें जाती मूर्छेसी।
किंबहुना चिळसी। पात्र होईन॥ ५७४॥

उभळीचा उजगरा। सेजारिया सोइलिया घरा।
शिणवील म्हणती म्हातारा। बहुतांतें हा॥ ५७५॥

ऐसी वार्धक्याची सूचणी। आपणिया तरुणपणीं।
देखे मग मनीं। विटे जो गा॥ ५७६॥

म्हणे पाहे हें येईल। आणि आतांचें भोगितां जाईल।
मग काय उरेल। हितालागीं॥ ५७७॥

म्हणोनि नाइकणें पावे। तंव आईकोनि घाली आघवें।
पंगु न होता जावें। तेथ जाय॥ ५७८॥

दिठी जंव जाये। तंव पाहावें तेतुलें पाहे।
मूकत्वा आधीं वाचा वाहे। सुभाषितें॥ ५७९॥

हात होती खुळे। हें पुढील मोटकें कळे।
आणि करूनि घाली सकळें। दानादिकें॥ ५८०॥

तेव्हां ऐसी दशा येईल पुढें। तैं मन होईल वेडें।
तंव चिंतूनि ठेवी चोखडें। आत्मज्ञान॥ ५८१॥

जैसे चोर पाहे झोंबती। तंव आजीचि रुसिजे संपत्ती।
का झांकाझाकी वाती। न वचतां कीजे॥ ५८२॥

तैसें वार्धक्य पावें। मग जें वायां जावें।
तें आतांचि आघवें। सवतें केलें॥ ५८३॥

आतां मोडूनि ठेलीं दुर्गें। कां वळित धरिलें खगें।
तेथ उपेक्षूनि जो रिघे। तो नागवला कीं॥ ५८४॥

तैसें वृद्धाप्य होये। आलेपणें वायां जाये।
जे तो शतवृद्ध आहे। नेणों कैंचा॥ ५८५ ॥

झाडिलीं कोळें झाडी। तया न फळे जेवीं बोंडीं।
जाहला अग्नि तरि राखोंडी। जाळील काई॥ ५८६ ॥

म्हणोनि वृद्धाप्याचेनि आठवें। वृद्धाप्या जो नागवे।
तयाचियां ठायीं जाणावें। ज्ञान आहे॥ ५८७ ॥

तैसेचि ना ना रोग। न पडिघाती पुढां जंव आंग।
तंव आरोग्याचे उपेग। करूनि घाली॥ ५८८ ॥

सापाचियां तोंडी। पडिली जे उंडी।
ते लाऊनि सांडी। प्रबुद्ध जैसा॥ ५८९ ॥

तैसा वियोग जेणें दुःखे। विपत्ति शोक पोखे।
तें स्नेह सांडूनि सुखें। उदासु होय॥ ५९० ॥

आणि जेणें जेणें कडे। दोष सूतील तोंडें।
तयां कर्मरंध्रा गुंडे। नियमाचे दाटी॥ ५९१ ॥

ऐस ऐसिया आइती। जयाची परी असती।
तोचि ज्ञानसंपत्ती। गोसावी गा॥ ५९२ ॥

आतां आणीकही एक। लक्षण अलौकिक।
सांगेन आइक। धनंजया॥ ५९३ ॥

असक्तिरनभिष्वङ्गः पुत्रदारगृहादिषु॥
नित्यं च समचित्तत्वम् इष्टानिष्टोपपत्तिषु॥ १३.९ ॥

तरि जो या देहावरी। उदासु ऐसिया परी।
उखिता जैसा बिढारीं। बैसविला आहे॥ ५९४ ॥

कां झाडाची साउली। वाटे जातां मीनली।
घरावरी तेतुली। आस्था नाहीं॥ ५९५ ॥

साउली सरिसीच असे। परी असे हें नेणिजे जैसें।
स्त्रियेचें तैसें। लोलुप्य नाहीं॥ ५९६ ॥

आणि प्रजा जे जाली। तियें वस्ती कीर आलीं।
कां गोरुवें बैसलीं। रुखातळीं॥ ५९७ ॥

जो संपत्तीमाजी असतां। ऐसा गमे पांडुसुता।
जैसा कां वाटे जातां। साक्षी ठेविला॥ ५९८ ॥

किंबहुना पुंसा। पांजरियामाजीं जैसा।
वेदाज्ञेसी तैसा। बिहूनि असे॥ ५९९ ॥

एऱ्हवीं दारागृहपुत्रीं। नाहीं जया मैत्री।
तो जाण पां धात्री। ज्ञानासि गा॥ ६०० ॥

आणि महासिंधू जैसे। ग्रीष्मवर्षीं सरिसे।
इष्टानिष्ट तैसें। जयाचियां ठायीं॥ ६०१ ॥

कां तिन्ही काळ होतां। त्रिधा नव्हे सविता।
तैसा सुखदुःखीं चित्ता। भेदु नाहीं॥ ६०२ ॥

जेथ नभाचेनि पाडें। समत्वा उणें न पडे।
तेथचि ज्ञान रोकडें। वोळख तूं॥ ६०३ ॥

मयि चानन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी॥
विविक्तदेशसेवित्वम् अरतिर्जनसंसदि॥ १३.१० ॥

आणि मीवांचूनि कांहीं। आणीक गोमटें नाहीं।
ऐसा निश्चयोचि तिहीं। जयाचां केला॥ ६०४ ॥

शरीर वाचा मानस। पियाली कृतनिश्चयाचा कोश।
एक मीवांचूनि वास। न पाहती आन॥ ६०५ ॥

किंबहुना निकट निज। जयाचें जाहलें मज।
तेणें आपणयां आम्हां सेज। एकी केली॥ ६०६ ॥

रिगतां वल्लभांपुढें। नाहीं आंगीं जीवीं सांकडें।
तिये कांतेचेनि पाडें। एकसरला जो॥ ६०७ ॥

मिळोनि मिळतचि असे। समुद्रीं गंगाजळ जैसें।
मी होऊनि मज तैसें। सर्वस्वें भजती॥ ६०८ ॥

सूर्याच्या होण्यां होइजे। कां सूर्यासवेंचि जाइजे।
हें विकलेपण साजे। प्रभेसी जेवीं॥ ६०९ ॥

पैं पाणियाचिये भूमिके। पाणी तळपे कौतुकें।
ते लहरी म्हणती लौकिकें। एऱ्हवीं तें पाणी॥ ६१० ॥

जो अनन्य यापरी। मी जाहलाहि मातें वरी।
तोचि तो मूर्तधारी। ज्ञान पैं गा॥ ६११॥

आणि तीर्थें धौतें तटें। तपोवनें चोखटें।
आवडती कपाटें। वसवूं जया॥ ६१२॥

शैलकक्षांचीं कुहरें। जळाशयपरिसरें।
अधिष्ठी जो आदरें। नगरा न ये॥ ६१३॥

बहु एकांतावरी प्रीति। जया जनपदावरी खंती।
जाण मनुष्यकारें मूर्ती। ज्ञानाची तो॥ ६१४॥

आणिकहि पुढती। चिन्हें गा सुमती।
ज्ञानाचिये निरुती। लागीं सांगों॥ ६१५॥

अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम्॥ एतज्ज्ञानमिति प्रोक्तम् अज्ञानं यदतोऽन्यथा॥ १३.११॥

तरी परमात्मा ऐसें। जें एक वस्तु असे।
तें जया दिसे। ज्ञानास्तव॥ ६१६॥

तें एकवांचूनि आनें। जियें भवस्वर्गादि ज्ञानें।
तें अज्ञान ऐसें मनें। निश्चयो करी॥ ६१७॥

स्वर्गा जाणें हें सांडी। भवविषयीं कान झाडी।
दे आत्मज्ञानीं बुडी। सद्भावाची॥ ६१८॥

भंगलिये वाटे। शोधूनिया अव्हांटे।
निघिजे जेवीं नीटें। राजपंथें॥ ६१९॥

तैसें ज्ञानजाताकरी। आघवेंचि एकीकडे सारी।
मग मन बुद्धि मोहरी। आत्मज्ञानीं॥ ६२०॥

म्हणे एक हेंचि आथी। येर जाणणें ते भ्रांती।
ऐसी निकुरेंसी मती। मेरु होय॥ ६२१॥

एवं निश्चयो जयाचा। द्वारीं आध्यात्मज्ञानाचां।
ध्रुव देवो गगनींचा। तैसा राहिला॥ ६२२॥

तयाचियां ठायीं ज्ञान। या बोला म्हणसी व्यवधान।
जे ज्ञानीं बैसलें मन। तेव्हांचि तें तो॥ ६२३॥

तरि बैसलेपणें जें होये। तें बैसतांचि बोलें न होये।
तरि ज्ञाना तया आहे। सरिसा पाडु॥ ६२४॥

आणि तत्त्वज्ञान निर्मळ। फळे जें एक फळ।
तें ज्ञेयही वरी सरळ। दिठी जया॥ ६२५॥

एऱ्हवीं बोधा आलेनि ज्ञानें। जरी ज्ञेय न दिसेचि मनें।
तरी ज्ञानलाभुही न मनें। जाहला सांता॥ ६२६॥

आंधळेनि हातीं दिवा। घेऊनि काय करावा।
तैसा ज्ञाननिश्चयो आघवा। वायां जाय॥ ६२७॥

जरि ज्ञानाचेनि प्रकाशें। परतत्त्वीं दिठी न पैसे।
ते स्फूर्तीचि असे। अंध होऊनि॥ ६२८॥

म्हणोनि ज्ञान जेतुलें दावी। तेतुली ही वस्तुचि आघवी।
ते देखे ऐसी व्हावी। बुद्धि चोख॥ ६२९॥

यालागीं ज्ञानें निर्दोखें। दाविलें ज्ञेय देखे।
तैसेनि उन्मेखें। आथिला जो॥ ६३०॥

जेवढी ज्ञानाची वृद्धी। तेवढीच जयाची बुद्धी।
तो ज्ञान हें शब्दीं। करणें न लगे॥ ६३१॥

पैं ज्ञानाचिये प्रभेसवें। जयाची मती ज्ञेयीं पावे।
तो हातधरणिया शिवे। परतत्त्वातें॥ ६३२॥

तोचि ज्ञान हें बोलतां। विस्मयो कवण पांडुसुता।
काय सवितयातें सविता। म्हणावें असे॥ ६३३॥

तंव श्रोतें म्हणितलें असो। न सांगे तयाचा अतिसो।
ग्रंथोक्ती तेथ आडसो। घालिसी कां॥ ६३४॥

तुझा हाचि आम्हां थोरु। वक्तृत्वाचा पाहुणेरु।
जे ज्ञानविषो फारु। निरोपिला॥ ६३५॥

रसु होआवा अतिमात्रु। हा घेतासि कविमंत्रु।
तरि अवंतूनि शत्रु। करितोसि कां गा॥ ६३६॥

ठायीं बैसतिये वेळे। जे रससोय घेऊनि पळे।
तियेचा येरु वोडव मिळे। कोणा अर्था॥ ६३७॥

आघवांचि विषयीं भादी। परि सांजवणी टेंकों नेदी।
ते खुरखोडी नुसधी। पोषी कवण॥ ६३८॥

तैसी ज्ञानीं मती न फांके। येर जल्पती नेणों केतुकें।
परि तें असो निकें। केलें तुवां॥ ६३९ ॥

जया ज्ञानलेशोद्देशें। कीजती योगादि सायासें।
ते धणीचें आणि तुझिया ऐसें। निरूपण॥ ६४० ॥

अमृताची सांतवांकुडी। लागो कां अनुघडी।
सुखाचियां दिसीं कोडी। गणिजतु कां॥ ६४१ ॥

पूर्णचंद्रेसीं राती। युग एक असो न पाहती।
तरि काय पाहत आहाती। चकोरें ते॥ ६४२ ॥

तैसें ज्ञानाचें बोलणें। आणि येणें रसाळपणें।
आतां पुरे कोण म्हणे। आकर्णितां॥ ६४३ ॥

आणि सभाग्यु पाहुणा ये। सुभगाचि वाढती होये।
तैं सरों नेणे रससोये। ऐसें आथी॥ ६४४ ॥

तैसा जाहला प्रसंगु। जे ज्ञानीं आम्हांसि लागु।
आणि तुजही अनुरागु। आथि येथ॥ ६४५ ॥

म्हणोनि यया वाखाणा। पासीं से आली चौगुणा।
ना म्हणों न ये देखणा। होसी ज्ञानी॥ ६४६ ॥

तरी आतां ययावरी। प्रज्ञेचा माजु धरीं।
पदें साच करीं। निरूपणीं॥ ६४७ ॥

या संतवाक्यासरिसे। म्हणितलें निवृत्तिदासें।
माझेंही जी ऐसे। मनोगत॥ ६४८ ॥

य वरी आतां तुम्हीं। आज्ञापिला स्वामी।
तरि वायां वाग्जाळ मी। वाढो नेदीं॥ ६४९ ॥

एवं इयें अवधारा। ज्ञानलक्षणें अठरा।
श्रीकृष्णें धनुर्धरा। निरूपिलीं॥ ६५० ॥

मग म्हणें या नांवें। ज्ञान एथ जाणावें।
हे स्वमत आणि आघवे। ज्ञानियेही म्हणती॥ ६५१ ॥

करतळावरी वाटोळा। डोलतु देखिजे आंवळा।
तैसें ज्ञान आम्हीं डोळा। दाविलें तुज॥ ६५२ ॥

आता धनंजया महामती। अज्ञान ऐसी वदंती।
तेही सांगों व्यक्ती। लक्षणेंसीं॥ ६५३ ॥

एऱ्हवीं ज्ञान फुडें जालिया। अज्ञान जाणवे धनंजया।
जें ज्ञान नव्हे तें अपैसया। अज्ञानचि॥ ६५४ ॥

पाहें पां दिवसु आघवा सरे। मग रात्रीची बारी उरे।
वांचूनि कांहीं तिसरें। नाहीं जेवीं॥ ६५५ ॥

तैसें ज्ञान जेथ नाहीं। तेंचि अज्ञान पाहीं।
तरि सांगों कांहीं कांहीं। चिन्हें तियें॥ ६५६ ॥

तरि संभावने जिये। जो मानाची वाट पाहे।
सत्कारें होये। तोषु जया॥ ६५७ ॥

गर्वें पर्वताचीं शिखरें। तैसा महत्त्वावरूनि नुतरे।
तयाचियां ठायीं पुरे। अज्ञान आहे॥ ६५८ ॥

आणि स्वधर्माची मांगळी। बांधे वाचेचियां पिंपळीं।
उभिला जैसा देउळीं। जाणोनि कुंचा॥ ६५९ ॥

घाली विद्येचा पसारा। सूये सुकृताचा डांगोरा।
करी तेतुलें मोहरा। स्फीतीचिया॥ ६६० ॥

आंग वरिवरी चर्ची। जनातें अभ्यर्चिता वंची।
तो जाण पां अज्ञानाची। खाणी एथ॥ ६६१ ॥

आणि वन्ही वनीं विचरे। तेथ जळती जैसीं जंगमें स्थावरें।
तैसें जयाचेनि आचरें। जगा दुःख॥ ६६२ ॥

कौतुकें जें जें जल्पे। तें सबळाहूनि तीख रुपे।
विषाहुनि संकल्पें। मारकु जो॥ ६६३ ॥

तयातें बहु अज्ञान। तोचि अज्ञानाचें निधान।
हिंसेसि आयतन। जयाचें जिणें॥ ६६४ ॥

आणि फुंकें भाता फुगे। रेचिलिया सवेंचि उफगे।
तैसा संयोगवियोगें। चढे वोहटे॥ ६६५ ॥

पडली वारयाचियां वळसां। धुळी चढे आकाशा।
हरिखा वळघे तैसा। स्तुतीवेळे॥ ६६६ ॥

निंदा मोटकी आइके। आणि कपाळ धरूनि ठाके।
थेंबें विरे वारेंनि शोखे। चिखलु जैसा॥ ६६७॥

तैसा मानापमानीं होये। जो कोण्हीही उर्मी न साहे।
तयाचियां ठायीं आहे। आज्ञान पुरें॥ ६६८॥

आणि जयाचियां मनीं गांठी। वरिवरी मोकळी वाचा दिठी।
आंगें मिळे जीवें पाठी। भलतया दे॥ ६६९॥

व्याधाचें चारा घालणें। तैसें प्रांजळ जोगावणें।
चांगाचीं अंतःकरणें। विरुद्ध करी॥ ६७०॥

गार शेवाळें गुंडाळली। कां निंबोळी जैसी पिकली।
तैसी जयाची भली। बाह्य क्रिया॥ ६७१॥

अज्ञान तयाचियां ठायीं। ठेविले असे पाही।
या बोला आन नाहीं। सत्य मानीं॥ ६७२॥

आणि गुरुकुळीं लाजे। जो गुरुभक्ती उभजे।
विद्या घेऊनि माजे। गुरूसींचि॥ ६७३॥

तयाचें नांव घेणें। हें वाचे शूद्रान्न होणें।
परि घडलें लक्षणें। बोलतां इयें॥ ६७४॥

आता गुरुभक्ताचें नांव घेवों। तेणें वाचे प्रायश्चित देवों।
गुरुसेवका नांव पाहा हो। सूर्य जैसा॥ ६७५॥

येतुलेनि पांगु पापाचा। निस्तरेल हे वाचा।
जो गुरुतल्पगाचियां। नामीं आला॥ ६७६॥

हा ठायवरी। तया नांवाचें भय हरी।
मग म्हणे अवधारीं। आणिकें चिन्हें॥ ६७७॥

तरी आंगें कर्मे ढिला। जो मनें विकल्प भरला।
अडवींचा आवगळला। कुहा जैसा॥ ६७८॥

तया तोंडीं कांटिवडें। आंतु नुसतीं हाडें।
अशुचि तेणें पाडें। सबाह्य जो॥ ६७९॥

जैसें पोटालागीं सुणें। उघडें झांकलें न म्हणे।
तैसें आपुलें परावें नेणे। द्रव्यालागीं॥ ६८०॥

एया ग्रामकुलाचियां ठायीं। जैसा मिळणी ठावो अठावो नाहीं।
तैसा स्त्रीविषयीं कांहीं। विचारीना॥ ६८१॥

कर्माचा वेळु चुके। कां नित्य नैमित्यिक ठाके।
तें जया न दुखे। जीवामाजीं॥ ६८२॥

पापी जो निसगु। पुण्याविषयीं अति निलागु।
जयाचियां मनीं वेगु। विकल्पाचा॥ ६८३॥

तो जाण निखळा। अज्ञानाचा पुतळा।
जो बांधोनि असे डोळां। वित्ताशेतें॥ ६८४॥

आणि स्वार्थें अळुमाळें। जो धैर्यापासोनि चळे।
जैसें तृणबीज ढळे। मुंगियेचेनि॥ ६८५॥

पावो सूदलिया सवें। जैसें थिल्लर कालवे।
तैसा भयाचेनि नांवें। गजबजे जो॥ ६८६॥

वायूचेनि सावायें। धूई दिगंतावरी जाये।
दुःखवार्ता होये। तैसें जया॥ ६८७॥

मनोरथांचिया धारसा। वाहणें जयाचिया मानसा।
पूरीं पडिला जैसा। दुधिया पाहीं॥ ६८८॥

वाउधणाचिया परी। जो आश्रयो कंहींचि न धरी।
क्षेत्रीं तीर्थीं पुरीं। थारों नेणे॥ ६८९॥

कां मातलिया सरडा। पुढती बुड पुढती शेंडा।
हिंडणवारा कोरडा। तैसा जया॥ ६९०॥

जैसा रोंविल्याविणें। रांजणु थारों नेणे।
तैसा पडे तैं राहणें। एऱ्हवीं हिंडे॥ ६९१॥

तयाचियां ठायीं उदंड। अज्ञान असे वितंड।
जो चांचल्यें भावंड। मर्कटाचें॥ ६९२॥

आणि पैं गा धनुर्धरा। जयाचिया अंतरा।
नाहीं वोढावारा। संयमाचा॥ ६९३॥

लेंडिये आला लोंढा। न मनी वाळुवेचा वरंडा।
तैसा निषेधाचिया तोंडा। बिहेना जो॥ ६९४॥

व्रतातें आड मोडी। धर्मातें पायें वोलांडी।
नियमाची आस तोडी। जयाची क्रिया॥ ६९५॥

नाहीं पापाचा कंटाळा। नेदी पुण्यासी जिव्हाळा।
लाजेचा पेंडवळा। खाणोनि घाली॥ ६९६॥

कुळेंसीं जो पाठमोरा। वेदाज्ञेसी दुऱ्हा।
कृत्याकृत्यव्यापारा। निवाडु नेणे॥ ६९७॥

वसो जैसा मोकाटु। वारा जैसा अफाटु।
फुटला जैसा पाटु। निरंजनीं॥ ६९८॥

आंधळें हातिरूं मातलें। डोंगरीं जैसें पेटलें।
तैसें विषयीं सुटलें। चित्त जयाचें॥ ६९९॥

पैं उबडां काइ न पडे। मोकाटु कोणां नातुडे।
ग्रामद्वारीचें आडें। नोलांडी कोण॥ ७००॥

जैसें सत्रीं अन्न जालें। कीं सामान्या बीक आलें।
वाणसियेचें उभलें। कोण न रिगे॥ ७०१॥

तैसें जयाचें अंतःकरण। तयाचियां ठायीं संपूर्ण।
अज्ञानाची जाण। ऋद्धि आहे॥ ७०२॥

आणि विषयांची गोडी। जो जीतु मेला न संडी।
स्वर्गीही खावया जोडी। येथौनिचि॥ ७०३॥

जो अखंड भोगा जचे। जया व्यसन काम्यक्रियेचें।
मुख देखोनि विरक्ताचें। सचैल करी॥ ७०४॥

विषो शिणोनि जाये। परि न शिणे सावधु नोहे।
कुहिलां हातीं खाये। कोढी जैसा॥ ७०५॥

खरी टेंकों नेदी उडे। लातौनि फोडी नाकाडें।
तरी जेवीं न काढे। माघौता खरु॥ ७०६॥

तैसा जो विषयांलागीं। उडी घाली जळतिये आगीं।
व्यसनाचीं आंगीं। लेणी मिरवी॥ ७०७॥

फुटोनि पडे तंव। मृग वाढवी हांव।
परि न म्हणे ते माव। रोहिणीची॥ ७०८॥

तैसा जन्मोनि मृत्यूवरी। विषयीं त्रासितां बहुतीं परीं।
तरी त्रासु नेघे धरी। अधिक प्रेम॥ ७०९॥

पहिलिये बाळदशे। आई बा हेंचि पिसें।
तें सरे मग स्त्रीमांसें। भुलोनि ठाके॥ ७१०॥

मग स्त्री भोगितां थावो। वृद्धाप्य लागे येवो।
तेव्हां तोचि प्रेमभावो। बाळकासि आणी॥ ७११॥

आंधळें व्यालें जैसें। तैसा बाळें परिवसे।
परि जी मरे तो न त्रासे। विषयांसि जो॥ ७१२॥

जाण तयाचियां ठायीं। अज्ञानासि पारु नाहीं।
आतां आणिकें कांहीं। चिन्हें सांगों॥ ७१३॥

तरि देह हेंचि आत्मा। ऐसेया जो मनोधर्मा।
वळंघोनिया कर्मा। आरंभु करी॥ ७१४॥

आणि उणें कां पुरें। जें जें कांहीं आचरे।
तयाचेनि आविष्कारें। कुंथों लागे॥ ७१५॥

डोइये ठेविलेनि भोजें। देवलविसें जेवीं फुंजे।
तैसा विद्यावयसा माजे। उताणा चाले॥ ७१६॥

म्हणे मीचि एकु आथी। माझ्यांचि घरीं संपत्ती।
माझी आचरती रीती। कोणा आहे॥ ७१७॥

नाहीं माझेंनि पाडें वाडु। मी सर्वज्ञु एकुचि रूढु।
ऐसा गर्वतुष्टीगंडु। घेऊनि ठाके॥ ७१८॥

व्याधि लागलिया माणुसा। न येचि भोग दाऊं जैसा।
निकें न साहे जो तैसा। पुढिलांचें॥ ७१९॥

पैं गुणु तेतुला खाय। स्नेह कीं जाळितु जाय।
जेथ ठेविजे तेथ होय। मसी ऐसें॥ ७२०॥

जीवनें शिंपिला तिडपिडी। विजिला प्राण सांडी।
लागला तरी काडी। उरों नेदी॥ ७२१॥

आळुमाळु प्रकाशु करी। तेतुलेनीचि उबारा धरी।
तैसिया दीपाचिया परी। सुविद्यु जो॥ ७२२॥

औषधाचेनि नांवे अमृतें। नवज्वरु जैसा आंबुथे।
कां विषचि होऊनि परतें। सर्पा दूध॥ ७२३॥

तैसा सद्गुणीं मत्सरु। व्युत्पत्ती अहंकारु।
तपोज्ञानें अपारु। ताठा चढे॥ ७२४॥

अंत्यजु राणिवे बैसविला। आरें धारणु गिळिला।
तैसा गर्वे फुगला। देखसी जो॥ ७२५॥

जो लाटणें ऐसा न लवे। पाथरु तेवीं न द्रवे।
गुणियासि नागवे। फोडसें जैसें॥ ७२६॥

किंबहुना तयापासी। अज्ञान आहे वाढीसी।
हें निकरें गा तुजसीं। बोलत असों॥ ७२७॥

आणिक पाहीं धनंजया। जो गृह देह सामग्रिया।
न देखे काळीचेया। जन्मातें गा॥ ७२८॥

कृतघ्ना उपेगु केला। का चोरा व्यवहारु दिधला।
निसुगु स्तविला। विसरे जैसा॥ ७२९॥

वोढाळिता लाविलें। तें तैसेंच कान पूंस वोलें।
कीं पुढती वोढाळुं आलें। सुणें जैसें॥ ७३०॥

बेडूक सापाचियां तोंडीं। जातसे सबुडबुडीं।
तो मक्षिकाचिया कोडीं। स्मरेना कांहीं॥ ७३१॥

तैसीं नवही द्वारें स्रवती। आंगीं देहाची लुती जिती।
जेणें जाली तें चित्तीं। सलेना जया॥ ७३२॥

मातृकोदरकुहरीं। सूनि विष्ठेचियां दाथरीं।
जठरीं नवमासवरी। उकडला जैं॥ ७३३॥

ते गर्भीची व्यथा। कां जें जालें उपजतां।
तें कांहींचि सर्वथा। नाठवी जो॥ ७३४॥

मळमूत्रपंकीं। लोळतें बाळ अंकीं।
तें देखोनि जो न थुंकी। त्रासु नेघे॥ ७३५॥

कालचि ना जन्म गेलें। पाहेचि पुढती आलें।
हें ऐसें कांहीं वाटलें। नाहीं जया॥ ७३६॥

आणि पैं तयाची परी। जीविताची फरारी।
देखोनि जो न करी। मृत्युचिंता॥ ७३७॥

जिणेयाचेनि विश्वासें। मृत्यु एक एथ असे।
हें जयाचेनि मानसें। मानिजेना॥ ७३८॥

अल्पोदकींचा मासा। हें नाटे ऐसिया आशा।
न वचेचि कां जैसा। अगाध डोहा॥ ७३९॥

कां गोरीचिया भुली। मृग व्याधा दिठी न घाली।
गळु न पाहतां गिळिली। उंडी मीनें॥ ७४०॥

दीपाचिया झगमगा। जाळील हें पतंगा।
नेणवेचि पैं गा। जयापरी॥ ७४१॥

गव्हारु निद्रासुखें। घर जलत असे तें न देखे।
नेणतां जेवी विखें। रांधिलें अन्न॥ ७४२॥

तैसा जीविताचेनि मिषें। हा मृत्युचि आला असे।
हें नेणेचि राजसें। सुखें जो गा॥ ७४३॥

शरीरींचीं वाढी। अहोरात्रांची जोडी।
विषयसुखप्रौढी। साचचि मानी॥ ७४४॥

परि बापुडा ऐसें नेणे। जें वेश्येचें सर्वस्व देणें।
तेंचि नागवणें। रूप एथ॥ ७४५॥

संवचोराचें साजणे। तेंचि तें प्राण घेणें।
लेपा स्नपन करणें। तेंचि मरण॥ ७४६॥

पांडुरोगें आंग सुटलें। तें तयाचि नांवे खुंटलें।
तैसें नेणे भुललें। आहारनिद्रा॥ ७४७॥

सन्मुख शूला। धांवतया पायें चपळा।
प्रतिपदीं ये जवळा। मृत्यु जेवीं॥ ७४८॥

तेवीं देहा जंव जंव वाढु। जंव जंव दिवसांचा पवाडु।
जंव जंव सुरवाडु। भोगांचा हा॥ ७४९॥

तंव तंव अधिकाधिकें। मरण आयुष्यातें जिंके।
मीठ जैसें उदकें। घांसिजत असे॥ ७५०॥

तैसें जीवित जाये। तयास्तव काळु पाहे।
हें हातोहातींचें नव्हे। ठाउकें जया॥ ७५१॥

किंबहुना पांडवा। हा आंगींचा मृत्यु नित्य नवा।
न देखे जो मावा। विषयांचिया ॥ ७५२॥

तो अज्ञानदेशींचा रावो। या बोला महाबाहो।
न पडे गा ठावो। आणिकांचा॥ ७५३॥

पैं जीविताचेनि सुखें। जैसा कां मृत्यु न देखे।
तैसाचि तारुण्यतोषें। जरा न गणी॥ ७५४॥

कडाडीं लोटला गाडा। शिखरौनि सुटला धोंडा।
तैसा न देखे जो पुढां। वृद्धाप्य आहे॥ ७५५॥

कां आडवोहळा पाणी आलें। जैसें म्हैसयांचें झुंज मातलें।
तैसें तारुण्याचे चढलें। भुररे जया॥ ७५६॥

पुष्टि लागे विघरों। कांति पाहे निसरों।
माथा आदरी शिरों। बागी बळ॥ ७५७॥

दाढी साउळ धरी। मान हालौनि वारी।
तरी जो करी। प्रियेचा पैसु॥ ७५८॥

पुढील उरीं आदळे। तंव न देखे जेवीं आंधळें।
कां डोळ्यावरलें निगळें। आळशी तोषे॥ ७५९॥

तैसें तरुणपण आजिचें। भोगितां वृद्धाप्य पाहेचें।
न देखे तोचि साचें। अज्ञानु गा॥ ७६०॥

देखे अक्षमें कुब्जें। कीं विटावूं लागे फुंजें।
परि न म्हणे पाहे माझें। हेंचि भवे॥ ७६१॥

आणि आंगीं वृद्धतेची। संज्ञा ये मरणाची।
परि जया तारुण्याची। भुली न फिटे॥ ७६२॥

तो अज्ञानाचें घर। हें साचचि घे उत्तर।
तेवींचि परियेसीं थोर। चिन्हें आणिक॥ ७६३॥

तरी वाघाचिये अडवे। चरोनि एक वेळ आला दैवे।
तेणें विश्वासें पुढती धांवे। वसू जैसा॥ ७६४॥

कां सर्पघराआंतु। अवचटें ठेवा आणिला स्वस्थु।
येतुलियासाठी निश्चितु। नास्तिक होय॥ ७६५॥

तैसेनि अवचटें हें। एक दोनी वेळां लाहे।
एथ रोग एक आहे। हें मानीना जो॥ ७६६॥

वैरिया नीद आली। आतां द्वंद्वं माझीं सरलीं।
हें मानी तो सपिलीं। मुकला जेवीं॥ ७६७॥

तैसी आहारनिद्रेची उजरी। रोग निर्वातु जोंवरी।
तंव जो न करी। व्याधीचिंता॥ ७६८॥

आणि स्त्रीपुत्रादिमेळें। संपत्ति जंव जंव फळे।
तेणें रजें डोळे। जाती जयाचे॥ ७६९॥

सवळेचि वियोगु पडेल। विळोनी विपत्ति येईल।
हें दुःख पुढील। देखेना जो॥ ७७०॥

तो अज्ञान गा पांडवा। आणि तोही तोचि जाणावा।
जो इंद्रियें अव्हासवा। चारी एथ॥ ७७१॥

वयसेचेनि उवायें। संपत्तीचेनि सावायें।
सेव्यासेव्य जाये। सरकटितु॥ ७७२॥

न करावे तें करी। असंभाव्य मनीं धरी।
चिंतू नये तें विचारी। जयाची मती॥ ७७३॥

रिघे जेथ न रिघावें। मागे जें न घ्यावें।
स्पर्शे जेथ न लागावें। आंग मन॥ ७७४॥

न वचावें तेथ जाये। न पाहावें तें जो पाहे।
न खावें तें खाये। तेवींचि तोषे॥ ७७५॥

न धरावा तो संगु। न लगावें तेथ लागु।
ना चरावा तो मार्गु। आचरे जो॥ ७७६॥

नायकावें तें आइके। न बोलावें तें बके।
परि दोष होईल हें न देखे। प्रवर्ततां॥ ७७७॥

अंगा मनासि रुची यावें। येतुलेनि कृत्याकृत्य नाठवे।
जो करणेयाचेनि नांवें। भलतेंचि करी॥ ७७८॥

परि पाप मज होईल। कां नरकयातना येईल।
हें कांहींचि पुढील। देखेना जो॥ ७७९ ॥

तयाचेनि आंगलगें। अज्ञान जगीं दाटुगें।
जें सज्ञानाही संगें। झोंबों सके॥ ७८० ॥

असो हें आइक। अज्ञान चिन्हें आणिक।
जेणें तुज सम्यक्। जाणवे तें॥ ७८१ ॥

तरी जयाची प्रीति पुरी। गुंतली देखसी घरीं।
नवगंधकेसरीं। भ्रमरी जैशी॥ ७८२ ॥

साकरेचिया राशी। बैसली नुडे माशी।
तैसेनि स्त्रीचित्त आवेशी। जयाचें मन॥ ७८३ ॥

ठेला बेडुक कुंडीं। मशक गुंतला शेंबुडीं।
जैसा ढोरु सुबुडबुडीं। रुतला पंकीं॥ ७८४ ॥

तैसें घरींहूनि निघणें। नाहीं जीवितें मरणें।
जया साप होऊनि असणें। भाटीं तिये॥ ७८५ ॥

प्रियोत्तमाचियां कंठीं। प्रमदा घे आठी।
तैशी जीवेंसी कोंपटी। धरूनि ठाके॥ ७८६ ॥

मधुरसोद्देशें। मधुकर जचे जैसें।
गृहसंगोपन तैसें। करी जो गा॥ ७८७ ॥

म्हातारपणीं जालें। माणिक एक विपायिलें।
तयाचें कां जेतुलें। मातापितरां॥ ७८८ ॥

तेतुलेनि पाडें पार्था। घरीं जया प्रेम आस्था।
आणि स्त्रीवांचूनि सर्वथा। जाणेना जो॥ ७८९ ॥

महापुरुषांचें चित्त। जालिया वस्तुगत।
ठाके व्यवहारजात। जयापरी॥ ७९० ॥

तैसा स्त्रीदेहीं जो जीवें। पडोनिया सर्वभावें।
कोण मी काय करावें। काहीं नेणे॥ ७९१ ॥

हानि लाज न देखे। परापवादु नाइके।
जयाचीं इंद्रियें एकमुखें। स्त्रिया केलीं॥ ७९२ ॥

चित्त आराधी स्त्रीयेचें। स्त्रीयेचेनि छंदें नाचे।
माकड गारुडियाचें। जैसें होय॥ ७९३ ॥

आपणपेंही शिणवी। इष्टमित्र दुरावी।
मग कवडाचि वाढवी। लोभी जैसा॥ ७९४ ॥

तैसा दानपुण्यें खांची। गोत्रकुटुंबा वंची।
परि गारी भरी स्त्रियेची। उणी हों नेदी॥ ७९५ ॥

पूजितीं दैवतें जोगवी। गुरूतें बोले झकवी।
मायबापां दावी। निदारपण॥ ७९६ ॥

स्त्रियेचियां तरी विखीं। भोगुसंपत्ति अनेकीं।
आणी वस्तु निकी। जे जे देखे॥ ७९७ ॥

प्रेमाथिलेनि भक्तें। जैसेनि भजिजे कुळदैवतें।
तैसा एकाग्रचित्तें। स्त्री जो उपासी॥ ७९८ ॥

साच आणि चोख। तें स्त्रियेसीचि अशेख।
येरांविषयीं जोगावणूक। तेही नाहीं॥ ७९९ ॥

इयेतें हन कोणी देखैल। इयेसी वेखासें जाईल।
तरि युगचि बुडैल। ऐसें जया॥ ८०० ॥

नायटेयां भेण। न मोडिजे नागांची आण।
तैसी पाळी उणखुण। स्त्रीयेची जो॥ ८०१ ॥

किंबहुना धनंजया। स्त्रीचि सर्वस्व जया।
आणि तियेचियां जालियां। लागीं प्रेम॥ ८०२ ॥

आणिकही जें समस्त। तेथिंचें संपत्तिजात।
तें जीवाहूनि आप्त। मानी जो गा॥ ८०३ ॥

तो अज्ञानासी मूळ। अज्ञाना तेणें बळ।
हें असो केवळ। तो तेंचि रूप॥ ८०४ ॥

आणि मातलिया सागरीं। मोकलिलिया तरी।
लाटांचियां येरझारीं। आंदोळे जेवीं॥ ८०५ ॥

तेवीं प्रिय वस्तु पावे। आणि सुखें जो उंचावे।
तैसाचि अप्रियासवें। तळवटु घे॥ ८०६ ॥

ऐसेनि जयाचियां चित्तीं। वैषम्यसाम्याची वोखती।
वाहे तो महामती। अज्ञान गा॥ ८०७॥

आणि माझां ठायीं भक्ती। फळालागीं जया आर्ती।
धनोद्देशें विरक्ती। नटणें जेवीं॥ ८०८॥

कां कांताचियां मानसी। रिगोनि स्वैरिणी जैसी।
राहाटे जारेंसीं। जावयालागीं॥ ८०९॥

तैसा मातें किरीटी। भजती गा पाउटी।
करूनि जो दिठी। विषो सूये॥ ८१०॥

आणि भजिनलियासवें। तोचि विषो जरी न पावे।
तरी सांडी म्हणे आघवें। टवाळ हें॥ ८११॥

कुणबट कुळवाडी। तैसा आन आन देव मांडी।
आदिलाची परवडी। वरी तया॥ ८१२॥

तया गुरुमार्गा टेकें। जयाचा सुगरवा देखे।
तरी तयाचा मंत्र शिके। येरु नेघे॥ ८१३॥

प्राणिजातेंसीं निष्ठुरु। स्थावरीं बहु भरु।
तेवींचि नाहीं एकसरु। निर्वाहो जया॥ ८१४॥

माझी मूर्ति निफजवी। ते घराचियां कोनीं बैसवी।
आपण देवो देवी। यात्रे जाय॥ ८१५॥

नित्य आराधन माझें। काजीं कुळदेवता भजे।
पर्वविशेषें कीजे। पूजा आना॥ ८१६॥

माझें अधिष्ठान घरीं। आणि वोवसे आनाचे करी।
पितृकार्यावसरीं। पितरांचा होय॥ ८१७॥

एकादशीचियां दिवशीं। जेतुला पाडु आम्हांसी।
तेतुलाचि नागांसी। पंचमीचियां दिवशीं॥ ८१८॥

चौथ मोटकी पाहे। आणि गणेशाचाचि होये।
चावदसी म्हणे माये। तुझाचि वो दुर्गे॥ ८१९॥

नित्य नैमित्तिकें कर्में सांडी। मग बैसे नवचंडी।
आदित्यवारीं वाढी। भैरवां पात्रीं॥ ८२०॥

पाठीं सोमवार पावे। आणि बेलेसीं लिंगा धांवे।
ऐसा एकलाचि आघवे। जोगावी जो॥ ८२१॥

ऐसा अखंड भजन करी। उगा नसे क्षणभरी।
अवघेनि गांवद्वारीं। अहेव जैसी॥ ८२२॥

तैसेनि जो गा भक्तु। सैरा देखसी धांवतु।
जाण अज्ञानाचा मूर्तु। अवतार तो॥ ८२३॥

आणि एकांतें चोखटें। तपोवनें तीर्थे तटें।
देखोनि जो गा विटे। तोहि तोचि॥ ८२४॥

जया जनपदीं सुख। गजबजेचें कवतिक।
वानूं आवडे लौकिक। तोहि तोचि॥ ८२५॥

आणि आत्मा गोचरु होये। ऐसी जे विद्या आहे।
ते आईकोनि डौर वाहे। विद्वांसु जो॥ ८२६॥

उपनिषदांकडे न वचे। योगशास्त्र न रुचे।
अध्यात्मज्ञानीं जयाचें। मनचि नाहीं॥ ८२७॥

आत्मचर्या एकी आथी। ऐसिये बुद्धीची भिंती।
पाडूनि जयाची मती। वोढाळ जाहली॥ ८२८॥

कर्मकांड तरी जाणे। मुखोद्गत पुराणें।
ज्योतिषीं तो म्हणे। तैसेंचि होय॥ ८२९॥

शिल्पीं अति निपुण। सूपकर्मीही प्रवीण।
विधि आथर्वण। हातीं आथी॥ ८३०॥

कोकीं नाहीं ठेलें। भारत तरी म्हणितलें।
आगम आफाविले। मूर्त होती॥ ८३१॥

नीतिजात सुझे। वैद्यकही बुझे।
काव्यनाटकीं दुजें। चतुर नाहीं॥ ८३२॥

स्मृतींची चर्चा। दंशु जाणे गारुडियाचा।
निघंटु प्रज्ञेचा। पाइकी करी॥ ८३३॥

व्याकरणीं चोखडा। तर्कीं अतिगाढा।
परि एक अध्यात्मज्ञानीं फुडा। जात्यंधु जो॥ ८३४॥

तें एकवांचूनि आघवां शास्त्रीं। सिद्धांतनिर्माणधात्री।
परि जळो तें मूळनक्षत्रीं। न पाहें गा॥ ८३५॥

मोराचियां आंगीं अशेषें। पिसें आहाति डोळसें।
परी एकली दिठी नसे। तैसें तें गा॥ ८३६॥

जरी परमाणूएवढें। संजीवनीमूळ जोडे।
तरी बहु काय गाडे। भरणें येरें॥ ८३७॥

आयुष्येंवीण लक्षणें। सिसेंवीण अळंकरणें।
वोहरेंवीण वाधावणें। तो विटंबु गा॥ ८३८॥

तैसें शास्त्रजात जाण। आघवेंचि अप्रमाण।
अध्यात्मज्ञानेंविण। एकलेनी॥ ८३९॥

यालागीं अर्जुना पाहीं। अध्यात्मज्ञानाचियां ठायीं।
जया नित्यबोधु नाहीं। शास्त्रमूढा॥ ८४०॥

तया शरीर जें जालें। तें अज्ञानाचें बीं विरुढलें।
तयाचें व्युत्पत्तित्व गेलें। अज्ञानवेलीं॥ ८४१॥

तो जें जें बोले। तें अज्ञानचि फुललें।
तयाचें पुण्य जें फळलें। तें अज्ञानचि गा॥ ८४२॥

आणि अध्यात्मज्ञान काहीं। जेणें मानिलेंचि नाहीं।
तो ज्ञानार्थु न देखे काई। हें बोलावें असे॥ ८४३॥

ऐलीचि थडी न पावतां। पळे जो माघौता।
तया पैलद्वीपीची वार्ता। काय होय॥ ८४४॥

कां दारवंठांचि जयाचें। शीर रोंविलें खांचे।
तो केवीं परिवरींचें। ठेविलें देखे॥ ८४५॥

तेवीं अध्यात्मज्ञानीं जया। अनोळख धनंजया।
तया ज्ञानार्थु देखावया। विषो काई॥ ८४६॥

म्हणोनि आतां विशेषें। तो ज्ञानाचें तत्त्व न देखे।
हें सांगावें आंखेंलेखें। न लगे तुज॥ ८४७॥

जेव्हां सगर्भे वाढिलें। तेव्हांचि पोटींचें धालें।
जैसें मागिलें पदें बोलिले। हेंचि होय॥ ८४८॥

वांचूनियां वेगळें। रूप करणें हें न मिळे।
घेई अवंतिलें आंधळें। तें दुजेनसीं ये॥ ८४९॥

एवं इये उपरतीं। ज्ञानचिन्हें मागुतीं।
अमानित्वादि प्रभृती। वाखाणिलीं॥ ८५०॥

जे ज्ञानपदें अठरा। केलियां येरी मोहरां।
अज्ञान या आकारा। सहजें येती॥ ८५१॥

मागां श्लोकाचेनि अर्धार्धें। ऐसें सांगितलें श्रीमुकुंदें।
ना उफराटीं इयें ज्ञानपदें। तेंचि अज्ञान॥ ८५२॥

म्हणोनि इया वाहणी। केली म्यां उपलवणी।
वांचूनि दूधा मेळऊनि पाणी। फार कीजे काई॥ ८५३॥

तैसें जी न बडबडी। पदाची कोर न सांडी।
परि मूळध्वनींचिये वाढी। निमित्त जाहलों॥ ८५४॥

तंव श्रोते म्हणती राहें। कें परिहारा ठावो आहे।
बिहिसी कां वाये। कविपोषका॥ ८५५॥

तूतें श्रीमुरारी। म्हणितलें प्रकट करीं।
जे अभिप्राय गव्हरीं। झांकिले आम्हीं॥ ८५६॥

तें देवाचें मनोगत। दावित आहासी तूं मूर्त।
हेंही म्हणतां चित्त। दाटैल तुझें॥ ८५७॥

म्हणोनि असो हें न बोलों। परि साविया गा तोषलों।
जे ज्ञानतरिये मेळविलों। श्रवणसुखाचिये॥ ८५८॥

आतां इयावरी। जे तो श्रीहरी।
बोलिला तें करीं। कथन वेगां॥ ८५९॥

इया संतवाक्यासरिसें। म्हणितलें निवृत्तिदासें।
जी अवधारा तरी ऐसें। बोलिलें देवें॥ ८६०॥

म्हणती तुवां पांडवा। हा चिन्हसमुच्चयो आघवा।
आयकिला तो जाणावा। अज्ञानभागु॥ ८६१॥

इया अज्ञान विभागा। पाठी देऊनि पैं गा।
ज्ञानविखीं चांगा। दृढा होइजे॥ ८६२॥

मग निर्वाळिलेनि ज्ञानें। ज्ञेय भेटेल मनें।
तें जाणावया अर्जुनें। आस केली॥ ८६३॥

तंव सर्वज्ञांचा रावो। म्हणे जाणोनि तयाचा भावो।
परिसें ज्ञेयाचा अभिप्रावो। सांगों आतां॥ ८६४॥

ज्ञेयं यत्तत् प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वाऽमृतमश्नुते॥
अनादिमत्परं ब्रह्म न सत्तन्नासदुच्यते॥ १३.१२॥

तरि ज्ञेय ऐसें म्हणणें। वस्तूतें येणेंचि कारणें।
जें ज्ञानेंवांचूनि कवणें। उपायें नये॥ ८६५॥

आणि जाणितलेयावरौतें। कांहीं करणें नाहीं जेथें।
जाणणेंचि तन्मयातें। आणी जयाचें॥ ८६६॥

जें जाणितलेयाचिसाठीं। संसाराची काढूनियां कांटी।
जिरोनि जाइजे पोटीं। नित्यानंदाचियां॥ ८६७॥
स्मल्ल्स्कप
तें ज्ञेय गा ऐसें। आदि जया नसे।
परब्रह्म आपैसें। नांव जया॥ ८६८॥

जें नाहीं म्हणों जाइजे। तंव विश्वाकारें देखिजे।
आणि विश्वचि ऐसें म्हणिजे। तरि हे माया॥ ८६९॥

रूप वर्ण व्यक्ती। नाहीं दृश्य द्रष्टा स्थिती।
तरि कोणें कैसें आथी। म्हणावें पां॥ ८७०॥

आणि साचचि जरी नाहीं। तरि महदादिक कोणें ठाईं।
स्फुरत कैचें काई। तेणेंवीण असे॥ ८७१॥

म्हणोनि आथी नाथी हे बोली। जें देखोनि मुकी जाहली।
विचारासीं मोडली। वाट जेथें॥ ८७२॥

जैसी भांडघटशरावीं। तदाकारें असे पृथ्वी।
तैसें सर्व होऊनियां सर्वीं। असे जे वस्तु॥ ८७३॥

सर्वतः पाणिपादं तत् सर्वतोऽक्षिशिरोमुखम्॥
सर्वतः श्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति॥ १३.१३॥

आघवांचि देशीं काळीं। नव्हतां देशकाळांवेगळी।
जे क्रिया स्थूळास्थूळीं। तेचि हात जयाचे॥ ८७४॥

तयातें याकारणें। विश्वबाहू ऐसें म्हणणें।
जें सर्वचि सर्वपणें। सर्वदा करी॥ ८७५॥

आणि समस्तांही ठायां। एके काळीं धनंजया।
आलें असे म्हणोनि जया। विश्वांघ्री नांव॥ ८७६॥

पैं सवितया आंग डोळे। नाहींत वेगवेगळे।
तैसें सर्वद्रष्टें सकळें। स्वरूपें जें॥ ८७७॥

म्हणोनि विश्वतश्चक्षु। हा अचक्षूचियां ठायीं पक्षु।
बोलावया दक्षु। जाहला वेदु॥ ८७८॥

जें सर्वांचिया शिरावरी। जे नित्य नांदे सर्वांपरी।
ऐसिये स्थितीवरी। विश्वमूर्धा म्हणिपे॥ ८७९॥

पैं गा मूर्ति तेंचि मुख। हुताशनीं जैसें देख।
तैसें सर्वपणें अशेख। भोक्तें जें॥ ८८०॥

यालागीं तया पार्था। विश्वतोमुख हे व्यवस्था।
आली वाक्प्रथा। श्रुतीचिया॥ ८८१॥

आणि वस्तुमात्रीं गगन। जैसें असे संलग्न।
तैसें शब्दजातीं कान। सर्वत्र जया॥ ८८२॥

म्हणोनि आम्ही तयातें। म्हणों सर्वत्र आइकतें।
एवं जें सर्वांतें। आवरूनि असे॥ ८८३॥

एऱ्हवीं तरी महामती। विश्वतश्चक्षु इया श्रुती।
तयाचिये व्याप्ती। रूप केलें॥ ८८४॥

वांचूनि हस्त नेत्र पाये। हे भाष तेथ कें आहे।
सर्व शून्यत्वाचा न साहे। निष्कर्षु जें॥ ८८५॥

पैं कल्लोळातें कल्लोळें। ग्रसिजत असे ऐसें कळे।
परि ग्रसितें ग्रासावेगळें। आहे काई॥ ८८६॥

तैसें साचचि जें एक। तेथ कें व्याप्यव्यापक।
परि बोलावया नावेक। करावें लागे॥ ८८७॥

पैं शून्य जैं दावावें जाहलें। तैं बिंदुलें एक पाहिजे केलें।
तैसें अद्वैत सांगावें बोलें। तैं द्वैत कीजे॥ ८८८॥

एऱ्हवीं तरी पार्था। गुरुशिष्यसत्पथा।
आडळु पडे सर्वथा। बोल खुंटे॥ ८८९॥

म्हणोनि गा श्रुती। द्वैतभावें अद्वैतीं।
निरूपणाची वाहती। वाट केली॥ ८९०॥

तेंचि आतां अवधारीं। इये नेत्रगोचरे आकारीं।
तें ज्ञेय जियापरी। व्यापक असे॥ ८९१॥

सर्वेन्द्रियगुणाभासं सर्वेन्द्रियविवर्जितम्॥
असक्तं सर्वभृच्चैव निर्गुणं गुणभोक्तृ च॥ १३.१४॥

तरी तें गा किरीटी ऐसें। अवकाशीं आकाश जैसें।
पटीं पट्ट होऊनि असे। तंतु जेवीं॥ ८९२॥

उदक होऊनि उदकीं। रसु जैसा अवलोकीं।
दीपपणें दीपकीं। तेज जैसें॥ ८९३॥

कर्पूरत्वें कापुरीं। सौरभ्य असे जयापरी।
शरीर होऊनि शरीरीं। कर्म जेवीं॥ ८९४॥

किंबहुना जैसें पांडवा। सोनेंचि सोनयाचा रवा।
तैसें जें या सर्वा। सर्वांगीं असे॥ ८९५॥

परी असे रवेपणामाजिवडे। तंव रवा ऐसें आवडे।
वांचूनि सोनें सांगडें। सोनया जेवीं॥ ८९६॥

पैं गा वोघुचि वांकुडा। परि पाणी उजू सुहाडा।
वन्हि आला लोखंडा। लोह नव्हे कीं॥ ८९७॥

घटाकारें वेंटाळें। तेथ नभ गमे वाटोळें।
मठीं तरी चौफळें। आयें दिसे॥ ८९८॥

परि ते अवकाश जैसे। नोहेजतीचि कां आकाशें।
जें विकार होऊनि तैसें। विकारी नोहे॥ ८९९॥

मन मुख्य इंद्रियां। सत्त्वादि गुणा ययां।
सारिखें ऐसें धनंजया। आवडे कीर॥ ९००॥

परि पैं गुळाची गोडी। नोहे बांधेया सांगडी।
तैसीं गुण इंद्रियें फुडीं। नाहीं तेथ॥ ९०१॥

अगा क्षीराचिये दशे। घृत क्षीराकारें असे।
परि क्षीरचि नोहे जैसें। कपिध्वजा॥ ९०२॥

तैसें जें इये विकारीं। विकार नोहे अवधारीं।
पैं आकारा नाम भोंवरी। येर सोने तें सोनें॥ ९०३॥

इया उघड मऱ्हाटिया। तें वेगळेपण धनंजया।
जाण गुणेंद्रियां। पासोनियां॥ ९०४॥

नामरूपसंबंधु। जातिक्रियाभेदु।
हा आकारासीच प्रवादु। वस्तूसि नाहीं॥ ९०५॥

तें गुण नव्हे कहीं। गुणा तया संबंधु नाहीं।
तरि तयाचियांचि ठायीं। आभासती॥ ९०६॥

येतुलेयासाठीं। संभ्रांताचियां पोटीं।
ऐसें जाय किरीटी। ना हेंचि धरी॥ ९०७॥

तरि तें गा धरणें ऐसें। अभ्रातें जेवीं आकाशें।
कां प्रतिवदन जैसें। आरसेनि॥ ९०८॥

ना तरी सूर्य प्रतिमंडळ। जैसेनि धरी सलिल।
कां रश्मिकरीं मृगजळ। धरिजे जेवीं॥ ९०९॥

तैसें गा संबंधेंवीण। यया सर्वांतें धरी निर्गुण।
परि तें वायां जाण। मित्यादृष्टी॥ ९१०॥

आणि या परी निर्गुणें। गुणातें भोगणें।
रंका राज्य करणें। स्वप्नीं जैसें॥ ९११॥

म्हणोनि गुणाचा संगु। अथवा गुणभोगु।
हा निर्गुणीं लागु। बोलों नये॥ ९१२॥

बहिरन्तश्च भूतानाम् अचरं चरमेव च॥
सूक्ष्मत्वात्तदविज्ञेयं दूरस्थं चान्तिके च तत॥ १३.१५॥

जें चराचर भूतां। माजीं असे पांडुसुता।
ना ना वन्हीं उष्णता। अभेदे जैसी॥ ९१३॥

तैसेनि अविनाशभावें। जें सूक्ष्मदशे आघवें।
व्यापूनि असे तें जाणावें। ज्ञेय एथ॥ ९१४॥

जें एक आंतु बाहेरी। जें एक जवळ दुरी।
जें एकवांचूनि परी। दुजी नाहीं॥ ९१५॥

क्षीरसागरींची गोडी। माजीं बहु थडिये थोडी।
हें नाहीं तया परवडी पूर्ण जें गा॥ ९१६॥

स्वेदजप्रभृती। वेगळालां भूतीं।
जयाचिये अनुस्यूती। खोमणें नाहीं॥ ९१७॥

पैं श्रोतेमुखटिळका। घटसहस्रा अनेकांस।
माजीं बिंबोनि चंद्रिका। न भेदे जेवीं॥ ९१८॥

ना ना लवणकणाचिये राशी। क्षारता एकचि जैसी।
कां कोडीं एकीं उसीं। एकचि गोडी॥ ९१९॥

अविभक्तं च भूतेषु विभक्तमिव च स्थितम्॥
भूतभर्तृ च तज्ज्ञेयं ग्रसिष्णु प्रभविष्णु च॥ १३.१६॥

तैसे अनेकीं भूतजातीं। जें आहे एकी व्याप्ती।
विश्वकार्या सुमती। कारण जें गा॥ ९२०॥

म्हणोनि हा भूताकारु। जेथूनि तेंचि तया आधारु।
कल्लोळ सागरु। जियापरी॥ ९२१॥

बाल्यादि तिन्हीं वयसीं। काया एकचि जैसी।
तैसें आदिस्थितिग्रासीं। अखंड जें॥ ९२२॥

सायंप्रातर्मध्याह्न। होतां जातां दिनमान।
जैसें कां गगन। पालटेना॥ ९२३॥

अगा सृष्टीवेळे प्रियोत्तमा। जया नांव म्हणती ब्रह्मा।
व्याप्ति जें विष्णुनामा। पात्र जाहलें॥ ९२४॥

मग आकारु हा हारपे। तेव्हां रुद्र जें म्हणिपे।
तेंही गुणत्रय जेव्हां लोपे। तैं जें शून्य॥ ९२५॥

नभाचें शून्यत्व गिळून। गुणत्रयातें नुरवून।
तें शून्य तें महाशून्य। श्रुतिवचनसंमत॥ ९२६॥

ज्योतिषामपि तज्ज्योतिः तमसः परमुच्यते॥
ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य विष्ठितम्॥ १३.१७॥

जें अग्नीचें दीपन। जें चंद्राचें जीवन।
सूर्याचे नयन। देखती जेणें॥ ९२७॥

जयाचेनि उजियेडें। तारांगण उघडें।
महातेज सुरवाडें। जेणें राहाटे॥ ९२८॥

जें आदीची आदी। जें वृद्धीची वृद्धी।
बुद्धीची बुद्धी। जीवाचा जीवु॥ ९२९॥

जें मनाचें मन। जें नेत्राचे नयन।
कनाचे कान। वाचेची वाचा॥ ९३०॥

जें प्राणाचा प्राण। जें गतीचे चरण।
क्रियेचें कर्तेपण। जयाचेनि॥ ९३१॥

आकारु जेणें आकारे। विस्तारु जेणें विस्तारे।
संहारु जेणें संहारे। पांडुकुमरा॥ ९३२॥

जें मेदिनीची मेदिनी। जें पाणी पिउनि असे पाणी।
तेजा दिवेलावणी। जेणें तेजें॥ ९३३॥

जें वायूचा श्वासोश्वासु। जें गगनाचा अवकाशु।
हें असो आघवाचि आभासु। आभासे जेणें॥ ९३४॥

किंबहुना पांडवा। जें आघवेंचि असे आघवा।
जेथ नाहीं रिगावा। द्वैतभावासी॥ ९३५॥

जें देखिलियाचि सवें। दृश्य द्रष्टा हें आघवें।
एकवाट कालवे। सामरस्यें॥ ९३६॥

मग तेंचि होय ज्ञान। ज्ञाता ज्ञेय हन।
ज्ञानें गमिजे स्थान। तेंहि तेंचि॥ ९३७॥

जैसें सरलियां लेख। आंख होती एक।
तैसें साध्यसाधनादिक। ऐक्यासि ये॥ ९३८॥

अर्जुना जिये ठायीं। न सरे द्वैताची वही।
हें असो जें हृदयीं। सर्वांचियां असे॥ ९३९॥

इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेयं चोक्तं समासतः॥
मद्भक्त एतद्विज्ञाय मद्भावायोपपद्यते॥ १३.१८॥

एवं हें तुजपुढां। आदीं क्षेत्र सुहाडा।
दाविलें फाडोवाडां। विवंचुनी॥ ९४०॥

तैसेंचि क्षेत्रापाठीं। जैसेनि देखसी दिठी।
तैसें ज्ञानही किरीटी। सांगितलें॥ ९४१॥

अज्ञानाहि कौतुकें। रूप केलें निकें।
जंव आयणी तुझी टेंके। पुरे म्हणे॥ ९४२॥

आणि आतां हें रोकडें। उपपत्तीचेंनि पवाडे।
निरूपिलें उघडें। ज्ञेय पैं गा॥ ९४३॥

हे आघवीच विवंचना। बुद्धि भरोनि अर्जुना।
मत्सिद्धि भावना। माझिया येती॥ ९४४॥

देहादिपरिग्रहीं। संन्यासु करूनियां जिहीं।
जीवु माझां ठायीं। वृत्तिकु केला॥ ९४५॥

ते मातें किरीटी। हेंचि जाणोनियां शेवटीं।
आपणपयां साटोवाटीं। मीचि होती॥ ९४६॥

मीचि होती परी। हे मुख्य गा अवधारीं।
सोहोपी सर्वांपरी। रचिली आम्हीं॥ ९४७॥

कडां पायरी कीजे। निराळी माचु बांधिजे।
अथावीं सुइजे। तरी जैसी॥ ९४८॥

एऱ्हवीं अवघेंचि आत्मा। हें सांगों जरी वीरोत्तमा।
तरी तुझिया मनोधर्मा। मिळेल ना॥ ९४९॥

म्हणोनि एकचि संचलें। चतुर्धा आम्हीं केलें।
जें अदळपण देखिलें। तुझिये प्रज्ञे॥ ९५०॥

पैं बाळ जैं जेवविजे। तैं घांसु एक विसा ठायीं कीजे।
तैसें एकचि हें चतुर्व्याजें। कथिलें आम्हीं॥ ९५१॥

एक क्षेत्र एक ज्ञान। एक ज्ञेय एक अज्ञान।
हे भाग केले अवधान। जाणोनि तुझें॥ ९५२॥

आणि ऐसेनिही पार्था। जरी हा अभिप्रावो तुज हाता।
न ये तरी हे व्यवस्था। एक वेळ सांगों॥ ९५३॥

आतां चौ ठायीं न करूं। एकही म्हणोनि न सरूं।
आत्मानात्मया धरूं। सरिसाचि पाडु॥ ९५४॥

परि तुवां येतुलें करावें। मागौनि तें आम्हां देयावें।
जे कानाचि नांव ठेवावें। आपण पैं गा॥ ९५५॥

या श्रीकृष्णाचियाबोला। पार्थु रोमांचितु जाहला।
तेथ देवो म्हणती भला। उचंबळे ना॥ ९५६॥

ऐसेनि तो येतां वेगु। धरूनि म्हणे श्रीरंगु।
प्रकृतिपुरुषविभागु। परिसें सांगों॥ ९५७॥

प्रकृतिं पुरुषं चैव विद्धयनादी उभावपि॥
विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसंभवान्॥ १३.१९॥

जया मार्गातें जगीं। सांख्य म्हणती योगी।
जयाचिये भाटिवेलागीं। मी कपिल जाहलों॥ ९५८॥

तो आइक निर्दोखु। प्रकृतिपुरुषविवेकु।
म्हणे आदिपुरुखु। अर्जुनातें॥ ९५९॥

तरी पुरुष अनादि आथी। आणि तैंचि लागोनि प्रकृति।
संवसरिसी दिवोराती। दोनी जैसी॥ ९६०॥

कां रूप नोहे वायां। परी रूपा लागली छाया।
निकणु वाढे धनंजया। कणेंसि कोंडा॥ ९६१॥

तैसीं जाण जवटें। दोन्ही इयें एकवाटे।
प्रकृतिपुरुष प्रगटें। अनादिसिद्धें॥ ९६२॥

पैं क्षेत्र येणें नांवें। जें सांगितलें आघवें।
तेंचि एक जाणावें। प्रकृति हे गा॥ ९६३॥

आणि क्षेत्रज्ञु ऐसें। जयातें म्हणितलें असे।
तो पुरुष हें अनारिसे। न बोलों घेई॥ ९६४॥

इयें आनानें नांवें। परि निरूप्य आन नोहे।
हें लक्षण न चुकावें। पुढतपुढतीं॥ ९६५॥

तरी केवळ जे सत्ता। तो पुरुष गा पांडुसुता।
प्रकृति तें समस्ता। क्रिया नांव॥ ९६६॥

बुद्धि इंद्रियें अंतःकरण। इत्यादि विकारभरण।
आणि ते तीन्ही गुण। सत्त्वादिक॥ ९६७॥

हा आघवाचि मेळावा। प्रकृति जाहला जाणावा।
हेचि हेतु संभवा। कर्माचिया॥ ९६८॥

कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते॥
पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुरुच्यते॥ १३.२०॥

तेथ इच्छा आणि बुद्धी। घडवी अहंकारेसीं आधीं।
मग तिया लाविती वेधीं। कारणाचियां॥ ९६९॥

तेंचि कारण ठाकावया। जें सूत्र धरणें उपाया।
तया नांव धनंजया। कार्य पैं गा॥ ९७०॥

आणि इच्छा मदाचियां थावीं। लागली मनातें उठवी।
तें इंद्रियें राहाटवी। हें कर्तृत्व पैं॥ ९७१॥

म्हणोनि तिन्ही या जाणा। कार्यकर्तृत्वकारणा।
प्रकृति मूळ हे राणा। सिद्धांचा म्हणे॥ ९७२॥

एवं तिहींचेनि समवायें। प्रकृति कर्मरूप होये।
परि जया गुणा वाढे त्राये। त्याचि सारिखी॥ ९७३॥

जें सत्त्वगुणें अधिष्ठिजे। तें सत्कर्म म्हणिजे।
रजोगुणें निपजे। मध्यम तें॥ ९७४॥

जें कां केवळें तमें। होती जियें कर्में।
निषिद्धें अधर्में। जाण तियें॥ ९७५॥

ऐसेनि संतासंतें। कर्में प्रकृतीस्तव होते।
तयापासोनि निर्वाळें तें। सुख दुःख गा॥ ९७६॥

असंतीं दुःख उपजे। सत्कर्मीं सुख निपजे।
तया दोहींचा बोलिजे। भोगु पुरुषा॥ ९७७॥

सुखदुःखें जंववरी। निफजती साचोकारीं।
तंव प्रकृति उद्यमु करी। पुरुषु भोगी॥ ९७८॥

प्रकृतिपुरुषांची कुळवाडी। सांगतां असंगडी।
जे आंबुली जोडी आंबुला खाय॥ ९७९॥

आंबुलया आंबुलिये। संगती ना सोये।
कीं आंबुली जग विये। चोज ऐकें॥ ९८०॥

पुरुषः प्रकृतिस्थो हि भुङ्क्ते प्रकृतिजान्गुणान्।
कारणं गुणसङ्गोऽस्य सदसद्योनिजन्मसु॥ १३.२१॥

जे अनंगु तो पेंधा। निकवढा नुसधा।
जीर्णु अतिवृद्धास्। पासोनि वृद्धु॥ ९८१॥

तया आडनांव पुरुषु। एऱ्हवीं स्त्री ना नपुंसकु।
किंबहुना एकु। निश्चयो नव्हें॥ ९८२॥

तो अचक्षु अश्रवणु। अहस्तु अचरणु।
रूप ना वर्णु। नाम आथी॥ ९८३॥

अर्जुना कांहींचि जेथ नाहीं। तो प्रकृतीचा भर्ता पाहीं।
कीं भोगणें ऐसेयाही। सुखदुःखाचें॥ ९८४॥

तो तरी अकर्ता। उदासु अभोक्ता।
परि इया पतिव्रता। भोगविजे॥ ९८५॥

जियेतें अळुमाळु। रूपागुणाचा चाळढाळु।
ते भलतैसाही खेळु। लेखा आणी॥ ९८६॥

मा इये प्रकृती तंव। गुणमयी हेंचि नांव।
किंबहुना सावेव। गुण तेचि हे॥ ९८७॥

हे प्रकृति क्षणीं नित्य नवी। रूपा गुणाचीच आघवी।
जडातेंही माजवी। इयेचा माजु॥ ९८८॥

नांवे इया प्रसिद्धें। स्नेहो इया स्निग्धें।
इंद्रियें प्रबुद्धें। इयेचेनि॥ ९८९॥

कायि मन हें नपुंसक। कीं ते हिंडवी तिन्ही लोक।
ऐसें ऐसें अलौकिक। करणें इयेचें॥ ९९०॥

हे भ्रमाचें महाद्वीप। व्याप्तीचेंचि रूप।
विकार उमप। इया केले॥ ९९१॥

हे कामाची मांडवी। हे मोहवनींची माधवी।
इये प्रसिद्धचि दैवी। माया हे नांव॥ ९९२॥

हे वाङ्मयाची वाढी। हे साकारपणाची जोडी।
प्रपंचाची धाडी। अभंग हे॥ ९९३॥

कळा एथुनि जालिया। विद्या इयेचिया केलिया।
इच्छा ज्ञान क्रिया। वियाली हे॥ ९९४॥

हे नादाची टांकसाळ। हे चमत्काराचें वेळाउळ।
किंबहुना सकळ। खेळु इयेचा॥ ९९५॥

जे उत्पत्ति प्रलयो होत। ते इयेचे सायंप्रात।
हें असो अद्भुत। मोहन हे॥ ९९६॥

हे अद्वयाचें दुसरें। हे निःसंगाचें सोयरें।
निराळेंसि घरें। नांदत असे॥ ९९७॥

इयेतें येतुलावरी। सौभाग्यव्याप्तीची थोरी।
म्हणोनि तया आवरी। अनावरातें॥ ९९८॥

तयाचियां तंव ठायीं। निपटूनि कांहींचि नाहीं।
कीं तया आघवेंहीं। आपणचि होय॥ ९९९॥

तया स्वयंभाची संभूती। तया अमूर्ताची मूर्ती।
आपण होय स्थिती। ठावो तया॥ १०००॥

तया अनार्ताची आर्ती। तया पूर्णाची तृप्ती।
तया अकुळाची जाती। गोत होय॥ १००१॥

निराकाराचा आकारु। तया निर्व्यापाराचा व्यापारु।
निरहंकाराचा अहंकारु। होऊनि ठाके॥ १००२॥

तया अचर्चाचें चिन्ह। तया अपाराचें मान।
तया अमनस्काचें मन बुद्धीही होय॥ १००३॥

तया अनामाचें नाम। तया अजाचें जन्म।
आपण होय कर्म। क्रिया तया॥ १००४॥

तया निर्गुणाचे गुण। तया अचरणाचे चरण।
तया अश्रवणाचे श्रवण। अचक्षूचे चक्षु॥ १००५॥

तया भावातीताचे भाव। तया निरवयवाचे अवयव।
किंबहुना होय सर्व। पुरुषाचें हे॥ १००६॥

ऐसेनि इया प्रकृती। आपुलिया सर्व व्याप्ती।
अविकारातें विकृती। माजीं कीजे॥ १००७॥

तेथ पुरुषत्व जें असे। तें ये इये प्रकृतिदशे।
चंद्रमा अंवसे। पडिला जैसा॥ १००८॥

विदळ बहु चोखा। मीनलिया वाला एका।
कसु होय पांचिका। जयापरी॥ १००९॥

कां साधूतें गोंधळी। संचारोनि सुये मैळी।
ना ना सुदिनाच्या आभाळीं। दुर्दिनु कीजे॥ १०१०॥

तेथ पय पशूचियां पोटीं। वन्हि जैसा काष्टीं।
गुंडूनि घेतला पटीं। रत्नदीपु॥ १०११॥

राजा पराधीनु जाहला। कां सिंहु रोगें रुंधला।
तैसा पुरुष प्रकृती आला। स्वतेजा मुके॥ १०१२॥

जागता नरु सहसा। निद्रा पाडूनि जैसा।
स्वप्नींचिया सोसा। वश्यु कीजे॥ १०१३॥

तैसें प्रकृतिजालेपणें। पुरुषा गुण भोगणें।
उदास अंतुरीगुणें। आतुडे जेवीं॥ १०१४॥

तैसें अजा नित्या होये। आंगीं जन्ममृत्यूचे घाये।
वाजती जैं लाहे। गुणसंगातें॥ १०१५॥

परि तें ऐसें पांडुसुता। तातलें लोह पिटितां।
जेवीं वन्हीसीचि घाता। बोलती तया॥ १०१६॥

कां आंदोळलिया उदक। प्रतिमा होय अनेक।
तें नानात्व म्हणती लोक। चंद्रीं जेवीं॥ १०१७॥

दर्पणाचिया जवळिका। दुजेपण जैसें ये मुखा।
कां कुंकुमें स्फटिका। लोहित्व ये॥ १०१८॥

तैसा गुणसंगमें। अजन्मा हा जन्मे।
पावतु ऐसा गमे। एऱ्हवीं नाहीं॥ १०१९॥

अधमोत्तमा योनी। यासि ऐसिया मानीं।
जैसा संन्यासी होय स्वप्नीं। अंत्यजादि जाती॥ १०२०॥

म्हणोनि केवळा पुरुषा। नाहीं होणें भोगणें देखा।
येथ गुणसंगुचि अशेखा। लागीं मूळ॥ १०२१॥

उपद्रष्टाऽनुमन्ता च भर्ता भोक्ता महेश्वरः॥
परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन् पुरुषः परः॥ १३.२२॥

हा प्रकृतिमाजीं उभा। परि जुई जैसा वोथंबा।
एया प्रकृती पृथ्वीनभा। तेतुला पाडु॥ १०२२॥

प्रकृतिसरितेचियां तटीं। मेरु होय हा किरीटी।
माजीं बिंबे परी लोटीं। लोटों नेणे॥ १०२३॥

प्रकृति होय जाये। हा तो असतुचि आहे।
म्हणोनि आब्रह्माचें होये। शासन हा॥ १०२४॥

प्रकृति येणें जिये। याचिया सत्ता जग विये।
इयालागीं इये। वरयतु हा॥ १०२५॥

अनंतें काळें किरीटी। जिया मिळती इया सृष्टी।
तिया रिगती ययाचियां पोटीं। कल्पांतसमयीं॥ १०२६॥

हा महद्ब्रह्मगोसावी। ब्रह्मगोलक लाघवी।
अपारपणें मवी। प्रपंचातें॥ १०२७॥

पैं या देहामाझारीं। परमात्मा ऐसी जे परी।
बोलिजे तें अवधारीं। ययातेंचि॥ १०२८॥

असा प्रकृतिपरौता। एक आथी पंडुसुता।
ऐसा प्रवादु तो तत्त्वता। पुरुषु हा पैं॥ १०२९॥

य एवं वेत्ति पुरुषं प्रकृतिं च गुणैः सह॥
सर्वथा वर्तमानोऽपि न स भूयोऽभिजायते॥ १३.२३॥

जो निखळपणें येणें। पुरुषातें यया जाणे।
आणि गुणाचें करणें। प्रकृतीचें तें॥ १०३०॥

हें रूप हे छाया। पैल जळ हे माया।
ऐसा निवाडु धनंजया। जेवीं कीजे॥ १०३१॥

तेणें पाडें अर्जुना। प्रकृतिपुरुषविवंचना।
जयाचिया मना। गोचर जाहली॥ १०३२॥

तो शरीराचेनि मेळें। करूं कां कर्में सकळें।
परि आकाश धुये न मैळे। तैसा असे॥ १०३३॥

आथिलेनि देहें। जो न घेपे देहमोहें।
देह गेलिया नोहे। पुनरपि तो॥ १०३४॥

ऐसा तया एकु। प्रकृतिपुरुषविवेकु।
उपकारु अलौकिकु। करी पैं गा॥ १०३५॥

परि हाचि अंतरीं। विवेक भानूचियापरी।
उदैजे ते अवधारीं। उपाय बहुत॥ १०३६॥

ध्यानेनात्मनि पश्यन्ति केचिदात्मानमात्मना॥
अन्ये सांख्येन योगेन कर्मयोगेन चापरे॥ १३.२४॥

कोणी एकु सुभटा। विचाराचियां आगिटां।
आत्मानात्मकिटा। पुटें देउनी॥ १०३७॥

छत्तीसही वानी भेद। तोडोनिया निर्विवाद।
निवडिती शुद्ध। आपणपें॥ १०३८॥

तया आपणपयाचियां पोटीं। आत्मध्यानाचिया दिठी।
देखती गा किरीटी। आपणपेंचि॥ १०३९॥

आणिक पैं दैवबगें। चित्त देती सांख्ययोगें।
एक ते अंगलगें। कर्माचेनि॥ १०४०॥

यया चतुर्विधप्रकारें। जे मज निमले पुरे।
तयांसीं कांहीं नुरे। भोक्तव्य गा॥ १०४१॥

अन्ये त्वेवमजानन्तः श्रुत्वाऽन्येभ्य उपासते॥
तेऽपि चातितरन्त्येव मृत्युं श्रुतिपरायणाः॥ १३.२५॥

येणें येणें प्रकारें। निस्तरती साचोकारें।
हें भय कां उरें। आघवेंचि॥ १०४२॥

परि ते करिती ऐसें। अभिमानु दवडुनि देशें।
एकाचिया विश्वासें। टेंकती बोला॥ १०४३॥

जे हिताहित देखती। हानि कणवा घेपती।
पुसोनि शिणु हरिती। देती सुख॥ १०४४॥

तयांचेनि मुखें जें निघे। तेतुलें आदरें चांगें।
ऐकोनियां आंगें। मनें होती॥ १०४५ ॥

तया ऐकणे याचेनि नांवे। ठेविती गा आघवें।
तया अक्षरासी जीवें। लोण करिती॥ १०४६ ॥

तेही अंतीं कपिध्वजा। इया मरणार्णवसमाजा।
पासूनि निघती वोजा। गोमटिया॥ १०४७ ॥

ऐसेसे हे उपाये। बहुवस एथें पाहें।
जाणावया होये। एकी वस्तु॥ १०४८ ॥

आतां पुरे हें बहुत। पैं सर्वार्थाचें मथित।
सिद्धांत नवनीत। देऊं तुज॥ १०४९ ॥

येतुलेनि पंडुसुता। अनुभव लाहाणा आयिता।
येर तंव तुज होतां। सायास नाहीं॥ १०५० ॥

म्हणोनि ते बुद्धि रचूं। मतवाद हे खांचूं।
सोलींव निर्वचूं। फलितार्थचि॥ १०५१ ॥

यावत्संजायते किंचित्सत्त्वं स्थावरजङ्गमम्॥
क्षेत्रक्षेत्रज्ञसंयोगात्तद्विद्धि भरतर्षभ॥ १३.२६ ॥

तरी क्षेत्रज्ञ येणें बोलें। तुज आपणपें जें दाविलें।
आणि क्षेत्रही सांगितलें। आघवें जें॥ १०५२ ॥

तया येरयेरांचियां मेळीं। होइजे भूतीं सकळीं।
अनिलसंगें जळीं। कल्लोळ जैसे॥ १०५३ ॥

कां तेजा आणि उखरा। भेटी जालिया वीरा।
मृगजळाचिया पूरा। रूप होय॥ १०५४ ॥

ना ना धाराधरधारीं। झळंबलिया वसुंधरी।
उठिजे जेवीं अंकुरीं। ना ना विधीं॥ १०५५ ॥

तैसें चराचर आघवें। जें कांहीं जीवु येणें नावें।
तें तों उभययोगें संभवे। ऐसें जाण॥ १०५६ ॥

इयालागीं अर्जुना। क्षेत्रज्ञा प्रधाना।
पासूनि न होती भिन्ना। भूतव्यक्ति॥ १०५७ ॥

समं सर्वेषु भूतेषु तिष्ठन्तं परमेश्वरम्॥
विनश्यत्स्वविनश्यन्तं यः पश्यति स पश्यति॥ १३.२७ ॥

पैं पटत्व तंतु नव्हे। तरि तंतूसीचि तें आहे।
ऐसां खोलीं डोळां पाहें। ऐक्य हें गा॥ १०५८ ॥

भूतें आघवींचि होती। एकाचीं एक आहाती।
परी पैं भूतप्रतीतीं। वेगळीक असे॥ १०५९ ॥

यांचीं नामें ही आनानें। अनारिसीं वर्तनें।
वेषही सिनाने। आघवेयांचे॥ १०६० ॥

ऐसें देखोनि किरीटी। भेद सूसी हन पोटीं।
तरि जन्माचिया कोटी। न लाहसी निघों॥ १०६१ ॥

पैं ना ना प्रयोजनशीळें। दीर्घें वक्रें वर्तुळें।
होती एकीचींच फळें। तुंबिणीयेचीं॥ १०६२ ॥

होतु का उजू वांकुडें। परि बोरीचें हें न मोडे।
तैसी भूतें अवघडें। परि वस्तु उजू॥ १०६३ ॥

अंगारकणीं बहुवसीं। उष्णता समान जैसी।
तैसा ना ना जीवराशीं। परेशु असे॥ १०६४ ॥

गगनभरी धारा। परी पाणी एकचि वीरा।
तैसा या भूताकारा। सर्वांगीं तो॥ १०६५ ॥

हें भूतग्राम विषम। परी वस्तू ते एथ सम।
घटमठीं व्योम। जियापरी॥ १०६६ ॥

हा नाशतां भूताभासु। एथ आत्मा तो अविनाशु।
जैसा केयूरादिकीं कसु। सुवर्णाचा॥ १०६७ ॥

एवं जीवधर्महीनु। जो जीवासीं अभिन्नु।
देखे तो सुनयनु। ज्ञानियांमाजीं॥ १०६८ ॥

ज्ञानाचा डोळां डोळसां। माजीं डोळसु तो वीरेशा।
हे स्तुति नोहे बहुवसा। भाग्याचा तो॥ १०६९ ॥

समं पश्यन् हि सर्वत्र समवस्थितमीश्वरम्॥
न हिनस्त्यात्मनात्मानं ततो याति परां गतिम्॥ १३.२८ ॥

जे गुणेंद्रिय धोकटी। देह धातूंची त्रिकुटी।
पांच मेळावा वोखटी। दारुण हे॥ १०७०॥

हें उघड पांचवें उली। हे पंचधा आंगीं लागली।
जीव पंचानना सांपडली। हरिणकुटी हे॥ १०७१॥

ऐसा असोनि इये शरीरीं। कोण नित्यबुद्धीची सुरी।
अनित्यभावाचियां उदरीं। दाटीचिना॥ १०७२॥

परी इये देहीं असतां। जो नयेचि आपणया घाता।
आणि शेखीं पंडुसुता। तेथेंचि मिळे॥ १०७३॥

जे योगज्ञानाचिया प्रौढी। वोलांडूनियां जन्मकोडी।
न निगों इया भाषा बुडी। देती योगी॥ १०७४॥

जें आकाशाचें पैल तीर। जें नादाची पैल मेर।
तुर्येचें माजघर। परब्रह्म जें॥ १०७५॥

मोक्षासकट गती। जेथें येती विश्रांती।
गंगादि अपांपती। सरिता जेवीं॥ १०७६॥

तें सुख येणेंचि देहें। पायपाखाळणिया लाहे।
भूत वैषम्यें नोहे। विषमबुद्धी॥ १०७७॥

दीपांचियां कोडीं जैसें। एकचि तेज सरिसें।
तैसा जो असे। सर्वत्र ईशु॥ १०७८॥

ऐसेनि समत्वें पंडुसुता। जिये जो देखतसाता।
तो मरणा आणि जीविता। नागवे फुडा॥ १०७९॥

म्हणोनि तो दैवागळा। वानीत असों वेळोवेळां।
जे साम्यसेजे डोळा। लागला तया॥ १०८०॥

प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमाणानि सर्वशः॥
यः पश्यति तथात्मानम् अकर्तारं स पश्यति॥ १३.२९॥

आणि मनोबुद्धिप्रमुखें। कर्मेंद्रियें अशेखें।
करी प्रकृतीचि हें देखे। साचें जो गा॥ १०८१॥

घरींचीं राहटती घरीं। घर कांहीं न करी।
अभ्र धांवे अंबरीं। अंबर तें उगें॥ १०८२॥

तैसी प्रकृति आत्मप्रभा। खेळे गुणीं विविधारंभा।
येथ आत्मा तो वोथंबा। नेणे कोण॥ १०८३॥

ऐसेनि येणें निवाडें। जयाचियां जीवीं उजिवडें।
अकर्तयातें फुडें। देखिलें तेणें॥ १०८४॥

यदा भूतपृथग्भावम् एकस्थमनुपश्यति॥
तत एव च विस्तारं ब्रह्म संपद्यते तदा॥ १३.३०॥

एऱ्हवीं तैंचि अर्जुना। होईजे ब्रह्मसंपन्ना।
जैं या भूताकृती भिन्ना। दिसती एकी॥ १०८५॥

लहरी जैसिया जळीं। परमाणुकणिका स्थळीं।
रश्मीकर मंडळीं। सूर्याचियां जेवीं॥ १०८६॥

ना तरी देहीं अवेव। मनीं आघवेचि भाव।
विस्फुल्लिंग सावेव। वन्हीं एकीं॥ १०८७॥

तैसे भूताकार एकाचे। हें दिठी रिगे जैं साचें।
तैंचि ब्रह्मसंपत्तीचें। तारूं लागे॥ १०८८॥

मग जयातयाकडे। ब्रह्मेंचि दिठी उघडे।
किंबहुना जोडे। अपार सुख॥ १०८९॥

येतुलेनि तुज पार्था। प्रकृतिपुरुषव्यवस्था।
ठायें ठावो प्रतीतिपथा। माजीं जाहली॥ १०९०॥

अमृत जैसें ये चुळा। कां निधान देखिजे डोळां।
तेतुला जिव्हाळा मानावा गा॥ १०९१॥

हा जी जाहलिये प्रतीति। घर बांधणें जें चित्तीं।
तें आतां ना सुभद्रापती। इयावरी॥ १०९२॥

तरी एक दोन्ही ते बोल। बोलिजती सखोल।
देई मनातें बोल। मग ते घेई॥ १०९३॥

ऐसें देवें म्हणितलें। मग बोलों आदरिलें।
तेथें अवधानाचेंचि केलें। सर्वांग येरें॥ १०९४॥

अनादित्वान्निर्गुणत्वात् परमात्मायमव्ययः॥
शरीरस्थो पि कौन्तेय न करोति न लिप्यते॥ १३.३१॥

तरि परमात्मा म्हणिपे। तो ऐसा जाण स्वरूपें।
जळीं जळें न लिंपे। सूर्यु जैसा॥ १०९५॥

कां जे जळा आदीं पाठीं। सूर्य असतुचि असे किरीटी।
माजीं बिंबे तें दृष्टी। आणिकांचिये॥ १०९६॥

तैसा आत्मा देहीं। आथि म्हणिपे हें कांहीं।
साचें तरी नाहीं। तो जेथिंचा तेथें॥ १०९७॥

आरिसांमुख जैसें। बिंबलिया नाम असे।
देहीं बसणें तैसें। आत्मतत्त्वा॥ १०९८॥

तया देहा म्हणती भेटी। हे सपायी निर्जिव गोठी।
वारिया वाळुवे गांठी। केंही आहे॥ १०९९॥

आगी आणि पाउसा। दोरा सुवावा कैसा।
केउता सांदा आकाशा। पाषाणेंसी॥ ११००॥

एक निघे पूर्वेकडे। एक तें पश्चिमेकडे।
तिये भेटीचेनि पाडें। संबंधु हा॥ ११०१॥

उजियेडा आणि अंधारेया। जो पाडु मृता उभया।
तोचि गा आत्मया। देहा जाण॥ ११०२॥

रात्री आणि दिवसा। कनका आणि कापुसा।
अपाडु कां जैसा। तैसाचि हा॥ ११०३॥

देह तंव पांचांचें जालें। हें कर्माचां गुणीं गुंथले।
भंवतसे चाकीं सूदलें। जन्ममृत्यूंच्यां॥ ११०४॥

हें काळानळाच्यां कुंडीं। घातली लोणियाची उंडी।
माशी पांखु पाखडी। तंव हें सरे॥ ११०५॥

हें विपायें आंगी पडे। तरी भस्म होऊनि उडे।
जाहलें श्वाना वरपडें। तरी ते विष्ठा॥ ११०६॥

या चुके दोन्हीं काजा। तरी होय कृमींचा पुंजा।
हा परिणामु कपिध्वजा। कश्मलु गा॥ ११०७॥

या देहाची हे दशा। आणि आत्मा तो एथ ऐसा।
पैं नित्य सिद्ध आपैसा। अनादिपणें॥ ११०८॥

सकळु ना निष्कळु। अक्रियु ना क्रियाशीळु।
कृश ना स्थुळु। निर्गुणपणें॥ ११०९॥

आभासु ना निराभासु। प्रकाशु ना अप्रकाशु।
अल्प ना बहुवसु। अरूपपणें॥ १११०॥

रिता ना भरितु। रहितु ना सहितु।
मूर्तु ना अमूर्तु। शून्यपणें॥ ११११॥

आनंदु ना निरानंदु। एकु ना विविधु।
मोकळा ना बद्धु। आत्मपणें॥ १११२॥

येतुला ना तेतुला। आइता ना रचिला।
बोलता ना उगला। अलक्षपणें॥ १११३॥

सृष्टीचां होणां न रचे। सर्वसंहारें न वेंचे।
आथी नाथी या दोहींचें। पंचत्व तो॥ १११४॥

मवे ना चर्चे। वाढे ना खांचे।
विटे ना वेंचे। अव्ययपणें॥ १११५॥

एवं रूप पैं आत्मा। देहीं जें म्हणती प्रियोत्तमा।
तें मठाकारें व्योमा। नाम जैसें॥ १११६॥

तैसें तयाचिये अनुस्यूती। होती जाती देहाकृती।
तो घे ना सांडी सुमती। जैसा तैसा॥ १११७॥

अहोरात्रें जैसीं। येती जाती आकाशीं।
आत्मसत्ते तैसीं। देहें जाण॥ १११८॥

म्हणोनि इये शरीरीं। कांहीं करावी ना करी।
आयताही व्यापारीं। सज्जु नव्हे॥ १११९॥

यालागीं स्वरूपें। उणा पुरा न घेपे।
हें असो तो न लिंपे। देहीं देहा॥ ११२०॥

यथा सर्वगतं सौक्ष्म्यादाकाशं नोपलिप्यते॥
सर्वत्रावस्थितो देहे तथात्मा नोपलिप्यते॥ १३.३२॥

अगा आकाश कें नाहीं। हें न रिघेचि कवणे ठायीं।
परि कायिसेनि कहीं। गादिजेना॥ ११२१॥

तैसा सर्वत्र सर्व देहीं। आत्मा असतुचि असे पाहीं।
परि संगदोषें एकेंही। लिप्तु नव्हे॥ ११२२॥

पुढतपुढती एथें। हेंचि लक्षण निरुतें।
जे जाणावें क्षेत्रज्ञातें। क्षेत्रविहीना॥ ११२३॥

यथा प्रकाशयत्येकः कृत्स्नं लोकमिमं रविः॥
क्षेत्र क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत॥ १३.३३॥

संसर्गे चेष्टिजे लोहे। परि लोह भ्रामक नोहे।
क्षेत्रक्षेत्रज्ञां आहे। तेतुला पाडु॥ ११२४॥

दीपकाची अर्ची। राहाटी वाहे घरींची।
परी वेगळीक कोडीची। दीपा आणि घरा॥ ११२५॥

काष्ठांचां पोटीं। वन्हि असे किरीटी।
परि काष्ठ नोहे या दिठी। पाहिजे गा॥ ११२६॥

अपाडु नभा आभाळा। रवि आणि मृगजळा।
तैसाचि हाही डोळां। देखसी जरी॥ ११२७॥

हें आघवेंचि असो एकु। गगनौनि जैसा अर्कु।
प्रगटवी लोकु। नांवें नांवें॥ ११२८॥

एथ क्षेत्रज्ञु तो ऐसा। प्रकाशकु क्षेत्राभासा।
यावरुतें हें न पुसा। शंका नेघा॥ ११२९॥

क्षेत्रक्षेत्रज्ञयोरेवम् अन्तरं ज्ञानचक्षुषा॥
भूतप्रकृतिमोक्षं च विदुर्यान्ति ते परम॥ १३.३४॥

शब्दतत्त्वसारज्ञा। पैं देखणी तेचि प्रज्ञा।
जे क्षेत्रा क्षेत्रज्ञा। अपाडु देखे॥ ११३०॥

इया दोहींचें अंतर। देखावया चतुर।
ज्ञानियांचे द्वार। आराधिती॥ ११३१॥

याचिलागीं सुमती। जोडिती शांतिसंपत्ती।
शास्त्रांचीं दुभतीं। पोसिती घरीं॥ ११३२॥

योगाचिया आकाशा। वळघिजे येवढाचि धिंवसा।
याचियाचि आशा। पुरुषासि गा॥ ११३३॥

शरीरादि समस्त। मानितााति तृणवत।
जीवें संतांचे होत। वाहणधरु॥ ११३४॥

ऐसैसियापरी। ज्ञानाचिया भरोवरी।
करूनियां अंतरीं। निरुते होती॥ ११३५॥

मग क्षेत्र क्षेत्रज्ञाचें। जे अंतर देखती साचें।
ज्ञानें उन्मेख तयांचें। वोवाळूं अम्ही॥ ११३६॥

आणि महाभूतादिकीं। प्रभेदलीं अनेकीं।
पसरलीसे लटिकी। प्रकृति जे हे॥ ११३७॥

ते शुकनळिकान्यायें। न लगती लागली आहे।
हें जैसें तैसें होये। ठाउवें जयां॥ ११३८॥

जैसी माळा ते माळा। ऐसीचि देखिजे डोळां।
सर्पबुद्धि टवाळा। उखी होउनि॥ ११३९॥

कां शुक्ति ते शुक्ति। हे साच होय प्रतीती।
रुपेयाची भ्रांती। जाऊनियां॥ ११४०॥

तैसी वेगळी वेगळेपणें। प्रकृति जे अंतःकरणें।
देखती ते मी म्हणें। ब्रह्म होती॥ ११४१॥

जें आकाशाहूनि वाड। जें अव्यक्ताची पैल कड।
जें भेटलिया अपाडा पाड। पडों नेदी॥ ११४२॥

आकारु जेथ सरे। जीवत्व जेथें विरे।
द्वैत जेथ नुरे। अद्वय जें॥ ११४३॥

तें परमतत्त्व पार्था। होती ते सर्वथा।
जे आत्मानात्मव्यवस्था। राजहंसु॥ ११४४॥

ऐसा हा जी आघवा। श्रीकृष्णें तया पांडवा।
उगाणा दिधला जीवा। जीवाचिया॥ ११४५॥

येर कलशीचें येरीं। रिचविजे जयापरी।
आपणपें तया श्रीहरी। दिधलें तैसें॥ ११४६॥

आणि कोणा देता कोण। तो नर तैसा नारायण।
वरी अर्जुनातें श्रीकृष्ण। हां मी म्हणे॥ ११४७॥

परि असो तें नाथिलें। न पुसतां कां मी बोलें।
किंबहुना दिधलें। सर्वस्व देवें॥ ११४८॥

कीं तो पार्थु जी मनीं। अझुनी तृप्ती न मनी।
अधिकाधिक उतान्ही। वाढवीतु असे॥ ११४९॥

स्नेहाचिया भरोवरी। आंबुथिला दीपु घे थोरी।
चाड अर्जुना अंतरीं। परिसतां तैसी॥ ११५०॥

तेथ सुगरणी आणि उदारे। रसज्ञ आणि जेवणारे।
मिळती मग अवतरे। हातु जैसा॥ ११५१॥

तैसें जी होतसे देवा। तया अवधानाचिया लवलवा।
पाहातां व्याख्यान चढलें थांवा। चौगुणें वरी॥ ११५२॥

सुवायें मेघु सांवरे। जैसा चंद्रें सिंधु भरे।
तैसा मातुला रसु आदरें। श्रोतयांचेनि॥ ११५३॥

आतां आनंदमय आघवें। विश्व कीजेल देवें।
तें रायें परिसावें। संजयो म्हणे॥ ११५४॥

एवं जे महाभारतीं। श्रीव्यासें अप्रांतमती।
भीष्मपर्वीं शांती। म्हणितली कथा॥ ११५५॥

तो श्रीकृष्णार्जुनसंवादु। नागरीं बोलीं विशदु। सांगोनि दाऊं प्रबंधु। वोवियेचा॥ ११५६॥
नुसधीचि शांतिकथा। आणिजेल कीर वाक्पथा।
जे शृंगाराचां माथां। पाय ठेविती॥ ११५७॥

दाऊं वेल्हाळे देशी नवी। जे साहित्यातें वोजावी।
अमृतातें चुकी ठेवी। गोडिसेपणें॥ ११५८॥

बोल वोल्हावतेनि गुणें। चंद्रासि घे उमाणे।
रसरंगीं भुलवणें। नादु लोपी॥ ११५९॥

खेचराचियाही मना। आणी सात्त्विकाचा पान्हा।
श्रवणासवें सुमना। समाधि जोडे॥ ११६०॥

तैसा वाग्विलास विस्तारूं। गीतार्थेंसीं विश्व भरूं।
आनंदाचें आवारूं। मांडूं जगा॥ ११६१॥

फिटो विवेकाची वाणी। हो कानामनाची जिणी।
देखो आवडे ते खाणी। ब्रह्मविद्येची॥ ११६२॥

दिसो परतत्त्व डोळां। पाहो सुखाचा सोहळा।
रिघो महाबोधसुकाळा। माजीं विश्व॥ ११६३॥

हें निफजेल आतां आघवें। ऐसें बोलिजेल बरवें।
जे अधिष्ठिला असें परमदेवें। श्रीनिवृत्ती मी॥ ११६४॥

म्हणोनि अक्षरीं सुभेदीं। उपमा श्लोक कोंदाकोंदी।
झाडा देईन प्रतिपदीं। ग्रंथार्थासी॥ ११६५॥

हा ठावोवरी मातें। पुरतया सारस्वतें।
केलें असे श्रीमंतें। श्रीगुरुरायें॥ ११६६॥

तेणें जी कृपासावायें। मी बोलें तेतुलें सामाये।
आणि तुमचिये सभे लाहें। गीता म्हणों॥ ११६७॥

विरि तुम्हा संतांचे पाये। आजि मी पातलों आहें।
म्हणोनि जी नोहे। अटकु काहीं॥ ११६८॥

प्रभु काश्मिरीं मुकें। नुपजे हें कौतुकें।
नाहीं उणीं सामुद्रिकें। लक्ष्मीयेसी॥ ११६९॥

तैसी तुम्हां संतांपासीं। अज्ञानाची गोठी कायसी।
यालागीं नवरसीं। वरुषेन मी॥ ११७०॥

किंबहुना आतां देवा। अवसरु मज देयावा।
ज्ञानदेव म्हणे बरवा। सांगेन ग्रंथु॥ ११७१॥

इति श्रीमद्भग्वद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां
योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
क्षेत्रक्षेत्रज्ञविभाग
(प्रकृतिपुरुषविवेक) योगोनाम त्रयोदशोऽध्यायः॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां
त्रयोदशोऽध्यायः॥ १३॥

श्लोक ३४ ओव्या ११७१

## 14 Three modes of material nature गुणत्रयविभागयोग

श्रीमद्भगवद्गीता चतुर्दशोऽध्यायः।
ज्ञानेश्वरी अध्याय चौदावा

जय जय आचार्या। समस्तसुरवर्या।
प्रज्ञाप्रभातसूर्या। सुखोदया॥ १॥

जय जय सर्व विसांवया। सोऽहंभावसुहावया।
नाना लोक हेलावया। समुद्रा तूं॥ २॥

आइकें गा आर्तबंधू। निरंतरकारुण्यसिंधू।
विशदविद्यावधू। वल्लभा जी॥ ३॥

तू जयांप्रति लपसी। तया जग हे दाविसी।
प्रकटु तैं करिसी। आघवेंचि तू॥ ४॥

कीं पुढिलाची दृष्टि चोरिजे। हा दृष्टिबंधु निफजे।
परी नवल लाघव तुझें। जें आपणपें चोरे॥ ५॥

जे तूंचि तूं सर्वा यया। मा कोणा बोधु कोणा माया।
ऐसिया आपेंआप लाघविया। नमो तुज॥ ६॥

जाणों जगीं आप बोलें। तें तुझिया बोला सुरस जालें।
तुझेनि क्षमत्व आलें। पृथ्वियेसी॥ ७॥

रविचंद्रादि शुक्ति। उदो करिती त्रिजगतीं।
तें तुझिया दीप्तीं। तेज तेजां॥ ८॥

जें चळवळिजे अनिळें। तैं दैविकेनि जी निजबळें।
नभ तुजमाजीं खेळे। लपीथपी॥ ९॥

किंबहुना माया अशेष। ज्ञान जी तुझेनि डोळस।
असो वानणें सायास। श्रुतीसि हें॥ १०॥

वेद वांनूनि तंव चांग। जंव न दिसे तुझें आंग।
मग आम्हां तया मूग। एकी पांती॥ ११॥

जी एकार्णवाचां ठाई। पाहतां थेंबाचा पाडु नाहीं।
मा महानदी काई। जाणिजती॥ १२॥

कां उदयलिया भास्वतु । चंद्र जैसा खद्योतु।
आम्हां श्रुति तुज आंतु। तो पाडु असे॥ १३॥

आणि दुजिया थांवो मोडे। जेथ परेशीं वैखरी बुडे।
तो तूं मा कोण तोंडें। वानावासी॥ १४॥

यालागीं आतां। स्तुति सांडूनि निवांता।
चरणीं ठेविजे माथा। हेंचि भलें॥ १५॥

तरी तुज तैसिया। नमो जी गुरुराया।
मज ग्रंथोद्यमु फळावया। वेव्हारा होई॥ १६॥

आतां कृपा भांडवल सोडीं। भरीं मति माझी पोतडी।
करीं ज्ञानपद्य जोडी। थोरा मातें॥ १७॥

मग मी संसरेन तेणें। करीन संतांसी कर्णभूषणें।
लेववीन सुलक्षणें। विवेकाचीं॥ १८॥

जी गीतार्थनिधान। काढू माझें मन।
सुयीं स्नेहांजन। आपलें तूं॥ १९॥

हे वाक्सृष्टि एके वेळे। देखतु माझे बुद्धीचे डोळे।
तैसा उदजो जो निर्मळें। कारुण्यबिंबें॥ २०॥

माझी प्रज्ञावेली वेल्हाळ। काव्यें होय सुफळ।
तो वसंतु होय स्नेहाळ। शिरोमणी॥ २१॥

प्रमेयमहापूरें। हें मतिगंगा ये थोरे।
तैसा वरिष उदारे। दिठीवेनी॥ २२॥

अगा विश्वैकधामा। तुझा प्रसादुचंद्रमा।
करू मज पूर्णिमा। स्फूर्तीची जी॥ २३॥

जी अवलोकिलिया मातें। उन्मेषसागरीं भरितें।
वोसंडेल स्फूर्तीतें। रसवृत्तीचें॥ २४॥

तंव तोषोनि गुरुराजें। म्हणितलें विनतिव्याजें।
मांडिलें देखों दुजें। स्तवनमिषें॥ २५॥

हें असो आतां वांजटा। तो ज्ञानार्थ करूनि गोमटा।
ग्रंथु दावीं उत्कंठा। भंगो नेदीं॥ २६॥

हो कां जी स्वामी। हेंचि पाहतु होतों मी।
जे श्रीमुखें म्हणा तुम्ही। ग्रंथु सांग॥ २७॥

परि हें म्यां केलें। कीं हें माझेनि जालें।
ऐसें नाहीं ठेविलें। वासनेमाजी॥ २८॥

सहजें दुर्वेचा हिरु। आंगेंचि तंव अमरु।
वरी आला पूरु। पीयूषाचा॥ २९॥

तरी आतां येणें प्रसादें। विन्यासें विदग्धें।
मूळशास्त्रपदें। वाखाणीन॥ ३०॥

परी जीवा आंतुलीकडे। जैसी संदेहाची डोणी बुडे।
ना श्रवणीं तरी चाडे। वाढु दिसे॥ ३१॥

तैसी बोली साचारी। अवतरो माझी माधुरी।
माले मागूनि घरीं। गुरुकृपेच्यां॥ ३२॥

तरी मागां त्रयोदशीं। अध्यायीं गोष्टी ऐसी।
श्रीकृष्णु अर्जुनेंसी। चावळले॥ ३३॥

जे क्षेत्रक्षेत्रज्ञयोगें। होइजे येणें जगें।
आत्मा गुणसंगें। संसारिया॥ ३४॥

आणि हाचि प्रकृतिगतु। सुखदुःख भोगीं हेतु।
अथवा गुणातीतु। केवळु हा॥ ३५॥

तरी कैसा पां असंगा संगु। कोण तो क्षेत्रक्षेत्रज्ञयोगु।
सुखदुःखदि भोगु। केवीं तया॥ ३६॥

गुण ते कैसे किती। बांधती कवणे रीती।
नातरी गुणातीतीं। चिन्हें काई॥ ३७॥

एवं यया आघवेया। अर्था रूप करावया।
विषो एथ चौदाविया। अध्यायासी॥ ३८॥

तरि तो आतां ऐसा। प्रस्तुत परियेसा।
अभिप्रावो विश्वेशा। वैकुंठाचा॥ ३९॥

तो म्हणे गा अर्जुना। अवधानाची सर्व सेना।
मेळउनि इया ज्ञाना। झोंबावें हो॥ ४०॥

आम्हीं मागां तुज बहुतीं। दाविलें हें उपपत्तीं।
तरी आझुनी प्रतीतीस्। कुशी न निघे॥ ४१॥

श्रीभगवानुवाच।
परं भुयः प्रवक्ष्यामि ज्ञानानां ज्ञानमुत्तमम्।
यज्ज्ञात्वा मुनयः सर्वे परां सिद्धिमितो गताः॥ १४.१॥

म्हणोनि गा पुढती। सांगिजेल तुजप्रती।
पर म्हणो श्रुतीं। डाहारिलें जें॥ ४२॥

एऱ्हवीं ज्ञान हें आपुलें। परि ऐसेनि जालें।
जे आवडोनि घेतलें। भवस्वर्गादिक॥ ४३॥

अगा याचि कारणें। हें उत्तम सर्वांपरी मी म्हणें।
जे वन्हि हें तृणें। येरें ज्ञानें॥ ४४॥

जियें भवस्वर्गातें जाणती। यागचि चांग म्हणती।
पारखी फुडी आथी। भेदीं जेयां॥ ४५॥

तियें आघवीचि ज्ञानें। केली येणें स्वप्नें।
जैशा वातोर्मी गगनें। गिळिजती अंतीं॥ ४६॥

कां उदितें रश्मिराजें। लोपिली चंद्रादि तेजें।
ना ना प्रळयांबुमाजें। नदी नद॥ ४७॥

तैसें हें येणें पाहलेया। ज्ञानजात जाय लया।
म्हणोनियां धनंजया। उत्तम हें॥ ४८॥

अनादि जे मुक्तता। आपुली असे पंडुसुता।
तो मोक्षु हाता येता। होय येणें॥ ४९॥

जयाचिया प्रतीती। विचारवीरीं समस्तीं।
नेदिजेचि संसृती। माथां उधऊं॥ ५०॥

मनें मन घालूनि मागें। विश्रांति जालिया आंगें।
ते देहीं देहाजोगे। होतीचि ना॥ ५१॥

मग तें देहाचें बेळें। वोलांडूनि एकेचि वेळे।
संवतुकी कांटाळें। माझें जाले॥ ५२॥

इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागताः।
सर्गेऽपि नोपजायन्ते प्रलये न व्यथन्ति च॥ १४.२॥

जे माझिया नित्यता। तेणें नित्य ते पंडुसुता।
परिपूर्ण पूर्णता। माझियाचि॥ ५३॥

मी जैसा अनंतानंदु। जैसाचि सत्यसिंधु।
तैसेचि ते भेदु। उरेचि ना॥ ५४॥

जें मी जेवढें जैसें। तेंचि ते जाले तैसें।
घटभंगीं घटाकाशें। आकाश जेवीं॥ ५५॥

नातरीं दीपमूळकीं। दीपशिखा अनेकी।
मिनलिया अवलोकीं। होय जैसें॥ ५६॥

अर्जुना तयापरी। सरली द्वैताची वारी।
नांदे नामार्थ एकाहारीं। मी तूं विण॥ ५७॥

येणेंचि पैं कारणें। जैं पहिलें सृष्टीचें जुंपणें।
तैं ही तया होणें। पडेचिना॥ ५८॥

सृष्टीचिये सर्वादी। जयां देहाची नाही बांधी।
तैं कैचें प्रळयावधी। निमतील पां॥ ५९॥

म्हणउनि जन्मक्षयां। अतीत ते धनंजया।
मी जाले ज्ञाना यया। अनुसरोनी॥ ६०॥

ऐसी ज्ञानाची वाढी। वानिली देवें आवडी।
तेवींचि पार्था ही गोडी। लावावया॥ ६१॥

तंव तया जालें आन। सर्वांगीं निघाले कान।
सपाई अवधान। आतलां पां॥ ६२॥

आतां देवाचिया ऐसें। जाकळीजतु असे बोरसें।
म्हणोनि निरूपण आकाशें। वेंटाळेना॥ ६३॥

मग म्हणे गा प्रज्ञाकांता। उजवली आजि वक्तृत्वता।
जे बोला येवढा श्रोता। जोडलासि॥ ६४॥

तरि एकु मी अनेकीं। गोंविजे देहपाशकीं।
त्रिगुणीं लुब्धकीं। कवणें परी॥ ६५॥

कैसा क्षेत्रयोगें। वियें इयें जगें।
तें परिस सांगें। कवणे परी॥ ६६॥

पैं क्षेत्र येणें व्याजें। हें यालागीं बोलिजे।
जे मत्संगबीजें। भूतीं पिके॥ ६७॥

मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन् गर्भं दधाम्यहम्।
संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत॥ १४.३॥

एऱ्हवीं तरी महद्ब्रह्म। यालागीं हें ऐसें नाम।
जे महदादिविश्राम। शाळिका हें॥ ६८॥

विकारां बहुवस थोरी। अर्जुना हेंचि करी।
म्हणोनि अवधारीं। महद्ब्रह्म॥ ६९॥

अव्यक्तवादमतीं। अव्यक्त ऐसी वदंती।
सांख्याचिया प्रतीती। प्रकृति हेचि॥ ७०॥

वेदांतीं इयेतें माया। ऐसें म्हणिजे प्राज्ञराया।
असो किती बोलों वायां। अज्ञान हे॥७१॥

आपुला आपणपेयां। विसरु जो धनंजया।
तेंचि रूप यया। अज्ञानासी॥ ७२॥

आणिकही एक असे। जें विचारावेळे न दिसे।
वातीं पाहतां जैसें। आंधारें कां॥ ७३॥

हालविलिया जाये। निश्चळीं तरी होयें।
दुधीं जैसी साये। दुधाची ते॥ ७४॥

पैं जागरु ना स्वप्न। ना स्वरूपावस्थान।
ते सुषुप्ति कां घन। जैसी होय॥ ७५॥

कां न वियता वायूतें। वांझें आकाश रितें।
तयाऐसें निरुतें। अज्ञान गा॥ ७६॥

पैल खांब कां पुरुखु। ऐसा निश्चयो नाहीं एकु।
परी काय नेणों आलोकु। दिसत असे॥ ७७॥

तेवीं वस्तु जैसी असे। तैसी कीर न दिसे।
परी कांहीं अनारिसें। देखिजेना॥ ७८॥

ना राती ना तेज। ते संधि जेवीं सांज।
तेवीं विरुद्ध ना निज। अज्ञान आथी॥ ७९॥

ऐसी कोणही एकी दिशा। तिये वादु अज्ञान ऐसा।
तया गुंडलिया प्रकाशा। क्षेत्रज्ञु नांव॥ ८०॥

अज्ञान थोरिये आणिजे। आपणपें तरी नेणिजे।
तें रूप जाणिजे क्षेत्रज्ञाचें॥ ८१॥

हाचि उभय योगु। बुझें बापा चांगु।
सत्तेचा नैसर्गु स्वभावो हा॥ ८२॥

आतां अज्ञानासारिखें। वस्तु आपणपेंचि देखे।
परी रूपें अनेकें। नेणों कोणें॥ ८३॥

जैसा रंकु भ्रमला। म्हणे जा रे मी रावो आला।
कां मूर्च्छितु गेला। स्वर्गलोका॥ ८४॥

तेवीं लचकलिया दिठी। मग देखणे जें जें उठी।
तया नांव सृष्टी। मीचि वियें पैं गा॥ ८५॥

जैसें कां स्वप्नमोहा। तो एकाकी देखिजे बहुवा।
तोचि पाडु आत्मया। स्मरणेंवीण असे॥ ८६॥

हेंचि आनि भांती। प्रमेय उपलवूं पुढती।
परि तू प्रतीती। याचि घे पां॥ ८७॥

तरी माझी हे गृहिणी। अनादि तरुणी।
अनिर्वाच्यगुणी। अविद्या हे॥ ८८॥

इये नाहीं हेंचि रूप। ठाणें हें अति उमप।
हे निद्रिता समीप। चेतां दुरी॥ ८९॥

पैं माझेनिचि आंगें। पहुढल्या हे जागे।
आणि सत्तासंभोगें। गुर्विणी होय॥ ९०॥

महद्ब्रह्मउदरीं। प्रकृतीं आठैं विकारीं।
गर्भाची करी। पेलोवेली॥ ९१॥

उभयसंगु पहिलें। बुद्धितत्त्व प्रसवलें।
बुद्धितत्त्व उभारैलें। होय मन॥ ९२॥

तरुणी ममता मनाची। ते अहंकार तत्त्व रची।
तेणें महाभूतांची। अभिव्यक्ति होय॥ ९३॥

आणि विषयेंद्रिया गोसी। स्वभावें तंव भूतांसी।
म्हणोनि येती सरिसीं। तियेंही रूपा॥ ९४॥

जालेनि विकारक्षोभें। पाठीं त्रिगुणाचें उभें।
तेव्हां ये वासनागर्भे। ठायेंठावो॥ ९५॥

रुखाचा आवांका। जैसी बीजकणिका।
जीवीं बांधें उदका। भेटतखेंवो॥ ९६॥

तैसी माझेनि संगें। अविद्या नाना जगें।
आर घेवो लागे। अणियाची॥ ९७॥

मग गर्भगोळा तया। कैसें रूप तैं आया।
तें परियेसें राया। सुजनाचिया॥ ९८॥

पैं मणिज स्वेदज। उद्भिज जारज।
उमटती सहज। अवेव हे॥ ९९॥

व्योमवायुवशें। वाढलेनि गर्भरसें।
मणिजु उससे। अवेवु हा॥ १००॥

पोटीं सूनि तमरजें। आगळिकां तोय तेजें।
उठितां निफजे। स्वेदजु गा॥ १०१॥

आप पृथ्वी उत्कटें। आणि तमोमात्रें निकृष्टें।
स्थावरु उमटे। उद्भिजु हा॥ १०२॥

पांचां पांचही विरजीं। होती मनबुद्ध्यादि साजीं।
हीं हेतु जारजी। ऐसें जाण॥ १०३॥

ऐसे चारी हे सरळ। करचरणतळ।
महाप्रकृति स्थूळ। तेंचि शिर॥ १०४॥

प्रवृत्ति पेललें पोट। निवृत्ति ते पाठी नीट।
सुरयोनी आंगें आठ। ऊर्ध्वाचीं॥ १०५॥

कंठु उल्हासता स्वर्गु। मृत्युलोक मध्यार्धभागु।
अधोदेशु चांगु। नितंबु तो॥ १०६॥

ऐसें लेकरूं एक। प्रसवली हे देख।
जयाचें तिन्ही लोक। बाळसें गा॥ १०७॥

चौऱ्यांशीं लक्ष योनी। तियें कांडां पेरां सांदणी।
वाढे प्रतिदिनीं। बाळक हें॥ १०८॥

ना ना देह अवयवीं। नामांचीं लेणीं लेववी।
मोहस्तन्यें वाढवी। नित्य नवें॥ १०९॥

सृष्टी वेगवेगळीया। तिया करांघ्रीं आंगोळियां।
भिन्नाभिमान सूदलिया। मुदिया तेथें॥ ११०॥

हें एकलौतें चराचर। अविचारित सुंदर।
प्रसवोनि थोर। थोरावली॥ १११॥

पैं ब्रह्मा प्रातःकाळु। विष्णु तो माध्यान्ह वेळु।
सदाशिव सायंकाळु। बाळा यया॥ ११२॥

महाप्रळयसेजे। खिळौनि आलें निदिजे।
विषमज्ञानें उमजे। कल्पोदयीं॥ ११२॥

अर्जुना यापरी। मिथ्यादृष्टीचां घरीं।
युगानुवृत्तीचीं करी। चोज पाउलें॥ ११४॥

संकल्पु जयाचा इष्टु। अहंकारु विनटु।
ऐसिया होय तैं शेवटु। ज्ञानें यया॥ ११५॥

आतां असो हे बहु बोली। ऐसें विश्व माया व्याली।
तेथ जांघु जाली। माझी सत्ता॥ ११६॥

सर्वयोनिषु कौन्तेय मूर्तयः संभवन्ति याः।
तासां ब्रह्म महद्योनिरहं बीजप्रदः पिता॥ १४.४॥

याकारणें मी पिता। महद्ब्रह्म माता।
अपत्य पंडुसुता। जगडंबरु॥ ११७॥

आतां शरीरें बहुतें। देखोनि न भेद हो चित्तें।
जे मनबुद्ध्यादि भूतें। एकेंचि येथें॥ ११८॥

हां गा एकेचि देहीं। काय अनारिसे अवयव नाहीं।
तेवीं विचित्र विश्व पाहीं। एकचि हें॥ ११९॥

पैं उंचा नीचा डाहाळिया। विषमा वेगळालिया।
येकाचि जेवीं जालिया। बीजाचिया॥ १२०॥

आणि संबंधु तोही ऐसा। मृत्तिके घटु लेंकु जैसा।
कां पटत्व कापुसा। नातु होय॥ १२१॥

ना ना कल्लोळपरंपरा। संतती जैसी सागरा।
आम्हां आणि चराचरा। संबंधु तैसा॥ १२२॥

म्हणोनि वन्हि आणि ज्वाळ। दोन्ही वन्हीचि केवळ।
तेवीं मी गा सकळ। संबंधु वावो॥ १२३॥

जालेनि जगें मी झांकें। तरी जगत्वें कोण फांके।
किळेवरी माणिकें। लोपिजे काई॥ १२४॥

अळंकारातें आलें। तरी सोनेपण काइ गेलें।
कीं कमळ फांकलें। कमळत्वा मुके॥ १२५॥

सांग पां धनंजया। अवयवीं अवयविया।
आच्छादिजे कीं तया। तेंचि रूप॥ १२६॥

कीं विरूढलेया जोंधळा। कणिसाचा निर्वाळा।
वेंचला कीं आगळा। दिसतसे॥ १२७॥

म्हणोनि जग परौतें। सारूनि पाहिजे मातें।
तैसा नव्हे उखितें। आघवें मीचि॥ १२८॥

हा तूं साचोकारा। निश्चयाचा खरा।
गांठी बांध वीरा। जीवाचिये॥ १२९॥

आतां मियां मज दाविला। शरीरीं वेगळाला।
गुणीं मीचि बांधला। ऐसा आवडें॥ १३०॥

जैसें स्वप्नीं आपण। उठवूनियां आत्ममरण।
भोगिजे जाण। कपिध्वजा॥ १३१॥

कां कावळातें डोळे। प्रकाशूनि पिवळें।
देखती तेंही कळे। तयांसीचि॥ १३२॥

ना ना सूर्य प्रकाशें। प्रकटी तैं अभ्र भासे।
तो लोपला हेंही दिसे। सूर्येंचि कीं॥ १३३॥

पैं आपणपेनि जालिया। छाया गा आपुलिया।
पाहोनि बिहालिया। आन आहे॥ १३४॥

तैसीं इयें ना ना देहें। दाऊनि मी ना ना होयें।
तेथ ऐसा जो बंधु आहे। तेंही देखें॥ १३५॥

बंधु कां न बंधिजे। हें जाणणें मज माझें।
नेणणेनि उपजे। आपलेनि॥ १३६॥

तरी कोणें गुणें कैसा। मजचि मी बंधु ऐसा।
आवडे ते परियेसा। अर्जुनदेवा॥ १३७॥

गुण किती किं धर्म। कायि ययां रूप नाम।
कें जालें हें वर्म। अवधारिजे॥ १३८॥

सत्त्वं रजस्तम इति गुणाः प्रकृतिसम्भवाः।
निबध्नन्ति महाबाहो देहे देहिनमव्ययम्॥ १४.५॥

तरी सत्त्वरजतम। तिघांसिही हे नाम।
आणि प्रकृति जन्म। भूमिका ययां॥ १३९॥

येथ सत्त्व ते उत्तम। रज ते मध्यम।
तिहींमाजीं तम। सावियाधारें॥ १४०॥

हें एकेचि वृत्तीच्यां ठायीं। त्रिगुणत्व आवडे पाहीं।
वयसात्रय देहीं। येकीं जेवीं॥ १४१॥

कां मिनलेनि कीडें। जंव जंव तूक वाढे।
तंव तंव सोनें हीन पडे। पांचिकां कसीं॥ १४२॥

पैं सावधपण जैसें। वाहविलें आळसें।
सुषुप्ति बैसे। घणावोनी॥ १४३॥

तैसी अज्ञानांगीकारें। निगाली वृत्ति विखुरे।
ते सत्त्वरज द्वारें। तमही होय॥ १४४॥

अर्जुना गा जाण। ययां नाम गुण।
आतां दाखूं खुण। बांधिती ते॥ १४५॥

तरी क्षेत्रज्ञदशे। आत्मा मोटका पैसे।
हें देह मी ऐसें। मुहूर्त करी॥ १४६॥

आजन्ममरणांतीं। देहधर्मीं समस्तीं।
ममत्वाची सूती। घे ना जंव॥ १४७॥

जैसी मीनाचां तोंडीं। पडेना जंव उंडी।
तंव गळ आसुडी। जळपारधी॥ १४८॥

तत्र सत्त्वं निर्मलत्वात प्रकाशकम् अनामयम्।
सुखसङ्गेन बध्नाति ज्ञानसङ्गेन चानघ॥ १४.६॥

तेवीं सत्त्वें लुब्धकें। सुखज्ञानाचि पाशिकें।
वोढिजती मग खुडके। मृगु जैसा॥ १४९॥

मग ज्ञानें चडफडी। जाणिवेचे खुरखोडी।
स्वयंसुख हें धाडी। हातींचें गा॥ १५०॥

तेव्हां विद्यामानें तोखे। लाभमात्रें हरिखे।
मी संतुष्ट हेंही देखे। श्लाघों लागे॥ १५१॥

म्हणे भाग्य ना माझें। आजि सुखियें नाहीं दुजें।
विकाराष्टकें फुंजे। सात्त्विकाचेनि॥ १५२॥

आणि येणेंही न सरे। लांकण लागे दुसरें।
जें विद्वत्तेचें भरे। भूत आंगीं॥ १५३॥

आपणचि ज्ञानस्वरूप आहे। तें गेलें हें दुःख न वाहे।
कीं विषयज्ञानें होये। गगनायेवढा॥ १५४॥

रावो जैसे स्वप्नीं। रंकपणें रिघे धानीं।
तो दों दाणा मानीं। इंद्रु ना मी॥ १५५॥

तैसें गा देहातीता। जालेया देहवंता।
हों लागे पंडुसुता। बाह्यज्ञानें॥ १५६॥

प्रवृत्तिशास्त्र बुझे। यज्ञविद्या उमजे।
किंबहुना सुझे। स्वर्गवरी॥ १५७॥

आणि म्हणे आजि आन। मीवांचूनि नाहीं सज्ञान।
चातुर्यचंद्रा गगन। चित्त माझें॥ १५८॥

ऐसें सत्त्व सुखज्ञानीं। जीवासि लावूनि कानी।
बैलाची करी वानी। पांगुळाचिया॥ १५९॥

आतां हाचि शरीरीं। रजें जियापरी।
बांधिजे तें अवधारीं। सांगिजेल॥ १६०॥

रजो रागात्मकं विद्धि तृष्णासङ्गसमुद्भवम्।
तन्निवध्नाति कौन्तेय कर्मसङ्गेन देहिनम्॥ १४.७॥

हें रज याचि कारणें। जीवातें रंजवूं जाणे।
हें अभिलाखाचें तरुणें। सदाचि गा॥ १६१॥

हें जीवीं मोटकें रिगे। आणि कामाच्यां मार्गीं लागे।
मग वारया वळघे। तृष्णेंचिया॥ १६२॥

घृतें आंबुखूनि आगियाळें। वज्राग्नीचें सादुकलें।
आतां बहु थेंकुलें। आहे तेथ॥ १६३॥

तैसी खवळे चाड। होय दुःखासकट गोड।
इंद्रश्रीहि सांकड। गमों लागे॥ १६४॥

तैसी तृष्णा वाढिनलिया। मेरुही आता आलिया।
तऱ्ही म्हणे एखादिया। दारुणाहि वळघों॥ १६५॥

आजि असतें वेंचिजेल। परी पाहे काय कीजेल।
ऐसा पांगीं वडील। व्यवसाय मांडी॥ १६६॥

जीविताचि कुरोंडी। वोवाळूं लागे कवडी।
मानी तृणाचिये जोडी। कृतकृत्यता॥ १६७॥

म्हणे स्वर्गा हन जावें। तरी काय तेथें खावें।
ययालागीं धावें। याग करूं॥ १६८॥

व्रतापाठीं व्रतें। आचरें इष्टापूर्तें।
काम्यावांचूनि हातें। शिवणें नाहीं॥ १६९॥

पैं ग्रीष्मांतींचा वारा। विसवों नेणे वीरा।
तैसा न म्हणे व्यापारा। राति दिवो॥ १७०॥

काय चंचळु मासा। कामिनीकटाक्ष्य जैसा।
लवलाहो तैसा। विजू नाहीं॥ १७१॥

तेतुलेनि गा वेगें। स्वर्गसंसारपांगें।
आगीमाजीं रिगे। क्रियांचिये॥ १७२॥

ऐसा देहीं देहावेगळा। ले तृष्णेचिया सांखळा।
खटाटोपु वाहे गळां। व्यापाराचा॥ १७३॥

हें रजोगुणाचें दारुण। देहीं देहियासि बंधन।
परिस आतां विंदाण। तमाचें तें॥ १७४॥

तमस्त्वज्ञानजं विद्धि मोहनं सर्वदेहिनाम्।
प्रमादालस्यनिद्राभिः तन्निबध्नाति भारत॥ १४.८॥

व्यवहाराचेहि डोळे। मंद जेणें पडळें।
मोहरात्रीचें काळें। मेहुडें जें॥ १७५॥

अज्ञानाचें जियालें। तया एका लागलें।
जेणें विश्व भुललें। नाचत असे॥ १७६॥

अविवेकमहामंत्र। जें मौढ्यमद्याचें पात्र।
हें असो मोहनास्त्र। जीवांसि जें॥ १७७॥

पार्था तें गा तम। रचूनि ऐसें वर्म।
चउखुरी देहात्म। मानियातें॥ १७८॥

हें एकचि कीर शरीरीं। माजों लागे चराचरीं।
आणि तेथ दुसरी। गोठी नाहीं॥ १७९॥

सर्वेंद्रिया जाड्य। मनामाजीं मौढ्य।
माल्हाती दार्ढ्य। आलस्याचें॥ १८०॥

आंगें आंग मोडामोडी। कार्यजातीं अनावडी।
नुसती परवडी। जांभयांची॥ १८१॥

उघडियाची दिठी। देखणें नाहीं किरीटी।
नाळविळावितांचि उठी। वो म्हणउनि॥ १८२॥

पडलिये धोंडी। नेणे कानी मुरडी।
तयाचि परी मुरकुंडी। उकलूं नेणे॥ १८३॥

पृथ्वी पाताळीं जांवो। कां आकाशही वरी येवो।
परी उठणें हा भावो। उपजों नेणें॥ १८४॥

उचितानुचित आघवें। झांसुरता ना आठवे जीवें।
जेथींचा तेथ लोळावें। ऐसी मेधा॥ १८५॥

उभऊनि करतळें। पडिघाये कपोळें।
पायांचें शिरियाळें। मांडू लागे॥ १८६॥

आणि निद्रेविषयीं चांगु। जीवीं आथि लागु।
झोंपीं जातां स्वर्गु। वावो म्हणे॥ १८७॥

ब्रह्मायु होइजे। मग निजलेयाचि असिजे।
हें वांचूनि दुजें व्यसन नाहीं॥ १८८॥

कां वाटें जातां वोधें। कल्हातांही डोळा लागे।
अमृतही परी नेघे। जरी नीद आली॥ १८९॥

तेवींचि आक्रोशबळें। व्यापारे कोणे एके वेळे।
निगालें तरी आंधळें। रोषें जैसे॥ १९०॥

केधवां कैसे राहाटावें। कोणेसीं काय बोलावें।
हें ठाकतें कीं नागवे। हेंही नेणे॥ १९१॥

वणवा मियां आघवा। पांखेंचि पुसोनि घेयावा।
पतंगु या हांवा। घाली जेवीं॥ १९२॥

तैसा वळघे साहसा। अकरणींचि धिंवसा।
किंबहुना ऐसा। प्रमाद रुचे॥ १९३॥

एवं निद्रालस्यप्रमादीं। तम इहीं त्रिविधीं।
बांधे निरुपाधीं। चोखटातें॥ १९४॥

जैसा वन्ही काष्ठीं भरे। तैं दिसे काष्ठाकारें।
व्योम घटें आवरे। तें घटाकाश॥ १९५॥

ना ना सरोवर भरलें। तैं चंद्रत्व तेथें बिंबलें।
तैसें गुणापासीं बांधलें। आत्मत्व गमे॥ १९६॥

सत्त्वं सुखे संजयति रजः कर्मणि भारत।
ज्ञानमावृत्य तु तमः प्रमादे संजयत्युत॥ १४.९॥
रजस्तमश्चाभिभूय सत्त्वं भवति भारत।
रजः सत्त्वं तमश्चैव तमः सत्त्वं रजस्तथा॥ १४.१०॥

परि हरूनि कफवात। जैं देहीं आटोपे पित्त।
तैं करी संतप्त। देह जेवीं॥ १९७॥

कां वर्ष आतप जैसें। जिणोनि शीत दिसे।
तेव्हां होय हिंव ऐसें। आकाश हें॥ १९८॥

ना ना स्वप्न जागृती। लोपूनि ये सुषुप्ति।
तैं क्षणु एक चित्तवृत्ती। तेचि होय॥ १९९॥

तैसीं रजतमें हारवी। जैं सत्त्व माजु मिरवी।
तैं जीवाकरवीं म्हणवी। सुखिया ना मी॥ २००॥

तैसेंचि सत्त्व रज। लोपूनि तमाचें भोज।
वळघे तैं सहज। प्रमादी होय॥ २०१॥

तयाचि गा परिपाठीं। सत्त्व तमातें पोटीं।
घालूनि जेव्हां उठी। रजोगुण॥ २०२॥

तेव्हां कर्मावांचूनि कांहीं। आन सौंदर्यचि नाहीं।
ऐसें मानी देहीं। देहराजु॥ २०३॥

त्रिगुणवृद्धि निरूपण। तीं श्लोकीं सांगितलें जाण।
आतां सत्त्वादि वृद्धिलक्षण। सादर परिसा॥ २०४॥

सर्वद्वारेषु देहेऽस्मिन् प्रकाश उपजायते।
ज्ञानं यदा तदा विद्यात् विवृद्धं सत्त्वमित्युत॥ १४.११॥
लोभः प्रवृत्तिरारम्भः कर्मणामशमः स्पृहा।
रजस्येतानि जायन्ते विवृद्धे भरतर्षभ॥ १४.१२॥
अप्रकाशोऽप्रवृत्तिश्च प्रमादो मोह एव च।
तमस्येतानि जायन्ते विवृद्धे कुरुनन्दन॥ १४.१३॥
यदा सत्त्वे प्रवृद्धे तु प्रलयं याति देहभृत्।
तदोत्तमविदां लोकान् अमलान्प्रतिपद्यते॥ १४.१४॥
रजसि प्रलयं गत्वा कर्मसङ्गिषु जायते।
तथा प्रलीनस्तमसि मूढयोनिषु जायते॥ १४.१५॥

पैं रजतमविजयें। सत्त्व गा देहीं इये।
वाढतां चिन्हें तियें। ऐसीं होती॥ २०५॥

जे प्रज्ञा आंतुलीकडे। न समाती बाहेरी वोसंडे।
वसंतीं पद्मखंडें। दृती जैसी॥ २०६॥

सर्वेंद्रियांच्यां आंगणीं। विवेक करी राबणी।
साचचि करचरणीं। होती डोळे॥ २०७॥

राजहंसापुढें। चांचूचें आंगरडें।
तोडी जेवीं झगडे। क्षीरनीराचे॥ २०८॥

तेवीं दोषादोषविवेकीं। इंद्रियेंचि होती पारखीं।
नियमु बारे पायिकी। वोळाअगे तैं॥ २०९॥

न ऐकणें तें कानचि वाळी। न पहाणें तें दिठीचि गाळी।
अवाच्य तें टाळी। जीभचि गा॥ २१०॥

वाती पुढां जैसें। पळो लागे काळवसें।
निषिद्ध इंद्रियां तैसें। समोर नोहे॥ २११॥

धाराधरकाळें। महानदी उचंबळे।
तैसी बुद्धि पघळे। शास्त्रजातीं॥ २१२॥

अगा पुनवेचां दिवशीं। चंद्रप्रभा धांवे आकाशीं।
ज्ञानीं वृत्ति तैसी। फांके सैंघ॥ २१३॥

वासना एकवटे। प्रवृत्ति वोहटे।
मानस विटे। विषयांवरी॥ २१४॥

एवं सत्त्व वाढे। तैं हे चिन्ह फुडें।
आणि निधनही घडे। तेव्हांचि जरी॥ २१५॥

तरी जैसीचि घरींची संपत्ती। आणि तैसीचि औदार्यधैर्यवृत्ती।
मा परत्रा आणि कीर्ती। कां नोहावें॥ २१६॥

कां पाहालेनि सुयाणें। जालयां परगुणें।
पडियंतें ये पाहुणें। स्वर्गोनियां॥ २१७॥

मग गोमटेया तया। जावळी असे धनंजया।
तेवीं सत्त्वीं जाणे देहा। कें आथि गा॥ २१८॥

जे स्वगुणीं उद्भट। घेऊनि सत्त्व चोखट।
निगे सांडूनि कोपट। भोगक्षम हें॥ २१९॥

अवचटें ऐसा जो जाये। तो सत्त्वाचाचि नवा होये।
किंबहुना जन्म लाहे। ज्ञानियांमाजीं॥ २२०॥

सांग पां धनुर्धरा। रावो रायपणें डोंगरा।
गेलिया अपुरा। होय काई॥ २२१॥

ना तरीं येथिंचा दिवा। नेलिया सेजिया गांवा।
तो तेथें तरी पांडवा। दीपचि कीं॥ २२२॥

तैसी ते सत्त्वशुद्धी। आगळी ज्ञानेंसी वृद्धी।
तरंगावों लागे बुद्धी। विवेकावरी॥ २२३॥

पैं महदादि परिपाटी। विचारूनि शेवटीं।
विचारासकट पोटीं। जिरोनि जाय॥ २२४॥

छत्तिसां सदतीसावें। चोविसां पंचविसावें।
तिन्हीं नुरोनि स्वभावें। चतुर्थ जें॥ २२५॥

ऐसें सर्व जें सर्वोत्तम। आलें असे जया सुगम।
तयासवें निरुपम। लाहे देह॥ २२६॥

इयाचि परी देख। तम सत्त्व अधोमुख।
बैसोनि जैं आगळीक। धरी रज॥ २२७॥

आपलिया कार्याचा। धुमाड गांवीं देहाचां।
माजवी तैं चिन्हांचा। उदयो ऐसा॥ २२८॥

पांजरली वाहटुळी। करी वेगळ वेटाळी।
तैसी विषयीं सरळी। इंद्रियां होय॥ २२९॥

परदारादिक पडे। परी विरुद्ध ऐसें नावडे।
मग शेळियेचेनि तोंडें। सैंघ चारी॥ २३०॥

हा ठायवरी लोभु। करी स्वैरत्वाचा राबु।
वेंटाळितां अलाभु। तें तें उरे॥ २३१॥

आणि आड पडलिया। उद्यमजातां भलतेया।
प्रवृत्ती धनंजया। हातु न काढी॥ २३२॥

तेवींचि एखादा प्रासादु। कां करावा अश्वमेधु।
ऐसा अचाट छंदु। घेऊनि उठी॥ २३३॥

नगरेंचि रचावीं। जळाशयें निर्मावीं।
महावनें लावावीं। ना ना विधें॥ २३४॥

ऐसैसां अफाटीं कर्मीं। समारंभु उपक्रमीं।
आणि दृष्टादृष्ट कामीं। पुरे न म्हणे॥ २३५॥

सागरुही सांडीं पडे। आगी न लाहे तीन कवडे।
ऐसें अभिलाषीं जोडे। दुर्भरत्व॥ २३६॥

स्पृहा मना पुढां पुढां। आशेचा घे दवडा।
विश्व घापे चाडा। पायांतळीं॥ २३७॥

इत्यादि वाढतां रजीं। इयें चिन्हें होती साजीं।
आणि ऐशा समाजीं। वेंचे जरी देह॥ २३८॥

तरी आघवांचि इहीं। परिवारला आनीं देहीं।
रिगे परी योनिही। मानुषीचि॥ २३९॥

सुरवाडेंसि भिकारी। वसो पां राजमंदिरीं।
तरी काय अवधारीं। रावो होईल॥ २४०॥

बैल तेथें करबाडें। हें न चुके गा फुडें।
नेइजो कां वऱ्हाडें। समर्थाचेनि॥ २४१॥

म्हणोनि व्यापाराच्या हातीं। उसंतु देहा ना राती।
तैसयांचिये पांती। जुंपिजे तो॥ २४२॥

कर्मजडाच्यां ठायीं। किंबहुना होय देहीं।
जो रजोवृद्धीच्यां डोहीं। बुडोनि निमे॥ २४३॥

मग तैसाचि पुढती। रजसत्त्ववृत्ती।
गिळूनि ये उन्नती। तमोगुण॥ २४४॥

तैंचि जियें लिंगें। देहींचीं सबाह्य सांगें।
तियें परिस चांगें। श्रोत्रबळें॥ २४५॥

तरी होय ऐसें मन। जैसें रविचंद्रहीन।
रात्रींचें कां गगन। अंवसेचिये॥ २४६॥

तैसें अंतर असोस। होय स्फूर्तिहीन उद्वस।
विचाराची भाष। हारपे पैं॥ २४७॥

बुद्धि मेचवेना धोंडी। हा ठायवरी मवाळें सांडी।
आठवो देशधडी। जाला असे॥ २४८॥

अविवेकाचेनि माजें। सबाह्य शरीर गाजे।
एकलेनि घेपे दीजे। मौढ्यें तेथ॥ २४९॥

आचारभंगाचीं हाडें। रुपती इंद्रियांपुढें।
मरे जरी तेणेंकडे। क्रिया जाय॥ २५०॥

पाहीं आणिकही एक दिसे। जे दुष्कृतीं चित्त उल्हासे।
आंधारीं देखणें जैसें। डुडुळांचें॥ २५१॥

तैसें निषिद्धाचेनि नांवें। भलतेंही भरे हावे।
तियेविषयीं धांवे। घेती करणें॥ २५२॥

मदिरा न घेतां डुले। सन्निपातेंवीण बरळे।
निष्प्रेमेंचि भुले। पिसें जैसें॥ २५३॥

चित्त तरी गेलें आहे। परी उन्मनी ते नोहे।
ऐसें माल्हातिजे मोहें। माजिरेनि॥ २५४॥

किंबहुना ऐसैसीं। इयें चिन्हें तम पोषी।
जैं वाढे आयितीसी आपुलिया॥ २५५॥

आणि हेंचि होय प्रसंगें। मरणाचें जरी पडे खागें।
तरी तेतुलेनि रिगे। तमेंसीं तो॥ २५६॥

राई राईपण बीजीं। सांठवूनियां अंग त्यजी।
मग विरूढे तैं दुजी। गोठी आहे गा॥ २५७॥

पैं होऊनि दीपकलिका। येरु आगी विझो कां।
कां जेथ लागे तेथ असका। तोचि आहे॥ २५८॥

म्हणोनिया तमाचिये लोथे। बांधोनियां संकल्पातें।
देह जाय तैं मागौतें। तमाचेंचि होय॥ २५९॥

आतां काय येणें बव्हें। जो तमोवृद्धि मृत्यु लाहे।
तो पशु कां पक्षी होये। झाड कां कृमी॥ २६०॥

कर्मणः सुकृतस्याहुः सात्त्विकं निर्मलं फलम्।
रजसस्तु फलं दुःखम् अज्ञानं तमसः फलम्॥ १४.१६॥

येणेंचि पैं कारणें। जें निपजे सत्त्वगुणें।
तें सुकृत ऐसें म्हणे। श्रौतसमो॥ २६१॥

म्हणौनिया तया निर्मळा। सुखज्ञानीं सरळा।
अपूर्व ये फळा। सात्त्विक तें॥ २६२॥

मग राजसा जिया क्रिया। तया इंद्रावणी पिकलिया।
जे सुखें चितारूनियां। फळती दुःखें॥ २६३॥

कां निंबोळियेचें पिक। वरि गोड आंत विख।
तैसें तें राजस देख। क्रियाफळ॥ २६४॥

तामस कर्म जितुकें। अज्ञान फळेंचि पिके।
विषांकुर विखें। जियापरी॥ २६५॥

सत्त्वात् संजायते ज्ञानं रजसो लोभ एव च।
प्रमादमोहौ तमसो भवतोऽज्ञानमेव च॥ १४.१७॥

म्हणउनि बा अर्जुना। येथ सत्त्वचि हेतु ज्ञाना।
जैसा कां दिनमाना। सूर्य हा पैं॥ २६६॥

आणि तैसेंचि हें जाण। लोभासि रज कारण।
आपलें विस्मरण। अद्वैता जेवीं॥ २६७॥

मोह अज्ञान प्रमादा। ययां मैळेया दोषवृंदा।
पुढती पुढती प्रबुद्धा। तमचि मूळ॥ २६८॥

ऐसें विचाराच्यां डोळां। तिन्हीं गुण हे वेगळवेगळां।
दाविले जैसा आंवळा। तळहातींचा॥ २६९॥

तंव रजतमें दोन्हीं। देखिलीं प्रौढ पतनीं।
सत्त्वावांचूनि नाणीं। ज्ञानाकडे॥ २७०॥

म्हणौनि सात्त्विक वृत्ती। एक जाले गा जन्मव्रती।
सर्वत्यागें चतुर्थी। भक्ति जैसी॥ २७१॥

ऊर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्था मध्ये तिष्ठन्ति राजसाः।
जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छन्ति तामसाः॥ १४.१८॥

तैसें सत्त्वाचेनि नटनाचें। असणें जाणें जयांचें।
ते तनुत्यागीं स्वर्गींचे। राय होती॥ २७२॥

इयाचि परि रजें। जिहीं कां जीजे मरिजे।
तिहीं मनुष्य होईजे। मृत्युलोकीं॥ २७३॥

तेथ सुखदुःखाचें खिचटें। जेविजे एकेंचि ताटें।
जेथ इये मरणवाटे। पडिलें नुठी॥ २७४॥

आणि तयाचि स्थिति तमीं। जे वाढोनि निमती भोगक्षमीं।
ते घेती नरकभूमी। मूळपत्र॥ २७५॥

एवं वस्तूचिया सत्ता। त्रिगुणासी पंडुसुता।
दाविली सकारणता। आघवीची॥ २७६॥

पैं वस्तु वस्तुत्वें असिकें। तें आपणपें गुणासारिखें।
देखोनि कार्यविशेखें। अनुकरे गा॥ २७७॥

जैसें कां स्वप्नींचेनि राजें। जैं परचक्र देखिजे।
तैं हारी जैत होईजे। आपणचि॥ २७८॥

तैसें मध्योर्ध्व अध। हे जे गुणवृत्ति भेद।
ते दृष्टीवांचूनि शुद्ध। वस्तुचि असे॥ २७९॥

नान्यं गुणेभ्यः कर्तारं यदा द्रष्टाऽनुपश्यति।
गुणेभ्यश्च परं वेत्ति मद्भावं सोऽधिगच्छति॥ १४.१९॥

परी हे वाहणी असो। तरी तुज आन ना दिसो।
परिसें तें सांगतसों। मागील गोष्टी॥ २८०॥

तरी ऐसें निजनिजें। सामर्थ्यें तिन्ही सहजें।
होती देहव्याजें। गुणचि हे॥ २८१॥

इंधनाचेनि आकारें। अग्नि जैसा अवतरे।
कां आवघेनि तरुवरें। भूमिरसु॥ २८२॥

ना ना दहियांचेनि मिसें। परिणमे दूधचि जैसें।
कां मूर्त होय ऊसें। गोडी जेवीं॥ २८३

तैसें हे सांतःकरण। देहचि होती त्रिगुण।
म्हणोनि बंधासि कारण। घडे कीर॥ २८४॥

परी चोज हें धनुर्धरा। जे एवढा हा गुंफिरा।
मोक्षाचा संसारा। उणा नोहे॥ २८५॥

त्रिगुण आपुलालेनि धर्में। देहींचे माघुत साउमें।
चाळितांही न खोमे। गुणातीतता॥ २८६॥

ऐसी मुक्ती असे सहज। ते आतां परिसवूं तुज।
जे तूं ज्ञानांबुज। द्विरेफु कीं॥ २८७॥

आणि गुणीं गुणाजोगें। चैतन्या नोहे मागें।
बोलिलों तें खागें। तेवींचि हें॥ २८८॥

तरी पार्था जैं ऐसें। बोधलेनि जीवें दिसे।
स्वप्न कां जैसें। चेइलेनी॥ २८९॥

नातरी आपण जळीं। बिंबलों तीरोनी न्याहाळी।
चळण होतां कल्लोळीं। अनेकधा॥ २९०॥

कां नटलेनि लाघवें। नटु जैसा न झकवे।
तैसें गुणजात देखावें। न होनियां॥ २९१॥

पैं ऋतुत्रय आकाशें। धरूनियांही जैसें।
नेदिजेचि येवों वोसें। वेगळेपणा॥ २९२॥

तैसें गुणीं गुणापरौतें। जें आपणपें असे आयितें।
तिये अहं बैसे अहंते। मूळकेचिये॥ २९३॥

तैं तेथूनि मग पाहातां। म्हणे साक्षी मी अकर्ता।
हे गुणचि क्रियाजातां। नियोजना॥ २९४॥

सत्त्वरजतमांच्यां। भेदीं पसरु कर्माचा।
होत असे तो गुणांचा। विकारु हा॥ २९५॥

ययामाजीं मी ऐसा। वनीं कां वसंतु जैसा।
वनलक्ष्मीविलासा। हेतुभूत॥ २९६॥

कां तारांगणीं लोपावें। सूर्यकांतीं उद्दीपावें।
कमळीं विकासावें। जावें तमें॥ २९७॥

यया कोणाचें काहीं। सविता जैसा नाहीं।
तैसा अकर्ता मी देहीं। सत्तारूप॥ २९८॥

मी दाऊनि गुण देखें। गुणतां हे मियां पोखे।
ययाचेनि निःशेखें। उरे तें मी॥ २९९॥

ऐसेनि विवेकें जया। उदय होय धनंजया।
ये गुणातीतत्व तया। ऊर्ध्वपंथें॥ ३००॥

गुणानेतानतीत्य त्रीन् देही देहसमुद्भवान्।
जन्ममृत्युजरादुःखैः विमुक्तोऽमृतमश्नुते॥ १४.२०॥

आतां निर्गुण असे आणिक। तें तो जाणे अचुक।
जें ज्ञानें केलें टीक। तयाचि वरी॥ ३०१॥

किंबहुना पंडुसुता। ऐसा तो माझी सत्ता।
पावे जैसी सरिता। सिंधुत्व गा॥ ३०२॥

नळिकेवरुनि उठिला जैसा शुक शाखे बैसला।
तैसा मूळ अहंते वेढिला। तो मी म्हणौनियां॥ ३०३॥

अगा अज्ञानाचिया निदा। जो घोरत होता बदबदा।
तो स्वस्वरूपीं प्रबुद्धा। चेइला कीं॥ ३०४॥

पैं बुद्धिभेदाचा आरिसा। तया हातोनि पडिला वीरेशा।
म्हणौनि प्रकृति मुखाभासा। मुकला तो॥ ३०५॥

देहाभिमानाचा वारा। आतां वाजों ठेला वीरा।
तैं ऐक्य वीचिसागरां। जीवेशां हें॥ ३०६॥

म्हणौनि मद्भावेंसी। प्राप्ति पाविजे तेणें सरिसी।
वर्षांतीं आकाशीं। घनजात जेवीं॥ ३०७॥

तेवीं मी होऊनि निरुता। मग देहींचि ये असतां।
नागवे देहसंभूतां। गुणांसि तो॥ ३०८॥

जैसा भिंगाचेनि घरें। दीपप्रकाशु नावरे।
कां न विझेचि सागरें। वडवानळ॥ ३०९॥

तैसा आला गेला गुणाचा। बोधु न मैळे तयाचा।
तो देहीं जैसा व्योमींचा। चंद्र जळीं॥ ३१०॥

तिन्ही गुण आपुलालिये प्रौढी। देहीं नाचविती बागडीं।
तो पाहोंही न धाडी। अहंतेतें॥ ३११॥

हा ठायेवरी। नेहटोनि ठेला अंतरीं।
आतां काय वर्ते शरीरीं। कांहीं नेणे॥ ३१२॥

सांडुनि आंगीची खोळी। सर्प रिगालिया पाताळीं।
ते त्वचा कोण सांभाळी। तैसे जालें॥ ३१३॥

कां सौरभ्यजीर्ण जैसा। आमोदु मिळोनि जाय आकाशा।
माघारा कमळकोशा। न येचि तो॥ ३१४॥

पैं स्वरूपसमरसें। तयाही गा जालें तैसें।
तेथ किंधर्म हें कैसें। नेणे देहीं॥ ३१५॥

म्हणौनि जन्म जरा मरण। इत्यादि जे साही गुण।
ते देहींचि ठेले कारण। नाहीं तया॥ ३१६॥

घटाचिया खापरिया। घटभंगीं फेडिलिया।
महदाकाश आपैसया। जालेंचि असे॥ ३१७॥

तैसी देहबुद्धि जाये। जैं आपणपां आठवु होय।
तैं आन कांहीं आहे। तैंवांचुनी॥ ३१८॥

येणें थोर बोधलेपणें। तयासि गा देहीं असणें।
म्हणूनि तो मी म्हणें। गुणातीत॥ ३१९॥

यया देवाचिया बोला। पार्थु अति सुखावला।
मेघें संबोखिला। मोरु जैसा॥ ३२०॥

अर्जुन उवाच।
कैर्लिङ्गैः त्रीन्गुणान् एतान् अतीतो भवति प्रभो।
किमाचारः कथं चैतान् त्रीन्गुणानतिवर्तते॥ १४.२१॥

तेणें तोषें वीर पुसे। जी कोण्हीं चिन्हीं तो दिसे।
जयामाजीं वसे। ऐसा बोधु॥ ३२१॥

तो निर्गुण काय आचरे। कैसेनि गुण निस्तरे।
हें सांगिजो माहेरें। कृपेचेनि॥ ३२२॥

तया अर्जुनाचिया प्रश्ना। षड्गुणांचा राणा।
परिहारु आकर्णा। बोलतु असे॥ ३२३॥

म्हणे पार्था तुझी नवाई। हें येतुलेंचि पुससी काई।
तें नामचि तया पाही। साचें लटिकें॥ ३२४॥

गुणातीत जया नांवें। तो गुणाधीन तरी नव्हे।
ना होय तरी नागवे। गुणां यया॥ ३२५॥

परी अधीन कां नागवें। हेंचि कैसेनि जाणावें।
गुणांचिये उखरवे। माजीं असतां॥ ३२६॥

हा संदेह जरी वाहसी। तरी सुखें पुसों लाहसी।
परिस आतां तयासी। रूप करूं॥ ३२७॥

श्रीभगवानुवाच।
प्रकाशं च प्रवृत्तिं च मोहमेव च पाण्डव॥
न द्वेष्टि संप्रवृत्तानि न निवृत्तानि काङ्क्षति॥ १४.२२॥

तरी रजाचेनि माजें। देहीं कर्माचें आणोजें।
प्रवृत्ति जैं घेईजे। वेंटाळुनि॥ ३२८॥

तैं मीचि कां कर्मठ। ऐसा न ये श्रीमाठ।
कां दरिद्रलिये बुद्धी वीट। तोही नाहीं॥ ३२९॥

अथवा सत्त्वेंचि अधिकें। जैं सर्वेंद्रियीं ज्ञान फांके।
तैं सुविद्यता तोखे। उभजेही ना॥ ३३०॥

कां वाढिलेनि तमें। न गिळिजेचि मोहभ्रमें।
तैं अज्ञानत्वें न श्रमे। घेणेंही नाहीं॥ ३३१॥

पैं मोहाचां अवसरीं। ज्ञानाची चाड न धरी।
ज्ञानें कर्में नादरी। होतां न दुःखी॥ ३३२॥

सायंप्रतर्मध्याह्ना। या तिहीं काळांची गणना।
नाहीं जेवीं तपना। तैसा असे॥ ३३३॥

तया वेगळाचि काय प्रकाशें। ज्ञानित्व यावें असे।
कायि जळार्णव पाउसें। साजा होय॥ ३३४॥

ना प्रवर्तलेनि कर्में। कर्मठत्व तया कां गमे।
सांगें हिमवंतु हिमें। कांपें कायि॥ ३३५॥

नातरी मोह आलिया। काइ पां ज्ञाना मुकिजेल तया।
महा आगीतें उन्हाळेया। जाळवत असे॥ ३३६॥

उदासीनवदासीनो गुणैर्यो न विचाल्यते॥
गुणा वर्तन्त इत्येव योऽवतिष्ठति नेङ्गते॥ १४.२३॥

तैसे गुणागुणकार्य हें। आघवेंचि आपण आहे।
मणौनि एकेका नोहे। तडातोडी॥ ३३७॥

येवढेया गा प्रतीती। तो देहा आलासे वस्ती।
वाटे जातां गुंती। माजीं जैसा॥ ३३८॥

तो जिणता ना हरवी। तैसा गुण नव्हे ना करवी।
जैसी कां श्रोणवी। संग्रामींचीं॥ ३३९॥

कां शरीरा आंतील प्राणु। घरीं आतिथ्याचा ब्राह्मणु।
ना ना चोहटाचा स्थाणु। उदासु जैसा॥ ३४०॥

आणि गुणाचा यावाजावा। ढळे चळे ना पांडवा।
मृगजळाचा हेलावा। मेरु जैसा॥ ३४१॥

हें बहुत कायि बोलिजे। व्योम वारेनि न वचिजे।
कां सूर्य ना गिळिजे। अंधःकारें॥ ३४२॥

स्वप्न कां गा जियापरी। जागतयातें न सिंतरी।
गुणीं तैसा अवधारीं। न बंधिजे तो॥ ३४३॥

गुणांसि कीर नातुडे। परी दुरूनि जैं पाहे कोडें।
तैं गुणदोष सायिखडें। सभ्यु जैसा॥ ३४४॥

सत्कर्मे सात्त्विकीं। रज तें रजोविषयकीं।
तम मोहादिकीं। वर्तत असे॥ ३४५॥

परिस तयाचिया गा सत्ता। होती गुणक्रिया समस्ता।
हें फुडें जाणे सविता। लौकिका जेवीं॥ ३४६॥

समुद्रचि भरती। सोमकांतचि पाझरती।
कुमुदें विकासती। चंद्र तो उगा॥ ३४७॥

कां वाराचि वाजे विझे। गगनें निश्चळ असिजे।
तैसा गुणाचिये गजबजे। डोलेना जो॥ ३४८॥

अर्जुना येणें लक्षणें। तो गुणातीतु जाणणें।
परिस आतां आचरणें। तयाचियें॥ ३४९॥

समदुःखसुखः स्वस्थः समलोष्टाश्मकाञ्चनः।
तुल्यप्रियाप्रियोधीरः तुल्यनिन्दात्मसंस्तुतिः॥ १४.२४॥

तरी वस्त्रासि पाठीं पोटीं। नाहीं सुतावांचूनि किरीटी।
ऐसें सुये दिठी। चराचर मद्रूपें॥ ३५०॥

म्हणोनि सुखदुःखा सरिसें। कांटाळें आचरे ऐसें।
रिपुभक्तां जैसें। हरीचें देणें॥ ३५१॥

एऱ्हवीं तरी सहजें। सुखदुःख तैंचि सेविजे।
देहजळीं होईजे। मासोळी जैं॥ ३५२॥

आतां तें तंव तेणें सांडिलें। आहे स्वस्वरूपेंसीचि मांडिलें।
सस्यांतीं निवडिलें। बीज जैसें॥ ३५३॥

कां वोघ सांडूनि गंगा। रिघोनि समुद्राचें आंगा।
निस्तरली लगबगा। खळाळाची॥ ३५४॥

तेवीं आपणपांचि जया। वस्ती जाली गा धनंजया।
तया देहीं आपैसया। सुख तैसें दुःख॥ ३५५॥

रात्रि तैसें पाहलें। हें धारणा जेवीं एक जालें।
आत्मारामा देहीं आतलें। द्वंद्व तैसें॥ ३५६॥

पैं निद्रिताचेनि आंगेंशीं। सापु तैशी उर्वशी।
तेवीं स्वरूपस्था सरिसीं। देहीं द्वंद्वं॥ ३५७॥

म्हणोनि तयाचां ठायीं। शेणा सोनया विशेष नाहीं।
रत्ना गुंडेया कांहीं। नेणिजे भेदु॥ ३५८॥

घरा येवों पां स्वर्ग। कां वरिपडो वाघ।
परी आत्मबुद्धीसि भंग। कदा नव्हे॥ ३५९॥

निवटलें न उपवढे। जळीनलें न विरूढे।
साम्यबुद्धी न मोडे। तयापरी॥ ३६०॥

हा ब्रह्मा ऐसेनि स्तविजो। कां नीच म्हणोनि निंदिजो।
परी नेणे जळो विझों। राखोंडी जैसी॥ ३६१॥

तैसी निंदा आणि स्तुती। नये कोण्हेचि व्यक्ती।
नाहीं अंधारें कां वाती। सूर्याघरीं॥ ३६२॥

मानापमानयोस्तुल्यः तुल्यो मित्रारिपक्षयोः।
सर्वारम्भपरित्यागी गुणातीता स उच्यते॥ १४.२५॥

ईश्वर म्हणोनि पूजिला। कां चोरु म्हणोनि गांजिला।
वृषगजीं वेढिला। केला रावो॥ ३६३॥

कां सुहृद पासीं आले। अथवा वैरी वरपडे जाले।
परी नेणे राती पाहालें। तेज जेवीं॥ ३६४॥

साहीं ऋतु येतां आकाशें। लिंपिजेचि ना जैसें।
तेवीं वैषम्य मानसें। जाणिजेना॥ ३६५॥

आणीकही एकु पाहीं। आचारु तयाच्यां ठायीं।
तरी व्यापारासि नाहीं। जालें दिसे॥ ३६६॥

सर्वारंभा उटकलें। प्रवृत्तीचें तेथ मावळे।
जळती गा कर्मफळें। ते तो आगी॥ ३६७॥

दृष्टादृष्टाचेनि नांवें। भावोचि जीवीं नुगवें।
तें सेवी जें स्वभावें। पैठें होये॥ ३६८॥

सुखे ना शिणे। पाषाणु कां जेणें मानें।
तैसी सांडीमांडी मनें। वर्जिली असे॥ ३६९॥

आतां किती हाचि विस्तारु। जाणें ऐसा आचारु।
तया तोचि साचारु। गुणातीतु॥ ३७०॥

गुणांतें अतिक्रमणें। घडे उपाये जेणें।
तो आतां आणिकु आईक म्हणे। श्रीकृष्णनाथु॥ ३७१॥

मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते॥
स गुणान् समतीत्यैतान् ब्रह्मभूयाय कल्पते॥ १४.२६॥

तरी व्यभिचार रहितें चित्तें। भक्तियोगे मातें।
सेवी तो गुणातें। जाकळू शके॥ ३७२॥

तरी कोणु मी कैसी भक्ती। अव्यभिचारा काय व्यक्ती।
हे आघवीचि निरुती। होआवी लागे॥ ३७३॥

तरि पार्था परियेसी। मी तंव येथ ऐसा।
रत्नीं किळावो जैसा। रत्नचि तो॥ ३७४॥

कां द्रवपणचि नीर। अवकाशुचि अंबर।
गोडी तेचि साखर। आन नाहीं॥ ३७५॥

वन्हीं तेंचि ज्वाळ। दळाचि नांव कमळ।
रूख तेंचि डाळ। फळादिक॥ ३७६॥

अगा हिंव जें आकर्षलें। तेंचि हिमवंत जेवीं जालें।
ना ना दूध मुरालें। तेंचि दहीं॥ ३७७॥

तैसें विश्व येणें नांवें। हें मीचि पैं आघवें।
घेई चंद्रबिंब सोलावें। न लगे जेवीं॥ ३७८॥

घृताचें थिजलेपण। न मोडितां घृतचि जाण।
कां नाटितां कांकण। सोनेंचि तें॥ ३७९॥

न उकलितां पटु। तंतुचि असे स्पष्टु।
न विरवितां घटु। मृत्तिका जेवीं॥ ३८०॥

म्हणोनि विश्वपण जावें। मग मातें घेयावें।
तैसा नव्हे आघवें। सकटचि मी॥ ३८१॥

ऐसेनि मातें जाणिजे। ते अव्यभिचार भक्ति म्हणिजे।
येथ भेदु कांहीं देखिजे। तरी व्यभिचारु तो॥ ३८२॥

याकारणें भेदातें। सांडूनि अभेदें चित्तें।
आपणयासकट मातें। जाणावें गा॥ ३८३॥

पार्था सोनयाची टिक। सोनयासी लागली देख।
तैसें आपणपें आणिक। मानावें ना॥ ३८४॥

तेजाचा तेजौनि निघाला। परी तेजींचि असे लागला।
तया रश्मी ऐसा भला। बोधु होआवा॥ ३८५॥

पैं परमाणु भूतळीं। हिमकणु हिमाचळीं।
मजमाजीं न्याहाळीं। अहं तैसें॥ ३८६॥

हो कां तरंगु लहानु। परी सिंधूसी नाहीं भिन्नु।
तैसा ईश्वरीं मी आनु। नोहेचि गा॥ ३८७॥

ऐसेनि या समरसें। दृष्टि जैं उल्हासे।
ते भक्ति पैं ऐसें। आम्ही म्हणों॥ ३८८॥

आणि ज्ञानाचें चांगावें। इयेचि दृष्टि नांवें।
योगाचेंही आघवें। सर्वस्व हें॥ ३८९॥

सिंधू आणि जळधरा। माजीं लागली अखंड धारा।
तैसी वृत्ति वीरा। प्रवर्ते ते॥ ३९०॥

कां कुहेसीं आकाशा। तोंडीं सांदा नाहीं तैसा।
तो परम पुरुषु तैसा। एकवटे गा॥ ३९१॥

प्रतिबिंबौनि बिंबवरी। प्रभेची जैसी उजरी।
ते सोऽहंवृत्ती अवधारीं। तैसी होय॥ ३९२॥

ऐसेनि मग परस्परें। ते सोऽहंवृत्ती अवतरे।
तैं तियेहि सकट सरे। आपैसया॥ ३९३॥

जैसा सैंधवाचा रवा। सिंधूमाजीं पांडवा।
विरलेया विरवावा। हेंही ठाके॥ ३९४॥

ना तरी जाळूनि तृण। वन्हिही विझे आपण।
तैसें भेदु नाशूनि जाण। ज्ञान नुरे॥ ३९५॥

माझें पैलपण जाये। भक्त हें ऐलपण ठाये।
अनादि ऐक्य जें आहे। तेंचि निवडे॥ ३९६॥

आतां गुणातें तो किरीटी। जिणे या नव्हती गोष्टी।
जे एकपणाही मिठी। पडों सरली॥ ३९७॥

किंबहुना ऐशी दशा। तें ब्रह्मत्व गा सुदंशा।
हें तो पावे जो ऐसा। मातें भजे॥ ३९८॥

पुढतीं इहीं लिंगीं। भक्तु जो माझा जगीं।
हे ब्रह्मता तयालागीं। पतिव्रता॥ ३९९॥

जैसें गंगेचेनि वोघें। डळमळित जळ जें निघे।
सिंधुपद तयाजोगें। आन नाहीं॥ ४००॥

तैसा ज्ञानाचिया दिठी। जो मातें सेवी किरीटी।
तो होय ब्रह्मतेच्यां मुकुटीं। चूडारत्न॥ ४०१॥

यया ब्रह्मत्वासीचि पार्था। सायुज्य ऐसी व्यवस्था।
याचि नांवें चौथा। पुरुषार्थ गा॥ ४०२॥

परी माझें आराधन। ब्रह्मत्वीं होय सोपान।
एथ मी हन साधन। गमेन हो॥ ४०३॥

तरी झणें झणें ऐसें। तुझां चित्तीं पैसें।
पैं ब्रह्म आन नसे। मी वांचूनि॥ ४०४॥

ब्रह्मणो हि प्रतिष्ठाहम् अमृतस्याव्ययस्य च॥
शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्यैकान्तिकस्य च॥ १४.२७॥

अगा ब्रह्म या नांवा। अभिप्रावो मी पांडवा।
मीचि बोलिजे आघवां। शब्दीं इहीं॥ ४०५॥

पैं मंडळ आणि चंद्रमा। दोन्ही नव्हती सुवर्मा।
तैसा मज आणि ब्रह्मा। भेदु नाहीं॥ ४०६॥

अगा नित्य जें निष्कंप। अनावृत्त धर्मरूप।
सुख जें जें उमप। अद्वितीय॥ ४०७॥

विवेकु आपलें काम। सारूनि ठाकी जें धाम।
निष्कर्षाचें निःसीम। किंबहुना मी॥ ४०८॥

ऐसेसें हो अवधारा। तो अनन्याचा सोयरा।
सांगतसे वीरा। पार्थासी॥ ४०९॥

येथ धृतराष्ट्र म्हणे। संजया हें तूतें कोणें।
पुसलेनिविण वायाणें। कां बोलसी॥ ४१०॥

माझी अवसरी ते फेडीं। विजयाची सांगें गुढी।
येरु जीवीं म्हणे सांडीं। गोठी यिया॥ ४११॥

संजयो विस्मयें मानसीं। आहा करूनि रसरसीं।
म्हणे कैसें पां देवेंसीं। द्वंद्व यया॥ ४१२॥

तरी कृपाळु तो तुष्टो। यया विवेकु हा घोंटो।
मोहाचा फिटो। महारोगु॥ ४१३॥

संजयो ऐसें चिंतितां। संवादु तो सांभाळितां।
हरिखाचा येतु चित्ता। महापूरु॥ ४१४॥

म्हणोनि आतां येणें। उत्साहाचेनि अवतरणें।
श्रीकृष्णाचें बोलणें। सांगिजैल॥ ४१५॥

तया अक्षरा आंतील भावो। पाववीन मी तुमचा ठावो।
आइका म्हणे ज्ञानदेवो। निवृत्तीचा॥ ४१६॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे गुणातीत( गुणत्रयविभाग) योगोनाम चतुर्दशोऽध्यायः॥

इति ज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां चतुर्दशोऽध्यायः॥ १४॥

( श्लोक २७ ओव्या ४१६)

# 15 Yoga of the Supreme Person पुरुषोत्तमयोग

श्रीमद्भगवद्गीता पञ्चदशोऽध्यायः।
ज्ञानेश्वरी अध्याय पंधरावा

---

आतां हृदय हें आपुलें। चौफाळुनियां भलें।
वरी बैसऊं पाउलें। श्रीगुरूचीं॥ १॥

ऐक्य भावाची अंजुळी। सर्वेंद्रियकुड्मुळी।
भरूनियां पुष्पांजुळी। अर्घ्यु देवों॥ २॥

अनन्योदकें धुवट। वासना जे तन्निष्ठ।
ते लागलेसे अबोट। चंदनाचें॥ ३॥

प्रेमाचेनि भांगारें। निर्वाळूनि नूपरें।
लेववूं सुकुमारें। पदें तियें॥ ४॥

घणावली आवडी। अव्याभिचारें चोखडी।
तिये घालूं जोडी। आंगोळिया॥ ५॥

आनंदामोदबहुळ। सात्त्विकाचें मुकुळ।
तें उमललें अष्टदळ। ठेऊं वरी॥ ६॥

तेथे अहं हा धूप जाळूं। नाहं तेजें वोवाळूं।
सामरस्यें पोटाळूं। निरंतर॥ ७॥

माझी तनु आणि प्राण। इया दोनी पाउवा लेववूं श्रीचरण।
करूं भोगमोक्ष निंबलोण। पायां तयां ॥ ८॥

इया श्रीगुरुचरणसेवा। हों पात्र तया दैवा।
जें सकळार्थमेळावा। पाटु बांधे॥ ९॥

ब्रह्मींचें विसवणेंवरी। उन्मेख लाहे उजरी।
जें वाचेतें इये करी। सुधासिंधु॥ १०॥

पूर्णचंद्राचिया कोडी। वक्तृत्वा घापे कुरोंडी।
तैसी आणी गोडी। अक्षरांतें॥ ११॥

सूर्यें अधिष्ठिली प्राची। जगा राणीव दे प्रकाशाची।
तैशी वाचा श्रोतयां ज्ञानाची। दिवाळी करी॥ १२॥

नादब्रह्म खुजें। कैवल्यही तैसें न सजे।
ऐसा बोलु देखिजे। जेणें दैवें॥ १३॥

श्रवणसुखाच्यां मांडवीं। विश्व भोगी माधवी।
तैसी सासिने बरवी। वाचावल्ली॥ १४॥

ठावो न पवतां जयाचा। मनेंसी मुरडली वाचा।
तो देवो होय शब्दाचा। चमत्कारु॥ १५॥

जें ज्ञानासि न चोजवे। ध्यानासिही जें नागवे।
तें अगोचर फावे। गोठीमाजीं॥ १६॥

येवढें एक सौभग। वळघे वाचेचें आंग।
श्रीगुरुपादपद्मपराग। लाहे जैं कां॥ १७॥

तरी बहु बोलूं काई। आजि तें आन ठाई।
मातें वाचूनि नाहीं। ज्ञानदेवो म्हणे॥ १८॥

जे तान्हेनि मिया अपत्यें। आणि माझे गुरुसि एकलौते।
म्हणौनि कृपेसि एकहातें। जालें तिये॥ १९॥

पाहा पां भरोवरी आघवी। मेघ चातकांसी रिचवी।
मजलागी गोसावीं। तैसें केलें॥ २०॥

म्हणोनि रिकामें तोंड। करूं गेलें बडबड।
कीं गीता ऐसें गोड। आतुडलें॥ २१॥

होय अदृष्ट आपैतें। तैं वाळूचि रत्नें परते।
उजू आयुष्य तैं मारितें। लोभु करी॥ २२॥

आधणीं घातलिया हरळ। होती अमृताचे तांदुळ।
जरी भुकेची राखे वेळ। श्रीजगन्नाथु॥ २३॥

तयापरी श्रीगुरु। करिती जैं अंगीकारु।
तैं होऊनि ठाके संसारु। मोक्षमय आघवा॥ २४॥

पाहा पां काई नारायणें। तया पांडवांचें उणें।
कीजेचि ना पुराणें। विश्ववंद्यें॥ २५॥

तैसें श्रीनिवृत्तिराजें। अज्ञानपण हें माझें।
आणिलें वोजे। ज्ञानाचिया॥ २६॥

परि हें असो आतां। प्रेम रुळतसे बोलतां।
कें गुरुगौरव वर्णितां। उन्मेष असे॥ २७॥

आतां तेणेंचि पसायें। तुम्हां संताचे मी पाये।
वोळगेन अभिप्रायें। गीतेचेनि॥ २८॥

तरी तोचि प्रस्तुतीं। चौदाविया अध्यायाच्यां अंतीं।
निर्णयो कैवल्यपती। ऐसा केला॥ २९॥

जें ज्ञान जयाच्यां हातीं। तोचि समर्थु मुक्ती।
जैसा शतमख संपत्ती। स्वर्गीचिये॥ ३०॥

कां शत एक जन्मां। जो जन्मोनि ब्रह्मकर्मा।
करी तोचि ब्रह्मा। आनु नोहे॥ ३१॥

ना ना सूर्याचा प्रकाशु। लाहे जेवीं डोळसु।
तेवीं ज्ञानेंचि सौरसु। मोक्षाचा तो॥ ३२॥

तरी तया ज्ञानालागीं। कवणा पां योग्यता आंगीं।
हें पाहतां जगीं। देखिला एकु॥ ३३॥

जें पाताळींचेही निधान। दावील कीर अंजन।
परी होआवे लोचन। पायाळाचे॥ ३४॥

तैसें मोक्ष देईल ज्ञान। येथ कीर नाहीं आन।
परी तेंचि थारे ऐसें मन। शुद्ध होआवें॥ ३५॥

तरी विरक्तीवांचूनि केहीं। ज्ञानासि तगणें नाहीं।
हें विचारूनि ठाई। ठेविलें देवें॥ ३६॥

आतां विरक्तीची कवण परी। जे येऊनि मनातें वरी।
हेंही सर्वज्ञें श्रीहरी। देखिलें असे॥ ३७॥

जे विषे रांधिली रससोये। जैं जेवणारा ठाउवी होये।
तैं तो ताटचि सांडूनि जाये। जयापरी॥ ३८॥

तैसी संसारा या समस्ता। जाणिजे जैं अनित्यता।
तैं वैराग्य दवडितां। पाठीं लागे॥ ३९॥

आतां अनित्यत्व या कैसें। तेंचि वृक्षाकारमिषें।
सांगिजत असे विश्वेशें। पंचदशीं॥ ४०॥

उपडिलें कवतिकें। झाड येरी मोहरा ठाके।
तें वेगें जैसें सुके। तैसें हें नव्हे जाण॥ ४१॥

याचि एकेपरी। रूपकाचिया कुसरी।
सारीतसे वारी। संसाराची॥ ४२॥

करूनि संसार वावो। स्वरूपीं अहंते ठावो।
होआवया अध्यावो। पंधरावा हा॥ ४३॥

आतां हेंचि आघवें। ग्रंथगर्भीचें चांगावें।
उपलविजेल जीवें। आकर्णिजे॥ ४४॥

तरी महानंदसमुद्र। जो पूर्ण पूर्णिमाचंद्र।
तो द्वारकेचा नरेंद्र। ऐसें म्हणे॥ ४५॥

अगा पैं पंडुकुमरा। येतां स्वरूपाचिया घरा।
करीतसे आडवारा। विश्वाभासु जो॥ ४६॥

तो हा जगडंबरु। नोहे येथ संसारु।
हा जाणें महातरु। थांवला असे॥ ४७॥

परी येरां रुखांसारिखा। तळीं मूळें वरी शाखा।
तैसा नोहे म्हणोनि लेखा। नये कवणा॥ ४८॥

आगी का कुऱ्हाडी। होय रिगावा जरी बुडीं।
तरी हो कां भलतेवढी। वरिचील वाढी॥ ४९॥

जे तुटलिया मूळापाशीं। उलंडेल कां शाखांशीं।
परी तैशी गोठी कायशी। हा सोपा नव्हे॥ ५०॥

अर्जुना हें कवतिक। सांगतां असे अलौकिक।
जे वाढी अधोमुख। रुखा यया॥ ५१॥

जैसा भानु उंचीं नेणो कें। रश्मिजाळ तळीं फांके।
संसार हें कावरुखें। झाड तैसें॥ ५२॥

आणि आथी नाथी तितुकें। रुंधलें असे येणेंचि एकें।
कल्पांतींचेनि उदकें। व्योम जैसें॥ ५३॥

कां रवीच्यां अस्तमानीं। आंधारेनि कोंदे रजनी।
तैसा हाचि गगनीं। मांडला असे॥ ५४॥

यया फळ ना चुंबितां। फूल ना तुरंबितां।
जें कांहीं पंडुसुता। तें रुखुचि हा॥ ५५॥

हा ऊर्ध्वमूळ आहे। परी उन्मूळिला नोहे।
येणेंचि हा होये। शाड्वळु गा॥ ५६॥

आणि ऊर्ध्वमूळ ऐसें । निगदिलें कीर असे।
परी अधींही असोसें। मूळें यया॥ ५७॥

पैं बल्वचेचि महाभारी। पिंपळा कां वडाचिया परी।
जे पारंबियांमाझारीं। डहाळिया असती॥ ५८॥

तेवींचि गा धनंजया। संसारतरु यया।
अधींचि आथी खांदिया। हेंही नाहीं॥ ५९॥

तरी ऊर्ध्वाहीकडे। शाखांचे मांदोडे।
दिसताति अपाडें। सासिन्नले॥ ६०॥

जालें गगनचि पां वेलिये। कां वारा मांडला रुखाचेनि आयें।
ना ना अवस्थात्रयें। उदयला असे॥ ६१॥

ऐसा हा एकु। विश्वाकार विटंकु।
उदयला जाण रूखु। ऊर्ध्वमूळु॥ ६२॥

आतां ऊर्ध्व या कवण। येथें मूळ तें किं लक्षण।
कां अधोमुखपण। शाखा कैसिया॥ ६३॥

अथवा द्रुमा यया। अधीं जिया मूळिया।
तिया कोण कैसिया। ऊर्ध्व शाखा॥ ६४॥

आणि अश्वत्थु हा ऐसी। प्रसिद्धी कायसी।
आत्मविदविलासीं। निर्णयो केला॥ ६५॥

हें आघवेंचि बरवें। तुझिये प्रतीतीसि फावे।
तैसेनि सांगों सोलिवें। विन्यासें गा॥ ६६॥

परी ऐकें गा सुभगा। हा प्रसंगु असे तुजचि जोगा।
कानचि करी हो सर्वांगा। हियें आथिलिया॥ ६७॥

ऐसें प्रेमरसें सुरफुरें। बोलिलें जंव यादववरें।
तंव अवधान अर्जुनाकारें। मूर्त जालें॥ ६८॥

देव निरूपिती तें थेंकुलें। येवढें श्रोतेपण फांकलें।
जैसें आकाशा खेंव पसरिलें। दाहीं दिशीं॥ ६९॥

श्रीकृष्णोक्तिसागरा। हा अगस्तीचि दुसरा।
म्हणौनि घोंटु भरों पाहे एकसरा। अवघेयाचा॥ ७०॥

ऐसी सोय सांडूनि खवळिली। आवडी अर्जुनीं देवें देखिली।
तेथ जालेनि सुखें केली। कुरवंडी तया॥ ७१॥

श्रीभगवानुवाच।
ऊर्ध्वमूलमधःशाखम् अश्वत्थं प्राहुरव्ययम्॥
छन्दांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित्॥ १५.१॥

मग म्हणे धनंजया। तें ऊर्ध्व गा तरू यया।
येणें रुखेंचि कां जया। ऊर्ध्वता गमे॥ ७२॥

एऱ्हवीं मध्य ऊर्ध्व अध। हे नाहीं जेथ भेद।
अद्वयासीं एकवद। जया ठायीं॥ ७३॥

जो नाइकिजतां नादु। जो असौरभ्य मकरंदु।
जो आंगाथिला आनंदु। सुरतेंविण॥ ७४॥

जया जें आऱ्हां परौतें। जया जें पुढें मागौतें।
दिसतेविण दिसते। अदृश्य जें॥ ७५॥

उपाधीचा दुसरा। घालितां वोपसरा।
नामरूपाचा संसारा। होय जयातें॥ ७६॥

ज्ञातृज्ञेयाविहीन। नुसधेचि जें ज्ञान।
सुखा भरलें गगन। गाळींव जें॥ ७७॥

जें कार्य ना कारण। जया दुजें ना एकपण।
आपणयां जें जाण। आपणचि॥ ७८॥

ऐसें वस्तु जें साचें। तें ऊर्ध्व गा यया तरूचें।
तेथ आर घेणें मूळाचें। तें ऐसें असे॥ ७९॥

तरी माया ऐसी ख्याती। नसतीच तया आथी।
कां वांझेची संतती। वानणें जैशी॥ ८०॥

तैशी सत् ना असत् होये। जे विचाराचें नाम न साहे।
ऐसेया परीची आहे। अनादि म्हणती॥ ८१॥

जे भवद्रुमबीजिका। जे प्रपंचाची भूमिका।
विपरीतज्ञानदीपिका। सांचली जे॥ ८२॥

जे ना ना शक्तींची मांदुस। जगदभ्राचें आकाश।
जे आकारजाताचें दुस। घडी केलें॥ ८३॥

ते माया वस्तूच्यां ठायीं। असे जैसेनि नाहीं।
मग वस्तुप्रभाचि पाहीं। प्रगट होय॥ ८४॥

जेव्हां आपणया आली निद। करी आपणपें जेवीं मुग्ध।
कां काजळी आणी मंद। प्रभा दीपीं॥ ८५॥

स्वप्नीं प्रियापुढें तरुणांगी। निदेली चेवऊनि वेगीं।
आलिंगिलेनिवीण आलिंगी। सकामु करी॥ ८६॥

तैसी स्वरूपीं जाली माया। आणी स्वाश्रयीं नेणणें धनंजया।
तेंचि रुखा यया। मूळ पहिलें॥ ८७॥

वस्तूसी आपुला जो अबोधु। तो ऊर्ध्वी आठुळैजे कंदु।
वेदांतींही हाचि प्रसिद्धु। बीजभावो॥ ८८॥

घन अज्ञानसुषुप्ती। तो बीजांकुरभावो म्हणती।
येर स्वप्न हन जागृती। हा फळभावो तयाचा॥ ८९॥

ऐसी यया वेदांती। निरूपणभाषाप्रतीती।
परी तें असो प्रस्तुतीं। अज्ञान मूळ॥ ९०॥

ते ऊर्ध्व आत्मा निर्मळे। अधोर्ध्व सूचिती मूळें।
बळिया बांधोनि आळें। मायायोगाचें॥ ९१॥

मग आधिलीं सदेहांतरें। उठती जियें अपारें।
तें चौपासि घेऊनि आगारें। खोलावती॥ ९२॥

ऐसें भवद्रुमाचें मूळ। हें ऊर्ध्वी करी बळ।
मग आणियांचें बेंचळ। अधीं दावी॥ ९३॥

तेथ चिद्वृत्ति पहिलें। महत्तत्त्व उमललें।
तें पान वाल्हें दुल्हें। एक निघे॥ ९४॥

मग सत्त्वरजतमात्मकु। त्रिविध अहंकारु जो एकु।
तो तिवणा अधोमुखु। डिरु फुटे॥ ९५॥

तो बुद्धीची घेऊनि आगारी। भेदाची वृद्धि करी।
तेथें मनाचें डाळ धरी। साजेपणें॥ ९६॥

ऐसा मूळाचिया गाढिका। विकल्परस कोंवळिका।
चित्तचतुष्टय डाहाळिका। कोंभैजे तो॥ ९७॥

मग आकाश वायु द्योतक। आप पृथ्वी हे पांच फोंक।
महाभूतांचे सारोख। सरळे होती॥ ९८॥

तैसींचि श्रोत्रादि तन्मात्रें। तियें अंगवसां गर्भपत्रें।
लुळलुळितें विचित्रें। उमळती गा॥ ९९॥

तेथ शब्दांकुर वरिपडी। श्रोत्रा वाढी देव्हडी।
होता करिती कांडीं। आकांक्षेचीं॥ १००॥

अंगत्वचेचे वेलपल्लव। स्पर्शांकुरीं घेती धांव।
तेथ बांबळ पडे अभिनव। विकारांचें॥ १०१॥

पाठीं रूपपत्र पालोवेलीं। चक्षु लांब तें कांडें घाली।
तेथ व्यामोहता भली। पाहाळीं जाय॥ १०२॥

आणि रसाचे आंगवसें। वाढतां वेगें बहुवसें
जिव्हे आर्तीचीं असोसें। निघती बेचें॥ १०३॥

तैसीचि कोंभैलेनि गंधें। घ्राणाची डिरी थांबु बांधे।
तेथ तळु घे स्वानंदें। प्रलोभाचा॥ १०४॥

एवं महदहंबुद्धि। मनें महाभूतसमृद्धि।
इया संसाराचिया अवधि। सासनिजे॥ १०५॥

किंबहुना इठीं आठें। आंगीं हा अधिक फांटे।
परी शिंपीचि येवढें उमटे। रुपें जेवीं॥ १०६॥

कां समुद्राचेनि पैसारें। वरी तरंगता असारे।
तैसें ब्रह्मचि होय वृक्षाकारें। अज्ञानमूळ॥ १०७॥

आतां याचा हाचि विस्तारु। हाचि यया पैसारु।
जैसा आपणपें स्वप्नीं परिवारु। येकाकिया॥ १०८॥

परी तें असो हें ऐसें। कावरें झाड उससे।
यया महदादि आरवसें। अधोशाखा॥ १०९॥

आणि अश्वत्थु ऐसें ययातें। म्हणती जे जाणते।
तेंही परिस हो येथें। सांगिजेल॥ ११०॥

तरी श्वः म्हणिजे उखा। तोंवरि एकसारिखा।
नाहीं निर्वाहो यया रुखा। प्रपंचरूपा॥ १११॥

जैसा न लोटतां क्षणु। मेघु होय ना ना वर्णु।
कां विजु नसे संपूर्णु। निमेषभरी॥ ११२॥

ना कांपतया पद्मदळा। विरीलिया बैसका नाहीं जळा।
कां चित्त जैसें व्याकुळा। माणुसाचें॥ ११३॥

तैसीचि ययाची स्थिती। नसत जाय क्षणक्षणाप्रती।
म्हणौनि ययातें म्हणती। अश्वत्थु हा॥ ११४ ॥

आणि अश्वत्थु येणें नांवें। पिंपळु म्हणती स्वभावें।
परी तो अभिप्रावो नव्हे। श्रीहरीचा॥ ११५ ॥

एऱ्हवीं पिंपळु घडतां विखीं। मियां गति देखिली असे निकी।
परी तें असो काय लौकिकीं। हेतु काज॥ ११६ ॥

म्हणोनि हा प्रस्तुतु। अलौकिकु परियेसा ग्रंथु।
तरी क्षणिकत्वेंचि अश्वत्थु बोलिजे हा॥ ११७ ॥

आणीकही एकु थोरु। यया अव्ययत्वाचा डगरु।
आथी परी तो भीतरु। ऐसा असे॥ ११८ ॥

जैसा मेघांचेनि तोंडें। सिंधु एकें आंगें काढे।
आणि नदी येरीकडे। भरितीचि असती॥ ११९ ॥

तेथ वोहटे ना चढे। ऐसा परिपूर्णुचि आवडे।
परी ते फुली जंव नुघडे। मेघांनदींची॥ १२० ॥

ऐसें या रुखाचें होणें जाणें। न तर्के होतेनि वहिलेपणें।
म्हणौनि लोकु यातें म्हणे। अव्ययु हा॥ १२१ ॥

एऱ्हवीं दानशीळु पुरुषु। वेंचकपणें संचकु।
तैसा व्ययेंहीं हा रुखु। अव्ययो गमे॥ १२२ ॥

जातां वेगें बहुवसें। न वचे कां भूमी रुतलें असे।
रथाचें चक्र दिसे। जियापरी॥ १२३ ॥

तैसें काळातिक्रमें जे वाळे। ते भूतशाखा जेथ गळे।
तेथ कोडीवरी उमाळे। उठती आणिक॥ १२४ ॥

परी येकी केधवां गेली। शाखाकोडी केधवां जाली।
हें नेणवे जेवीं उमललीं। आषाढ अभ्रें॥ १२५ ॥

महाकल्पाच्यां शेवटीं। उदेलिया उमळती सृष्टी।
तैसेंचि आणिखीचें दांग उठी। सासिन्नलें॥ १२६ ॥

संहारवातें प्रचंडें। पडती प्रळयांतींचीं सालडें।
तंव कल्पादीचीं जुंबाडें। पाल्हेजती॥ १२७ ॥

रिगे मन्वंतर मनूपुढें। वंशावरी वंशांचें मांडे।
जैसी इक्षुवृद्धी कांडेनकांडें। जिंके जेवीं॥ १२८ ॥

कलियुगांतीं कोरडीं चहुं युगांची सालें सांडी।
तंव कृतयुगाची पेली देव्हडी। पडे पुढती॥ १२९ ॥

वर्ततें वर्ष जाये। तें पुढिला मुळहारी होये।
जैसा दिवसु जात कीं येत आहे। हें चोजवेना॥ १३० ॥

जैशा वारियाचां झुळकां। सांदा ठाउवा नव्हे देखा।
तैसिया उठती पडती शाखा। नेणों किती॥ १३१ ॥

एकी देहाची डिरी तुटे। तंव देहांकुरीं बहुवी फुटे।
ऐसेनि भवतरु हा वाटे। अव्ययो ऐसा॥ १३२ ॥

जैसें वाहतें पाणी जाय वेगें। तैसेंचि आणिक मिळे मागे।
तेवीं असंतचि असिजे जगें। मानिजे संत॥ १३३ ॥

कां लागोनि डोळा उघडे। तंव कोडीवरी घडे मोडे।
तें नेणतया तरंगु आवडे। नित्यु ऐसा॥ १३४ ॥

वायसा एकें बुबुळें दोहींकडे। डोळा चाळीतां अपाडें।
दोन्ही आथी ऐसा पडे। भ्रमु जेवीं जगा॥ १३५ ॥

पैं भिंगोरी निधिये पडली। ते गमे भूमीवरी जैसी जडली।
ऐसा वेगातिशयो भुली। हेतु होय॥ १३६ ॥

हें बहु असो झडती। आंधारे भोवंडितां कोलती।
ते दिसे जैसी आयती। चक्राकार॥ १३७ ॥

हा संसारवृक्षु तैसा। मोडतु मांडतु सहसा।
न देखोनि लोकु पिसा। अव्ययो मानी॥ १३८ ॥

परि ययाचा वेगु देखे। जो हा क्षणिक ऐसा वोळखे।
जाणे कोडिवेळां निमिखे। होत जात॥ १३९ ॥

नाहीं अज्ञानावांचूनि मूळ। ययाचें असिलेपण टवाळ।
ऐसें झाड सिनसाळ। देखिलें जेणें॥ १४० ॥

तयातें गा पंडुसुता। मी सर्वज्ञुही म्हणें जाणता।
पैं वाग्ब्रह्मसिद्धांता। वंद्यु तोचि॥ १४१ ॥

योगजाताचें जोडलें। तया एकासीचि उपेगा गेलें।
किंबहुना जियालें। ज्ञानही तेणें॥ १४२॥

असो बहु हें बोलणें। वानिजेल तो कवणें।
जो भवरुखु जाणे। उखि ऐसा॥ १४३॥

अधश्चोर्ध्वं प्रसृतास्तस्य शाखा
गुणप्रवृद्धा विषयप्रवालाः॥
अधश्च मूलान्यनुसन्ततानि
कर्मानुबन्धीनि मनुष्यलोके॥ १५.२॥

मग ययाचि प्रपंचरूपा। अधोशाखिया पादपा।
डाहाळिया जाती उपमा। ऊर्ध्वाही उजू॥ १४४॥

आणि अधीं फांकलीं डाळें। तियें होतीं मूळें।
तयांही तळीं पघळे। वेल पालवु॥ १४५॥

ऐसें जें आम्हीं। म्हणितलें उपक्रमीं।
तेंही परिसें सुगमीं। बोलीं सांगों॥ १४६॥

तरी बद्धमूळें अज्ञानें। महदादिकीं शासनें।
वेदांचीं थोरवनें। घेऊनियां॥ १४७॥

परि आधीं तंव स्वेदज। जारायुज उद्भिज अंडज।
हे बुडौनि महाभुज। उठती चारी॥ १४८॥

यया एकैकाचेनि आंगवटें। चौऱ्यांशीं लक्षधा फुटे।
ते वेळीं जीवशाखीं फांटे। सैंध होती॥ १४९॥

प्रसवती शाखा सरळिया। ना ना सृष्टि डाहाळिया।
आड फांटती माळिया। जातिचिया॥ १५०॥

स्त्री पुरुष नपुंसकें। हे व्यक्तिभेदांचे टके।
आंदोळती आंगिकें। विकारभारें॥ १५१॥

जैसा वर्षाकाळु गगनीं। पाल्हेजे नवघनीं।
तैसें आकारजात अज्ञानीं। वेला जाय॥ १५२॥

मग शाखाचेनि आंगभारें। लवोनि गुंफती परस्परें।
गुणक्षोभाचे वारे। उदयजती॥ १५३॥

तेथ तेणें अचाटें। गुणाचेनि झडझडाटें।
तिहीं ठायीं हा फांटे। ऊर्ध्वमूळ॥ १५४॥

ऐसा रजाचिया झुळुका। झडाडितां आगळिका।
मनुष्यजातीशाखा। थोरावती॥ १५५॥

तिया ऊर्ध्वीं ना अधीं। माझारींचि कोंदाकोंदी।
आड फुटती खांदी। चतुर्वर्णाचिया॥ १५६॥

तेथ विधिनिषेधीं सपल्लव। वेदवाक्यांचे अभिनव।
पालव डोलती बरव। आणिती तयां॥ १५७॥

अर्थु कामु पसरे। अग्रवनें घेती थारे।
तेथ क्षणिकें पदांतरें। इहभोगांचीं॥ १५८॥

तेथ प्रवृत्तीचेनि वृद्धिलाभे। खांकरेजती शुभाशुभें।
ना ना कर्मांचे खांबे। नेणों किती॥ १५९॥

तेवींचि भोगक्षयें मागिलें। पडती देहांचीं बुडसळें।
तंव पुढां वाढी पेले। नवेया देहांची॥ १६०॥

आणि शब्दादिक सुहावे। सहज रंगें हवावे।
विषयपल्लव नवे। नित्यचि होती॥ १६१॥

ऐसें रजोवातें प्रचंडें। मनुष्यशाखांचे मांदोडे।
वाढती तो एथ रुढे। मनुष्यलोकु॥ १६२॥

तैसाचि तो रजाचा वारा। नावेक धरी वोसरा।
मग वाजों लागे घोरा। तमाचा तो॥ १६३॥

तेधवां याचि मनुष्यशाखा। नीच वासना अधीं देखा।
पल्हेजती डाहाळुका। कुकर्मांचिया॥ १६४॥

अप्रवृत्तीचे खणुवाळे। फोक निघती सरळे।
घेत पान पालव डाळें। प्रमादाचीं॥ १६५॥

बोलती निषेधनियमें। जिया ऋचा यजुःसामें।
तो पाला तया घुमे। टकेयावरी॥ १६६॥

प्रतिपादिती अभिचार। आगम जे परमार।
तेही पानीं घेती प्रसर। वासना वेली॥ १६७॥

तंव तंव होती थोराडें। अकर्माचीं तळबुडें।
आणि जन्मशाखा पुढें पुढें। घेती धांव॥ १६८॥

तेथ चांडाळादि निकृष्टा। दोषजातीचा थोर फांटा।
जाळ पडे कर्मभ्रष्टां। भुलोनियां॥ १६९ ॥

पशु पक्षी सूकर। व्याघ्र वृश्चिक विखार।
हे आडशाखानिकर। थोरावती॥ १७० ॥

परी ऐशा शाखा पांडवा। सर्वांगींहि नित्य नवा।
नरकभोग यावा। फळाचा तो॥ १७१ ॥

आणि हिंसाविषयपुढारी। कुकर्मसंगें धुर धरी।
जन्मवरी आगारी। वाढतीचि असे॥ १७२ ॥

ऐसे होती तरु तृण। लोह लोष्ठ पाषाण।
इया खांदिया तेवीं जाण। फळेंहि हेंचि॥ १७३ ॥

अर्जुना गा अवधारीं। मनुष्या लागोनि इया परी।
वृद्धि स्थावरांतवरी। अधोशाखांची॥ १७४ ॥

म्हणोनि जीं मनुष्य डाळें। येंचि जाणावीं अधींचि मूळें।
जे एथूनि मग पघळे। संसार तरु॥ १७५ ॥

एऱ्हवीं ऊर्ध्वींचें पार्था। मुद्दल मूळ पाहतां।
अधींचिया मध्यस्था। शाखा इया॥ १७६ ॥

परी तामसीं सात्त्विकीं। सुकृतदुष्कृतात्मकीं।
विरुढती या शाखीं। अधोर्ध्वींचियां॥ १७७ ॥

आणि वेदत्रयीचिया पाना। नये अन्यत्र लागों अर्जुना।
जे मनुष्यावांचूनि विधाना। विषो नाहीं॥ १७८ ॥

म्हणोनि तनु मानुषा। इया ऊर्ध्वमूळौनि जरी शाखा।
तरी कर्मवृद्धीसि देखा। इयेंचि मूळें॥ १७९ ॥

आणि आनीं तरी झाडीं। शाखा वाढतां मुळें गाढीं।
मूळ गाढें तंव वाढी। पैस आथी॥ १८० ॥

तैसेंचि इया शरीरा। कर्में तंव देहा संसारा।
आणि देह तंव व्यापारा। ना म्हणोंचि न ये॥ १८१ ॥

म्हणोनि देहें मानुषें। इयें मुळें होती न चुके।
ऐसें जगज्जनकें। बोलिलें तेणें॥ १८२ ॥

मग तमाचें तें दारुण। स्थिरवलेया वउधाण।
सत्त्वाची सुटे सत्राण। वाहुटळी॥ १८३ ॥

तैं याचि मनुष्याकारा। मुळीं सुवासना निघती आरा।
घेऊनि फुटती कोंबारा। सुकृतांकुरीं॥ १८४ ॥

उकलतेनि उन्मेखें। प्रज्ञाकुशलतेची तिखें।
डिरिया निघती निमिखें। बाबळैजुनी॥ १८५ ॥

मतीचे सोट वावे। घालिती स्फूर्तींचेनि थांवें।
बुद्धि प्रकाश घे धांवें। विवेकाचेनि॥ १८६ ॥

तेथ मेधरसें सगर्भ। आस्था पत्रीं सबोंब।
सरळ निघती कोंभ। सद्वृत्तीचे॥ १८७ ॥

सदाचाराचिया सहसा। टका उठती बहुवसा।
घुमघुमिति घोषां। वेदपद्यांच्यां॥ १८८ ॥

शिष्टागमविधानें। विविधयागवितानें।
इयें पानावरी पानें। पांजरती॥ १८९ ॥

ऐशा यमदमीं घोंसाळिया। उठती तपाचिया डाहाळिया
देती वैराग्यशाखा कवळिया। वेल्हाळपणें॥ १९० ॥

विशिष्टां व्रतांचे फोक। धीराच्यां आणगटीं तिख।
जन्मवेगें ऊर्ध्वमुख। उंचावती॥ १९१ ॥

माजीं वेदांचा पला दाट। तो करी सुविद्येचा झडझडाट।
जंव वाजे अचाट। सत्त्वानिळु तो॥ १९२ ॥

तेथ धर्मडाळ वाहाळी। दिसती जन्मशाखा सरळी।
तिया आड फुटती फळीं। स्वर्गादिकीं॥ १९३ ॥

पुढां उपरती रागें लोहिवी। धर्ममोक्षाची शाखा पालवी।
पाल्हाजत नित्य नवी। वाढतीचि असे॥ १९४ ॥

पैं रविचंद्रादि ग्रहवर। पितृ ऋषी विद्याधर।
हे आडशाखा प्रकार। पैसु घेती॥ १९५ ॥

याहीपासून उंचवडे। गुढले फळाचेनि बुडें।
इंद्रादिक ते मांडोदे। थोर शाखांचे॥ १९६ ॥

मग तयांही उपरी डाहाळिया। तपोज्ञानीं उंचावलिया।
मरीचि कश्यपादि इया। उपरी शाखा॥ १९७॥

एवं माळोवाळी उत्तरोत्तरु। ऊर्ध्वशाखांचा हा पैसारु।
बुडीं साना अग्रीं थोरु। फळाढ्यपणें॥ १९८॥

वरी उपरिशाखाही पाठीं। येती फळभार जे किरीटी।
ते ब्रह्मेशांत अणगटीं। कोंभ निघती॥ १९९॥

फळाचेनि वोझेपणें। ऊर्ध्वी वोवांडें दुणें।
जंव माघौतें बैसणें। मूळींचि होय॥ २००॥

प्राकृताही तरी रुखा। जे फळें दाटली होय शाखा।
ते वोवांडली देखा। बुडासि ये॥ २०१॥

तैसें जेथूनि हा आघवा। संसारतरूचा उठावा।
तियें मूळीं टेंकती पांडवा। वाढतेनि ज्ञानें॥ २०२॥

म्हणौनि ब्रह्मेशानापरौतें। वाढणें नाहीं जीवातें।
तेथूनि मग वरौतें। ब्रह्मचि कीं॥ २०३॥

परि हे असो ऐसे। ब्रह्मादिक ते आंगवसे।
ऊर्ध्वमुळासरिसे। न तुकती गा॥ २०४॥

आणीकही शाखा उपरता। जिया सनकादिकनामें विख्याता।
तिया फळीं मूळीं नाडळतां। भरलिया ब्रह्मां॥ २०५॥

ऐसीं मनुष्यालागौनि जाणावी। ऊर्ध्वा ब्रह्मादिशेष पालवी।
शाखांची वाढी बरवी। उंचावे पैं॥ २०६॥

पार्था ऊर्ध्वीचिया ब्रह्मादि। मनुष्यत्वचि होय आदि।
म्हणौनि इयें अधीं। म्हणितलीं मूळें॥ २०७॥

एवं तुज अलौकिकु। हा अधोर्ध्वशाखु।
सांगितला भवरुखु। ऊर्ध्वमूळु॥ २०८॥

आणि अधीचीं हीं मूळें। उपपत्ती परिसविलीं सविवळें।
आतां परिस उन्मूळे। कैसेनि हा॥ २०९॥

न रूपमस्येह तथोपलभ्यते
नान्तो न चादिर्न च संप्रतिष्ठा॥
अश्वत्थमेनं सुविरूढमूलम्
असङ्गशस्त्रेण दृढेन छित्त्वा॥ १५.३॥

परी तुझ्यां हन पोटीं। ऐसें गमेल किरीटी।
जे एवढें झाड उत्पाटी। ऐसें कायि असे॥ २१०॥

कीं ब्रह्मयाच्यां शेवटवरी। ऊर्ध्व शाखांची थोरी।
आणि मूळ तंव निराकारीं। ऊर्ध्वी असे॥ २११॥

हा स्थावराही तळीं। फांकत असे अधींच्या डाळीं।
माजीं धांवतसे दुजां मूळीं। मनुष्यरूपीं॥ २१२॥

ऐसा गाढा आणि अफाटु। आतां कोण करी यया शेवटु।
तरी झणीं हा हळुवटु। धरिसी भावो॥ २१३॥

परी हा उन्मूळावया दोषें। येथ सायासचि कायिसे।
काय बाळा बागुल देशें। दवडावा आहे॥ २१४॥

गंधर्वदुर्ग कायी पाडावे। काय शशविषाण मोडावें।
होआवें मग तोडावें। खपुष्प कीं॥ २१५॥

तैसा संसारु हा वीरा। रुख नाहीं साचोकारा।
मा उन्मूळणीं दरारा। कायिसासा तरी॥ २१६॥

आम्हीं सांगितली जे परी। मूळडाळांची उजरी।
ते वांझेचीं घरभरीं। लेकुरें जैशीं॥ २१७॥

काय कीजती चेइलेपणीं। स्वप्नींची तियें बोलणीं।
तैशी जाण ते काहाणी। दुबळीचि ते॥ २१८॥

वांचूनि आम्हीं निरूपिलें जैसें। ययाचें अचळ मूळ असे तैसें।
आणि तैसाचि जरी हा असे। साचोकारा॥ २१९॥

तरी कोणाचेनि संतानें। निपजती या उन्मूळणें।
काय फुंकिलिया गगनें। जाइजेल गा॥ २२०॥

म्हणौनि पैं धनंजया। आम्हीं वानिलें रूप तें माया।
कासवीचेनि तुपें राया। वोगरिलें जैसें॥ २२१॥

मृगजळाचीं गा तळीं। तिये दिठी दुरूनिचि न्याहाळीं।
वांचूनि तेणें पाणियें साळी केळी। लाविसी काई॥ २२२॥

मूळ अज्ञानचि लटिकें। मा तयाचें कार्य हें केतुकें।
म्हणोनि संसाररुख सत्य कें। वावोचि गा॥ २२३॥

आणि अंतु यया नाहीं। ऐसें बोलिजे जें कांहीं।
तेंही साचचि पाहीं। येकें परी ॥ २२४॥

तरी प्रबोधु जंव नोहे। तंव निद्रे काय अंतु आहे।
कीं रात्री न सरे तंव न पाहे। तया आरौतें॥ २२५॥

तैसा जंव पार्था। विवेकु नुधवी माथा।
तंव अंतु नाहीं अश्वत्था। भवरूपा यया॥ २२६॥

वाजतें वारें निवांत। जंव न राहे जेथिंचें तेथ।
तंव तरंगता अनंत। म्हणावीचि की॥ २२७॥

म्हणौनि सूर्य जैं हारपे। तैं मृगजळाभासु लोपे।
कां प्रभा जाय दीपे। मालवलेनि॥ २२८॥

तैसें मूळ अविद्या खाये। तें ज्ञान जैं उभें होये।
तैंचि यया अंतु आहे। एऱ्हवीं नाहीं॥ २२९॥

तेवींचि हा अनादी। ऐसी आथी शाब्दी।
तो आळु नोहे अनुरोधी। बोल तया॥ २३०॥

जे संसारवृक्षाचां ठायीं। साचोकार तंव नाहीं।
मा नाहीं तया आदि काई। कोण होईल॥ २३१॥

जो साच जेथूनि उपजे॥ तयातें आदि हें साजे।
आतां नाहींचि तो म्हणिजे। कोठूनियां॥ २३२॥

म्हणोनि जन्मे ना आहे। तैसिया सांगों कवण माये।
यालागीं नाहींपणेंचि होये। अनादि हा॥ २३३॥

वांझेचिया लेंका। कैंची जन्मपत्रिका।
नभीं निळी भूमिका। कें कल्पू पां॥ २३४॥

व्योमकुसुमाचा पांडवा। कवणें देंठ तोडावा।
म्हणोनि नाहीं ऐसिया भवा। आदि कैंची॥ २३५॥

जैसें घटाचें नाहींपण। असतचि असे केलेनिवीण।
तैसा समूळ वृक्ष जाण। अनादि हा॥ २३६॥

अर्जुना ऐसेनि पाहीं। आद्यंतु ययासि नाहीं।
माजीं स्थिती आभासे कांहीं। परी टवाळ तें गा॥ २३७॥

ब्रह्मगिरीहूनि न निगे। आणि समुद्रींही कीर न रिगे।
तरी माजीं दिसे वाउगें। मृगांबु जैसें॥ २३८॥

तेसा आद्यंतीं कीर नहीं। आणि साचही नोहे कहीं।
परि लटिकेपणाची नवाई। पडिभासे गा॥ २३९॥

ना ना रंगीं गजबजे। जैसें इंद्रधनुष्य देखिजे।
तैसा नेणतया आपजे। आहे ऐसा॥ २४०॥

ऐसेनि स्थितीचिये वेळे। भुलवी अज्ञानाचे डोळे।
लाघवी हरी मेखळे। लोकु जैसा॥ २४१॥

आणि नसतीचि श्यामिका। व्योमीं दिसे तैसी दिसो कां।
तरी दिसणेंही क्षणा एका। होय जाय॥ २४२॥

स्वप्नींही मनिलें लटिकें। तरी निर्वाहो कां एकसारिखें।
तेवीं आभासु हा क्षणिके। रीतीचा गा॥ २४३॥

देखतां आहे आवडे। घेऊं जाइजे तरी नातुडे।
जैसा टिकु कीजे माकडें। जळामाजीं॥ २४४॥

तरंगभंगु सांडी पडे। विजूही न पुरे होडे।
आभासासि तेणें पाडें। होणें जाणें गा॥ २४५॥

जैसा ग्रीष्मशेषींचा वारा। नेणिजे समोर की पाठीमोरा।
तैसी स्थिती नाहीं तरुवरा। भवरूपा यया॥ २४६॥

एवं आदि ना अंत स्थिती। ना रूप ययासि आथी।
आतां कायसी कुंथाकुंथी। उन्मूळणीं गा॥ २४७॥

आपुलिया अज्ञानासाठीं। नव्हता थांवला किरीटी।
तरी आतां आत्माज्ञानाचेनि लोटीं। खांडेनि गा॥ २४८॥

वांचूनि ज्ञानेंवीण ऐकें। उपाय करिसी जितुके।
तिहीं गुंफसि अधिकें। रुखीं इये॥ २४९॥

मग किती खांदोखांदीं। यया हिंडावें ऊर्ध्वीं अधीं।
म्हणौनि मूळचि अज्ञान छेदी। सम्यक् ज्ञानें॥ २५०॥

एऱ्हवीं दोरीचिया उरगा। डांगा मेळवितां पैं गा।
तो वावोचि भारु गा। केल होय॥ २५१॥

तरावया मृगजळाची गंगा। डोणीलागीं धांवतां दांगा।
माजीं वोहळें बुडिजे पैं गा। साच जेवीं॥ २५२॥

तेवीं नाथिलिया संसारा। उपायीं जाचतया वीरा।
आपणपें लोपे वारा। विकोपीं जाय॥ २५३॥

म्हणोनि स्वप्नींचेया भया। औषध चेवोचि धनंजया।
तेवीं अज्ञानमूळा यया। ज्ञानचि खड्ग॥ २५४॥

परि तेंचि लीला परजवे। तैसें वैराग्याचें नित्य नवें।
अभंगबळ होआवें। बुद्धीसी गा॥ २५५॥

उठलेनि वैराग्यें जेणें। हा त्रिवर्गु ऐसा सांडणें।
जैसें वमुनियां सुणें। आतांचि गेलें॥ २५६॥

हा ठायवरी पांडवा। पदार्थजातीं आघवा।
विटवी तो होआवा। वैराग्य लाठु॥ २५७॥

मग देहाहंतेचें दळें। सांडूनि एकेचि वेळे।
प्रत्यक् बुद्धी करतळें। हातवसावें॥ २५८॥

निसिलें विवेकसाहणें। जें ब्रह्माहमस्मिबोधें सणाणें।
मग पुरतेनि बोधें उटणें। एकलेंचि॥ २५९॥

परि निश्चयाचें मुष्टिबळ। पाहावें एकदोनी वेळ।
मग तुळावें अति चोखाळ। मननवरी॥ २६०॥

पाठीं हतियेरां आपणयां। निदिध्यासें एक जालिया।
पुढां दुजें नुरेल घाया। पुरतें गा॥ २६१॥

तें आत्मज्ञानाचें खांडें। अद्वैतप्रभेचे निवाढें।
नेदील उरों कवणेकडे। भववृक्षासि॥ २६२॥

शरदागमींचा वारा। जैसा केरु फेडी अंबरा।
का उदयला रवी आंधारा। घोंटु भरी॥ २६३॥

ना ना उपवड होतां खेंवो। नुरे स्वप्नसंभ्रमाचा ठावो।
स्वप्नप्रतीतिधारेचा वाहो। करील तैसे॥ २६४॥

तेव्हां ऊर्ध्व कां ऊर्ध्वींचें मूळ। कां अधींचें हन शाखाजाळ।
तें कांहींचि न दिसे मृगजळ। चांदिणां जेवीं॥ २६५॥

ऐसेनि गा वीरनाथा। आत्मज्ञानाचिया खड्गलता।
छेदुनिया भवाश्वत्था। ऊर्ध्वमूळातें॥ २६६॥

ततः पदं तत्परिमार्गितव्यं
यस्मिन् गता न निवर्तन्ति भूयः॥
तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये
यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी॥ १५.४॥

मग इदंतेसि वाळलें। जें मीपणेंवीण डाहारलें।
तें रूप पाहिजे आपलें। आपणचि॥ २६७॥

परि दर्पणाचेनि आधारें। एकचि करून दुसरें।
मुख पाहाती गव्हारें। तैसें नको हें॥ २६८॥

हें पाहाणें ऐसें असे वीरा। जैसा न मोडलिया विहिरा।
मग आपलिया उगमीं झरा। भरोनि ठाके॥ २६९॥

नातरी आटलिया अंभ। निजबिंबीं प्रतिबिंब।
नेहटे कां नभीं नभ। घटाभावीं॥ २७०॥

ना ना इंधनांशु सरलेया। वन्हि परते जेवीं आपणपयां।
तैसें आपेंआप धनंजया। न्याहाळणें जें गा॥ २७१॥

जिव्हे आपली चवी चाखणें। चक्षू निज बुबुळ देखणें।
आहे तया ऐसें निरीक्षणें। आपुलें पैं॥ २७२॥

कां प्रभेसि प्रभा मिळे। गगन गगनावरी लोळे।
ना ना पाणी भरलें खोळे। पाणियाचिये॥ २७३॥

आपणचि आपणयातें। पाहिजे जें अद्वैतें।
तें ऐसें होय निरुतें। बोलिजतु असे॥ २७४॥

जें पाहिजतेनवीण पाहिजे। कांहीं नेणणाचि जाणिजे।
आद्यपुरुष कां म्हणिजे। जया ठायातें॥ २७५॥

तेथही उपाधीचा वोथंबा। घेऊनि श्रुति उभविती जिभा।
मग नामरूपाचा बडंबा। करिती वायां॥ २७६॥

पैं भवस्वर्गा उबगले। मुमुक्षु योगज्ञाना वळवले।
पुढती न यों इया निगाले। पैजा जेथ॥ २७७॥

संसाराचिया पायां पुढां। पळती वीतराग होडा।
ओलांडोनि ब्रह्मपदाचा कर्मकडा। घालिती मागां॥ २७८॥

अहंतादिभावां आपुलियां। झाडा देऊनि आघवेयां।
पत्र घेती ज्ञानिये जया। मूळघरासी॥ २७९॥

जियें कां वस्तूचें नेणणें। आणिलें थोर जगा जाणणें।
नाहीं तें नांदविलें जेणें। मी तूं जगीं॥ २८०॥

पैं जेथुनी हे एवढी। विश्वपरंपरेची विरूढी।
वाढती आशा जैशी कोरडी। निदैवाची॥ २८१॥

पार्था तें वस्तु पहिलें। आपणपें पैं आपुलें।
पाहिजे जैसें हिंवलें। हिंव हिंवें॥ २८२॥

आणीकही एक तया। वोळखण असे धनंजया।
तरी जया कां भेटलिया। येणेंचि नाहीं॥ २८३॥

परी तया भेटती ऐसे। जे ज्ञानें सर्वत्र सरिसे।
महाप्रळयांबूचे जैसें। भरलेपण॥ २८४॥

निर्मानमोहा जितसङ्गदोषा
अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः॥
द्वन्द्वैर्विमुक्ताः सुखदुःखसंज्ञैः
गच्छत्यमूढाः पदमव्ययं तत्॥ १५.५॥

जया पुरुषांचें कां मन। सांडोनि गेले मोहमान।
वर्षांतीं जैसे घन। आकाशातें॥ २८५॥

निकवड्या निष्ठुरा। उबगिजे जेवीं सोयरा।
तैसे नागवती विकारां। वेटाळूं जे॥ २८६॥

फळली केळी उन्मळे। तैसी आत्मलाभें प्रबळें।
जयांची क्रिया ढाळेंढाळें। गळती आहे॥ २८७॥

आगी लागलिया रुखीं। देखोनि सैरा पळती पक्षी।
तैसे सांडिले अशेखीं। विकल्पीं जे॥ २८८॥

आइकें सकळ दोषतृणीं। अंकुरिजती जिये मेदिनी।
तिये भेदबुद्धीची काहाणी। नाहीं जयातें॥ २८९॥

सूर्योदयासरिसी। रात्री पळोनि जाय आपैसी।
गेली देह अहंता तैसी। अविद्येसवें॥ २९०॥

पैं आयुष्यहीना जीवातें। शरीर सांडी जेवीं अवचितें।
तेवीं निदसुरें द्वैतें। सांडिले जे॥ २९१॥

लोहाचें साकडें परिसा। न जोडे अंधारु रवि जैसा।
द्वैतबुद्धीचा तैसा। सदा दुकाळ जया॥ २९२॥

अगा सुखदुःखाकारें। द्वंद्वें देहीं जियें गोचरें।
तियें जयां कां समोरें। होतीचिना॥ २९३॥

स्वप्नींचें राज्य कां मरण। नोहे हर्षशोकासि कारण।
उपवढलिया जाण। जियपरी॥ २९४॥

तैसे सुखदुःखरूपीं। द्वंद्वीं जे पुण्यपापीं।
न घेपिजती सर्पीं। गरुड जैसे॥ २९५॥

आणि अनात्मवर्गनीर। सांडूनि आत्मरसाचें क्षीर।
चरताति जे सविचार। राजहंस॥ २९६॥

जैसा वर्षोनि भूतळीं। आपला रसु अंशुमाळी।
मागौता आणी रश्मिजाळीं। बिंबासीचि॥ २९७॥

तैसे आत्मभ्रांतीसाठीं। वस्तु विखुरली बारावाटीं।
ते एकवटिती ज्ञानदृष्टी। अखंड जे॥ २९८॥

किंबहुना आत्मयाचां। निर्धारीं विवेकु जयांचा।
बुडाला वोघु गंगेचा। सिंधू जैसा॥ २९९॥

पैं आघवेंचि आपुलेंपणें। नुरेचि जयां अभिलषणें।
जैसें येथूनि पऱ्हां जाणें। आकाशा नाहीं॥ ३००॥

जैसा अग्नीचा डोंगरु। नेघे कोणी बीज अंकुरु।
तैसा मनीं जयां विकारु। उदैजेना॥ ३०१॥

जैसा काढिलिया मंदराचळु। राहे क्षीराब्धि निश्चळु।
तैसा नुठी जयां सळु। कामोर्मींचा॥ ३०२॥

चंद्रमा कळीं धाला। न दिसे कोणें आंगी वोसावला।
तेवीं अपेक्षेचा अवखळा। न पडे जयां॥ ३०३॥

हें किती बोलूं असांगडें। जेवीं परमाणु नुरे वायूपुढे।
तैसें विषयांचें नावडे। नांवचि जयां॥ ३०४॥

एवं जे जे कोणी ऐसे। केले ज्ञानाख्यहुताशें।
ते तेथ मिळती जैसें। हेमीं हेम॥ ३०५॥

तेथ म्हणिजे कवणें ठाई। ऐसेंही पुससी कांहीं।
तरी तें पद गा नाहीं। वेंचु जया॥ ३०६॥

दृश्यपणें देखिजे। कां ज्ञेयत्वें जाणिजे।
अमुकें ऐसें म्हणिजे। तें जें नव्हे॥ ३०७॥

न तद्भासयते सूर्यो न शशाङ्को न पावकः॥
यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम॥ १५.६॥

पैं दीपाचिया बंबाळीं। कां चंद्र हन जें उजळी।
हें काय बोलों अंशुमाळी। प्रकाशी जें॥ ३०८॥

तें आघवेंचि दिसणें। जयाचें कां न देखणें।
विश्व भासतसे जेणें। लपालेनि॥ ३०९॥

जैसें शिंपीपण हारपे। तंव तंव खरें होय रुपें।
कां दोरीं लोपतां सापें। फार होइजे॥ ३१०॥

तैसीं चंद्रसूर्यादि थोरें। इयें तेजें जियें फारें।
तियें जयाचेनि आंधारें। प्रकाशती॥ ३११॥

ते वस्तु कीं तेजोराशी। सर्वभूतात्मक सरिसी।
चंद्रसूर्याच्या मानसीं। प्रकाशे जे॥ ३१२॥

म्हणौनि चंद्रसूर्य कवडसां। पडती वस्तूचिया प्रकाशा।
यालागीं तेज जें तेजसा। तें वस्तूचें अंग॥ ३१३॥

आणि जयाच्या प्रकाशीं। जग हारपें चंद्रार्केंसीं।
सचंद्र नक्षत्रें जैसीं। दिनोदयीं॥ ३१४॥

नातरी प्रबोधलिये वेळे। ते स्वप्नींची दिंडी मावळे।
कां नुरेचि सांजवेळे। मृगतृष्णिका॥ ३१५॥

तैसा जिये वस्तूच्या ठायीं। कोण्हीच कां आभासु नाहीं।
तें माझें निजधाम पाहीं। पाटाचें गा॥ ३१६॥

पुढती जे तेथ गेले। ते न घेतीचि माघौतीं पाउलें।
महोदधीं कां मिनले। स्रोत जैसे॥ ३१७॥

कां लवणाची कुंजरी। सुदलिया लवणसागरीं।
होयचि ना माघारी। परती जैसी॥ ३१८॥

ना ना गेलिया अंतराळा। न येतीचि वन्हिज्वाळा।
नाहीं तप्तलोहौनि जळा। निघणें जेवीं॥ ३१९॥

तेवीं मजसीं एकवट। जे जाले ज्ञानें चोखट।
तयां पुनरावृत्तीची वाट। मोडली गा॥ ३२०॥

तेथ प्रज्ञापृथ्वीचा रावो। पार्थु म्हणे जी जी महापसावो।
परी विनंती एकी देवो। चित्त देतु॥ ३२१॥

तरी देवेंसि स्वयें एक होती। मग माघौते जे न येती।
ते देवेंसि भिन्न आथी। कीं अभिन्न जी॥ ३२२॥

जरी भिन्नचि अनादिसिद्ध। तरी न येती हें असंबद्ध।
जे फुलां गेले षट्पद। ते फुलेंचि होती कां॥ ३२३॥

पैं लक्ष्याहूनि अनारिसे। बाण लक्ष्यीं शिवोनि जैसे।
मागुते पडती तैसे। येतीचि ते॥ ३२४॥

ना तरी तूंचि ते स्वभावें। तरी कोणें कोणासि मिळावें।
आपणयसी आपण रुपावें। शस्त्रें केवीं॥ ३२५॥

म्हणोनि तुजसी अभिन्नां जीवां। तुझा संयोगवियोगु देवा।
नये बोलों अवयवां। शरीरेंसी॥ ३२६॥

आणि जे सदा वेगळे तुजसीं। तया मिळणी नाहीं कोणे दिवसीं।
मा येती न येती हे कायसी। वायबुद्धि॥ ३२७॥

तरी कोण गा तूतें। पावोनि न येती माघौते।
हें विश्वतोमुखा मातें। बुझावीं जी॥ ३२८॥

इये आक्षेपीं अर्जुनाच्या। जो शिरोमणि सर्वज्ञांचा।
तोषला बोध शिष्याचा। देखोनियां॥ ३२९॥

मग म्हणे गा महामती। मातें पावोनि न येती पुढती।
ते भिन्नाभिन्न रिती। आहाती दोनी॥ ३३०॥

जैं विवेकें खोलें पहिजे। तरी मी तेचि ते सहजे।
ना आहाचवाहाच तरी दुजे। ऐसेंही गमती॥ ३३१॥

जैसे पाणियांहि वेगळ। आपजतां दिसती कल्लोळ।
एऱ्हवीं तरी निखिळ। पाणीचि ते॥ ३३२॥

कां सुवर्णाहुनि आनें। लेणीं गमती भिन्नें।
मग पाहिजे तंव सोने। आघवेंचि तें॥ ३३३॥

तैसें ज्ञानाचिये दिठी। मजसीं अभिन्नचि ते किरीटी।
येर भिन्नपण तें उठी। अज्ञानास्तव॥ ३३४॥

आणि साचोकारोनि वस्तुविचारें। कैचें मज एकासि दुसरें।
भिन्नाभिन्नव्यवहारें। उमसिजेल॥ ३३५॥

आघवेंचि आकाश सूनि पोटीं। बिंबचि जैं आते खोटी।
तैं प्रतिबिंब कें उठी। कें रश्मि शिरे॥ ३३६॥

कां कल्पांतींचिया पाणिया। काय वोत भरताती धनंजया।
म्हणौनि कैंचे अंश अविक्रिया। एका मज॥ ३३७॥

परी ओघाचेनि मेळें। पाणी उजू परी वांकुडें जालें।
रवी दुजेपण आलें। तोयबगें॥ ३३८॥

व्योम चौफळें कीं वाटोळें। हें ऐसें कायिसयाही मिळे।
परी घटमठीं वेंटाळें। तैसेंही आथी॥ ३३९॥

हां गा निद्रेचेनि आधारें। काय एकलेनि जग न भरे।
स्वप्नींचेनि जैं अवतरे। राजपणें॥ ३४०॥

कां मिनलेनि किडाळें। वानिभेदासि ये सोळें।
तैसा स्वमायें वेंटाळें। शुद्ध जैं मी॥ ३४१॥

तैं अज्ञान एक रूढे। तेणें कोहंविकल्पांचें मांडे।
मग विवरूनि कीजे फुडें। देहोहं ऐसें॥ ३४२॥

ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः॥
मनःषष्टानीन्द्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति॥ १५.७॥

असें शरीराचि येवढें। जै आत्मज्ञान वेगळें पडे।
तैं माझा अंशु ऐसे आवडे। थोडे पणें॥ ३४३॥

समुद्र कां वायुवशें। तरंगाकार उल्लसे।
तो समुद्रांशु ऐसा दिसे। सानिवा जेवीं॥ ३४४॥

तेवीं जडातें जीवविता। देह अहंता उपजविता।
मी जीव गमें पंडुसुता। जीवलोकीं॥ ३४५॥

पैं जीवाचिया बोधा। गोचरु जो हा धांदा।
तो जीवलोकशब्दा। अभिप्रावो॥ ३४६॥

अगा उपजणें निमणें। हें साचचि जें कां मानणें।
तो जीवलोकु मी म्हणें। संसारु हन॥ ३४७॥

एवंविध जीवलोकीं। तूं मातें ऐसा अवलोकीं।
जैसा चंद्र कां उदकीं। उदकातीत॥ ३४८॥

पैं काश्मीराचा रवा। कुंकुमावरी पांडवा।
आणिका गमे लोहिवा। तो तरी नव्हे॥ ३४९॥

तैसे अनादिपण न मोडे। माझें अक्रियत्व न खंडे।
परी कर्ता भोक्ता ऐसें आवडे। ते जाण गा भ्रांती॥ ३५०॥

किंबहुना आत्मा चोखटु। होऊनि प्रकृतीसी एकवटु।
बांधे प्रकृतिधर्माचा पाटु। आपणपयां॥ ३५१॥

पैं मनादि साही इंद्रियें। श्रोत्रादि प्रकृतिकार्यें।
तियें माझीं म्हणौनि होये। व्यापारारूढ॥ ३५२॥

जैसें स्वप्नीं परिव्राजें। आपणपयां आपण कुटुंब होइजे।
मग तयाचेनि धांविजे। मोहें सैरा॥ ३५३॥

तैसा आपलिया विस्मृती। आत्मा आपणचि प्रकृती।
सारिखा गमोनि पुढती। तियेसीचि भजे॥ ३५४॥

मनाच्या रथीं वळघे। श्रवणाचिया द्वारें निघे।
मग शब्दाचिया रिघे। रानामाजीं॥ ३५५॥

तोचि प्रकृतीचा वागोरा। करी त्वचेचिया मोहरा।
आणि स्पर्शाचिया धोरा। वना जाय॥ ३५६॥

कोणे एके अवसरीं। रिघोनि नेत्राच्या द्वारीं।
मग रूपाच्या डोंगरीं। सैरा हिंडे॥ ३५७॥

कां रसनेचिया वाटा। निघोनि गा सुभटा।
रसाचा दरकुटा। भरोंचि लागे॥ ३५८॥

ना तरी येणेंचि घ्राणें। देहेशु करी निघणें।
मग गंधाचीं दारुणें। आडवें लंघी॥ ३५९॥

ऐसेनि देहेंद्रियनायकें। धरूनि मन जवळिकें।
भोगिजती शब्दादिकें। विषयभरणें॥ ३६०॥

शरीरं यदवाप्नोति यच्चप्युत्क्रामतीश्वरः॥
गृहीत्वैतानि संयाति वायुर्गन्धानिवाशयात्॥ १५.८॥

परी कर्ता भोक्ता ऐसें। हें जीवाचें तैंचि दिसे।
जैं शरीरीं कां पैसे। येकादिये॥ ३६१॥

जैसा आथिला आणि विलासिया। तैंचि वोळखों ये धनंजया।
जैं राजसेव्या ठाया। वस्तीसि ये॥ ३६२॥

तैसा अहंकतृत्वाचा वाढु। कां विषयेंद्रियाचा धुमाडु। हा जाणिजे तैं निवाडु। जैं देह पावे॥ ३६३॥
अथवा शरीरातें सांडी। तऱ्ही इंद्रियांची तांडी।
हे आपणपयांसवें काढी। घेऊनि जाय॥ ३६४॥

जैसा अपमानिला अतिथि। ने सुकृताची संपत्ति।
कां साइखडेयाची गति। सूत्रतंतू॥ ३६५॥

ना ना मावळतेनि तपनें। नेइजती लोकांचीं दर्शनें।
हें असो द्रुति पवनें। नेइजे जैसी॥ ३६६॥

तेवीं मनःषष्ठां ययां। इंद्रियांतें धनंजया।
देहराजु ने देहा। पासूनि गेला॥ ३६७॥

श्रोत्रं चक्षुः स्पर्शनं च रसनं घ्राणमेव च॥
अधिष्ठाय मनश्चायं विषयानुपसेवते॥ १५.९॥

मग येथें अथवा स्वर्गीं। जेथ जेथ जैसें देह आपंगी।
तेथ तैसेंचि पुढती पांगी। मनादिक॥ ३६८॥

जैसा मालवलिया दिवा। प्रभेसीं जाय पांडवा।
मग उजळिजे तेथ तेधवां। तैसाचि फांके॥ ३६९॥

परी ऐसेसिया राहाटी। अविवेकियांचिये दिठी।
येतुलें हें किरीटी। गमेचि गा॥ ३७०॥

जे आत्मा देहासि आला। आणि विषयो येणेंचि भोगिला।
अथवा देहोनि गेला। हें साचचि मानी॥ ३७१॥

एऱ्हवीं येणें आणि जाणें। कां करणें आणि भोगणें।
हें प्रकृतीचें तेणें। मानियेलें॥ ३७२॥

उत्क्रामन्तं स्थितं वापि भुञ्जानं वा गुणान्वितं॥
विमूढा नानुपश्यन्ति पश्यन्ति ज्ञानचक्षुषः॥ १५.१०॥

यतन्तो योगिनश्चैनं पश्यन्त्यात्मन्यवस्थितं॥
यतन्तोऽप्यकृतात्मानो नैनं पश्यन्त्यचेतसः॥ १५.११॥

परी देहाचे मोटकें उभें। आणि चेतना तेथ उपलभे।
तिये चळवळेनि लोभें। आला म्हणती॥ ३७३॥

तैसेंचि तयां संगती। इंद्रियें आपलालां अर्थीं वर्तती।
तया नांव सुभद्रापती। भोगणें जया॥ ३७४॥

पाठीं भोगक्षीण आपैसें। देह गेलिया तें न दिसे।
तेथें गेला गेला ऐसें। बोभाती गा॥ ३७५॥

पैं रुखु डोलतु देखावा। तरी वारा वाजतु मानावा।
रुखु नसे तेथें पांडवा। नाहीं तो गा॥ ३७६॥

कां आरसा समोर ठेविजे। आणि आपणपें तेथ देखिजे।
तरी तेधवांचि जालें मानिजे। काय आधीं नाहीं॥ ३७७॥

कां परता केलिया आरिसा। लोपु जाला तया आभासा।
तरी आपणपें नाहीं ऐसा। निश्चयो करावा॥ ३७८॥

शब्द तरी आकाशाचा। परी कपाळीं पिटे मेघांच्या।
कां चंद्रीं वेगु अभ्राचा। अरोपिजे॥ ३७९॥

तैसें होइजे जाइजे देहें। तें आत्मसत्ते अविक्रियें।
निष्टंकिती गा मोहें। आंधळे ते॥ ३८०॥

येथ आत्मा आत्मयाच्या ठायीं। देखिजे देहींचा धर्मु देहीं।
ऐसें देखणें ते पाहीं। आन आहाती॥ ३८१॥

ज्ञानें कां जयांचे डोळे। देखोनि न राहाती देहींचे खोळे।
सूर्यरश्मी आणियाळे। ग्रीष्मीं जैसे॥ ३८२॥

तैसी विवेकाचेनि पैसें। जयांची स्फूर्ती स्वरूपीं बैसे।
ते ज्ञानिये देखती ऐसें। आत्मयातें॥ ३८३॥

जैसें तारांगणीं भरलें। गगन समुद्रीं बिंबलें।
परी तें तुटोनि नाहीं पडिलें। ऐसें निवडे॥ ३८४॥

गगन गगनींचि आहे। हें आभासे तें वाये।
तैसा आत्मा देखती देहें। गंवसिलाही॥ ३८५॥

खळाळाच्या लगबगीं। फेडूनि खळाळाच्या भागीं।
देखिजे चंद्रिका कां उगी। चंद्रीं जेवीं॥ ३८६॥

कां नाडरचि भरे शोषे। सूर्यु तो जैसा तैसाचि असे।
देह होतां जातां तैसें। देखती मातें॥ ३८७॥

घट मठु घडले। तेचि पाठीं मोडले।
परि आकाश तें संचलें। असतचि असे॥ ३८८॥

तैसें अखंडे आत्मसत्ते। अज्ञानदृष्टिकल्पितें।
हें देहचि होतें जातें। जाणतीं फुडें॥ ३८९॥

चैतन्य चढे ना वोहटे। चेष्टवी ना चेष्टे।
ऐसें आत्मज्ञानें चोखटें। जाणती ते॥ ३९०॥

आणि ज्ञानही आपैतें होईल। प्रज्ञा परमाणुही उगाणा देईल।
सकल शास्त्रांचें येईल। सर्वस्व हातां॥ ३९१॥

परी ते व्युत्पत्ति ऐसी। जरी विरक्ति न रिगे मानसीं।
तरी सर्वात्मका मजसीं। नव्हेचि भेटी॥ ३९२॥

पैं तोंड भरो कां विचारा। आणि अंतःकरणीं विषयांसी थारा।
तरी नातुडें धनुर्धरा। त्रिशुद्धीं मी॥ ३९३॥

हां गा वोसणतयाच्या ग्रंथीं। काइ तुटती संसारगुंती।
कीं परिवसिलेया पोथी। वाचिली होय॥ ३९४॥

ना ना बांधोनियां डोळे। घ्राणीं लाविजती मुक्ताफळें।
तरी तयांचें काय कळे। मोल मान॥ ३९५॥

तैसा चित्तीं अहंते ठावो। आणि जिभे सकळशास्त्रांचा सरावो।
ऐसेनि कोडी एक जन्म जावो। परी न पविजे मातें॥ ३९६॥

जो एक मी कां समस्तीं। व्यापकु असें भूतजातीं।
ऐक तिये व्याप्ती। रूप करूं॥ ३९७॥

यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम॥
यच्चन्द्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकम्॥ १५.१२॥

तरी सूर्यासकट आघवी। हे विश्वरचना जे दावी।
ते दीप्ति माझी जाणावी। आद्यंतीं आहे॥ ३९८॥

जळ शोषुनि गेलिया सविता। ओलांश पुरवीतसे माघौता।
ते चंद्रीं पंडुसुता। ज्योत्स्ना माझी॥ ३९९॥

आणि दहनपचनसिद्धी। करीतसे जें निरवधी।
ते हुताशीं तेजोवृद्धी। माझीचि गा॥ ४००॥

गामाविश्य च भूतानि धारयाम्यहमोजसा॥
पुष्णामि चौषधीः सर्वाः सोमो भूत्वा रसात्मकः॥ १५.१३॥

मी रिगालों असे भूतळीं। म्हणौनि समुद्रमहाजळीं।
हे पांसूची ढेंपुळी। विरेचिना॥ ४०१॥

आणी भूतेंही चराचरें। हे धरितसे जियें अपारें।
तियें मीचि धरीं धरे। रिगोनिया॥ ४०२॥

गगनीं मी पंडुसुता। चंद्राचेनि मिसें अमृता।
भरला जालों चालता। सरोवरु॥ ४०३॥

तेथूनि फांकती रश्मिकर। ते पाट पेलुनि अपार।
सर्वौषधींचे आगर। भरितु असें मी॥ ४०४॥

ऐसेनि सस्यादिकां सकळा। करी धान्यजाती सुकाळा।
दें अन्नद्वारा जिव्हाळा। भूतजातां॥ ४०५॥

आणि निपजविलें अन्न। तरी तैसें कैचें दीपन।
जेणें जिरूनि समाधान। भोगिती जीव॥ ४०६॥

अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः॥
प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम्॥ १५.१४॥

म्हणौनि प्राणिजाताच्या घटीं। करूनि कंदावरी आगिठी।
दीप्ति जठरींही किरीटी। मीचि जालों॥ ४०७॥

प्राणापानाच्या जोडभातीं। फुंकफुंकोनियां अहोरातीं।
आटीतसें नेणों किती। उदरामाजीं॥ ४०८॥

शुष्कें अथवा स्निग्धें। सुपक्वें कां विदग्धें।
परी मीचि गा चतुर्विधें। अन्नें पचीं॥ ४०९॥

एवं मीचि आघवें जन। जना निरवितें मीचि जीवन।
जीवनीं मुख्य साधन। वन्हिही मीचि॥ ४१०॥

आतां ऐसियाहीवरी काई। सांगों व्याप्तीची नवाई।
येथ दुजें नाहींची घेई। सर्वत्र मी गा॥ ४११॥

तरी कैसेनि पां वेखें। सदा सुखियें एकें।
एकें तियें बहुदुःखें। क्रांतें भूतें॥ ४१२॥

जसी सगळिये पाटणीं। एकेंचि दीपें दिवेलावणीं।
जालिया कां न देखणीं। उरलीं एकें॥ ४१३॥

ऐसी हन उखिविखी। करित आहासि मानसीं कीं।
तरी परिस तेही निकी। शंका फेडूं॥ ४१४॥

पैं आघवा मीचि असें। येथ नाहीं कीर अनारिसें।
परी प्राणियांचिया उल्लासें। बुद्धी ऐसा॥ ४१५॥

जैसें एकचि आकाशध्वनि। वाद्यविशेषीं आनानी।
वाजावें पडे भिन्नी। नादांतरीं॥ ४१६॥

कां लोकचेष्टीं वेगळालां। जो हा एकचि भानु उदैला।
तो आनानी परी गेला। उपेगासी॥ ४१७॥

ना ना बीजधर्मानुरूप। झाडां उपजवी आप।
तैसें परिणमलें स्वरूप। माझें जीवां॥ ४१८॥

अगा नेणा आणि चतुरा। पुढां निळयांचा दुसरा।
नेणा सर्प जाला येरा। सुखालागीं॥ ४१९॥

हें असो स्वातीचें उदक। शुक्तीं मोतीं व्याळीं विख।
तैसा सज्ञानासी मी सुख। दुःख तों अज्ञानासी॥ ४२०॥

सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टो
मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च।
वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो
वेदान्तकृद्वेदविदेवचाहम्॥ १५.१५॥

एऱ्हवीं सर्वांच्या हृदयदेशीं। मी अमुका आहें ऐसी।
जे बुद्धि स्फुरे अहर्निशीं। ते वस्तु गा मी॥ ४२१॥

परी संतासवें वसतां। योगज्ञानीं पैसतां।
गुरुचरण उपासितां। वैराग्येंसीं॥ ४२२॥

येणेंचि सत्कर्में। अशेषही अज्ञान विरमे।
जयांचें अहं विश्रामे। आत्मरूपीं॥ ४२३॥

ते आपेंआप देखोनि देखीं। मियां आत्मेनि सदा सुखी।
येथें मीवांचून अवलोकीं। आन हेतु असे॥ ४२४॥

अगा सूर्योदयो जालिया। सूर्यें सूर्यचि पहावा धनंजया।
तेवीं मातें मियां जाणावया। मीचि हेतु॥ ४२५॥

ना शरीरपरातें सेवितां। संसारगौरवचि ऐकतां।
देहीं जयाची अहंता। बुडोनि ठेली॥ ४२६॥

ते स्वर्गसंसारालागीं। धांवतां कर्ममार्गीं।
दुःखाच्या सेलभागीं। भागीन होती॥ ४२७॥

परी हेंही होणें अर्जुना। मजचिस्तव तया अज्ञाना।
जैसा जागताचि हेतु स्वप्ना। निद्रितें होय॥ ४२८॥

पैं अभ्रें दिवसु हारपला। तोहि दिवसेंचि जाणों आला।
तेवीं मी नेणोनि विषयो देखिला। मजचिस्तव भूतीं॥ ४२९॥

एवं निद्रा कां जागणिया। प्रबोधुचि हेतु धनंजया।
तेवीं ज्ञाना अज्ञाना जीवांचिया। मीचि मूळ॥ ४३०॥

जैसें सर्पत्वा कां दोरा। दोरुचि मूळ धनुर्धरा।
तैसा ज्ञाना अज्ञानाचिया संसारा। मियांचि सिद्धि॥ ४३१॥

म्हणोनि जैसा असें तैसया। मातें नेणोनि धनंजया।
वेदु जाणों गेला तंव तया। जालिया शाखा॥ ४३२॥

तरी तिहीं शाखाभेदीं। मीचि जाणिजे त्रिशुद्धी।
जैसा पूर्वापरां नदी। समुद्रचि ठी॥ ४३३॥

आणि महासिद्धांतापासीं। श्रुति हारपती शब्देंसीं।
जैसिया सगंधा आकाशीं। वातलहरी॥ ४३४॥

तैसें समस्तही श्रुतिजात। ठाके लाजिलें ऐसें निवांत।
तें मीचि करीं यथावत। प्रकटोनियां॥ ४३५॥

पाठीं श्रुतिसकट अशेष। जग हारपे जेथ निःशेष।
तें निजज्ञानही चोख। जाणता मीचि॥ ४३६॥

जैसें निदेलिया जागिजे। तेव्हां स्वप्नींचे कीर नाहीं दुजें।
परी एकत्वही देखों पाविजे। आपलेंचि॥ ४३७॥

तैसें आपलें अद्वयपण। मी जाणतसें दुजेनवीण।
तयाही बोधा कारण। जाणता मीचि॥ ४३८॥

मग आगी लागलिया कापुरा। ना काजळी ना वैश्वानरा।
उरणें नाहीं वीरा। जयापरी॥ ४३९॥

तेवीं समूळ अविद्या खाये। तें ज्ञानही जैं बुडोनि जाये।
तऱ्ही जें नाहीं कीर नोहे। आणि न साहे असणेंही॥ ४४०॥

पैं विश्व घेऊनि गेला मागेंसीं। तया चोरातें कवण कें गिंवसी।
जे कोणी एकी दशा ऐसी। शुद्ध ते मी॥ ४४१॥

ऐसें जडाजडव्याप्ती। रूप करितां कैवल्यपती।
ठी केली निरुपहितीं। आपुलां रूपीं॥ ४४२॥

तो आघवचि बोधु सहसा। अर्जुनीं उमटला कैसा।
व्योमींचा चंद्रमा जैसा। क्षीरार्णवीं॥ ४४३॥

कां प्रतिभिंती चोखटे। समोरील चित्र उमटे।
तैसा अर्जुनें आणि वैकुंठें। नांदतसे बोधु॥ ४४४॥

तरी बाप वस्तुस्वभावो। फावे तंव तंव गोडिये थांवो।
म्हणौनि अनुभवियांचा रावो। अएजुन म्हणे॥ ४४५॥

जी व्यापकपण बोलतां। निरुपाधिक जें आतां।
स्वरूप प्रसंगता। बोलिले देवो॥ ४४६॥

तें एक वेळ अव्यंगवाणें। कीजो कां मज सांगणें।
तेथ द्वारकेचा नाथु म्हणे। भलें केलें॥ ४४७॥

पैं अर्जुना आम्हांहि वाडेंकोडें। अखंड बोलों आवडे।
परी काय कीजे न जोडे। पुसतें ऐसें॥ ४४८॥

आजि मनोरथांसि फळ। जोडलासि तूं केवळ।
जे तोंड भरूनि निखळ। आलासि पुसों॥ ४४९॥

जें अद्वैतावरीही भोगिजे। तें अनुभवींचें तूं विरजें।
पुसोनि मज माझें। देतोसि सुख॥ ४५०॥

जैसा आरिसा आलिया जवळा। दिसे आपणपें आपलां डोळां।
तैसा संवादिया तूं निर्मळा। शिरोमणी॥ ४५१॥

तुवां नेणोनि पुसावें। मग आम्हीं परिसऊं बैसावें।
तो गा हा पाडु नव्हे। सोयरेया॥ ४५२॥

ऐसें म्हणौनि आलिंगिलें। कृपादृष्टी अवलोकिलें।
मग देवो काय बोलिले। अर्जुनेंसीं॥ ४५३॥

पैं दोहीं वोठीं एक बोलणें। दोहीं चरणीं एक चालणें।
तैसें पुसणें सांगणें। तुझें माझें॥ ४५४॥

एवं आम्हीं तुम्हीं येथें। देखावें एका अर्थातें।
सांगतें पुसतें येथें। दोन्हीं एक॥ ४५५॥

ऐसा बोलत भुलला देवो मोहें। अर्जुनातें आलिंगूनि ठाये।
मग बिहाला म्हणे नोहे। आवडी हे॥ ४५६॥

जाले इक्षुरसाचे ढाळ। तरी लवण देणें किडाळ।
जे संवादसुखाचें रसाळ। नासेल थितें॥ ४५७॥

आधींच आम्हां यया कांहीं। नरनारायणा सिनें नाहीं।
परी आतां जिरो माझ्या ठायीं। वेगु हा माझा॥ ४५८॥

इया बुद्धी सहसा। श्रीकृष्ण म्हणे वीरेशा।
पैं गा तो तुवां कैसा। प्रश्नु केला॥ ४५९॥

जो अर्जुन श्रीकृष्णीं विरत होता। तो परतोनिया मागुता।
प्रश्नावळीची कथा। ऐकों आला॥ ४६०॥

येथ सद्गदें बोले। अर्जुनें जी जी म्हणितलें।
निरुपाधिक आपुलें। रूप सांगा॥ ४६१॥

यया बोला तो शार्ङ्गी। तेंचि सांगावयालागीं।
उपाधी दोहीं भागीं। निरूपीत असे॥ ४६२॥

पुसिलिया निरुपहित। उपाधि कां सांगे येथ।
हें कोण्हाही प्रस्तुत। गमे जरी॥ ४६३॥

तरी ताकाचे अंश फेडणें। याचि नांव लोणी काढणें।
चोखाचिये शुद्धी तोडणें। कीडचि जेवीं॥ ४६४॥

बाबुळीचि सारावी हातें। परी पाणी तंव असे आइतें।
अभ्रचि जावें गगन तें। सिद्धचि कीं॥ ४६५॥

वरील कोंड्याचा गुंडाळा। झाडूनि केलिया वेगळा।
कणु घेतां विरंगोळा। असे काई॥ ४६६॥

तैसा उपाधि उपहितां। शेवटु जेथ विचारितां।
तें कोणातेंहीं न पुसतां। निरुपाधिक॥ ४६७॥

जैसें न सांगणेवरी। बाळा पतीसी रूप करी।
बोलु निमालेपणें विवरी। अचर्चातें॥ ४६८॥

पैं सांगणेयाजोगें नव्हे। तेथींचें सांगणें ऐसें आहे।
म्हणौनि उपाधि लक्षण हें। बोलिजे आदीं॥ ४६९॥

पाडिव्याची चंद्ररेखा। निरुती दावावया शाखा।
दाविजे तेवीं औपाधिका। बोली इया॥ ४७०॥

द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च॥
क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते॥ १५.१६॥

मग तो म्हणे गा सव्यसाची। पैं इये संसारपाटणींची।
वस्ती साविया टांची। दुपुरुषीं॥ ४७१॥

जैसी आघवांचि गगनीं। नांदतें दिवोरात्री दोन्ही।
तैसे संसारराजधानीं। दोन्हीचि हे॥ ४७२॥

आणिकही तिजा पुरुषु आहे। परी तो या दोहींचें नांव न साहे।
जो उदेला गांवेंसीं खाये। दोहींतें ययां॥ ४७३॥

परी ते तंव गोठी असो। आधीं दोहींचि हे परियेसों।
जे संसारग्रामा वसों। आले असती॥ ४७४॥

एक आंधळा वेडा पंगु। येर सर्वांगें पुरता चागु।
परी ग्रामगुणें संगु। घडला दोघां॥ ४७५॥

तया एका नाम क्षरु। येरातें म्हणती अक्षरु।
इहीं दोहींचि परी संसारु। कोंदला असे॥ ४७६॥

आतां क्षरु तो कवणु। अक्षरु तो किंलक्षणु।
हा अभिप्रावो संपूर्णु। विवंचूं गा॥ ४७७॥

तरी महदहंकारा। लागूनियां धनुर्धरा।
तृणांतींचा पांगोरा। वरी पैं गा॥ ४७८॥

जें कांहीं सानें थोर। चालतें अथवा स्थिर।
किंबहुना गोचर। मनबुद्धीसि जें॥ ४७९॥

जेतुलें पांचभौतिक घडतें। जें नामरूपा सांपडतें।
गुणत्रयाच्या पडतें। कामठां जें॥ ४८०॥

भूताकृतीचें नाणें। घडत भांगारें जेणें।
काळासि जूं खेळणें। जिहीं कवडां॥ ४८१॥

जाणणेंचि विपरीतें। जें जें कांहीं जाणिजतें।
जें प्रतिक्षणीं निमतें। होऊनियां॥ ४८२॥

अगा काढूनि भ्रांतीचें दांग। उभवी सृष्टीचें आंग।
हें असो बहु जग। जया नाम॥ ४८३॥

पैं अष्टधा भिन्न ऐसें। जें दाविलें प्रकृतिमिसें।
जें क्षेत्रद्वारा छत्तिसें। भागीं केलें॥ ४८४॥

हें मागील सांगों किती। अगा आतांचि जें प्रस्तुती।
वृक्षाकार रूपकरीती। निरूपिलें॥ ४८५॥

तें आघवेंचि साकारें। कल्पूनि आपणपयां पुरें।
जालें असे तदनुसारें। चैतन्यचि॥ ४८६॥

तें जैसा कुहां आपणचि बिंबे। सिंह प्रतिबिंब पाहतां क्षोभे।
मग क्षोभला समारंभें। घाली तेथ॥ ४८७॥

कां सलिलीं असतचि असे। व्योमावरी व्योम बिंबे जैसें।
अद्वैत होऊनि तैसें। द्वैतें घेपे॥ ४८८॥

अर्जुना गा यापरी। साकार कल्पूनि पुरी।
आत्मा विस्मृतीची करी। निद्रा तेथ॥ ४८९॥

पैं स्वप्नीं सेजार देखिजे। मग पहुडणें जैसें तेथ कीजे।
तैसें पुरीं शयन जाणिजे। आत्मयासी॥ ४९०॥

पाठीं तिये निद्रेचेनि भरें। मी सुखी दुःखी म्हणत घोरे।
अहंसमाधीचेनि थोरें। वोसणाये सादें॥ ४९१॥

हा जनकु हे माता। हा मी गौर हीन पुरता।
पुत्र वित्त कांता। माझें हें ना॥ ४९२॥

ऐसिया वेंधौनि स्वप्ना। धांवत भवस्वर्गाचिया राना।
तया चैतन्या नाम अर्जुना। क्षर पुरुषु गा॥ ४९३॥

आतां ऐक क्षेत्रज्ञु येणें। नामें जयातें बोलणें।
जग जीवु कां म्हणे। जिये दशेतें॥ ४९४॥

जो आपुलेनि विसरें। सर्वभूतत्वें अनुकरे।
तो आत्मा बोलिजे क्षरें। पुरुषनांवें॥ ४९५॥

जे तो वस्तुस्थिति पुरता। म्हणौनि आली पुरुषता।
वरी देहपुरीं निदैजतां। पुरुषनांवें॥ ४९६॥

आणि क्षरपणाचा नाथिला। आळु यया ऐसेनि आला।
जे उपाधीचि आतला। म्हणोनियां॥ ४९७॥

जैसी खळाळीचिया उदका। सरसीं उदाळे चंद्रिका।
तैसा विकारां औपाधिकां। ऐसाचि गमे॥ ४९८॥

कां खळाळु मोटका शोषे। आणि चंद्रिका तैं सरिसींच भ्रंशे।
तैसा उपाधिनाशीं न दिसे। औपाधिकु॥ ४९९॥

ऐसें उपाधीचेनि पाडें। क्षणिकत्व यातें जोडे।
तेणें खोंकरपणें घडे। क्षर हें नांव॥ ५००॥

एवं जीवचैतन्य आघवें। हें क्षर पुरुष जाणावें।
आतां रूप करूं बरवें। अक्षरासी॥ ५०१॥

तरी अक्षरु जो दुसरा। पुरुष पैं धनुर्धरा।
तो मध्यस्थु गा गिरिवरां। मेरु जैसा॥ ५०२॥

जे तो पृथ्वी पाताळस्वर्गीं। इहीं न भेदे तिहीं भागीं।
तैसा दोही ज्ञानाज्ञानांगीं। पडेना जो॥ ५०३॥

ना यथार्थज्ञानें एक होणें। ना अनेकत्वें दुजें घेणें।
ऐसें निखळ जें नेणणें। तेंचि तें रूप॥ ५०४॥

पांसुता निःशेष जाये। ना घटभांडादिकें होये।
तया मृत्पिंडा ऐसें आहे। मध्यस्थ जें॥ ५०५॥

पैं आटोनि गेलिया सागरु। मग तरंगु ना नीरु।
तया ऐशी अनाकारु। जे दशा गा॥ ५०६॥

पार्था जागणें तरी बुडे। परी स्वप्नाचें कांहीं न मांडे।
तैसिये निद्रे सांगडें। न्याहाळणें जे॥ ५०७॥

विश्व आघवेंचि मावळे। आणि आत्मबोधु तरी नुजळे।
तिये अज्ञानदशे केवळे। अक्षरु नांव॥ ५०८॥

अजा म्हणतां जन्म जन्म नाहीं। त्यासि नाशु कैचा कायी।
यालागीं अक्षरु पाहीं। अज्ञानघन॥ ५०९॥

सर्वां कळी सांडिलें जैसें। चंद्रपण उरे अंवसे।
रूप जाणावें तैसें। अक्षराचें॥ ५१०॥

पैं सर्वोपाधिविनाशें। हे जीवदशा जेथ पैसे।
फळपाकांत जैसें। झाड बीजीं॥ ५११॥

घन अज्ञान सुषुप्ती। तो बीजभाव म्हणती।
येर स्वप्न हन जागृती। फळभाव तो॥ ५१२॥

तैसें उपाधीसी उपहित। थोकोनि ठाके जेथ।
तयातें अव्यक्त। बोलती गा॥ ५१३॥

जयासी कां बीजभावो। वेदांतीं केला ऐसा आवो।
तो तया पुरुषा ठावो। अक्षराचा॥ ५१४॥

जेथूनि अन्यथाज्ञान। फांकोनि जागृति स्वप्न।
ना नाबुद्धीचें रान। रिगालें असे॥ ५१५॥

जीवत्व जेथुनि किरीटी। विश्व उठवितचि उठी।
ते उभय बोधांची मिठी। अक्षरु पुरुषु॥ ५१६॥

येरु क्षरु पुरुषु कां जनीं। देहीं खेळे जागृतीं स्वप्नीं।
तिया अवस्था जो दोन्ही। वियाला गा॥ ५१७॥

पैं अज्ञानघनसुषुप्ती। ऐसेसी जे का ख्याती।
या उणी येकी प्राप्ती। ब्रह्माची जे॥ ५१८॥

साचचि पुढती वीरा। जरी न येतां स्वप्नजागरां।
तरी ब्रह्मभावो साचोकारा। म्हणों येता॥ ५१९॥

परी प्रकृतिपुरुषें दोनी। अभ्रें जालीं जियें गगनीं।
क्षेत्रक्षेत्रज्ञु स्वप्नीं। देखिला जियें॥ ५२०॥

हें असो अधोशाखा। या संसाररूपा रुखा।
मूळ तें पुरुषा। अक्षराचें॥ ५२१॥

हा पुरुषु कां म्हणिजे। जे पूर्णपणेचि निजें।
पैं मायापुरीं पहुडिजे। तेणेंही बोलें॥ ५२२॥

आणि विकारांची जे वारी। ते विपरीत ज्ञानाची परी।
नेणिजे जिये माझारीं। ते सुषुप्ती गा हा॥ ५२३॥

म्हणौनि यया आपैसे। क्षरणें पां नसे।
आणि कहीं हा न नाशे। ज्ञानाउणें॥ ५२४॥

यालागीं हा अक्षरु। ऐसा वेदांतीं डगरु।
केला देखसी थोरु। सिद्धांताचा॥ ५२५॥

ऐसें जीवकार्यकारण। जया मायासंगुचि लक्षण।
अक्षर पुरुषु जाण। चैतन्य तें॥ ५२६॥

उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः॥
यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः॥ १५.१७॥

आतां अन्यथाज्ञानीं। या दोनी अवस्था जया जनीं।
तया हारपती घनीं। अज्ञानतत्त्वीं॥ ५२६॥

तें अज्ञान ज्ञानीं बुडालिया। ज्ञानें कीर्तिमुखत्व केलिया।
जैसा वन्हि काष्ठ जाळुनिया। स्वयें जळे॥ ५२७॥

तैसें अज्ञान ज्ञानें नेलें। आपण वस्तु देऊनि गेलें।
ऐसें जाणणेनिवीण उरलें। जाणतें जें ॥ ५२८॥

तें तो गा उत्तम पुरुषु। जो तृतीय कां निष्कर्षु।
दोहींहून आणिकु। मागिला जो॥ ५२९॥

सुषुप्ती आणि स्वप्ना। पासूनि बहुवें अर्जुना।
जागणें जैसें आना। बोधाचेंचि॥ ५३०॥

कां रश्मी हन मृगजळा। पासूनि अर्कमंडळा।
अफाटु तेवीं वेगळा। उत्तमु गा॥ ५३१॥

हें ना काष्ठींचा काष्ठाहुनी। अनारिसा जैसा वन्ही।
तैसा क्षराक्षरापासुनी। आनचि तो॥ ५३२॥

पैं ग्रासूनि आपली मर्यादा। एक करीत नदीनदां।
उठी कल्पांतीं उदावादा। एकार्णवाचा॥ ५३३॥

तैसें स्वप्न ना सुषुप्ती। ना जागराची गोठी आथी।
जैसी गिळिली दिवोराती। प्रळयतेजें॥ ५३४॥

मग एकपण ना दुजें। असें नाहीं हें नेणिजे।
अनुभव निर्बुजे। बुडाला जेथें॥ ५३५॥

ऐसें आथि जें कांहीं। तें तो उत्तम पुरुषु पाहीं।
जें परमात्मा इहीं। बोलिजे नामीं॥ ५३६॥

तेंही एथ न मिसळतां। बोलणें जीवत्वें पंडुसुता।
जैसी बुडणेयाची वार्ता। थडियेचा कीजे॥ ५३७॥

तैसें विवेकाचिये कांठीं। उभें केलेया किरीटी।
पारावाराचिया गोठी। करणें वेदां॥ ५३८॥

म्हणौनि पुरुषु क्षराक्षर। दोन्ही देखोनि अवर।
यातें म्हणती पर। आत्मरूप॥ ५३९॥

अर्जुना ऐसिया परी। परमात्मा शब्दवरी।
सूचिजे गा अवधारीं। पुरुषोत्तमु॥ ५४०॥

एऱ्हवीं न बोलणेनि बोलणें। जेथिचें सर्व नेणिवा जाणणें।
कांहींच न होनि होणें। जे वस्तु गा॥ ५४१॥

सोऽहं तेंही अस्तवलें। जेथ सांगतेंचि सांगणें जालें।
द्रष्टत्वेंसीं गेलें। दृश्य जेथ॥ ५४२॥

आतां बिंबा आणि प्रतिबिंबा। माजी कैंची हें म्हणों नये
प्रभा।

जऱ्ही कैसेनि हे लाभा। जायेचि ना॥ ५४३॥

कां घ्राणा फुला दोहीं। द्रुति असे जे माझारिलां ठायीं।
ते न दिसे तरी नाहीं। ऐसें बोलों नये॥ ५४४॥

तैसें द्रष्टा दृश्य हें जाये। मग कोण म्हणे काय आहे।
हेंचि अनुभवें तेंचि पाहे। रूप तया॥ ५४५॥

जो प्रकाश्येंवीण प्रकाशु। ईशितव्येंवीण ईशु।
आपणेनिचि अवकाशु। वसवीत असे जो॥ ५४६॥

जो नादें ऐकिजता नादु। स्वादें चाखिजता स्वादु।
जो भोगिजतसे आनंदु। आनंदेंचि॥ ५४७॥

सुखासि सुख जोडिलें। जें तेज तेजासि सांपडलें।
शून्यही बुडालें। महाशून्यीं जिये॥ ५४८॥

जो पूर्णतेचा परिणामु। पुरुषु गा सर्वोत्तमु।
विश्रांतीचाही विश्रामु। विराला जेथें॥ ५४९॥

जो विकासाही वरी उरता। ग्रासातेंही ग्रासूनि पुरता।
जो बहुतें पाडें बहुतां। पासूनि बहु॥ ५५०॥

पैं नेणतयाप्रती। रुपेपणाची प्रतीती।
रुपें न होऊनि शुक्ती। दावी जेवीं॥ ५५१॥

कां ना ना अलंकारदशे। सोने न लपत लपालें असे।
विश्व न होनियां तैसें। विश्व जो धरी॥ ५५२॥

हें असो जलतरंगा। नाहीं सिनानेपण जेवीं गा।
तेवीं दिसता प्रकाशु जगा। आपणचि जो॥ ५५३॥

आपुलिया संकोचविकाशा। आपणचि रूप वीरेशा।
हा जळीं चंद्र हन जैसा। समग्र गा॥ ५५४॥

तैसा विश्वपणें कांहीं होये। विश्वलोपीं केहीं न जाये।
जैसा रात्री दिवसें नोहे। द्विधा रवि॥ ५५५॥

तैसा कांहींचि कोणीकडे। कायिसेनिहि वेंचीं न पडे।
जयाचें सांगडें। जयासीचि॥ ५५६॥

यस्मात्क्षरमतीतोऽहमक्षरादपि चोत्तमः॥
अतोऽस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः॥ १५.१८॥

जो आपणपेंचि आपणया। प्रकाशितसे धनंजया।
काय बहु बोलों जया। नाहीं दुजे॥ ५५७॥

तो गा मी निरुपाधिकु। क्षराक्षरोत्तमु एकु।
म्हणोनि म्हणे वेद लोकु। पुरुषोत्तमु॥ ५५८॥

यो मामेवमसंमूढो जानाति पुरुषोत्तमम्॥
स सर्वविद्भजति मां सर्वभावेन भारत॥ १५.१९॥

परी हें असो ऐसिया। मज पुरुषोत्तमातें धनंजया।
जाणे जो पाहलेया। ज्ञानमित्रें॥ ५५९॥

चेइलिया आपुलें ज्ञान। जैसें नाहींचि होय स्वप्न।
तैसें स्फुरतें जया त्रिभुवन। वावो जालें॥ ५६०॥

कां हातीं घेतलिया माळा। फिटे सर्पाभासाचा कांटाळा।
तैसा माझेनि बोधे टवाळा। नागवे जो॥ ५६१॥

लेणें सोनेंचि जो जाणे। तो लेणेपण तें वावो म्हणे।
तेवीं मी जानि जेणें। वाळिला भेदु॥ ५६२॥

मग म्हणे सर्वत्र सच्चिदानंदु। मीचि एकु स्वतःसिद्धु।
जो आपणेनसीं भेदु। नेणोनि जाणे॥ ५६३॥

तेणेंचि सर्व जाणितलें। हेंही म्हणणें थेंकुलें।
जे तया सर्व उरलें। द्वैत नाहीं॥ ५६४॥

म्हणोनि माझिया भजना। उचितु तोचि अर्जुना।
गगन जैसें आलिंगना। गगनाचिया॥ ५६५॥

क्षीरसागरा परगुणें। कीजे क्षीरसागरचिपणें।
अमृतचि होऊनि मिळणें। अमृतीं जेवीं॥ ५६६॥

साडेपंधरा मिसळावें। तैं साडेपंधरेंचि होआवें।
तेवीं मी जालिया संभवे। भक्ति माझी॥ ५६७॥

हां गा सिंधूसि आनी होती। तरी गंगा कैसेनि मिळती।
म्हणौनि मी न होतां भक्ती। अन्वयो आहे॥ ५६८॥

ऐसियालागीं सर्व प्रकारीं। जैसा कल्लोळु अनन्यु सागरीं।
तैसा मातें अवधारीं। भ्जिन्नला जो॥ ५६९॥

सूर्या आणि प्रभे। एकवंकी जेणें लोभें।
तो पाडु मानूं लाभे। भजना तया॥ ५७०॥

इति गुह्यतमं शास्त्रम् इदमुक्तं मयानघ॥
एतद्बुद्ध्वा बुद्धिमान्स्यात् कृतकृत्यश्च भारत॥ १५.२०॥

एवं कथिलयादारभ्य। जें हें सर्व शास्त्रैकलभ्य।
उपनिषदां सौरभ्य। कमळदळां जेवीं॥ ५७१॥

हें शब्दब्रह्माचें मथितें। श्रीव्यासप्रज्ञेचेनि हातें।
मथुनि काढिलें आयितें। सार आम्हीं॥ ५७२॥

जे ज्ञानामृताची जाह्नवी। जे आनंदचंद्रींची सतरावी।
विचारक्षीरार्णवींची नवी। लक्ष्मी जे हे॥ ५७३॥

म्हणोनि आपुलेनि पदें वर्णें। अर्थाचेनि जीवेंप्राणें।
मीवांचोनि हों नेणें। आन कांहीं॥ ५७४॥

क्षराक्षरत्वें समोर जालें। तयांचें पुरुषत्व वाळिलें।
मग सर्वस्व मज दिधलें। पुरुषोत्तमीं॥ ५७५॥

म्हणौनि जगीं गीता। मियां आत्मेनि पतिव्रता।
जे हे प्रस्तुत तुवां आतां। आकर्णिली॥ ५७६॥

साचचि बोलाचें नव्हे हें शास्त्र। पैं संसारु जिणतें हें शस्त्र।
आत्मा अवतरविते मंत्र। अक्षरें इयें॥ ५७७॥

परी तुजपुढां सांगितलें। तें अर्जुना ऐसें जालें।
जें गौप्यधन काढिलें। माझें आजि॥ ५७८॥

मज चैतन्यशंभूच्या माथां। जो निक्षेपु होता पार्था।
तया गौतमु जालासि आस्था। निधी तूं गा॥ ५७९॥

चोखटिवा आपुलिया। पुढिला उगाणा घेयावया।
तया दर्पणाचीचि परी धनंजया। केली आम्हां॥ ५८०॥

कां भरलें चंद्रतारांगणीं। नभ सिंधु आपणयामाजीं आणी।
तैसा गीतेसीं मी अंतःकरणीं। सुदला तुवां॥ ५८१॥

जे त्रिविधमळकटा। तूं सांडिलासी सुभटा।
म्हणौनि गीतेसीं मज वसौटा। जालासि गा॥ ५८२॥

परी हें बोलों काय गीता। जे हे माझी उन्मेषलता।
जाणे तो समस्ता। मोहा मुके॥ ५८३॥

सेविली अमृतसरिता। रोगु दवडूनि पंडुसुता।
अमरपण उचिता। देऊनि घाली॥ ५८४॥

तैसी गीता हे जाणितलिया। काय विस्मयो मोह जावया।
परी आत्मज्ञानें आपणापयां। मिळिजे येथ॥ ५८५॥

जया आत्मज्ञानाच्या ठायीं। कर्म आपुलेया जीविता पाहीं।
होऊनियां उतराई। लया जाय॥ ५८६॥

हारपलें दावूनि जैसा। मागु सरे वीरविलासा।
ज्ञानचि कळस वळघे तैसा। कर्मप्रासादाचा॥ ५८७॥

म्हणौनि ज्ञानिया पुरुषा। कृत्य करूं सरलें देखा।
ऐसा अनाथांचा सखा। बोलिला तो॥ ५८८॥

तें श्रीकृष्णवदनामृत। पार्थीं भरोनि असे वोसंडत।
मग व्यासकृपा प्राप्त। संजयासी॥ ५८९॥

तो धृतराष्ट्रराया। सूतसे पान करावया।
म्हणौनि जीवितांतु तया। नव्हेचि भारी॥ ५९०॥

एऱ्हवीं गीताश्रवण अवसरीं। आवडो लागतां अनधिकारी।
परी शेखीं तेचि उजरी। पातला भली॥ ५९१॥

जेव्हां द्राक्षीं दूध घातलें। तेव्हां वायां गेलें गमलें।
परी फळपाकीं दुणावलें। देखिजे जेवीं॥ ५९२॥

तैसी श्रीहरीवक्त्रींचीं अक्षरें। संजयें सांगितलीं आदरें।
तिहीं अंधु तोही अवसरें। सुखिया जाला॥ ५९३॥

तेंचि मऱ्हाठेनि विन्यासें। मियां उन्मेषें ठसेंठोंबसें।
जी जाणें नेणें तैसें। निरोपिलें॥ ५९४॥

सेवंतीये अरसिकांही। आंग पाहतां विशेषु तरी नाहीं।
परी सौरभ्य नेलें तिहीं। भ्रमरीं जाणिजे॥ ५९५॥

तैसें घडतें प्रमेय घेइजे। उणें तें मज देइजे।
जें नेणणें हेंचि सहजें। रूप कीं बाळा॥ ५९६॥

तरी नेणतें जऱ्ही होये। तऱ्ही देखोनि बाप कीं माये।
हर्ष केंहि न समाये। चोज करिती॥ ५९७॥

तैसें संत माहेर माझें। तुम्ही मिनलिया मी लाडैजें।
तेंचि ग्रंथाचेनि व्याजें। जाणिजो जी॥ ५९८॥

आतां विश्वात्मकु हा माझा। स्वामी श्रीनिवृत्तिराजा।
तो अवधारू वाक्यपूजा। ज्ञानदेवो म्हणे॥ ५९९॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे पुरुषोत्तमयोगोनाम पञ्चदशोऽध्यायः॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां पञ्चदशोऽध्यायः॥

श्लोक २० ओव्या ५९९

## 16 The Devine and Demonic Natures दैवासुरसंपद्विभागयोग

श्रीमद्भगवद्गीता षोडशोऽध्यायः।
ज्ञानेश्वरी अध्याय सोळावा

---

मावळवीत विश्वाभासु। नवल उदयला चंडांशु।
अद्वयाब्जिनीविकाशु। वंदूं आतां॥ १॥

जो अविद्याराती रुसोनियां। गिळी ज्ञानाज्ञानचांदणियां।
जो सुदिनु करी ज्ञानियां। स्वबोधाचा॥ २॥

जेणें विवळतिये सवळे। लाहोनि आत्मज्ञानाचे डोळे।
सांडिती देहाहंतेचीं अविसाळें। जीवपक्षी॥ ३॥

लिंगदेहकमळाचां। पोटीं वेंचतया चिद्भ्रमराचा।
बंदिमोक्षु जयाचा। उदैला होय॥ ४॥

शब्दाचिया आसकडीं। भेदनदीच्या दोहीं थडीं।
आरडत विरहवेडीं। बुद्धिबोधु॥ ५॥

तया चक्रवाकांचें मिथुन। सामरस्याचें समाधान।
भोगवी जो चिद्गगनरु। भुवनदिवा॥ ६॥

जेणें पाहालिये पाहांटे। भेदाची चोरळी फिटे।
रिघती आत्मानुभववाटे। पांथिक योगी॥ ७॥

जयाचेनि विवेककिरणसंगें। उन्मेखसूर्यकांतफुणगें।
दीपले जाळिती दांगें। संसाराचीं॥ ८॥

जयाचा रश्मिपुंजु निबरु। होतां स्वरूप उखरीं स्थिरु।
ये महासिद्धीचा पूरु। मृगजळाचा॥ ९॥

जो प्रत्यग्बोधाचिया माथया। सोऽहंतेचांमध्याह्नीं आलिया।
लपे आत्मभ्रांति छाया। आपणपां तळीं॥ १०॥

तेव्हां विश्वस्वप्नासहितें। कोण अन्यथामतिनिद्रेतें।
सांभाळी नुरेचि जेथें। मायाराती॥ ११॥

म्हणौनि अद्वयबोधपाटणीं। तेथ महानंदाची दाटणी।
मग सुखानुभूतीचीं घेणीं देणीं। मंदावो लागती॥ १२॥

किंबहुना ऐसैसें। मुक्तकैवल्य सुदिवसें।
सदा लाहिजे कां प्रकाशें। जयाचेनि॥ १३॥

जो निजधामव्योमींचा रावो। उदैलाचि उदैजतखेंवो।
फेडी पूर्वादि दिशांसीं ठावो। उदयास्ताचा॥ १४॥

न दिसणें दिसणेंनसी मावळवी। दोन्हीं झांकिलें तें सैंघ पालवी।
काय बहु बोलों ते आघवी। उखाचि आनी॥ १५॥

तो अहोरात्रांचा पैलकडु। कोणें देखावा ज्ञानमार्तंडु।
जो प्रकाश्येवीण सुरवाडु। प्रकाशाचा॥ १६॥

तया चित्सूर्या श्रीनिवृत्ती। आतां नमो म्हणों पुढतपुढती।
जे बाधका येइजतसे स्तुती। बोलाचिया॥ १७॥

देवाचें महिमान पाहोनियां। स्तुति तरी येइजे चांगावया।
जरी स्तव्यबुद्धीसीं लया। जाइजे कां॥ १८॥

जो सर्व नेणिवां जाणिजे। मौनाचिया मिठीया वानिजे।
कांहींच न होनि आणिजे। आपणपयां जो॥ १९॥

जया तुझिया उद्देशासाठीं। पश्यंती मध्यमा पोटीं।
सूनि परेसींही पाठीं। वैखरी विरे॥ २०॥

तया तूतें सेवकपणें। लेववीं बोलकेया स्तोत्राचें लेणें।
हें उपसाहावेंही म्हणतां उणें। अद्वयानंदा॥ २१॥

परी रंकें अमृताचा सागरु। देखिलिया पडे उचिताचा विसरु।
मग करूं धांवे पाहुणेरु। शाखांचा तया॥ २२॥

तेथ शाकुही कीर बहुत म्हणावा। तयाचा हर्षवेगुचि तो घ्यावा।
उजळोनि दिव्य तेजा हातिवा। ते भक्तीचि पाहावी॥ २३॥

बाळा उचित जाणणें होये। तरी बालपणचि कें आहे।
परी साचचि येरी माये। म्हणोनि तोषे॥ २४॥

हां गा गांवरसें भरलें। पाणी पाठीं पाय देत आलें।
तें गंगा काय म्हणितलें। परतें सर॥ २५॥

जी भृगूचा कैसा अपकारु। कीं तो मानूनि प्रियोपचारु।
तोषेचि ना शार्ङ्गधरु। गुरुत्वासी॥ २६॥

कीं आंधारें खतेलें अंबर। झालेया दिवसनाथासमोर।
तेणें तयातें पऱ्हा सर। म्हणितलें काई॥ २७॥

तेवीं भेदबुद्धीचिये तुळे। घालूनि सूर्यश्लेषाचें कांटाळें।
तुकिलासी ते येकी वेळे। उपसाहिजो जी॥ २८॥

जिहीं ध्यानाचां डोळां पाहिलासी। वेदादि वाचां वानिलासी।
जे उपसाहिलें तयांसी। तें आम्हांही करीं॥ २९॥

परी मी आजि तुझ्या गुणीं। लाचावलों अपराधु न गणीं।
भलतें करीं परी अर्धधणीं। नुठीं कदा॥ ३०॥

मियां गीतां येणें नांवें। तुझें पसायमृत सुहावें।
वानूं लाधलों तें दुणेन थांवें। दैवलें दैव॥ ३१॥

माझिया सत्यवादाचें तप। वाचा केलें बहुत कल्प।
तयां फळांचें हें महाद्वीप। पातली प्रभु॥ ३२॥

पुण्यें पोषिलीं असाधरणें। तियें तुझें गुण वानणें।
देऊनि मज उत्तीर्णें। जालीं आजी॥ ३३॥

जी जीवित्वाचां आडवीं। आतुडलों होतों मरणगांवीं।
ते अवदसाची आघवी। फेडिली आजी॥ ३४॥

जे गीता येणें नावें नावाणिगी। जे अविद्या जिणोनि दाटुगी।
ते कीर्ती तुझी आम्हां जोगी। वानावया जाली॥ ३५॥

पैं निर्धना घरीं वानिवसे। महालक्ष्मीचि येऊनि बैसे।
तयातें निर्धन ऐसें। म्हणों ये काई॥ ३६॥

कां अंधकाराचिया ठाया। दैवें सूर्यु आलिया।
तो अंधारुचि जगा यया। प्रकाशु नोहे॥ ३७॥

जया देवाची पाहतां थोरी। विश्व परमाणुही दशा न धरी।
तो भावाचिये सरोभरी। नव्हेचि काई॥ ३८॥

तैसा मी गीता वाखाणीं। हे खपुष्पाची तुरंबणि।
परी समर्थें तुवां शिरयाणीं। फेडिली ते॥ ३९॥

म्हणौनि तुझेनि प्रसादें। मी गीतापद्यें अगाधें।
निरूपीन जी विशदें। ज्ञानदेवो म्हणे॥ ४०॥

तरी अध्यायीं पंधरावां। श्रीकृष्णें तया पांडवा।
शास्त्रसिद्धंतु आघवा। उगाणिला॥ ४१॥

जे वृक्षरूपक परिभाषा। केलें उपाधिरूप अशेषा।
सद्वैद्यें जैसें दोषा। अंगलीना॥ ४२॥

आणि कूटस्थु जो अक्षरु। दाविला पुरुषप्रकारु।
तेणें उपहिताही आकारु। चैतन्या केला॥ ४३॥

पाठीं उत्तमपुरुष। शब्दांचें करूनि मिष।
दाविलें चोख। आत्मतत्त्व॥ ४४॥

आत्मविषयीं आंतुवट। साधन जें आंगदट।
ज्ञान हेंही स्पष्ट। चावळला॥ ४५॥

म्हणौनि इये अध्यायीं। निरूप्य नुरेचि कांहीं।
आतां गुरुशिष्या दोहीं। स्नेहो लाहण॥ ४६॥

एवं इयेविषयीं कीर। जाणते बुझावलें अपार।
परी मुमुक्षु इतर। साकांक्ष जाले॥ ४७॥

त्या मज पुरुषोत्तमा। ज्ञानें भेटे जो सुवर्मा।
तो सर्वज्ञु तोचि सीमा। भक्तीचीही॥ ४८॥

ऐसें हें त्रैलोक्यनायकें। बोलिलें अध्यायांत श्लोकें।
तेथें ज्ञानचि बहुतेकें। वानिलें तोषें॥ ४९॥

भरूनि प्रपंचाचा घोंटु। कीजे देखतयाचि देखतां द्रष्टु।
आनंदासाम्राज्यीं पाटु। बांधिजे जीवा॥ ५०॥

येवढ्या लाठेपणाचा उपावो। आनु नाहींचि म्हणे देवो।
हा सम्यग्ज्ञानाचा रावो। उपायामाजीं॥ ५१॥

ऐसे आत्मजिज्ञासु जे होते। तिहीं तोषलेनि चित्तें।
आदरें तया ज्ञानातें। वोवाळिलें जीव॥ ५२॥

आतां आवडी जेथ पडे। तयाचि अवसरीं पुढें पुढें।
रिगों लागे हें घडे। प्रेम ऐसें॥ ५३॥

म्हणौनि जिज्ञासूंच्या पैकीं। ज्ञानीं प्रतीती होय ना जंव निकी।
तंव योगक्षेमु ज्ञानविखीं। स्फुरेलचि कीं॥ ५४॥

म्हणोनि तेंचि सम्यग्ज्ञान। कैसेनि होय स्वाधीन।
जालिया वृद्धियत्न। घडेल केवीं॥ ५५॥

कां उपजोंचि जें न लाहे। जें उपजलेंही अव्हांटा सूये।
तें ज्ञानी विरुद्ध काय आहे। हें जाणावें कीं॥ ५६॥

मग जाणतयां जें विरूं। तयाचीं वाट वाहती करूं।
ज्ञाना हित तेंचि विचारूं। सर्वभावें॥ ५७॥

ऐसा जिज्ञासु तुम्हीं समस्तीं। भावो जो धरिला असे चित्तीं।
तो पुरवावया लक्ष्मीपती। बोलिजेल॥ ५८॥

ज्ञानासि सुजन्म जोडे। आपली विश्रांतीही वरी वाढे।
ते संपत्तीचे पवाडे। सांगिजेल दैवी॥ ५९॥

आणि ज्ञानाचेनि कामाकारें। जे रागद्वेषांसि दे थारे।
तिये आसुरियेहि घोरें। करील रूप॥ ६०॥

सहज इष्टानिष्टकरणी। दोघीचि इया कवतुकिणी।
हे नवमाध्यायीं उभारणी। केली होती॥ ६१॥

तेथ साउमा घेयावा उवावो। तंव वोडवला आन प्रस्तावो।
तरी तयां प्रसंगें आतां देवो। निरूपीत असे॥ ६२॥

या निरूपणाचेनि नांवें। अध्याय पद सोळावें।
लावणी पाहतां जाणावें। मागिलावरी॥ ६३॥

परी असो हें आतां प्रस्तुतीं। ज्ञानाच्या हिताहितीं।
समर्था संपत्ती। इयाचि दोन्ही॥ ६४॥

जे मुमुक्षुमार्गींची बोळावी। जे मोहरात्रीची धर्मदिवी।
ते आधीं तंव दैवी। संपत्ती ऐका॥ ६५॥

जेथ एक एकातें पोखी। ऐसे बहुत पदार्थ येकीं।
संपादिजती ते लोकीं। संपत्ति म्हणिजे॥ ६६॥

ते दैवी सुख संभवी। तेथ दैवां गुणां येकोपजीवी।
जाली म्हणौनि दैवी। संपत्ति हे॥ ६७॥

श्री भगवानुवाच।
अभयं सत्त्वसंशुद्धिः ज्ञानयोगव्यवस्थितिः।
दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम्॥ १६.१॥

आतां तयाचि दैवगुणां। माजी धुरेचा बैसणा।
बैसे तया आकर्णा। अभय असे॥ ६८॥

तरी न घालूनि महापुरीं। न घेपे बुडण्याची शियारी।
कां रोगु न गणिजे घरीं। पथ्याचिया॥ ६९॥

तैसा कर्माकर्माचिया मोहरा। उठूं नेदूनि अहंकारा।
संसाराचा दरारा। सांडणें येणें॥ ७०॥

अथवा ऐक्यभावाचेनि पैसें। दुजे मानूनि आत्मा ऐसें।
भयवार्ता देशें। दडवणें जें॥ ७१॥

पाणी बुडवूं ये मिठातें। तंव मीठचि पाणी आतें।
तेवीं आपण जालेनि अद्वैतें। नाशे भय॥ ७२॥

अगा अभय येणें नांवें। बोलिजे तें हें जाणावें।
सम्यग्ज्ञानाचें आघवें। धांवणें हें॥ ७३॥

आतां सत्त्वशुद्धी जे म्हणिजे। ते ऐसां चिन्हीं जाणिजे।
तरी जळे ना विझे। राखोंडी जैसी॥ ७४॥

कां पाडिवा वाढी न मगे। अंवसे तुटी सांडूनि मागें।
माजीं अतिसूक्ष्म अंगें। चंद्रु जैसा राहे॥ ७५॥

ना तरि वार्षिया सांडिली। ग्रीष्में नाहीं मांडिली।
माजीं निजरूपें निवडली। गंगा जैसी॥ ७६॥

तैसी संकल्पविकल्पाची वोढी। सांडूनि रजतमाची कावडी।
भोगितां निजधर्माची आवडी। बुद्धि उरे॥ ७७॥

इंद्रियवर्गें दाखविलिया। विरुद्धा अथवा भलीया।
विस्मयो कांहीं केलिया। नुठी चित्तीं॥ ७८॥

गांवा गेलिया वल्लभु। पतिव्रतेचा विरहक्षोभु।
भलतेसणी हानिलाभु। न मनीं जेवीं॥ ७९॥

तेवीं सत्त्स्वरूप रुचलेपणें। बुद्धी जें ऐसें अनन्य होणें।
ते सत्त्वशुद्धी म्हणे। केशिहंता॥ ८०॥

आतां आत्मलाभाविखीं। ज्ञानयोगामाजीं एकीं।
जे आपुलिया ठाकीं। हांवे भरे॥ ८१॥

तेथ सगळिये चित्तवृत्ती। त्यागु करणें ऐशा रीती।
निष्कामें पूर्णाहुती। हुताशीं जैसी॥ ८२॥

कां सुकुळीनें आपुली। आत्मजा सत्कुळींच दिधली।
हें असो लक्ष्मी स्थिरावली। मुकुंदीं जैसी॥ ८३॥

तैसेनि विकलेपणें। जें योगज्ञानींच या वृत्तिक होणें।
तो तिजा गुण म्हणे। श्रीकृष्णनाथ॥ ८४॥

आतां देहवाचाचित्तें। यथासंपन्नें वित्तें।
वैरी जालियाही आर्तातें। न वंचणें जें कां॥ ८५॥

पत्र पुष्प छाया। फळें मूळें धनंजया।
वाटेचा न चुके आलिया। वृक्षु जैसा॥ ८६॥

तैसें मनौनि धनवरी। विद्यमानें आल्या अवसरीं।
श्रांतांचिये मनोहारीं। उपयोगा जाणें॥ ८७॥

तयां नांव जाण दान। जें मोक्षनिधानाचें अंजन।
हें असो ऐक चिन्ह। दमाचें तें॥ ८८॥

तरी विषयेंद्रिय मिळणी। करूनि घापे वितुटणी।
जैसें तोडिजे खड्गु पाणी। पारकेया॥ ८९॥

तैसा विषयजातांचा वारा। वाजों नेदिजे इंद्रियद्वारां।
इये बांधोनि प्रत्याहारा। हातीं वोपी॥ ९०॥

आंतुला चित्ताचे अंगवरीं। सांडोनि प्रवृत्ति पडे परबाहेरी।
आगी सुयिजे दाहींहि द्वारीं। वैराग्याची॥ ९१॥

श्वासोच्छ्वासाहुनि बहुवसें। व्रतें आचरे खरपुसें।
वोसंतिता रात्रिदिवसें। नाराणकु जया॥ ९२॥

पैं दमु ऐसें म्हणिपे। तो हा जाण स्वरूपें।
यागार्थुही संक्षेपें। सांगों ऐक॥ ९३॥

तरी ब्राह्मण करुनि धुरे। स्त्रियादिक पैल मेरे।
माझारीं अधिकारें। आपुलालेनि॥ ९४॥

जया जे सर्वोत्तम। भजनीय देवताधर्म।
ते येणें यथागम। विधी यजिजे॥ ९५॥

जैसा द्विज षट्कर्में करी। शूद्र तयातें नमस्कारी।
कीं दोहींसिही सरोभरी। निपजे यागु॥ ९६॥

तैसें अधिकारपर्यालोचें। हें यज्ञ करणें सर्वांचें।
परी विष फळाशेचें। न घापे माजीं॥ ९७॥

आणि मी कर्ता ऐसा भावो। नेदिजे देहाचेनि द्वारें जावों।
ना वेदाज्ञेसि तरी ठावो। होइजे स्वयें॥ ९८॥

अर्जुना एवं संज्ञु। सर्वत्र जाण यज्ञु।
कैवल्यमार्गींचा अभिज्ञु। सांगाती हा॥ ९९॥

आतां चेंडुवें भूमी हाणिजे। हें नव्हे तो हाता आणिजे।
कीं शेतीं बीं विखुरजे। परी पिकीं लक्ष॥ १००॥

ना तरि ठेविले देखावया। आदर कीजे दिविया।
कां शाखा फळें यावया। सिंपिजे मूळ॥ १०१॥

हें बहु असो आरिसा। आपणपें देखावया जैसा।
पुढतपुढती बहुवसा। उटिजे प्रीती॥ १०२॥

तैसा प्रतिपाद्यु जो ईश्वरु। तो होआवयालागी गोचरु।
श्रुतीचा निरंतरु। अभ्यासु करणें॥ १०३॥

ते द्विजांसीच ब्रह्मसूत्र। येरा स्तोत्र कां नाममंत्र।
आवर्तवणें पवित्र। पावावया तत्त्व॥ १०४॥

पार्था गा स्वाध्यावो। बोलिजे तो हा म्हणे देवो।
आतां तप शब्दाभिप्रावो। आईक सांगों॥ १०५॥

तरी दानें सर्वस्व देणें। वेंचणें तें व्यर्थ करणें।
जैसे फळोनि स्वयें सुकणें। औषधीचें जेवीं॥ १०६॥

ना ना धुपाचा अग्निप्रवेशु। कनकीं तुकाचा नाशु।
कां पितृपक्षु पोषितां ऱ्हासु। चंद्राचा जैसा॥ १०७॥

तैसा स्वरूपाचिया प्रसरा। लागीं प्राणेंद्रियशरीरां।
आटणी करणें जें वीरा। तेंचि तप॥ १०८॥

अथवा अनारिसें। तपाचें रूप जरी असे।
तरी जाण जेवीं दुधीं हंसें। सूदली चांचू॥ १०९॥

तैसें देहजीवाचिये मिळणी। जो उदयजत सूये पाणी।
तो विवेक अंतःकरणीं। जागवी जो॥ ११०॥

पाहतां आत्मयाकडे। परी बुद्धीचा पैसु सांकडे।
सनिद्र स्वप्न बुडे। जागणीं जैसे॥ १११॥

तैसा आत्मपर्यालोचु। प्रवर्ते जो साचु।
तपाचा हा निर्वेचु। धनुर्धरा॥ ११२॥

आतां बाळाच्या हितीं स्तन्य। जैसें ना ना भूतीं चैतन्य।
तैसें प्राणिमात्रीं सौजन्य। आर्जव तें॥ ११३॥

अहिंसा सत्यमक्रोधः त्यागः शान्तिरपैशुनम्।
दया भूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं ह्रीरचापलम्॥ १६.२॥

आणि जगाचिया सुखोद्देशें। शरीरें वाचा मानसें।
राहाटणें तें अहिंसे। रूप जाण॥ ११४॥

आतां तीख होऊनी मवाळ। जैसें जातीचें मुकुळ।
कां तेज परी शीतळ। शशांकाचें॥ ११५॥

शके दावितांचि रोग फेडूं। आणि जिभे तरी नव्हे कडु।
ते वोखदु नाहीं मा घडूं। उपमा कैंची॥ ११६॥

तरी मऊपणें बुबुळें। झगडतांही परी नाडळे।
एऱ्हवीं फोडी कोराळें। पाणी जैसे॥ ११७॥

तैसें तोडावया संदेह। तीख जैसें कां लोह।
श्राव्यत्वें तरी माधुर्य। पायीं घाली॥ ११८॥

आइकतां कौतुकें। कानातेंचि निघती मुखें।
जें साचारिवेचेनि बिकें। ब्रह्महीं भेदी॥ ११९॥

किंबहुना प्रियपणें। कोणातेंही झकवूं नेणे।
यथार्थ तरी खुपणें। नाहीं कवणा॥ १२०॥

एऱ्हवीं गोरी कीर काना गोड। परी साचाचां पाखाळीं कीड।
आगीचें करणें उघड। परी जळो तें साच॥ १२१॥

कानीं लागतां महुर। अर्थें विभांडी जिव्हार।
तें वाचा नव्हे सुंदर। लांवचि पां॥ १२२॥

परी अहितीं कोपोनि सोप। लालनीं मऊ जैसें पुष्प।
तिये मातेचें स्वरूप। जैसें कां होय॥ १२३॥

तैसें श्रवणसुखचतुर। परिणमोनि साचार।
बोलणें जें अविकार। तें सत्य येथें॥ १२४॥

आतां घालितांही पाणी। जैसी पाषाणीं न निघे आणी।
का मथिलिया लोणी। कांजी नेदी॥ १२५॥

त्वचा पायें शिरीं। हालेयाही फडे न करी।
वसंतींही अंबरीं। न होती पुष्पें॥ १२६॥

ना ना रंभेचेनिही रूपें। शुकीं नुठिजेचि कंदर्पें।
कां भस्मीं वन्हि न उद्दीपे। घृतेंही जेवीं॥ १२७॥

तेवींचि कुमारु क्रोधें भरे। तैसिया मंत्राचीं बीजाक्षरें।
तियें निमित्तेंही अपारें। मीनलिया॥ १२८॥

परि धातयाही पायां पडतां। नुठी गतायु पंडुसुता।
तैसी नुपजे उपजवितां। क्रोधोर्मी गा॥ १२९॥

अक्रोधत्व ऐसें। नांव तें ये दशे।
जाण ऐसें श्रीनिवासें। म्हणितलें तया॥ १३०॥

आतां मृत्तिकात्यागें घटु। तंतुत्यागें पटु।
त्यजिजे जेवीं वटु। बीजत्यागें॥ १३१॥

कां त्यजुनि भिंतिमात्र। त्यजिजे आघवेंचि चित्र।
कां निद्रात्यागें विचित्र। स्वप्नजाळ तें॥ १३२॥

ना ना जळत्यागें तरंग। वर्षात्यागें मेघ।
त्यजिजती जैसे भोग। धनत्यागें॥ १३३॥

तेवीं बुद्धिमंतीं देहीं। अहंता सांडूनि पाहीं।
सांडिजे अशेषही। संसारजात॥ १३४॥

तया नांव त्यागु। म्हणे तो यज्ञांगु।
हे मानूनि सुभगु। पार्थु पुसे॥ १३५॥

आतां शांतीचें जी लिंग। तें व्यक्त मज सांग।
देवो म्हणती चांग। अवधानदेई॥ १३६॥

तरी गिळोनि ज्ञेयातें। ज्ञाता ज्ञानही माघौतें।
हारपें निरूतें। ते शांति पैं गा॥ १३७॥

जैसा प्रळयांबूचा उभडु। बुडवूनि विश्वाचा पवाडु।
होय आपणपें निविडु। आपणपांचि॥ १३८॥

मग उगम ओघ सिंधु। हा नुरेचि व्यवहारभेदु।
परी जलैक्याचा बोधु। तोही कवणा॥ १३९॥

तैसी ज्ञेया देता मिठी। ज्ञातृत्वही पडे पोटीं।
मग उरे तेंचि किरीटी। शांतीचें रूप॥ १४०॥

आतां कदर्थवित व्याधी। बळीकरणाचिया आधीं।
आपपरु न शोधी। सद्वैद्य जैसा॥ १४१॥

का चिखलीं रुतली गाये। धड भाकड न पाहे।
जो तियेचिया ग्लानी होये। कालाभुला॥ १४२॥

ना ना बुडतियातें सकरुणु। न पुसें अंत्यजु कीं ब्राह्मणु।
काढूनि राखे प्राणु। हेंचि जाणे॥ १४३॥

कीं माहेवणी पापियें। उघडी केली विपायें।
ते नेसविल्यावीण न पाहे शिष्टु जैसा॥ १४४॥

तैसे अज्ञानप्रमादादिकीं। कां प्राक्तनींही सदोखीं।
निंद्यत्वाच्या सर्वविखीं खिळिले जे॥ १४५॥

तयां आंगीक आपुलें। देऊनियां भलें।
विसरविजती सलें। सलतीं तियें॥ १४६॥

अगा पुढिलाचा दोषु। करूनि आपुलिये दिठी चोखु।
मग घापे अवलोकु। तयावरी॥ १४७॥

जैसा पुजूनि देवो पाहिजे। पेरूनि शेता जाइजे।
तोषोनि प्रसादु घेइजे। अतिथीचा॥ १४८॥

तैसें आपुलेनि गुणें। पुढिलाचें उणें।
फेडुनियां पाहणें। तयाकडे॥ १४९॥

वांचूनि न विंधिजे वर्मी। नातुडविजे अकर्मीं।
न बोलविजे नामीं। सदोषीं तिहीं॥ १५०॥

वरी कोणे एकें उपायें। पडिलें तें उभें होये।
तेंचि कीजे परी घाये। नेदावे वर्मी॥ १५१॥

पैं उत्तमाचियासाठीं। नीच मानिजे किरीटी।
हें वांचोनि दिठी। दोषु न घेपे॥ १५२॥

अपैशून्याचें लक्षण। अर्जुना हें फुडें जाण।
मोक्ष मार्गींचें सुखासन। मुमुक्षूं हें॥ १५३॥

आतां दया ते ऐसी। पूर्णचंद्रिका जैसी।
निववितां न कडसी। सानें थोर॥ १५४॥

तैसें दुःखिताचें शिणणें। हिरतां सकणवपणें।
उत्तमाधम नेणें। विवंचूं गा॥ १५५॥

पैं जगीं जीवनासारिखें। वस्तु अंगवरी उपखे।
परी जातें जीवित राखे। तृणाचेंहि॥ १५६॥

तैसें पुढिलाचेनि तापें। कळवळलिये कृपे।
सर्वस्वेंसीं दिधलें आपणपें। तरी थोडेंचि गमे॥ १५७॥

निम्न भरलिया उणें। पाणी ढळोंचि नेणे।
तेवीं श्राता तोषौनि जाणें। सामोरेया॥ १५८॥

पैं पायीं कांटा नेहटे। तंव व्यथा जीवीं उमटे।
तैसा पोळे संकटें। पुढिलांचेनि॥ १५९॥

कां पावो शीतळता लाहे। कीं ते डोळ्यांचिलागीं होये।
तैसा परसुखें जाये। सुखावतु जो॥ १६०॥

किंबहुना तृषितालागीं। पाणी आरायिलें असे जगीं।
तैसें दुःखितांच्या सेलभागीं। जिणें जयाचें॥ १६१॥

तो पुरुषु वीरराया। मूर्तिमंत जाण दया।
मी उदयजतांचि तया। ऋणिया लाभें॥ १६२॥

आतां सूर्यासि जीवें। अनुसरलिया राजीवें।
परी तें तो न शिवे। सौरभ्य जैसें॥ १६३॥

कां वसंताचिया वाहाणी। आलिया वनश्रीचिया अक्षौहिणी।
ते न करीतुचि घेणी। निगाला तो॥ १६४॥

हें असो महासिद्धीसी। लक्ष्मीही आलिया पाशीं।
परी महाविष्णु जैसी। गणीचिना ते॥ १६५॥

तैसे ऐहिकींचे कां स्वर्गींचे। भोग पाईक जालिया इच्छेचे।
परी भोगावे हें न रुचे। मनामाजीं॥ १६६॥

बहुवें काय कौतुकीं। जीव नोहे विषयाभिलाखी।
अलोलुप्त्वदशा ठाउकी। जाण ते हे॥ १६७॥

आतां माशियां जैसें मोहळ। जळचरां जेवीं जळ।
कां पक्षियां अंतराळ। मोकळें हें॥ १६८॥

ना तरि बाळकोद्देशें। मातेचें स्नेह जैसें।
कां वसंतींचा स्पर्शें। मऊ मलयानिळु॥ १६९॥

डोळ्यां प्रियाची भेटी। कां पिलियां कूर्मीची दिठी।
तैसीं भूतमात्रीं राहटी। मवाळ ते॥ १७०॥

स्पर्शें अतिमृदु। मुखीं घेतां सुस्वादु।
घ्राणासि सुगंधु। उजाळु आंगें॥ १७१॥

तो आवडे तेवढा घेतां। भलतेया विरुद्ध जरी न होतां।
तरी उपमे येता। कापूर कीं॥ १७२॥

परी महाभूतें पोटीं वाहे। तेवींचि परमाणूमाजीं सामाये।
या विश्वानुसार होये। गगन जैसें॥ १७३॥

काय सांगों ऐसें जिणें। जें जगाचेनि जीवें प्राणें।
तया नांव म्हणें। मार्दव मी॥ १७४॥

आतां पराजयें राजा। जैसा कदर्थिजे लाजा।
कां मानिया निस्तेजा। निकृष्टास्तव॥ १७५॥

ना ना चांडाळमंदिराशीं। अवचटें आलिया संन्याशी।
मग लाज होय जैसी। उत्तम तया॥ १७६॥

क्षत्रिया रणीं पळोनि जाणें। तें कोण साहे लाजिरवाणें।
कां वैधव्यें पाचारणें। महासतियेतें॥ १७७॥

रूपसा उदयलें कुष्ट। संभाविता कुटीचें बोट।
तया लाजा प्राणसंकट। होय जैसें॥ १७८॥

तैसें औटहातपणें। जें शव होऊनि जिणें।
उपजों उपजों मरणें। नावां नावां॥ १७९॥

तियें गर्भमेदमुसें। रक्तमूत्ररसें।
वोंतीव होऊनि असे। तें लाजिरवाणें॥ १८०॥

हें बहु असो देहपणें। नांवारूपासि येणें।
नाहीं लाजिरवाणें। तयाहूनि॥ १८१॥

ऐसैसिया अवकळा। घेपे शरीराचा कंटाळा।
ते लाज पैं निर्मळा। निसुगा गोड॥ १८२॥

आतां सूत्रतंतु तुटलिया। चेष्टाचि ठाके सायखडिया।
तैसें प्राणजयें कर्मेंद्रियां। खुंटे गती॥ १८३॥

कीं मावळलिया दिनकरु। सरे किरणांचा प्रसरु।
तैसा मनोजयें प्रचारु। बुद्धीन्द्रियांचा॥ १८४॥

एवं मनपवननियमें। होती दाही इंद्रियें अक्षमें।
तें अचापल्य वर्में। येणें होय॥ १८५॥

तेजः क्षमा धृतिः शौचम् अद्रोहो नातिमानिता।
भवन्ति संपदं दैवीम् अभिजातस्य भारत॥ १६.३॥

आतां ईश्वरप्राप्तीलागीं। प्रवर्ततां ज्ञानयोगी।
धिंवसेयाच्या आंगीं। वोसिवा नव्हे॥ १८६॥

वोकटें मरणा ऐसें। तेंही आलें अग्निप्रवेशें।
परी प्राणेश्वरोद्देशें। न गणीचि सती॥ १८७॥

तैसें आत्मनाथाचिया आधी। लाऊनि विषयविषाची बाधी।
धांवों आवडे पाणधी। शून्याचिये॥ १८८॥

न ठाके निषेधु आड। न पडे विधीची भीड।
नुपजेचि जीवीं कोड। महासिद्धीचें॥ १८९॥

ऐसें ईश्वराकडे निज। धांवे आपसया सहज।
तयां नांव तेज। आध्यात्मिक तें॥ १९०॥

आतां सर्वही साहातिया गरिमा। गर्वा न ये तेचि क्षमा।
जैसें देह वाहोनि रोमा। वाहणें नेणें॥ १९१॥

आणि मातलिया इंद्रियांचे वेग। कां प्राचीनें खवळले रोग।
अथवा योगवियोग। प्रियाप्रियांचे॥ १९२॥

यया आघवियांचाचि थोरु। एके वेळे आलिया पूरु।
तरी अगस्ति कां होऊनि धीरु। उभा ठाके॥ १९३॥

आकाशीं धूमाची रेखा। उठिली बहुवा आगळिका।
ते गिळी येकी झुळुका। वारा जेवीं॥ १९४॥

तैसें अधिभूताधिदैवां। अध्यात्मादि उपद्रवां।
पातलेयां पांडवा। गिळुनि घाली॥ १९५॥

ऐसें चित्तक्षोभाच्या अवसरीं। उचलूनि धैर्या जें चांगावें करी।
धृति म्हणिपे अवधारीं। तियेतें गा॥ १९६॥

आतां निर्वाळूनि कनकें। भरिला गांगें पीयूखें।
तया कलशाचियासारिखें। शौच असे॥ १९७॥

जे आंगीं निष्काम आचारु। जीवीं विवेकु साचारु।
तो सबाह्य घडला आकारु। शुचित्वाचा॥ १९८॥

कां फेडित पाप ताप। पोखीत तीरींचे पादप।
समुद्रा जाय आप। गंगएचें जैसें॥ १९९॥

कां जगाचें आंध्य फेडितु। श्रियेचीं राउळें उघडितु।
निघे जैसा भास्वतु। प्रदक्षिणे॥ २००॥

तैसीं बांधलीं सोडित। बुडालीं काढित।
सांकडी फेडीत आर्तांचिया॥ २०१॥

किंबहुना दिवसराती। पुढिलाचें सुख उन्नती।
आणित आणित स्वार्थी। प्रवेशिजे॥ २०२॥

वांचूनि आपुलिया काजालागीं। प्राणिजातांच्या अहितभागीं।
संकल्पाचीही आडवंगी। न करणें जें॥ २०३॥

पैं अद्रोहत्व ऐशिया गोष्टी। ऐकसी जिया किरीटी।
तें सांगितलें हें दिठी। पाहों ये तैसें॥ २०४॥

आणि गंगा शंभूच्या माथां। पावोनि संकोचे जेवीं पार्था।
तेवीं मान्यपणें सर्वथा। लाजणें जे॥ २०५॥

तें हें पुढतपुढती। अमानित्व जाण सुमती।
मागां सांगितलेंसे किती। तेंचि तें बोलों॥ २०६॥

एवं इहीं सव्विसें। ब्रह्मसंपदा हे वसत असे।
मोक्षचक्रवर्तीचें जैसें। अग्रहार होय॥ २०७॥

ना ना हे संपत्ति दैवी। या गुणतीर्थांची नित्य नवी।
निर्विण्णसगरांची दैवी। गंगाचि आली॥ २०८॥

कीं गुणकुसुमांची माळा। हे घेऊनि मुक्तिबाळा।
वैराग्यनिरपेक्षाचा गळा। गिंवसीत असे॥ २०९॥

कीं सव्विसें गुणज्योती। इहीं उजळूनि आरती।
गीता आत्मया निजपती। नीरांजना आली॥ २१०॥

उगळितीं निर्मळें। गुण इयेंचि मुक्ताफळें।
दैवी शुक्तिकळें। गीतार्णवींची॥ २११॥

काय बहु वानूं ऐसी। अभिव्यक्ती ये अपैसी।
केलें दैवी गुणराशी। संपत्तिरूप॥ २१२॥

आतां दुःखाची आंतुवट वेली। दोषकाट्यांची जरी भरली।
तरी निजाभिधानीं घालीं। आसुरी ते॥ २१३॥

पैं त्याज्य त्यजावयालागीं। जाणावी जरी अनुपयोगी।
तरी ऐका ते चांगी। श्रोत्रशक्ती॥ २१४॥

तरी नरकव्यथा थोरी। आणावया दोषीं अघोरीं।
मेळु केला ते आसुरी। संपत्ति हे॥ २१५॥

ना ना विषवर्गु एकवटु। तयां नांव जैसें बासटु।
आसुरी संपत्ती हा खोटु। दोषांचा तैसा॥ २१६॥

दम्भो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च।
अज्ञानं चाभिजातस्य पार्थ संपदमासुरीम्॥ १६.४॥

तरी तयाचि आसुरां। दोषांमाजी जया वीरा।
वाडपणाचा डांगोरा। तो दंभु ऐसा॥ २१७॥

जैसी आपुली जननी। नग्न दाविलिया जनीं।
ते तीर्थचि परी पतनीं कारण होय॥ २१८॥

कां विद्या गुरूपदिष्टा। बोभाइलियां चोहटां।
तरी इष्टदा परी अनिष्टा। हेतु होती॥ २१९॥

पैं आंगें बुडतां महापूरीं। जे वेगें काढी पैल तीरीं।
ते नांवचि बांधिलिया शिरीं। बुडवी जैसी॥ २२०॥

कारण जें जीविता। तें वानिलें जरी सेवितां।
तरी अन्नचि पंडुसुता। होय विष॥ २२१॥

तैसा दृष्टादृष्टाचा सखा। धर्मु जाला तो फोकारिजे देखा।
तरी तारिता तोचि देखा। लागीं होय॥ २२२॥

म्हणौनि वाचेचा चौबारा। घातलिया धर्माचा पसारा।
धर्मुचि तो अधर्मु होय वीरा। तो दंभु जाणें॥ २२३॥

आतां मूर्खाचिये जिभे। अक्षराचा आंबुखा सुभे।
आणि तो ब्रह्मसभे। न रिझे जैसा॥ २२४॥

कां मादुरी लोकांचा घोडा। गजपतिही मानी थोडा।
कां कांटियेवरिलिया सरडा। स्वर्गुही नीच॥ २२५॥

तृणाचेनि इंधनें। आगी धावे गगनें।
थिल्लरबळें मीनें। न गणिजे सिंधु॥ २२६॥

तैसा माजे स्त्रिया धनें। विद्या स्तुती बहुतें मानें।
एके दिवसींचेनि परान्नें। अल्पकु जैसा॥ २२७॥

अभ्रच्छायेचिया जोडी। निदैवु घर मोडी।
मृगांबु देखोनि फोडी। पाणियाढें मूर्ख॥ २२८॥

किंबहुना ऐसैसें। उतणें जें संपत्तिमिसें।
तो दर्पु गा अनारिसें। न बोलें घेईं॥ २२९॥

आणि जगा वेदीं विश्वासु। आणि विश्वासीं पूज्य ईशु।
जगीं एक तेजसु। सूर्यचि हा॥ २३०॥

जगस्पृहे आस्पद। एक सार्वभौमपद।
न मरणें निर्विवाद। जगा पढियें॥ २३१॥

म्हणौनि जरी उत्साहें। यातें वानूं जाये।
कीं तें आइकोनि मत्सरु वाहे। फुगों लागे॥ २३२॥

म्हणे ईश्वरातें खायें। तया वेदा विष सूयें।
गौरवामाजीं त्राये। भंगीत असे॥ २३३॥

पतंगा नावडे ज्योती। खद्योता भानूची खंती।
कां टिटिभेनें अपापंती। वैरी केला॥ २३४॥

तैसा अहंनामाचेनि मोहें। ईश्वराचें नामही न साहे।
बापातें म्हणे मज हे। सवती जाली॥ २३५॥

ऐसा अहंमन्यतेचा पुष्टगंडु। तो अभिमानी परमलंडु।
रौरवाचा रूढु। मार्गुचि तो हा॥ २३६॥

आणि पुढिलांचें सुख। देखणियाचें होय मिख।
चढे क्रोधाचें विख। मनोवृत्ती॥ २३७॥

शीतजळाचिये भेटी। तातला तेलीं आगीं उठी।
चंद्रु देखोनि जळे पोटीं। कोल्हा जैसा॥ २३८॥

विश्वाचें आयुष्य जेणें उजळे। तो सूर्यु उदैला देखोनि सवळे।
पापिया फुटती डोळे। डुडुळाचे॥ २३९॥

जगाची सुखपहांट। चोरां मरणाहूनि निकृष्ट।
दुधाचें काळकूट। होय व्याळीं॥ २४०॥

अगाधें समुद्रजळें। प्राशितां अधिकें जळे।
वडवाग्नि न मिळे। शांति कहीं॥ २४१॥

तैसा विद्याविनोदविभवें। देखे पुढिलांचीं दैवें।
तंव तंव रोषु दुणावे। क्रोधु तो जाण॥ २४२॥

आणि मन सर्पाची कुटी। डोळे नाराचांची सुटी
बोलणें ते वृष्टी इंगळांची॥ २४३॥

येर जे क्रियाजात। तें तिखयाचें कर्वत।
ऐसें सबाह्य खसखसित। जयाचें गा॥ २४४॥

तो मनुष्यांत अधमु जान। पारुष्याचें अवतरण।
आतां आइक खुण। अज्ञानाची॥ २४५॥

तरी शीतोष्णस्पर्शा। निवाडु नेणे पाषाणु जैसा।
कां रात्री आणि दिवसा। जात्यंधु तो॥ २४६॥

आगी उठिला आरोगणें। जैसा खाद्याखाद्य न म्हणे।
कां परिसु पाडु नेणे। सोनया लोहा॥ २४७॥

ना तरि तेना ना रसीं। रिघोनि दर्वी जैसी।
परी रसस्वादासी। चाखो नेणे जेवीं॥ २४८॥

कां वारा जैसा पारखी। नव्हेचि गा मार्गामार्गाविखीं।
तैसे कृत्याकृत्यविवेकीं। अंधपण जें॥ २४९॥

हें चोख हें मैळ। ऐसें नेणोनियां बाळ।
देखे तें केवळ। मुखींचि घाली॥ २५०॥

तैसें पापपुण्याचें खिचटें। करोनि खातां बुद्धिचेष्टे।
कडु मधुर न वाटे। ऐसी जे दशा॥ २५१॥

तिये नाम अज्ञान। या बोला नाहीं आन।
एवं साही दोषाचें चिन्ह। सांगितलें॥ २५२॥

इहींच साहीं दोषांगीं। हे आसुरी संपत्ति दाटुगी।
जैसें थोर विष भुजंगी। अंग सानें॥ २५३॥

कां तिघां वन्हींची पांती। पाहतां थोडे ठाय गमती।
परी विश्वही प्राणाहुती। करूं न पुरे॥ २५४॥

धातयाही गेलिया शरण। त्रिदोषीं न चुके मरण।
तया तिहींची दुणी जाण। साही दोष हे॥ २५५॥

इहीं साही दोषीं संपूर्णी। जाली इयेचि उभारणी।
म्हणोनि आसुरी उणी। संपदा नव्हे॥ २५६॥

परी क्रूरग्रहांची जैसी। मांदी मिळे एकेचि राशी।
कां येती निंदकापासीं। अशेष पापें॥ २५७॥

मरणाराचें आंग। पडिघाती आघवे रोग।
कां कुमुहूर्तीं दुर्योग। एकवटती॥ २५८॥

कां आयुष्य जातिये वेळे। शेळिये सातवेउळि मिळे।
तैसे साही दोष सगळे। जोडती तया॥ २५९॥

विश्वासला आतुडवीजे चोरा। शिणला सुइजे महापुरा।
तैसें दोषीं इहीं नरा। अनिष्ट कीजे॥ २६०॥

मोक्षमार्गाकडे। जयांचा आंबुखा पडे।
तैं न निघेचि म्हणौनि बुडे। संसारीं तो॥ २६१॥

अधमां योनींच्या पाउटीं। उतरत जो किरीटी।
स्थावरांही तळवटीं। बैसणें घे॥ २६२॥

हें असो तयाच्या ठायीं। मिळोनि साही दोहीं इहीं।
आसुरी संपत्ति पाहीं। वाढविजे॥ २६३॥

ऐसिया या दोनी। संपत्ती प्रसिद्धा जनीं।
सांगितलिया चिन्हीं। वेगळाल्या॥ २६४॥

दैवी संपद्विमोक्षाय निबन्धायासुरी मता।
मा शुचः संपदं दैवीम् अभिजातोऽसि पाण्डव॥ १६.५॥

इया दोन्हींमाजीं पहिली। दैवी जे म्हणितली।
ते मोक्षसूर्यें पाहली। उखाचि जाण॥ २६५॥

येरी जे दुसरी। संपत्ति कां आसुरी।
ते मोहलोहाची खरी। सांखळी जीवां॥ २६६॥

परि हें आइकोनि झणें। भय घेसी हो मनें।
काय रात्रीचा दिनें। धाकु धरिजे॥ २६७॥

हे आसुरी संपत्ति तया। बंधालागीं धनंजया।
जो साही दोषां ययां। आश्रयो होये॥ २६८॥

तूं तंव पांडवा। सांगितलेया दैवा।
गुणनिधी बरवा। जन्मलासी॥ २६९॥

म्हणौनि पार्था तूं या। दैवी संपत्ती स्वामिया।
होऊनि यावें उवाया। कैवल्याचिया॥ २७०॥

द्वौ भूतसर्गौ लोकेऽस्मिन् दैव आसुर एव च।
दैवो विस्तरशः प्रोक्त आसुरं पार्थ मे शृणु॥ १६.६॥

आणि दैवां आसुरां। संपत्तिवंतां नरां।
अनादिसिद्ध उजरा। राहाटीचा आहे॥ २७१॥

जैसें रात्रीच्या अवसरीं। व्यापारिजे निशाचरीं।
दिवसा सुव्यवहारीं। मनुष्यादिकीं॥ २७२॥

तैसिया आपुलालिया राहाटीं। वर्तती दोनी सृष्टी।
दैवी आणि किरीटी। आसुरी येथ॥ २७३॥

तेवींचि विस्तारूनि दैवी। ज्ञानकथनादि प्रस्तावीं।
मागील ग्रंथीं बरवी। सांगितली॥ २७४॥

आतां आसुरी जे सृष्टि। तेथिंची उपलवूं गोठी।
अवधानाची दिठी। दे पां निकी॥ २७५॥

तरी वाद्येवीण नादु। नेदी कवणाही सादु।
कां अपुष्पीं मकरंदु। न लभे जैसा॥ २७६॥

तैसी प्रकृति हे आसुर। एकली नोहे गोचर।
जंव एकाधें शरीर। माल्हाती ना॥ २७७॥

मग आविष्कारला लांकुडें। पावकु जैसा जोडे।
तैसी प्राणदेहीं सांपडे। आटोपली हे॥ २७८॥

ते वेळीं जे वाढी ऊंसा। तेचि आंतुला रसा।
देहाकारु होय तैसा। प्राणियांचा॥ २७९॥

आतां तयाचि प्राणियां। रूप करूं धनंजया।
घडले जे आसुरीया। दोषवृंदी॥ २८०॥

प्रवृत्तिं च निवृत्तिं च जना न विदुरासुराः।
न शौचं नापि चाचारो न सत्यं तेषु विद्यते॥ १६.७॥

तरी पुण्यालागीं प्रवृत्ती। कां पापाविषयीं निवृत्ती।
या जाणणेयाची राती। तयांचें मन॥ २८१॥

निगणेया आणि प्रवेशा। चित्त नेदीतु आवेशा।
कोशकिटु जैसा। जाचिन्नला पैं॥ २८२॥

कां दिधलें मागुती येईल। कीं न ये हें पुढील।
न पाहातां दे भांडवल। मूर्ख चोरां॥ २८३॥

तैसिया प्रवृत्ति निवृत्तिं दोनी। नेणिजती आसुरीं जनीं।
आणि शुचित्व स्वप्नीं। न देखती ते॥ २८४॥

काळिमा सांडील कोळसा। वरीं चोखी होईल वायसा।
राक्षसही मांसा। विटो शके॥ २८५॥

परी आसुरी प्राणियां। शौच नाहीं धनंजया।
पवित्रत्व जेवीं भांडिया। मद्याचिया॥ २८६॥

वाढविती विधीची आस। का पाहाती वडिलाची वास।
आचाराची भाष। नेणतीचि ते॥ २८७॥

जैसें चरणें शेळियेचें। कां धावणें वारियेचें।
जाळणें आगीचें। भलतेउतें॥ २८८॥

तैसें पुढां सूनि स्वैर। आचरती ते आसुर।
सत्येंसि वैर। सदाचि तयां॥ २८९॥

जरी नांगिया आपुलिया। विंचू करी गुदगुलिया।
तरी साचा बोलिया। बोलती ते॥ २९०॥

आपानाचेनि तोंडें। जरी सुगंधा येणें घडे।
तरी सत्य तयां जोडे। आसुरांतें॥ २९१॥

ऐसें ते न करितां कांहीं। आंगेंचि वोखटे पाहीं।
आतां बोलती ते नवाई। सांगिजेल॥ २९२॥

एऱ्हवीं करेयाच्या ठायीं चांग। तें तयासि कैंचें नीट आंग।
तैसा आसुरांचा प्रसंग। प्रसंगें परिस॥ २९३॥

उधवणीचें जेवीं तोंड। उगळी धुंवाचे उभड।
हें जाणिजे तेवीं उघड। सांगों ते बोल॥ २९४॥

असत्यमप्रतिष्ठं ते जगदाहुरनीश्वरम्।
अपरस्परसंभूतं किमन्यत् कामहैतुकम्॥ १६.८

तरी विश्व हा अनादि ठावो। येथ नियंता ईश्वररावो।
चावडिये न्यावो अन्यावो। निवडी वेदु॥ २९५॥

वेदीं अन्यायीं पडे। तो निरयभोगें दंडे।
संन्यायी तो सुरवाडे। स्वर्गीं जाये॥ २९६॥

ऐसी हे विश्व व्यवस्था। अनादि जे पार्था।
इयेतें म्हणती ते वृथा। अवघेंचि हें॥ २९७॥

यज्ञमूढ ठकिले यागीं। देवपिसें प्रतिमालिंगीं।
नागविले भगवे योगी। समाधिभ्रमें॥ २९८॥

तेथ आपलेनि बळें। भोगिजे जें जें वेंटाळें।
हें वांचोनि कें वेगळें। पुण्य आहे॥ २९९॥

ना अशक्तपणें आंगिकें। वेगळवेंटाळी न टके।
ऐसा गादिजे वीण विषयसुखें। तेंचि पाप॥ ३००॥

प्राण घेपती संपन्नांचे। ते पाप जरी साचें।
तरी सर्वस्व हाता ये तयांचें। हें पुण्यफळ कीं॥ ३०१॥

बळी अबळातें खाय। हेंचि बाधित जरी होय।
तरी मांसया कां न होय। निसंतान॥ ३०२॥

आणि कुळें शोधूनि दोन्ही। कुमारेंचि शुभलग्नीं।
मेळवीजती प्रजासाधनीं। हेतु जरी॥ ३०३॥

तरी पशुपक्ष्यादि जाती। जया मिती नाहीं संतती।
तया कोणें प्रतिपत्ती। विवाह केले॥ ३०४॥

चोरियेचें धन आलें। तरी तें कोणासि विष जालें।
वालभें परद्वार केलें। कोढी कोणी होय॥ ३०५॥

म्हणोनि देवो गोसावी। तो धर्माधर्मु भोगवी।
आणि परत्राच्या गांवीं। करी तो भोगी॥ ३०६॥

परी परत्र ना देवो। न दिसे म्हणोनि तें वावो।
आणि कर्ता निमे मा ठावो। भोग्यासि कवणु॥ ३०७॥

येथ उर्वशिया इंद्र सुखी। जैसा कां स्वर्गलोकीं।
तैसाचि कृमिही नरकीं। लोळतु श्लाघे॥ ३०८॥

म्हणौनि नरक स्वर्गु। नव्हे पापपुण्यभागु।
जे दोहीं ठायीं सुखभोगु। कामाचाचि तो॥ ३०९॥

याकारणें कामें। स्त्रीपुरुषयुग्में।
मिळती तेथ जन्मे। आघवें जग॥ ३१०॥

आणि जें जें अभिलाषें। स्वार्थालागीं हें पोषे।
पाठीं परस्परें द्वेषें। कामचि नाशी॥ ३११॥

एवं कामावांचूनि कांहीं। जगा मूळचि आन नाहीं।
ऐसें बोलती पाहीं। आसुर ते॥ ३१२॥

आतां असो हें किडाळ। बोली न करूं पाघळ।
सांगतांचि सफोल। होतसे वाचा॥ ३१३॥

एतां दृष्टिमवष्टभ्य नष्टात्मानोऽल्पबुद्धयः।
प्रभवन्त्युग्रकर्माणः क्षयाय जगतोऽहिताः॥ १६.९॥

आणि ईश्वराचिया खंती। नुसधियाचि करिती चांथी।
हेंही नाहीं चित्तीं। निश्चयो एकु॥ ३१४॥

किंबहुना उघड। आंगी भरूनियां पाखंड।
नास्तिकपणाचें हाड। रोंविलें जीवीं॥ ३१५॥

ते वेळीं स्वर्गालागीं आदरु। कां नरकाचा अडदरु।
या वासनांचा अंकुरु। जळोनि गेला॥ ३१६॥

मग केवळ ये देहखोडां। अमेध्योदकाचा बुडबुडा।
विषयपंकीं सुहाडा। बुडाले गा॥ ३१७॥

जैं आटावे होती जळचर। तैं डोहीं मिळती ढीवर।
कां पडावें होय शरीर। तैं रोगा उदयो॥ ३१८॥

उदैजणें केतूचें जैसें। विश्वा अनिष्टाचि दोषें।
जन्मती ते तैसे। लोकां आटूं॥ ३१९॥

विरूढलिया अशुभ। फुटती तैं ते कोंभ।
पापाचे कीर्तिस्तंभ। चालते ते॥ ३२०॥

आणि मागां पुढां जाळणें। वांचूनि आगी कांहीं नेणें।
तैसें विरुचि एक करणें। भलतेयां॥ ३२१॥

परी तेंचि गा करणें। आदरिती संभ्रमें जेणें।
तो आइक पार्था म्हणे। श्रीनिवासु॥ ३२२॥

काममाश्रित्य दुष्पूरं दम्भमानमदान्विताः।
मोहात् गृहीत्वाऽसत् ग्राहान् प्रवर्तन्तेऽशुचिव्रताः॥ १६.१०॥

तरी जाळ पाणियें न भरे। आगी इंधनें न पुरे।
तयां दुर्भरांचिये धुरे। भुकाळु जो॥ ३२३॥

तया कामाचा बोलावा। जीवीं धरुनिया पांडवा।
दंभमानाचा मेळावा। मेळविती॥ ३२४॥

मातलिया कुंजरा। आगळी जाली मदिरा।
तैसा मदाचा ताठा तंव जरा। चढतां आंगीं॥ ३२५॥

आणि आग्रहा तोचि ठावो। वरि मौढ्या ऐसा सावावो।
मग काय वानूं निर्वाहो। निश्चयाचा॥ ३२६॥

जिहीं परोपतापु घडे। परावा जीवुं रगडे।
तिहीं कर्मीं होऊनि गाढे। जन्मवृत्ती॥ ३२७॥

मग आपुलें केलें फोकारिती। आणि जगातें धिक्कारिती।
दाहीं दिशा पसरिती। स्पृहाजाळ॥ ३२८॥

ऐसेनि गा आटोपें। थोरिये आणती पापें।
धर्मधेनु खुरपें। सुटलें जैसें॥ ३२९॥

चिन्तामपरिमेयां च प्रलयान्तामुपाश्रिताः।
कामोपभोगपरमा एतावदिति निश्चिताः॥ १६.११॥

याचि एका आयती। तयाचिया कर्मप्रवृत्ती।
आणि जिणियाही परौती। वाहती चिंता॥ ३३०॥

पाताळाहूनि निम्न। जियेचिये उंचिये सानें गगन।
जें पाहतां त्रिभुवन। अणुही नोहे॥ ॥ ३३१॥

ते योगपटाची मवणी। जीवीं अनियम चिंतवणी।
जे सांडूं नेणे मरणीं। वल्लभा जैसी॥ ३३२॥

तैसी चिंता अपार। वाढविती निरंतर।
जीवीं सूनि असार। विषयादिक॥ ३३३॥

स्त्रिया गाइलें आइकावें। स्त्रीरूप डोळां देखावें।
सर्वेंद्रियीं आलिंगावें। स्त्रियेतेंचि॥ ३३४॥

कुरवंडी कीजे अमृतें। ऐसें सुख स्त्रियेपरौतें।
नाहींचि म्हणौनि चित्तें। निश्चयो केला॥ ३३५॥

मग तयाचि स्त्रीभोगा। लागीं पाताळस्वर्गा।
धांवती दिग्विभागा। परौतेही॥ ३३६॥

आशापाशशतैर्बद्धाः कामक्रोधपरायाणाः।
ईहन्ते कामभोगार्थम् अन्यायेनार्थसंचयान्॥ १६.१२॥

आमिषकवळु थोरी आशा। न विचारितां गिळी मासा।
तैसें कीजे विषयाशा। तयांसि गा॥ ३३७॥

वांछित तंव न पवती। मग कोरडियेचि आशेची संतती।
वाढऊं वाढऊं होती। कोशकिडे॥ ३३८॥

आणि पसरिला अभिलाषु। अपूर्णु होय तोचि द्वेषु।
एवं कामक्रोधांहूनि अधिकु। पुरुषार्थु नाहीं॥ ३३९॥

दिहा खोलणें रात्रीं जागोवा। ठाणांतरियां जैसा पांडवा।
अहोरात्रींही विसांवा। भेटेचिना॥ ३४०॥

तैसें उंचोनि लोटिलें कामें। नेहटती क्रोधाचिये ढेमे।
तरी रागद्वेषें प्रेमें। न माती केंही॥ ३४१॥

तेविंचि जीवींचिया हांवा। विषयवासनांचा मेळावा।
केला परी तो भोगावा। अर्थें कीं ना॥ ३४२॥

म्हणोनि भोगावयाजोगा। पुरता अर्थ पैं गा।
आणावया जगा। झोंबती सैरा॥ ३४३॥

एकातें साधूनि मारिती। एकाचि सर्वस्वें हरिती।
एकालागीं उभारिती। अपाययंत्रें॥ ३४४॥

पाशिकें पोतीं वागुरा। सुणीं ससाणें चिकाटी खोंचरा।
घेऊनि निघती डोंगरा। पारधी जैसे॥ ३४५॥

ते पोसावया पोट। मारूनि प्राणियांचे संघाट।
आणिती ऐसें निकृष्ट। तेंही करिती॥ ३४६॥

परप्राणघातें। मेळविती वित्तें।
मिनलयां चित्तें। तोषणें कैसें॥ ३४७॥

इदमद्य मया लब्धम् इमं प्राप्स्ये मनोरथम्।
इदमस्तीदमपि मे भविष्यति पुनर्धनम्॥ १६.१३॥

म्हणे आजि मियां। संपत्ति बहुतेकांचिया।
आपुल्या हातीं केलिया। धन्यु ना मी॥ ३४८॥

ऐसा श्लाघों जंव जाये। तंव मनीं आणीकही वाहे।
सवेंचि म्हणे पाहे। आणिकांचेंही आणूं॥ ३४९॥

हें जेतुलें असे जोडिलें। तयाचेनि भांडवलें।
लाभा घेईन उरलें। चराचर हें॥ ३५०॥

ऐसेनि धना विश्वाचिया। मीचि होईन स्वामिया।
मग दिठी पडे तया। उरो नेदी॥ ३५१॥

असौ मया हतः शत्रुः हनिष्ये चापरानपि।
ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं बलवान सुखी॥ १६.१४॥

हे मारिले वैरी थोडे। आणीकही साधीन गाढे।
मग नांदेन पवाडें। येकलाचि मी॥ ३५२॥

माझीं होतील कामारीं। तियेंवांचूनि येरें मारीं।
किंबहुना चराचरीं। ईश्वरु तो मी॥ ३५३॥

मी भोगभूमीचा रावो। आणि सर्वसुखासी ठावो।
म्हणोनि इंद्रुही वावो। मातें पाहुनि॥ ३५४॥

मी मनें वाचा देहें। करीं तें कैसें नोहे।
कें मजवांचूनि आहे। आज्ञासिद्ध आन॥ ३५५॥

तंवचि बळिया काळु। जंव न दिसें मी अतुर्बळु।
सुखाचा कीर निखळु। रासिवा मीचि॥ ३५६॥

आढ्योऽभिजनवानस्मि कोऽन्योऽस्ति सदृशो मया।
यक्ष्ये दास्यामि मोदिष्य इत्यज्ञानविमोहिताः॥ १६.१५॥

कुबेरु आथिला होये। परी तो नेणें माझी सोये।
संपत्ती मजसम नव्हे। श्रीनाथाही॥ ३५७॥

माझिया कुळाचा उजाळु। कां जातिगोतांचा मेळु।
पाहतां ब्रह्माही हळु। उणाचि दिसे॥ ३५८॥

म्हणोनि मिरविती नांवें। वायां ईश्वरादि आघवे।
नाहीं मजसीं सरी पावे। ऐसें कोण्ही॥ ३५९॥

आतां लोपला अभिचारु। त्याचा करीन मी जीर्णोद्धारु।
प्रतिष्ठीन परमारु। यागवरी॥ ३६०॥

मातें गाती वानिती। नटनाचें रिझविती।
तयां देईन मागती। ते ते वस्तु॥ ३६१॥

माजिरां अन्नपानीं। प्रमदांच्या आलिंगनीं।
मी होईन त्रिभुवनीं। आनंदाकारु॥ ३६२॥

काय बहु सांगों ऐसें। ते आसुरीप्रकृतीपिसें।
तुरंबिती असोसें। गगनौळें तियें॥ ३६३॥

अनेकचित्तविभ्रान्ता मोहजालसमावृताः।
प्रसक्ताः कामभोगेषु पतन्ति नरकेऽशुचौ॥ १६.१६॥

ज्वराचेनि आटोपें। रोगी भलतैसें जल्पे।
चावळती संकल्पें। जाण ते तैसे॥ ३६४॥

अज्ञान आतले धुळी। म्हणौनि आशा वाहटुळी।
भोवंडीजती अंतराळीं। मनोरथांच्या॥ ३६५॥

अनियम आषाढमेघ। कां समुद्रोर्मी अभंग।
तैसे कामिती अनेक। अखंड काम॥ ३६६॥

मग पैं कामनाचि तयां। जीवीं जाल्या वेलरिया।
वोरपिलीं कांटिया। कमळें जैसीं॥ ३६७॥

कां पाषाणाचिया माथां। हांडी फुटली पार्था।
जीवीं तैसे सर्वथा। कुटके जाले॥ ३६८॥

तेव्हां चढतिये रजनी। तमाची होय पुरवणी।
तैसा मोहो अंतःकरणीं। वाढोंचि लागे॥ ३६९॥

आणि वाढे जंव जंव मोहो। तंव तंव विषयीं रोहो।
विषय तेथ ठावो। पातकांसी॥ ३७०॥

पापें आपलेनि थावें। जंव करिती मेळावे।
तंव जितांचि आघवे। येती नरक॥ ३७१॥

म्हणौनि गा सुमती। जे कुमनोरथां पाळिती।
ते असुर येती वस्ती। तया ठाया॥ ३७२॥

जेथ असिपत्रतरुवर। खदिरांगाराचे डोंगर।
तातलां तेलीं सागर। उतताती॥ ३७३॥

जेथ यातनांची श्रेणी। हे नित्य नवी यमजाचणी।
पडती तिये दारुणीं। नरकलोकीं॥ ३७४॥

ऐसे नरकाच्या सेले। भागीं जे जे जन्मले।
तेही देखों भुलले। नरकलोकीं॥ ३७५॥

एऱ्हवीं यागादिक क्रिया। लाहणें तेचि धनंजया।
परी विफळती आचरोनियां। नाटकी जैसे॥ ३७६॥

वल्लभाचिया उजरिया। आपणया पति कुस्त्रिया।
जोडोनि तोषिती जैसिया। अहेवपणें॥ ३७७॥

आत्मसंभाविताः स्तब्धा धनमानमदान्विताः।
यजन्ते नामयज्ञैस्ते दम्भेनाविधिपूर्वकम्॥ १६.१७॥

तैसें आपणयां आपण। मानितां महंतपण।
फुगती असाधारण। गर्वें तेणें॥ ३७८॥

मग लवों नेणती कैसे। आटिवा लोहाचे खांब जैसे।
कां उधवले आकाशे। शिळाराशी॥ ३७९॥

तैसें आपुलिये बरवे। आपणचि रिझतां जीवें।
तृणाहीहूनि आघवें। मानिती नीच॥ ३८०॥

वरी धनाचिया मदिरा। माजूनि धनुर्धरा।
कृत्याकृत्यविचारा। सवतें केलें॥ ३८१॥

जया आंगीं आयती ऐसी। तेथ यज्ञाची गोठी कायसी।
तरी काय काय पिसीं। न करिती गा॥ ३८२॥

म्हणौनि कोणे एके वेळे। मौढ्यमद्याचेनि बळें।
यागाचीही टवाळें। आदरिती॥ ३८३॥

ना कुंड मंडप वेदी। ना उचित साधनसमृद्धी।
आणि तयांसी तंव विधी। द्वंद्वचि सदा॥ ३८४॥

देवां ब्राह्मणांचेनि नांवें। आड वारेनहि नोहावें।
ऐसें आथी तेथ यावें। लागे कवणा॥ ३८५॥

पैं वासरुवाचा भोकसा। गाईपुढें ठेवूनि जैसा।
उगाणा घेती क्षीररसा। बुद्धिवंत॥ ३८६॥

तैसें यागाचेनि नांवें। जग वाऊनि हांवे।
नागविती आघवें। अहेरावरीं॥ ३८७॥

ऐशा कांहीं आपुलिया। होमिती जे उजरिया।
तेणें कामिती प्राणिया। सर्वनाशु॥ ३८८॥

अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं च संश्रिताः॥
मामात्मपरदेहेषु प्रद्विषन्तोऽभ्यसूयकाः॥ १६.१८॥

मग पुढां भेरी निशाण। लाउनी ते दीक्षितपण।
जगीं फोकारिती आपण। वावो वावो॥ ३८९॥

तेव्हां महत्त्वें तेणें अधमां। गर्वा चढे महिमा।
जैसे लेवे दिधले तमा। काजळाचे॥ ३९०॥

तैसें मौढ्य घणावे। औद्धित्य उंचावे।
अहंकारु दुणावे। अविवेकुही॥ ३९१॥

मग दुजयाची भाष। नुरवावया निःशेष।
बळीयेपणा अधिक। होय बळ॥ ३९२॥

ऐसा अहंकार बळा। जालिया एकवळा।
दर्पसागरु मर्यादवेळा। सांडूनि उते॥ ३९३॥

मग वोसंडिलेनि दर्पें। कामाही पित्त कुरुपे।
तया धर्गीं सैंघ पळिपे। क्रोधाग्नि तो॥ ३९४॥

तेथ उन्हाळा आगी खरमरा। तेला तुपाचिया कोठारा।
लागला आणि वारा। सुटला जैसा॥ ३९५॥

तैसा अहंकारु बळा आला। दर्पु कामक्रोधीं गुढला।
या दोहोंचा मेळु जाला। जयांचां ठायीं॥ ३९६॥

ते आपुलिया सवेशा। मग कोणी कोणी हिंसा।
या प्राणियांतें वीरेशा। न साधिती गा॥ ३९७॥

पहिलें तंव धनुर्धरा। आपुलिया मांसरुधिरा।
वेंचु करिती अभिचारा। लागोनियां॥ ३९८॥

तेथ जाळिती जियें देहें। यांमाजीं जो मी आहें।
तया आत्मया मज घाये। वाजती ते॥ ३९९॥

आणि अभिचारकीं तिहीं। उपद्रविजे जेतुलें कांहीं।
तेथ चैतन्य मी पाहीं। शीणु पावें॥ ४००॥

आणि अभिचारावेगळें। विपायें जें अवगळे।
तया टाकिती इटाळें। पैशुन्याचीं॥ ४०१॥

सती आणि सत्पुरुख। दानशीळ याज्ञिक।
तपस्वी अलौकिक। संन्यासी जे॥ ४०२॥

कां भक्त हन महात्मे। इयें माझीं निजाचीं धामें।
निर्वाळलीं होमधर्में। श्रौतादिकीं॥ ४०३॥

तयां द्वेषाचेनि काळकूटें। बासटोनि तिखटें।
कुबोलांचीं सदटें। सूति कांडें॥ ४०४॥

तानहं द्विषतः क्रूरान् संसारेषु नराधमान्॥
क्षिपाम्यजस्रमशुभान् आसुरीष्वेव योनिषु॥ १६.१९॥

ऐसे आघवांचि परी। प्रवर्तले माझ्या वैरीं।
तरी तयां पापियां जें मी करीं। तें आइक पां॥ ४०५॥

तरी मनुष्यदेहाचा तागा। घेऊनि रुसती जे जगा।
ते पदवी हिरोनि पैं गा। ऐसें ठेवीं॥ ४०६॥

जे क्लेशगांवींचा उकरडा। भवपुरींचा पानिवडा।
ते तमोयोनि तयां मूढां। वृत्तीचि दें॥ ४०७॥

मग आहाराचेनि नांवें। तृणही जेथ नुगवे।
ते व्याघ्र वृश्चिक आडवे। तैसिये करीं॥ ४०८॥

तेथ क्षुधादुःखें बहुतें। तोडूनि खाती आपणयातें।
मरमरों मागुतें। होतचि असती॥ ४०९॥

कां आपलां गरळजाळीं। जळतया आंगाची पेंदळी।
ते सर्पचि करीं बिळीं। निरुंधला॥ ४१०॥

परी घेतला श्वासु घापे। येतुलेनही मापें।
विसांवा तयां नाटोपे। दुर्जनांसी॥ ४११॥

ऐसेनि कल्पांचिया कोडी। गणितांही संख्या थोडी।
तेतुला वेळु न काढीं। क्लेशौनि तयां॥ ४१२॥

तरी तयांसी जेथ जाणें। तेथिंचें हें पहिलें पेणें।
तें पावोनि येरें दारुणें। न होती दुःखें॥ ४१३॥

आसुरीं योनिमापन्ना मूढा जन्मनि जन्मनि॥
मामप्राप्यैव कौन्तेय ततो यान्त्यधमां गतिम्॥ १६.२०॥

हा ठायवरी घोरी। संपत्ति ते आसुरी।
अधोगती अवधारीं। जोडिली तिहीं॥ ४१४॥

पाठीं व्याघ्रादि तामसा। योनी तो अळुमाळु ऐसा।
देहधाराचा उसासा। आथी जो हीं॥ ४१५॥

तोही मी वोल्हावा हिरें। मग तमचि होती एकसरें।
जेथें गेलें आंधारें। काळवंडैजे॥ ४१६॥

जयाची पापा चिळसी। नरक घेती विवसी।
शीण जाय मूर्च्छी। शिणें जेणें॥ ४१७॥

मळु जेणें मैळे। तापु जेणें पोळे।
जयाचेनि नांवें सळे। महाभय॥ ४१८॥

पाप जयाचा कंटाळा। उपजे अमंगळ अमंगळा।
विटाळुहि विटाळा। बिहे जया॥ ४१९॥

ऐसें विश्वाचेया वोखटेया। अधम जे धनंजया।
तें ते होती भोगूनियां। तामसा योनि॥ ४२०॥

अहा सांगतां वाचा रडे। आठवितां मन खिरडे।
कटारें मूर्खी केवढें। जोडिले निरय॥ ४२१॥

कायिसया ते आसुर। संपत्ति पोषिती वाउर।
जिया दिधलें घोर। पतन ऐसें॥ ४२२॥

म्हणोनि तुवां धनुर्धरा। नोहावें गा तिया मोहरा।
जेउता वासु आसुरा। संपत्तिवंता॥ ४२३॥

आणि दंभादि दोष साही। हे संपूर्ण जयांच्या ठायीं।
ते त्यजावे हें काई। म्हणों कीर॥ ४२४॥

त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः॥
कामः क्रोधस्तथा लोभः तस्मादेतत् त्रयं त्यजेत्॥ १६.२१॥

परी काम क्रोध लोभ। या तिहींचेचि थोंब।
थावे तेथें अशुभ। पिकलें जाण॥ ४२५॥

सर्व दुःखां आपुलिया। दर्शना धनंजया।
पाढाऊ हे भलतया। दिधले आहाती॥ ४२६॥

कां पापियां नरकभोगीं। सुवावयालागीं जगीं।
पातकांची दाटुगी। सभाचि हे॥ ४२७॥

ते रौरव गा तंवचिवरी। आइकिजती पटांतरीं।
जंव हे तिन्ही अंतरीं। उठती ना॥ ४२८॥

अपाय तिहीं आसलग। यातना इहीं सवंग।
हाणी हाणी नोहे हे तिघ। हेचि हाणी॥ ४२९॥

काय बहु बोलों सुभटा। सांगितलिया निकृष्टा।
नरकाचा दारवंटा। त्रिशंकु हा॥ ४३०॥

या कामक्रोधलोभां। माजीं जीवें जो होय उभा।
तो निरयपुरिची सभा। सन्मानु पावे॥ ४३१॥

म्हणौनि पुढतपुढतीं किरीटी। हे कामादिदोषत्रिपुटी।
त्यजावीचि गा वोखटी। आघवां विषयीं॥ ४३२॥

एतैर्विमुक्तः कौन्तेय तमोद्वारैस्त्रिभिर्नरः॥
आचरत्यात्मनः श्रेयः ततो याति परां गतिम्॥ १६.२२॥

धर्मादिकां चौही आंतु। पुरुषार्थाचि तैंचि मातु।
करावी जैं संघातु। सांडील हा॥ ४३३॥

हे तिन्ही जीवीं जंव जागती। तंववरी निकियाची प्राप्ती।
हे माझे कान नाइकती। देवोही म्हणे॥ ४३४॥

जया आपणपें पढिये। आत्मनाशा जो बिहे।
तेणें न धरावी हे सोये। सावध होइजे॥ ४३५॥

पोटीं बांधोनि पाषाण। समुद्रीं बाहीं आंगवण।
कां जियावया जेवण। काळकूटाचें॥ ४३६॥

इहीं कामक्रोधलोभेंसीं। कार्यसिद्धि जाण तैसी।
म्हणोनि ठावोचि पुसीं। ययांचा गा॥ ४३७॥

जैं कहीं अवचटें। हे तिकडी सांखळ तुटे।
तैं सुखें आपुलिये वाटे। चालों लाभे॥ ४३८॥

त्रिदोषीं सांडिले शरीर। त्रिकुटीं फिटलिया नगर।
त्रिदाह निमालिया अंतर। जैसें होय॥ ४३९॥

तैसा कामादिकीं तिघीं। सांडिला सुख पावोनि जगीं।
संगु लाहे मोक्षमार्गीं। सज्जनांचा॥ ४४०॥

मग सत्संगें प्रबळें। सच्छास्त्राचेनि बळें।
जन्ममृत्यूचीं निमाळें। निस्तरे रानें॥ ४४१॥

ते वेळीं आत्मानंदें आघवें। जें सदा वसतें बरवें।
तें तैसेंचि पाटण पावे। गुरुकृपेचें॥ ४४२॥

तेथ प्रियाची परमसीमा। तो भेटे माउली आत्मा।
तये खेवीं आटे डिंडिमा। सांसारिक हे॥ ४४३॥

ऐसा जो कामक्रोधलोभां। झाडी करूनि ठाके उभा।
तो येवढिया लाभा। गोसावी होय॥ ४४४॥

यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः॥
न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिम्॥ १६.२३॥

ना हें नावडोनि कांहीं। कामादिकांचांचि ठायीं।
दाटिली जेणें डोई। आत्मचोरें॥ ४४५॥

जो जगीं समान सकृपु। हिताहित दाविता दीपु।
तो अमान्यु केला बापु। वेदु जेणें॥ ४४६॥

न धरीचि विधीची भीड। न करीचि आपली चाड।
वाढवीत गेला कोड। इंद्रियांचें॥ ४४७॥

कामक्रोधलोभांची कास। न सोडीच पाळिली भाष।
स्वैराचारांचें असोस। वळघला रान॥ ४४८॥

तो सुटकेचिया वाहिणीं। मग पिवों न लाहे पाणी।
स्वप्नींही ते कहाणी। दूरीचि तया॥ ४४९॥

आणि परत्र तंव जाये। हें कीर तया आहे।
परी ऐहिकही न लाहे। भोग भोगूं॥ ४५०॥

तरी माशालागीं भुलला। ब्राह्मण पाणबुडां रिघाला।
कीं तेथही पावला। नास्तिकवादु॥ ४५१॥

तैसें विषयांचेनि कोडें। जेणें परत्रा केलें उबडें।
तंव तोचि आणिकीकडे। मरणें नेला॥ ४५२॥

एवं परत्र ना स्वर्गु। ना ऐहिकही विषयभोगु।
तेथ केउता प्रसंगु। मोक्षाचा तो॥ ४५३॥

म्हणोनि कामाचेनि बळें। जो विषय सेऊं पाहे सळें।
तया विषयो ना स्वर्ग मिळे। ना उद्धरे तो॥ ४५४॥

तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ॥
ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि॥ १६.२४॥

याकारणें पैं बापा। जया आथी आपली कृपा।
तेणें वेदांचिया निरोपा। आन न कीजे॥ ४५५॥

पतीचिया मता। अनुसरोनि पतिव्रता।
अनायासें आत्महिता। भेटेचि ते॥ ४५६॥

ना तरि श्रीगुरुवचना। दिठी देतु जतना।
शिष्य आत्मभुवना। माजीं पैसे॥ ४५७॥

हें असो आपुला ठेवा। हाता आथी जरी यावा।
तरी आदरें जेवीं दिवा। पुढां कीजे॥ ४५८॥

तैसा अशेषांही पुरुषार्था। जो गोसावी हो म्हणे पार्था।
तेणें श्रुति स्मृति माथां। बैसणें घापे॥ ४५९॥

शास्त्र म्हणेल जें सांडावें। तें राज्यही तृण मानावें।
जें घेववी तें न म्हणावें। विषही विरुद्ध॥ ४६०॥

ऐसिया वेदैकनिष्ठा। जालिया जरी सुभटा।
तरी कें आहे अनिष्टा। भेटणें गा॥ ४६१॥

पैं अहितापासूनि काढिती। हित देउनी वाढविती।
नाहीं श्रुतिपरौती। माउली जगा॥ ४६२॥

म्हणौनि ब्रह्मेंसीं मेळवी। तंव हे कोणें न सांडावी।
अगा तुवांही ऐसीचि भजावी। विशेषेंसीं॥ ४६३॥

जे आजि अर्जुना तूं येथें। करावया सत्य शास्त्रें सार्थें।
जन्मलासि बळार्थें। धर्माचेनि॥ ४६४॥

आणि धर्मानुज हें ऐसें। बोधेंचि आलें आपैसें।
म्हणोनि आनारिसें। करूं नये॥ ४६५॥

कार्याकार्यविवेकीं। शास्त्रेंचि करावीं पारखीं।
अकृत्य कुडें तें लोकीं। वाळावें गा॥ ४६६॥

मग कृत्यपणें खरें निगे। तें तुवां आपुलेनि आंगें।
आचरौनि आदरें चांगें। सारावें गा॥ ४६७॥

जे विश्वप्रामाण्याची मुदी। आजि तुझ्या हातीं असे सुबुद्धी।
लोकसंग्रहासि त्रिशुद्धी। योग्यु होसी॥ ४६८॥

एवं आसुरवर्गु आघवा। सांगोनि तेथिंचा निगावा।
तोहि देवें पांडवा। निरूपिला॥ ४६९॥

इयावरी तो पंडूचा। कुमरु सद्भावो जीवींचा।
पुसेल तो चैतन्याचा। कानीं ऐका॥ ४७०॥

संजयें व्यासाचिया निरोपा। तो वेळु फेडिला तया नृपा।
तैसा मीहि निवृत्तिकृपा। सांगेन तुम्हां॥ ४७१॥

तुम्ही संत माझिया कडा। दिठीचा कराल बहुडा।
तरी तुम्हां माने येवढा। होईन मी॥ ४७२॥

म्हणोनि निज अवधान। मज वोळगे पसायदान।
दीजो जी समर्थ होईन। ज्ञानदेवो म्हणे॥ ४७३॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे दैवासुरसंपद्विभागयोगोनाम षोडशोऽध्यायः॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां षोडशोऽध्यायः॥

श्लोक २४ ओव्या ४७३

# 17 The Division of Faiths श्रद्धात्रयविभागयोग

श्रीमद्भगवद्गीता सप्तदशोऽध्यायः।
ज्ञानेश्वरी अध्याय सतरावा

---

विश्वविकासित मुद्रा। जया सोडवी तुझी योगनिद्रा।
तया नमो जी गणेंद्रा। श्रीगुरुराया॥ १॥

त्रिगुणत्रिपुरीं वेढिला। जीवत्वदुर्गीं आडिला।
तो आत्मशंभूनें सोडविला। तुझिया स्मृती॥ २॥

म्हणोनि शिवेंसी कांटाळा। गुरुत्वे तूंचि आगळा।
तऱ्ही हळू मायाजाळा। माजि तारुनी॥ ३॥

जे तुझ्याविखीं मूढ। तयांलागीं तूं वक्रतुंड।
ज्ञानियांसि तरी अखंड। उजूचि आहासि॥ ४॥

दैविकीं दिठी पाहतां सानी। तऱ्ही मीलनोन्मीलनीं।
उत्पत्ति प्रलय दोन्ही। लीलाचि करिसी॥ ५॥

प्रवृत्तिकर्णाच्या चाळीं। उठिलीं मदगंधनिळीं।
पूजीजसी नीळोत्पळीं। जीवभृंगाच्या॥ ६॥

पाठीं निवृत्तिकर्णताळें। आहालली ते पूजा विधूळे।
तेव्हां मिरविसी मोकळें। आंगाचें लेणें॥ ७॥

वामांगीचा लास्यविलास। जो हा जगद्रूप आभास।
तो तांडवमिसें कळास। दाविसी तूं॥ ८॥

हें असो विस्मयदातारा। तूं होसी जयाचा सोहरा।
सोइरिकेचिया व्यवहारा। मुकेचि तो॥ ९॥

फेडितां बंधनाचा ठावो। तूं जगद्बंधू ऐसा भावो।
धरूं वोळगे उवावो। तुझाचि आंगीं॥ १०॥

दुजनाचेनि नांवें तया। देहही नुरेचि पैं देवराया।
जेणें तूं आपणपयां। केलासि दूजा॥ ११॥

तूतें करूनि पुढें। जे उपायीं घेती दवडे।
तयां ठासी बहुवें पाडें। मागांचि तूं॥ १२॥

जो ध्यानें सूये मानसीं। तयालागीं नाहीं तूं त्याचे देशीं।
ध्यानही विसरे तेणेंसीं। वालभ तुज॥ १३॥

तूतें सिद्धचि जो नेणे। तो नांदे सर्वज्ञपणें।
वेदांही येवढें बोलणें। नेघसी कानीं॥ १४॥

मौन गा तुझें राशिनांव। आतां स्तोत्रीं कें बांधों हांव।
दिसती तेतुली माव। भजों काई॥ १५॥

दैविकें सेवक हों पाहों। तरि भेदितां द्रोहचि लाहों।
म्हणोनि आतां कांहीं नोहों। तुजलागीं जी॥ १६॥

जैं सर्वथा सर्वही नोहिजे। तैं अद्वया तूतें लाहिजे।
हें जाणें मी वर्म तुझें। आराध्यलिंगा॥ १७॥

तरि नुरोनि वेगळेपण। रसीं भजिंनलें लवण।
तैसें नमन माझें जाण। बहु काय बोलों॥ १८॥

आतां रिता कुंभ समुद्रीं रिगे। तो उचंबळत भरोनि निगे।
कां दशी दीपसंगे। दीपचि होय॥ १९॥

तैसा तुझिया प्रणतीं। मी पूर्ण झालों श्रीनिवृत्ती।
आतां आणीन व्यक्ती। गीतार्थ तो॥ २०॥

तरि षोडशाध्यायशेखीं। तिये समाप्तीच्या श्लोकीं।
जो ऐसा निर्णयो निष्टंकीं। ठेविला देवें॥ २१॥

जे कृत्याकृत्यव्यवस्था। अनुष्ठावया पार्था।
शास्त्रचि एक सर्वथा। प्रमाण तुज॥ २२॥

तेथ अर्जुन मानसें। म्हणें हें ऐसें कैसें।
जे शास्त्रेंवीण नसे। सुटिका कर्मा॥ २३॥

तरी तक्षकाची फडे। ठाकोनि कैं तो मणि काढे।
कैं नाकींचा केश जोडे। सिंहाचिये॥ २४॥

मग तेणे तो वोविजे। तरीच लेणें पाविजे।
येऱ्हवीं काय असिजे। रिक्तकंठीं॥ २५॥

तैसी शास्त्रांची मोकळी। यां कैं कोण वेंटाळी।
एकवाक्यतेच्या फळीं। पैसिजे कैं॥ २६॥

जालयाही एकवाक्यता। कैं लाभे वेळ अनुष्ठितां।
कैंचा पैसार जीविता। येतुलालिया॥ २७॥

आणि शास्त्रें अर्थें देशें काळें। या चहूंही जें एकफळे।
तो उपावो कें मिळे। आघवयांसी॥ २८॥

म्हणौनि शास्त्राचें घडतें। नोहे प्रकारें बहुतें।
तरि मूर्खा मुमुक्षां येथें। काय गति पां॥ २९॥

हा पुसावया अभिप्राव। जो अर्जुन करी प्रस्ताव।
तो सतराविया ठाव। अध्याय येथ॥ ३०॥

तरी सर्वविषयीं वितृष्ण। जो सकळकळीं प्रवीण।
कृष्णाही नवल कृष्ण। अर्जुनत्वें जो॥ ३१॥

शौर्या जोडला आधार। जो सोमवंशाचा शृंगार।
सुखादि उपकार। जयाची लीला॥ ३२॥

जो प्रज्ञेचा प्रियोत्तम। ब्रह्मविद्येचा विश्राम।
सहचर मनोधर्म। देवाचा जो॥ ३३॥

अर्जुन उवाच।
ये शास्त्रविधिमुत्सृज्य यजन्ते श्रद्धयान्विताः।
तेषां निष्ठा तु का कृष्ण सत्वमाहो रजस्तमः॥ १७.१॥

तो अर्जुन म्हणे गा तमालश्यामा। इंद्रियां फावलिया ब्रह्मा।
तुझा बोल आम्हां। साकांक्ष पैं जी॥ ३४॥

जें शास्त्रेंवांचूनि आणिकें। प्राणियां स्वमोक्ष न देखे।
ऐसें कां कैंपखें। बोललासी॥ ३५॥

तरी न मिळेचि तो देश। नव्हेचि काळा अवकाश।
जो करवी शास्त्राभ्यास। तोही दुरी॥ ३६॥

आणि अभ्यासीं विरजिया। होती जिया सामग्रिया।
त्याही नाहीं आपैतिया। तिये वेळीं॥ ३७॥

उजू नोहेचि प्राचीन। नेदीचि प्रज्ञा संवाहक।
ऐसें ठेलें आपादन। शास्त्राचें जया॥ ३८॥

किंबहुना शास्त्राविखीं। एकही न लाहातीचि नखी।
म्हणूनि उखिविखी। सांडिली जिहीं॥ ३९॥

परि निर्धारूनि शास्त्रें। अर्थानुष्ठानें पवित्रें।
नांदताति परत्रें। साचारें जे॥ ४०॥

तयां ऐसें आम्हीं होआवें। ऐसी चाड बांधोनि जीवें।
घेती तयांचे मागावे। आचरावया॥ ४१॥

धड्याचिया अक्षरा। तळीं बाळ लिहे दातारा।
कां पुढां सूनि पडिकारा। अक्षम चाले॥ ४२॥

तैसें सर्व शास्त्रनिपुण। तयांचें जें आचरण।
तेंचि करिती प्रमाण। आपलिये श्रद्धे॥ ४३॥

मग शिवादिकें पूजनें। भूम्यादिकें महादानें।
अग्निहोत्रादि यजनें। करिती जे श्रद्धा॥ ४४॥

तयां सत्वरजतमां। माजि कोण पुरुषोत्तमा।
गति होय तें आम्हां। सांगिजो जी॥ ४५॥

तंव वैकुंठपीठींचें लिंग। जो निगमपद्माचा पराग।
जिये जयाचेनि हें जग। अंगच्छाया॥ ४६॥

काळ सावियाचि वाढ। लोकोत्तर प्रौढ।
अद्वितीय गूढ। आनंदघन॥ ४७॥

इयें श्लाघिजती जेणें बिकें। तें जयाचे आंगीं असिकें।
तो श्रीकृष्ण स्वमुखें। बोलत असे॥ ४८॥

श्रीभगवानुवाच।
त्रिविधा भवति श्रद्धा देहिनां सा स्वभावजा।
सात्विकी राजसी चैव तामसी चेति तां शृणु॥ १७.२॥

म्हणे पार्था तुझा अतिसो। हेंही गा आम्हीं जाणतसों।
शास्त्राभ्यासाचा आडसो। मानितोसि कीं॥ ४९॥

नुसधियाचि श्रद्धा। झोंबों पाहसी परमपदा।
तरि तैसें हें प्रबुद्धा। सोहोपें नोहे॥ ५०॥

श्रद्धा म्हणतलिया साठीं। पातेजों नये किरिटी।
काय द्विज अंत्यजघृष्टीं। अंत्यज नोहे॥ ५१॥

गंगोदक जरी जालें। तरि मद्यभांडा आलें।
तें घेऊं नये कांहीं केलें। विचारीं पां॥ ५२॥

चंदन होय शीतळु। परि अग्नीसी पावे मेळु।
तैं हातीं धरितां जाळूं। न शके काई॥ ५३॥

कां किडाचिये आटतिये पुटीं। पडिलें सोळें किरिटी।
घेतलें चोखटासाठीं। नागवीना॥५४॥

तैसें श्रद्धेचें दळवाडें। आंगें कीर चोखडें।
परि प्राणियांच्या पडे। विभागीं जैं॥ ५५॥

तैं प्राणिये तंव स्वभावें। अनादिमायाप्रभावें।
त्रिगुणाचेचि आघवे। वळिले आहाती॥ ५६॥

तेथही दोन गुण खांचती। मग एक धरी उन्नती।
तैं तैसियाचि होती वृत्ती। जीवांचिया॥ ५७॥

वृत्ती ऐसें मन धरिती। मना ऐसी क्रिया करिती।
केलिया ऐसी वरिती। मरोनि देहें॥ ५८॥

बीज मोडे झाड होये। झाड मोडे बीजीं सामाये।
ऐसेनि कल्पकोडी जाये। परि जाति न नाशे॥ ५९॥

तियापरि यियें अपारें। होत जात जन्मांतरें।
त्रिगुण न व्याभिचरे। प्राणियांचे॥ ६०॥

म्हणूनि प्राणियांच्या पैकीं। पडिली श्रद्धा अवलोकीं।
ते होय गुणासारिखी। तिहीं ययां॥ ६१॥

विपायें वाढे सत्व शुद्ध। तेव्हां ज्ञानासी करी साध्य।
परि एका दोघे वोखद। येर आहाती॥ ६२॥

सत्वाचेनि आंगलगे। ते श्रद्धा मोक्षफळा रिगे।
तंव रज तम उगे। कां पां राहाती॥ ६३॥

मोडोनि सत्वाची त्राये। रजोगुण आकाशें जाये।
तेव्हां तेचि श्रद्धा होये। कर्मकेरसुणी॥ ६४॥

मग तमाची उठी आगी। तेव्हां तेचि श्रद्धा भंगी।
हों लागे भोगालागीं। भलतेया॥ ६५॥

सत्वानुरूपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत।
श्रद्धामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रद्धः स एव सः॥ १७.३॥

एवं सत्वरजतमां। वेगळी श्रद्धा सुवर्मा।
नाहीं गा जीवग्रामा। माजी यया॥ ६६॥

म्हणोनि श्रद्धा स्वाभाविक। असे पैं त्रिगुणात्मक।
रज तम सात्विक। भेदीं इहीं॥ ६७॥

जैसें जीवनचि उदक। परि विषीं होय मारक।
कां मिरयामाजी तीख। उंसीं गोड॥ ६८॥

तैसा बहुवसें तमें। जो सदाचि होय निमे।
तेथ श्रद्धा परिणमे। तेंचि होऊनी॥ ६९॥

मग काजळा आणि मसी। न दिसे विवंचना जैसी।
तेवीं श्रद्धा तामसी। सिनी नाहीं॥ ७०॥

तैसीच राजसी जीवीं। रजोमय जाणवी।
सात्विकीं आघवी। सत्वाचीच॥ ७१॥

ऐसेनि हा सकळ। जगडंबर निखिळ।
श्रद्धेचाचि केवळ। वोतला असे॥ ७२॥

परि गुणत्रय वशें। त्रिविधपणाचें लासें।
श्रद्धें जें उठिलें असे। तें वोळख तूं॥ ७३॥

तरि जाणिजे झाड फुलें। कां मानस जाणिजे बोलें।
भोगें जाणिजे केलें। पूर्वजन्मींचें॥ ७४॥

तैसीं जिहीं जिहीं चिन्हीं। श्रद्धेचीं रूपें तिन्ही।
देखीजती ते वानी। अवधारीं पां॥ ७५॥

यजन्ते सात्विका देवान् यक्षरक्षांसि राजसाः।
प्रेतान्भूतगणांश्चान्ये यजन्ते तामसा जनाः॥ १७.४॥

तरि सात्विक श्रद्धा। जयांचा होय बांधा।
तयां बहुतकरूनि मेधा। स्वर्गी आथी॥ ७६॥

ते विद्याजात पढती। यज्ञक्रिये निवडती।
किंबहुना पडती। देवलोकीं॥ ७७॥

आणि श्रद्धा राजसा। घडले जे वीरेशा।
ते भजती राक्षसां। खेचरां हन॥ ७८॥

श्रद्धा जे कां तामसी। ते मी सांगेन तुजपाशीं।
जे केवळ पापराशी। अतिकर्कशी निर्दयत्वें॥ ७९॥

जीववधें साधूनि बळी। भूतप्रेतकुळें मैळीं।
स्मशानीं संध्याकाळीं। पूजिती जे॥ ८०॥

तें तमोगुणाचें सार। काढूनि निर्मिले नर।
जाण तामसियेचें घर। श्रद्धेचें तें॥ ८१॥

ऐसी इंहीं तिहीं लिंगीं। त्रिविध श्रद्धा जगीं।
पैं हें ययालागीं। सांगत असें॥ ८२॥

जे हे सात्विक श्रद्धा। जतन धरावी प्रबुद्धा।
येरी दोनी विरुद्धा। सांडाविया॥ ८३॥

हे सात्विकमति जया। निर्वाहती होय धनंजया।
बागूल नोहे तया। कैवल्य तें॥ ८४॥

तो न पढे कां ब्रह्मसूत्र। न लोढो सर्व शास्त्र।
सिद्धांत न होवोत स्वतंत्र। तयाच्या हातीं॥ ८५॥

परि श्रुतिस्मृतींचे अर्थ। जे आपण होऊन मूर्त।
अनुष्ठानें गाजत। वडील जे हे॥ ८६॥

तयांची आचरतीं पाउलें। पाऊनि सात्विकी श्रद्धा चाले।
तो तेंचि फळ ठेविलें। ऐसें लाहे॥ ८७॥

पैं एक दीप लावी सायासें। आणिक तेथें लाऊं बैसे।
तरि तो काय प्रकाशें। वंचिजे गा॥ ८८॥

कां एकें मोल अपार। वेंचोनि केलें धवळार।
तो सुरवाड वस्तीकर। न भोगी काई॥ ८९॥

हें असो जो तळें करी। तें तयाचीच तृषा हरी।
कीं सुआरासीचि अन्न घरीं। येरां नोहि॥ ९०॥

बहुत काय बोलों पैं गा। येका गौतमासीच गंगा।
येरां समस्तां काय जगा। वाहाळ जाली॥ ९१॥

म्हणौनि आपलियापरी। शास्त्र अनुष्ठिती कुसरी।
जाणे तयांतें श्रद्धाळु जो वरी। तो मूर्खही तरे॥ ९२॥

अशास्त्रविहितं घोरं तप्यन्ते ये तपो जनाः।
दम्भाहङ्कारसंयुक्ताः कामरागबलान्विताः॥ १७.५॥

ना शास्त्राचेनि कीर नांवें। खांकरोंही नेणती जीवें।
परि शास्त्रज्ञांही शिवे। टेंको नेदिती॥ ९३॥

वडिलांचिया क्रिया। देखोनि वाती वांकुलिया।
पंडितां डांकुलिया। वाजविती॥ ९४॥

आपलेनीचि आटोपें। धनित्वाचेनि दर्पें।
साचचि पाखंडाचीं तपें। आदरिती॥ ९५॥

आपुलिया पुढिलांचिया। आंगीं घालूनि कातिया।
रक्तमांसा प्रणीतया। भरभरों॥ ९६॥

रिचविती जळतकुंडीं। लाविती चेडयाच्या तोंडीं।
नवसियां देती उंडी। बाळकांची॥ ९७॥

आग्रहाचिया उजरिया। क्षुद्रदेवतां वरिया।
अन्नत्यागें सातरिया। ठाकती एक॥ ९८॥

अगा आत्मपरपीडा। बीज तमक्षेत्रीं सुहाडा।
पेरिती मग पुढां। तेंचि पिके॥ ९९॥

बाहू नाहीं आपलिया। आणि नावेतेंही धनंजया।
न धरी होय तया। समुद्रीं जैसें॥ १००॥

कां वैद्यातें करी सळा। रस सांडी पायखोळां।
तो रोगिया जेविं विव्हळा। सवता होय॥ १०१॥

ना ना पडिकाराचेनि सळें। काढी आपुलेचि डोळे।
तें वानवसां आंधळें। जैसें ठाके॥ १०२॥

तैसें तयां असुरां होये। जे निंदूनि शास्त्रांची सोये।
सैंघ धांवताती मोहें। आडवीं जे कां॥ १०३॥

काम करवी तें करिती। क्रोध मारवी तें मारिती।
किंबहुना मातें पुरिती। दुःखाचा गुंडां॥ १०४॥

कर्षयन्तः शरीरस्थं भूतग्राममचेतसः।
मां चैवान्तःशरीरस्थं तान् विद्ध्यासुरनिश्चयान्॥ १७.६॥

आपलां परावां देहीं। दुःख देती जें जें कांहीं।
मज आत्मया तेतुलाही। होय शीण॥ १०५॥

पैं वाचेनि ही पालवें। पापियां तयां नातळावें।
परि पडिलें सांगावें। त्यजावया॥ १०६॥

प्रेत बाहिर घालिजे। कां अंत्यज संभाषणीं त्यजिजे।
हें असो हातें क्षाळिजे। कश्मळातें॥ १०७॥

येथ शुद्धीचिया आशा। तो लेपु न मनवे जैसा। तयातें सांडावया तैसा। अनुवाद हा॥ १०८॥

तरि अर्जुना तूं तयांतें। देखसी तैं स्मर हो मातें।
जें आन प्रायश्चित्त येथें। मानेल ना॥ १०९॥

म्हणौनि श्रद्धा जे सात्विकी। पुढती तेचि पैं येकी।
जतन करावी निकी। सर्वोपरी॥ ११०॥

तरि धरावा तैसा संग। जेणें पोखे सात्विक लाग।
सत्वबुद्धीचा भाग। आहार घेपे॥ १११॥

येऱ्हवीं तरी पाहीं। स्वभाववृद्धीच्या ठायीं।
आहारावाचुनि नाहीं। बळी हेतु॥ ११२॥

प्रत्यक्ष पाहें पां वीरा। जो सावध घे मंदिरा।
तो होऊनि ठाके माजिरा। तियेचि क्षणीं॥ ११३॥

कां जो साविया अन्नरस सेवी। तो व्यापिजे वातश्लेष्मस्वभावीं।
काय ज्वर जालिया निववी। पयादिक॥ ११४॥

ना तरी अमृत जयापरी। घेतलिया मरण वारी।
कां आपुलिया ऐसें करी। जैसें विष॥ ११५॥

तेवि जैसा घेपे आहार। धातु तैसाचि होय आकार।
आणि धातु ऐसा अंतर। भाव पोखे॥ ११६॥

जैसें भांडियाचेनि तापें। आंतुलें उदकही तापे।
तैसी धातुवशें आटोपे। चित्तवृत्ती॥ ११७॥

म्हणौनि सात्विक रस सेविजे। तैं सत्वाची वाढी पाविजे।
राजसा तामसा होइजे। येरीं रसीं॥ ११८॥

तरी सात्विक कोण आहार। राजस तामसा कायि आकार।
हें सांगों करीं आदर। आकर्णनीं॥ ११९॥

आहारस्त्वपि सर्वस्य त्रिविधो भवति प्रियः।
यज्ञस्तपस्तथा दानं तेषां भेदमिमं शृणु॥ १७.७॥

आणि एकसरें आहारा। कैसेनि तिनी मोहरा।
जालिया तेंही वीरा। रोकडें दाऊं॥ १२०॥

तरि जेवणाराचिया रुची। निष्पत्ति कीं वोनियाची।
आणि जेविता तंव गुणांची। दासी येथ॥ १२१॥

जो जीव कर्ता भोक्ता। तो गुणांस्तव स्वभावता।
पावोनियां त्रिविधता। चेष्टे त्रिधा॥ १२२॥

म्हणौनि त्रिविध आहार। यज्ञही त्रिप्रकार।
तप दान हन व्यापार। त्रिविधचि ते॥ १२३॥

पैं आहारलक्षण पहिलें। सांगों जें म्हणितलें।
तें आईक गा भलें। रूप करूं॥ १२४॥

आयुःसत्वबलारोग्य सुखप्रीतिविवर्धनाः।
रस्याःस्निग्धाः स्थिरा हृद्या आहाराः सात्विकप्रियाः॥ १७.८॥

तरी सत्वगुणाकडे। जैं दैवें भोक्ता पडे।
तैं मधुरीं रसीं वाढे। मेचु तया॥ १२५॥

आंगेंचि द्रव्यें सुरसें। जे आंगेंचि पदार्थ गोडसे।
आंगेचि स्नेहें बहुवसें। सुपक्वें जियें॥ १२६॥

आकारें नव्हती डगळें। स्पर्शें अति निबळें।
जिभेलागीं स्नेहाळें। स्वादें जियें॥ १२७॥

रसें गाढी वरी ढिलीं। द्रवभावीं आथिलीं।
ठायें ठाव सांडिलीं। अग्नितापें॥ १२८॥

आंगे सानें परिणामें थोर। जैसें गुरुमुखींचें अक्षर।
तैसा अल्पीं जिहीं अपार। तृप्ति राहे॥ १२९॥

आणि मुखीं जैसीं गोडें। तैसीं चिहीं ते आंतुलेकडे।
तिये अन्नीं प्रीति वाढे। सात्विकांसी॥१३०॥

एवं गुणलक्षण। सात्विक भोज्य जाण। आयुष्याचें त्राण।
नीच नवें हें॥ १३१॥

येणें सात्विक रसें। जंव देहीं मेहो वरिसे।
तंव आयुष्यनदी उससे। देहाचि देहा॥ १३२॥

सत्वाचिये कीर पाळती। कारण हाचि सुमती।
दिवसाचिये उन्नती। भानु जैसा॥ १३३॥

आणि शरीरा हन मानसा। बळाचा पैं कुवासा।
हा आहार तरी दशा। कैंची रोगां॥ १३४॥

हा सात्विक होय भोग्य। तैंचि भोगावया आरोग्य।
शरीरासी भाग्य। उदयलें जाणों॥ १३५॥

आणि सुखाचें घेणें देणें। निकें उवाया ये येणें।
हें असो वाढे साजणें। आनंदेसीं॥ १३६॥

ऐसा सात्विक आहार। परिणमला थोर।
करी हा उपकार। सबाह्यासी॥ १३७॥

आतां राजसासि प्रीती। जिही रसीं आथी।
करूं तयाही व्यक्ती। प्रसंगे गा॥ १३८॥

कट्वम्ललवणात्युष्ण तीक्ष्णरूक्षविदाहिनः।
आहारा राजसस्येष्टा दुःखशोकामयप्रदाः॥ १७.९॥

तरि मारें उणें काळकूट। तेणेंमानें जें कडुवट।
कां चुनियाहूनि दासट। आम्ल हन॥ १३९॥

कणिकीतें जैसें पाणी। तैसें मीठ बांधया आणी।
तेतुलीच मेळवणी। रसांतरांची॥ १४०॥

ऐसें खारट अपाडें। राजसा तया आवडे।
उन्हाचेनि मिषें तोंडें। आगीचि गिळी॥ १४१॥

वाफेचिया सिगे। वातीही लाविल्या लागे।
तैसें उन्ह मागे। राजस तो॥ १४२॥

वावदळ पाडूनि ठाये। साबळ डाहारला आहे.
तैसें तीख तो खाये। जें घायेंविण रूपे॥ १४३॥

आणि राखेहूनि कोरडें। आंत बाहेरी येकें पाडें।
तो जिव्हादंश आवडे। बहु तया॥ १४४॥

परस्परें दातां। आदळ होय खातां।
तो गा मुखीं घेतां। तोषों लागे॥ १४५॥

आधींच द्रव्यें चुरमुरीं। वरी परवडिजती मोहरी।
जियें घेतां होती धुवारी। नाका तोंडा॥ १४६॥

हें असो उगें आगीतें। म्हणे तैसें राईतें ॥
पढिये प्राणापरते। राजसासि गा॥ १४७॥

ऐसा न पुरोनि तोंडा। जिभा केला वेडा।
अन्नमिषें अग्नि भडभडां। पोटीं भरी॥ १४८॥

तैसाचि लवंघा सुटे। मग भुई ना सेजे सांटे।
पाणियाचें न सुटे। तोंडोनि पात्र॥ १४९॥

ते आहार नव्हती घेतले। व्याधिव्याळ जे सुतले।
ते चेववाया घातलें। माजवण पोटीं॥ १५०॥

तैसें एकमेकां सळें। रोग उठती एके वेळे।
ऐसा राजस आहार फळे। केवळ दुःखें॥ १५१॥

एवं राजसा आहारा। रूप केलें धनुर्धरा।
परिणामाचाही विसुरा। सांगीतला॥ १५२॥

आतां तया तामसा। आवडे आहार जैसा।
तेंहीं सांगों चिळसा। झणें तुम्ही॥ १५३॥

तरी कुहिलें उष्टें खातां। न मनिजे तेणें अनहिता।
जैसें कां उपहिता। म्हैसी खाय॥ १५४॥

यातयामं गतरसं पूति पर्युषितं च यत्।
उच्छिष्टमपि चामेध्यं भोजनं तामसप्रियं॥ १७.१०॥

निपजलें अन्न तैसें। दुपाहरीं कां येरे दिवसें।
अतिकरें तैं तामसें। घेइजे तें॥ १५५॥

ना तरी अर्ध उकडिलें। कां निपट करपोनि गेलें।
तैसेंही खाय चुकलें। रसा जें येवों॥ १५६॥

जया कां आथि पूर्ण निष्पत्ती। जेथ रस धरी व्यक्ती।
तें अन्न ऐसी प्रतीती। तामसा नाहीं॥ १५७॥

ऐसेनि कंहीं विपायें। सदन्ना वरपडा होये।
तरी घाणी सुटे तंव राहे। व्याघ्र जैसा॥ १५८॥

कां बहुवे दिवशीं वोलांडिलें। स्वादपणें सांडिलें।
शुष्क अथवा सडलें। गाभिणेंही हो॥ १५९॥

तेंही बाळाचे हातवरी। चिवडिलें जैसी राडी करी।
कां सवें बैसोनि नारी। गोतांबील करी॥ १६०॥

ऐसेनि कश्मळें जैं खाय। तैं तया सुखभोजन ऐसें होय।
परि येणेही न धाय। पापिया तो॥ १६१॥

मग चमत्कार देखा। निषेधाचा आंबुखा।
जया कां सदोषा। कुद्रव्यासी॥ १६२॥

तया अपेयांच्या पानीं। अखाद्यांच्या भोजनीं।
वाढविजे उतान्ही। तामसें तेणें॥ १६३॥

एवं तामस जेवणारा। ऐसैसी मेचु हे वीरा।
तयाचें फळ दुसरां। क्षणीं नाहीं॥ १६४॥

जे जेव्हांचि हें अपवित्र। शिवे तयांचें वक्त्र।
तेव्हांचि पापा पात्र। जाला तो कीं॥ १६५॥

यावरतें जें जेंवीं। ते जेविती वोज न म्हणावी।
पोटभरती जाणावी। यातना ते॥ १६६॥

शिरच्छेदें काय होये। कां आगी रिघतां कैसें आहे।
हें जाणावें काइ पाहें। परि साहातचि असे॥ १६७॥

म्हणौनि तामसा अन्ना। परिणाम गा सिनाना।
न सांगोंचि अर्जुना। देव म्हणे॥ १६८॥

आतां ययावरी। आहाराचिया परी।
यज्ञही अवधारीं। त्रिधा असे॥ १६९॥

तरी तिहींमाजी प्रथम। सात्विक यज्ञाचें वर्म।
आईक पां सुमहिम। शिरोमणी॥ १७०॥

अफलाकांक्षिभिर्यज्ञो विधिदृष्टो य इज्यते।
यष्टव्यमेवेति मनः समाधाय स सात्विकः॥ १७.११॥

तरि एक प्रियोत्तम। वांचोनि वाढों नेदी काम।
जैसा कां मनोधर्म। पतिव्रतेचा॥ १७१॥

ना ना सिंधूतें ठाकूनि गंगा। पुढारां न करीचि रिगा।
कां आत्मा देखोनि उगा। वेद ठेला॥ १७२॥

तैसें जे आपुल्या स्वहितीं। वेंचूनियां चित्तवृत्ती।
नुरवितीचि अहंकृती। फळालागीं॥ १७३॥

पातलेया झाडाचें मूळ। मागुतें सरों नेणेचि जळ।
जिरालें कां केवळ। तयाच्याचि आंगीं॥ १७४॥

तैसें मनें देहीं। यजन निश्चयाच्या ठायीं।
हारपोनि जे कांहीं। वांच्छिती ना॥ १७५॥

तिंहीं फळवांच्छा त्यागीं। स्वधर्मावांचूनि विरागी।
कीजे जो यज्ञ सर्वांगीं। अळंकृत॥ १७६॥

परि आरिसां आपणपें। डोळां जैसें घेपे।
कां तळहातींचें दीपें। रत्न पाहिजे॥ १७७॥

ना ना उदितें दिवाकरें। गमावा मार्ग दिठी भरे।
तैसा वेद निर्धारें। देखोनियां॥ १७८॥

तियें कुंडें मंडप वेदी। आणिकही संभार समृद्धी।
ते मिळवणी जैसी विधी। आपणपां केली॥ १७९ ॥

सकळावयव उचितें। लेणीं पातलीं जैसीं आंगातें।
तैसे पदार्थ जेथिंचें तेथें। विनियोगुनी॥ १८० ॥

काय वानूं बहुतीं बोलीं। जैसी सर्वाभरणीं भरली।
ते यज्ञविद्याचि रूपा आली। यजनमिषें॥ १८१ ॥

तैसा सांगोपांग। निपजे जो याग।
नुठवूनिया लाग। महत्त्वाचा॥ १८२ ॥

प्रतिपाळ तरी पोटाचा। झाडीं कीजे तुळशीचा।
परि फळा फुला छायेचा। आश्रय नाहीं॥ १८३ ॥

किंबहुना फळाशेविण। ऐसेया निगुती निर्माण।
होय तो याग जाण। सात्विक गा॥ १८४ ॥

अभिसंधाय तु फलं दम्भार्थमपि चैव यत्।
इज्यते भरतश्रेष्ठ तं यज्ञं विद्धि राजसम्॥ १७.१२ ॥

आतां यज्ञ कीर वीरेशा। करी पैं याचि ऐसा।
परि श्राद्धालागीं जैसा। अवंतिला रावो॥ १८५ ॥

जरि राजा घरासि ये। तरी बहुत उपयोगा जाये।
आणि कीर्तीही होये। जगामाजी॥ १८६ ॥

तैसा धरूनि आवांका। म्हणे स्वर्ग जोडेल असिका।
दीक्षित होईन मान्य लोकां। घडेल याग॥ १८७ ॥

ऐसी केवळ फळालागीं। महत्त्व फोकरावया जगीं।
पार्था निष्पत्ती जे यागीं। राजस पैं ते॥ १८८ ॥

विधिहीनमसृष्टान्नं मन्त्रहीनमदक्षिणम्।
श्रद्धाविरहितं यज्ञं तामसं परिचक्षते॥ १७.१३ ॥

आणि पशुपक्षिविवाहीं। जोसी कामापरौता नाहीं।
तैसा तामसा यज्ञा पाहीं। आग्रहचि मूळ॥ १८९ ॥

वारया वाट न वाहे। कीं मरण मुहूर्त पाहे।
निषिद्धांसी बिहे। आगी जरी॥ १९० ॥

तरी तामसाचिया आचारा। विधीचा आथी ना वोढावारा।
म्हणूनि तो धनुर्धरा। उत्संखळु॥ १९१ ॥

नाहीं विधीची तेथ चाड। न ये मंत्रादिक तया आड।
अन्नजातां न सुये तोंड। मासिये जेवीं॥ १९२ ॥

वैराचा बोध ब्राह्मणा। तेथ कें रिगेल दक्षिणा।
अग्नि जाला वाउधाणा। वरपडा जैसा॥ १९३ ॥

तैसें वांयांचि सर्वस्व वेंचे। मुख न देखतां श्रद्धेचे।
नागविले निपुत्रिकाचें। घर जैसें॥ १९४ ॥

ऐसा जो यज्ञाभास। तया नाम याग तामस।
आइकें म्हणे निवास। श्रियेचा तो॥ १९५ ॥

आतां गंगेचें एक पाणी। परि नेलें आनानीं वाहणीं।
एक मैळ एक आणी। शुद्धत्व जैसें॥ १९६ ॥

तैसें तिहीं गुणीं तप। येथ जाहालें आहे त्रिरूप।
तें एक केलें दे पाप। उद्धरी एक॥ १९७ ॥

तरि तेंचि तिहीं भेदीं। कैसेनि पां म्हणौनि सुबुद्धी।
जाणों पाहसी तरी आधीं। तपचि जाण॥ १९८ ॥

येथ तप म्हणजे काई। तें स्वरूप दावूं पाहीं।
मग भेदिलें गुणीं तिहीं। तें पाठीं बोलों॥ १९९ ॥

तरि तप जें कां सम्यक। तेंही त्रिविध आइक।
शारीर मानसिक। शाब्द गा॥ २०० ॥

आतां ह्या तिहींमाझारीं। शारीर तंव अवधारीं।
तरि शंभू कां श्रीहरी। पढियंता होय॥ २०१ ॥

देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं शौचमार्जवम्।
ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तप उच्यते॥ १७.१४ ॥

तया प्रिय देवतालया। यात्रादिकें करावया।
आठही पाहार जैसें पायां। उळिग घापे॥ २०२ ॥

देवांगण मिरवणियां। अंगोपचार पुरवणियां।
करावया म्हणियां। शोभती हात॥ २०३ ॥

लिंग कां प्रतिमा दिठी। देखतखेंवो अंगेष्टी।
लोटिजे कां काठी। पडली जैसी॥ २०४॥

आणि विधिविनयादिकीं। गुणीं वडील जे लोकीं।
तयां ब्राह्मणांची निकी। पाइकी कीजे॥ २०५॥

अथवा प्रवासें कां पीडा। कां शिणले जे सांकडां।
ते जीव सुरवाडा। आणीजती॥ २०६॥

सकळ तीर्थांचिये धुरे। जियें कां मातापितरें।
तयां सेवेसि कीर शरीरें। लोण कीजे॥ २०७॥

आणि संसारा ऐसा दारुण। जो भेटलाचि हरी शीण।
तो ज्ञानदानीं सकरुण। भजिजे गुरु॥ २०८॥

आणि स्वधर्माचा आगिठां। देहजाड्याचिया किटा।
आवृत्तिपुटीं सुभटा। झाडी कीजे॥ २०९॥

वस्तु भूतमात्रीं नमिजे। परोपकारीं भजिजे।
स्त्रीविषयीं नियमिजे। नांवेंनांव॥ २१०॥

जन्मतेचि प्रसंगें। स्त्रीदेह शिवणें आंगें।
तेथूनि जन्म अवघें। सोंविळें कीजे॥ २११॥

भूतमात्राचेनि नांवें। तृणही नासुडावें।
किंबहुना सांडावे। छेद भेद॥ २१२॥

ऐसैसी जैं शरीरीं। राहाटीची पडे उजरी।
तैं शारीर तप घुमरी। आलें जाण॥ २१३॥

पार्था समस्तही हें करणें। देहाचेनि प्रधानपणें।
म्हणौनि ययातें मी म्हणें। शारीर तप॥ २१४॥

एवं शारीर जें तप। तयाचें दाविलें रूप।
आतां आईक निष्पाप। वाङ्मय तें॥ २१५॥

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत्।
स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते॥ १७.१५॥

तरी लोहाचे आंग तुक। न तोडितांचि कनक।
केलें जैसें देख। परिसें तेणें॥ २१६॥

तैसें न दुखवितां सहजें। जावळिया सुख निपजे।
ऐसें साधुत्व कां देखिजे। बोलणां जिये॥ २१७॥

पाणी मुदल झाडा जाये। तृण ते प्रसंगेंचि जिये।
तैसें एका बोलिलें होये। सर्वांहि हित॥ २१८॥

जोडे अमृताची सुरसरी। तैं प्राणांतें अमर करी।
स्नानें पाप ताप वारी। गोडीही दे॥ २१९॥

तैसा अविवेकही फिटे। आपुलें अनादित्व भेटे।
आइकतां रुचि न विटे। पीयूषीं जैसी॥ २२०॥

जरी कोणी करी पुसणें। तरी होआवें ऐसें बोलणें।
ना तरी आवर्तणें। निगम कां नाम॥ २२१॥

ऋग्वेदादि तीन्ही। प्रतिष्ठीजती वाग्भुवनीं।
केली जैसी वदनीं। ब्रह्मशाळा॥ २२२॥

ना तरी एकाधें नांव। तेंचि शैव कां वैष्णव।
वाचे वसे तें वाग्भव। तप जाणावें॥ २२३॥

आतां तप जें मानसिक। तेंही सांगों आइक।
म्हणे लोकनाथनायक। नायकचि तो॥ २२४॥

मनःप्रसादः सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रहः।
भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्यते॥ १७.१६॥

तरि सरोवर तरंगीं। सांडिलें आकाश मेघीं।
कां चंदनाचे उरगीं। उद्यान जैसें॥ २२५॥

ना ना कळा वैषम्यें चंद्र। कां सांडिला आधीं नरेंद्र।
ना तरि क्षीरसमुद्र। मंदराचळें॥ २२६॥

तैसीं ना ना विकल्पजाळें। सांडूनि गेलिया सकळें।
मन राहे कां केवळें। स्वरूपें जें॥ २२७॥

तपनेंवीण प्रकाश। जाड्येंवीण रस।
पोकळीवीण अवकाश। होय जैसा॥ २२८॥

तैसी आपली सोय देखे। आणि आपलिया स्वभावा मुके।
हिंवली जैसी आंगिकें। हिवों नेदी॥ २२९॥

मग न चलते कळंकेंवीण। शशिबिंब जैसें नित्य परिपूर्ण।
तैसें चोखीं शृंगारपण। मनाचें जें॥ २३०॥

बुजाली वैराग्याची वोरप। जिराली मनाची धांप कांप।
तेथ केवळ जाली वाफ। निजबोधाची॥ २३१॥

म्हणौनि विचारावया शास्त्र। राहाटवावें जें वक्त्र।
तें वाचेचेंही सूत्र। हातीं न धरी॥ २३२॥

तें स्वभाव लाभलें लाभलेपणें। मन मनपणाही धरूं नेणे।
शिवतलें जैसें लवणें। आपलें निज॥ २३३॥

तेथ कें उठिती ते भाव। जिहीं इंद्रियमार्गी धांव।
घेऊनि ठाकावे गांव। विषयांचे ते॥ २३४॥

म्हणौनि तिये मानसीं। भावशुद्धीचि असे आपैसी।
रोमशुचि जैसी। तळहाताची॥२३५॥

काय बहु बोलों अर्जुना। जैं हे दशा ये मना।
तैं मनस्तपोभिधाना। पात्र होय ती॥ २३६॥

परि तें असो हें जाण। मानसतपाचें लक्षण।
देवो म्हणे संपूर्ण। सांगितले॥ २३७॥

एवं देहवाचाचित्तें। जें पातलें त्रिविधत्वातें।
तें सामान्य तप तूतें। परिसवलें गा॥ २३८॥

आतां गुणत्रयसंगें। हेंचि विशेषें त्रिविधीं रिगे।
तेंही आईक चांगें। प्रज्ञाबळें॥ २३९॥

श्रद्धया परया तप्तं तपस्तत् त्रिविधं नरैः।
अफलाकांक्षिभिर्युक्तैः सात्विकं परिचक्षते॥ १७.१७॥

तरि हेंचि तप त्रिविधा। जें दाविलें तुज प्रबुद्धा।
तेंचि करीं पूर्णश्रद्धा। सांडूनि फळ॥ २४०॥

जैं पुरतिया सत्वशुद्धी। आचरिजे आस्तिकबुद्धी।
तैं तयातेंचि गा प्रबुद्धीं। सत्विक म्हणिपे॥२४१॥

सत्कारमानपूजार्थं तपो दम्भेन चैव यत्।
क्रियते तदिह प्रोक्तं राजसं चलमध्रुवम्॥ १७.१८॥

ना तरी तपस्थापनेलागीं। दुजेपण मांडूनि जगीं।
महत्त्वाद्रीच्या शृंगीं। बैसावया॥ २४२॥

त्रिभुवनींचिया सन्माना। न वचावें ठाया आना।
धुरेचिया आसना। भोजनालागीं॥ २४३॥

विश्वाचिया स्तोत्रा। आपण होआवया पात्रा।
विश्वें आपलिया यात्रा। कराविया॥ २४४॥

लोकांचिया विविध पूजा। आश्रय न धरावया दुजा।
भोग भोगावे वोजा। महत्त्वाचिये॥ २४५॥

आंग बोल माखूनि तपें। विकावया आपणपें।
अंगहीन पडपे। जियापरी॥ २४६॥

हें असो धनमानीं आस। वाढवूनि तप कीजे सायास।
तैं तेंचि तप राजस। बोलिजे गा॥ २४७॥

पहुरणें जें दुहिलें। तैं तें गुरूं न दुभेचि व्यालें।
कां उभें शेत चारिलें। पिकावया नुरे॥ २४८॥

तैसें फोकारितां तप। कीजे जें साक्षेप।
तें फळीं तंव सोप। निःशेष जाय॥ २४९॥

ऐसें निर्फळ देखोनि करितां। माझारीं सांडीं पंडुसुता।
म्हणौनि नाहीं स्थिरता। तपा तया॥ २५०॥

येऱ्हवीं तरी आकाश मांडी। जो गर्जोनि ब्रह्मांड फोडी।
तो अकाळमेघ काय घडी। राहात आहे॥२५१॥

तैसें राजस तप जें होय। तें फळीं कीर वांझ जाये।
परी आचरणींही नोहे। निर्वाहतें गा॥ २५२॥

आतां तेचि तप पुढती। तामसाचिये रीती।
पैं परत्रा आणि कीर्ती। मुकोनि कीजे॥ २५३॥

मूढग्राहेणात्मनो यत् पीडया क्रियते तपः।
परस्योत्सादनार्थं वा तत्तामसमुदाहृतम्॥ १७.१९॥

केवळ मूर्खपणाचा वारा। जीवीं घेऊनि धनुर्धरा।
नाम ठेविजे शरीरा। वैरियाचें॥ २५४॥

पंचाग्नीची दडगी। खोलवीजती शरीरालागीं।
कां इंधन कीजे हें आगी। आंतु लावी॥ २५५॥

माथां जळिजती गुगुळ। पाठीं घालिजती गळ।
आंग जाळिती इंगळ। जळतभीतां॥ २५६॥

दवडोनि श्वासोच्छ्वास। कीजती वायांचि उपवास।
कां घेपती धूमाचे घांस। अधोमुखें॥ २५७॥

हिमोदकें आकंठें। खडकें सेविजती तटें।
जितां मांसाचे चिमुटे। तोडिती जेथ॥ २५८॥

ऐसी ना ना परी हे काया। घाय सूतां पैं धनंजया।
तप कीजे नाशावया। पुढिलांतें॥ २५९॥

आंगभारें सुटला धोंडा। आपण फुटोनि होय खंडखंडा।
कां आड जालियांतें रगडा। करी जैसा॥ २६०॥

तेविं आपलिया आटणिया। सुखें असतया प्राणिया।
जियावया शिराणिया। कीजती गा॥ २६१॥

किंबहुना हे वोखटी। घेऊनि क्लेशाची हातवटी।
तप निफजे तें किरीटी। तामस होय॥ २६२॥

एवं सत्वादिकाच्या आंगीं। पडिलें तप तिहीं भागीं।
जाले तेंही तुज चांगीं। दाविलें व्यक्ती॥ २६३॥

आतां बोलतां प्रसंगा। आलें म्हणौनि पैं गा।
करूं रूप दानलिंगा। त्रिविधा तया॥ २६४॥

येथ गुणाचेनि बळें। दानही त्रिविध असे जालें।
तेंचि आइक पहिलें। सात्विक ऐसें॥ २६५॥

दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे।
देशे काले च पात्रे च तद्दानं सात्विकं स्मृतम्॥ १७.२०॥

तरी स्वधर्मा आंतौतें। जें जें मिळेल आपणयातें।
तें तें दीजे बहुतें। सन्मानयोगें॥ २६६॥

जालया सुबीज प्रसंग। पडे क्षेत्रवाफेचा पांग।
तैसाचि दानाचा हा लाग। देखतसें॥ २६७॥

अनर्घ्य रत्न हाता चढे। तैं भांगाराची वोढी पडे।
दोनीं जालीं तरी न जोडे। लेतें आंग॥ २६८॥

परि सण सुहृद संपत्ती। हे तिन्ही येकीं मिळती।
जैं भाग्य धरी उन्नती। आपुल्याविषीं॥२६९॥

तैसें निफजवावया दान। जैं सत्व सुये संवाहन।
तैं देश काळ भोजन। द्रव्यही मिळे॥ २७०॥

तरि आधीं तंव प्रयत्नेसीं। होआवें कुरुक्षेत्र कां काशी।
ना तरि तुके जो इहींसीं। तो देशही हो॥ २७१॥

तेथ रविचंद्रराहु मेळ। होतां पाहे पुण्य काळ।
कां तयासारिखा निर्मळ। आनही जाला॥ २७२॥

तैशा काळीं तिये देशीं। होआवी पात्रसंपत्ती ऐसी।
मूर्ति आहे धरिली जैसी। शुचत्वेंचि कां॥ २७३॥

आचाराचें मूळपीठ। वेदांची उतारपेठ।
तैसें द्विजरत्न चोखट। पावोनियां॥ २७४॥

मग तयाचे ठायीं वित्ता। निवर्तवावी स्वसत्ता।
परि प्रियापुढें कांता। रिगे जैसेनी॥ २७५॥

कां जयाचें ठेविलें तया। देऊनि होय जे उतराइया।
ना ना हडपें विडा राया। दिधला जैसा॥ २७६॥

तैसेनि निष्कामें जीवें। भूम्यादिक अर्पावें।
किंबहुना हांवे। नेदावें उठों॥ २७७॥

आणि जया दान द्यावें। तयातें ऐसेया पाहावें।
जया घेतलें नुमचवे। कायसेनिही॥ २७८॥

साद घातलिया आकाशा। नेदी प्रतिशब्द जैसा।
कां पाहिला आरसा। येरीकडे॥ २७९॥

ना तरी उदकाचिये भूमिके। आफळिलेनि कंदुकें।
उधळौनि कवतिकें। न येइजे हाता॥ २८०॥

ना ना वसो घातला चारु। माथां तुरंबिला बुरु।
न करी प्रत्युपकारु। जियापरी॥ २८१॥

तैसें दिधलें दातयाचें। जो कोणेही आंगें नुमचे।
अर्पिलया साम्य तयाचें। कीजे पैं गा॥ २८२॥

ऐसिया जें सामग्रिया। दान निफजे वीरराया।
तें सात्विक दानवर्या। सर्वांही जाण॥ २८३॥

आणि तोचि देश काळ। घडे तैसाचि पात्रमेळ।
दानभागही निर्मळ। न्यायगत॥ २८४॥

यत्तु प्रत्युपकारार्थं फलमुद्दिश्य वा पुनः।
दीयते च परिक्लिष्टं तद्दानं राजसं स्मृतम्॥ १७.२१॥

परि मनीं धरूनि दुभत्तें। चारिजे जेविं गाईतें।
कां पेंव करूनि आइतें। पेरूं जायिजे॥ २८५॥

ना ना दिठी घालूनि आहेरा। आवंतूं जाइजे सोयिरा।
कां वाण धाडिजे घरा। वोवसियाचे॥ २८६॥

पैं कळांतर गांठीं बांधिजे। मग पुढिलाचें काज कीजे।
पूजा घेऊनि रस दीजे। पीडितांसि॥ २८७॥

तैसें जया जें दान देणें। तें तेणेंचि गा जीवनें।
पुढती भजावा भावें येणें। दीजे जें कां॥ २८८॥

अथवा कोणी वाटे जातां। घेतलें उमचों न शकता।
मिळे जैं पंडुसुता। द्विजोत्तम॥ २८९॥

तरी कवड्या एकासाठीं। अशेषां गोत्रांचींच किरीटी।
सर्व प्रायश्चित्तें सुये मुठी। तयाचिये॥ २९०॥

तेवींचि पारलौकिकें। फळें वांच्छिजती अनेकें।
आणि दीजे तरी भुके। येकाही नोहे॥ २९१॥

तेंही ब्राह्मण नेवों सरे। कीं हाणिचेनि शिणें झांसुरे।
सर्वस्व जैसें चोरें। नागऊनि नेलें॥ २९२॥

काय बहु सांगो सुमती। जें दीजे या मनोवृत्ती।
तें दान गा त्रिजगतीं। राजस पैं॥ २९३॥

अदेशकाले यद्दानम् अपात्रेभ्यश्च दीयते।
असत्कृतमवज्ञातं तत्तामसमुदाहृतम्॥ १७.२२॥

मग म्लेच्छांचे वसौटे। दांगाणे हन कैकटे।
कां शिबिरें चोहटे। नगरींचे ते॥ २९४॥

तेही तेही ठाई मिळणी। समय सांजवेळ कां रजनी।
तेव्हां उदार होणें धनीं। चोरियेच्या ते॥ २९५॥

पात्रें भाट नागारी। सामान्य स्त्रिया कां जुवारी।
जियें मूर्तिमंतें भुररीं। भुले तयां॥ २९६॥

नृत्याची पुरवणी। ते पुढां डोळेभारणी।
गीत भाटींव तो श्रवणीं। कर्णजप॥ २९७॥

तयाहीवरी अळुमाळ। जैं घे फुलागंधाचा गुगुळ।
तंव भ्रमाचा तो वेताळ। अवतरे तैसा॥ २९८॥

तेथ विभांडूनियां जग। आणिले पदार्थ अनेग।
तेणें घालूं लागे मातंग। गवादीसी॥ २९९॥

एवं ऐसेंनि जें देणें। तें तामसदान मी म्हणें।
आणि घडे दैवगुणें। आणिकही एक॥ ३००॥

विपाये घुणाक्षर पडे। टाळिये काउळा सांपडे।
तैसें तामसां पर्व जोडे। पुण्यदेशीं॥ ३०१॥

तेथ देखोनि तो आथिला। योग्य मागोंही आला।
तोही दर्पा चढला। भांबावे जरी॥ ३०२॥

तरी श्रद्धा न धरी जीवीं। तया माथाही न खालवी।
स्वयें न करी ना करवी। अर्घ्यादिक॥ ३०३॥

आलिया न घाली बैसों। तेथ गंधाक्षतांचा काय अतिसो।
हा प्रसंग कीर असो। तामसीं नरीं॥ ३०४॥

पैं बोळविजे रिणाइत। तैसा झकवी तयाचा हात।
तूं करणें याचा बहुत। प्रयोग तेथ॥ ३०५॥

आणि जया जें दे किरीटी। तयातें उमाणी तयासाठीं।
मग कुबोलें कां लोटी। अवज्ञेच्या॥ ३०६॥

हें बहु असो यापरी। मोल वेंचणें जें अवधारीं।
तया नांव चराचरीं। तामस दान॥ ३०७॥

ऐसें आपुलाल्या चिन्हीं । अळंकृतें तीन्ही ।
दानें दाविलीं अभिधानीं । राजतनया ॥ ३०८ ॥

तेथ मी जाणत असें । विपायें तूं गा ऐसें ।
कल्पिसील मानसें । विचक्षणा ॥ ३०९ ॥

जे भवबंध मोचक । येकलें कर्म सात्विक ।
तरी कां वेखासीं सदोख । येर बोलावीं ॥ ३१० ॥

परि नोसंतितां बिवसी । भेटी नाहीं निधीसी ।
कां धूं न साहतां जैसी । वाती न लगे ॥ ३११ ॥

तैसें शुद्ध सत्वा आड । आहे रजतमाचें कवाड ।
तें भेदणेयातें कीड । म्हणावें कां ॥ ३१२ ॥

आम्हीं श्रद्धादि दानांत । जें समस्तही क्रियाजात ।
सांगीतले कां व्याप्त । तिहीं गुणीं ॥ ३१३ ॥

तेथ भरंवसेनि तीन्ही । न सांगोंचि ऐसें मानीं ।
परि सत्व दावाया दोन्ही । बोलिलों येरें ॥ ३१४ ॥

जें दोहीमाजि तिजें असे । तें दोहीं सांडितांचि दिसे ।
अहोरात्र त्यागें जैसें । संध्यारूप ॥ ३१५ ॥

तैसें रजतमविनाशें । तिजें जें उत्तम दिसे ।
तें सत्व हें आपैसें । फावसि ये ॥ ३१६ ॥

एवं दावावया सत्व तुज । निरूपिलें तम रज ।
तें सांडूनि सत्वें काज । साधीं आपलें ॥ ३१७ ॥

सत्वेंचि येणें चोखाळें । करीं यज्ञादिकें सकळें ।
पावसी तैं करतळें । आपलें निज ॥ ३१८ ॥

सूर्यें दाविलें सातें । काय एक न दिसे तेथें ।
तेविं सत्वें केलें फळातें । काय नेदी ॥ ३१९ ॥

हे कीर आवडतांविखीं । शक्ति सत्वीं आथि निकी ।
परि मोक्षेंसीं एकी । मिसळणें जें ॥ ३२० ॥

तें एक आनचि आहे । तयाचा सावावो जैं लाहे ।
तैं मोक्षाचाही होये । गांवीं सरतें ॥ ३२१ ॥

पैं भांगार जर्‍हीं पंधरें । तर्‍ही राजावळीची अक्षरें ।
लाहे तैंचि सरे । जियापरी ॥ ३२२ ॥

स्वच्छें शीतळें सुगंधें । जळें होती सुखप्रदें ।
परि पवित्रत्व संबंधें । तीर्थाचेनि ॥ ३२३ ॥

नयी हो कां भलतैसी थोरी । परि गंगा जैं अंगिकारी ।
तैंचि तिये सागरीं । प्रवेश गा ॥ ३२४ ॥

तैसें सात्विक कर्मा किरीटी । येतां मोक्षाचिये भेटी ।
न पडे आडकाठी । तें वेगळें आहे ॥ ३२५ ॥

हा बोल आयकतखेवीं । अर्जुना आधि न माये जीवीं ।
म्हणे देवें कृपा करावी । सांगावें तें ॥ ३२६ ॥

तेथ कृपाळु चक्रवर्ती । म्हणे आइक तयाची व्यक्ती ।
जेणें सात्विक तें मुक्ति । रत्न देखें ॥ ३२७ ॥

ॐ तत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः स्मृतः ।
ब्राह्मणास्तेन वेदाश्च यज्ञाश्च विहिताः पुरा ॥ १७.२३ ॥

तरि अनादि परब्रह्म । जें जगदादि विश्रामधाम ।
तयाचें एक नाम । त्रिधा पैं असे ॥ ३२८ ॥

तें कीर अनाम अजाती । परि अविद्यावर्गाचिये राती ।
माजि वोळखावया श्रुती । खूण केली ॥ ३२९ ॥

उपजलिया बाळकासी । नांव नाहीं तयापासीं ।
ठेवलेनि नांवेंसीं । ओ देत उठी ॥ ३३० ॥

कष्टले संसारशिणें । जे देवों येती गार्‍हाणें ।
तयां ओ दे नांव जेणें । तो संकेत हा ॥ ३३१ ॥

ब्रह्माचा अबोला फिटावा । अद्वैततत्वें तो भेटावा ।
ऐसा मंत्र देखिला कवणा । वेदें बापें ॥ ३३२ ॥

मग दाविलेनि जेणें एकें । ब्रह्म आळविलें कवतिकें ।
मागां असत ठाके । पुढां उभें ॥ ३३३ ॥

परि निगमाचळशिखरीं । उपनिषदार्थ नगरीं ।
आहाती जे ब्रह्माच्या येकाहारीं । तयांसीच कळे ॥ ३३४ ॥

हेंही असो प्रजापती। शक्ती जे सृष्टि करिती।
ते जया एक आवृत्ती। नामाचिये॥ ३३५ ॥

पैं सृष्टीचिया उपक्रमा। पूर्वीं गा वीरोत्तमा।
वेडा ऐसा ब्रह्मा। एकला होता॥ ३३६ ॥

मज ईश्वरातें नोळखे। ना सृष्टीही करूं शके।
तो थोर केला ऐकें। नामें जेणें॥ ३३७ ॥

जयाचा अर्थ जीवीं ध्यातां। जें वर्णत्रयचि जपतां।
विश्वसृजनयोग्यता। आली तया॥ ३३८ ॥

तेधवां रचिले ब्रह्मजन। तयां वेद दिधलें शासन।
यज्ञा ऐसें वर्तन। जीविके केलें॥ ३३९ ॥

पाठीं नेणों किती येर। स्रजिले लोक अपार।
जाले ब्रह्मदत्त अग्रहार। तिन्ही भुवनें॥ ३४० ॥

ऐसें नाममंत्रें। जेणें धातया अढळचि करणें।
तयाचें स्वरूप आइक म्हणे। श्रीकांत तो॥ ३४१ ॥

तरि सर्व मंत्रांचा राजा। तो प्रणव आदिवर्ण बुझा।
आणि तत्कार दुजा। तिजा सत्कार॥ ३४२ ॥

एवं ॐ तत्सदाकार। ब्रह्मनाम हें त्रिप्रकार।
हें फूल तुरंबी सुंदर। उपनिषद तें॥ ३४३ ॥

येणेंसी गा होऊनि एक। जैं कर्म चाले सात्विक।
तें कैवल्यातें पाइक। घरींचें करी॥ ३४४ ॥

परि कापुराचें थळीव। आणुनि देईल दैव।
लेवों जाणणेंचि अडव। तेथ असे बापा॥ ३४५ ॥

तैसें आदरिजेल सत्कर्म। उच्चरिजेल ब्रह्मनाम।
परि नेणिजेल जरी वर्म। विनियोगाचें॥ ३४६ ॥

तरि महंतांचिया कोडी। घरा आलीयाही वोढी।
मानूं नेणतां परवडी। मुदल तुटे॥ ३४७ ॥

कां ल्यावया चोखट। टीक भांगार एकवट।
घालूनि बांधिली मोट। गळां जेवीं॥ ३४८ ॥

तैसें तोडीं ब्रह्मनाम। हातीं तें सात्विक कर्म।
विनियोगेंवीण काम। विफळ होय॥ ३४९ ॥

अगा अन्न आणि भूक। पासीं असे परी देख।
जेऊं नेणतां बाळक। लंघनचि कीं॥ ३५० ॥

कां स्नेह सूत्र वैश्वानरा। जालियाही संसारा।
हातवटी नेणतां वीरा। प्रकाश नोहे॥ ३५१ ॥

तैसें वेळे कृत्य पावे। तेथिंचा मंत्रही आठवे।
परि व्यर्थ तें आघवें। विनियोगेंवीण॥ ३५२ ॥

म्हणौनि वर्णत्रयात्मक। जें हें परब्रह्मनाम।
विनियोग तूं आइक। याचा आतां॥ ३५३ ॥

तस्मादोमित्युदाहृत्य यज्ञदानतपःक्रियाः।
प्रवर्तन्ते विधानोक्ताः सततं ब्रह्मवादिनाम्॥ १७.२४ ॥

तरि या नामींचीं अक्षरें तिन्ही। कर्मा आदि मध्य निदानीं।
प्रयोजावीं पैं स्थानीं। इहीं तिहीं॥ ३५४ ॥

हेचि एकी हातवटी। घेऊनि हन किरीटी।
आले ब्रह्मविद भेटी। ब्रह्माचिये॥ ३५५ ॥

ब्रह्मेंसीं होआवया एकी। ते न वंचती यज्ञादिकीं।
जे चावळले वोळखीं। शास्त्रांचिया॥ ३५६ ॥

तो आदि तव ॐकार। ध्यानें करिती गोचर।
पाठीं आणिती उच्चार। वाचेही तो॥ ३५७ ॥

तेणें ध्यानें प्रकटें। प्रणवोच्चारें स्पष्टें।
लागती मग वाटे। क्रियांचिये॥ ३५८ ॥

आंधारीं अभंग दिवा। आडवीं समर्थ बोळावा।
तैसा प्रणव जाणावा। कर्मारंभी॥ ३५९ ॥

उचित देवोद्देशें। द्रव्यें धर्म्यें आणि बहुवसें।
द्विजद्वारा हन हुताशें। यजिती पैं ते॥ ३६० ॥

आहवनीयादि वह्नीं। निरेक्षरूपीं हवनीं।
यजिती पैं विधानीं। फुडे होउनी॥ ३६१ ॥

किंबहुना ना ना याग। निष्पत्तीचें घेऊनि अंग।
करिती नावडतेया त्याग। उपाधीचा॥ ३६२॥

का न्यायें जोडला पवित्रीं। मूम्यादिकीं स्वतंत्रीं।
देशकाळशुद्ध पात्रीं। देती दानें॥ ३६३॥

अथवा एकांतरा कृच्छ्रीं। चांद्रायणें मासोपवासीं।
शोधोनि गा धातुराशी। करिती तपें॥ ३६४॥

एवं यज्ञ दान तपें। जियें गाजती बंधरूपें।
तिहींच होय सोपें। मोक्षाचें तया॥ ३६५॥

स्थळीं नावा जिया दाटिजे। जळीं तियाचि जेवीं तरिजे।
तेविं बंधकीं कर्मीं सुटिजे। नामें येणें॥ ३६६॥

परि हें असो ऐसिया। या यज्ञदानादि क्रिया।
ॐकारें सावायिलिया। प्रवर्तती॥ ३६७॥

तिया मोटकिया जेथ फळीं। रिगों पाहाती निहाळीं।
प्रयोजिती तिये काळीं। तच्छब्द तो॥ ३६८॥

तदित्यनभिसंधाय फलं यज्ञतपःक्रियाः।
दानक्रियाश्च विविधाः क्रियन्ते मोक्षकांक्षिभिः॥ १७.२५॥

जें सर्वांही जगापरौतें। जें एक सर्वही देखतें।
जें तच्छब्दें बोलिजे तें। पैल वस्तु॥ ३६९॥

तें सर्वादिकत्वें चित्तीं। तद्रूप ध्याउनिया सुमती।
उच्चारेंही व्यक्ती। आणिती पुढती॥ ३७०॥

म्हणती तद्रूपा ब्रह्म तया। फळेंसीं क्रिया इया।
तेचि होतु आम्हां भोगावया। कांहींचि नुरो॥ ३७१॥

ऐसेनि तदात्मकें ब्रह्में। तेथ उगाणूनि कर्में।
आंग झाडिती न ममें। येणें बोलें॥ ३७२॥

आतां ॐकारें आदरिलें। तत्कारें समर्पिलें।
इया रीती जया आलें। ब्रह्मत्व कर्मा॥ ३७३॥

तें कर्म कीर ब्रह्माकारें। चालें तेणेंही न सरे।
जें करी तेणेंसीं दुसरें। आहे म्हणौनी॥ ३७४॥

मीठ आंगें जळीं विरे। परि क्षारता वेगळी उरे।
तैसें कर्म ब्रह्माकारें। गमे तें द्वैत॥ ३७५॥

आणि दुजें जंव जंव घडे। तंव तंव संसारभय जोडे।
हें देवो आपलेनि तोंडें। बोलती वेदें॥३७६॥

म्हणौनि परत्वें ब्रह्म असे। तें आत्मत्वें परियवसे।
सच्छब्द या रिणादोषें। ठेविला देवें॥ ३७७॥

तरि ॐकार तत्कारीं। कर्म केलें जें ब्रह्मशरीरीं।
जें प्रशस्तादि बोलवरी। वाखाणिलें॥ ३७८॥

प्रशस्तकर्मीं तिये। सच्छब्दा विनियोग आहे।
तोचि आइका होये। तैसा सांगों॥ ३७९॥

सद्भावे साधुभावे च सदित्येतत् प्रयुज्यते।
प्रशस्ते कर्मणि तथा सच्छब्दः पार्थ युज्यते॥ १७.२६॥

तरि सच्छब्दें येणें। आटूनि असताचें नाणें।
दाविजे अव्यंगवाणें। सत्तेचें रूप॥ ३८०॥

जें सतचि काळें देशें। होऊं नेणेचि अनारिसें।
आपणपां आपण असे। अखंडित॥ ३८१॥

हें दिसतें जेतुलें आहे। तें असतपणें जें नोहे।
देखतां रूपीं सोये। लाभे जयाची॥ ३८२॥

तेणेंसीं प्रशस्त तें कर्म। जें जालें सर्वात्मक ब्रह्म।
देखिजे करूनि सम। ऐक्यबोधें॥ ३८३॥

तरी ॐकार तत्कारें। जें कर्म दाविलें ब्रह्माकारें।
तें गाळूनि होइजे एकसरें। सन्मात्रचि॥ ३८४॥

ऐसा हा अंतरंग। सच्छब्दाचा विनियोग।
जाणा म्हणे श्रीरंग। मी न म्हणें हो॥ ३८५॥

ना मीचि जरी हो म्हणें। तरि श्रीरंगीं दुजें हेंचि उणें।
म्हणौनि हें बोलणें। देवाचेंचि॥ ३८६॥

आतां आणिकही परी। सच्छब्द हा अवधारीं।
सात्विक कर्मा करी। उपकार जो॥ ३८७॥

तरी सत्कर्मे चांगें। चालिलीं अधिकारबगें।
परि एखादे कां आंगें। हिणावती जैं॥ ३८८॥

तैं उणें एकें अवयवें। शरीर ठाकें आघवें।
कां अंगहीना भांडावे। रथाची गती॥ ३८९॥

तैसें एकेचि गुणेंवीण। सतचि परी असतपण।
कर्म धरी गा जाण। जिये वेळें॥ ३९०॥

तेव्हां ॐकार तत्कारीं। सावायिला हा चांगी परी।
सच्छब्द कर्मा करी। जीर्णोद्धार॥ ३९१॥

तें असतपण फेडी। आणी सद्भावाचिये रूढी।
निजसत्वाचिये प्रौढी। सच्छब्द हा॥ ३९२॥

दिव्यौषध जैसें रोगिया। कां सावावो ये भंगलिया।
सच्छब्द कर्मा व्यंगलिया। तैसा जाण॥ ३९३॥

अथवा कांहीं प्रमादें। कर्म आपुलिये मर्यादे।
चुकोनि पडे निषिद्धे। वाटे हन॥ ३९४॥

चालतयाचि मार्ग सांडे। पारखियाचि अखरें पडे।
राहाटीमाजी न घडे। काइ काइ॥ ३९५॥

म्हणौनि तैसी कर्मा। राभस्यें सांडे सीमा।
असाधुत्वाचिया दुर्नामा। येवो पाहे जें॥ ३९६॥

तेथ गा हा सच्छब्दु। येरां दोहींपरीस प्रबुद्धु।
प्रयोजिला करी साधु। कर्मातें यया॥ ३९७॥

लोहा परिसाची घृष्टी। वोहळा गंगेची भेटी।
कां मृता जैसी वृष्टी। पीयूषाची॥ ३९८॥

पैं असाधुकर्मा तैसा। सच्छब्दप्रयोग वीरेशा।
हें असो गौरवचि ऐसा। नामाचा यया॥ ३९९॥

घेऊनि येथिंचें वर्म। जैं विचारिसी हें नाम।
तैं केवळ हेंचि ब्रह्म। जाणसी तूं॥ ४००॥

पाहे पां ॐ तत्सत् ऐसें। हें बोलणें तेथ नेतसे।
जेथूनि कां हें प्रकाशे। दृश्यजात॥ ४०१॥

तें तव निर्विशिष्ट। परब्रह्म चोखट।
तयाचें हें आंतुवट। व्यंजक नाम॥ ४०२॥

परि आश्रय आकाशा। आकाशचि कां जैसा।
या नामा अनामिया आश्रय तैसा। अभेद असे॥ ४०३॥

उदयिला आकाशीं। रवीचि रवीतें प्रकाशी।
हे नामव्यक्ति तैसी। ब्रह्मचि करी॥ ४०४॥

म्हणौनि त्र्यक्षर हें नाम। नव्हे जाण केवळ ब्रह्म।
याहीलागीं कर्म। जें जें कीजे॥ ४०५॥

यज्ञे तपसि दाने च स्थितिः सदिति चोच्यते।
कर्म चैव तदर्थीयं सदित्येवाभिधीयते॥ १७.२७॥

ते याग अथवा दानें तपादिकेंही गहनें।
तियें निफजितु कां न्यूनें। होऊनि ठातु॥ ४०६॥

परि परिसाचा वरकलीं। नाहीं चोखाकिडाची बोली।
तैसीं ब्रह्मीं अर्पितां केलीं। ब्रह्मचि होतीं॥ ४०७॥

उणिया पुरियाची परी। नुरेचि तेथ अवधारीं।
निवडूं न येती सागरीं। जैसिया नदी॥ ४०८॥

एवं पार्था तुजप्रती। ब्रह्मनामाची हे शक्ती।
सांगीतली उपपत्ती। डोळसा गा॥ ४०९॥

आणि एएकेकाही अक्षरा। वेगळवेगळा वीरा।
विनियोग नागरा। बोलिलों रीति॥ ४१०॥

एवं ऐसें सुमहिम। म्हणौनि हें ब्रह्मनाम।
आतां जाणीतलें कीं सुवर्म। राया तुवां॥ ४११॥

तरि येथूनि याचि श्रद्धा। उपलविली हो सर्वदा।
जयाचें जालें बंधा। उरों नेदी॥ ४१२॥

जिये कर्मी हा प्रयोग। अनुष्ठिजे सद्विनियोग।
तेथ अनुष्ठिला सांग। वेदचि तो॥ ४१३॥

अश्रद्धया हुतं दत्तं तपस्तप्तं कृतं च यत्।
असदित्युच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह॥ १७.२८॥

ना सांडूनि हे सोये। मोडूनि श्रद्धेची बाहे।
दुराग्रहाची त्राये। वाढऊनियां॥ ४१४॥

मग अश्वमेध कोडी कीजे। रत्नें भरोनि पृथ्वी दीजे।
एकांगुष्ठींही तपिजे। तपसाहस्त्रीं॥ ४१५॥

जळाशयाचेनि नांवें। समुद्रही कीजती नवे।
परि किंबहुना आघवें। वृथाचि तें॥ ४१६॥

पाषाणावरी वर्षिलें। जैसें भस्मीं हवन केलें।
कां खेव दीधलें। साउलिये॥ ४१७॥

ना तरि जैसें चडकणां। गगन हाणीतलें अर्जुना।
तैसा समारंभ सुणा। गेलाचि तो॥ ४१८॥

घाणां गाळिले गुंडे। तेल ना पेंडी जोडे।
तैसें दरिद्र तेवढें। ठेलेचि आंगीं॥ ४१९॥

गांठीं बांधली खापरी। येथ अथवा पैलतीरीं।
न सरोनि जैसी मारी। उपवासीं गा॥ ४२०॥

तैसें कर्मजातें तेणें। नाहीं ऐहिकींचें भोगणें।
तेथ परत्र तें कवणें। अपेक्षावें॥ ४२१॥

म्हणौनि ब्रह्मनामश्रद्धा। सांडूनि कीजे जो धांदा।
हें असो सिणू नुसधा। दृष्टादृष्टीं तो॥ ४२२॥

ऐसें कलुषकरि केसरी। त्रिताप तिमिर तमारी।
श्रीवर वीर नरहरी। बोलिलें तेणें॥ ४२३॥

तेथ निजानंदा बहुवसा। माजि अर्जुन तो सहसा।
हरपला चंद्र जैसा। चांदिणेनी॥ ४२४॥

अहो संग्राम हा वाणिया। मापें नाराचांचिया आणिया।
सूनि मांस घे मवणिया। जीवितेंसीं॥ ४२५॥

ऐसिया समयीं कर्कशें। भोगीजत स्वानंद राज्य कैसें।
आजि भाग्योदय हा नसे। आणिके ठाईं॥ ४२६॥

संजय म्हणे कौरवराया। गुणा रिझों ये रिपूचिया।
आणि गुरुही हा आमुचिया। सुखाचा येथ॥ ४२७॥

हा न पुसता हे गोठी। तरि देव कां सोडिते गांठी।
तरि कैसेनि आम्हां भेटी। परमार्थेंसीं॥ ४२८॥

होतो अज्ञानाच्या आंधारां। वोसंतीत जन्म वाहरा।
तों आत्मप्रकाश मंदिरा। आंत आणिलें॥ ४२९॥

येवढा आम्हां तुम्हां थोर। केला येणें उपकार।
म्हणौनि हा व्याससहोदर। गुरुत्वें होय॥ ४३०॥

तेवींचि संजयो म्हणें चित्तीं। हा अतिशय या नृपती।
खुपेल म्हणौनि किती। बोलत असों॥ ४३१॥

ऐसी हे बोली सांडिली। मग येरीचि गोठी आदरिली।
जे पार्थें कां पुसिली। श्रीकृष्णातें॥ ४३२॥

याचें जैसें कां करणें। तैसें मीही करीन बोलणें।
ऐकिजो ज्ञानदेव म्हणे। श्रीनिवृत्तीचा॥ ४३३॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे श्रद्धात्रयविभागयोगोनाम सप्तदशोऽध्यायः॥ १७॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां सप्तदशोऽध्यायः॥ १७॥

श्लोक २८ ओव्या ४३३

# 18 The Perfection of Renunciation मोक्षसंन्यासयोग

श्रीमद्भगवद्गीता अष्टादशोऽध्यायः।
ज्ञानेश्वरी अध्याय अठरावा

---

जयजय देव निर्मळ। निजजनाखिलमंगळ।
जन्मजराजळदजाळ। प्रभंजन॥ १॥

जयजय देव प्रबळ। विदळितामंगळकुळ।
निगमागमद्रुमफळ। फलप्रद॥ २॥

जयजय देव सकळ। विगतविषयवत्सल।
कलितकाळकौतूहल। कलातीत॥ ३॥

जयजय देव निश्चळ। चलितचित्तपानतुंदिल।
जगदुन्मीलनाविरल। केलिप्रिय॥ ४॥

जयजय देव निष्कळ। स्फुरदमंदानंदबहळ।
नित्यनिरस्ताखिलमळ। मूळभूत॥ ५॥

जयजय देव स्वप्रभ। जगदंबुदगर्भनभ।
भुवनोद्भवारंभस्तंभ। भवध्वंस॥ ६॥

जयजय देव विशुद्ध। अविद्योद्यानद्विरद।
शमदममदनमदभेद। दयार्णव॥ ७॥

जयजयदेवैकरूप। अतिकृतकंदर्पसर्पदर्प।
भक्तभाव भुवनदीप। तापापह॥ ८॥

जयजय देव अद्वितीय। परिणतोपरमैकप्रिय।
निजजनजित भजनीय। मायागम्य॥ ९॥

जयजय देव श्रीगुरो। अकल्पनाकल्पतरो।
स्वसंविद् द्रुमबीजप्ररो। हणावनी॥ १०॥

हें काय एकैक ऐसें। ना ना परिभाषावशें।
स्तोत्र करूं तुजदोषें। निर्विशेषा॥ ११॥

जिहीं विशेषणीं विशेषिजे। तें दृश्य नव्हे रूप तुझें।
हें जाणें मी म्हणोनि लाजें। वानणा इंहीं॥ १२॥

परि मर्यादेचा सागर। हा तंवचि तया डगर।
जंव न देखे सुधाकर। उदया आला॥ १३॥

सोमकांत निजनिर्झरीं। चंद्रा अर्घ्यादिक न करी।
तें तोचि अवधारीं। करवीं कीं जी॥ १४॥

नेणों कैसीं वसंतसंगें। अवचितीं झाडांचीं अंगें।
फुटती तैं तयांही जोगें। धरणें नोहे॥ १५॥

पद्मिनी रविकिरण। लाहे मग लाजे कवण।
कां जळें शिंवतलें लवण। आंग भुले॥ १६॥

तैसा तूतें जेथ मी स्मरें। तेथ मीपण मी विसरें।
मग जाकळिला ढेंकरें। तृप्त जैसा॥ १७॥

मज तुवां जी केलें जैसें। माझें मीपण दवडूनी देशें।
स्तुतिमिषें पांचपिसें। बांधलें वाचे॥ १८॥

ना येऱ्हवीं तरी आठवी। राहोनि स्तुति जैं करावी।
तैं गुणागुणीं धरावी। सरोभरी कीं॥ १९॥

तरी तूं जी एकरसाचें लिंग। केवीं करूं गुणागुणीं विभाग।
मोतीं फोडोनि सांधितां चांग। कीं तैसेंचि भलें॥ २०॥

आणि बाप तूं माय। इंहीं बोलीं ना स्तुती होय।
डिंभोपाधिक जाय। विटाळ तेथ॥ २१॥

जी जालेनि पाइकें आलें। तें गोसावीपण केवी बोलें।
ऐसें उपाधी उशिटलें। काय वर्णूं॥ २२॥

जरि आत्मा तूं एकसरा। हेंही म्हणतां दातारा।
तरी आंतुल तूं बाहेरा। व्यापितोसी॥ २३॥

म्हणूनि सत्यचि तुजलागीं। स्तुती न देखों जी जगीं।
मौनावाचुनि लेणें आंगीं। सुसीना मा॥ २४॥

स्तुती कांहीं न बोलणें। पूजा कांहीं न करणें।
सन्निधी कांहीं न होणें। तुझ्या ठायीं॥ २५॥

तरि जितलें जैसें भुली। पिसें आलाप घाली।
तैसें वानूं तें माउली। उपसाहावें तुवां॥ २६॥

आतां गीतार्थाची मुक्तमुदी। लेववीं माझिये वाग्वृद्धी।
जेणें मानें हे सभासदीं। सज्जनांच्या॥ २७॥

तेथ म्हणितलें श्रीनिवृत्ती। नको हें पुढतपुढती।
परिसीं लोहा घृष्टी किती। वेळवेळा कीजे गा॥ २८॥

तंव विनवी ज्ञानदेव। म्हणे हो कां जी पसाव।
परि अवधान देतु देव। ग्रंथा आतां॥ २९॥

जी गीतारत्न प्रासादाचा। कळस अर्थ चिंतामणीचा।
सर्व गीता दर्शनाचा। पाढाऊ जो॥ ३०॥

लोकीं तरी आथी ऐसें। जे दुरूनि कळस दिसे।
आणि भेटींचि हातवसे। देवतेची तिये॥ ३१॥

तैसेंचि एथही आहे। जे एकेचि येणें अध्यायें।
आघवाचि दृष्ट होये। गीतागम हा॥ ३२॥

मी कळस याचि कारणें। अठरावा अध्याय म्हणें।
उवाइला बादरायणें। गीताप्रासादा॥ ३३॥

नोहे कळसापरतें कांहीं। प्रासादीं काम नाहीं।
तें सांगतसे गीताही। संपलेपणें॥ ३४॥

व्यास सहजें सूत्री बळी। तेणें निगम रत्नाचळी।
उपनिषदार्थांची माळी। माजी खांडिली॥ ३५॥

तेथ त्रिवर्गाचा अणुआरु। आडऊ निघाला जो अपारु।
तो महाभारत प्राकारु। भोंवता केला॥ ३६॥

माजि आत्मज्ञानाचे एकवट। दळवाडें झाडूनि चोखट।
घडिलें पार्थवैकुंठ। संवाद कुसरी॥ ३७॥

निवृत्तिसूत्र सोडणिया। सर्वशास्त्रार्थ पुरवणिया।
आवो साधिला मांडणिया। मोक्ष रेखेचा॥ ३८॥

ऐसेनि करितां उभारा। पंधरा अध्यायांत पंधरा।
भूमि निर्वाळलिया पुरा। प्रासाद जाहला॥ ३९॥

उपरि सोळावा अध्याय। तो ग्रीवे घंटेचा आय।
सप्तदश तो ठाय। पडघाणिये॥ ४०॥

तयाही वरी अष्टादश। तो आपैसा मांडला कळस।
उपरि गीतादिकीं व्यास। ध्वज लागला॥ ४१॥

म्हणौनि मागील जे अध्याय। ते चढते भूमीचे आय।
तयांचे पुरें दाविताहे। आपुल्या आंगीं॥ ४२॥

जालया कामी नाहीं चोरी। ते कळसें होय उजरी।
तेविं अष्टादश विवरी। साद्यंत गीता॥ ४३॥

ऐसा व्यासें विंदाणिये। गीताप्रासादु जोडणिये।
आणूनि राखिले प्राणिये। ना ना परी॥ ४४॥

एक प्रदक्षिणा जपाचिया। बाहेरूनि करिती यया।
एक ते श्रवणमिषें छाया। सेविती ययाची॥ ४५॥

एक ते अवधानाचा पुरा। विडापाउड भीतरां।
घेऊनि रिघती गाभारां। अर्थज्ञानाच्या॥ ४६॥

ते निजबोधें उराउरीं। भेटती आत्मया श्रीहरी।
परि मोक्षप्रासादीं सरी। सर्वांही आथी॥ ४७॥

समर्थांचिये पंक्तिभोजनें। तळिंल्या वरिल्या एक पक्वान्नें।
तेविं श्रवणें अर्थें पठणें। मोक्षचि लाभे॥ ४८॥

ऐसा गीता वैष्णवप्रासाद। अठरावा अध्याय कळस विशद।
म्यां म्हणितला हा भेद। जाणोनियां॥ ४९॥

आतां सप्तदशापाठीं। अध्याय कैसेनि उठी।
तो संबंध सांगों दिठी। दिसे तैसा॥ ५०॥

का गंगा यमुना उदक। वोघबगें वेगळिक।
दावी होऊनि एक। पाणीपणें॥ ५१॥

न मोडतां दोन्ही आकार। घडिलें एक शरीर।
हें अर्धनारीनटेश्वर। रूपीं दिसे॥ ५२॥

ना ना वाढली दिवसें। कळा बिंबीं पैसे।
परि सिनाने लेवे जैसे। चंद्रीं नाहीं॥ ५३॥

तैसीं सिनानीं चारी पदें। श्लोकश्लोकावच्छेदें।
अध्याय अध्याय भेदें। गमे कीर॥ ५४॥

परि प्रमेयाची उजरी। आनान रूप न धरी।
ना ना रत्नमणीं दोरी। एकचि जैसी॥ ५५॥

मोतियें मिळोनि बहुवें। एकावळीचा पाड आहे।
परी शोभे रूप होये। एकचि तेथ॥ ५६॥

फुलां फुलसरां लेख चढे। द्रुतीं दुजी अंगुळी न पडे।
श्लोक अध्याय तेणें पाडें। जाणावे हे॥ ५७॥

सात शतें श्लोक। अध्यायां अठरांचे लेख।
परी देव बोलिले एक। जें दुजें नाहीं॥ ५८॥

आणि म्यांही न सांडोनि ते सोये। ग्रंथव्यक्ती केली आहे।
प्रस्तुत तेणें निर्वाहें। निरूपण आइका॥ ५९॥

तरी सतरावा अध्याय। पावतां पुरता ठाव।
जे संपतां श्लोकीं देव। बोलिले ऐसें॥ ६०॥

अर्जुना ब्रह्मनामाच्या विखीं। बुद्धी सांडूनि आस्तिकीं।
कर्में किजती तितुकीं। असंतें होती॥ ६१॥

हा ऐकोनि देवाचा बोल। अर्जुना आला डोल।
म्हणे कर्मनिष्ठा मळ। ठेविला देखों॥ ६२॥

तो अज्ञानांध तंव बापुडा। ईश्वरचि न देखे एवढा।
तेथ नामचि एक तें पुढां। कां सुझे तया॥ ६३॥

आणि रज तमें दोन्हीं। गेलियावीण श्रद्धा सानी।
ते कां लागे अभिधानीं। ब्रह्माचिये॥ ६४॥

मग कोता खेंव देणें। वार्तेवरील धांवणें।
सांडीं पडे खेळवणें। नागिणीचें तें॥ ६५॥

तैसीं कर्में दुवाडें। तयां जन्मांतराची कडे।
दुर्मेळावे येवढे। कर्मामाजी॥ ६६

ना त्रिपायें हें उजू होये। तरी ज्ञानाची योग्यता लाहे।
येऱ्हवीं येणेंचि जाये। निरयालया॥ ६७॥

कर्मीं हा ठायवरी। आहाती बहुवा अवसरी।
आतां कर्मठां कें ये वारी। मोक्षाची हे॥ ६८॥

तरी फिटो कर्माचा पांग। कीजो अवघाचि त्याग।
आदरीजो अव्यंग। संन्यास हा॥ ६९॥

कर्म बाधेचिया कंहीं। जेथ भयाची गोठी नाहीं।
तें आत्मज्ञान जिहीं। स्वाधीन होय॥ ७०॥

ज्ञानाचे आवाहनमंत्र। जें ज्ञान पिकतें सुक्षेत्र।
ज्ञान आकर्षितें सूत्र। तंतु जे कां॥ ७१॥

ते दोनी संन्यास त्याग। अनुष्ठनी सुटे जग।
तरी हेचि आतां चांग। व्यक्त पुसों॥ ७२॥

ऐसें म्हणोनि पार्थें। त्याग संन्यासव्यवस्थे।
रूप होआवया येथें। प्रश्न केला॥ ७३॥

तेथ प्रत्युत्तरें बोली। श्रीकृष्णें जे चावळिली।
तया व्यक्ती जाली। अष्टादशा॥ ७४॥

एवं जन्यजनकभावें। अध्याय अध्यायातें प्रसवे।
आतां ऐका बरवें। पुसिलें जें॥ ७५॥

तरि पंडुकुमरें तेणें। देवाचे सरतें बोलणें।
जाणोनि अंतःकरणें। काणी घेतली॥ ७६॥

येऱ्हवीं तत्त्वाविषयीं भला। तो निश्चित असे कीर जाहला।
परि देवो राहे उगला। तें साहवेना॥ ७७॥

वत्स धलियाही वरी। धेनू न वचावी दुरी।
अनन्य प्रीतीची परी। ऐसी आहे॥ ७८॥

तेणें काजेवीणही बोलावें। तें दिखिलें तरि पाहावें।
भोगिता चाड दुणावे। पढियंतयाठायीं॥ ७९॥

ऐसी प्रेमाची हे जाती। आणि पार्थ तंव तेचि मूर्ती।
म्हणूनि करूं लाहे खंती। उगेपणाची॥ ८०॥

आणि संवादाचेनि मिषें। जे अव्यवहार वस्तु असे।
तेचि भोगिजे कीं जैसें। दर्पणी रूप॥ ८१॥

मग संवाद तोचि पारुखे। तरि भोगितां भोगणें थोके।
हें कां साहावेल सुखें। लांचावलेया॥ ८२॥

यालागीं त्याग संन्यास। पुसावयाचें घेऊनि मिस।
मग उपलविलें दुस। गीतेंचें तें॥ ८३॥

अठरावा अध्याय नोहे। हे एकाध्यायी गीताचि आहे।
जैं वत्सचि धेनू दुहे। तैं वेळ कायसी॥ ८४॥

तैसी संपतां अवसरीं। गीता आदरविली माघारी।
स्वामी भृत्याचा न करी। संवाद काई॥ ८५॥

अर्जुन उवाच।
संन्यासस्य महाबाहो तत्त्वमिच्छामि वेदितुम्।
त्यागस्य च हृषीकेश पृथक्केशिनिषूदन॥ १८.१॥

परी हें असो ऐसें। अर्जुनें पुसिजत असे।
म्हणे विनंती विश्वेशें। अविधारिजो॥ ८६॥

हां जी संन्यास आणि त्याग। इया दोहीं एके अर्थी लाग।
जैसा संघात संघ। संघातेंचि बोलिजे॥ ८७॥

तैसेंचि त्यागें आणि संन्यासें। त्यागचि बोलिजत असे।
आमचेनि तंव मानसें। जाणिजे हेंचि॥ ८८॥

ना कांहीं आथी अर्थभेद। तो देव करोतु विशद।
तेथ म्हणती श्रीमुकुंद। भिन्नचि पैं॥ ८९॥

तरि अर्जुना तुझ्या मनीं। त्याग संन्यास दोनी।
एकार्थ गमले हें मानीं। मीही साच॥ ९०॥

इंहीं दोहीं कीर शब्दीं। त्यागचि बोलिजे त्रिशुद्धी।
परि कारण एथ भेदी। येतुलेंचि॥ ९१॥

निपटुनी कर्म सांडिजे। तें सांडणें संन्यास म्हणिजे।
फळमात्र कां त्यजिजे। तो त्याग गा॥ ९२॥

तरी कोणा कर्माचें फळ। सांडिजे कोण कर्म केवळ।
हेंही सांगों विवळ। चित्त देई॥ ९३॥

तरि आपैसीं दांगें डोंगर। झाडाळी विती अपार।
तैसें लांबें राजागर। नुठिती ते॥ ९४॥

न पेरिता सैंघ तृणें। उठती तैसें साळीचे होणें।
नाही गा राबा उणें। जियापरी॥ ९५॥

कां अंग जाहालें सहजें। परि लेणें उद्यमें कीजे।
नदी आपैसे आपादिजे। विहिरी जेवीं॥ ९६॥

तैसें नित्यनैमित्तिक। कर्म होय स्वाभाविक।
परि न कामितां कामिक। न निफजे॥ ९७॥

श्रीभगवानुवाच।
काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः।
सर्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणाः॥ १८.२॥

कां कामनेचेचि दळवाडें। जें उभारावया घडे।
अश्वमेधादिक फुडे। याग जेथ॥ ९८॥

वापी कूप आराम। अग्रहारें हन महाग्राम।
आणीकही ना ना संभ्रम। व्रतांचे ते॥ ९९॥

ऐसें इष्टपूर्त सकळ। जया कामना एक मूळ।
जें केलें भोगवी फळ। बांधोनियां॥ १००॥

देहाचिया गांवा आलिया। जन्ममृत्यूचिया सोहळ्या।
ना म्हणों न ये धनंजया। जियापरी॥ १०१॥

कां ललाटींचें लिहिलें। न मोडे गा कांहीं केलें।
काळे गोरेपण धुतलें। फिटों नेणे॥ १०२॥

केलें काम्य कर्म तैसें। फळ भोगावया धरणें बैसे।
न फेडितां ऋण जैसें। वोसंडीना॥ १०३॥

कां कामनाही न करितां। अवसांत घडे पंडुसुता।
तरी वायकांड झुंझतां। लागे जैसें॥ १०४॥

गुळ नेणतां तोंडीं। घातला देचि गोडी।
आगी मानूनि राखोंडी। चेपिला पोळी॥ १०५॥

काम्यकर्मीं हें एक। सामर्थ्य आथी स्वाभाविक।
म्हणौनि नको कौतुक। मुमुक्षूं एथ॥ १०६॥

किंबहुना पार्था ऐसें। जें काम्य कर्म गा असे।
तें त्यजिजे विष जैसें। वोकूनियां॥ १०७॥

मग तया त्यागातें जगीं। संन्यास ऐसया भंगी।
बोलिजे अंतरंगीं। सर्वद्रष्टा॥ १०८॥

हें काम्य कर्म सांडणें। तें कामनेतेंचि उपडणें।
द्रवत्यागें दवडणें। भय जैसें॥ १०९॥

आणि सोमसूर्यग्रहणें। येऊनि करविती पार्वणें।
कां मातापितरमरणें। अंकित जे दिवस॥ ११०॥

अथवा अतिथी हन पावे। हें ऐसैसें पडे जें करावें।
तें तें कर्म जाणावें। नैमित्तिक गा॥ १११॥

वार्षिया क्षोभे गगन। वसंते दुणावे वन।
देह शृंगारी यौवन। दशा जैसी॥ ११२॥

कां सोमकांत सोमें पघळे। सूर्यें फांकती कमळें।
एथ असतेंच पाल्हाळे। आन न ये॥ ११३॥

तैसें नित्य जें कां कर्म। तें निमित्ताचे लाहे नियम।
एथ उंचावे तेणें नाम। नैमित्तिक होय॥ ११४॥

आणि सायंप्रातर्मध्याह्नीं। जें कां करणीय प्रतिदिनीं।
परि दृष्टि जैसी लोचनीं। अधिक नोहे॥ ११५॥

कां नापादितां गती। चरणीं जैसी आथी।
ना तरी ते दीप्ती। दीपबिंबीं॥ ११६॥

वास नेदितां जैसें। चंदनीं सौरम्य असे।
अधिकाराचें तैसें। रूपचि जे॥ ११७॥

नित्य कर्म ऐसें जनीं। पार्था बोलिजे तें मानीं।
एवं नित्य नैमित्तिक दोन्हीं। दाविलीं तुज॥ ११८॥

हेंचि नित्य नैमित्तिक। अनुष्ठेय आवश्यक।
म्हणौनि म्हणों पाहती एक। वांझ ययातें॥ ११९॥

परि भोजनीं जैसें होये। तृप्ती लाभे भूक जाये।
तैसें नित्य नैमित्तिकीं आहे। सर्वांगी फळ॥ १२०॥

कीड आगिठां पडे। तरि मळ तुटे वानी चढे।
यया कर्मा तया सांगडें। फळ जाणावें॥ १२१॥

जे प्रत्यवाय तंव गिळे। स्वाधिकार बहुवें उजळे।
ते हातोफळिया मिळे। सद्गतीसी॥ १२२॥

येवढेवरी ढिसाळ। नित्यनैमित्तिकीं आहे फळ।
परि तें त्यजिजे मूळ। नक्षत्रीं जैसें॥ १२३॥

लता पिके आघवी। तंव चूत बांधे पालवी।
मग हात न लावित माधवीं। सोडूनि घाली॥ १२४॥

तैसी नोलांडितां कर्मरेखा। चित्त दीजे नित्यनैमित्तिका।
पाठी फळा कीजे अशेखा। वांतीचियेवानी॥ १२५॥

यया कर्मफळ त्यागातें। त्याग म्हणती पैं जाणते।
एवं त्याग संन्यास तूतें। परिसविले॥ १२६॥

हा संन्यास जैं संभवे। तैं काम्य बांधूं न पवे।
निषिद्ध तंव स्वभावें। निषिद्धें गेलें॥ १२७॥

आणि नित्यादिक जें असे। तें येणें फळत्यागें नासे।
शिर लोटलिया जैसें। येर आंग॥ १२८॥

मग सस्य फळपाकांत। तैसें निमालिया कर्मजात।
आत्मज्ञान गिंवसित। अपैसे ये॥ १२९॥

ऐसिया निगुती दोनी। त्याग संन्यास अनुष्ठानीं।
पडले गा आत्मज्ञानीं। बांधती पाट॥ १३०॥

ना तरी हे निगुती चुके। मग त्याग कीजे हाततुकें।
तें कांहीं न त्यजे अधिकें। गोवींचि पडे॥ १३१॥

जें औषध व्याधी अनोळख। तें घेतलिया परते विख।
कां अन्न न मानितां भूक। न मारी काय॥ १३२॥

म्हणौनि त्याज्य जें नोहे। तेथ त्यागातें न सुवावें।
त्याज्यालागीं नोहावें। लोभपर॥ १३३॥

चुकलिया त्यागाचें वेंझें। केला सर्वत्यागही होय वोझें।
निषिद्धें त्या सर्वत्र जुंझे। वीतराग ते॥ १३४॥

त्याज्यं दोषवदित्येके कर्म प्राहुर्मनीषिणः।
यज्ञदानतपःकर्म न त्याज्यमिति चापरे॥ १८.३॥

एकां फळत्याग न ठाके। ते कर्मातें म्हणती बंधकें।
जैसें आपण नग्न भांडकें। जगातें म्हणे॥ १३५॥

कां जिव्हालंपट रोगिया। अन्नें दूषीं धनंजया।
आंगा न रुसे कोढिया। मासियां कोपे॥ १३६॥

तैसें फळकाम दुर्बळ। म्हणती कर्मचि किडाळ।
मग निर्णय देती केवळ। त्यजावें ऐसा॥ १३७॥

एक म्हणती यागादिक। करावेंचि आवश्यक।
जे यावांचूनि शोधक। आन नसे॥ १३८॥

मनशुद्धीच्या मार्गीं। जैं विजयी व्हावें वेगीं।
तैं कर्म सबळालागीं। आळस न कीजे॥ १३९॥

भांगार आथि शोधावें। तरी आगी जेविं नुबगावें।
कां दर्पणालागीं सांचावें। अधिक रज॥ १४०॥

ना ना वस्त्रें चोख होआवीं। ऐसें आथी जरी जीवीं।
तरी संवदणी न मानावी। मलिन जैसी॥ १४१॥

तैसी कर्मै क्लेशकारें। म्हणौनि न न्यावीं अव्हेरें।
कां अन्नलाभें अरुवारें। रांधितिये उणें॥ १४२॥

इंहीं इंहीं गा शब्दीं। एक कर्मी बांधती बुद्धी।
ऐसा त्याग विसंवादीं। पडोनि ठेला॥ १४३॥

तरि विसंवाद तो फिटे। त्यागाचा निश्चय भेटे।
तैसें बोलों गोमटें। अवधान देईं॥ १४४॥

निश्चयं शृणु मे तत्र त्यागे भरतसत्तम।
त्यागो हि पुरुषव्याघ्र त्रिविधः सम्प्रकीर्तितः॥ १८.४॥

तरि त्याग एथें पांडवा। त्रिविध पैं जाणावा।
तया त्रिविधाही बरवा। विभाग करूं॥ १४५॥

त्यागाचे तिन्ही प्रकार। कीजती जरी गोचर।
तरी तूं इत्यर्थाचें सार। इतुलें जाण॥ १४६॥

मज सर्वज्ञाचिये बुद्धी। जें अलोट माने त्रिशुद्धी।
निश्चयतत्त्व तें आधीं। अवधारीं पां॥ १४७॥

तरि आपुलिये सोडवणे। जो मुमुक्षू जागों म्हणे।
तया सर्वस्वें करणें। हेंचि एक॥ १४८॥

यज्ञदानतपः कर्म न त्याज्यं कार्यमेव तत्।
यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम्॥ १८.५॥

जियें यज्ञदानतपादिकें। इयें कर्मै आवश्यकें।
तियें न सांडावीं पांथिकें। पाउलें जैंसीं॥ १४९॥

हरपलें न देखिजे। तंव तयाचा मागु न सांडिजे।
कां तृप्त न होतां लोटिजे। भाणें जेवीं॥ १५०॥

नाव थडी न पवतां। न सांडिजे केळी न फळतां।
कां ठेविलें न दिसतां। दीप जैसा॥ १५१॥

तैसी आत्मज्ञानाविखीं। जंव निश्चिती नाहीं निकी।
तंव नोहावें यागादिकीं। उदासीन॥ १५२॥

तरि स्वाधिकारानुरुपें। तियें यज्ञ दाने तपें।
अनुष्ठावींचि साक्षेपें। अधिकेंवर॥ १५३॥

जें चालणें वेगावत जाये। तो वेग बैसावयाचि होये।
तैसा कर्मातिशय आहे। नैष्कर्म्यालागीं॥ १५४॥

अधिकें जंव जंव औषधी। सेवायाची मांडी बांधी।
तंव तंव मुकिजे व्याधी। तयाचिये॥ १५५॥

तैसीं कर्मै हातोपातीं। जैं कीजती यथा निगुती।
तैं रजतमें झडती। झाडा देउनी॥ १५६॥

कां पाटोवाटीं पुटें। भांगारा खार देणें घटे।
तैं कीड झडकरी तुटे। निर्व्याज होय॥ १५७॥

तैसें निष्ठा केलें कर्म। तें सांडीं करूनि रजतम।
सत्वशुद्धीचें धाम। डोळां दावी॥ १५८॥

म्हणौनिया धनंजया। सत्वशुद्धी गिंवसतया।
तीर्थांचिया सावाया। आलीं कर्मै॥ १५९॥

तीर्थै बाह्यमळ क्षाळे। कर्मै अभ्यंतर उजळे।
एवं तीर्थै जाण निर्मळें। सत्कर्मेंचि॥ १६०॥

तृषार्ता मरुदेशीं। झळे अमृतें वोळलीं जैसी।
कीं अंधालागीं डोळ्यासीं। सूर्य आला॥ १६१॥

बुडतया नदीच धांविन्नली। पडतया पृथ्वीच कळवळिली।
निमतया मृत्यूनें दिधली। आयुष्यवृद्धी॥ १६२॥

कर्मै कर्मबद्धता। मुमुक्षु सोडविले पंडुसुता।
जैसा रसरीति मरतां। राखिला विषें॥ १६३॥

तैसीं एके हातवटिया। कर्मै कीजती धनंजया।
बंधकेंचि सोडवावया। मुख्यें होती॥ १६४॥

आतां तेचि हातवटी। तुज सांगो गोमटी।
जया कर्मातें किरीटी। कर्मचि रुसे॥ १६५॥

एतान्यपि तु कर्माणि सङ्गं त्यक्त्वा फलानि च।
कर्तव्यानीति मे पार्थ निश्चितं मतमुत्तमम्॥ १८.६॥

तरि महायागप्रमुखें। कर्में निफजतांही अचुकें।
कर्तेपणाचें न ठाके। फुंजणें आंगीं॥ १६६॥

जो मोलें तीर्था जाये। तया मी यात्रा करीत आहें।
ऐसिये श्लाघ्यतेचा नोहे। तोष जेवीं॥ १६७॥

कां मुद्रा समर्थाचिया। जो एकवटु झोंबे राया।
तो मी जिणता ऐसिया न येचि गर्वा॥ १६८॥

जो कांसे लागोनि तरे। तया पोंहती ऊर्मी नुरे।
पुरोहित नाविष्करे। दातेपणें॥ १६९॥

तैसें कर्तुत्व अहंकारें। नेघोनि यथा अवसरें।
कृत्यजातांचे मोहरें। सारीजती॥ १७०॥

केल्या कर्मा पांडवा। जो आथी फळाचा यावा।
तया मोहरा हों नेदावा। मनोरथ॥ १७१॥

आधींचि फळीं आस तुटलिया। कर्में आरम्भावीं धनंजया।
परावें बाळ धाया। पाहिजे तैसें॥ १७२॥

पिंपरुवांचिया आशा। न शिंपिजे पिंपळ जैसा।
तैसिया फळ निराशा। कीजती कर्में॥ १७३॥

सांडूनि दुधाची टकळी। गोंवारी गांवधेनु वेंटाळी।
किंबहुना कर्मफळीं। तैसें कीजे॥ १७४॥

ऐसी हे हातवटी। घेऊनि जे क्रिया उठी।
आपणा आपुलिया गांठी। लाहेचि तो॥ १७५॥

म्हणोनि फळी लाग। सांडोनि देहसंग।
कर्में करावीं हा चांग। निरोप माझा॥ १७६॥

जो जीवबंधें शीणला। सुटके जाचे आपलां।
तेणें पुढतपुढतीं या बोला। आन न कीजे॥ १७७॥

नियतस्य तु संन्यासः कर्मणो नोपद्यते।
मोहात्तस्य परित्यागः तामसः परिकीर्तितः॥ १८.७॥

ना तरी अंधाराचेनि रोखें। जैसीं डोळां रोविजती नखें।
तैसा कर्मद्वेषें अशेखें। कर्मेचि सांडी॥ १७८॥

तयाचें कर्म सांडणें। तें तामस मी म्हणें।
शिसाराचे रागें लावणें। शिसचि जैसें॥ १७९॥

हां गा मार्ग दुवाड होये। तरी निस्तारितील पाये।
कीं तेचि खांडणें आहे। मार्गापराधें॥ १८०॥

भुकेलियापुढें अन्न। हो कां भलतैसें ऊन्ह।
तरी बुद्धी न घेतां लंघन। भाणे पापरा हाल्या॥ १८१॥

तैसा कर्माचा बाध कर्में। निस्तरिजे करितेनि वर्में।
हें तामस नेणे भ्रमें। माजविला॥ १८२॥

कीं स्वभावें आलें विभागा। तें कर्मचि वोसंडी पैं गा।
तरि झणें आतळा त्यागा। तामसा तया॥ १८३॥

दुःखमित्येव यत्कर्म कायक्लेशभयात्त्यजेत्
स कृत्वा राजसं त्यागं नैव त्यागफलं लभेत्॥ १८.८॥

अथवा स्वाधिकार बुझे। आपलें विहितही सुझे।
परि करितया उबजे। निबरपणा॥ १८४॥

जे कर्माची ऐलीकड। नावेक दिसे दुवाड।
जे वाहतिये वेळ जड। शिदोरी जैसी॥ १८५॥

जैसा निंब जिभे कडवट। हिरडा पहिलें तुरट।
तैसा कर्मा ऐल सेवट। खणुवाळा होय॥ १८६॥

कां धेनू दुवाड शिंग। शेंवतीये अडव आंग।
भोजनसुख महाग। पाक करितां॥ १८७॥

तैसें पुढतपुढती कर्म। आरंभीच अति विषम।
म्हणौनि तोतें श्रम। करितां मानी॥ १८८॥

येऱ्हवीं विहितत्वें मांडी। परि घालितां असुरवाडीं।
तेथ पोळला ऐसा सांडी। आदरिलेंही॥ १८९॥

म्हणे वस्तु देहासारिखी। आली बहुतीं भाग्यविशेखीं।
मा जाचूं कां कर्मादिकीं। पापिया जैसा॥ १९०॥

केले कर्मी जें द्यावें। तें झणें मज होआवें।
आजि भोगुं ना बरवे। हातिंचे भोग॥ १९१॥

ऐसा शरीराचिया क्लेशा। भेणें कर्मे वीरेशा।
सांडी तो परियेसा। राजस त्याग॥ १९२॥

येऱ्हवीं तेथही कर्म सांडे। परि तया त्यागफळ न जोडे।
जैसें उतलें आगीं पडे। तें नलगेचि होमा॥ १९३॥

कां बुडोनि प्राण गेले। ते अर्धोदकीं निमाले।
हें म्हणों नये जाहलें। दुर्मरणचि॥ १९४॥

तैसें देहाचेचि लोभें। जेणें कर्मा पाणी सुभे।
तेणें साच न लभे। त्यागाचें फळ॥ १९५॥

किंबहुना आपुलें। जैं ज्ञान होय उदया आलें।
तैं नक्षत्रांतें पाहिलें। गिळी जैसें॥ १९६॥

तैशा सकारण क्रिया। हारपती धनंजया।
तो कर्मत्याग ये जया। मोक्षफळासी॥ १९७॥

तें मोक्षफळ अज्ञाना। त्यागिया नाहीं अर्जुना।
म्हणौनि तो त्याग न माना। राजसु तो॥ १९८॥

तरि कोणे पां एथ त्यागें। तें मोक्षफळ घर रिघे।
हेंही आइक प्रसंगें। बोलिजेल॥ १९९॥

कार्यमित्येव यत्कर्म नियतं क्रियतेऽर्जुन।
सङ्गं त्यक्त्वा फलं चैव स त्यागः सात्त्विको मतः॥ १८.९॥

तरि स्वाधिकाराचेनि नांवें। जें वांटिया आलें स्वभावें।
तें आचरे विधिगौरवें। शृंगारोनि॥ २००॥

परि हें मी करित असें। ऐसा आठव त्यजी मानसें।
तैसेंचि पाणी दे आशे। फळाचिये॥ २०१॥

पैं अवज्ञा आणि कामना। मातेच्या ठायीं अर्जुना।
केलिया दोनी पतना। कारण होती॥ २०२॥

तरि दोनी यें त्यजावी। मग माताचि ते भजावी।
वांचूनि मुखालागीं वाळावी। गायचि सगळी॥ २०३॥

आवडतियेही फळीं। असारें साली आंठोळी।
त्यासाठी अवगळी। फळातें कोण्ही॥ २०४॥

तैसा कर्तृत्वाचा मद। आणि कर्मफळाचा आस्वाद।
या दोहींचें नांव बंध। कर्माचा कीं॥ २०५॥

तरि या दोहींच्या विखीं। जैसा बाप नातळे लेंकीं।
तैसा हों न शके दुःखी। विहिता क्रिया॥ २०६॥

हा जो त्याग तरुवर। जो गा मोक्षफळें यें थोर।
सात्विक ऐसा डगर। यासींच जगीं॥ २०७॥

आतां जाळूनि बीज जैसें। झाडा कीजे निर्वंशें।
फळ त्यागूनि कर्म तैसें। त्यजिलें जेणें॥ २०८॥

तया लागत खेंवो परिसीं। धातूचि गंधिकाळिमा जैसी।
जाती रजतमें तैसीं। तुटलीं दोन्ही॥ २०९॥

मग सत्वें चोखाळें। उघडती आत्मबोधाचे डोळे।
तेथ मृगांबु सांजवेळे। होय जैसें॥ २१०॥

तैसा बुद्ध्यादिकांपुढां। असतचि विश्वाभास येवढा।
तो न देखे कवणीकडां। आकाश जैसें॥ २११॥

न द्वेष्ट्यकुशलं कर्म कुशले नानुषज्जते।
त्यागी सत्वसमाविष्टो मेधावी छिन्नसंशयः॥ १८.१०॥

आणि प्राचीनाचेनि बळें। आलीं कृत्यें कुशलाकुशलें।
तियें व्योमा आंगीं आभाळें। विराली जैसीं॥ २१२॥

तैसी तयाचिये दिठी। कर्में चोखाळलीं किरीटी।
म्हणोनि सुखदुःखीं उठी। पडेना तो॥ २१३॥

तेणें शुभकर्म जाणावें। मग तें हर्षें करावें।
कां अशुभालागीं व्हावें। द्वेषिया ना॥ २१४॥

तरि इया विषयींचा कांहीं। तया एकही संदेह नाहीं।
जैसा स्वप्नाच्या ठायीं। जागन्निलिया॥ २१५॥

म्हणऊनि कर्म आणि कर्ता। या द्वैतभावाची वार्ता।
नेणे तो पंडुसुता। सात्विक त्याग॥ २१६॥

ऐसेनि कर्में पार्था। त्यजिलीं त्यजिती सर्वथा।
अधिकें बांधती अन्यथा। सांडिलीं तरी॥ २१७॥

न हि देहभृता शक्यं त्यक्तुं कर्माण्यशेषतः।
यस्तु कर्मफलत्यागी स त्यागीत्यभिधीयते॥ १८.११॥

आणि हां गा सव्यसाची। मूर्ति लाहोनि देहाची।
खांती करिती कर्माची। ते गांवढे गा॥ २१८॥

मृत्तिकेचा वीट। घेऊनि काय करील घट।
केउतें तंतू पट। सांडील तो॥ २१९॥

तेवीचि वह्नित्व आंगीं। आणि उबे उबगणें आगी।
कीं तो दीप प्रभेलागीं। द्वेष करील काई॥ २२० ॥

हिंग त्रासला घाणी। तरी कैंचें सुगंधत्व आणी।
द्रव्य सांडूनि पाणी। कें राहे तें॥ २२१॥

तैसा शरीराचेनि आभासें। नांदत जंव असे।
तंव कर्मत्यागाचें पिसें। काइसें तरी॥ २२२॥

आपण लाविजे टिळा। म्हणोनि पुसों ये अवलीळा।
मा घाली फेडी निडळा। कां करूं ये गा॥ २२३॥

तैसें विहित स्वयें आदरिलें। म्हणोनि त्यजूं ये त्यजिलें।
परि कर्मचि देह आतलें। तें कां सांडील गा॥ २२४॥

जें स्वासोच्छ्वासवरी। होत निजेलियाही वरी।
कांहीं न करणेंचि परी। होती जयाची॥ २२५॥

या शरीराचेनि मिसकें। कर्मही लागलें असिकें।
जिता मेलया न ठाके। इया रीती॥ २२६॥

यया कर्मातें सांडिती परी। एकीचि ते अवधारीं।
जे करितां न जाइजे हारी। फळाशेचिये॥ २२७॥

कर्मफळ ईश्वरीं अर्पे। तत्प्रसादें बोध उद्दीपे।
तेथ रज्जुज्ञानें लोपे। व्याळशंका॥ २२८॥

तेणें आत्मबोधें तैसें। अविद्येसीं कर्म नाशे।
पार्था त्यजिजे जैं ऐसें। तैं त्यजिलें होय॥ २२९॥

म्हणोनि इयापरी जगीं। कर्मैं त्यजी तो महात्यागी।
येर मूर्च्छने नांव रोगी। विश्रांति जैसी॥ २३०॥

तैसा कर्मी शिणे एकीं। तो विसावो पाहे आणिकीं।
दांडेयाचे घाय बुकी। धाडणें जैसें॥ २३१॥

परि हें असो पुढती। तोचि त्यागी त्रिजगतीं।
जेणें फलत्यागें निष्कृती। नेलें कर्म॥ २३२॥

अनिष्टमिष्टं मिश्रं च त्रिविधं कर्मणः फलम्
भवत्यत्यागिनां प्रेत्य न तु संन्यासिनां क्वचित्॥ १८.१२॥

येऱ्हवीं तरी धनंजया। त्रिविधा कर्मफळा गा यया।
समर्थ ते कीं भोगावया। जे न सांडितीचि आशा॥ २३३॥

आपणचि विऊनि दुहिता। कीं न मम म्हणे पिता।
तो सुटे कीं प्रतिग्रहीता। जांवाई शिरके॥ २३४॥

विषाचे आगरही वाहती। ते विकितां सुटले जिती।
येर निमाले जे घेती। वेंचोनि मोलें॥ २३५॥

तैसें कर्ता कर्म करू। अकर्ता फळाशा न धरू।
एथ न शके आवरूं। दोहींतें कर्म॥ २३६॥

वाटे पिकलिया वृक्षाचें। फळ अपेक्षी तयाचें।
तेविं साधारण कर्माचें। फळ घेतया॥ २३७॥

परि करूनि फळ नेघे। तो जगाच्या कामीं न रिघे।
जे त्रिविध जग आघवें। कर्मकमळ हें॥ २३८॥

देव मनुष्य स्थावर। यया नांव जगडंबर।
आणि हे तंव तीन्ही प्रकार। कर्मफळाचे॥ २३९॥

तेंचि एक गा अनिष्ट। एक तें केवळ इष्ट।
आणि एक इष्टानिष्ट। त्रिविध ऐसें॥ २४०॥

परि विषयमता बुद्धी। आंगीं सूनि अवधी।
प्रवर्तती जे निषिद्धीं। कुव्यापारीं॥ २४१॥

तेथ कृमि कीट लोष्ट। हें देह लाहती निकृष्ट।
तया नाम तें अनिष्ट। कर्मफळ॥ २४२॥

कां स्वधर्मा मान देतां। स्वाधिकार पुढां सूतां।
सुकृत कीजे पुसतां। आम्नायातें॥ २४३॥

तैं इंद्रादिक देवांचीं। देहें लाहिजती सव्यसाची।
तया कर्मफळा इष्टाची। प्रसिद्धी गा॥ २४४ ॥

आणि गोड आंबट मिळे। तेथ रसांतर फरसाळें।
उठी दोहीं वेगळें। दोहीं जिणतें॥ २४५ ॥

रेचकचि योगवशें। होय स्तंभावयादोषें।
सत्यासत्य समरसें। सत्यासत्यचि जिणिजे॥ २४६ ॥

म्हणोनि समभागें शुभाशुभें। मिळोनि अनुष्ठानाचें उभें।
तेणें मनुष्यत्व लाभे। तें मिश्र फळ॥ २४७ ॥

ऐसें त्रिविध यया भागीं। कर्मफळ मांडलेंसे जगीं।
हें न सांडी तयां भोगीं। जे सूदले आशा॥ २४८ ॥

जेथ जिव्हेचा हात फांटे। तंव जेवितां वाटे गोमटे।
मग परिणामीं शेवटें। अवश्य मरण॥ २४९ ॥

संवचोर मैत्री चांग। जंव न पविजे तें दांग।
सामान्या भली आंग। न शिवे तंव॥ २५० ॥

तैसीं कर्मे करितां शरीरीं। लाहती महत्त्वाची फरारी।
पाठीं निधनीं एकसरी। पावती फळें॥ २५१ ॥

जैसा समर्थ आणि ऋणिया। मागो आला बाइणिया।
न लोटे तैसा प्राणिया। पडे तो भोग॥ २५२ ॥

मग कणिसौनि कण झडे। तो विरूढला कणिसा चढे।
पुढती भूमीं पडे। पुढती उठी॥ २५३ ॥

तैसें भोगीं जें फळ होय। तें फळांतरें वीत जाय।
चालतां पायें पाय। जिणिजे जैसा॥ २५४ ॥

उताराचिये सांगडी। ठाके ते ऐलीच थडी।
तेविं न मूकीजती वोढी। भोग्याचिये॥ २५५ ॥

पैं साध्य साधन प्रकारें। फळभोग तो पसरे।
एवं गोंविले संसारें। अत्यागी ते॥ २५६ ॥

येऱ्हवीं जातिपुष्पांचें विकसणें। त्याचि नाम जैसें सुकणें।
तैसें कर्ममिषें न करणें। केलें जिहीं॥ २५७ ॥

बीजचि वरोसि वेंचे। तेथ वाढती कुळवाडी खांचे।
तेविं फळत्यागें कर्माचें। सारिलें काम॥ २५८ ॥

ते सत्वशुद्धी साहाकारें। गुरुकृपामृत तुषारें।
सासिन्नलेनि वोसरे। द्वैतदैन्य॥ २५९ ॥

तेव्हां जगदाभासमिषें। स्फुरे तें त्रिविध फळ नाशे।
एथ भोक्ता भोग्य आपैसें। निमालें हें॥ २६० ॥

घडे ज्ञानप्रधान ऐसा। संन्यास जया वीरेशा।
तेचि फळभोग सोसा। मुकले गा॥ २६१ ॥

आणि येणें कीर संन्यासें। जैं आत्मरूपीं दिठी पैसे।
तैं कर्म एक ऐसें। देखणें आहे॥ २६२ ॥

पडोनि गेलिया भिंती। चित्रांची केवळ होय माती।
कां पाहालेया राती। आंधारें उरे॥ २६३ ॥

जैं रूपचि नाहीं उभें। तैं छाया काह्याची शोभे।
दर्पणेंवीण बिंबे। वदन कें पां॥ २६४ ॥

फिटलिया निद्रेचा ठाव। कैंचा स्वप्नासि प्रस्ताव।
मग सत्य कीं तें वाव। कोण म्हणे॥ २६५ ॥

तैसे गा संन्यासें येणें। तंव अविद्येसीची नाहीं जिणें।
मा तियेचें कार्य कोणें। घेपे दीपे॥ २६६ ॥

म्हणोनि संन्यासियें पाहीं। कर्माची गोठी कीजेल काई।
परि अविद्या आपुल्या देहीं। आहे जैं कां॥ २६७ ॥

कर्तेपणाचेनि थावें। आत्मा शुभाशुभीं धांवे।
दृष्टि भेदाचिये राणिवे। रचलीसे जैं॥ २६८ ॥

तैं तरी गे सुवर्मा। बीजावळी आत्मया कर्मा।
अपाडें जैसी पश्चिमा। पूर्वेसि कां॥ २६९ ॥

ना तरी आकाशा कां आभाळा। सूर्या आणि मृगजळा।
बीजावळी भूतळा। वायूसि जैसी॥ २७० ॥

पांघरोनि नईचें उदक। असे नईमाजि खडक।
परि जाणिजे कां वेगळिक। कोडीची ते॥ २७१ ॥

हो कां उदका जवळी। परि सिनीचि ते बाबुळी।
काय संगास्तव काजळी। दीप म्हणों ये॥ २७२॥

जरी चंद्रीं जाला कलंक। तरी चंद्रेंसीं नव्हे एक।
आहे दृष्टी डोळ्यां विवेक। अपाड जेतुला॥ २७३॥

ना ना वाटा वाटे जातया। वोघा वोघी वाहतया।
आरसा आरसां पाहतया। अपाड जेतुला॥ २७४॥

पार्था गा तेतुलेनि मानें। आत्मेनिसीं कर्म सिनें।
परि घेवविजे अज्ञानें। तें कीर ऐसें॥ २७५॥

विकासे रवीतें उपजवी। द्रुती अलीकरवीं भोगवी।
ते सरोवरीं कां बरवी। अब्जिणी जैसी॥ २७६॥

पुढतपुढती आत्मक्रिया। अन्यकारणकाचि तैशिया।
करूं पांचांही तयां। कारणां रूप॥ २७७॥

पञ्चैतानि महाबाहो कारणानि निबोध मे।
सांख्ये कृतान्ते प्रोक्तानि सिद्धये सर्वकर्मणाम्॥ १८.१३॥

आणि पांचही कारणें तियें। तूंही जाणशील विपायें।
जे शास्त्रें उभऊनि बाहे। बोलती जयांतें॥ २७८॥

वेदरायाचिया राजधानीं। सांख्यवेदांतांच्या भुवनीं।
निरूपणाच्या निशाणध्वनीं। गर्जती जियें॥ २७९॥

जे सर्व कर्म सिद्धीलागीं। इयेंचि मुदलें हो जगीं।
तेथ न सुवावा अभंगीं। आत्मराज॥ २८०॥

इया बोलाचे डांगुरटी। तियें प्रसिद्धी आलीं किरीटी।
म्हणोनि तुझ्या हन कर्णपुटीं। वसोत कां जे॥ २८१॥

आणि मुखांतरीं आइकिजे। तैसें कायसें हें ओझें।
मी चिद्रत्न तुझें। असतां हातीं॥ २८२॥

दर्पण पुढां मांडलेया। कां लोकांचिया डोळ्यां।
मान द्याया पहावया। आपुलें निकें॥ २८३॥

भक्त जैसेनि जेथ पाहे। तेथ तें तेंचि होत जाये।
तो मी तुझें जाहालों आहें। खेळणें आजी॥ २८४॥

ऐसें हें प्रीतीचेनि वेगें। देव बोलतां से नेघे।
तंव आनंदामाजी आंगें। विरत पार्थ॥ २८५॥

चांदिणियाचा पडिभर। होतां सोमकांताचा डोंगर।
विघरोनि सरोवर। हों पाहे जैसा॥ २८६॥

तैसें सुख आणि अनुभूती। या भावांची मोडूनि भिंती।
आतलें अर्जुनाकृती। सुखचि जेथ॥ २८७॥

तेथ समर्थ म्हणौनि देवा। अवकाश जाहाला आठवा।
मग बुडतयाचा धांवा। जीवें केला॥ २८८॥

अर्जुना येसणें धेंडें। प्रज्ञा पसरेंसीं बुडे।
आलें भरतें एवढें। तें सांवरूनि॥ २८९॥

देव म्हणे हां गा पार्था। तूं आपणपें देख सर्वथा।
तंव सांवरूनि येरें माथा। तुकियेला॥ २९०॥

म्हणे जाणसी दातारा। मी तुजसीं व्यक्तिशेजारा।
उबगला आदीं एकाहारा। येवों पाहें॥ २९१॥

तयाही हा ऐसा। लोभें देतसां जरी लालसा।
तरी कां जी घालीतसां। आड आड जीवा॥ २९२॥

तेथ श्रीकृष्ण म्हणती निकें। अद्यापि नाहीं मा ठाउकें।
वेड्या चंद्रा आणि चंद्रिकें। न मिळणें आहे॥ २९३॥

आणि हाही बोलोनि भावो। तुज दाऊं आम्ही भिवों।
जे रुसतां बांधे थावो। तें प्रेम गा हें॥ २९४॥

एथ एकमेकांचिये खुणे। विसंवाद तंव जिणें।
म्हणौनि असो हें बोलणें। इयेविषयींचें॥ २९५॥

मग कसकसें तें आतां। बोलत होतो पंडुसुता।
सर्व कर्मां भिन्नता। आत्मेनिसीं॥ २९६॥

तंव अर्जुन म्हणे देवें। माझिये मनींचेंचि स्वभावें।
प्रस्ताविलें बरवें। प्रमेय तें जी॥ २९७॥

जें सकळ कर्मांचें बीज। कारणपंचक तुज।
सांगेन ऐसी पैज। घेतली कां॥ २९८॥

आणि आत्मया एथ कांहीं। सर्वथा लाग नाहीं।
हें पुढारलासि तें देई। लाहाणे माझें॥ २९९॥

यया बोला विश्वेशें। म्हणितलें तोषें बहुवसें।
इयेविषयीं धरणें बैसे। ऐसें कें जोडे॥ ३००॥

तरी अर्जुना निरूपिजेल। तें कीर भाषे आंतुल।
परि मेचु ये होइजेल। ऋणिया तुज॥ ३०१॥

तंव अर्जुन म्हणे देवो। काई विसरले मागील भावो।
इये गोठी कीं राखत आहों। मीतूंपण जी॥ ३०२॥

एथ श्रीकृष्ण म्हणती हो कां। आतां अवधानाचा पसर निका।
करूनियां आइका। पुढारलों तें॥ ३०३॥

तरि सत्यचि गा धनुर्धरा। सर्व कर्मांचा उभारा।
होतसे बाहिरबाहिरा। करणें पांचें॥ ३०४॥

आणि पंचकारण दळवाडें। जिहीं कर्माकार मांडे।
तें हेतु तंव उघडे। पांच आथी॥ ३०५॥

येथ आत्मतत्व उदासीन। तें ना हेतु ना उपादान।
ना तें अंग करी संवाहन। कर्मसिद्धीचें॥ ३०६॥

तेथ शुभाशुभीं अंशीं। निफजती कर्में ऐसीं।
राती देवो आकाशीं। जियापरी॥ ३०७॥

तोय तेज धूम। ययां वायूसी संगम।
जालिया होय अभ्रागम। व्योम तें नेणे॥ ३०८॥

ना ना काष्ठीं नाव मिळे। ते नावाडेनि चळे।
चालविजे अनिळें। उदक तें साक्षी॥ ३०९॥

कां कवणें एकें पिंडें। वेंचितां अवतरे भांडें।
मग भंवडिजे दंडें। भ्रमे चक्र॥ ३१०॥

आणि कर्तृत्व कुलालाचें। तेथ काय तें पृथ्वीयेचें।
आधारावांचूनि वेंचे। विचारीं पां॥ ३११॥

हेंही असो लोकांचिया। राहाटी होतां आघविया।
कोण काम सवितया। आंगा आलें॥ ३१२॥

तैसें पांचहेतुमिळणीं। पांचेचि इंहीं कारणीं।
कीजे कर्मलतांची लावणी। आत्मा सिना॥ ३१३॥

आतां येचि वेगळालीं। पांचही विवंचूं गा भलीं।
तुकोनि घेतलीं। मोतिये जैसीं॥ ३१४॥

अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम्।
विविधा च पृथक् चेष्टा दैवं चैवात्र पञ्चमम्॥ १८.१४॥

तैसीं यथालक्षणें। आइकें पांच कारणें।
तरि देह हें मी म्हणें। पहिलें एथ॥ ३१५॥

ययातें अधिष्ठान ऐसें। म्हणिजे तें याचि दोषें।
जे स्वभाग्येंसीं वसे। भोक्ता येथ॥ ३१६॥

इंद्रियांच्या दाहे हातीं। जाचोनि देवोराती।
सुखदुःखें प्रकृती। जोडीजती जियें। ३१७॥

तियें भोगावया पुरुखा। आन ठावोचि नाहीं देखा।
म्हणौनि अधिष्ठानभाखा। बोलिजे देह॥ ३१८॥

हें चोविसांही तत्वांचें। कुटुंबघर वस्तीचें।
तुटे बंध मोक्षांचें। गुंथाडें एथ॥ ३१९॥

किंबहुना अवस्था त्रया। हें अधिष्ठान धनंजया।
म्हणोनि देहा यया। हेंचि नाम॥ ३२०॥

आणि कर्ता हें दुजें। कर्माचें कारण जाणिजे।
प्रतिबिंब म्हणिजे। चैतन्याचें जें॥ ३२१॥

आकाशचि वर्षे नीर। तें तळवटीं बांधे नाडर।
मग बिंबोनि तदाकार। होय जेवीं॥ ३२२॥

कां निद्राभरें बहुवें। राया रायपण ठाउवें नव्हे।
मग स्वप्नींचिये सामावे। रंकपणीं॥ ३२३॥

तैसें आपुलेनि विसरें। चैतन्यचि देहाकारें।
आभासोनि आविष्करे। देहपणें जें॥३२४॥

जया विचाराच्या देशीं। प्रसिद्धि गा जीव ऐसी।
जेणें भाष केली देहेंसीं। आघवांविषयीं॥ ३२५॥

प्रकृती करी कर्में। तो म्यां केली म्हणे भ्रमें।
येथ कर्ता येणे नामें। बोलिजे जीव॥ ३२६॥

मग पातेयांच्या केशीं। एकीच उठती दिठी जैसी।
मोकळीच वरी ऐसी। चिरीव गमे॥ ३२७॥

कां घरा आंतुल एक। दीपाचा अवलोक।
गवाक्षभेदें अनेक। आवडे जेवीं॥ ३२८॥

कां एकचि पुरुष जैसा। अनुसरत नवां रसां।
नवविध ऐसा। आवडो लागे॥ ३२९॥

तेविं बुद्धीचें एक जाणणे। श्रोतादिभेदें येणें।
बाहेरी इंद्रियपणें। फांके जें कां॥ ३३०॥

तें पृथग्विध करण। कर्माचें इया कारण।
तिसरे गा जाण। नृपनंदना॥ ३३१॥

आणि पूर्वपश्चिम वाहणी। निघालिया वोघाचिया मिळणी।
होय नदी नद पाणी। एकचि जेवीं॥ ३३२॥

तैसी क्रियाशक्ति पवनीं। असे जे अनपायिनी।
ते पडिली ना ना स्थानीं। ना ना होय॥ ३३३॥

जैं वाचे करी येणें। तैं तेचि होय बोलणें।
हाता आली तरी घेणें। देणें होय॥ ३३४॥

अगा चरणाच्या ठायीं। तरि गती तेचि पाहीं।
अधोद्वारीं दोहीं। क्षरणें तेचि॥ ३३५॥

कंदौनि हृदयवरी। प्रणवाची उजरी।
करितां तेचि शरीरीं। प्राण म्हणिजे॥ ३३६॥

मग ऊर्ध्वीचिया रिगानिगा। पुढती तेचि शक्ति पैं गा।
उदान ऐसिया लिंगा। पात्र जाहाली॥ ३३७॥

अधो रंध्राचेनि वाहें। अपान हें नाम लाहे।
व्यापकपणें होये। व्यान तेचि॥ ३३८॥

आरोगिलेनि रसें। शरीर भरी सरिसें।
आणि न सांडितां असे। सर्वसंधी॥ ३३९॥

ऐसिया इया राहटीं। मग तेचि क्रिया पाठीं।
समान ऐसा किरीटी। बोलिजे गा॥ ३४०॥

आणि जांभई शिंक ढेंकर। ऐसैसा होतसे व्यापार।
नाग कूर्म कृकर। इत्यादि होय॥ ३४१॥

एवं वायूची हे चेष्टा। एकीचि परि सुभटा।
वर्तनास्तव पालटा। येतसे जे॥ ३४२॥

ते भेदली वृत्तिपंथें। वायुशक्ति गा एथें।
कर्मकारण चवथें। ऐसें जाण॥ ३४३॥

आणि ऋतु बरवा शारदु। शारदीं पुढती चांदु।
चंद्रीं जैसा संबंधु। पूर्णिमेचा॥ ३४४॥

कां वसंतीं बरवा आराम। आरामीं प्रिया संगम।
संगमीं आगम। उपचारांचा॥ ३४५॥

ना ना कमळीं पांडवा। विकास जैसा बरवा।
विकासींही यावा। परागाचा तो॥ ३४६॥

वाचे बरवें कवित्व। कवित्वीं बरवें रसिकत्व।
रसिकत्वीं परतत्व। स्पर्श जैसा॥ ३४७॥

तैसी सर्ववृत्ति वैभवीं। बुद्धीचि एकली बरवी।
बुद्धीही बरव नवी। इंद्रिय प्रौढी॥ ३४८॥

इंद्रियप्रौढी मंडळा। शृंगार एकचि निर्मळा।
जैं आधिष्ठात्रिय कां मेळा। दैवतांचा जो॥ ३४९॥

म्हणूनि चक्षुरादिकीं दाहें। इंद्रियां पाठीं स्वानुग्रहें।
सूर्यादिकां कां आहे। सुरांचें वृंद॥ ३५०॥

तें देववृद बरवें। कर्मकारण पांचवें।
अर्जुना एथ जाणावें। देव म्हणे॥ ३५१॥

एवं माने तुझिये आयणी। तैसी कर्मजातांची हे खाणी।
पंचविध आकर्णी। निरूपिली॥ ३५२॥

आतां हेचि खाणी वाढे। मग कर्माची सृष्टी घडे।
जिहीं ते हेतुही उघडे। दाऊं पांचै॥ ३५३॥

शरीरवाक् मनोभिर्यत् कर्म प्रारभते नरः।
न्याय्यं वा विपरितं वा पञ्चैते तस्य हेतवः॥ १८.१५ ॥

तरि अवसांत आली माधवी। ते हेतु होय नवपल्लवीं।
पल्लव पुष्पपुंज दावी। पुष्प फळांतें॥ ३५४ ॥

कां वार्षिये आणिजे मेघ। मेघें वृष्टिप्रसंग।
वृष्टीस्तव भोग। सस्यसुखाचा॥ ३५५ ॥

ना तरी प्राची अरुणातें विये। अरुणें सूर्योदय होये।
सूर्यें सगळा पाहे। दिवस जैसा॥ ३५६ ॥

तईसें मन हेतु पांडवा। होय कर्म संकल्प भावा।
तो संकल्प लावी दिवा। वाचेचा गा॥ ३५७ ॥

मग वाचेचा तो दिवटा। दावी कृत्यजातांचिया वाटा।
तेव्हां कर्ता रिगे कामठां। कर्तुत्वाच्या॥ ३५८ ॥

तेथ शरीरादिक दळवाडें। शरीरादिकां हेतूचि घडे।
लोहकाम लोखंडें। निर्वाळिजे जैसें॥ ३५९ ॥

कां ताथुवाचा ताणा। तांथु घालितां वैरणा।
तो तंतूचि विचक्षणा। होय पट॥ ३६० ॥

तैसें मन वाचा देहाचें। कर्म मनादि हेतुचि रचे।
रत्नीं घडे रत्नाचें। दळवाडें जेवीं॥ ३६१ ॥

एथ शरिरादिकें कारणें। तेचि हेतु केविं हें कोणें।
अपेक्षिजे तरि तेणें। अवधारिजो॥ ३६२ ॥

आइका सूर्याचिया प्रकाशा। हेतु कारण सूर्यचि जैसा।
कां उंसाचें कांडें उंसा। वाढि हेतु॥ ३६३ ॥

ना ना वाग्देवता वानावी। तैं वाचाचि लागे कामवावी।
कां वेदां वेदेंचि बोलावी। प्रतिष्ठा जेवीं॥ ३६४ ॥

तैसें कर्मा शरीरादिकें। कारण हें कीर ठाउकें।
परि हेंचि हेतु न चुके। हेंही एथ॥ ३६५ ॥

आणि देहादिकीं कारणीं। देहादि हेतु मिळणी।
होय जया उभारणी। कर्मजाता॥ ३६६ ॥

तें शास्त्रार्थें मानिलेया। मार्गा अनुसरे धनंजया।
तरि न्याय तो न्याया। हेतु होय॥ ३६७ ॥

जैसा पर्जन्योदकाचा लोट। विपायें धरी साळींचा पाट।
तो जिरे परि अचाट। उपयोग आथी॥ ३६८ ॥

कां रोषें निघालें अवचटें। पडिलें द्वारकेचिये वाटे।
तें शिणे परि सुनाटें। न वचती पदें॥ ३६९ ॥

तैसें हेतु कारणमेळें। उठी कर्म जें आंधळें।
तें शास्त्राचे लाहे डोळे। तैं न्याय्य म्हणिपे॥ ३७० ॥

ना दूध वाढतां ठावो पावे। तंव उतोनि जाय स्वभावें।
तोही वेंच परि नव्हे। वेंचिलें तें॥ ३७१ ॥

तैसें शास्त्र साह्येंवीण। केलें नोहे जरी अकारण।
तरि लागो कां नागवण। दानलेखीं॥ ३७२ ॥

अगा बावन्नां वर्णां परतां। कोण मंत्र आहे पंडुसुता।
कां बावन्नही नुच्चारितां। जीव आथी॥ ३७३ ॥

परि मंत्राची कडसणी। जंव नेणिजे कोदंडपाणी।
तंव उच्चारफळ वाणी। न पवे जेवीं॥ ३७४ ॥

तेवीं कारणहेतु योगें। जें बिसाट कर्म निगे।
तें शास्त्राचिये न लगे। कांसे जंव॥ ३७५ ॥

कर्म होतचि असे तेव्हांही। परि तें होणें नव्हे पाहीं।
तो अन्याय गा अन्यायीं। हेतु होय॥ ३७६ ॥

तत्रैवं सति कर्तारम् आत्मानं केवलं तु यः।
पश्यत्यकृतबुद्धित्वान् न स पश्यति दुर्मतिः॥ १८.१६ ॥

एवं पंचकारणां कर्मा। पांचही हेतु हे सुमहिमा।
आतां एथें पाहें पां आत्मा। सांपडला असे॥ ३७७ ॥

भानु न होनि रूपें जैसीं। चक्षु रूपातें कां प्रकाशी।
आत्मा न होनि कर्में तैसीं। प्रकटित असे गा॥ ३७८ ॥

पैं प्रतिबिंब आरिसा। दोन्ही न होनि वीरेशा।
दोहींतें प्रकाशी जैसा। न्याहाळिता तो॥ ३७९ ॥

कां अहोरात्र सविता। न होनि करी पंडुसुता।
तैसा आत्मा कर्म कर्ता। न होनि दावी॥ ३८०॥

परि देहाहंमान भुली। जयाची बुद्धी देहींच आतली।
तया आत्मविषयीं जाली। मध्यरात्री गा॥ ३८१॥

जेणें चैतन्या ईश्वरा ब्रह्मा। देहचि केलें परमसीमा।
तया आत्मा कर्ता हे प्रमा। अलाट उपजे॥ ३८२॥

आत्माचि कर्म कर्ता। हाही निश्चय नाहीं तत्त्वतां।
देहचि मी कर्म कर्ता। मानितो साच॥ ३८३॥

जे आत्मा मी कर्मातीत। सर्वकर्म साक्षिभूत।
हे आपुली कंहीं मात। नायकेचि कानीं॥ ३८४॥

म्हणौनि उपमा आत्मयातें। देहचिवरी मविजे एथें।
विचित्र काई रात्रि दिवसांतें। डुडुळ न करी॥ ३८५॥

पैं जेणें आकाशींचा कंहीं। सत्य सूर्य देखिला नाहीं।
तो थिल्लरींचें बिंब काई। मानूं न लाहे॥ ३८६॥

थिल्लराचेनि जालेपणें। सूर्यासि आणी होणें।
त्याच्या नाशीं नाशणें। कंपे कंप॥ ३८७॥

आणि निद्रिस्ता चेवो न ये। तंव स्वप्न साच हों लाहे।
रज्जु नेणतां सर्पा बिहे। विस्मो कवण॥ ३८८॥

जंव कवळ आथि डोळां। तंव चंद्र देखावा कीं पिंवळा।
काय मृगींही मृगजळा। भाळावें नाहीं॥ ३८९॥

तैसा शास्त्रगुरूचेनि नांवें। जो वाराही टेकों नेदी सिवें।
केवळ मौढ्याचेनींचि जीवें। जियाला जो॥ ३९०॥

तेणें देहात्मदृष्टीमुळें। आत्मया घेपें देहाचें जाळें।
जैसा अभ्राचा वेग कोल्हें। चंद्रीं मानी॥ ३९१॥

मग तया मानणयासाठीं। देहबंदीशाळे किरीटी।
कर्माच्या वज्रगांठी। कळासे तो॥ ३९२॥

पाहें पां बंध भावना दृढा। नळियेवरी तो बापुडा।
काय मोकळेयाही चवडा। न ठकेचि पुंसा॥ ३९३॥

म्हणोनि निर्मळे आत्मस्वरूपीं। जो प्रकृतीचें केलें आरोपी।
तो कल्पकोडीच्या मापीं। मवीचि कर्में॥ ३९४॥

आतां कर्मामाजी असे। परि तयातें कर्म न स्पर्शे।
वडवानळातें जैसें। समुद्रोदक॥ ३९५॥

तैसेनि वेगळेपणें। जयाचें कर्मीं असणें।
तो कीर वोळखावा कवणें। तरी सांगों॥ ३९६॥

जे मुक्तातें निर्धारितां। लाभे आपलीच मुक्तता।
जैसी दीपें दिसे पाहतां। आपली वस्तु॥ ३९७॥

ना तरी दर्पण जंव उटिजे। तंव आपणपयां आपण भेटिजे।
कां तोय पावतां तोय होइजे। लवणें जेवीं॥ ३९८॥

हें असो परतोनि मागुतें। प्रतिबिंब पाहे बिंबातें।
तंव पाहणे जाऊनि आयितें। बिंबचि होय॥ ३९९॥

तैसें हारपलें आपणपें पावे। तैं संतांतें पाहतां गिंवसावे।
म्हणोनि वानावे ऐकावे। तेचि सदा॥ ४००॥

परि कर्मीं असोनि कर्में। जों नागवे समविषमें।
चर्मचक्षूचेनि चामें। दृष्टी जैसी॥ ४०१॥

तैसा सोडवला जो आहे। तयाचे रूप आतां पाहें।
उपपत्तीची बाहे। उभऊनि सांगों॥ ४०२॥

यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते।
हत्वाऽपि स इमांल्लोकान् न हन्ति न निबद्ध्यते॥ १८.१७॥

तरि अविद्येचिया निदा। विश्वस्वप्नाचा हा धांदा।
भोगित होता प्रबुद्धा। अनादि जो॥ ४०३॥

तो महाव्याख्याचेनि नांवें। गुरुकृपेचेनि थावें।
माथां हात ठेवणें नव्हे। थापिटला जैसा॥ ४०४॥

तैसा विश्वस्वप्नेंसिं माया। नीद सांडूनि धनंजया।
सहजेंचि चेइला अद्वया। नंदपणें जो॥ ४०५॥

तेव्हां मृगजळाचे पूर। दिसते एक निरंतर।
हारपती कां चंद्रकर। फांकतां जैसे॥ ४०६॥

कां बाळत्व निघोनि जाय। तैं बागुला नाहीं त्राय।
पैं जळालिया इंधन न होय। रंधन जेवीं॥ ४०७॥

ना ना चेवो आलिया पाठीं। तैं स्वप्न न दिसे दिठी।
तैसी अहं ममता गा किरीटी। नुरेचि तया॥ ४०८॥

मग सूर्य अंधारालागीं। तिघो कां भलते सुरंगीं।
परि तो तयाच्या भागीं। नाहींचि जैसा॥ ४०९॥

तैसा आत्मत्वें वेष्टिला होये। तो जया तया दृश्यातें पाहे।
तें दृश्य द्रष्टेपणेंसीं होत जाये। तयाचेंचि रूप॥ ४१०॥

जैसा वह्नि जया लागे। तें वह्नीचि जालिया आंगे।
दाह्य दाहक विभागें। सांडिजे तें॥ ४११॥

तैसा कर्माकारा दुजेया। तो कर्तेपणाचा आत्मया।
आळ आला तो गेलिया। कांहीं बाहीं जें उरे॥ ४१२॥

तिये आत्मस्थितीचा जो रावो। मग तो देहीं इये जाणेल ठावो।
काय प्रलयांबूचा उन्नाहो। वोघ मानी॥ ४१३॥

तैसी ते पूर्ण अहंता। काई देहपणें पंडुसुता।
आवरे काई सविता। बिंबें धरिला॥ ४१४॥

पैं मथूनि लोणी घेपे। तें मागुती ताकीं घापे।
तरि तें लिप्तपणें लिपें। तेणेंसीं काई॥ ४१५॥

ना ना काष्टौनि वीरेशा। वेगळाविलिया हुताशा।
राहे काष्ठाचिया मांदुसा। कोंडलेपणें॥ ४१६॥

कां रात्रीचिया उदरांत। रिगाला जो हा भास्वत।
तो रात्री ऐसी मात। ऐके काई॥ ४१७॥

तैसें वेद्यवेदकपणेंसीं। पडिलें कां जयाच्या ग्रासीं।
तया देह मी ऐसी। अहंता कैंची॥ ४१८॥

आणि आकाशें जेथें जेथुनी। जाइजे तेथ असे भरोनी।
म्हणोनि ठेलें कोंदोनी। आपेंआप॥ ४१९॥

तैसें जें तेणें करावें। तो तेंचि आहे स्वभावें।
मा कोणे कर्मीं वेष्टावें। कर्तेपणें॥ ४२०॥

नुरेचि गगनावीण ठावो। नोहेचि समुद्रा प्रवाहो।
नुठीचि ध्रुवा जावों। तैसें जाहालें॥ ४२१॥

ऐसेनि अहंकृतिभावो। जयाचा बोधीं जाहाला वावो।
तऱ्ही देहा जंव निर्वाहो। तंव आथी कर्में॥ ४२२॥

वारा जरी वाजोनि वोसरे। तरी तो डोल रुखीं उरे।
कां सेंदें द्रुति राहे कापुरें। वेंचलेनी॥ ४२३॥

कां सरलेया गीताचा समारंभु। न वचे वाहवलेयाचा क्षोभु।
भूमि लोळोनि गेलिया अंबु। वोल थारे॥ ४२४॥

अगा मावळलेनि अर्कें। संध्येचिये भूमिके।
ज्योतिदीप्ती कौतुकें। दिसे जैसी॥ ४२५॥

पैं लक्ष भेदिलियाहीवरी। बाण धांवेचि तंववरी।
जंव भरली आथी उरी। बळाची तया॥ ४२६॥

ना ना चक्रीं भांडें जालें। तें कुलालें परतें नेलें।
परि भ्रमेचि तें मागिले। भोंवडिलेपणें॥ ४२७॥

तैसा देहाभिमान गेलिया। देह जेणें स्वभावें धनंजया।
जालें तें आपैसया। चेष्टवीच तें॥ ४२८॥

संकल्पेंवीण स्वप्न। न लावितां दांगीचें बन।
न रचितां गंधर्वभुवन। उठी जैसें॥ ४२९॥

आत्मयाचेनि उद्यमेंवीण। तैसें देहादि पंचकारण।
होय आपणयां आपण। क्रियाजात॥ ४३०॥

पैं प्राचीन संस्कारशेषें। पांचही कारणें सहेतुकें।
काम वीजती गा अनेकें। कर्माकारें॥ ४३१॥

तया कर्मामाजी मग। संहरो आघवें जग।
अथवा नवें चांग। अनुकरो॥ ४३२॥

परि कुमुद कैसेनि सुके। तें कमळ कैसें फांके।
ही दोन्ही रवि न देखे। जयापरी॥ ४३३॥

कां विजु वर्षोनि आभाळ। ठिकरिया आतो भूतळ।
अथवा करू शाडळ। पर्जन्यवृष्टी॥ ४३४॥

तरि तया दोहींतें जैसें। नेणिजेचि कां आकाशें।
तैसा देहींच जो असे। विदेहदृष्टी॥ ४३५ ॥

तो देहादिकीं चेष्टीं। घडतां मोडतां हे सृष्टी।
न देखे स्वप्न दृष्टी। चेइला जैसा॥ ४३६ ॥

येऱ्हवीं चामाचे डोळेवरी। जे देखती देहचिवरी।
ते कीर तो व्यापारी। ऐसेंचि मानिती॥ ४३७ ॥

कां तृणाचा बाहुला। जो आगरामेरे ठेविला।
तो सत्य राखतां कोल्हा। न मनी काई॥ ४३८ ॥

पिसें नेसलें कां नागवें। हें लोकीं येऊनि जाणावें।
ठाणोरियांचे मवावे। आणिकीं धाय॥ ४३९ ॥

कां महासतीचे भोग। देखे कीर सकळ जग।
परि ते आगी ना आंग। ना लोक देखे॥ ४४० ॥

तैसा स्वस्वरूपें उठिला। जो दृश्येंसीं द्रष्टा आटला।
तो नेणे काय राहटला। इंद्रियग्राम॥ ४४१ ॥

अगा थोरीं कल्लोळीं कल्लोळ साने। लोपतां तिरींचेनि जनें।
एका एकीं गिळिलें हें मनें। मानिजे जऱ्ही॥ ४४२ ॥

तऱ्ही उदकाप्रति पाहीं। कोण ग्रासीतसे काई।
तैसें पूर्णा दुजें नाहीं। जें तो मारी॥ ४४३ ॥

सुवर्णाचिया चंडिका। सुवर्णशूळेंचि देखा।
सुवर्णाचिया महिखा। नाश केला॥ ४४४ ॥

तो देवलवसिया कडा। व्यवहार गमला फुडा।
वांचूनि महिष शूळ चामुंडा। सुवर्णचि तें॥ ४४५ ॥

पैं चित्रींचें जळ हुताश। तो दृष्टीचाचि आभास।
पटीं आग्न वोलांश। दोन्ही नाहीं॥ ४४६ ॥

मुक्ताचें देह तैसें। हाले चाले संस्कारवशें।
तें देखोनि लोक पिसे। तो कर्ता म्हणती॥ ४४७ ॥

आणि तयां करणेयां आंत। घडो त्रैलोक्या घात।
परि तेणे केला हा मात। बोलों न ये॥ ४४८ ॥

अगा अंधःकार देखावा तेजें। मग तो फेडिजे हें कें बोलिजे।
तैसें ज्ञानियां नाहीं दुजें। तो मारील काई॥ ४४९ ॥

म्हणोनि तयाची बुद्धी। नेणे पापपुण्याची गंधी।
गंगा मीनलिया नदी। विटाळ जैसा॥ ४५० ॥

अग्नीसी अग्नी झगटलिया। काय पोळे तो धनंजया।
कीं शस्त्र रूपे आपणया। आपणचि॥ ४५१ ॥

तैसें आपणपया परतें। जो नेणे क्रिया जातातें।
तेथ काय लिंपवी बुद्धीतें। तयाचिये॥ ४५२ ॥

म्हणोनि कार्य कर्ता क्रिया। हें स्वरूपचि जाहलें जया।
नाहीं शरीरादिकीं तया। कर्मबंध॥ ४५३ ॥

जे कर्ता जीव विंदाणीं। काढूनि पांचही खाणी।
घडित आहे करणीं। आउतीं दाहें॥ ४५४ ॥

तेथ न्यावो आणि अन्यावो। हा द्विविध साधूनि आवो।
उभारितां न लवी खेंवो। कर्म भुवनें॥ ४५५ ॥

या थोराडा कीर कामा। विरजा नोहे आत्मा।
परि म्हणसी हन उपक्रमा। हात लावी॥ ४५६ ॥

तो साक्षी चिद्रूप। कर्मप्रवृत्तीचा संकल्प।
उठी तो कां निरोप। आपणचि दे॥ ४५७ ॥

तरी कर्म प्रवृत्तीही लागीं। तया आयास नाहीं आंगीं।
जे प्रवृत्तीचेही उइळिगीं। लोकचि आथी॥ ४५८ ॥

म्हणोनि आत्मयाचें केवळ। जो रूपचि जाहला निखिळ।
तया नाहीं बंदिशाळ। कर्माचि हे॥ ४५९ ॥

परि अज्ञानाच्या पटीं। अन्यथा ज्ञानाचें चित्र उठी।
तेथ चितारणी हे त्रिपुटी। प्रसिद्ध जे कां॥ ४६० ॥

ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता त्रिविधा कर्मचोदना।
करणं कर्म कर्तेति त्रिविधः कर्मसंग्रहः॥ १८.१८ ॥

जें ज्ञान ज्ञाता ज्ञेय। हें जगाचें बीजत्रय।
तें कर्माची निःसंदेह प्रवृत्ती जाण॥ ४६१ ॥

आतां ययाची गा त्रया। व्यक्ती वेगळालिया।
आइकें धनंजया। करूं रूप॥ ४६२॥
स्मल्ल्स्किप
तरि जीवसूर्यबिंबाचे। रश्मी श्रोत्रादिकें पांचे।
धांवोनि विषयपद्माचे। फोडीत मढ॥ ४६३॥

कीं जीव नृपाचे वारु उपलाणे। घेऊनि इंद्रियांचीं केंकाणें।
विषयदेशींचें नागवणें। आणीत जे॥ ४६४॥

हें असो इंहीं इंद्रियीं राहटे। जें सुखदुःखेंसीं जीवा भेटे।
ते सुषुप्तिकाळीं वोहटे। जेथ ज्ञान॥ ४६५॥

तया जीवा नांव ज्ञाता। आणि जें हें सांगितलें आतां।
तेंचि एथ पंडुसुता। ज्ञान जाण॥ ४६६॥

जें अविद्येचिये पोटीं। उपजतखेंवो किरीटी।
आपणयातें वांटी। तिहीं ठायीं॥ ४६७॥

आपुलिये धांवरेपुढां। घालूनि ज्ञेयाचा गुंडा।
उभारी मागिली कडां। ज्ञातृत्वातें॥ ४६८॥

मग ज्ञातया ज्ञेया दोघां। तो नांदणुकेचा बगा।
माजि जालेनि पैं गा। वाहे जेणें॥ ४६९॥

टाकूनि ज्ञेयाची शिंव। पुरे जयाची धांव।
सकळ पदार्थां नांव। सूतसे जें॥ ४७०॥

तें गा सामान्य ज्ञान। या बोला नाहीं आन।
ज्ञेयाचेंही चिन्ह। आईक आतां॥ ४७१॥

तरि शब्द स्पर्श। रूप गंध रस।
हा पंचविध आभास। ज्ञेयाचा तो॥ ४७२॥

जैसे एकेचि चूतफळें। इंद्रियां वेगळवेगळें।
रसें वर्णें परिमळें। भेटिजे स्पर्शें॥ ४७३॥

तैसें ज्ञेय तरी एकसरें। परि ज्ञान इंद्रियद्वारें।
घे म्हणोनि प्रकारें। पांच जालें॥ ४७४॥

आणि समुद्रीं वोघाचें जाणें। सरे लाणीपासीं धांवणें।
कां फळीं सरे वाढणें। सस्याचें जेवीं॥ ४७५॥

तैसें इंद्रियांच्या वाहवटीं। धांवतया ज्ञाना जेथ उठी।
होय तें गा किरीटी। विषय ज्ञेय॥ ४७६॥

एवं ज्ञातया ज्ञान ज्ञेया। तिहीं रूप केलें धनंजया।
हे त्रिविध सर्व क्रिया। प्रवृत्ती जाण॥ ४७७॥

जे शब्दादि विषय। हें पंचविध जें ज्ञेय।
तेंचि प्रिय कां अप्रिय। एके परीचें॥ ४७८॥

ज्ञान मोटकें ज्ञातया। दावी ना जंव धनंजया।
तंव स्वीकारा कीं त्यजावया। प्रवर्तेचि तो॥ ४७९॥

परि मीनातें देखोनि बक। जैसानि धनातें रंक।
का स्त्री देखोनि कामुक। प्रवृत्ति धरी॥ ४८०॥

जैसें खालारां धांवे पाणी। भ्रमर पुष्पाचिये घाणीं।
ना ना सुटला सांजवणीं। वत्सचि पां॥ ४८१॥

अगा स्वर्गींची उर्वशी। ऐकोनि जेवीं माणुसीं।
वराता लावीजती आकाशीं। यागांचिया॥ ४८२॥

पै पारवा जैसा किरीटी। चढला नभाचिये पोटीं।
पारवी देखोनि लोटी। आंगचि सगळे॥ ४८३॥

हें ना घनगर्जनेसरिसा। मयूर वोवांडे आकाशा।
ज्ञाता ज्ञेया देखोनि तैसा। धांवचि घे॥ ४८४॥

म्हणोनि ज्ञान ज्ञेय ज्ञाता। हे त्रिविध गा पंडुसुता।
होयचि कर्मा समस्तां। प्रवृत्ति येथ॥ ४८५॥

परि तेंचि ज्ञेय विपायें। जरी ज्ञातयाचें प्रिय होये।
तरी भोगावया न साहे। क्षणही विलंब॥ ४८६॥

ना तरी अवचटें। तेंचि विरुद्ध होऊनि भेटे।
तरी युगांत वाटे। सांडावया॥ ४८७॥

व्याळा कां हारा। वरपडा जालेया नरा।
हर्ष आणि दरारा। सरसाचि उठी॥ ४८८॥

तैसें ज्ञेय प्रियाप्रियें। देखिलेनि ज्ञातया होये।
मग त्यागस्वीकारीं वाहे। व्यापारातें॥ ४८९॥

तेथ रागी प्रतिमल्लाचा। गोसांवी सर्वदळाचा।
रथ सांडूनि पायांचा। होय जैसा॥ ४९०॥

तैसें ज्ञातेपणें जें असे। तें ये कर्ता ऐसिये दशे।
जेवितें बसलें जैसें। रंधन करूं॥ ४९१॥

कां भंवरेंचि केला मळा। वरकल जाला अंकसळा।
ना ना देव रिगाला देउळा। चिया कामा॥ ४९२॥

तैसा ज्ञेयाचिया हांवा। ज्ञाता इंद्रियांचा मेळावा।
राहाटवी तेथ पांडवा। कर्ता होय॥ ४९३॥

आणि आपण होऊनि कर्ता। ज्ञाना आणि करणता।
तेथें ज्ञेयचि स्वभावता। कार्य होय॥ ४९४॥

ऐसा ज्ञानाचिये निजगती। पालट पडे गा सुमती।
नेत्रांची शोभा रातीं। पालटे जैसी॥ ४९५॥

कां अदृष्ट जालिया उदासु। पालटे श्रीमताचा विलासु।
पूर्णिमेपाठीं शीतांशु। पालटे जसा॥ ४९६॥

तैसा चाळितां करणें। ज्ञाता वेष्टिजे कर्तेपणें।
तेथिंचीं तिये लक्षणें ऐक आतां॥ ४९७॥

तरि बुद्धि आणि मन। चित्त अहंकार हन।
हें चतुर्विध चिन्ह। अंतःकरणाचें॥४९८॥

बाह्य त्वचा श्रवण। चक्षु रसना घ्राण।
हें पंचविध जाण। इंद्रिय गा॥ ४९९॥

तेथ आंतुलें तंव करणें। कर्ता कर्तव्या घे उमाणें।
मग तैं जरी जाणें। सुखा येतें॥ ५००॥

तरि बाहेरिलें तियेंही। चक्षुरादिकें दाहाही।
उठौनि लवलाहीं। व्यापारा सुये॥ ५०१॥

मग तो इंद्रिय कदंब। करविजे तंव राब।
जंव कर्तव्याचा लाभ। हातासि ये॥ ५०२॥

ना तें कर्तव्य जरी दुःखें। फळेल ऐसें देखें।
तो लावी त्यागमुखें। तियें दाहाही॥ ५०३॥

मग फिटे दुःखाचा ठावो। तंव राहाटवी रात्रिदिवो।
विकण वातें वाहावो। जयापरी॥ ५०४॥

तैसेनि त्याग स्वीकारीं। वाहतां इंद्रियाची धुरी।
ज्ञातयातें अवधारीं। कर्ता म्हणिपे॥ ५०५॥

आणि कर्तयाच्या सर्व कर्मीं। आउतांचिया परि क्षमी।
म्हणोनि इंद्रियांतें आम्ही। करणें म्हणों॥ ५०६॥

आणि हेंचि करणेंवरी। कर्ता क्रिया ज्या उभारी।
तिया व्यापे तें अवधारीं। कर्म एथ॥ ५०७॥

सोनाराचिया बुद्धी लेणें। व्यापे चंद्रकरीं चांदिणें।
कां व्यापे वेल्हाळपणें। वेली जैसी॥ ५०८॥

ना ना प्रभा व्यापे प्रकाशु। गोडिया इक्षुरसु।
हें असो अवकाशु। आकाशीं जैसा॥ ५०९॥

तैसें कर्तव्याचिया क्रिया। व्यापलें जें धनंजया।
तें कर्म गा बोलावया। आन नाहीं॥ ५१०॥

एवं कर्म कर्ता करण। या तीहीचेंही लक्षण।
सांगितलें तुज विचक्षण। शिरोमणी॥ ५११॥

एथ ज्ञाता ज्ञान ज्ञेय। हें कर्माचें प्रवृत्तित्रय।
तैसेंचि कर्ता करण कार्य। हा कर्मसंचय॥ ५१२॥

वन्हीं ठेविला असे धूम। आथी बीजीं जेविं द्रुम।
कां मनीं जोडे काम। सदा जैसा॥ ५१३॥

तैसा कर्ता क्रिया करणीं। कर्माचे आहे जिंतवणी।
सोनें जैसें खाणीं। सुवर्णाचिये॥ ५१४॥

म्हणोनि हें कार्य मी कर्ता। ऐसें आथि जेथ पंडुसुता।
तेथ आत्मा दूरी समस्तां। क्रियापासीं॥ ५१५॥

यालागी पुढतपुढती। आत्मा वेगळाचि सुमती।
आतां असो हें किती। जाणतासि तूं॥ ५१६॥

ज्ञानं कर्म च कर्ता च त्रिधैव गुणभेदतः।
प्रोच्यते गुणसंख्याने यथावच्छृणु तान्यपि॥ १८.१९॥

परी सांगितलें जें ज्ञान। कर्म कर्ता हन।
ते तिन्हीं तिन्हीं ठायीं भिन्न। गुणीं आहाती॥ ५१७॥

म्हणोनि ज्ञाना कर्मा कर्तया। पातेजों नये धनंजया।
जे दोनी बांधती सोडावया। एकचि प्रौढे॥ ५१८॥

तें सात्विक ठाउवें होये। तो गुणभेद सांगों पाहें।
जो सांख्यशास्त्रीं आहे। उवाइला॥ ५१९॥

जें विचारक्षीरसमुद्र। स्वबोध कुमुदिनीचंद्र।
ज्ञानडोळसां नरेंद्र। शास्त्रांचा जें॥ ५२०॥

कीं प्रकृतिपुरुष दोनी। मिसळलीं दिवोरजनी।
तियें निवडिता त्रिभुवनीं। मार्तंड जें॥ ५२१॥

जेथ अपारा मोहराशी। तत्त्वाच्या मापीं चोविसीं।
उमाणें घेउनि परेशीं। सुरवाडिजे॥ ५२२॥

अर्जुना तें सांख्यशास्त्र। पढे जयाचें स्तोत्र।
तें गुणभेदचरित्र। ऐसें आहे॥ ५२३॥

जे आपुलेनि आंगिकें। त्रिविधपणाचेनि अंकें।
दृश्यजात तितकें अंकित केलें॥ ५२४॥

एवं सत्व रज तमा। तिहींची एवढी असे महिमा।
जे त्रैविध्य आदि ब्रह्मा। अंतीं कृमि॥ ५२५॥

परि विश्वींची आघवी मांदी। जेणें भेदलेनि गुणभेदी।
पडिली तें तंव आदीं। ज्ञान सांगों॥ ५२६॥

जे दिठी जरी चोख कीजे। तरी भलतेंही चोख सुजे।
तैसें ज्ञानें शुद्धें लाहिजे। सर्वही शुद्ध॥ ५२७॥

म्हणोनि तें सात्विक ज्ञान। आतां सांगों दे अवधान।
कैवल्यगुणनिधान। श्रीकृष्ण म्हणे॥ ५२८॥

सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते।
अविभक्त विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्विकम्॥ १८.२०॥

तरी अर्जुना गा तें फुडें। सात्विक ज्ञान चोखडें।
जयाच्या उदयीं ज्ञेय बुडे। ज्ञातेनिसीं॥ ५२९॥

जैस सूर्य न देखें अंधारें। सरिता नेणिजती सागरें।
कां कवळिलिया न धरे। आत्मच्छाया॥ ५३०॥

तयापरी जया ज्ञाना। शिवादि तृणावसाना।
इया भूतव्यक्ति भिन्ना। नाडळती॥ ५३१॥

जैसें हातें चित्र पाहतां। होय पाणियें मीठ धुतां।
कां चेवोनि स्वप्ना येतां। जैसें होय॥ ५३२॥

तैसें ज्ञानें जेणें। करितां ज्ञातव्यातें पाहणें।
जाणता ना जाणणें। जाणावें उरे॥ ५३३॥

पैं सोनें आटूनि लेणीं। न काढिती आपुलिया आयणी।
कां तरंग न घेपती पाणी। गाळूनि जैसें॥ ५३४॥

तैसी जया ज्ञानाचिया हातां। नलगेचि दृश्यकथा।
तें ज्ञान जाण सर्वथा। सात्विक गा॥ ५३५॥

आरिसा पाहों जातां कोडें। जैसें पाहातेंचि का रिगे पुढें।
तैसें ज्ञेय लोटोनि पडे। ज्ञाताचि जें॥ ५३६॥

पुढती तेंचि सात्विक ज्ञान। जें मोक्षलक्ष्मीचें भुवन।
हें असो एक चिन्ह। राजसाचे॥ ५३७॥

पृथक्त्वेन तु यज्ज्ञानं नानाभावान् पृथग्विधान्
वेत्ति सर्वेषु भूतेषु तज्ज्ञानं विद्धि राजसम्॥ १८.२१॥

तरि पार्था परियेस। तें ज्ञान गा राजस।
जें भेदाची कांस। धरूनि चाले॥ ५३८॥

विचित्रता भूतांचिया। आपण आतोनि ठिकरिया।
बहु चकै ज्ञातया। आणिली जेणें॥ ५३९॥

जैसें साचा रूपा आड। घालूनि विसराचें कवाड।
मग स्वप्नाचें काबाड। वोइरी निद्रा॥ ५४०॥

तैसें स्वज्ञानाचिये पौळी। बाहेरी मिथ्यामोहाचे खळीं।
तिहीं अवस्थांची वह्याळी। दावी जें जीवा॥ ५४१॥

अळंकारपणें झांकलें। बाळका सोने कां वायां गेलें।
तैसें नामीं रूपीं दुरावलें। अद्वत जया॥ ५४२॥

अवतरली गाडग्यां घडां। पृथ्वी अनोळख जाली मूढां।
वह्नि जाला कानडा। दीपत्वासाठीं॥ ५४३॥

कां वस्त्रपणाचेनि आरोपें। मूर्खांप्रति तंतु हारपे।
ना ना मुग्धां पट लोपे। दाऊनि चित्र॥ ५४४॥

तैसी जया ज्ञाना। जाणोनि भूतव्यक्ती भिन्ना।
ऐक्यबोधाची भावना। निमोनि गेली॥ ५४५॥

मग इंधनीं भेदला अनळ। फुलावरी परिमळ।
कां जळभेदें सकळ। चंद्र जैसा॥ ५४६॥

तैसे पदार्थभेद बहुवस। जाणोनि लहान थोर वेष।
आतलें तें राजस। ज्ञान येथ॥ ५४७॥

आतां तामसाचेंही लिंग। सांगेन तें वोळख चांग।
डावलावया मातंग। सदन तैसें॥ ५४८॥

यत्तु कृत्स्नवदेकस्मिन् कार्ये सक्तमहैतुकम्।
अतत्त्वार्थवदल्पं च तत्तामसमुदाहृतम्॥ १८.२२॥

तरि किरीटी जें ज्ञान। हिंडे विधीचेनि वस्त्रें हीन।
श्रुति पाठमोरी नग्न। म्हणोनि तया॥ ५४९॥

येरीही शास्त्रबाह्यकारीं। जें निंदेचे विटाळवरी।
बोळविलेंसे डोंगरीं। म्लेंच्छधर्माच्या॥ ५५०॥

जें गा ज्ञान ऐसें। गुणग्रहें तामसें।
घेतलें भोंवे पिसें। होऊनिया॥ ५५१॥

जें सोयरिके बाध नेणे। पदार्थी निषेध न म्हणे।
निरोपिलें जैसें सुणें। शून्यग्रामीं॥ ५५२॥

तया तोंडी जें नाडळे। कां खातां जेणे पोळे।
तेचि येक वाळे। येर घेचि तें॥ ५५३॥

पैं सोनें चोरितां उंदिर। न म्हणे थरविथर।
नेणें मांसखाइर। काळें गोरें॥ ५५४॥

ना ना वनामाजी बोहरी। कडसणी जेविं न करी।
कां जीत मेलें न विचारी। बैसतां मासी॥ ५५५॥

अगा वांता कां वाढियेला। साजुक कां सडलिया।
विवेक कावळिया। नाहीं जैसा॥ ५५६॥

तैसें निषिद्ध सांडूनि द्यावें। कां विहित आदरें घ्यावें।
हें विषयांचेनि नांवें। नेणेचि जें॥ ५५७॥

जेतुलें आड पडे दिठी। तेतुलें घेचि विषयासाठिं।
मग तें स्त्रीद्रव्य वांटी। शिस्नोदरां॥ ५५८॥

तीर्थातीर्थ हे भाख। उदकीं नाहीं सनोळख।
तृषा वोळे तेंचि सुख। वांचूनियां॥ ५५९॥

तयाचिपरी खाद्याखाद्य। न म्हणे निंद्यानिंद्य।
तोंडा आवडे तें मेध्य। ऐसाचि बोध॥ ५६०॥

आणि स्त्रीजात तितुकें त्वचेंद्रियेंचि वोळखे।
तियेविषयीं सोयरिके। सादरचि बहु॥ ५६१॥

पैं स्वार्थी जें उपकरे। तयाचि नाम सोयिरें।
देहसंबंध न सरे। जिये ज्ञानीं॥ ५६२॥

मृत्यूचें आघवेंचि अन्न। आगी आघवेंचि इंधन।
तैसें जगचि आपलें धन। तामसज्ञाना॥ ५६३॥

ऐसेनि विश्व सकळ। जेणें विषयचि मानिलें केवळ।
तया एक जाण फळ। देहभरण॥ ५६४॥

आकाश पतिता नीरा। जैसा सिंधुचि एक थारा।
तैसें कृत्यजात उदरा। लागींचि बुझे॥ ५६५॥

वांचूनि स्वर्ग नरक आथी। तया हेतु प्रवृत्ति निवृत्ती।
इये आघवीयेचि राती। जाणिवेची जें॥ ५६६॥

जें देहखंडा नाम आत्मा। ईश्वर पाषाणप्रतिमा।
ययापरौती प्रेमा। ढळों नेणे॥ ५६७॥

म्हणे पडिलेनि शरीरें। केलेनिसीं आत्मा सरे।
मा भोगावया उरे। कोण वेषें॥ ५६८॥

ना ईश्वर पाहतां आहे। तो भोगवी जरी हें होये।
तरी देवचि खाये। विकूनियां॥ ५६९॥

गांवींचे देवळेश्वर। नियामकचि होती साचार।
तरि देशींचे डोंगर। उगे कां असती॥ ५७०॥

ऐसा विपायें देव मानिजे। तरि पाषाणमात्रचि जाणिजे।
आणि आत्मा तंव म्हणिजे। देहातेंचि॥ ५७१॥

येरें पापपुण्यादिकें। तें अवघेंचि करोनि लटिकें।
हित मानी अग्निमुखें। चरणें जें कां॥ ५७२॥

जें चामाचे डोळे दाविती। जें इंद्रियें गोडी लाविती।
तेंचि साच हे प्रतीती। फुडी जया॥ ५७३॥

किंबहुना ऐसी प्रथा। वाढती देखसी पार्था।
धूमाची वेली वृथा। आकाशीं जैसी॥ ५७४॥

कोरडा ना वोला। उपयोगा आथी गेला।
तो वाढोनि मोडला। भेंड जैसा॥ ५७५॥

ना ना उसांचीं कणसें। कां नपुसकें माणुसें।
वन लागलें जैसें। साबरीचे॥ ५७६॥

ना तरी बाळकाचें मन। कां चोराघरींचें धन।
अथवा गळस्तन। शेळीयेचें॥ ५७७॥

तैसें जें वायाणें। वोसाळ दिसे जाणणें।
तयातें मी म्हणें। तामस ज्ञान॥ ५७८॥

तेंही ज्ञान इया भाषा। बोलिजे तो भाव ऐसा।
जात्यंधाचा कां जैसा। डोळा वाड॥ ५७९॥

कां बधिराचे नीट कान। अपेया नाम पान।
तैसें आडनांव ज्ञान। तामसा तया॥ ५८०॥

हें असो किती बोलावें। तरि ऐसें जें देखावें।
तें ज्ञान नोहे जाणवें। डोळस तम॥ ५८१॥

एवं तिहीं गुणीं। भेदलें यथालक्षणीं।
ज्ञान श्रोतेशिरोमणी। दाविलें तुज॥ ५८२॥

आतां याचि त्रिप्रकारा। ज्ञानाचेनि धनुर्धरा।
प्रकाशें होती गोचरा। कर्तयांच्या क्रिया॥ ५८३॥

म्हणौनि कर्म पैं गा। अनुसरे तिहीं भागां।
मोहरें जालिया वोघा। तोय जैसें॥ ५८४॥

तेंचि ज्ञानत्रयवशें। त्रिविध कर्म जें असे।
तेथ सात्विक तंव ऐसें। परिस आधीं॥ ५८५॥

नियतं सङ्गरहितम् अरागद्वेषतः कृतम्।
अफलप्रेप्सुना कर्म यत्तत्सात्विकमुच्यते॥ १८.२३॥

तरि स्वार्थादिकाचेनि मार्गें। आलें जें मानिलें आंगें।
पतिव्रतेचेनि परिष्वंगें। प्रियातें जैसें॥ ५८६॥

सांवळ्या आंगा चंदन। प्रमदा लोचना अंजन।
तैसें अधिकारासी मंडण। नित्यपणें जें॥ ५८७॥

तें नित्य कर्म भलें। होय नैमित्तिकीं सावाइलें।
सोनयासी जोडलें। सौरभ्य जैसें॥ ५८८॥

आणि आंगा जीवाची संपत्ती। वेंचूनि करी बाळाची पाळती।
परि जीवें उबगणें हे स्थिती। न पाहे माय॥ ५८९॥

तैसें सर्वस्वें कर्म अनुष्ठी। परि फल न सूये दिठी।
उखिती क्रिया पैठी। ब्रह्मींचि करी॥ ५९०॥

आणि प्रिय आलिया स्वभावें। शंबळ उरे वेंचें ठाउवें नव्हे।
तैसें सत्प्रसंगे करावें। पारुषे जरी॥ ५९१॥

तरी अकरणाचेनि खेदें। द्वेषांतें जिवीं न बांधे।
जालियाचेनि आनंदें। फुंजों नेणे॥ ५९२॥

ऐस ऐसिया हातवटिया। कर्म निफजे जें धनंजया।
जाण सात्विक हें तया। गुणनाम गा॥ ५९३॥

यावरी राजसाचें। लक्षण सांगिजेल साचें।
न करीं अवधानाचें वाणेंपण॥ ५९४॥

यत्तु कामेप्सुना कर्म साहङ्कारेण वा पुनः।
क्रियते बहुलायासं तद्राजसमुदाहृतम्॥ १८.२४॥

तरि घरीं मातापितरां। धड बोली नाहीं संसारा।
येर विश्व भरी आदरा। मूर्ख जैसा॥ ५९५॥

कां तुळशीचिया झाडा। दुरूनि न घापे सिंतोडा।
द्राक्षींचेया तरि बुडा। दूधचि लाविजे॥ ५९६॥

तैसी नित्य नैमित्तिकें। कर्मैं जियें आवश्यकें।
तयांचेविषीं न शके। बैसला उठूं॥ ५९७॥

येरां काम्याचेनि तरि नांवें। देह सर्वस्व आघवें।
वेंचितांही न मनवे। बहु ऐसें॥ ५९८॥

अगा देवढी वाढी लाहिजे। तेथ मोल देतां न धाइजे।
पेरितां पुरे न म्हणिजे। बीज जेवीं॥ ५९९॥

कां परिस जालिया हातीं। लोहालागीं सर्वसंपत्ती।
वेंचितां ये उन्नती। साधक जैसा॥ ६००॥

तैसीं फळें देखोनि पुढें। काम्य कर्मैं दुवाडें।
करी परि तें थोडें। केलेंही मानी॥ ६०१॥

तेणें फळ कामुकें। यथाविधि नेटकें।
काम्य कीजे तितुकें। क्रियाजात॥ ६०२॥

आणि तयाही केलियाचें। तोंडीं लावी डौंडीचे।
कर्मी या नामपाटाचें। वाणें सारी॥ ६०३॥

तैसा भरे कर्माहंकारु। मग पिता अथवा गुरु।
ते न मनी काळज्वरु। औषध जैसें॥ ६०४॥

तैसेनि साहंकारें। फळाभिलाषियें नरें।
कीजे गा आदरें। जें जें कांहीं॥ ६०५॥

परि तेंही करणें बहुवसा। वळघोनि करी सायासा।
जीवनोपाय कां जैसा। कोल्हांटियाचा॥ ६०६॥

एका कणालागीं उंदीर। अवघा उपसे डोंगर।
कां शेवाळादोषें दर्दुर। समुद्र डहुळी॥ ६०७॥

पैं भिकेपरतें न लाहे। तऱ्ही गारुडी साप वाहे।
काय कीजे शीणचि होये। गोड येकां॥ ६०८॥

हें असो परमाणूचेनि लाभें। पाताळ लंघिती वोळंबे।
तैसें स्वर्गसुखलोभें। विचंबणें जें॥ ६०९॥

तें काम्यकर्म सक्लेश। जाणावें येथ राजस।
आतां चिन्ह परिस। तामसाचें॥ ६१०॥

अनुबन्धं क्षयं हिंसाम् अनपेक्ष्य च पौरुषम्।
मोहादारभ्यते कर्म यत्तत्तामसमुच्यते॥ १८.२५॥

तरि तें गा तामस कर्म। जें निंदेचे काळें धाम।
निषेधाचें जन्म। साच जेणें॥ ६११॥

जें निपजविल्यापाठीं। कांहींच न दिसे दिठी।
रेघ काढिलिया पोटीं। तोयाचे जेवीं॥ ६१२॥

कां काजी धुसळलिया। कां राख फुंकलिया।
कांहीं न दिसे गाळिलिया। वाळु घाणां॥ ६१३॥

ना ना उपणिलिया भूंस। कां विंधिलिया आकाश।
ना ना मांडलिया पाश। वारयासी॥ ६१४॥

हें अवघेंचि जैसें। वांझें होऊनि नासे।
जें केलिया पाठीं तैसें। वायाचि जाय॥ ६१५॥

येऱ्हवीं नर देहाही येवढें। धन आटणिये पडे।
तें कर्म निफजवितां मोडे। जगाचें सुख॥ ६१६॥

जैसा कमळवनीं फास। काढिलिया कांटस।
आपण झिजे नाश। कमळां करी॥ ६१७॥

कां आपण आंगें जळे। आणि नागवी जगाचे डोळे।
पतंग जैसा सळें दीपाचेनि॥ ६१८॥

तैसें सर्वस्व वायां जावो। वरी स्वदेहाही होय घावो।
परि पुढिलां अपावो। निफजविजे जेणें॥ ६१९॥

माशी आपणयातें गिळवी। परि पुढिलां वांती शिणवी।
तें कश्मळ आठवी। आचरण जें॥ ६२०॥

तेंही करावया दोषें। मज सामर्थ्य असे कीं नसे।
हेंही पुढील तैसें। न पाहतां करी॥ ६२१॥

केवढा माझा उपावो। करितां कोण प्रस्तावो।
केलियाही आवो। काय येथ॥ ६२२॥

इये जाणवेची सोये। अविवेकाचेनि पायें।
पुसोनियां होये। साटोप कर्मी॥ ६२३॥

आपला वसौटा जाळोनि। बिसाटे जैसा वह्नी।
कां स्वमर्यादा गिळोनि सिंधु उठी॥ ६२४॥

मग नेणे बहु थोडें। न पाहे मागें पुढें।
मार्गामार्ग येकवढें। करीत चाले॥ ६२५॥

तैसें कृत्याकृत्य सरकटित। आपपर नुरवित।
कर्म होय तें निश्चित। तामस जाण॥ ६२६॥

ऐसी गुणत्रयभिन्ना। कर्माची गा अर्जुना।
हे केली विवंचना। उपपत्तीसीं॥ ६२७॥

आतां इयाची कर्मा भजतां। कर्माभिमानिया कर्ता।
तो जीवही त्रिविधता। पातला असे॥ ६२८॥

चतुराश्रमवशें। एक पुरुष चतुर्धा दिसे।
कर्तया त्रैविध्य तैसें। कर्मभेदें॥ ६२९॥

परि तया तिहीं आंत। सात्विक तंव प्रस्तुत।
सांगेन दत्तचित्र। आकर्णी तूं॥ ६३०॥

मुक्तसङ्गोऽनहंवादी धृत्युत्साहसमन्वितः।
सिध्यसिद्ध्योर्निर्विकारः कर्ता सात्विक उच्यते॥ १८.२६॥

तरि फळोद्देशें सांडलिया। वाढती जेविं सरळिया।
शाखा कां चंदनाच्या। बावनया॥ ६३१॥

कां फळतांही सार्थका। जैसिया नागलतिका।
तैसिया करी नित्यादिका। क्रिया जो कां॥ ६३२॥

परि फळ शून्यता। नाहीं तया विफळता।
पैं फळासीचि पंडुसुता। फळें कायिसीं॥ ६३३॥

आणि आदरें करी बहुवसें। परि मी कर्ता हे नुमसे।
वर्षाकाळींचे जैसे। मेघवृंद॥ ६३४॥

तेवींचि परमात्मलिंगा। समर्पावयाजोगा।
कर्मकलाप पैं गा। निपजावया॥ ६३५॥

तया काळातें नुलंघणें। देशशुद्धीही साधणें।
कां शास्त्रांच्या वातीं पाहणें। क्रियानिर्णय॥ ६३६॥

वृत्तीकरणां येकवळा। चित्त जावों नेदणें फळा।
नियमाचिया सांखळा। वाहे सदा॥ ६३७॥

हा निरोध साहावयालागीं। धैर्याचिया चांगाचांगी।
चिंतवणी जिती आंगीं। वाहे जो कां॥ ६३८॥

आणि आत्मयाचिये आवडी। कर्में करितां वरपडीं।
देहसुखाचिये परवडीं। येवों न लाहे॥ ६३९॥

ऐसी निद्रा दुऱ्हावे। क्षुधा न बाणवे।
सुरवाड न पावे। आंगाचा ठावो॥ ६४०॥

तंव अधिकाधिक। उत्साह धरी आगळीक।
सोनें जैसें पुटीं तुक। तुटलिया कसीं॥ ६४१॥

जरी आवडी आथी साच। तरी जीवितेंहीं सलच।
आगीं घालितां रोमांच। देखिजती सतिये॥ ६४२॥

मा आत्मया येवढिया प्रिया। वालभेला जो धनंजया।
देहही सिदतां तया। काय खेद होईल॥ ६४३॥

म्हणौनि विषय सुरवाड तुटे। जंव जंव देहबुद्धि आटे।
तंव तंव आनंद दुणवटे। कर्मी जया॥ ६४४॥

ऐसेनि जो कर्म करी। आणि कोणे एकें अवसरीं।
तें ठाके ऐसी सरी। वाहे जरी॥ ६४५॥

तरी कडाडीं मोडे गाडा। तो आपणपे मनी अवघडा।
तैसा ठाकलेनिही थोडा। नोहे जो कां॥ ६४६॥

ना तरी आदरिलें। अव्यंग सिद्धी गेलें।
तरि तेंही जिंतिलें। मिरवूं नेणे॥ ६४७॥

इया खुणा कर्म करितां। देखिजे जो पंडुसुता।
तयांतें म्हणिपे तत्त्वता। सात्विक कर्ता॥ ६४८॥

आतां राजसा कर्तेया। वोळखणें हें धनंजया।
जे अभिलाषा जगाचिया। वसौटा तो॥ ६४९॥

रागी कर्मफलप्रेप्सुर्लुब्धो हिंसात्मकोऽशुचिः।
हर्षशोकान्वितः कर्ता राजसः परिकीर्तितः॥ १८.२७॥

जैसा गांवींचिया कश्मळा। उकरडा होय येकवळा।
कां स्मशानीं अमंगळा। आघवयांचि॥ ६५०॥

तयापरी जो अशेषा। विश्वाचिया अभिलाषा।
पायपाखाळणिया दोषां। घरटा जाला॥ ६५१॥

म्हणोनि फळाचा लाग। देखे जिये असलग।
तिये कर्मीं चांग। रोहो मांडी॥ ६५२॥

आणि आपण जालिये जोडी। उपखों नेदी कवडी।
क्षणक्षणां कुरोंडी। जीवाची करी॥ ६५३॥

कृपणचित्तीं ठेवा आपुला। तैसा दक्ष पराविया माला।
बक जैसा खुतला। मासेयासी॥ ६५४॥

आणि गोंवी गेलिया जवळीं। झगटलिया आंग फाळी।
फळें तरी आंत पोकळीं। बोरांटी जैसी॥ ६५५॥

तैसें मनें वाचा कायें। भलतया दुःख देत जाये।
स्वार्थ स्वाधितां न पाहे। पराचे हित॥ ६५६॥

तेवींच आंगें कर्मीं। आचरण नोहे क्षमी।
न निघे मनोधर्मीं। अरोचक॥ ६५७॥

कनकाचिये फळा। आंत माज बाहेरी मौळा।
तैसा सबाह्य दुबळा। शुचित्वें जो॥ ६५८॥

आणि कर्मजात केलिया। फळ लाहे जरी धनंजया।
तरि हरिखें जगा यया। वांकुलिया वाये॥ ६५९॥

अथवा जें आदरिलें। हीनफळ होय केलें।
तरि शोकें तेणें जिंतिलें। धिक्कारों लागे॥ ६६०॥

कर्मीं राहाटी ऐसी। जयातें होती देखती।
तोचि जाण त्रिशुद्धीसी। राजस कर्ता॥ ६६१॥

आतां यया पाठीं येर। जो कुकर्माचा आगर।
तोही करूं गोचर। तामस कर्ता॥ ६६२॥

अयुक्तः प्राकृतः स्तब्धः शठो नैष्कृतिकोऽलसः।
विषादी दीर्घसूत्री च कर्ता तामस उच्यते॥ १८.२८॥

तरि मियां लागलिया कैसें। पुढील जळत असे।
हें नेणिजे हुताशें। जियापरी॥ ६६३॥

पैं शस्त्रें मियां तिखटें। नेणिजे कैसेनि निवटे।
कां नेणिजे काळकूटे। आपलें केलें॥ ६६४॥

तैसा पुढिलिया आपुलिया। घात करीत धनंजया।
आदरी वोखटिया। क्रिया जो कां॥ ६६५॥

तियां करितांही वेळीं। काय जालें हें न सांभाळी।
चळला वायू वाहटुळी। चेष्टे तैसा॥ ६६६॥

पैं करणिया आणि जया। मेळ नाहीं धनंजया।
तो पाहूनि पिसेया। कैंची त्राय॥ ६६७॥

आणि इंद्रियांचें वैरिलें। चरोनि राखे जो जियालें।
बैलातळीं लागलें। गोचिड जैसें॥ ६६८॥

हांसया रुदना वेळ। नेणतां आदरी बाळ।
राहटे उच्छृंखळ। तयापरी॥ ६६९॥

जो प्रकृति आतलेपणें। कृत्याकृत्यस्वाद नेणे।
फुगे केरें धालेपणें। उकरडां जैसा॥ ६७०॥

म्हणौनि मान्याचेनि नांवें। ईश्वराही परी न खालवे।
स्तब्धपणें न मनवे। डोंगरासी॥ ६७१॥

आणि मन जयाचें कलाली। राहाटी फुडी चोरिली।
दिठी कीर ते वोतली। पण्यांगनेची॥ ६७२॥

किंबहुना कपटाचें। देहचि वळिलें तयाचें।
तें जिणें कीं जुवाराचें। टिटघर॥ ६७३॥

नोहे तयाचा प्रादुर्भावो। तो साभिलाष भिल्लांचा गांवो।
म्हणौनि न ये येवों जावों। तया ठाया॥ ६७४॥

आणि आणिकाचें निकें केलें। विरु होय जया आलें।
जैसें अपेय पया मिनलें। लवण करी॥ ६७५॥

कां हिंव ऐसा पदार्थ। घातलिया आगी आंत।
तेचि क्षणीं धडाडित। अग्नि होय॥ ६७६॥

ना ना सुद्रव्यें गोमटी। जालिया शरीरीं पैठीं।
होऊनि ठाती किरीटी। मळचि जेवीं॥ ६७७॥

तैसें पुढिलाचें बरवें। जयाच्या भीतरीं पावें।
आणि विरुद्धचि आघवें। होऊनि निगे॥ ६७८॥

जो गुण घे दे दोष। अमृताचें करी विष।
दूध पाजिलिया देख। व्याळ जैसा॥ ६७९॥

आणि ऐहिकीं जियावें। जेणें परत्रा साच यावें।
तें उचित कृत्य पावे। अवसरीं जिये॥ ६८०॥

तेव्हां जया आपैसी। निद्रा ये ठेविली ऐसी।
दुर्व्यवहारीं जैसी। विटाळें लोटे॥ ६८१॥

पैं द्राक्षरसा आम्ररसा। वेळे तोंड सडे वायसा।
कां डोळे फुटती दिवसा। डुडुळाचे॥ ६८२॥

तैसा कल्याण काळ पाहे। तैं तयातें आळस खाये।
ना प्रमादीं तरि होये। तो म्हणे तैसें॥ ६८३॥

जेवींचि सागराच्या पोटीं। जळें अखंड आगिठी।
तैसा विषाद वाहे गांठीं। जिवाचिये जो॥ ६८४॥

लेंडोराआगीं धूमावधि। कां अपाना आंगीं दुर्गंधि।
तैसा जो जीवितावधि। विषादें केला॥ ६८५॥

आणि कल्पांताचिया पारा। वेगळेंही जो वीरा।
सूत्र धरी व्यापारा। साभिलाषा॥ ६८६॥

अगा जगाही परौती। शुचा वाहे पैं चित्तीं।
करितांविषीं हातीं। तृणही न लगे॥ ६८७॥

ऐसा जो लोका आंत। पापपुंज मूर्त।
देखसी तो अव्याहत। तामस कर्ता॥ ६८८॥

एवं कर्म कर्ता ज्ञान। या तिहींचें त्रिधा चिन्ह।
दाविलें तुज सुजन। चक्रवर्ती॥ ६८९॥

बुद्धेर्भेदं धृतेश्चैव गुणतस्त्रिविधं शृणु।
प्रोच्यमानमशेषेण पृथक्त्वेन धनञ्जय॥ १८.२९॥

आतां अविद्येच्या गांवीं। मोहाची वेढूनि मदवी।
संदेहाचीं आघवीं। लेऊनि लेणीं॥ ६९०॥

आत्मनिश्चयाची बरव। जया आरिसा पाहे सावयव।
तिये बुद्धीचीही धांव। त्रिधा असे॥ ६९१॥

अगा सत्वादि गुणीं इंहीं। काइ एक तिहीं ठायीं।
न कीजेचि येथ पाहीं। जगामाजी॥ ६९२॥

आगीं न वसतां पोटीं। कवण काष्ठ असे सृष्टीं।
तैसें तें कैंचें दृश्यकोटी। त्रिविध जें नोहे॥ ६९३॥

म्हणौनि तिहीं गुणीं। बुद्धी केली त्रिगुणी।
धृतीसिही वांटणी। तैसीचि असे॥ ६९४॥

तेंचि येक वेगळालें। यथा चिन्हीं अळंकारलें।
सांगिजेल उपाइलें। भेदलेपणें॥ ६९५॥

परि बुद्धि धृति इयां। दोहीं भागांमाजि धनंजया।
आधीं रूप बुद्धीचिया। भेदासि करूं॥ ६९६॥

तरि उत्तम मध्यम निकृष्टा। संसारासि गा सुभटा।
प्राणिया येतिया वाटा। तिनी आथी॥ ६९७॥

जे करणीय काम्य निषिद्ध। ते हे मार्ग तिन्ही प्रसिद्ध।
संसार भय संबंध। जीवां ययां॥ ६९८॥

प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्याकार्ये भयाभये।
बन्धं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्विकी॥ १८.३०॥

म्हणौनि अधिकारें मानिलें। जें विधीचेनि वोघे आलें।
तें एकचि येथ भलें। नित्य कर्म॥ ६९९॥

तेंचि आत्मप्राप्ति फळ। दिठी सूनि केवळ।
कीजे जैसें कां जळ। सेविजे ताहने॥ ७००॥

येतुलेनि तें कर्म। सांडी जन्मभय विषम।
करूनि दे सुगम। मोक्षसिद्धि॥ ७०१॥

ऐसें करी तो भला। संसारभयें सांडिला।
कारणीयत्वें आला। मुमुक्षुभागा॥ ७०२॥

तेथ जे बुद्धि ऐसा। बळिया बांधे भरंवसा।
मोक्ष ठेविला ऐसा। जोडेल येथ॥ ७०३॥

म्हणौनि निवृत्तीचि मांडली। सूनि प्रवृत्ति तळीं।
इये कर्मीं बुडकुळी। द्यावी कीं ना॥ ७०४॥

तृषार्ता उदकें जिणें। कां पुरीं पडलिया पव्हणें।
अंधकूपीं गति किरणें। सूर्याचेनि॥ ७०५॥

ना ना पथ्येसि औषध लाहे। तरी रोगें दाटलाही जिये।
कां मीना जिव्हाळा होये। जळाचा तरी॥ ७०६॥

तरि तयाच्या जीविता। नाहीं जेविं अन्यथा।
तसें कर्मीं इये वर्ततां। जोडेचि मोक्ष॥ ७०७॥

हें करणीयाचिया कडे। जें ज्ञान आथी चोखडें।
आणि अकरणीय हें फुडें। ऐसें जाण॥७०८॥

जीं तिये काम्यादिकें। संसारभयदायकें।
अकृत्यपणाचें आंबुखें। पडिलें जयां॥ ७०९॥

तिये कर्मीं अकार्यीं। जन्ममरणसमयीं।
प्रवृत्ति पळवी पायीं। मागिलीचि॥ ७१०॥

पैं आगीमाजि न रिघवे। अथावीं न घलवे।
धगधगीत नागवे। शूळ जेवीं॥ ७११॥

कां काळिया नाग धुंधुवात। देखोनि न घालवे हात।
न वचवे खोपें आंत। व्याघ्राचिये॥ ७१२॥

तैसे कर्म अकरणीय। देखोनि महाभय।
उपजे निःसंदेह। बिद्धि जिये॥ ७१३॥

वाढिलें रांधूनि विषें। तेथ जाणिजे मृत्यु न चुके।
तेवि निषिद्धीं कां देखे। बंधातें जो॥ ७१४॥

मग बंध भय भरितीं। तियें निषिद्धीं प्राप्तीं।
विनियोग जाणे निवृत्ती। कर्मांचिये॥ ७१५॥

ऐसेनि कार्याकार्यविवेकी। जे प्रवृत्तिनिवृत्तीमापकी।
खरा कुडा पारखी। जियापरी॥ ७१६॥

तैसी कृत्याकृत्यशुद्धी। बुझे जे निरवधी।
सात्विक म्हणिपे बुद्धी। तेचि तूं जाण। ७१७॥

यया धर्ममधर्मं च कार्यं चाकार्यमेव च।
अयथावत्प्रजानाति बुद्धिः सा पार्थ राजसी॥ १८.३१॥

आणि बकाच्या गांवीं। घेपे क्षीरनीर सकलवी।
कां अहोरात्रींची गोंवी। आंधळें नेणे॥ ७१८॥

जया फुलाचा मकरंद फावे। तो काष्ठें कोरूं धांवे।
परि भ्रमरपणा नव्हे। अव्हांटा जेवीं॥ ७१९॥

तैसीं इयें कार्याकार्यें। धर्माधर्मरूपें जियें।
तिये न चोजवितां जाये। जाणती जे कां॥

अगा डोळांवीण मोतियें। घेतां पाड मिळे विपायें।
न मिळणें तें आहे। ठेविलें तेथें॥ ७२१॥

तैसें अकरणीय अवचटें। नोडवे तरीच लोटे।
येरवीं जाणे एकवटें। दोन्हीं जे कां॥ ७२२॥

ते गा बुद्धि चोखविखीं। जाण येथ राजसी।
अक्षत टाकिली जैसी। मांदियेवरी॥ ७२३॥

अधर्मं धर्ममिति या मन्यते तमसावृता।
सर्वार्थान्विपरीतांश्च बुद्धिः सा पार्थ तामसी॥ १८.३२॥

आणि राजा जिया वाटा जाये। ते चोरांसि आडव होये।
कां राक्षसां दिवो पाहें। राति होउनि॥ ७२४॥

ना ना निधानचि निदैवा। होये कोळसयाचा उडवा।
पैं असतें आपणपें जीवा। नाहीं जालें॥ ७२५॥

तैसें धर्मजात तितकें। जिये बुद्धीसी पातकें।
साच तें लटिकें। ऐसेंचि बुझे॥ ७२६॥

ते आघवेचि अर्थ। करूनि घाली अनर्थ।
गुण ते ते व्यवस्थित। दोषचि मानी॥ ७२७॥

किंबहुना श्रुतिजातें। अधिष्ठूनि केलें सरतें।
तेतुलेंहि उपरतें। जाणे जे बुद्धी॥ ७२८॥

कोणातेंही न पुसतां। तामसी जाणावी पंडुसुता।
रात्री काय धर्मार्था। साच करावी॥ ७२९॥

एवं बुद्धीचे भेद। तिन्ही तुज विशद।
सांगितले स्वबोध। कुमुदचंद्रा॥ ७३०॥

आतां ययाची बुद्धिवृत्ती। निष्टंकिला कर्मजातीं।
खांद मांडिजे धृती। त्रिविधा जया॥ ७३१॥

तिये धृतीचेहि विभाग। तिन्ही यथालिंग।
सांगिजती चांग। अवधान दे॥ ७३२॥

धृत्या यया धारयते मनःप्राणेन्द्रियक्रियाः।
योगेनाव्यभिचारिण्या धृतिः सा पार्थ सात्विकी॥ १८.३३॥

तरि उदेलिया दिनकर। चोरीसीं थोके अंधःकार।
कां राजज्ञा अव्यवहार। कुंठवी जेवीं॥ ७३३॥

ना ना पवनाचा साट। वाजीनलिया नीट।
आंगेंसीं बोभाट। सांडिती मेघ॥ ७३४॥

कां अगस्तीचेनि दर्शनें। सिंधु घेउनी ठाती मौनें।
चंद्रोदयीं कमळवनें। मिठी देती॥ ७३५॥

हें असो पावो उचलिला। मदमुख न ठेविती खालां।
गर्जोनि पुढां झाला। सिंह जरी॥ ७३६॥

तैसा जो धीर। उठलिया अंतर।
मनादिकें व्यापार। सांडिती उभीं॥ ७३७॥

इंद्रियां विषयांचिया गांठी। अपैसां सुटती किरीटी।
मन मायेच्या पोटीं। रिगती दाही॥ ७३८॥

अधोर्ध्व गुढें काढी। प्राण नवांची पेंडी।
बांधोनि घाली उडी। मध्यमेमाजी॥ ७३९॥

संकल्प विकल्पाचें लुगडें। सांडूनि मन उघडें।
बुद्धि मागिलेकडे। उगीचि बैसे॥ ७४०॥

ऐसी धैर्यराजें जेणें। मन प्राण करणें।
स्वचेष्टांचीं संभाषणें। सांडवीजती॥ ७४१॥

मग आघवींचि सडीं। ध्यानाच्या आंतुल्या मढीं।
कोंडिजती निरवडी। योगाचिये॥ ७४२॥

परी परमात्मया चक्रवर्ती। उगाणिती जंव हातीं।
तंव लांच न घेतां धृती। धरिजती जियां॥७४३॥

ते गा धृति येथें। सात्विक हें निरुतें।
आईक अर्जुनातें। श्रीकांत म्हणे॥ ७४४॥

यया तु धर्मकामार्थान् धृत्या धारयतेऽर्जुन।
प्रसङ्गेन फलाकांक्षी धृतिः सा पार्थ राजसी॥ १८.३४॥

आणि होऊनिया शरीरीं। स्वर्गसंसाराच्या दोहीं घरीं।
नांदे जो पोटभरी। त्रिवर्गोपायें॥ ७४५॥

तो मनोरथांच्या सागरीं। धर्मार्थकामांच्या तारुवावरी।
जेणें धैर्यबळें करी। क्रिया वाणिज्य॥ ७४६॥

जें कर्म भांडवला सुये। तयाची चौगुणी येती पाहे।
येवढें साहस वाहे। जया धृती॥ ७४७॥

ते गा धृती राजस। पार्था येथ परियेस।
आतां आइक तामस। तिसरी जे कां॥ ७४८॥

यया स्वप्नं भयं शोकं विषादं मदमेव च।
न विमुञ्चति दुर्मेधा धृतिः सा पार्थ तामसी॥ १८.३५॥

तरी सर्वाधमें गुणें। जयाचे कां रूपा येणें।
कोळसा काळेपणें। घडला जैसा॥ ७४९॥

अहो प्राकृत आणि हीन। तयाही कीं गुणत्वाचा मान।
परि न म्हणिजे पुण्यजन। राक्षस काई॥ ७५०॥

पैं ग्रहांमाजि इंगळ। तयातें म्हणिजे मंगळ।
तैसा तमीं धसाळ। गुणशब्द हा॥ ७५१॥

जे सर्व दोषांचा वसौटा। तमचि कामऊनि सुभटा।
उभारिला आंगवठा। जया नराचा॥ ७५२॥

तो आळस सूनि असे कांखे। म्हणौनि निद्रे कंही न मुके।
पापें पोषितां दुःखें। न सांडिजे जेवीं॥ ७५३॥

आणि देहा धनाचिया आवडी। सदा भय तयातें न सांडी।
विसंबूं न शके थोंडी। काठिण्य जैसें॥ ७५४॥

आणि पदार्थजातीं स्नेहो। बांधे म्हणौनि तो शोकें ठावो।
केला न शके पाप जावों। कृतघ्नौनि जैसें॥ ७५५॥

आणि असंतोष जीवेंसीं। धरूनि ठेला अहर्निशीं।
म्हणौनि मैत्री तेणेंसी। विषादें केली॥ ७५६॥

लसणातें न सांडी गंधी। कां अपथ्यशीळातें व्याधी।
तैसी केली मरणावधी। विषादें तया॥ ७५७॥

आणि वयसा वित्त काम। ययांचा वाढवी संभ्रम।
म्हणौनि मदें आश्रम। तोचि केला॥ ७५८॥

आगीतें न सांडी ताप। सळातें जातीचा साप।
कां जगाचा वैरी वासिप। अखंड जैसा॥ ७५९॥

ना तरि शरीरातें काळ। न विसंबे कवणे वेळ।
तैसा आथि अढळ। तामसी मद॥ ७६०॥

एवं पांचही हे निद्रादिक। तामसाच्या ठायीं दोख।
जया धृती देख। धरिले आहाती॥ ७६१॥

तिये गा धृती नांवें। तामसी तेथ हें जाणावें।
म्हणीतलें तेणें देवें। जगाचेनी॥ ७६२॥

एवं त्रिविध जे बुद्धि। कीजे कर्मनिश्चयो आधि।
तो धृती या सिद्धि। नेइजो येथ॥ ७६३॥

सूर्यें मार्ग गोचर होये। आणि तो चालती कीर पाये।
परि चालणें तें आहे। धैर्यें जेवीं॥ ७६४॥

तैसी बुद्धि कर्मातें दावी। तें करणसामग्री निफजवी।
परि निफजावया होआवी। धीरता जे॥ ७६५॥

ते हें गा तुजप्रति। सांगीतली त्रिविध धृति।
यया कर्मत्रया निष्पत्ति। जालिया मग॥ ७६६॥

येथ फळ जें एक निफजे। सुख जयातें म्हणिजे।
तेंही त्रिविध जाणिजे। कर्मवशें॥ ७६७॥

तरि फळरूप तें सुख। त्रिगुणीं भेदलें देख।
विवचूं आतां चोख। चोखीं बोलीं॥ ७६८॥

परि चोखी ते कैसी सांगें। पैं घेवों जातां बोलबगें।
कानींचियेही लागे। हातींचा मळ॥ ७६९॥

म्हणौनि जयाचेनि अव्हेरें। अवधानही होय बहिरें।
तेणें आइक हो आदरें। जिवाचेनि॥ ७७०॥

ऐसें म्हणौनि देवो। त्रिविधा सुखाचा प्रस्तावो।
मांडला तो निर्वाहो। निरूपित असे॥ ७७१॥

सुखं त्विदानीं त्रिविधं शृणु मे भरतर्षभ।
अभ्यासाद्रमते यत्र दुःखान्तं च निगच्छति॥ १८.३६॥

म्हणे सुखत्रयसंज्ञा। सांगों म्हणौनि प्रतिज्ञा।
बोलिलों तें प्राज्ञा। ऐक आतां॥ ७७२॥

तरि सुख तें गा किरीटी। दाविजेल तुज दिठी।
जें आत्मयाचिये भेटी। जीवासि होय॥ ७७३॥

परि मात्रेचेनि मापें। दिव्यौषध जैसें घेपे।
कां कथिलाचें कीजे रुपें। रसभावनीं॥ ७७४॥

ना ना लवणाचें जळ। होआवया दोनी चार वेळ।
देऊनि सांडिजती ढाळ। तोयाचे जेवीं॥ ७७५॥

तेविं जालेनि सुखलेशें। जीव भाविलिया अभ्यासें।
जीवपणाचें नासे। दुःख जेथें॥ ७७६॥

तें येथ आत्मसुख। जालें असे त्रिगुणात्मक।
तेंही सांगों एकैक। रूप आतां॥ ७७७॥

यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम्
तत्सुखं सात्विकं प्रोक्तम् आत्मबुद्धिप्रसादजम्॥ १८.३७॥

आतां चंदनाचें बुड। सर्पी जैसें दुवाड।
कां निधानाचें तोंड। विवसिया जेविं॥ ७७८॥

अगा स्वर्गींचें गोमटें। आडव यागसंकटें।
कां बाळपण दासटें। त्रासकाळें॥ ७७९ ॥

हें असो दीपाचिये सिद्धी। अवघड धूम आधीं।
ना तरि तो औषधीं। जिभेचा ठावो॥ ७८० ॥

तयापरि पांडवा। जया सुखाचा रिगावा।
विषम तेथ मेळावा। यमदमांचा॥ ७८१ ॥

देत सर्वस्नेहां मिठी। आंगीं ऐसें वैराग्य उठी।
स्वर्गसंसारा कांटी। काढीतचि॥ ७८२ ॥

विवेक श्रवणें खरपुसें। जेथ व्रताचरणें कर्कशें।
करितां जाती भोकसे। बुद्ध्यादिकांचे॥ ७८३ ॥

सुषुम्नेचेनि तोंडें। गिळिजे प्राणापाणाचे लोंढे।
बोहणियेसीचि येवढें। भारी जेथ॥ ७८४ ॥

जें सारसांही विघडतां। होय वोहाहूनि वत्स काढितां।
ना भणंग दवडितां। भाणयावरूनी॥ ७८५ ॥

पैं माये पुढौनि बाळक। काळें नेतां एकुलतें एक।
होय कां उदक। तुटतां मीना॥ ७८६ ॥

तैसें विषयांचें घर। इंद्रियां सांडितां थोर।
युगांत होय तें वीर। विराग साहाती॥ ७८७ ॥

ऐसा जया सुखाचा आरंभ। दावी काठिण्याचा क्षोभ।
मग क्षीराब्धीं लाभ। अमृताचा जैसा॥ ७८८ ॥

पहिलिया वैराग्य गरळा। धैर्यशंभु वोडवी गळा।
तरि ज्ञानामृतें सोहळा। पाहे जेथें॥ ७८९ ॥

पैं कवलिताहि कोपे ऐसें। द्राक्षांचें हिरवेपण असे।
तें परिपाकीं कां जैसें। माधुर्य आते॥ ७९० ॥

तें वैराग्यादिक तैसें। पिकलिया आत्मप्रकाशें।
मग वैराग्येंसींही नाशे। अविद्याजात॥ ७९१ ॥

तेव्हां सागरीं गंगा जैसी। आत्मीं मीनल्या बुद्धि तैसी।
अद्वयानंदाची आपैसी। खाणी उघडे॥ ७९२ ॥

ऐसें स्वानुभव विश्रामें। वैराग्यमूळ जें परिणमे।
तें सात्विक येणें नामें। बोलिजे सुख॥ ७९३ ॥

विषयेन्द्रियसंयोगात् यत्तदग्रेऽमृतोपमम्
परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतम्॥ १८.३८ ॥

आणि विषयेंद्रिया। मेळ होतां धनंजया।
जें सुख जाय थडिया। सांडूनि दोन्ही॥ ७९४ ॥

अधिकारिया रिगतां गांवो। होय जैसा उत्साहो।
कां रिणावरी विवाहो। विस्तारिला॥ ७९५ ॥

ना ना रोगिया जिभेपासीं। केळें गोड साखरेसीं।
कां बचनागाची जैसी। मधुरता पहिली॥ ७९६ ॥

पहिलें संवचोराचें मैत्र। हाट भेटीचें कलत्र।
कां लाघवीयाचे विचित्र। विनोद ते॥ ७९७ ॥

तैसें विषयेंद्रियदोखीं। जें सुख जीवातें पोखी।
मग उपडिला खडकीं। हंस जैसा॥ ७९८ ॥

तैसी जोडी आघवी आटे। जीविताचा ठाय फिटे।
सुकृताचियाही सुटे। धनाची गांठी॥ ७९९ ॥

आणिक भोगिलें जें कांहीं। तें स्वप्न तैसें होय नाहीं।
मग हानीचाचि घाई। लोळावें उरे॥ ८०० ॥

ऐसें आपत्ती जें सुख। ऐहिकीं परिणमे देख।
परत्रीं कीर विख। होउनि परते॥ ८०१ ॥

जें इंद्रियजाता लळा। दिधलिया धर्माचा मळा।
जाळूनि भोगिजे सोहळा। विषयांचा जेथ॥ ८०२ ॥

तेथ पातकें बांधिती थावो। तियें नरकीं देती ठावो।
जेणें सुखें हा अपावो। परत्रीं ऐसा॥ ८०३ ॥

पैं नामें विष मधुरें। परि मारूनि अंतीं खरें।
तैसें आदि जें गोडिरें। अंतीं कडु॥ ८०४ ॥

पार्था तें सुख साचें। वळिलें आहे रजाचें।
म्हणौनि न शिवें तयाचें। आंग कांहीं॥ ८०५ ॥

यदग्रे चानुबन्धे च सुखं मोहनमात्मनः।
निद्रालस्यप्रमादोत्थं तत्तामसमुदाहृतम्॥ १८.३९॥

आणि अपेयाचेनि पानें। अखाद्याचेनि भोजनें।
स्वैर स्त्रीसंधानें। होय जें सुख॥ ८०६॥

कां पुढिलांचेनि मारें। तरि परस्वापहारें।
जें सुख अवतरे। भाटाच्या बोलीं॥ ८०७॥

जें आलस्यावरी पोखिजे। निद्रेमाजी जें देखिजे।
जयाच्या आद्यंतीं भुलिजे। आपुली वाट॥ ८०८॥

तें सुख गा पार्था। तामस जाण सर्वथा।
हें बहुधा न सांगोंचि जे कथा। असंभाव्य हें॥ ८०९॥

ऐसें कर्मभेदें मुदलें। फळसुखही त्रिधा झालें।
तें हें यथागमें केलें। गोचर तुज॥ ८१०॥

तें कर्ता कर्म फळ। हे त्रिपुटी येकीं केवळ।
वांचूनि कांहींचि नसे स्थूळ। सूक्ष्मीं इये॥ ८११॥

आणि हे तंव त्रिपुटी। तिहीं गुणीं इंहीं किरीटी।
गुंफिली असे पटीं। तांतुवीं जैसी॥ ८१२॥

न तदस्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु वा पुनः।
सत्त्वं प्रकृतिजैर्मुक्तं यदेभिः स्यात् त्रिभिर्गुणैः॥ १८.४०॥

म्हणौनि प्रकृतीच्या आलोकीं। न बंधिजे इंही सत्वादिकीं।
तैसी स्वर्गीं ना मृत्युलोकीं। आथी वस्तु॥ ८१३॥

कैंचा लोंवेवीण कांबळा। मातियेवीण मोदळा।
कां जळेंवीण कल्लोळा। होणें आहे॥ ८१४॥

तैसें न होनि गुणाचें। सृष्टीच्या रचना रचे।
ऐसें नाहींच गा साचें। प्राणिजात॥ ८१५॥

यालागीं हें सकळ। तिहीं गुणांचेंचि केवळ।
घडलें आहे निखिळ। ऐसें जाण॥ ८१६॥

गुणीं देवां त्रयी लाविली। गुणीं लोकीं त्रिपुटी पाडिली।
चतुर्वर्णी घातली। सिनानी उळिगें॥ ८१७॥

ब्राह्मणक्षत्रियविशां शूद्राणां च परन्तप।
कर्माणि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणैः॥ १८.४१॥

तेचि चारी वर्ण। पुससी जरी कोण कोण।
तरि जयां मुख्य ब्राह्मण। धुरेचे कां॥ ८१८॥

येर क्षत्रिय वैश्य दोन्ही। तेही ब्राह्मणाच्याचि मानिजे मानीं।
जे ते वैदिक विधानीं। योग्य म्हणौनी॥ ८१९॥

चौथा शूद्र जो धनंजया। वेदीं लाग कीर नाहीं तया।
तऱ्ही वृत्ति वर्णत्रया। अधीन तयाची॥ ८२०॥

तिये वृत्तीचिया जवळिका। वर्णत्रयांब्राह्मणांदिकां।
अहो शूद्रही कीं देखा। चौथा जाला॥ ८२१॥

जैसा फुलाचेनि सांगातें। तांतु तुरंबिजे श्रीमंतें।
तैसें द्विजसंगें शूद्रातें। स्वीकारी श्रुती॥ ८२२॥

असैसी गा पार्था। हे चतुर्वर्ण व्यवस्था।
करूं आतां कर्मपथा। यांचिया रूप॥ ८२३॥

जिहीं गुणीं ते वर्ण चारी। जन्म मृत्यूंचिये कातरीइ।
चुकोनियां ईश्वरीं। पैठे होती॥ ८२४॥

जियें आत्मप्रकृतीचे इंहीं। गुणीं सत्वादिकीं तिहीं।
कर्में चौघां चहूं ठाई। वांटिलीं वर्णां॥ ८२५॥

जैसें बापें जोडिलें लेंकां। वांटिले सूर्यें मार्ग पांथिकां।
ना ना व्यापार सेवकां। स्वामीनें जैसे॥ ८२६॥

तैसी प्रकृतीच्या गुणीं। जया कर्मांची वेल्हावणी।
केली आहे वर्णीं। चहूं इंहीं॥ ८२७॥

तेथ सत्वें आपल्या आंगीं। समीननिमीन भागीं।
दोघे केले नियोगी। ब्राह्मण क्षत्रिय॥ ८२८॥

आणि रज परी सात्विक। तेथ ठेविले वैश्य लोक।
रजचि तमभेसक। तेथ शूद्र ते गा॥ ८२९॥

ऐसा येकाचि प्राणिवृंदा। भेद चतुर्वर्णधा।
गुणींचि इंहीं प्रबुद्धा। केला जाण॥ ८३०॥

मग आपलें ठेविलें जैसें। आइतेंचि दीपें दिसे।
गुणभिन्न कर्म तैसें। शास्त्र दावी॥ ८३१॥

तेंचि आतां कोण कोण। वर्णविहिताचें लक्षण।
हें सांगों ऐक श्रवण। सौभाग्यनिधी॥ ८३२॥

शमो दमस्तपः शौचं क्षान्तिरार्जवमेव च।
ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम्॥ १८.४२॥

तरि सर्वेंद्रियाच्या वृत्ती। घेऊनि आपुल्या हातीं।
बुद्धि आत्मया मिळे एकांती। प्रिया जैसि॥ ८३३॥

ऐसा बुद्धीचा उपरम। तया नाम म्हणिपे शम।
तो गुण गा उपक्रम। जया कर्माचा॥ ८३४॥

आणि बाह्येंद्रियाचें धेंडें। पिटूनि विधीचेनि दंडें।
नेदिजे अधर्माकडे। कंहींचि जावों॥ ८३५॥

तो पैं गा शमा विरजा। दम गुण जेथ दुजा।
आणि स्वधर्माचिया वोजा। जिणें जें कां॥ ८३६॥

तेवींचि सटवीचिये राती। न विसंबिजे जेवि वाती।
तैसा ईश्वर निर्णय चित्ती। वाहणें सदा॥ ८३७॥

तया नाम तप। हें तिजया गुणाचें रूप।
आणि शौचही निष्पाप। द्विविध जेथ॥ ८३८॥

मन भावशुद्धी भरलें। आंग क्रिया अळंकारिलें।
ऐसें सबाह्य जियालें। साजिरें जें कां॥ ८३९॥

तया नाम शौच पार्था। तो कर्मी गुण जये चौथा।
आणि पृथ्वीचिया परी सर्वथा। सर्व जें साहाणें॥ ८४०॥

ते गा क्षमा पांडवा। गुण जेथ पांचवा।
स्वरामाजिं सुहावा। पंचम जैसा॥ ८४१॥

आणि वांकडेनि वोघेंसीं। गंगा वाहे उजूचि जैसी।
कां पृष्टीं वळला उसीं। गोडी जैसी॥ ८४२॥

तैसा विषमांही जीवां। लागीं उजुकार बरवा।
तें आर्जव गा साहावा। जेथींचा गुण॥ ८४३॥

आणि पाणियें प्रयत्ने माळी। अखंड जचे झाडामुळीं।
परि तें आघवेंचि फळीं। जाणे जेवीं॥ ८४४॥

तैसें शास्त्राचारें तेणें। ईश्वरच एक पावणें।
हें फुडें जें कां जाणणें। तें येथ ज्ञान॥ ८४५॥

तें गा कर्मी जिये। सातवा गुण होये।
आणि विज्ञान हें पाहें। एवंरूप॥ ८४६॥

तरि सत्वशुद्धीचिये वेळे। शास्त्रें कां ध्यानबळें।
ईश्वरतत्वींचि मिळे। निष्टंक बुद्धी॥ ८४७॥

हें विज्ञान बरवें। तें गुणरत्न जेथ आठवें।
आणि आस्तिक्य जाणावें। नववा गुण॥ ८४८॥

पैं राजमुद्रा आथिलियां। प्रजा भजे भलतयां।
तेविं शास्त्रें स्वीकारिलिया। मार्गमात्रातें॥ ८४९॥

आदरें जें कां मानणें। तें आस्तिक्य मी म्हणें।
तो नववा गुण जेणें। कर्म तें साच॥ ८५०॥

एवं नवही शमादिक। गुण जेथ निर्दोष।
तें कर्म जाण स्वाभाविक। ब्राह्मणाचें॥ ८५१॥

तो नवगुण रत्नाकर। यया नवरत्नांचा हार।
न फेडीत ले दिनकर। प्रकाश जैसा॥ ८५२॥

ना ना चांपा चांपौळीं पूजिला। चंद्र चंद्रिका धवळला।
कां चंदन निजें चर्चिला। सौरभ्यें जेवीं॥ ८५३॥

तेविं नवगुणटिकलग। लेणें ब्राह्मणाचें अव्यंग।
कंहींचि न संडी आंग। ब्राह्मणाचें॥ ८५४॥

आतां उचित तें क्षत्रिया। तेंही कर्म धनंजया।
सांगों ऐक प्रज्ञेचिया। भरोवरी॥ ८५५॥

शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम्।
दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम्॥ १८.४३॥

तरि भानु हा तेजें। नापेक्षी जेविं विरजे।
कां सिंहे न पाहिजे। जावळिया॥ ८५६॥

ऐसा स्वयंभ जो जीवें लाठ। सावायेंवीण उद्भट।
तें शौर्य गा जेथ श्रेष्ठ। पहिला गुण॥ ८५७॥

आणि सूर्याचेनि प्रतापें। कोडिही नक्षत्र हारपे।
ना तो तरि न लोपे। सचंद्रीं तिहीं॥ ८५८॥

तैसें आपुलेनि प्रौढीगुणें। जगा या विस्मय देणें।
आपण तरी न क्षोभणें। कायसेनही। ८५९॥

तें प्रागल्भ्यरूप तेजा। जिये कर्मीं गुण दुजा।
आणि धीर तो तिजा। जेथींचा गुण॥ ८६०॥

वरिपडलिया आकाश। बुद्धीचे डोळे मानस।
झांकी नातें परियेस। धैर्य जेथे॥ ८६१॥

आणि पाणी हो कां भलतेतुकें। परि तें जिणौनि पद्म फांके।
कां आकाश उंचिया जिंके। आवडे तयातें ८६२॥

तेविं विविधा अवस्था। पातलिया जिणौनि पार्था।
प्रज्ञा फळतया अर्था। वेझ देणें जें॥ ८६३॥

तें दक्षत्व गा चोख। जेथ चौथा गुण देख।
आणि जुंझ अलौकिक। पांचवा गुण॥ ८६४॥

आदित्याचीं झाडें। सदा सन्मुख सूर्याकडे।
तेविं समोर शत्रूपुढें। होणें जें कां॥ ८६५॥

माहेवणी प्रयत्नेंसीं। चुकविजे सेजे जैसी।
रिपू पाठी नेदिजे तैसी। समरंगणीं॥ ८६६॥

हा क्षत्रियाचेया आचारीं। पांचवा गुणेंद्र अवधारीं।
चहूं पुरुषार्थी शिरीं। भक्ति जैसी॥ ८६७॥

आणि जालेनि फुलें फळें। शाखिया जैसी मोकळे।
कां उदार परिमळें। पद्माकर॥ ८६८॥

ना ना आवडीचेनि मापें। चांदिणें भलतेणें घेपे।
पुढिलांचेनि संकल्पें। तैसें जें देणें॥ ८६९॥

तें उमप गा दान। जेथ सहावें गुणरत्न।
आणि आज्ञे एकायतन। होणें जें कां॥ ८७०॥

पोषूनि अवयव आपुले। करविजती मातविले।
तेविं पालणें लोभविलें। जग जें भोगणें॥ ८७१॥

तया नाम ईश्वरभावो। जो सर्व सामर्थ्याचा ठावो।
तो गुणांमाजि रावो। सातवा जेथ॥ ८७२॥

ऐसें जें शौर्यादिकीं। इंहीं सात गुणविशेखीं।
अळंकृत सप्तऋखीं। आकाश जैसें॥ ८७३॥

तैसें सप्तगुणीं विचित्र। कर्म जें जगीं पवित्र।
तें सहज जाण क्षात्र। क्षत्रियाचें॥ ८७४॥

ना ना क्षत्रिय नव्हे नरु। तो सत्वसोनियाचा मेरु।
म्हणौनि गुणस्वर्गा आधारु। सातां इयां॥ ८७५॥

ना तरि सप्तगुणार्णवीं। परिवारली बरवी।
हे क्रिया नव्हे पृथ्वी। भोगीतसे तो॥ ८७६॥

कां गुणांचे सातांही ओघीं। हे क्रिया ते गंगा जगीं।
तया महोदधीचिया आंगीं। विलसे जैसी॥ ८७७॥

परि हें बहु असे देख। शौर्यादि गुणात्मक।
कर्म गा नैसर्गिक। क्षत्र जातीसी॥ ८७८॥

आतां वैश्याचिये जाती। उचित जे महामती।
ते ऐकें निरुती। क्रिया सांगों॥ ८७९॥

कृषिगोरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम्।
परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम्॥१८.४४॥

तरि भूमि बीज नांगर। यया भांडवलाचा आधार।
घेऊनि लाभ अपार। मेळवणें जें॥ ८८०॥

किंबहुना कृषीजिणें। गोधनें राखोनि वर्तणें।
कां समर्घाची विकणें। महार्घ वस्तु॥ ८८१॥

येतुलालाचि पांडवा। वैश्यातें कर्माचा मेळावा।
हा वैश्यजातिस्वभावा। आंतुला जाण॥ ८८२॥

आणि वैश्य क्षत्रिय ब्राह्मण। हे द्विजन्मे तीन्ही वर्ण।
ययांचें जें शुश्रूषण। तें शूद्रकर्म॥ ८८३॥

पैं द्विजसेवेपरौतें। धांवणें नाहीं शूद्रातें।
एवं चतुर्वर्णोचितें। दाविलीं कर्में॥ ८८४॥

स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः।
स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विन्दति तच्छृणु॥ १८.४५॥

आतां इयेचि विचक्षणा। वेगळालिया वर्णा।
उचित जैसें करणां। शब्दादिक॥ ८८५॥

ना तरि जळदच्युता। पाणिया उचित सरिता।
सरितेसी पांडुसुता। सिंधु उचित॥ ८८६॥

तैसें वर्णाश्रमवशें। जें करणीय आलें असे।
गोरेया आंगा जैसें। गोरेपण॥ ८८७॥

तया स्वभावविहिता कर्मा। शास्त्राचेनि मुखें वीरोत्तमा।
प्रवर्तावयालागीं प्रमा। अढळ कीजे॥ ८८८॥

पैं आपुलेंच रत्न थितें। घेपे पारखियाचेनि हातें।
तैसें स्वकर्म आपैतें शास्त्रें करावें॥ ८८९॥

जैसी दिठी असे आपुलिया ठाई। परि दीपेंवीण भोग नाहीं।
मार्गु न लाहतां काई। पाय असतां होय॥ ८९०॥

म्हणौनि ज्ञातिवशें साचार। सहज असे जो अधिकार।
तो आपुलालिया शास्त्रें गोचर। आपण कीजे॥ ८९१॥

मग घरींचाचि ठेवा। जेविं डोळ्यां दावी दिवा।
तरी घेतां काय पांडवा। आडळ असे॥ ८९२॥

तैसें स्वभावें भागा आलें। वरी शास्त्रें खरें केलें।
तें विहित जो आपुलें। आचरे गा॥ ८९३॥

परि आळस सांडुनी। फळकाम दवडुनी।
आंगें जीवें मांडुनी। तेथेंचि भरु॥ ८९४॥

वोघीं पडिलें पाणी। नेणे आनानी वाहणी।
तैसा जाय आचरणीं। व्यवस्थौनी॥ ८९५॥

अर्जुना जो या परी। तें विहित कर्म स्वयें करी।
तो मोक्षाच्या ऐलतीरीं। पैठा होय॥ ८९६॥

जे अकरणा आणि निषिद्धा। न वचेचि कांहीं संबंधा।
म्हणौनि भवा विरुद्धा। मुकला तो॥ ८९७॥

आणि काम्य कर्माकडे। न परतेचि जेथ कोडें।
तेथ चंदनाचेंही खोडें। न लेचि तो॥ ८९८॥

येर नित्य कर्म तंव। फळत्यागें वेंचिलें सर्व।
म्हणौनि मोक्षाची शिंव। ठाकूं लाहे॥ ८९९॥

ऐसेनि शुभाशुभीं संसारीं। सांडिला तो अवधारीं।
वैराग्य मोक्षद्वारीं। उभा ठाके॥ ९००॥

जें सकळ भाग्याची सीमा। मोक्षलाभाची जें प्रमा।
ना ना कर्ममार्गश्रमा। शेवटु जेथ॥ ९०१॥

मोक्षफळें दिधली वोल। जें सुकृततरूचें फूल।
तयें वैराग्यीं ठेवी पाउल। भंवरु जैसा॥ ९०२॥

पाहीं आत्मज्ञान सुदिनाचा। वाधावा सांगतया अरुणाचा।
उदय त्या वैराग्याचा। ठावो पाये॥ ९०३॥

किंबहुना आत्मज्ञान। जेणें हातां ये निधान।
तें वैराग्य दिव्यांजन। जीवें ले तो॥ ९०४॥

ऐसी मोक्षाची योग्यता। सिद्धी जाय तया पंडुसुता।
अनुसरोनि विहिता। कर्मा यया॥ ९०५॥

हें विहित कर्म पांडवा। आपुला अनन्य वोलावा।
आणि हेंचि परम सेवा। मज सर्वात्मकाची॥ ९०६॥

पैं आघवांचि भोगेंसीं। पतिव्रता क्रीडे प्रियेंसीं।
कीं तयाचि नामें जैसीं। तपें तियां केलीं॥ ९०७॥

कां बाळका एकी माये। वांचोनि जिणें काय आहे।
म्हणौनि सेविजे कीं तो होये। पाटाचा धर्म॥ ९०८॥

ना ना पाणी म्हणौनि मासा। गंगा न सांडितां जैसा।
सर्वतीर्थ सहवासा। वरपड जाला॥ ९०९॥

तैसे आपलिया विहिता। उपाय असे न विसंबतां।
ऐसा कीजे कीं जगन्नाथा। आभार पडे॥ ९१०॥

अगा जयाचें विहित। तें ईश्वराचें मनोगत।
म्हणौनि केलिया निभ्रांत। सांपडेचि तो॥ ९११॥

पैं जीवाचें कसीं उतरली। ते दासी कीं गोसवीण झाली।
तैसी सेवेची तया मवली। वहि जेवीं॥ ९१२॥

तैसें स्वामीचिया मनोभावा। न चुकिजे हेचि परमसेवा।
येर तें गा पांडवा। वाणिज्य करणें॥ ९१३॥

यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम्।
स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः॥ १८.४६॥

म्हणौनि विहित क्रिया केली। नव्हे तयाची खूण पाळिली।
जयापासूनि कां आलीं। आकार भूतें॥ ९१४॥

जो अविद्येचिया चिंधिया। गुंडूनि जीव बाहुलिया।
खेळवीतसे तिगुणिया। अहंकार रज्जू॥ ९१५॥

जेणें जग हें समस्त। आंत बाहेरी पूर्ण भरित।
जालें आहे दीपजात। तेजें जैसें॥ ९१६॥

तया सर्वात्मका ईश्वरा। स्वकर्म कुसुमांची वीरा।
पूजा केली होय अपारा। तोषालागीं॥ ९१७॥

म्हणौनि तिये पूजे। रिझलेनि आत्मराजें।
वैराग्यसिद्धि देयिजे। पसाय तया॥ ९१८॥

जिये वैराग्यदशे। ईश्वराचेनि वेधवशें।
हें सर्वही नावडे जैसें। वांत होत॥ ९१९॥

प्राणनाथाचिया आधी। विरहिणीतें जिणेंही बाधी।
तैसें सुखजात त्रिशुद्धी। दुःखचि लागे॥ ९२०॥

सम्यक् ज्ञान नुदैजतां। वेधेंचि तन्मयता।
उपजे ऐसी योग्यता। बोधाची लाहे॥ ९२१॥

म्हणौनि मोक्ष लाभालागीं। जो व्रतें वाहतसे आंगीं।
तेणें स्वधर्म आस्था चांगी। अनुष्ठावा॥ ९२२॥

श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात् स्वनुष्ठितात्।
स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम्॥ १८.४७॥

अगा आपला हा स्वधर्म। आचरणीं जरी विषम।
तरी पाहावा तो परिणाम। फळेल जेणें॥ ९२३॥

जैं सुखालागीं आपणपयां। निंबचि आथी धनंजया।
तैं कडुवटपणा तयाचिया। उबगिजे ना॥ ९२४॥

फळणया ऐलीकडे। केळीतें पाहतां आस मोडे।
ऐसी त्यजिली तरी जोडे। तैसें कें गोमटें॥ ९२५॥

तेविं स्वधर्म सांकडु। देखोनि केला जरी कडु।
तरि मोक्ष सुरवाडु। अंतरला कीं॥ ९२६॥

आणि आपली माये। कुब्ज जरी आहे।
तरी जियेतें नोहे। स्नेह कुऱ्हें कीं॥ ९२७॥

येरी जिया पराविया। रंभेहूनि बरविया।
तिया काय कराविया। बालकें तेणें॥ ९२८॥

अगा पाणियाहूनि बरवें। तुपीं गुण कीर आहे।
परि मीना काय होये। असणें तेथ॥ ९२९॥

पैं आघविया जगा जें विख। तें विखकीडिया पीयूष।
आणि जगा गुळ तें देख। मरण दे तया॥ ९३०॥

म्हणौनि जे विहित जया जेणें। फिटे संसाराचें धरणें।
क्रिया कठोर जऱ्ही तेणें। तेचि करावी॥ ९३१॥

येरा पराचारा बरविया। ऐसें होईल टेंकलेया।
पायांचे चालणें डोइया। केलें जैसें॥ ९३२॥

यालागीं कर्म आपलें। जें जातिस्वभावें असे आलें।
तें करी तेणें जिंतिलें। कर्मबंधातें॥ ९३३॥

आणि स्वधर्मचि पाळावा। परधर्म तो गाळावा।
हा नेमही पांडवा। न कीजेचि पैं॥ ९३४॥

तरी आत्मा दृष्ट नोहे। तंव कर्म करणें कां ठाये।
आणि करणें तेथ आहे। आयास आधीं॥ ९३५॥

सहजं कर्म कौन्तेय सदोषमपि न त्यजेत्।
सर्वारम्भा हि दोषेण धूमेन अग्निरिवावृताः॥ १८.४८॥

म्हणौनि भलतिये कर्मीं। आयास जऱ्हीं उपक्रमीं।
तरी काय स्वधर्मीं। दोष सांगें॥ ९३६॥

अगा उजू वाटा चालावें। तऱ्ही पायचि शिणवावे।
ना आड रानें धांवावें। तऱ्ही तेंची॥ ९३७॥

पैं शिळा कां सिदोरिया। दाटणें एक धनंजया।
परि जें वाहतां विसावया। मिळिजे तें घेपे॥ ९३८॥

येऱ्हवीं कणा आणि भूसा। कांडितांही सोस सरिसा।
जेंचि रंधन श्वानमांसा। तेंचि हवी॥ ९३९॥

दधी जळाचिया घुसळणा। व्यापार सारिखेचि विचक्षणा।
वाळुवे तिळा घाणा। गाळणें एक॥ ९४०॥

पैं नित्य होम देयावया। कां सैरा आगी सुवावया।
फुंकितां धूम धनंजया। साहणें तेंचि॥ ९४१॥

परी धर्मपत्नी धांगडी। पोसितां जरी एकी वोढी।
तरि कां अपरवडी। आणावी आंगा॥ ९४२॥

हां गा पाठीं लागला घाई। मरण न चुकेचि पाहीं।
तरि समोरला काई। आगळें न कीजे॥ ९४३॥

कुळस्त्री दांडयाचे घाये। परघर रिगालीही जरि साहे।
तरि स्वपतीतें वांये। त्यजिलें कीं॥ ९४४॥

तैसें आवडतेंही करणें। न निपजे शिणल्याविणें।
तरि विहित बा रे कोणे। बोलें भारी॥ ९४५॥

तरि थोडेंचि अमृत घेतां। सर्वस्व वेंचो कां पंडुसुता।
जेणें जोडे जीविता। अक्षयत्व॥ ९४६॥

येर कांह्या मोलें वेंचुनी। विष पियावें घेउनी।
आत्महत्येसि निमोनी। जायिजे जेणें॥ ९४७॥

तैसें जाचूचियां इंद्रियें। वेंचूनि आयुष्याचेनि दियें।
सांचले पापीं आन आहे। दुःखावांचूनि॥ ९४८॥

म्हणोनि करावा स्वधर्म। जो करितां हिरोनि घे श्रम।
उचित देईल परम। पुरुषार्थराज॥ ९४९॥

या कारणें किरीटी। स्वधर्माचिये राहटी।
न विसंबिजे संकटी। सिद्धमंत्र जैसा॥ ९५०॥

कां नाव जैसी उदधीं। महारोगीं दिव्यौषधी।
न विसंबिजे तया बुद्धी। स्वकर्म येथ॥ ९५१॥

मग ययाचि गा कपिध्वजा। स्वकर्माचिया महापूजा।
तोषला ईश तम रजा। झाडा करुनी॥ ९५२॥

शुद्ध सत्वाचिया वाटा। आणि आपुली उत्कंठा।
भव स्वर्ग काळकूटा। ऐसे दावी॥ ९५३॥

जिये वैराग्य येणें बोलें। मागां संसिद्धि रूप केलें।
किंबहुना तें आपुलें। मेळवी खागें॥ ९५४॥

मग जिंतिलिया हें भोये। पुरुष सर्वत्र जैसा होये।
कां जालाही जें लाहे। तें आतां सांगों॥ ९५५॥

असक्तबुद्धिः सर्वत्र जितात्मा विगतस्पृहः।
नैष्कर्म्यसिद्धिं परमां संन्यासेनाधिगच्छति॥ १८.४९॥

तरि देहादिक हें संसारें। सर्वही मांडलेंसे जें गुंफिरें।
तेथ नातुडे तो वागुरे। वारा जैसा॥ ९५६॥

पैं परिपाकाचिये वेळे। फळ देठें ना देठ फळें।
न धरे तैसें स्नेह खुळें। सर्वत्र होय॥ ९५७॥

पुत्र वित्त कलत्र। हे जालियाही स्वतंत्र।
माझें न म्हणे पात्र। विषाचे जैसें॥ ९५८॥

हें असो विषयजातीं। बुद्धि पोळली ऐसी माघोउती।
पाउलें घेऊनि एकांतीं। हृदयाच्या रिघे॥ ९५९॥

ऐसया अंतःकरण। बाह्य येतां तयाची आण।
न मोडी समर्था भेण। दासी जैसी॥ ९६०॥

तैसें ऐक्याचिये मुठी। माजिवडें चित्त किरीटी।
करूनि वेधीं नेहटी। आत्मयाच्या॥ ९६१॥

तेव्हां दृष्टादृष्ट स्पृहे। निमणे जालेंचि आहे।
आगीं दडपलिया धुयें। राहिजे जैसें॥ ९६२॥

म्हणौनि नियमिलिया मानसीं। स्पृहा नासोनि जाय आपैसी।

किंबहुना तो ऐसी। भूमिका पावे॥ ९६३॥

पैं अन्यथा बोध आघवा। मावळोनि तया पांडवा।
बोध मात्रींचि जीवा। ठाव होय॥ ९६४॥

धरवणी वेंचें सरे। तैसें भोगें प्राचीन पुरे।
नवें तंव नुपकरे। कांहींचि करूं॥ ९६५॥

ऐशी कर्मीं साम्य दशा। होय तेथ वीरेशा।
मग श्रीगुरु आपैसा। भेटेचि गा॥ ९६६॥

रात्रीची चौपाहरी। वेंचलिया अवधारीं।
डोळयां तमारी। मिळे जैसा॥ ९६७॥

कां येऊनि फळांचा घड। पारुषवी केळीची वाढ।
श्रीगुरू भेटोनि करी पाड। मुमुक्षू तैसा॥ ९६८॥

मग आलिंगिला पूर्णिमा। जैसा उणीव सांडी चंद्रमा।
तैसें होय वीरोत्तमा। गुरुकृपा तया॥ ९६९॥

तेव्हां अबोधमात्र असे। तो तंव तया कृपा नाशे।
तेथ निशिसवें जैसें। आंधारें जाय॥ ९७०॥

तैसी अबोधाचिये कुशी। मर्म कर्ता कार्य ऐशी।
त्रिपुटी असे ते जैसी। गाभिणी मारिली॥ ९७१॥

तैसेंचि अबोध नाशासवें। नाशे क्रियाजात आघवें।
ऐसा समूळ संभवे। संन्यास हा॥ ९७२॥

येणें मूळाज्ञानसंन्यासें। दृश्याचा जेथ ठावो पुसे।
तेथ बुझावें तें आपैसें। तोचि आहे॥ ९७३॥

चेइलियावरी पाहीं। स्वप्नींचिया तिये डोहीं।
आपणयातें काई। काढूं जाइजे॥ ९७४॥

तैं मी नेणें आतां जाणेन। हें सरलें तया दुःस्वप्न।
जाला ज्ञातृज्ञेयाविहीन। चिदाकार॥ ९७५॥

मुखाभासेंसीं आरिसा। परता नेलिया वीरेशा।
पहातेंपणेंवीण जैसा। पाहता ठाके॥ ९७६॥

तैसें नेणणें जें गेलें। तेणें जाणणेंही नेलें।
मग निष्क्रिय उरलें। चिन्मात्रचि॥ ९७७॥

तेथ स्वभावें धनंजया। नाहीं कोणीचि क्रिया।
म्हणौनि प्रवाद तया। नैष्कर्म्य ऐसा॥ ९७८॥

तें आपुले आपणपें। असताचि होऊनि हारपे।
तरंग कां वायुलोपें। समुद्र जैसा॥ ९७९॥

तैसें न होणें निपजे। ते नैष्कर्म्य सिद्धि जाणिजे।
सर्व सिद्धींत सहजें। परम हेची॥ ९८०॥

देउळाचिया कामा कळस। परम गंगेसी सिंधुप्रवेश।
कां सुवर्णशुद्धी कस। सोळावा जैसा॥ ९८१॥

तैसें आपुलें नेणणें। फेडिजे कां जाणणें।
तेंहि गिळूनि असणें। ऐशी जे दशा॥ ९८२॥

तियेपरतें कांहीं। निपजणें येथ नाहीं।
म्हणौनि म्हणिपे पाहीं। परमसिद्धि ते॥ ९८३॥

परि हेचि आत्मसिद्धि। जो कोणी भाग्यनिधि।
श्रीगुरुकृपालब्धि। काळीं पावे॥ ९८४॥

सिद्धिं प्राप्तो यथा ब्रह्म तथाऽप्नोति निबोध मे।
समासेनैव कौन्तेय निष्ठा ज्ञानस्य या परा॥ १८.५०॥

उदयजतां दिनकर। प्रकाशचि आते अंधार।
कां दीपसंगे कर्पूर। दीपचि होय॥ ९८५॥

तया लवणाची कणिका। मिळतखेंवों उदका।
उदकचि होऊनि देखा। ठाके जेवीं॥ ९८६॥

कां निद्रित चेवविलिया। स्वप्नेंसीं नीद वायां।
जाऊनि आपणपयां। मिळे जैसा॥ ९८७॥

तैसें जया कोण्हासि दैवें। गुरुवाक्य श्रवणाचिसवें।
द्वैत गिळोनि विसंवे। आपणया वृत्ती॥ ९८८॥

तयासि मग कर्म करणें। हें बोलिजेलचि कवणें।
आकाशा येणें जाणें। आहे काई॥ ९८९॥

म्हणौनि तयासि कांहीं। त्रिशुद्धि करणें नाहीं।
परि ऐसें जरि हें कांहीं। नव्हे जया॥ ९९०॥

कानां वचनाचिये भेटी। सरिसाचि पैं किरीटी।
वस्तु होऊनि उठी। कवणि एक जो॥ ९९१॥

येऱ्हवीं स्वकर्माचेनि वन्हीं। काम्यनिषिद्धाचिया इंधनीं।
रज तम कीर दोन्ही। जाळिलीं आधीं॥ ९९२॥

पुत्र वित्त पर लोक। यया तिहींचा अभिलाख।
घरीं होइ पाइक। हेंही जालें॥ ९९३॥

इंद्रियें सैरा पदार्थी। रिगतां विटाळलीं होतीं।
तियें प्रत्त्याहार तीर्थी। न्हाणिलीं कीर॥ ९९४॥

आणि स्वधर्माचें फळ। ईश्वरीं अर्पूनि सकळ।
घेऊनि केलें अढळ। वैराग्यपद॥ ९९५॥

ऐसी आत्म साक्षात्कारीं। लाभे ज्ञानाची उजरी।
ते सामग्री कीर पुरी। मेळविली॥ ९९६॥

आणि तेचि समयीं। सद्गुरु भेटले पाहीं।
तेवींचि तिहीं कांहीं। वंचिजेना॥ ९९७॥

परि वोखद घेतखेंवो। काय लाभे आपला ठावो।
कां उदयजतांचि दिवो। मध्याह्न होय॥९९८॥

सुक्षेत्रीं आणि वोलटें। बीजहि पेरिलें गोमटें।
तरि आलोट फळ भेटे। परि वेळें कीं गा॥ ९९९॥

जोडला मार्ग प्रांजळ। मिनला सुसंगाचाही मेळ।
तरि पाविजे वांचूनि वेळ। लागेचि कीं॥ १०००॥

तैसा वैराग्यलाभ जाला। वरि सद्गुरूही भेटला।
जीवीं अंकुर फुटला। विवेकाचा॥ १००१॥

तेणें ब्रह्म एक आथि। येर आघवीचि भ्रांति।
हेही कीर प्रतीति। गाढ केली॥ १००२॥

परि तेंचि जें परब्रह्म। सर्वात्मक सर्वोत्तम।
मोक्षाचेंही काम। सरे जेथ॥ १००३॥

यया तिन्हीं अवस्था पोटीं। जिरवी जें गा किरीटी।
तया ज्ञानासिही मिठी। दे जें वस्तु॥ १००४॥

ऐक्याचें एकपण सरे। जेथ आनंदकणही विरे।
कांहींचि नुरोनि उरे। जें कांहीं गा॥ १००५॥

तियें ब्रह्मीं ऐक्यपणें। ब्रह्मचि होऊनि असणें।
तें क्रमेंचि करूनि तेणें। पाविजे पैं॥ १००६॥

भुकेलियापासीं। वोगरिलें षड्रसीं।
तो तृप्ती प्रतिग्रासीं। लाहे जेवीं॥ १००७॥

तैसा वैराग्याचा वोलावा। विवेकाचा तो दिवा।
आंबुतिथां आत्मठेवा। काढीचि तो॥ १००८॥

तरी भोगिजे आत्म ऋद्धी। येवढी योग्यतेची सिद्धी।
जयाच्या आंगीं निरवधी। लेणें जाली॥ १००९॥

तो जेणें क्रमें ब्रह्म। होणें करी गा सुगम।
तया क्रमाचें आतां वर्म। आईक सांगों॥ १०१०॥

बुद्ध्या विशुद्धया युक्तो धृत्यात्मानं नियम्य च।
शब्दादीन्विषयांस्त्यक्त्वा रागद्वेषौ व्युदस्य च॥ १८.५१॥

तरी गुरू दाविलिया वाटा। येऊनि विवेकतीर्थ तटा।
धुऊनियां मळवटा। बुद्धीचा तेणें॥ १०११॥

मग राहूनें उगळिली। प्रभा चंद्रें आलिंगिली।
तैसी शुद्धत्वें जडली। आपणयां बुद्धि॥ १०१२॥

सांडूनि कुळें दोन्ही। प्रियासी अनुसरे कामिनी।
द्वंद्वत्यागें स्वचिंतनीं। पडली तैसी॥ १०१३॥

आणि ज्ञाना ऐसें जिव्हार। नेवों नेवों निरंतर।
इंद्रियीं केले थोर। शब्दादिक जे॥ १०१४॥

तें रश्मिजाळ काढलेया। मृगजळ जाय लया।
तैसें वृत्तिरोधें तयां। पांचांहीं केलें॥ १०१५॥

नेणतां अधमाचिया अन्ना। खादलिया कीजे वमना।
तैसीं वोकविलीं सवासना। इंद्रियें विषयीं॥ १०१६॥

मग प्रत्यगावृत्ती चोखटें। लाविलीं गंगेचेनि तटें।
ऐसीं प्रायश्चित्तें धुवटे। केलीं येणें॥ १०१७॥

पाठीं सात्विकें धीरें तेणें। शोधारलीं तियें करणें।
मग मनेंसीं योगधारणे। मेळविलीं॥ १०१८॥

तेविंचि प्राचीनें इष्टानिष्टें। भोगेंसीं येउनी भेटे।
तेथ देखिलियाही वोखटें। द्वेष न करी॥ १०१९॥

अथवा गोमटेंचि विपायें। तें आणूनि पुढां सूये।
तयालागीं न होये। साभिलाष॥ १०२०॥

यापरि इष्टानिष्टीं। रागद्वेष किरीटी।
त्यजूनि गिरिकपाटीं। निकुंजीं वसे॥ १०२१॥

विविक्तसेवी लघ्वाशी यतवाक्कायमानसः।
ध्यानयोगपरो नित्यं वैराग्यं समुपाश्रितः॥ १८.५२॥

गजबजा सांडिलिया। वसवी वनस्थळिया।
अंगाचिया मांदिया। एकलेया॥ १०२२॥

शमदमादिकीं खेळे। न बोलणेंचि चावळे।
गुरुवाक्याचेनि मेळें। नेणे वेळ॥ १०२३॥

आणि आंगा बळ यावें। ना तरी क्षुधा जावें।
कां जिभेचे पुरावे। मनोरथ॥ १०२४॥

भोजन करितां विखीं। यया तिहींतें न लेखी।
आहारीं मिती संतोषीं। माप न सूये॥ १०२५॥

अनशनाचेनि पावकें। हारपती प्राण पोखे।
इतुकियाचि भाग मोटकें। अशन करी॥ १०२६॥

आणि परपुरुषें कामिली। कुळवधू आंग न घाली।
निद्रालस्या न मोकली। अशन तैसें॥ १०२७॥

दंडवतांचेनि प्रसंगें। भुयीं हन अंग लागे।
वांचूनि येर निघे। राभस्य तेथ॥ १०२८॥

देह निर्वाहा पुरतें। राहाटवी हातांपायांतें।
किंबहुना आपैतें। सबाह्य केलें॥ १०२९॥

आणि मनाचा उंबरा। वृत्तीसी देखों नेदी वीरा।
तेथ कें वाग्व्यापारा। अवकाश असे॥ १०३०॥

ऐसेनि देह वाचा मानस। हें जिणोनि बाह्यप्रदेश।
आकळिलें आकाश। ध्यानाचें तेणें॥ १०३१॥

गुरुवाक्यें उठविला। बोधीं निश्चय आपला।
न्याहाळी हातीं घेतला। आरिसां जैसा॥ १०३२॥

पैं ध्याता आपणपेंचि परी। ध्यानरूप वृत्तिमाझारीं।
ध्येयत्वें घे हे अवधारीं। ध्यानरूढी गा॥ १०३३॥

तेथ ध्येय ध्यान ध्याता। ययां तिहीं एकरूपता।
होय तंव पंडुसुता। कीजे तें गा॥ १०३४॥

म्हणौनि तो मुमुक्षु। आत्मज्ञानीं जाला दक्षु।
परि पुढां सूनि पक्षु। योगाभ्यासाचा॥ १०३५॥

अपान रंध्र द्वया। माझारीं धनंजया।
पार्ष्णी पिडूनियां। कांवरुमूळ॥ १०३६॥

आकुंचूनि अध। देऊनि तिन्ही बंध।
करूनि एकवद। वायुभेदा॥ १०३७॥

कुंडलिनी जागऊनि। मध्यमा विकाशूनि।
आधारादि भेदुनि। अग्निवरी॥ १०३८॥

सहस्र दळांचा मेघ। पीयूषें वर्षोनि चांग।
तो मूळवरी वोघ। आणूनियां॥ १०३९॥

नाचतया पुण्य गिरी। चिद्भैरवाच्या खापरीं।
मनपवनाची खीच पुरी। वाढूनियां॥ १०४०॥

जालिया योगाचा गाढा। मेळावा सूनि हा पुढां।
ध्यान मागिलीकडां। स्वयंभ केलें॥ १०४१॥

आणि ध्यान योग दोन्ही। इयें आत्मतत्वज्ञानीं।
पैठीं होआवया निर्विघ्नीं। आधींचि तेणें॥ १०४२॥

वीतरागते सारिखा। जोडूनि ठेविला सखा।
तो आघवियाचि भूमिकां। सवें चाले॥ १०४३॥

पहावें दिसे तंववरी। दिठीतें न सांडी दीप जरी।
तरी कें अवसरी। देखावया॥ १०४४॥

तैसें मोक्षीं प्रवर्तलिया। वृत्ती ब्रह्मीं जाय लया।
तंव वैराग्य आथी तया। भंग कैंचा॥ १०४५॥

म्हणौनि सवैराग्य। ज्ञानाभ्यास तो सभाग्य।
करूनि जाला योग्य। आत्मलाभा॥ १०४६॥

ऐसी वैराग्याची आंगीं। बाणूनियां वज्रांगी।
राजयोग तुरंगीं। आरूढला॥ १०४७॥

वरी आड पडिलें दिठी। सानें थोर निवटी।
तें बळी विवेकमुष्टीं। ध्यानाचे खांडें॥ १०४८॥

ऐसेनि संसार रणा आंत। आंधारीं सूर्य तैसा असे जात।
मोक्ष विजयश्रिये वरैत। होआवयालागीं॥ १०४९॥

अहङ्कारं बलं दर्पम् कामं क्रोधं परिग्रहम्।
विमुच्य निर्ममः शान्तो ब्रह्मभूयाय कल्पते॥ १८.५३॥

तेथ आडवावया आले। दोषवैरी जे धोपटिले।
तयांमाजी पहिले। देहाहंकार॥ १०५०॥

जो न मोकली मारूनि। जीवों नेदी उपजवोनि।
विचंबवी खोडां घालूनी। हाडांचिया॥ १०५१॥

तयाचा देहदुर्ग हा थारा। मोडोनि घेतला तो वीरा।
आणि बळ हा दुसरा। मारिला वैरी॥ १०५२॥

जो विषयांचेनि नांवें। चौगुणेंही वरी थांवे।
जेणें मृतावस्था धांवे। सर्वत्र जगा॥ १०५३॥

तो विषयविषाचा ठावो। आघविया दोषांचा रावो।
परी ध्यानखड्गाचा घावो। साहेल कैंचा॥ १०५४॥

आणि प्रिय विषयप्राप्ती। करी जया सुखाची व्यक्ती।
तेचि घालूनि बुंथी। आंगी जो वाजे॥ १०५५॥

जो सन्मार्गा भुलवी। मग अधर्माच्या आडवीं।
सूनि वाघां सांपडवी। नरकादिकां॥ १०५६॥

तो विश्वासें मारितां रिपु। निवटूनि घातला दर्पु।
आणि जयाचा हा कंपु। तापसांसी॥ १०५७॥

क्रोधा ऐसा महादोख। जयाचा देख परिपाक।
भरिजे तंव अधिक। रिता होय जो॥ १०५८॥

तो काम कोणेच ठायीं। नसे ऐसें केलें पाहीं।
कीं तेंचि क्रोधाही। सहजें आलें॥ १०५९॥

मुळाचें तोडणें जैसें। होय कां शाखोद्देशें।
काम नाशलेनि नाशे। तैसा क्रोध॥ १०६०॥

म्हणौनि काम वैरी। जाला जेथ ठाणोरी।
तेथ सरली वारी। क्रोधाचीही॥ १०६१॥

आणि समर्थ आपुला खोडा। शिसें वाहवी जैसा होडा।
तैसा भुंजौनि जो गाढा। परिग्रहो॥ १०६२॥

जो माथांचि पालावणी। अंगा अवगुण घालवी।
जीवें दांडी घेववी। ममत्वाची॥ १०६३॥

शिष्यशास्त्रादि विलासें। मठादि मुद्रेचेनि मिसें।
घातले आहाती फांसे। निःसंगा जेणें॥ १०६४॥

घरीं कुटुंबपणें सरे। तरी वनीं वन्य होऊनि अवतरे।
नागवीयाही शरीरें। लागला आहे॥ १०६५॥

ऐसा दुर्जय जो परिग्रहो। तयाचा फेडूनि ठावो।
भव विजयाचा उत्साहो। भोगीतसे॥ १०६६॥

तेथ अमानित्वादि आघवे। ज्ञानगुणाचे जे मेळावे।
ते कैवल्य देशींचे आघवे। राव जैसे आले॥ १०६७॥

तेव्हां सम्यक् ज्ञानाचिया। राणिवा उगाणूनि तया।
परिवार होऊनियां। राहत आंगें॥ १०६८॥

प्रवृत्तीचिये राजबिदीं। अवस्थाभेद प्रमदीं।
कीजत आहे प्रतिपदीं। सुखाचें लोण॥ १०६९॥

पुढां बोधाचिये कांबीवरी। विवेक दृश्याची मांदी सारी।
योग भूमिका आरती करी। येती जैसिया॥ १०७०॥

तेथ ऋद्धिसिद्धींचीं अनेगें। वृंदें मिळती प्रसंगें।
तिये पुष्पवर्षीं आंगें। नाहातसे तो ॥ १०७१॥

ऐसेनि ब्रह्मैक्यासारिखें। स्वराज्य येतां जवळिकें।
झळंबित आहे हरिखें। तिन्ही लोक॥ १०७२॥

तेव्हां वैरिया कां मैत्रिया। तयासि माझें म्हणावया।
समानता धनंजया। उरेचिही ना॥ १०७३॥

हें ना भलतेणें व्याजें। तो जयातें म्हणे माझें।
तें नोडवेचि कां दुजें। अद्वितीय जाला॥ १०७४॥

पैं आपुलिया एकी सत्ता। सर्वही कवळूनियां पंडुसुता।
कंहीं न लगती ममता। धाडिली तेणें॥ १०७५॥

ऐसा जिंतिलिया रिपुवर्ग। अपमानिलिया हें जग।
अपैसा योग तुरंग। स्थिर जाला॥ १०७६॥

वैराग्याचें गाढलें। अंगत्राण होतें भलें।
तेंही नावेक ढिलें। तेव्हां करी॥ १०७७॥

आणि निवटी ध्यानाचें खांडें। तें दुजें नाहींचि पुढें।
म्हणून हात आसुडे। वृत्तीचाही॥ १०७८॥

जैसें रसौषध खरें। आपुलें काज करूनि पुरें।
आपणही नुरे। तैसें होतसे॥ १०७९॥

देखोनि ठाकिता ठावो। धांवता थिरावे पावो।
तैसा ब्रह्म सामिप्यें थावो। अभ्यास सांडी॥ १०८०॥

घडतां महोदधीसी। गंगा वेग सांडी जैसी।
कां कामिनी कांतापासीं। स्थिर होय॥ १०८१॥

ना ना फळतिये वेळे। केळीची वाढी मांटुळे।
कां गांवापुढें वळे। मार्ग जैसा॥ १०८२॥

तैसा आत्म साक्षात्कार। होईल देखोनि गोचर।
ऐसा साधन हतियेर। हळूचि ठेवी॥ १०८३॥

म्हणौनि ब्रह्मेंसिं तया। ऐक्याचा समो धनंजया।
होतसे तैं उपाया। वोहट पडे॥ १०८४॥

मग वैराग्याची गोंधळुक। जे ज्ञानाभ्यासाचे बार्धक्य।
योगफळाचाही परिपाक। दशा जे कां॥ १०८५॥

ते शांति पैं गा सुभगा। संपूर्ण ये तयाचिया आंगा।
तैं ब्रह्म होआवयाजोगा। होय तो पुरुष॥ १०८६॥

पुनवेहुनि चतुर्दशी। जेतुलें उणेपण शशी।
कां सोळेया ऊनि जैसी। पंधरावी वानी॥ १०८७॥

सागरींही पाणी वेगें। संचरे तें रूप गंगे।
येर निश्चळ जें उगें। तें समुद्र जैसा॥ १०८८॥

ब्रह्मा आणि ब्रह्म होतिये। योग्यते तैसा पाड आहे।
तेंचि शांतीचेनि लाहे। हातें तो गा॥ १०८९॥

पैं तेंचि होणेनवीण। प्रतीती आलें जें ब्रह्मपण।
ते ब्रह्म होती जाण। योग्यता येथ॥ १०९०॥

ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न कांक्षति।
समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम्॥ १८.५४॥

ते ब्रह्मभाव योग्यता। पुरुष तो मग पंडुसुता।
आत्मबोध प्रसन्नता। पदीं बैसे॥ १०९१॥

जेणे निपजे रससोय। तो तापही जैं जाय।
तैं ते कां होय। प्रसन्न जैसी॥ १०९२॥

ना ना भरतिया लगबगा। शरत्काळीं सांडिजे गंगा।
कां गीत राहतां उपांगा। वोहट पडे॥ १०९३॥

तैसा आत्मबोधीं उद्यम। करितां होय जो श्रम।
तोही जेथें शम। होऊनि जात॥ १०९४॥

आत्मबोध प्रशस्ती। हे तिये दशेची ख्याती।
ते भोगीतसे महामती। योग्य तो गा॥ १०९५॥

तेव्हां आत्मत्वें शोचावें। कांहीं पावावया कामावें।
हें सरलें समभावें। भरितें तया॥ १०९६॥

उदया येतां गभस्ती। ना ना नक्षत्र व्यक्ती।
हारवीजती दीप्ती। आंगिका जेवीं॥ १०९७॥

तेवीं उठतिया आत्मप्रथा। हे भूतभेद व्यवस्था।
मोडीत मोडीत पार्था। वास पाहे तो॥ १०९८॥

पाटियेवरील अक्षरें। जैसीं पुसतां येती करें।
तैसीं हारपती भेदांतरे। तयाचिये दृष्टी॥ १०९९॥

तैसेनि अन्यथा ज्ञानें। जियें घेपती जागरस्वप्नें।
तियें दोन्ही केलीं लीनें। अव्यक्तामाजी॥ ११००॥

मग तेंही अव्यक्त। बोध वाढतां झिजत।
पुरलां बोधीं समस्त। बुडोनि जाय॥ ११०१॥

जैसी भोजनाच्या व्यापारीं। क्षुधा जिरत जाय अवधारीं।
मग तृप्तीच्या अवसरीं। नाहींच होय॥ ११०२॥

ना ना चालीचिया वाढी। वाट होय जाय थोडी।
मग पातलाठायीं बुडी। देऊनि निमे॥ ११०३॥

कां जागृती जंव उद्दीपे। तंव तंव निद्रा हारपे।
मग जागीनलिया स्वरूपें। नाहींच होय॥ ११०४॥

हें ना आपुलें पूर्णत्व भेटे। जेथ चंद्रासी वाढी खुंटे।
ते शुक्ल पक्ष आटे। निःशेष जैसा॥ ११०५॥

तैसा बोध्यजात गिळित। बोधबोधें ये मज आंत।
मिसळला तेथ साद्यंत। अबोध गेला॥ ११०६॥

तेव्हां कल्पांताचिये वेळे। नदी सिंधूंचें पेंडवळें।
मोडुनि भरिलें जळें। आब्रह्म जैसें॥ ११०७॥

ना ना गेलिया घट मठ। आकाश ठाके एकवट।
कां जळोनि काष्टें काष्ठ। वह्नीचि होय॥ ११०८॥

ना तरि लेणियाचे ठसे। आटोनि गेलिया मुसे।
नामरूप भेदें जैसें। सांडिजे सोनें॥ ११०९॥

हेंही असो चेइलया। हें स्वप्न नाहीं जालया।
मग आपणचि आपणयां। उरिजे जैसें। १११०॥

तैसा मी एक वांचूनि कांहीं। तया तयाहीसकट नाहीं।
हे चौथी भक्ति पाहीं। माझी तो लाहे॥ ११११॥

येर आर्त जिज्ञासु अर्थार्थी। हे भजती जिये पंथीं।
ते तिन्ही पावोनि चौथी। म्हणिपत आहे॥ १११२॥

येऱ्हवीं तिजी ना चौथी। हे पहिली ना सरती।
पैं माझिये सहजस्थिती। भक्ति नाम॥ १११३॥

जे नेणणें माझें प्रकाशूनि। अन्यथात्वें मातें दाऊनि।
सर्वही सर्वीं भजौनि। बुझावीतसे॥ १११४॥

जो जेथ जैसें पाहों बसे। तया तेथ तैसेंचि असे।
हें उजियेडें कां दिसे। अखंडें जेणें॥ १११५॥

स्वप्नाचें दिसणें न दिसणें। जैसें आपलेनि असलेपणें।
विश्वाचें आहे नाहीं जेणें। प्रकाशें तैसें॥ १११६॥

ऐसा हा सहज माझा। प्रकाश जो कपिध्वजा।
तो भक्ति या वोजा। बोलिजे गा॥ १११७॥

म्हणोनि आर्ताच्या ठायीं। हे आर्ति होऊनि पाहीं।
अपेक्षणीय जें कांहीं। तें मीचि केला॥ १११८॥

जिज्ञासुपुढां वीरेशा। हेचि होऊनि जिज्ञासा।
मी कां जिज्ञासु ऐसा। दाखविला॥ १११९॥

हेचि होऊनि अर्थना। मीचि माझ्या अर्थीं अर्जुना।
करूनि अर्थाभिधाना। आणी मातें॥ ११२०॥

एवं घेऊनि अज्ञानातें। माझी भक्ति जे हे वर्ते।
ते दावी मज द्रष्टयातें। दृश्य करूनि॥ ११२१॥

येथें मुखचि दिसे मुखें। या बोला कांहीं न चुके।
परी दुजेपण हें लटिकें। आरिसा करी॥ ११२२॥

दिठी चंद्रचि घे साचें। परि येतुलें हें तिमिराचें।
जे एकचि असे तयाचे। दोनी दावी॥ ११२३॥

तैसा सर्वत्र मीचि मियां। घेपतसें धनंजया।
परि दृश्यत्व हें वायां। अज्ञानवशें॥ ११२४॥

तें अज्ञान आतां फिटलें। माझें द्रष्टृत्व मज भेटलें।
निजबिंबीं एकवटलें। प्रतिबिंब जैसें॥ ११२५॥

पैं जेव्हांही असे किडाळ। तेव्हांही सोनेंचि अढळ।
परि तें कीड गेलिया केवळ। उरे जैसें॥ ११२६॥

हां गा पूर्णमे आधीं कायी। चंद्र सावयव नाहीं।
परि तिये दिवसीं भेटे पाहीं। पूर्णता तया॥ ११२७॥

तैसा मीचि अज्ञान द्वारें। दिसें परि हस्तांतरें।
मग द्रष्टत्वीं तें सरे। मियांचि मी लाभें॥ ११२८॥

म्हणौनि दृश्यपथा। अतीत माझा पार्था।
भक्तियोग चवथा। म्हणितला गा॥ ११२९॥

भक्त्या मामभिजानाति यावन्यश्चास्मि तत्त्वतः।
ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनन्तरम्॥ १८.५५॥

इया ज्ञान भक्ती सहज। भक्त एकवटला मज।
तो मीचि केवळ हें तुज। श्रुतही आहे॥ ११३०॥

जे उभऊनियां भुजा। ज्ञानिया तो आत्मा माझा।
हें बोलिलों कपिध्वजा। सप्तमाध्यायीं॥ ११३१॥

ते हे कल्पादि भक्ति मियां। श्रीभागवतमिषें ब्रह्मया।
उत्तम म्हणोनि धनंजया। उपदेशिली॥ ११३२॥

ज्ञानी इयेतें स्वसंविति। शैव म्हणती शक्ति।
आम्ही परम भक्ति। आपली म्हणों॥ ११३३॥

हे मज मिळतिये वेळे। तयां कर्मयोगियां फळे।
मग समस्तही निखिळें। मियांचि भरे॥ ११३४॥

तेथ वैराग्य विवेकेंसीं। आटे बंध मोक्षेंसीं।
वृत्ती तये अवृत्तीसीं। बुडोनि जाय॥ ११३५॥

घेऊनि ऐलपणातें। परत्व हारपे जेथें।
गिळूनि चाऱ्ही भूतें। आकाश जैसें॥ ११३६॥

तयापरि थडथांद। साध्य साधनातीत शुद्ध।
तें मी होऊनि ऐकवद। भोगितो मातें॥ ११३७॥

घडोनि सिंधूचिया आंगा। सिंधूवरी तळपे गंगा।
तैसा पाड तया भोगा। अवधारिजो॥ ११३८॥

कां आरिसयासि आरिसा। उटूनि दाविलिया जैसा।
देखणा अतिशय तैसा। भोगणा तिये॥ ११३९॥

हें असो दर्पण नेलिया। तो मुखबोधही गेलिया।
देखलेपण एकलेयां। आस्वादिजे जेवीं॥ ११४०॥

चेइलया स्वप्न नाशे। आपलें ऐक्यचि दिसे।
तें दुजेनवीण जैसें। भोगिजे कां॥ ११४१॥

तेंचि जालिया भोग तयाचा। न घडे हा भाव जयांचा।
तिहीं बोलें केविं बोलाचा। उच्चार कीजे॥ ११४२॥

तयांच्या नेणों गावीं। रवि प्रकाशी हन दिवीं।
कीं व्योमालागीं मांडवी। उभिली तिहीं॥ ११४३॥

हां गा राजन्यत्व नव्हतां आंगीं। रावो रायपण काय भोगी।
कां आंधार हन आलिंगी। दिनकरातें॥ ११४४॥

आणि आकाश जें नव्हे। तया आकाश काय जाणवे।
रत्नाच्या रूपीं मिरवे। गुंजांचें लेणें॥ ११४५॥

म्हणौनि मी होणें नाहीं। तया मीचि आहें केंही।
मग भजेल हें कायी। बोलों कीर॥ ११४६॥

या लागीं तो कर्मयोगी। मी जालाचि मातें भोगी।
तारुण्य कां तरुणांगी। जियापरी॥ ११४७॥

तरंग सर्वांगीं तोय चुंबी। प्रभा सर्वत्र विलसे बिंबीं।
ना ना अवकाश नभीं। लुंठत जैसा॥ ११४८॥

तैसा रूप होऊनि माझें। मातें क्रियावीण तो भजे।
घनाकार कां सहजें। सोनयातें जेवीं॥ ११४९॥

कां चंदनाची द्रुती तैसी। चंदनीं भजे अपैसी।
कां अकृत्रिम शशीं। चंद्रिका ते॥ ११५०॥

तैसी क्रिया कीर न साहे। तऱ्हीं अद्वैतीं भक्ति आहे।
हें अनुभवाचिजोगें नव्हे। बोला ऐसें॥ ११५१॥

तेव्हां पूर्व संस्कारछंदें। जें कांहीं तो अनुवादे।
तेणें आळविलेनि वोदें। बोलता मीचि॥ ११५२॥

बोलता बोलताचि भेटे। तेथें बोलेल हे न घटे।
तें मान तंव गोमटें। स्तवन माझें॥ ११५३॥

म्हणोनि तया बोलतां। बोली बोलता मी भेटतां।
मौन होय तेणें तत्वता। स्तवितो मातें॥ ११५४॥

तैसेचि बुद्धि कां दिठी। जें तो देखों जाय किरीटी।
तें देखणें दृश्य लोटी। देखतेंचि दावी॥ ११५५॥

आरिसया आधीं जसें। देखतेंचि मुख दिसे।
तयाचें देखणें तैसें। मेळवी द्रष्टें॥ ११५६॥

दृश्य जाउनियां द्रष्टें। द्रष्टयासीचि जैं भेटे।
तैं एकलेपणें न घटे। द्रष्टेपणही॥ ११५७॥

तेथ स्वप्नींचिया प्रिया। चेवोनि झोंबों गेलिया।
ठायिजे दोन्ही न होनियां। आपणचि जैसें॥ ११५८॥

कां दोन्हीं काष्ठांचिये घुष्टी। माजी वह्नी येक उठी।
तो दोन्ही हे भाष आटी। आपणचि होय॥ ११५९॥

ना ना प्रतिबिंब हातीं। घेऊं गेलिया गभस्ती।
बिंबताही असती। जाय जैसी॥ ११६०॥

तैसा मी होऊनि देखतें। तो घेऊं जाय दृश्यातें।
तेथ दृश्य ने थितें। द्रष्टृत्वेंसीं॥ ११६१॥

रवि आंधार प्रकाशिता। नुरेचि जेविं प्रकाशता।
तेविं दृश्यीं नाहीं द्रष्ट्रता। मी जालिया॥ ११६२॥

मग देखिजे ना न देखिजे। ऐसी जे दशा निपजे।
तें तें दर्शन माझें। साचोकारें॥ ११६३॥

तें भलतयाही किरीटी। पदार्थाचिया भेटी।
द्रष्टृदृश्यातीता दृष्टी। भोगितो सदा॥ ११६४॥

आणि आकाश हें आकाशें। दाटलें न ढळे जैसें।
मियां आत्मेन आपणपें तैसें। जालें तया॥ ११६५॥

कल्पांतीं उदक उदकें। रुंधिलिया वाहों ठाके।
तैसा आत्मेनि मियां येकें। कोंदला तो॥ ११६६॥

पावो आपणयां वोळघे। केविं वह्नि आपणपयां लागे।
आपणपां पाणी रिघे। स्नाना कैसें॥ ११६७॥

म्हणोनि सर्व मी जालेपणें। ठेलें तया येणें जाणें।
तेंचि गा यात्रा करणें। अद्वया मज॥ ११६८॥

पैं जळावरील तरंग। जरी धांविन्नला सवेग।
तरी नाहीं भूमिभाग। क्रमिला तेणें॥ ११६९॥

जें सांडावें कां मांडावें। जें चालणें जेणें चालावें।
तें तोयचि एक आघवें। म्हणोनियां॥ ११७०॥

गेलियाही भलतेउता। उदकपणें पंडुसुता।
तरंगाची एकात्मता। न मोडेचि जेवीं॥ ११७१॥

तैसा मीपणें हा लोटला। तो आघवेयाचि मज आला।
या यात्रा होय भला। कापडी माझा॥ ११७२॥

आणि शरीर स्वभाववशें। कांहीं एक करूं जरी बैसे।
तरी मीचि तो तेणें मिषें। भेटे तया॥ ११७३॥

तेथ कर्म आणि कर्ता। हे जाऊनि पंडुसुता।
मियां आत्मेनि मज पाहतां। मीचि होय॥ ११७४॥

पैं दर्पणातें दर्पणें। पाहिलिया होय न पाहाणें।
सोनें झांकिलिया सुवर्णें। न झांके जेवीं॥ ११७५॥

दीपातें दीपें प्रकाशिजे। तें न प्रकाशिणेंचि निपजे।
तैसें कर्म मियां कीजे। तें करणें कैंचें॥ ११७६॥

कर्मही करीतचि आहे। जैं करावें हे भाष जाये।
तैं न करणेंचि होये। तयाचें केलें॥ ११७७॥

क्रियाजात मी जालेपणें। घडे कांहींचि न करणें।
तयाचि नांव पूजणें। खुणेचें माझें॥ ११७८॥

म्हणौनि करितयाही वोजा। तें न करणें हेंचि कपिध्वजा।
निपजे तिया महापूजा। पूजी तो मातें॥ ११७९॥

एवं तो बोले तें स्तवन। तो देखे तें दर्शन।
अद्वया मज गमन। तो चाले तेंचि॥ ११८०॥

तो करी तेतुली पूजा। तो कल्पी तो जप माझा।
तो निजे तेचि कपिध्वजा। समाधि माझी॥ ११८१॥

जैसें कनकेंसी कांकणें। असिजे अनन्यपणें।
तो भक्तियोगें येणें। मजसीं तैसा॥ ११८२॥

उदकीं कल्लोळ। कापुरीं परिमळ।
रत्नी उजाळ। अनन्य जैसा॥ ११८३॥

किंबहुना तंतूसीं पट। कां मृत्तिकेसीं घट।
तैसा तो एकवट। मजसीं माझा॥ ११८४॥

इया अनन्यसिद्धा भक्ती। या आघवाचि दृश्यजातीं।
मज आपणपेंया सुमती। द्रष्टयातें जाणे॥ ११८५॥

तिन्ही अवस्थांचेनि द्वारें। उपाध्युपहिताकारें।
भावाभाव रूप स्फुरे। दृश्य जें हें॥ ११८६॥

तें हें आघवेंचि मी द्रष्टा। ऐसिया बोधाचा माजिवटां।
अनुभवाचा सुभटा। धेंडा तो नाचे॥ ११८७॥

रज्जु जालिया गोचर। आभासतां तो व्याळाकार।
रज्जूच ऐसा निर्धार। होय जेवीं॥ ११८८॥

भांगारापरतें कांहीं। लेणें गुंजहीभरी नाहीं।
हें आटुनिया ठायीं। कीजे जैसें॥ ११८९॥

उदका येकापरतें। तरंग नाहींचि हे निरुतें।
जाणोनि तया आकारातें। न घेपे जेवीं॥ ११९०॥

ना तरी स्वप्नविकारां समस्तां। चेउनियां उमाणें घेतां।
तो आपणया परौता। न दिसे जैसा॥ ११९१॥

तैसें जें कांहीं आथि नाथी। तेणें होय ज्ञेयस्फूर्ती।
तें ज्ञाताचि मी हे प्रतीती। होऊनि भोगी॥ ११९२॥

मग जाणे अज मी अजर। अक्षय मी अक्षर।
अपूर्व मी अपार। आनंद मी॥ ११९३॥

अचळ मी अच्युत। अनंत मी अद्वैत।
आद्य मी अव्यक्त। व्यक्तही मी॥ ११९४॥

ईश्य मी ईश्वर। अनादि मी अमर।
अभय मी आधार। आधेय मी॥ ११९५॥

स्वामी मी सदोदित। सहज मी सतत।
सर्व मी सर्वोगत। सर्वातीत मी॥ ११९६॥

नवा मी पुराणु। शून्य मी संपूर्णु।
अस्थूल अनणु। जें कांहीं तें मी॥ ११९७॥

अक्रिय मी एक। असंग मी अशोक।
व्याप्त मी व्यापक। पुरुषोत्तम मी॥ ११९८॥

अशब्द मी अश्रोत्र। अरूप मी अगोत्र।
सम मी स्वतंत्र। ब्रह्म मी पर॥ ११९९॥

ऐसें आत्मत्वे मज एकातें। इया अद्वयभक्ती जाणोनि निरुतें।
आणि याही बोधा जाणतें। तेंही मीच जाणें॥ १२००॥

पैं चेइलेयानंतरें। आपुलें एकपण उरे।
तेंही तयावरी स्फुरे। तयासींचि जैसें॥ १२०१॥

कां प्रकाशितां अर्क। तोचि होय प्रकाशक।
तयाही अभेदा द्योतक। तोचि जैसा॥ १२०२॥

तैसा वेद्यांच्या विलयीं। केवळ वेदक उरे पाहीं।
तेणें जाणवे तयातेंही। हेंही जो जाणे॥ १२०३॥

तया अद्वयपणा आपुलिया। जाणती ज्ञप्ती जे धनंजया।
ते ईश्वरचि मी हे तया। बोधासि ये॥ १२०४॥

मग द्वैताद्वैतातीत। मीचि आत्मा एक निभ्रांत।
हें जाणोनि जाणणें जेथ। अनुभवीं रिघे॥ १२०५॥

तेथ चेइलया एकपण। दिसें जें आपुलया आपण।
तेंही जातां नेणों कोण। होइजे जेवीं॥ १२०६॥

कां डोळा देखतिये क्षणीं। स्वरूपपण सुवर्णी।
नाटितां होय आटणी। अळंकाराचीही॥ १२०७॥

ना ना लवण तोय होये। मग क्षारता तोयत्वें राहे।
तेही जिरतां जेविं जाये। जालेपण तें॥ १२०८॥

तैसा मी तो हें जें असे। तें स्वानंदानुभव समरसें।
कालवूनियां प्रवेशे। मजचिमाजी॥ १२०९॥

आणि तो हे भाष जेथ जाये। तेथें मी हें कोण्हासी आहे।
ऐसा मी ना तो तिये सामाये। माझ्याचि रूपीं॥ १२१०॥

तेव्हां कापुर जळों सरे। तयाचि नाम अग्नि पुरे।
मग उभयातीत उरे। आकाश जेवीं॥ १२११॥

कां धाडलिया एका एक। वाढे तो शून्य विशेख।
तैसा आहे नाहींचा शेख। मीचि मग आथी॥ १२१२॥

तेथ ब्रह्म आत्मा ईश। यया बोला मोडे सारस।
न बोलणें याही पैस। नाहीं तेथ॥ १२१३॥

न बोलणेंही न बोलोनी। तें बोलिजे तोंड भरूनी।
जाणीव नेणिव नेणोनी। जाणिजे तें॥ १२१४॥

तेथ बुझिजे बोध बोधें। आनंद घेपे आनंदें।
सुखवरी नुसधें। सुखचि भोगिजे॥ १२१५॥

तेथ लाभ जोडला लाभा। प्रभा आलिंगिली प्रभा।
विस्मय बुडाला उभा। विस्मयामाजी॥ १२१६॥

शम तेथ सामावला। विश्राम विश्रांती आला।
अनुभव वेडावला। अनुभूतिपणें॥ १२१७॥

किंबहुना ऐसें निखळ। मी पणा जोडे तया फळ।
सेवूनि वेली वेल्हाळ। कर्मयोगाची ते॥ १२१८॥

पैं कर्मयोगिया किरीटी। चक्रवर्तीच्या मुकुटीं।
मी चिद्रत्न तें साटोवाटीं। होय तो माझा॥ १२१९॥

कीं कर्मयोग प्रासादाचा। कळस जो हा मोक्षाचा।
तया वरील अवकाशाचा। उवावो जाला तो॥ १२२०॥

ना ना संसार आडवी। कर्मयोग वाट बरवी।
जोडली ते मदैक्य गांवीं। पैठी जालीसे॥ १२२१॥

हें असो कर्मयोग वोघे। तेणें भक्तिचि गंगें।
मी स्वानंदोदधि वेगें। ठाकिला कीं गा॥ १२२२॥

हा ठायवरी सुवर्मा। कर्मयोगीं आहे महिमा।
म्हणौनिवेळोवेळां तुम्हां। सांगतो आम्ही॥ १२२३॥

पैं देशें काळें पदार्थें। साधूनि घेइजे मातें।
तैसा नव्हे मी आयतें। सर्वांचें सर्वही॥ १२२४॥

म्हणौनि माझ्या ठायीं। जाचावें नलगे कांहीं।
मी लाभे इये उपायीं। साचाच गा॥ १२२५॥

एक शिष्य एक गुरु। हा रूढला साच व्यवहारू।
तो मत्प्राप्ति प्रकारू। जाणावया॥ १२२६॥

अगा वसुधेच्या पोटीं निधान सिद्ध किरीटी।
वह्नि सिद्ध काष्ठीं। वोहां दूध॥ १२२७॥

परि लाभे तें असतें। तया कीजे उपायातें।
येर सिद्धचि तैसा तेथें। उपायीं मी॥ १२२८॥

हा फळवरी उपावो। कां पां प्रस्तावीतसे देवो।
हें पुसतां तरि अभिप्रावो। येथिंचा ऐसा॥ १२२९॥

जे गीतार्थाचें चांगावें। मोक्षोपायपर आघवें।
आन शास्त्रोपाय नव्हे। प्रमाण सिद्ध॥ १२३०॥

वारा आभाळचि फेडी। वांचून सूर्यातें न घडी।
कां हात बांबुळी धाडी। तोय न करी॥ १२३१॥

तैसा आत्मदर्शनी आडळ। असे अविद्येचा जो मळ।
तो शास्त्र नाशी येर निर्मळ। मी प्रकाशें स्वयें॥ १२३२॥

म्हणौनि आघवींचि शास्त्रें। अविद्या विनाशाची पात्रें।
वांचोनि न होती स्वतंत्रें। आत्मबोधीं॥ १२३३॥

तया अध्यात्म शास्त्रांसीं। जैं साचपणाची ये पुसी।
तैं येइजे जया ठायासी। ते हे गीता॥ १२३४॥

भानुभूषिता प्राचिया। सतेजा दिशा आघविया।
तैसी शास्त्रेश्वरा गीता या। सनाथें शास्त्रें॥ १२३५॥

हें असो येणें शास्त्रेश्वरें। मागां उपाय बहुवे विसारें।
सांगीतला जैसा करें। घेवों ये आत्मा॥ १२३६॥

परि प्रथम श्रवणासवें। अर्जुना विपायें हें फावे।
हा भाव सकणवे। धरूनि श्रीहरी॥ १२३७॥

तेंचि प्रमेय एकवेळ शिष्यीं होआवया अढळ।
सांगतसे मुकुळ। मुद्रा आतां॥ १२३८॥

आणि प्रसंगें गीता। ठावही हा संपता।
म्हणौनि दावी आद्यंता। एकार्थत्व॥ १२३९॥

जे ग्रंथाच्या मध्यभागीं। ना ना अधिकार प्रसंगीं।
निरूपणा अनेगी। सिद्धांतीं केलें॥ १२४०॥

तरि तेतुलेही सिद्धांत। इये शास्त्रीं प्रस्तुत।
हें पूर्वापार नेणत। कोण्ही जैं मानी॥ १२४१॥

तैं महासिद्धांताचा आवांका। सिद्धांतकक्षा अनेका।
भिडऊनि आरंभ देखा। संपवीत असे॥ १२४२॥

एथ अविद्यानाश हें स्थळ। तेणें मोक्षापादन फळ।
या दोन्हीं केवळ। साधन ज्ञान॥ १२४३॥

हें इतुलेंचि ना ना परी। निरूपिलें ग्रंथ विस्तारीं।
तें आतां दोहीं अक्षरीं। अनुवादावें॥ १२४४॥

म्हणौनि उपेयही हातीं। जालया उपायस्थिती।
देव प्रवर्तले तें पुढती। येणेंचि भावें॥ १२४५॥

सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणो मद् व्यपाश्रयः।
मत्प्रसादादवाप्नोति शाश्वतं पदमव्ययम्॥ १८.५६॥

मग म्हणे गा सुभटा। तो कर्मयोगिया निष्ठा।
मी होउनी होय पैठा। माझ्या रूपीं॥ १२४६॥

स्वकर्मांच्या चोखौळी। मज पूजा करूनि भली।
तेणें प्रसादें आकळी। ज्ञान निष्ठेतें॥ १२४७॥

ते ज्ञान निष्ठा जेथ हातवसे। तेथ भक्ति माझी उल्लासे।
तिया मजसीं समरसें। सुखिया होय॥ १२४८॥

आणि विश्व प्रकाशितया। आत्मया मज आपुलिया।
अनुसरे जो करूनियां। सर्वत्रता हे॥ १२४९॥

सांडूनि आपला आडळ। लवण आश्रयी जळ।
कां हिंडोनि राहे निश्चळ। वायु व्योमीं॥ १२५०॥

तैसा बुद्धी वाचा कायें। जो मातें आश्रऊनि ठाये।
तो निषिद्धेंही विपायें। कर्मैं करू॥ १२५१॥

परि गंगेच्या संबंधीं। बिदी आणि महानदी।
ऐक्य तेविं माझ्या बोधीं। शुभाशुभांसी॥ १२५२॥

कां बावनें आणि घुरें। हा निवाड तंवचि सरे।
जंव न घेपती वैश्वानरें। कवळूनि दोन्ही॥ १२५३॥

ना ना पांचिकें आणि सोळें। हें सोनया तंवचि आळें।
जंव परिस आंगमेळें। येकवटीना॥ १२५४॥

तैसें शुभाशुभ ऐसें। हें तंवचि वरी आभासे।
जंव येक न प्रकाशें। सर्वत्र मी॥ १२५५॥

अगा रात्रि आणि दिवो। हा तंवचि द्वैत भावो।
जंव न रिगिजे गांवो। गभस्तीचा॥ १२५६॥

म्हणौनि माझिया भेटी। तयांची सर्व कर्मैं किरीटी।
जाऊनि बैसे तो पाटीं। सायुज्याच्या॥ १२५७॥

देशें काळें स्वभावें। वेंच जया न संभवे।
तें पद माझें पावे। अविनाश तो॥ १२५८॥

किंबहुना पंडुसुता। मज आत्मयाची प्रसन्नता।
लाहे तेणें न पविजता। लाभ कवण असे॥ १२५९॥

चेतसा सर्वकर्माणि मयि संन्यस्य मत्परः।
बुद्धियोगमुपाश्रित्य मच्चित्तः सततं भव॥ १८.५७॥

या कारणें गा तुवां इया। सर्व कर्मा आपुलिया।
माझ्या स्वरूपीं धनंजया। संन्यास कीजे॥ १२६०॥

परि तोचि संन्यास वीरा। करणीयाचा झणें करा।
आत्मविवेकीं धरा। चित्त वृत्ति हे॥ १२६१॥

मग तेणें विवेक बळें। आपणपें कर्मा वेगळें।
माझ्या स्वरूपीं निर्मळें। देखिजेल सर्व॥ १२६२॥

आणि कर्माची जन्म भोये। प्रकृति जे कां आहे।
ते आपणयाहूनि बहुवे। देखसी दुरी॥ १२६३॥

तेथ प्रकृति आपणयां। वेगळी नुरे धनंजया।
रूपेंवीण कां छाया। जयापरी॥ १२६४॥

ऐसेनि प्रकृति नाश। जालया कर्म संन्यास।
निफजेल अनायास। सकारण॥ १२६५॥

मग कर्मजात गेलिया। मी आत्मा उरें आपणपयां।
तेथ बुद्धि घापे करूनियां। पतिव्रता॥ १२६६॥

बुद्धि अनन्य येणें योगें। मजमाजी जैं रिगे।
तैं चित्त चैत्य त्यागें। मातेंचि भजे॥ १२६७॥

ऐसें चैत्यजातें सांडिलें। चित्त माझ्या ठायीं जडलें।
ठाके तैसें वहिलें। सर्वदा करीं॥ १२६८॥

मच्चित्तः सर्वदुर्गाणि मत्प्रसादात्तरिष्यसि।
अथ चेत्त्वमहङ्कारान्न श्रोष्यसि विनंक्ष्यसि॥ १८.५८॥

मग अभिन्ना इया सेवा। चित्त मियांचि भरेल जेव्हां।
माझा प्रसाद जाण तेव्हां। संपूर्ण जाहला॥ १२६९॥

तेथ सकळ दुःख धामें। भुंजीजती जियें मृत्युजन्में।
तियें दुर्गमेंचि सुगमें। होती तुज॥ १२७०॥

सूर्याचेनि सावायें। डोळा सावालिया होये।
तैं आंधाराचा आहे। पाड तया॥ १२७१॥

तैसा माझेनि प्रसादें। जीवकण जयाचा उपमर्दे।
तो संसाराचेनि बाधे। बागुलें केवीं॥ १२७२॥

म्हणौनि धनंजया। तूं संसार दुर्गती यया।
तरसील माझिया। प्रसादास्तव॥ १२७३॥

अथवा हन अहंभावें। माझें बोलणें हें आघवें।
काना मनाचिये शिवे। नेदिसी टेकों॥ १२७४॥

तरि नित्य मुक्त अव्यय। तूं आहासि तें होवूनि वाय।
देह संबंधाचा घाय। वाजेल आंगीं॥ १२७५॥

जया देह संबंधा आंत। प्रतिपदीं आत्मघात।
भुंजतां उसंत। कंहींच नाहीं॥ १२७६॥

येवढेनि दारुणें। निमणेनवीण निमणें।
पडेल जरी बोलणें। नेघसी माझें॥ १२७७॥

यदहङ्कारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे।
मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति॥ १८.५९॥

पथ्यद्वेषिया पोषी ज्वर। कां दीपद्वेषिया अंधःकार।
विवेकद्वेषें अहंकार। पोषूनि तैसा॥ १२७८॥

स्वदेहा नाम अर्जुन। परदेहा नाम स्वजन।
संग्रामा नाम मलिन। पापाचार॥ १२७९॥

इया मती आपुलिया। तिघां तीन नामें ययां।
ठेऊनियां धनंजया। न जुंझें ऐसा॥ १२८०॥

जीवामाजी निष्टंक। करिसी जो आत्यंतिक।
तो वायां धाडील नैसर्गिक। स्वभावचि तुझा॥ १२८१॥

आणि मी अर्जुन हे आत्मिक। ययां वध करणें हें पातक।
हे माया वांचूनि तात्त्विक। कांहीं आहे॥ १२८२॥

आधीं जुंझार तुवां होआवें। मग जुंझावया शस्त्र घेयावें।
कां न जुंझावया करावें। देवांगण॥ १२८३॥

म्हणौनि न जुंझणें। म्हणसी तें वायाणें।
ना मानूं लोकपणें। लोकदृष्टीही॥ १२८४॥

तऱ्ही न जुंझें ऐसें। निष्टंकिसी जें मानसें।
तें प्रकृति अनारिसें। करवीलचि॥ १२८५॥

स्वभावजेन कौन्तेय निबद्धः स्वेन कर्मणा।
कर्तुं नेच्छसि यन्मोहात् करिष्यस्यवशोऽपि तत्॥ १८.६०॥

पैं पूर्वे वाहतां पाणी। पव्हिजे पश्चिमेचे वाहणीं।
तरि आग्रहचि उरे तें आणी। आपुलिया लेखा॥ १२८६॥

कां साळीचा कण म्हणे। मी नुगवें साळीपणें।
तरी आहे आन करणें। स्वभावासी॥ १२८७॥

तैसा क्षात्रसंस्कारसिद्धा। प्रकृती घडिलासि प्रबुद्धा।
आतां नुठीं म्हणसी हा धांदा। परि उठविजसीचि तूं॥
१२८८॥

पैं शौर्य तेज दक्षता। एवमादिक पंडुसुता।
गुण दिधले जन्मतां। प्रकृती तुज॥ १२८९॥

तरि तयाचिया समवाया। अनुरूप धनंजया।
न करितां उगलियां। न येल असों॥ १२९०॥

म्हणौनिया तिहीं गुणीं। बांधलासि तूं कोदंडपाणी।
त्रिशुद्धि निघसी वाहाणीं। क्षात्राचिया॥ १२९१॥

ना हें आपुलें जन्ममूळ। न विचारितचि केवळ।
न जुंझें ऐसें अढळ। व्रत जरी घेसी॥ १२९२॥

तरि बांधोनि हात पाये। जो रथीं घातला होये।
तो न चले तरी जाये। दिगंता जेवीं॥ १२९३॥

तैसा तूं आपुलियाकडूनी। मी कांहींच न करीं म्हणौनी।
ठासी परी भरंवसेनी। तूंचि करिसी॥ १२९४॥

उत्तर वैराटींचा राजा। पळतां तूं कां निघालासि जुंझा।
हा क्षात्र स्वभाव तुझा। जुंझवील तुज॥ १२९५॥

महावीर अकरा अक्षौहिणी। तुवां येकें नागविले रणांगणीं।
तो स्वभाव कोदंडपाणी। जुंझवील तूतें॥ १२९६॥

हां गा रोग कायी रोगिया। आवडे दरिद्र दरिद्रिया।
परि भोगविजे बळिया। अदृष्टें जेणें॥ १२९७॥

तें अदृष्ट अनारिसें। न करील ईश्वरवशें।
तो ईश्वरही असे। हृदयीं तुझ्या॥ १२९८॥

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति।
भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया॥ १८.६१॥

सर्व भूतांच्या अंतरीं। हृदय महा अंबरीं।
चिद्वृत्तीच्या सहस्रकरीं। उदयला असे जो॥ १२९९॥

अवस्थात्रय तिन्ही लोक। प्रकाशूनि अशेष।
अन्यथा दृष्टि पांथिक। चेवविले॥ १३००॥

वेद्योदकाच्या सरोवरीं। फांकतां विषय कल्हारीं।
इंद्रियषट्पदा चारी। जीव भ्रमरातें॥ १३०१॥

असो रूपक हें तो ईश्वर। सकळ भूतांचा अहंकार।
पांघरोनि निरंतर। उल्हासत असे॥ १३०२॥

स्वमायेचें आडवस्त्र। लावूनि एकला खेळवी सूत्र।
बाहेरी नटी छायाचित्र। चौऱ्यासीं लक्ष॥ १३०३॥

तया ब्रह्मादि कीटातां। अशेषांही भूतजातां।
देहाकार योग्यता। पाहोनि दावी॥ १३०४॥

तेथ जें देह जयापुढें। अनुरूपपणें मांडे।
तें भूत तया आरूढे। हें मी म्हणौनि॥ १३०५॥

सूत सूतें गुंतलें। तृण तृणेंचि बांधलें।
कां आत्मबिंबा घेतलें। बाळकें जळीं॥ १३०६॥

तयापरी देहकारें। आपणपेंचि दुसरें।
देखोनि जीव आविष्करे। आत्मबुद्धि॥ १३०७॥

ऐसेनि शरीराकारीं। यंत्रीं भूतें अवधारीं।
वाहूनि हालवी दोरी। प्राचीनाची॥ १३०८॥

तेथ जया जें कर्मसूत्र। मांडूनि ठेविलें स्वतंत्र।
तें तिये गती पात्र। होंचि लागे॥ १३०९॥

किंबहुना धनुर्धरा। भूतातें स्वर्ग संसारा।
माजि भोंवडी तृणें वारा। आकाशीं जैसीं॥ १३१०॥

भ्रामकाचेनि संगें। जैसें लोहो वेढा रिगे।
तैसीं ईश्वरसत्ता योगें। चेष्टती भूतें॥ १३११॥

जैसे चेष्टा आपुलालिया। समुद्रादिक धनंजया।
चेष्टती चंद्राचिया। सन्निधि येकीं॥ १३१२॥

तया सिंधू भरितें दाटे। सोमकांता पाझर फुटे।
कुमुदां चकोरांचा फिटे। संकोच तो॥ १३१३॥

तैसीं बीजप्रकृतिवशें। अनेकें भूतें येकें ईशें।
चेष्टवीजती तो असे। तुझ्या हृदयीं॥ १३१४॥

अर्जुनपण न घेतां। मी ऐसें जें पंडुसुता।
उठतसे तें तत्त्वता। तयाचें रूप॥ १३१५॥

या लागीं तो प्रकृतीतें। प्रवर्तवील हें निरुतें।
आणि ते जुंझवील तूतें। न जुंझसी जऱ्ही॥ १३१६॥

म्हणौनि ईश्वर गोसावी। तेणें प्रकृति हे नेमावी।
तिया सुखें राबवावीं। इंद्रियें आपुलीं॥ १३१७॥

तूं करणें न करणें दोन्ही। लाऊनि प्रकृतीच्या मानीं।
प्रकृतीही कां अधीनी। हृदयस्था जया॥ १३१८॥

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत।
तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम्॥ १८.६२॥

तया अहं वाचा चित्त आंग। देऊनियां शरण रिग।
महोदधी कां गांग। रिगालें जैसें॥ १३१९॥

मग तयाचेनि प्रसादें। सर्वोपशांति प्रमदे।
कांत होऊनियां स्वानंदें। विरूपींच रमसी॥ १३२०॥

संभूति जेणें संभवे। विश्रांति जेथें विसंबे।
अनुभूतिही अनुभवे। अनुभवा जया॥ १३२१॥

तिये निजात्मपदींचा रावो। होऊनि ठाकसी अव्ययो।
म्हणे लक्ष्मीनाहो। पार्था तूं॥ १३२२॥

इति ते ज्ञानमाख्यातं गुह्यात् गुह्यतरं मया।
विमृश्यैतदशेषेण। यथेच्छसि तथा कुरु॥ १८.६३॥

हे गीतानाम विख्यात। सर्व वाङ्मयाचें मथित।
आत्मा जेणें हस्तगत। रत्न होय॥ १३२३॥

ज्ञान ऐसिया रूढी। वेदांतें जयाची प्रौढी।
वानितां कीर्ति चोखडी। पातलीं जगीं॥ १३२४॥

बुद्ध्यादिकें डोळसें। हें जयाचें कां कडवसें।
मी सर्वद्रष्टाहि दिसें। पाहला जया॥ १३२५॥

तें हें गा आत्मज्ञान। मज गोप्याचेंही गुप्त धन।
परि तूं म्हणूनि आन। केविं करूं॥ १३२६॥

या कारणें गा पांडवा। आम्हीं आपला हा गुप्त ठेवा।
तुज दिधला कणवा। जाकळिलेपणें॥ १३२७॥

जैसी भुलली वोरसें। माय बोले बाळा दोषें।
प्रीति ही परी तैसें। न करूंचि हो॥ १३२८॥

तेथ आकाश आणि गाळिजे। अमृताही साली फेडिजे।
कां दिव्याकरवीं करविजे। दिव्य जैसें॥ १३२९॥

जयाचेनि अंगप्रकाशें। पाताळींचा परिमाणु दिसे।
तया सूर्याहि कां जैसें। अंजन सुदलें॥ १३३०॥

तैसें सर्वज्ञेंही मियां। सर्वही निर्धारूनियां।
निकें होय तें धनंजया। सांगीतलें तुज॥ १३३१॥

आतां तूं ययावरी। निकें हें निर्धारीं।
निर्धारूनि करीं। आवडे तैसें॥ १३३२॥

यया देवाचिया बोला। अर्जुन उगाचि ठेला।
तेथ देवो म्हणती भला। अवंचक होसी॥ १३३३॥

वाढितया पुढें भुकेला। उपरोधें म्हणे धाला।
तैं तोचि पीडे आपला। आणि दोषही तया॥ १३३४॥

तैसा सर्वज्ञ श्रीगुरू। भेटलिया आत्मनिर्धारू।
न पुसिजे जैं आभारू। धरूनियां॥ १३३५॥

तैं आपणपेंचि वंचे। आणि पापही वंचनाचे।
आपणयाचि साचें। चुकविलें तेणें॥ १३३६॥

पैं उगेपणा तुझिया। हा अभिप्रावो कीं धनंजया।
जें एकवेळ आवांकुनियां। सांगावें ज्ञान॥ १३३७॥

तेथ पार्थ म्हणे दातारा। भलें जाणसी माझिया अंतरा।
हें म्हणों तरी दुसरा। जाणता असे काई॥ १३३८॥

येर ज्ञेय हें जी आघवें। तूं ज्ञाता येकचि स्वभावें।
मा सूर्य म्हणौनि वानावें। सूर्यातें काई॥ १३३९॥

या बोला श्रीकृष्णें। म्हणितलें काय येणें।
हेंचि थोडें गा वानणें। जें बुझतासि तूं॥ १३४०॥

सर्वगुह्यतमं भूयः शृणु मे परमं वचः।
इष्टोऽसि मे दृढमिति ततो वक्ष्यामि ते हितम्॥ १८.६४॥

तरि अवधान पघळ। करूनियां आणीक एकवेळ।
वाक्य माझें निर्मळ। अवधारीं पां॥ १३४१॥

हें वाच्य म्हणोनि बोलिजे। कां श्राव्य मग आयिकिजे।
तैसें नव्हे परि तुझें। भाग्य बरवें॥ १३४२॥

कूर्मीचिया पिलियां। दिठी पान्हा ये धनंजया।
आकाश बाहे बापिया। घरींचें पाणी॥ १३४३॥

जो व्यवहार जेथ न घडे। तयाचें फळचि तेथ जोडे।
काय दैवें न सांपडे। सानुकूळें॥ १३४४॥

येरवीं द्वैताची वारी। सारूनि ऐक्याच्या परिवरीं।
भोगिजे तें अवधारीं। रहस्य हें॥ १३४५॥

आणि निरुपचारा प्रेमा। विषय होय जें प्रियोत्तमा।
तें दुजें नव्हे कीं आत्मा। ऐसेंचि जाणावें॥ १३४६॥

आरिसाचिया देखिलया। गोमटें कीजे धनंजया।
तें तया नोहे आपणयां। लागीं जैसें॥ १३४७॥

तैसें पार्था तुझेनि मिषें। मी बोलें आपणयाचि दोषें।
माझ्या तुझ्या ठाई असे। मी तूं पणा गा॥ १३४८॥

म्हणौनि जिव्हारींचें गुज। सांगतसें जीवासीं तुज।
हें अनन्य गतीचें मज। आथी व्यसन॥ १३४९॥

पैं जळा आपणपें देतां। लवण भुललें पंडुसुता।
कीं आघवें तयाचें होतां। न लाजेचि तें॥ १३५०॥

तैसा तूं माझ्या ठाई। राखो नेणसीचि कांहीं।
तरी आतां तुज काई। गोप्य मी करीं॥ १३५१॥

म्हणौनि आघवींचि गूढें। जें पाऊनि अति उघडें।
तें गोप्य माझें चोखडें। वाक्य आइक॥ १३५२॥

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु।
मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे॥ १८.६५॥

तरि बाह्य आणि अंतरा। आपुलिया सर्व व्यापारा।
मज व्यापकातें वीरा। विषय करीं॥ १३५३॥

आघवा आंगी जैसा। वायू मिळोनि आहे आकाशा।
तूं सर्व कर्मी तैसा। मजसींच असें॥ १३५४॥

किंबहुना आपुलें मन। करीं माझें एकायतन।
माझेनि श्रवणें कान। भरूनि घालीं॥ १३५५॥

आत्मज्ञानें चोखडीं। संत जे माझीं रूपडीं।
तेथ दृष्टि पडो आवडी। कामिनी जैसी॥ १३५६॥

मी सर्व वस्तीचें वसौटें। माझीं नामें जियें चोखटें।
तिये जीवा यावया वाटे। वाचेचिये लावीं॥ १३५७॥

हाताचें करणें। कां पायाचें चालणें।
तें होय मज कारणें। तैसें करीं॥ १३५८॥

आपुला अथवा परावा। ठायीं उपकरसी पांडवा।
तेणें यज्ञें होयीं बरवा। याज्ञिक माझा॥ १३५९॥

हें एकैक शिकवूं काई। पैं सेवकै आपुल्या ठाई।
उरऊनि येर सर्वही। मी सेव्यचि करीं॥ १३६०॥

तेथ जाऊनि भूतद्वेष। सर्वत्र नमवैनम मीचि एक।
ऐसेनि आश्रय आत्यंतिक। लाहसी तूं माझा॥ १३६१॥

मग भरलेया जगा आंत। जाऊनि तिजयाची मात।
होऊनि ठायील एकांत। आम्हां तुम्हां॥ १३६२॥

तेव्हां भलतिये अवस्थे। मी तूतें तूं मातें।
भोगिसी ऐसें आइतें। वाढेल सुख॥ १३६३॥

आणि तिजें आडळ करितें। निमालें अर्जुना जेथें।
तैं मीचि म्हणौनि तूं मातें। पावसी शेखीं॥ १३६४॥

जैसी जळींची प्रतिभा। जळनाशीं बिंबा।
येतां गाभागोभा। कांहीं आहे॥ १३६५॥

पैं पवन अंबरा। कां कल्लोळ सागरा।
मिळतां आडवारा। कोणाचा गा॥ १३६६॥

म्हणौनि तूं आणि आम्ही। हें दिसताहे देहधर्मी।
मग ययाच्या विरामीं। मीचि होसी॥ १३६७॥

यया बोलां माझारीं। होय नव्हे झणें करीं।
येथ आन आथी तरी। तुझीच आण॥ १३६८॥

पैं तुझी आण वाहणें। हें आत्मलिंगातें शिवणें।
प्रीतीची जाती लाजणें। आथवो नेदी॥ १३६९॥

येऱ्हवीं वेढूनि प्रपंच। जेणें विश्वाभास हा साच।
आज्ञेचा नटनाच। काळातें जिणे॥ १३७०॥

तो देव मी सत्य संकल्प। आणि जगाच्या हितीं बाप।
मा आणेचा आक्षेप। कां करावा॥ १३७१॥

परि अर्जुना तुझेनि वेधें। मियां देवपणाची बिरुदें।
सांडिली गा मी आधें। सगळेनि तुवां॥ १३७२॥

पैं काजा आपुलिया। रावो आपली आपणया।
आण वाहे धनंजया। तैसें हें कीं॥ १३७३॥

तेथ अर्जुन म्हणे देवें। अचाट हें न बोलावें।
जें आमचें काज नांवें। तुझेनि एकें॥ १३७४॥

या वरी सांगों बैससी। कां सांगतां भाषही देसी।
या तुझिया विनोदासी। पार आहे जी॥ १३७५॥

कमळवना विकाशू। करी रवीचा एक अंशू।
तेथ आघवाचि प्रकाशू। नित्य देतो॥ १३७६॥

पृथ्वी निवऊनि सागर। भरिजती येवढें थोर।
वर्षे तेथ मिषांतर। चातक कीं॥ १३७७॥

म्हणौनि औदार्या तुझेया। मज निमित्त ना म्हणावया।
प्राप्ति असे दानीराया। कृपानिधी॥ १३७८॥

तंव देव म्हणती राहें। या बोलाचा प्रस्ताव नोहे।
पैं मातें पावसी उपायें। साचचि येणें॥ १३७९॥

सैंधव सिंधू पडिलिया। जो क्षण धनंजया।
तेणें विरेचि कीं उरावया। कारण कायी॥ १३८०॥

तैसें सर्वत्र भजतां। सर्व मी होतां अहंता।
निःशेष जाऊनि तत्वता। मीचि होसी॥ १३८१॥

एवं माझिये प्राप्तीवरी। कर्मालागोनि अवधारीं।
दाविली तुज उजरी। उपायांची॥ १३८२॥

जे आधी तंव पंडुसुता। सर्व कर्में मज अर्पितां।
सर्वत्र प्रसन्नता। लाहिजे माझी॥ १३८३॥

पाठीं माझ्या इये प्रसादीं। माझें ज्ञान जाय सिद्धी।
तेणें मिळविजे त्रिशुद्धी। स्वरूपीं माझ्या॥ १३८४॥

मग पार्था तिये ठाईं। साध्य साधन होय नाहीं।
किंबहुना तुज कांहीं। उरेचिना॥ १३८५॥

तरी सर्व कर्में आपलीं। तुवां सर्वदा मज अर्पिलीं।
तेणें प्रसन्नता लाधली। आजि हे माझी॥ १३८६॥

म्हणोनि येणें प्रमाद बळें। नवे जुंझाचेनि आडळें।
न ठाकेचि एकवेळे। भाळलों तुज॥ १३८७॥

जें सप्रपंच अज्ञान जाये। जेणें एक मी गोचर होयें।
तें उपपत्तीचेनि उपायें। गीतारूप हें॥ १३८८॥

मियां ज्ञान तुज आपुलें। ना ना परी उपदेशिलें।
येणें अज्ञानजात सांडवलें। धर्माधर्म जें॥ १३८९॥

सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज।
अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः॥ १८.६६॥

आशा जैसी दुःखातें। व्याली निंदा दुरितें।
हें असो जैसें दैन्यातें। दुर्भगत्व॥ १३९०॥

तैसें स्वर्ग नरक सूचक। अज्ञान व्यालें धर्मादिक।
तें सांडूनि घालीं अशेख। ज्ञान येणें॥ १३९१॥

हातीं घेऊनि तो दोर। सांडिजे जैसा सर्पाकार।
कां निद्रात्यागें घराचार। स्वप्नींचा जैसा॥ १३९२॥

ना ना सांडिलेनि कवळें। चंद्रींचें धुपे पिवळें।
व्याधित्यागें कडुवाळे। पण मुखाचें॥ १३९३॥

अगा दिवसा पाठी देउनि। मृगजळ घापे त्यजुनी।
कां काष्ठत्यागें वह्नी। त्यजिजे जैसा॥ १३९४॥

तैसें धर्माधर्माचें टवाळ। दावी अज्ञान जें कां मूळ।
तें त्यजून त्यजीं सकळ। धर्मजात॥ १३९५ ॥

मग अज्ञान निमालिया। मीचि एक असें अपैसया।
सनिद्र स्वप्न गेलया। आपणपें जैसें॥ १३९६ ॥

तैसा मी एकवांचून कांहीं। मग भिन्नाभिन्न आन नाहीं।
सोऽहं बोधें तयाच्या ठायीं। अनन्य होय॥ १३९७ ॥

पैं आपलेनि भेदेंविण। माझें जाणिजे जें एकपण।
तयाचि नांव शरण। मज येणे गा॥ १३९८ ॥

जैसें घटाचेनि नाशें। गगनीं गगन प्रवेशे।
मज येणें शरण तैसें। ऐक्य करी॥ १३९९ ॥

सुवर्णमणि सोनया। ये कल्लोळ जैसा पाणिया।
तैसा मज धनंजया। शरण ये तूं॥ १४०० ॥

वांचूनि सागराच्या पोटीं। वडवानळ शरण आला किरीटी।
जाळूं न टके तया गोठी। वाळुनि दे पां॥ १४०१ ॥

मजही शरण रिघिजे। आणि जीवत्वेंचि असिजे।
धिक् बोलीं यिया न लजे। प्रज्ञा केंवीं॥ १४०२ ॥

अगा प्राकृताही राया। आंगीं पडे जें धनंजया।
तें दासिरूंहि कीं तया। समान होय॥ १४०३ ॥

मा मी विश्वेश्वर भेटें। आणि जीवग्रंथी न सुटे।
हे बोल नको वोखटे। कानी लाऊं॥ १४०४ ॥

म्हणौनि मी होऊनि मातें। सेवणें आहे आयितें।
तैसें करीं हातायेतें। ज्ञानें येणें॥ १४०५ ॥

मग ताकौनियां काढिलें। लोणी माघौतें ताकीं घातलें।
परि न घेपेचि कांहीं केलें। तेणें जेवीं॥ १४०६ ॥

तैसें अद्वयत्वें मज। शरण रिघालिया तुज।
धर्माधर्म हें सहज। लागतील ना॥ १४०७ ॥

लोह उभें खाय माती। तें परिसाचिये संगती।
सोनें जालया पुढती। न शिविजे मळें॥ १४०८ ॥

हें असो काष्ठापासोनी। मथूनि घेतलिया वह्नी।
मग काष्ठेंही कोंडोनी। न टके जैसा॥ १४०९ ॥

अर्जुना काय दिनकर। देखत आहे आंधार।
कीं प्रबोधीं होय गोचर। स्वप्नभंग॥ १४१० ॥

तैसें मजसीं एकवटलेया। मी सर्वरूप वांचूनियां।
आन कांहीं उरावया। कारण असे॥ १४११ ॥

म्हणौनि तयाचें कांहीं। चिंतीं ना आपुल्या ठाईं।
तुझें पापपुण्य पाहीं। मीचि होईन॥ १४१२ ॥

तेथ सर्व बंध लक्षणें। पापें उरावें दुजेपणें।
तें माझ्या बोधीं वायाणें। होऊनि जाईल॥ १४१३ ॥

जळीं पडिलिया लवणा। सर्वही जळ होय विचक्षणा।
तुज मी अनन्य शरणा। होईन तैसा॥ १४१४ ॥

येतुलेनि अपैसया। सुटलाचि आहासि धनंजया।
घेई मज प्रकाशोनियां। सोडवीन तूतें॥ १४१५ ॥

या कारणें पुढती। हे आधी न वाहें चित्तीं।
मज एकासि ये सुमती। जाणोनि शरण॥ १४१६ ॥

ऐसें सर्व रूप रूपसें। सर्व दृष्टि डोळसें।
सर्व देश निवासें। बोलिलें श्रीकृष्णें॥ १४१७ ॥

मग सांवळा सकंकण। बाहु पसरोनि दक्षिण।
आलिंगिला स्वशरण। भक्तराज तो॥ १४१८ ॥

न पवतां जयातें। काखे सूनि बुद्धीतें।
बोलणें मागौतें। वोसरलें॥ १४१९ ॥

ऐसें जें कांहीं एक। बोला बुद्धीसिही अटक।
तें द्यावया मिष। खेंवाचें केलें॥ १४२० ॥

हृदया हृदय एक जालें। ये हृदयींचें ते हृदयीं घातलें।
द्वैत न मोडितां केलें। आपणा ऐसें अर्जुना॥ १४२१ ॥

दीपें दीप लाविला। तैसा परिष्वंग तो जाला।
द्वैत न मोडितां केला। आपणपें पार्थ॥ १४२२ ॥

तेव्हां सुखाचा मग तया। पूर आला जो धनंजया।
तेथ वाड तऱ्हीं बुडोनियां। ठेला देव॥ १४२३॥

सिंधु सिंधुतें पावों जाये। तें पावणें ठाके दुणा होये।
वरी रिगे पुरवणिये। आकाशही॥ १४२४॥

तैसें तया दोघांचे मिळणें। दोघां नावरे जाणावें कवणें।
किंबहुना श्रीनारायणें। विश्व कोंदलें॥ १४२५॥

एवं वेदाचें मूळसूत्र। सर्वाधिकारैक पवित्र।
श्रीकृष्णें गीत शास्त्र। प्रकट केलें॥ १४२६॥

तेथ गीता मूळ वेदां। ऐसें केविं पां आलें बोधा।
हें म्हणाल तरी प्रसिद्धा। उपपत्ती सांगों॥ १४२७॥

तरी जयाच्या निश्वासीं। जन्म झालें वेदराशी।
तो सत्य प्रतिज्ञ पैजेसीं। बोलिला स्वमुखें॥ १४२८॥

म्हणौनि वेदां मूळभूत। गीता म्हणों हें उचित।
आणि कंही एकी येथ। उपपत्ती असे॥ १४२९॥

जें न नशत स्वरूपें। जयाचा विस्तार जेथ लपे।
तें तयाचें म्हणिपे। बीज जगीं॥ १४३०॥

तरि कांडत्रयात्मक। शब्दराशी अशेष।
गीतेमाजि असे रुख। बीजीं जैसा॥ १४३१॥

म्हणौनि वेदांचें बीज। श्रीगीता होय हें मज।
गमे आणि सहज। दिसतही आहे॥ १४३२॥

जे वेदांचे तिन्ही भाग। गीते उमटले असती चांग।
भूषण रत्नीं सर्वांग। शोभलें जैसें॥ १४३३॥

तियेंचि कर्मादिकें तिन्हीं। कांडे कोण कोणे स्थानीं।
गीते आहाती तें नयनीं। दाखऊं आइक॥ १४३४॥

तरि पहिला जो अध्याव। तो शास्त्रप्रवृत्ति प्रस्ताव।
द्वितीयीं सांख्य सद्भाव। प्रकाशिला॥ १४३५॥

मोक्षदानीं स्वतंत्र। ज्ञानप्रधान हें शास्त्र।
येतुलालें दुजीं सूत्र। उभारिलें॥ १४३६॥

मग अज्ञानें बांधलेयां। मोक्षपदीं बैसावया।
साधनारंभ तो तृतीया। ध्यायीं बोलिला॥ १४३७॥

जे देहाभिमानबंधें। सांडूनि काम्य निषिद्धें।
विहित परि अप्रमादें। अनुष्ठावे॥ १४३८॥

ऐसेनि सद्भावें कर्म करावें। हा तिजा अध्यायीं देवें।
निर्णय केला तें जाणावें। कर्मकांड येथ॥ १४३९॥

आणि तेंचि नित्यादिक। अज्ञानाचें आवश्यक।
आचरतां मोचक। केंवी होय पां॥ १४४०॥

ऐसी अपेक्षा जालिया। बद्ध मुमुक्षुते आलिया।
देवें ब्रह्मार्पणत्वें क्रिया। सांगीतली॥ १४४१॥

जें देह वाचा मानसें। विहित निपजे जें जैसें।
तें एक ईश्वरोद्देशें। कीजे म्हणीतलें॥ १४४२॥

हेंचि ईश्वरीं कर्मयोगें। भजन कथनाचें खागें।
आदरिलें शेषभागें। चतुर्थाचेनि॥ १४४३॥

तें विश्वरूप अकरावा। अध्याय संपे जंव आघवा।
तंव कर्मे ईश भजावा। हें जें बोलिलें॥ १४४४॥

तें अष्टाध्यायीं उघड। जाण येथें देवताकांड।
शास्त्र सांगतसे आड। मोडूनि बोले॥ १४४५॥

आणि तेणेंचि ईश प्रसादें। श्रीगुरु संप्रदाय लब्धें।
साच ज्ञान उद्बोधे। कोवळें जें॥ १४४६॥

तें अद्वेष्टादि प्रभृतिकीं। अथवा अमानित्वादिकीं।
वाढविजे म्हणौनि लेखीं। बारावा गणूं॥ १४४७॥

तो बारावा अध्याय आदि। आणि पंधरावा अवधि।
ज्ञानफळपाकसिद्धि। निरूपणासी॥ १४४८॥

म्हणौनि चहुंही इहीं। ऊर्ध्वमूळांतीं। अध्यायीं।
ज्ञानकांड ये ठायीं। निरूपिजे॥ १४४९॥

एवं कांडत्रयरूपिणी। श्रुतीच हे कोडिसवाणी।
गीता पद्य रत्नांचीं लेणीं। लेयिली आहे॥ १४५०॥

हें असो कांडत्रयात्मक। श्रुति मोक्षरूप फळ एक।
बोभावे जें आवश्यक। ठाकावें म्हणौनि॥ १४५१॥

तयाचेनि साधन ज्ञानेंसी। वैर करी जो प्रतिदिवशीं।
तो अज्ञानवर्ग षोडशीं। प्रतिपादिजे॥ १४५२॥

तोचि शास्त्राचा बोळावा। घेवोनि वैरी जिणावा।
हा निरोप तो सतरावा। अध्याय येथ॥ १४५३॥

ऐसा प्रथमा लागोनि। सतरावा लाणी करूनी।
आत्मनिश्वास विवरूनी। दाविला देवें॥ १४५४॥

तया अर्थजातां अशेषां। केला तात्पर्याचा आवांका।
तो हा अठरावा देखा। कलशाध्याय॥ १४५५॥

एवं सकळ सांख्यसिंधु। श्रीभगवद्गीता प्रबंधु।
हा औदार्यें आगळा वेदु। मूर्त जाण॥ १४५६॥

वेद संपन्न होय ठाई। परि कृपण ऐसा आन नाहीं।
जे कानीं लागला तिहीं। वर्णांच्याची॥ १४५७॥

येरां भवव्यथा ठेलियां। स्त्री शूद्रादिकां प्राणियां।
अनवसर मांडूनियां। राहिला आहे॥ १४५८॥

तरी मज पाहतां तें मागील उणें। फेडावया गीतापणें।
वेद वेठला भलतेणें। सेव्य होआवया॥ १४५९॥

ना हें अर्थे रिगोनि मनीं। श्रवणें लागोनि कानीं।
जपमिषें वदनीं। वसोनियां॥ १४६०॥

ये गीतेचा पाठ जो जाणे। तयाचेनि सांगातीपणें।
गीता लिहोनि वाहणें। पुस्तकमिषें॥ १४६१॥

ऐसैसा मी सकटा। संसाराचा चोहटां।
गवादि घालीत चोखटा। मोक्षसुखाची॥ १४६२॥

परि आकाशीं वसावया। पृथ्वीवरी बैसावया।
रविदीप्ती राहाटावया। आवार नभ॥ १४६३॥

तेविं उत्तम अधम ऐसें। सेवितां कवणातेंही न पुसे।
कैवल्य दानें सरिसें। निववीत जगा॥ १४६४॥

या लागीं मागिली कुटी। भ्याला वेद गीतेच्या पोटीं।
रिगाला आतां गोमटी। कीर्ति पातला॥ १४६५॥

म्हणौनि वेदाची सुसेव्यता। ते हे मूर्त जाण श्रीगीता।
श्रीकृष्णें पंडुसुता। उपदेशिली॥ १४६६॥

परि वत्साचेनि वोरसें। दुभतें होय घरोद्देशें।
जालें पांडवाचेनि मिषें। जगदुद्धरण॥ १४६७॥

चातकाचिये कणवे। मेघ पाणियेसिं धांवे।
तेथ चराचर आघवें। निवालें जेवीं॥ १४६८॥

कां अनन्यगती कमळा। लागीं सूर्य ये वेळोवेळां।
कीं सुखिया होइजे डोळां त्रिभुवनींचा॥ १४६९॥

तैसें अर्जुनाचेनि व्याजें। गीता प्रकाशूनि श्रीराजें।
संसारा एवढें थोर ओझें। फेडिलें जगाचें॥ १४७०॥

सर्वशास्त्र रत्नदीप्ती। उजळिता हा त्रिजगती।
सूर्य नव्हे लक्ष्मीपती। वक्त्राकाशींचा॥ १४७१॥

बाप कुळ तें पवित्र। जेथिंचा पार्थ या ज्ञाना पात्र।
जेणें गीता केलें स्वतंत्र। आवार जगा॥ १४७२॥

हें असो मग तेणें। सद्गुरु श्रीकृष्णें।
पार्थाचें मिसळणें। आणिलें द्वैता॥ १४७३॥

पाठीं म्हणतसे पांडवा। शास्त्र हें मानलें कीं जीवा।
तेथ येरु म्हणे देवा। आपुलिया कृपा॥ १४७४॥

तरि निधान जोडावया। भाग्य घडे गा धनंजया।
परि जोडिलें भोगावया। विपायें होय॥ १४७५॥

पैं क्षीरसागरा एवढें। अविरजी दुधाचें भांडें।
सुरां असुरां केवढें। मथितां जालें॥ १४७६॥

तें साहसही फळा आलें। जें अमृतही डोळां देखिलें।
परि वरिचिल चुकले। जतनेनें॥ १४७७॥

तेथ अमरत्वा वोगरिलें। तें मरणाचिलागीं जालें।
भोगों नेणतां जोडलें। ऐसें आहे॥ १४७८॥

नहुष स्वर्गाधिपति जाला। परी राहाटीं भांबावला।
तो भुजंगत्व पावला। नेणसी कायी॥ १४७९॥

म्हणौनि बहुत पुण्य तुवां। केलें तेणें धनंजया।
आजि शास्त्रराजा इया। जालासी विषय॥ १४८०॥

तरि ययाचि शास्त्राचेनी। संप्रदायें पांघुरौनि।
शास्त्रार्थ हा निकेनीं। अनुष्टीं हो॥ १४८१॥

येऱ्हवीं अमृत मथना। सारिखें होईल अर्जुना।
जरि रिघसी अनुष्ठाना। संप्रदायेंवीण॥ १४८२॥

गाय धड जोडे गोमटी। ते तैंचि पय दे किरीटी।
जैं जाणिजे हातवटी। सांजवणीची॥ १४८३॥

तैसा श्रीगुरु प्रसन्न होये। शिष्य विद्याही कीर लाहे।
परि ते फळे संप्रदायें। उपासिलिया॥ १४८४॥

म्हणौनि शास्त्रीं जो इये। उचित संप्रदाय आहे।
तो ऐक आतां बहुवें। आदरेंसी॥ १४८५॥

इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन।
न चाशुश्रूषवे वाच्यं न च मां योऽभ्यसूयति॥ १८.६७॥

तरि तुवां हें जें पार्था। गीताशास्त्र लाधलें आस्था।
तें तपोहीना सर्वथा। सांगावें ना हो॥ १४८६॥

अथवा तापसही जाला। परि गुरुभक्तीं जो ढिला।
तो वेदीं अंत्यज वाळिला। तैसा वाळीं॥ १४८७॥

ना तरि पुरोडाशु जैसा। न घापे वृद्ध तरी वायसा।
गीता नेदी तैसी तापसा। गुरुभक्ति हीना॥ १४८८॥

कां तपही जोडे देहीं। भजे गुरुदेवांच्या ठाईं।
परि आकर्णनीं नाहीं। चाड जरी॥ १४८९॥

तरि मागील दोहीं आंगीं। उत्तम होय कीर जगीं।
परि या श्रवणालागीं। योग्य नोहे॥ १४९०॥

मुक्ताफळ भलतैसें। हो परि मुख नसे।
तंव गुण प्रवेशे। तेथ कायी॥ १४९१॥

सागर गंभीर होये। हें कोण ना म्हणत आहे।
परि वृष्टी वायां जाये। जाली तेथ॥ १४९२॥

धालिया दिव्यान्न सुवावें। मग जें वायां धाडावें।
तें आर्तीं कां न करावें। उदारपण॥ १४९३॥

म्हणौनि योग्य भलतैसे। होत परी चाड नसे।
तरि झणें वानिवसें। देसी हें तयां॥ १४९४॥

रूपाचा सुजाण डोळा। वोडवूं ये कायि परिमळा।
जेथ जें माने तें फळा। तेथचि ये गा॥ १४९५॥

म्हणौनि तपी भक्ति। पाहावे ते सुभद्रापती।
परि शास्त्र श्रवणीं अनासक्ति। वाळावेचि ते॥ १४९६॥

ना तरी तपभक्ति। होऊनि श्रवणीं आर्ति।
आथी ऐसी ही आयती। देखसी जरी॥ १४९७॥

तरी गीता शास्त्र निर्मिता। जो मी सकळ लोक शास्ता।
तया मातें सामान्यता। बोलेले जो॥ १४९८॥

माझ्या सज्जनेंसिं मातें। पैशुन्याचेनि आव्हाते।
एक आहाती तयांतें। योग्य न म्हणें॥ १४९९॥

तयांची येर आघवी। सामग्री ऐसी जाणावी।
दीपेंवीण ठाणदिवी। रात्रीची जैसी॥ १५००॥

अंग गोरें आणि तरुणें। वरि लेयिलें आहे लेणें।
परि एकलेनि प्राणें। सांडिलें जेवीं॥ १५०१॥

सोनयाचें सुंदर। निर्वाळिलें होय घर।
परि सर्पांगना द्वार। रुंधलें आहे॥ १५०२॥

निपजे दिव्यान्न चोखट। परि माजी काळकूट।
असो मैत्री कपट। गर्भिणी जैसी॥ १५०३॥

तैसी तप भक्ति मेधा। तयाची जाण प्रबुद्धा।
जो माझयांचि कां निंदा। माझीचि करी॥ १५०४॥

या कारणें धनंजया। तो भक्त मेधावी तपिया।
तरि नको बापा इया। शास्त्रा आतळों देवों॥ १५०५॥

काय बहु बोलों निंदका। योग्य स्रष्टयाही सारिखा।
गीता हे कवतिका। लागींही नेदीं॥ १५०६॥

म्हणौनि तपाचा धनुर्धरा। तळीं दाटोनि गाडोरां।
वरि गुरुभक्तीचा पुरा। प्रासाद जो जाला॥ १५०७॥

आणि श्रवेणेच्छेचा पुढां। दारवंटा सदा उघडा।
वरी कलश चोखडा। अनिंदा रत्नांचा॥ १५०८॥

य इदं परमं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति।
भक्तिं मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशयः॥ १८.६८॥

ऐशा भक्तालयीं चोखटी। गीता रत्नेश्वर हा प्रतिष्ठीं।
मग माझिया संवसाटीं। तुकसी जगीं॥ १५०९॥

कां जे एकाक्षरपणेंसीं। त्रिमात्रकेचिये कुशी।
प्रणव होता गर्भवासीं। सांकडला॥ १५१०॥

तो गीतेचिया बाहळीं। वेदबीज गेलें पाल्हाळीं।
कीं गायत्री फुलीं फळीं। श्लोकांच्या आली॥ १५११॥

ते हे मंत्र रहस्य गीता। मेळवी जो माझिया भक्ता।
अनन्य जीवना माता। बाळका जैसी॥ १५१२॥

तैसी भक्तां गीतेसीं। भेटी करी जो आदरेंसीं।
तो देहापाठीं मजसीं। एकचि होय॥ १५१३॥

न च तस्मान्मनुष्येषु कश्चिन्मे प्रियकृत्तमः।
भविता न च मे तस्मादन्यः प्रियतरो भुवि॥ १८.६९॥

आणि देहाचेंही लेणें। लेऊनि वेगळेपणें।
असे तंव जीवें प्राणें। तोचि पढिये॥ १५१४॥

ज्ञानियां कर्मठा तापसां। यया खुणेचिया माणुसां।
माजि तो एक गा जैसा। पढिये मज॥ १५१५॥

तैसा भूतळीं आघवा। आन न देखें पांडवा।
जो गीता सांगे मेळावां। भक्त जनांचा॥ १५१६॥

मज ईश्वराचेनि लोभें। हे गीता पढतां अक्षोभें।
जो मंडन होय सभे। संतांचिये॥ १५१७॥

नवपल्लवीं रोमांचित। मंदानिळें कांपवित।
आमोद जळें वोसंडत। फुलांचे डोळे॥ १५१८॥

कोकिळा कलर वाचेनि मिषें। सद्गद बोलवित जैसें।
वसंत कां प्रवेशे। मद्भक्त आरामीं॥ १५१९॥

कां जन्माचें फळ चकोरां। होत जैं चंद्र ये अंबरा।
ना ना नव घन मयूरां। वो देत पावे॥ १५२०॥

तैसा सज्जनांच्या मेळापीं। गीता पद्य रत्नीं उमपीं।
वर्षे जो माझ्या रूपीं। हेतु ठेऊनि॥ १५२१॥

मग तयाचेनि पाडें। पढियंतें मजफुडें।
नाहींचि गा मागें फुडें। न्याहाळितां॥ १५२२॥

अर्जुना हा ठायवरी। मी तयातें सूयें जिव्हारीं।
जो गीतार्थाचें करी। परगुणें संतां॥ १५२३॥

अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः।
ज्ञानयज्ञेन तेनाहं इष्टः स्यमिति मे मतिः॥ १८.७०॥

पैं माझिया तुझिया मिळणीं। वाढीनली जे हे कहाणी।
मोक्षधर्म कां जिणी। आलासे जेथें॥ १५२४॥

तो हा सकळार्थप्रद। आम्हां दोघांचा संवाद।
न करितां पदभेद। पाठेंचि जो पढे॥ १५२५॥

तेणें ज्ञानानळीं प्रदीप्तीं। मूळ अविद्येचिया आहुतीं।
तोषविला होय सुमती। परमात्मा मी॥ १५२६॥

घेऊनि गीतार्थ उगाणा। ज्ञानिये जें विचक्षणा।
ठाकिती तें गाणावाणा। गीतेचा तो लाहे॥ १५२७॥

गीता पाठकासि असे। फळ अर्थज्ञाचि सरिसें।
गीता माउलिये कीं नसे। जाणें तान्हें॥ १५२८॥

श्रद्धावाननसूयश्च श्रृणुयादपि यो नरः।
सोऽपि मुक्तः शुभाँल्लोकान् प्राप्नुयात् पुण्यकर्मणाम्॥ १८.७१॥

आणि सर्वमार्गी निंदा। सांडूनि आस्था पैं शुद्धा।
गीता श्रवणीं श्रद्धा। उभारी जो॥ १५२९॥

तयाच्या श्रवण पुटीं। गीतेचीं अक्षरें जंव पेठीं।
होती ना तंव उठाउठीं। पळेचि पाप॥ १५३०॥

अटवीयेमाजी जैसा। वह्नि रिघतां सहसा।
लंघिती कां दिशा। वनौकें तियें॥ १५३१॥

कां उदयाचळ कुळीं। झळकतां अंशुमाळी।
तिमिरें अंतराळीं। हारपती॥ १५३२॥

तैसा कानाच्या महाद्वारीं। गीता गजर जेथ करी।
तेथ सृष्टीचिये आदिवरी। जायचि पाप॥ १५३३॥

ऐसी जन्मवल्ली धुवट। होय पुण्यरूप चोखट।
याही वरी अचाट। लाहे फळ। १५३४॥

जे इये गीतेचीं अक्षरें। जेतुलीं कां कर्णद्वारें।
रिघती तेतुले होती पुरे। अश्वमेध कीं। १५३५॥

म्हणौनि श्रवणें पापें जाती। आणि धर्म धरी उन्नती।
तेणें स्वर्गराज्य संपत्ती। लाहेचि शेखीं। १५३६॥

तो पैं मज यावयालागीं। पहिलें पेणें करी स्वर्गीं।
मग आवडे तंव भोगी। पाठीं मजचि मिळे॥ १५३७॥

ऐसी गीता धनंजया। ऐकतया आणि पढतया।
फळे महानंदें मियां। बहु काय बोलों॥ १५३८॥

याकारणें हें असो। परि जयालागीं शास्त्रातिसो।
केला तें तंव तुज पुसों। काज तुझें॥ १५३९॥

कच्चिदेतच्छ्रुतं पार्थ त्वयैकाग्रेण चेतसा।
कच्चिदज्ञानसंमोहः प्रनष्टस्ते धनंजय॥ १८.७२॥

तरि सांग पां पांडवा। हा शास्त्र सिद्धांत आघवा।
तुज एकचित्तें फावा। गेला आहे॥ १५४०॥

आम्हीं जैसें जया रीती। उगाणिलें कानांच्या हातीं।
येरीं तैसेंचि तुझ्या चित्तीं। पैठें केलें कीं॥ १५४१॥

अथवा माझारीं। गेलें सांडी विखुरी।
किंवा उपेक्षेवरी। वाळूनि सांडिलें॥ १५४२॥

जैसें आम्हीं सांगीतलें। तैसेचि हृदयीं फावलें।
तरी सांग पां वहिलें। पुसेन तें मी॥ १५४३॥

तरी स्वाज्ञान जनितें। मागिले मोहें तूतें।
भुलविलें तो येथें। असे कीं नाहीं॥ १५४४॥

हें बहु पुसों काई। सांगें तूं आपुल्या ठाई।
कर्माकर्म कांहीं। देखतासी॥ १५४५॥

पार्थ स्वानंदैकरसें। विरेल ऐसा भेद दशे।
आणिला येणें मिषें। प्रश्नाचेनि॥ १५४६॥

पूर्णब्रह्म जाला पार्थ। तरी पुढील साधावया कार्यार्थ।
मर्यादा श्रीकृष्णनाथ। उल्लंघों नेदी॥ १५४७॥

येऱ्हवीं आपलें करणें। सर्वज्ञ काय तो नेणे।
परि केलें पुसणें। याचिलागीं॥ १५४८॥

एवं करोनियां प्रश्न। नसतेंचि अर्जुनपण।
आणूनियां जालें पूर्णपण। तें बोलवी स्वयें। १५४९॥

मग क्षीराब्धीतें सांडित। गगनीं पुंज मंडित।
निवडे जैसा न निवडित। पूर्णचंद्र॥ १५५०॥

तैसा ब्रह्म मी हें विसरे। तेथ जगचि ब्रह्मत्वें भरे।
हेंही सांडी तरी विरे। ब्रह्मपणही॥ १५५१॥

ऐसा मोडत मांडत ब्रह्में। तो दुःखें देहाचिये सीमे।
मी अर्जुन येणें नामें। उभा ठेला॥ १५५२॥

मग कांपतां करतळीं। दडपूनि रोमावळी।
पुलकु स्वेदजळीं। जिरऊनिया॥ १५५३॥

प्राणक्षोभे डोलतया। आंगा आंगचि टेंकया।
सूनि स्तंभ चाळया। भुलौनियां॥ १५५४॥

नेत्र युगळाचेनि वोतें। आनंदामृताचें भरितें।
वोसंडत तें मागुतें। काढूनियां॥ १५५५॥

विविधा औत्सुक्यांची दाटी। चीप दाटत होती कंठी।
ते करूनियां पैठी। हृदयामाजी॥ १५५६॥

वाचेचें वितुळणें। सांवरूनि प्राणें।
अक्रमाचें श्वसणें। ठेऊनि ठायीं॥ १५५७॥

अर्जुन उवाच।
नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रदादान्मयाऽच्युत।
स्थितोऽस्मि गतसन्देहः करिष्ये वचनं तव॥ १८.७३॥

मग अर्जुन म्हणे काय देवो। पुसताति आवडो मोहो।
तरी तो सकुटुंब गेला जी ठावो। घेऊनि आपला॥ १५५८॥

पासीं येऊनि दिनकरें। डोळयांतें आंधारें।
पुसिजे हें कायि सरे। कोणे गांवीं॥ १५५९॥

तैसा तूं श्रीकृष्णराया। आमुचिया डोळयां।
गोचर हेंचि कायिसया। न पुरे तंव॥ १५६०॥

वरि लोभें मायेपासूनि। तें सांगसी तोंड भरूनि।
जें कायीसेनिही करूनि। जाणूं नये॥ १५६१॥

आतां मोह असे कीं नाहीं। हें ऐसें जी पुससी काई।
कृतकृत्य जाहलों पाहीं। तुझेंपणें॥ १५६२॥

गुंतलों होतों अर्जुनगुणें। तो मुक्त झालों तुझेंपणें।
आतां पुसणें सांगणें। दोन्ही नाहीं॥ १५६३॥

मी तुझेनि प्रसादें। लाधलेनि आत्मबोधें।
मोहाचे तया कांदे। नेदीच उरों॥ १५६४॥

आतां करणें कां न करणें। हें जेणें उठी दुजेपणें।
तें तूं वांचूनि नेणें। सर्वत्र गा॥ १५६५॥

ये विषयीं माझ्या ठायीं। संदेहाचें नुरेचि कांहीं।
त्रिशुद्धी कर्म जेथ नाहीं। तें मी जालों॥ १५६६॥

तुझेनि मज मी पावोनि। कर्तव्य नेलें निपटूनि।
परि आज्ञा तुझी वांचोनि। आन नाहीं प्रभो॥ १५६७॥

कां जें दृश्य दृश्यातें नाशी। जें दुजें द्वैतातें ग्रासी।
जें एक परि सर्वदेशीं। वसवी सदा॥ १५६८॥

जयाचेनि संबंधें बंध फिटे। जयाचिया आशा आस तुटे।
जें भेटलयां सर्व भेटे। आपणपांचि॥ १५६९॥

तें तूं गुरुलिंग जी माझें। जें एकलेपणींचे विरजें।
जयालागीं वोलांडिजे। अद्वैत बोध॥ १५७०॥

आपणचि होऊनि ब्रह्म। सारिजे कृत्याकृत्याचें काम।
मग कीजे कां निःसीम। सेवा जयाची॥ १५७१॥

गंगा सिंधु सेवूं गेली। पावतांचि समुद्र जाली।
तेवीं भक्तां सेल दिधली। निजपदाची॥ ७२॥

तो तूं माझा जी निरुपचारू। श्रीकृष्णा सेव्य सद्गुरू।
मा ब्रह्मतेचा उपकारू। हाचि मानी॥ १५७३॥

जें मज तुम्हां आड। होतें भेदाचें कवाड।
तें फेडोनि केलें गोड। सेवामुख॥ १५७४॥

तरी आतां तुझी आज्ञा। सकळ देवाधिदेव राज्ञा।
करीन देयीं अनुज्ञा। भलतिये विषयीं॥ १५७५॥

यया अर्जुनाचिया बोला। देव नाचे सुखें भुलला।
म्हणे विश्वफळा जाला। फळ हा मज॥ १५७६॥

उणेनि उमचला सुधाकर। देखुनी आपला कुमर।
मर्यादा क्षीरसागर। विसरेचिना॥ १५७७॥

ऐसें संवादाचा बहुलां। लग्न दोघांचियां आंतुलां।
लागलें देखोनि जाला। निर्भय संजय॥ १५७८॥

तेणें म्हणतसे संजयो। बाप कृतानिधी रावो।
तो आपुला मनोभावो। अर्जुनेंसीं केला॥ १५७९॥

तेणें उचंबळलेपणें। संजय धृतराष्ट्रातें म्हणे।
जी कैसें बादरायणें रक्षिलों दोघे॥ १५८०॥

आजि तुमतें अवधारा। नाहीं चर्मचक्षुही संसारा।
कीं ज्ञानदृष्टी व्यवहारा। आणिलेति॥ १५८१॥

आणि रथींचिये राहाटी। घेई जो घोडेयासाठीं।
तया आम्हां या गोष्टी। गोचरा होती॥ १५८२॥

वरी जुंझाचे निर्वाण। मांडलें असे दारुण।
दोहीं हारीं आपण। हारपिजे जैसें॥ १५८३॥

येवढा जिये सांकडां। कैसा अनुग्रहो पैं गाढा।
जे ब्रह्मानंद उघडा। भोगवीतसे॥ १५८४॥

ऐसें संजय बोलिला। परि न द्रवे येरु उगला।
चंद्रकिरणीं शिवतला। पाषाण जैसा। १५८५॥

हे देखोनि तयाची दशा। मग करीचिना सरिसा।
परि सुखें जाला पिसा। बोलतसे॥ १५८६॥

भुलविला हर्षवेगें। म्हणौनि धृतराष्ट्रा सांगे।
येऱ्हवीं नव्हे तयाजोगें। हें कीर जाणे॥ १५८७॥

संजय उवाच।
इत्यहं वासुदेवस्य पार्थस्य च महात्मनः।
संवादं इमं अश्रौषम् अद्भुतं रोमहर्षणम्॥ १८.७४॥

मग म्हणे पैं कुरुराजा। ऐसा भ्रातृपुत्र तो तुझा।
बोलिला तें अधोक्षजा। गोड जालें॥ १५८८॥

अगा पूर्वापर सागर। यया नामासीचि सिनार।
येर आघवें तें नीर। एक जैसें॥ १५८९॥

तैसा श्रीकृष्ण पार्थ ऐसें। हें आंगाचि पासीं दिसे।
मग संवादीं जी नसे। कांहींचि भेद॥ १५९०॥

पैं दर्पणाहूनि चोखें। दोन्ही होती सन्मुखें।
तेथ येरीं येर देखे। आपणपें जैसें॥ १५९१॥

तैसा देवेंसीं पंडुसुत। आपणपें देवीं देखत।
पांडवेंसीं देखे अनंत। आपणपें पार्थी॥ १५९२॥

देवा देवा भक्तालागीं। जिये विवर देखे आंगीं।
येरु तिये चिही भागीं। दोन्ही देखे॥ १५९३॥

आणिक कांहींचि नाहीं। म्हणौनि करिती काई।
दोघे एकपणें पाहीं। नांदताती॥ १५९४॥

आतां भेद जरी मोडे। तरी प्रश्नोत्तर कां घडे।
ना भेदचि तरि जोडे। संवाद सुख कां॥ १५९५॥

ऐसें बोलतां दुजेपणें। संवादीं द्वैत गिळणें।
तें ऐकिलें बोलणें। दोघांचें मियां॥ १५९६॥

उटूनि दोन्ही आरसे। वोडविलिया सरिसे।
कोण कोणा पाहातसे। कल्पावें पां॥ १५९७॥

कां दीपा सन्मुख। ठेविलिया दीपक।
कोण कोणा अर्थिक। कोण जाणे॥ १५९८॥

ना ना अर्कापुढें अर्क। उदयलिया आणिक।
कोण म्हणे प्रकाशक। प्रकाश्य कवण॥ १५९९॥

हें निर्धारूं जातां फुडें। निर्धारासी ठक पडे।
ते दोघे जाले एवढे। संवादें सरिसे॥ १६००॥

जी मिळतां दोन्ही उदकें। माजि लवण वारूं ठाके।
कीं तयासीही निमिखें। तेंचि होय॥ १६०१॥

तैसें श्रीकृष्ण अर्जुन दोन्ही। संवादले तें मनीं।
धरितां मजही वानी। तेचि होतसे॥ १६०२॥

ऐसें म्हणे ना मोटकें। तंव हिरोनी सात्त्विकें।
आठव नेला नेणों कें। संजयपणाचा॥ १६०३॥

रोमांच जंव फरके। तंव तंव आंग सुरके।
स्तंभ स्वेदातें जिंके। एकला कप॥ १६०४॥

अद्वयानंद स्पर्शें। दिठी रसमय जाली असे।
ते अश्रु नव्हती जैसें। द्रवत्वचि॥ १६०५॥

नेणों काय न माय पोटीं। काय नेणों गुंफे कंठीं।
वागर्था पडत मिठी। उससाचिया॥ १६०६॥

किंबहुना सात्त्विकां आठां। चाचर मांडतां उमेठा।
संजय जाहलासे चोहटां। संवाद सुखाचा॥ १६०७॥

तया सुखाची ऐसी जाती। जे आपणचि धरी शांती।
मग पुढती देहस्मृती। लाधली तेणें॥ १६०८॥

व्यासप्रसादाच्छ्रुत्वान् एतद्गुह्यमहं परम्
योगं योगेश्वरात्कृष्णात् साक्षात्कथयतः स्वयम्॥ १८.७५॥

तेव्हां बैसतेनि आनंदें। म्हणे जी जें उपनिषदें।
नेणती तें व्यासप्रसादें। ऐकिलें मियां॥ १६०९॥

ऐकतांचि ते गोठी। ब्रह्मत्वाची पडिली मिठी।
मी तूं पणेंसीं दिठी। विरोनि गेली॥ १६१०॥

हे आघवेचि कां योग। जया ठाया येते मार्ग।
तयाचें वाक्य सवंग। केलें मज व्यासें॥ १६११॥

अहो अर्जुनाचेनि मिषें। आपणपेंचि दुजें ऐसें।
नटोनि आपणया उद्देशें। बोलिले जें देव॥ १६१२॥

तेथ कीं माझे श्रोत्र। पाटाचें जाले जी पात्र।
काय वानूं स्वतंत्र। सामर्थ्य श्रीगुरूचें॥ १६१३॥

राजन्संस्मृत्य संस्मृत्य संवादमिममद्भुतम्।
केशवार्जुनयोः पुण्यं हृष्यामि च मुहुर्मुहुः॥ १८.७६॥

राया हें बोलतां विस्मित होये। तेणेंचि मोडावला ठाये।
रत्नीं कीं रत्नविळा ये। झांकोळित जैसी॥ १६१४॥

हिमवंतींचीं सरोवरें। चंद्रोदयीं होती काश्मीरें।
मग सूर्यागमीं माघारें। द्रवत्व ये॥ १६१५॥

तैसा शरीराचिया स्मृती। तो संवाद संजय चित्तीं।
धरी आणि पुढती। तेचि होय॥ १६१६॥

तच्च संस्मृत्य संस्मृत्य रूपमत्यद्भुतं हरेः।
विस्मयो मे महान् राजन् हृष्यामि च पुनः पुनः॥ १८.७७॥

मग उठोनि म्हणे नृपा। श्रीहरीचिया विश्वरूपा।
देखिलया उगा कां पां। असों लाहसी॥ १६१७॥

न देखणेनि जें दिसे। नाहींपणेंचि जें असे।
विसरें आठवे तें कैसें। चुकवूं आतां॥ १६१८॥

देखोनि चमत्कार। कीजे तो नाहीं पैसार।
मजही सकट महापुर। नेत आहे॥ १६१९॥

ऐसा श्रीकृष्णार्जुन। संवादसंगमीं स्नान।
करूनि देतसे तिळदान। अहंतेचें॥ १६२०॥

तेथ असंवरें आनंदें। अलौकिकही कांहीं स्फुंदें।
श्रीकृष्ण म्हणे सद्गदे। वेळोवेळां॥ १६२१॥

या अवस्थांची कांहीं। कौरवातें परी नाहीं।
म्हणौनि रायें तें कांहीं। कल्पावें जंव॥ १६२२॥

तंव जाला सुखलाभ। आपणपां करूनि स्वयंभ।
बुझाविला अवष्टंभ। संजयें तेणें॥ १६२३॥

तेथ कोणी एकीं अवसरी। होआवी ते करूनि दुरी।
रावो म्हणे संजया परी। कैसी तुझी गा॥ १६२४॥

तेणें तूतें येथें व्यासें। बैसविलें कासया उद्देशें।
अप्रसंगामाजि ऐसें। बोलसी काई॥ १६२५॥

रानींचें राऊळा नेलिया। दाही दिशा मानी सुनिया।
कां रात्री होय पाहलया। निशाचरा॥ १६२६॥

जो जेथिंचें गौरव नेणे। तयासि तें भिंगुळवाणें।
म्हणौनि अप्रसंग तेणें। म्हणावा कीं तो॥ १६२७॥

मग म्हणे सांगें प्रस्तुत। उदयलेंसे जें उत्कळित।
तें कोणासि बा रे जैत। देईल शेखीं॥ १६२८॥

येऱ्हवीं विशेषें बहुतेक। आमुचे ऐसें मानसिक।
जे दुर्योधनाचे अधिक। प्रताप सदा॥ १६२९॥

आणि येरांचेनि पाडें। दळही याचें देव्हडें।
म्हणौनि जैत फुडें। आणील ना तें॥ १६३०॥

आम्हां तंव गमे ऐसें। मा तुझें ज्योतिष कैसें।
तें नेणों संजया असे। तैसें सांग पां॥ १६३१॥

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम॥ १८.७८॥

यया बोला संजयो म्हणे। जी येरयेरांचें मी नेणें।
परि आयुष्य तेथें जिणें। हें फुडें कीं गा॥ १६३२॥

चंद्र तेथें चंद्रिका। शंभु तेथें अंबिका।
संत तेथें विवेका। असणें कीं जी॥ १६३३॥

रावो तेथें कटक। सौजन्य तेथें सोइरिक।
वह्नि तेथें दाहक। सामर्थ्य कीं॥ १६३४॥

दया तेथें धर्म। धर्म तेथें सुखागम।
सुखीं पुरुषोत्तम। असे जैसा॥ १६३५॥

वसंत तेथें वनें। वन तेथें सुमनें।
सुमनीं पालिंगनें। सारंगाची॥ १६३६॥

गुरु तेथें ज्ञान। ज्ञानीं आत्मदर्शन।
दर्शनीं समाधान। आथी जैसें॥ १६३७॥

भाग्य तेथें विलास। सुख तेथें उल्हास।
हें असो तेथ प्रकाश। सूर्य जेथें॥ १६३८॥

तैसे सकळ पुरुषार्थ। जेणें स्वामी कां सनाथ।
तो श्रीकृष्ण रावो जेथ। तेथ लक्ष्मी॥ १६३९॥

आणि आपलेनि कांतेसीं। ते जगदंबा जयापासीं।
अणिमादिकी काय दासी। नव्हती तयातें॥ १६४०॥

कृष्ण विजयस्वरूप निजांगें। तो राहिला असे जेणें भागें।
तैं जय लागवेगें। तेथेंचि आहे॥ १६४१॥

विजयी नामें अर्जुन विख्यात। विजयस्वरूप श्रीकृष्णनाथ।
श्रियेसीं विजय निश्चित। तेथेंचि असे॥ १६४२॥

तयाचिये देशींच्या झाडीं। कल्पतरूतें होडी।
न जिणावें कां एवढीं। मायबापें असतां॥ १६४३॥

ते पाषाणही आघवे। चिंतारत्नें कां नोहावे।
तिये भूमिके कां न यावें। सुवर्णत्व॥ १६४४॥

तया गांवींचिया। नदी अमृतें वाहाविया।
नवल काय राया। विचारीं पां॥ १६४५॥

तयाचे बिसाट शब्द। सुखें म्हणों येती वेद।
सदेह सच्चिदानंद। कां नोहावे ते॥ १६४६॥

पैं स्वर्गापवर्ग दोन्हीं। इये पदें तया अधीनीं।
श्रीकृष्ण बाप जननी। कमळा जया॥ १६४७॥

म्हणौनि जिया बाहीं उभा। तो लक्ष्मियेचा वल्लभा।
तेथ सर्वसिद्धि स्वयंभा। येर मी नेणें॥ १६४८॥

आणि समुद्राचा मेघ। उपयोगें तयाहूनि चांग।
तैसा पार्थी आजि लाग। आहे तये॥ १६४९॥

कनकत्व दीक्षा गुरू। लोहा परीस होय किरू।
परि जगा पोसिता व्यवहारू। तेंचि जाणे॥ १६५०॥

येथ गुरुत्वा येतसे उणें। ऐसें झणें कोण्ही म्हणे।
वह्नि प्रकाश दीपपणें। प्रकाशी आपला॥ १६५१॥

तैसा देवाचिया शक्ती। पार्थ देवासीच बहुती।
परी माने इये स्तुती। गौरव असे॥ १६५२॥

आणि पुत्रें मी सर्व गुणीं। जिणावा हे बापा शिराणी।
तरी ते शार्ङ्गपाणी। फळा आली॥ १६५३॥

किंबहुना ऐसा नृपा। पार्थ जालासे कृष्णकृपा।
तो जयाकडे साक्षेपा। रीती आहे॥ १६५४॥

तोचि गा विजयासि ठावो। येथ तुज कोण संदेहो।
तेथ न ये तरी वावो। विजयोचि होय॥ १६५५॥

म्हणौनि जेथ श्री तेथ श्रीमंत। जेथ तो पंडूचा सुत।
तेथ विजय समस्त। अभ्युदय तेथ॥ १६५६॥

जरी व्यासाचेनि साचे। धिरे मन तुमचें।
तरि या बोलाचें। ध्रुवचि माना॥ १६५७॥

जेथ तो श्रीवल्लभ। तेथ भक्तकदंब।
तेथ सुख आणि लाभ। मंगळाचा॥ १६५८॥

या बोला आन होये। तरी व्यासाचा अंक न वाहे।
ऐसें गाजोनि बाहे। उभिली तेणें॥ १६५९॥

## 18.1 Critical Appriciation of Gita गीतामहात्म्य

एवं भारताचा आवांका। आणूनि श्लोका एका।
संजयें कुरुनायका। दीधला हातीं॥ १६६०॥

जैसा नेणों केवढा वह्नी। परि गुणाग्रीं ठेऊनी।
आणिजे सूर्याची हानी। निस्तरावया॥ १६६१॥

तैसें शब्दब्रह्म अनंत। जालें सवालक्ष भारत।
भारताचें शतें सात। सर्वस्व गीता॥ १६६२॥

तयाही सातां शतांचा। इत्यर्थ हा श्लोकशेषींचा।
व्यासशिष्य संजयाचा। पूर्णोद्गार जो॥ १६६३॥

येणें एकचि श्लोकें। राहे तेणें असकें।
अविद्याजाताचें निकें। जिंतिलें होय॥ १६६४॥

ऐसें श्लोकशतें सात। गीतेची पदें आंगें वाहत।
पदें म्हणो कीं परमामृत। गीताकाशींचें॥ १६६५॥

कीं आत्मराजाचिये सभे। गीते वोडवले हे खांबे।
मज श्लोक प्रतिभे। ऐसे येत॥ १६६६॥

कीं गीता हे सप्तशती। मंत्र प्रतिपाद्य भगवती।
मोहमहिषा मुक्ती। आनंदली असे॥ १६६७॥

म्हणौनि मनें कायें वाचा। जो सेवक होईल इयेचा।
तो स्वानंद सम्राज्याचा। चक्रवर्ती करी॥ १६६८॥

कीं अविद्या तिमिर रोखें। श्लोक सूर्यातें पैजा जिंके।
ऐसे प्रकाशिले गीतामिषें। रायें श्रीकृष्णें॥ १६६९॥

की श्लोकाक्षर द्राक्षलता। मांडव जाली आहे गीता।
संसारपथ श्रांता। विसंबावया॥ १६७०॥

कीं सभाग्यसंतीं भ्रमरीं। सेविले ते श्लोक कल्हारीं।
श्रीकृष्णाख्य सरोवरीं। सासिन्नली हे॥ १६७१॥

कीं श्लोक नव्हती आन। गमे गीतेचें महिमान।
वाखाणिते बंदीजन। उदंड जैसें॥ १६७२॥

कीं श्लोकांचिया आवारा। सात शतें करूनि सुंदरा।
सर्वागम गीतापुरा। वसों आले॥ १६७३॥

कीं निजकांता आत्मया। आवडी गीता मिळावया।
श्लोक नव्हती बाह्या। पसर कां जो॥ १६७४॥

कीं गीताकमळीचें भृंग। कीं हे गीतासागर तरंग।
कीं हरीचे हे तुरंग। गीतारथींचे॥ १६७५॥

कीं श्लोक सर्व तीर्थ संघात। आला श्रीगीतेगंगे आंत।
जे अर्जुन सिंहस्थ। जाला म्हणौनि॥ १६७६॥

कीं नोहे हे श्लोकश्रेणी। अचिंतचित्त चिंतामणी।
कीं निर्विकल्पां लावणी। कल्पतरूंची॥ १६७७॥

ऐसिया शतें सात श्लोका। परि आगळा एकएका।
आतां कोण वेगळिका। वानावा पां॥ १६७८॥

तान्ही आणि पारठी। इया कामधेनूतें दिठी।
सूनि जैसिया गोठी। कीजती ना॥ १६७९॥

दीपा आगिल मागिल। सूर्या धाकुटा वडील।
अमृतसिंधु खोल। उथळ कायसा॥ १६८०॥

तैसें पहिले सरते। श्लोक न म्हणावे गीते।
जुनीं नवीं पारिजातें। आहाती काई॥ १६८१॥

आणि श्लोका पाड नाहीं। हें कीर समर्थू काई।
येथ वाच्य वाचकही। भाग न धरी॥ १६८२॥

जे इये शास्त्रीं एक। श्रीकृष्णचि वाच्य वाचक।
हें प्रसिद्ध जाणे लोक। भलताही॥ १६८३॥

येथें अर्थें तेंचि पाठें। जोडे एवढेनि धटें।
वाच्य वाचक एकवटें। साधितें शास्त्र॥ १६८४॥

म्हणौनि मज कांहीं। समर्थनीं आतां विषय नाहीं।
गीता जाणा हे वाङ्मयी। श्रीमूर्ति प्रभूची॥ १६८५॥

शास्त्र वाच्यें अर्थें फळे। मग आपण मावळे।
तैसें नव्हे हें सगळें। परब्रह्मचि॥ १६८६॥

तैसा विश्वाचिया कृपा। करूनि महानंद सोपा।
अर्जुनव्याजें रूपा। आणिला देवें॥ १६८७॥

चकोराचेनि निमित्तें। तिन्ही भुवनें संतप्तें।
निववीलीं कळावंतें। चंद्रें जेवीं॥ १६८८॥

कां गौतमाचेनि मिषें। कळिकाळ ज्वरितोद्देशें।
पाणिढाळ गिरीशें। गंगेचा केला॥ १६८९॥

तैसें गीतेचें हें दुभतें। वत्स करूनि पार्थातें।
दुभीनली जगापुरतें। श्रीकृष्ण गाय॥ १६९०॥

येथें जीवें जरी नाहाल। तरी हेंच कीर होआल।
ना तरी पाठमिओषें तिंबाल। जीभचि जरी॥ १६९१॥

तरि लोह एकें अंशें। झगटलिया परिसें।
येरीकडे आपसें। सुवर्ण होय॥ १६९२॥

तैसी पाठाची ते वाटी। श्लोकपाद लावाना जंव वोठीं।
तंव ब्रह्मतेची पुष्टी। येईल आंगा॥ १६९३॥

ना येणेंसीं मुख वांकडें। करूनि ठाकाल कानवडें।
तरि कानींही घेतां पडे। तेचि लेख॥ १६९४॥

जे हे श्रवणें पाठें अर्थें। गीता नेदी मोक्षा आरौते।
जैसा समर्थ दाता कोण्हातें। नास्ति न म्हणे॥ १६९५॥

म्हणौनि जाणतया सवा। गीताचि एकी सेवां।
काय कराल आघवां। शास्त्रीं येरीं॥ १६९६॥

आणि कृष्णार्जुनीं मोकळी। गोठी चावळिली जे निराळीं।
ते श्रीव्यासें केली करतळीं। घेवों ये ऐसी॥ १६९७॥

बाळकातें वोरसें। माय जैं जेववूं बैसे।
तैं तया ठाकती तैसे। घांस करी॥ १६९८॥

का अफाटा समीरणा। आपैतेंपण शाहाणा।
केलें जैसें विंजणा। निर्मूनियां॥ १६९९॥

तैसें शब्दें जें न लभे। तें घडूनियां अनुष्टुभे।
स्त्रीशूद्रादि प्रतिभे। सामाविलें॥ १७००॥

स्वातीचेनि पाणियें। न होती जरी मोतियें।
तरी आंगीं सुंदरांचिये। कां शोभती तियें॥ १७०१॥

नाद वाद्या न येता। तरि कां गोचर होता।
फुलें न होतां घेपता। आमोद केवीं॥ १७०२॥

गोडीं न होती पक्वान्नें। तरि कां फावती रसने।
दर्पणावीण नयनें। नयन कां दिसे॥ १७०३॥

द्रष्टा श्रीगुरुमूर्ती। न रिगतां दृश्यपंथीं।
तरि कां ह्या उपास्ती। आकळता तो॥ १७०४॥

तैसें वस्तु जें असंख्यात। तया संख्या शतें सात।
न होती तरि कोणा येथ। फावों शकतें॥ १७०५॥

मेघ सिंधूचें पाणी वाहे। तरी जग तयाचेंचि पाहे।
कां जें उमप तें नोहे। ठाकतें कोण्हा॥ १७०६॥

आणि वाचा जें न पवे। तें हे श्लोक न होते बरवे।
तरि कानें मुखें फावे। ऐसें कां होतें॥ १७०७॥

म्हणोनि श्रीव्यासाचा हा थोर। विश्वासि जाला उपकार।
जे कृष्णउक्ती आकार। ग्रंथाचा केला॥ १७०८॥

आणि तोचि हा मी आतां। श्रीव्यासाचीं पदें पाहतां पाहतां।
आणिला श्रवणपथा। मऱ्हाठिया॥ १७०९॥

व्यासादिकांचे उन्मेख। राहाटती जेथ साशंक।
तेथ मीही रंक एक। वाचाळी करी॥ १७१०॥

परि गीता ईश्वर भोळा। ले व्यासोक्ति कुसुममाळा।
तरि माझिया दुर्वादळा। ना न म्हणे कीं॥ १७११॥

आणि क्षीरसिंधूचिया तटा। पाणिया येती गजघटा।
तेथ काय मुरकुटा। वारिजत असे॥ १७१२॥

पांखकुंटे पाखिरुं। नुडे तरी नभींच स्थिरू।
गगन आक्रमी सत्वरु। तो गरुडही तेथ॥ १७१३॥

राजहंसाचें चालणें। भूतळीं जालिया शाहाणें।
आणिकें काय कोणें। चालावेंचि ना॥ १७१४॥

जी आपुलेनि अवकाशें। अगाध जळ घेपे कलशें।
चुळीं चूळपणा ऐसें। भरूनि न निघे॥ १७१५॥

दिवटीच्या आंगीं थोरी। तरि ते बहु तेज धरी।
वाती आपुलिया परी। आणीच कीं ना॥ १७१६॥

जी समुद्राचेनि पैसें। समुद्रीं आकाश भासे।
थिल्लरीं थिल्लरा ऐसें। बिंबेचि पैं॥ १७१७॥

तेविं व्यासादिक महामती। वावरों येती इये ग्रंथीं।
मा आम्ही ठाकों हे युक्ती। न मिळे कीर॥ १७१८॥

जिये सागरीं जळचरें। संचरती मंदराकारें।
तेथ देखोनि शफरें येरें। पोहों न लाहती॥ १७१९॥

अरुण आंगा जवळिके। म्हणोनि सूर्यातें देखें।
मा भूतळींची न देखे। मुंगी काई॥ १७२०॥

यालागीं आम्हां प्राकृतां। देशिकारें बंधें गीता।
म्हणणें हें अनुचिता कारण नोहे॥ १७२१॥

आणि बाप पुढां जाये। ते घेत पाउलाची सोये।
बाळ ये तरि न लाहे। पावों कायी॥ १७२२॥

तैसा व्यासाचा मागोवा घेत। भाष्यकारांतें वाट पुसत।
अयोग्यही मी न पवत। कें जाईन॥ १७२३॥

आणि पृथ्वी जयाचिया क्षमा। नुबगे स्थावरजंगमा।
जयाचेनि अमृतें चंद्रमा। निववी जग॥ १७२४॥

जयाचें आंगिक असिकें। तेज लाहोनि अर्कें।
आंधाराचें सावाइकें। लोटिजत आहे॥ १७२५॥

समुद्रा जयाचें तोय। तोया जयाचें माधुर्य।
माधुर्या सौंदर्य। जयाचेनि॥ १७२६॥

पवना जयाचें बळ। आकाश जेणें पघळ।
ज्ञान जेणें उज्वळ। चक्रवर्ती॥ १७२७॥

वेद जेणें सुभास। सुख जेणें सोल्लास।
हें असो रूपस। विश्व जेणें॥ १७२८॥

तो सर्वोपकारी समर्थ। सद्गुरु श्रीनिवृत्तिनाथ।
राहाटत असे मजही आंत। रिघोनिया॥ १७२९॥

आतां आयती गीता जगीं। मी सांगें मऱ्हाठिया भागी।
येथ कें विस्मयालागीं। ठाव आहे॥ १७३०॥

श्रीगुरुचेनि नांवें माती। डोंगरीं जयापासीं होती।
तेणें कोळियें त्रिजगती। एकवट केली॥ १७३१॥

चंदनें वेधलीं झाडें। जालीं चंदनाचेनि पाडें।
वसिष्ठें मांडली कीं भांडे। भानूसीं शाटी॥ १७३२॥

मा मी तंव चित्ताथिला। आणि श्रीगुरु ऐसा दादुला।
जो दिठीवेनि आपुला। बैसवी पदीं॥ १७३३॥

आधींचि देखणी दिठी। वरी सूर्य पुरवी पाठी।
तैं न दिसे ऐसी गोठी। केंही आहे॥ १७३४॥

म्हणोनि माझे नित्य नवे। श्वासोच्छ्वासही प्रबंध होआवे।
श्रीगुरुकृपा काय नोहे। ज्ञानदेव म्हणे॥ १७३५॥

याकारणें मियां। श्रीगीतार्थ मऱ्हाठिया।
केला लोकां यया। दिठीचा विषो॥ १७३६॥

परि मऱ्हाठे बोल रंगें। कवळितां पैं गीतांगें।
तैं गातयाचेनि पांगें। एकाद्यता नोहे॥ १७३७॥

म्हणौनि गीता गावों म्हणे। तैं गाणिवे होती लेणें।
ना मोकळे तरि उणें। गीताही आणित॥ १७३८॥

सुंदर आंगीं लेणें न सूये। तैं तो मोकळा शृंगार होये।
ना लेइलें तरि आहे। तैसें कें उचित॥ १७३९॥

कां मोतियांची जैसी जाती। सोनयाही मान देती।
ना तरि मानवती। अंगेंचि सडीं॥ १७४०॥

ना ना गुंफिलीं कां मोकळीं। उणीं न होती परिमळीं।
वसंतागमींचीं वाटोळीं। मोगरीं जैसीं॥ १७४१॥

तैसा गणिवेनें मिरवी। गीतेवीणही रंग दावी।
ती लाभाचा प्रबंध वोवीं। केला मियां॥ १७४२॥

तेणें आबाळ सुबोधें। वोवीचेनि प्रबंधें।
ब्रह्मरस सुस्वादें। अक्षरें गुंथिलीं॥ १७४३॥

आतां चंदनाच्या तरुवरीं। परिमळालागीं फुलवरी।
पारुखणें जियापरी। लागेना कीं॥ १७४४॥

तैसा प्रबंध हा श्रवणीं। लागतखेंवो समाधि आणी।
ऐकिलियाही वाखाणी। काय व्यसन न लवी॥ १७४५॥

पाठ करितां व्याजें। पांडित्यें येती विषजें।
तैं अमृतातें नेणिजे। फावलिया॥ १७४६॥

तैसेनि आइतेपणें। कवित्वा जालें हें उपेणें।
मनन निदिध्यास श्रवणें। जिंतिलें आतां॥ १७४७॥

हे स्वानंद भोगाची सेल। भलतयासीचि देईल।
सर्वेंद्रियां पोषवील। श्रवणाकरवीं॥ १७४८॥

चंद्रातें आंगवणें। भोगूनि चकोर शाहाणे।
परि फावे जैसें चांदिणें। भलतयाही॥ १७४९॥

तैसें अध्यात्मशास्त्रीं यिये। अंतरंगचि अधिकारियें।
परि लोक वाक्चातुर्यें। होईल सुखिया॥ १७५०॥

ऐसें श्रीनिवृत्तिनाथांचें। गौरव आहे जी साचें।
ग्रंथ नोहे हें कृपेचें। वैभव तिये॥ १७५१॥

क्षीरसिंधु परिसरीं। शक्तीच्या कर्णकुहरीं।
नेणों कैं श्रीत्रिपुरारीं। सांगीतले जें॥ १७५२॥

तें क्षीर कल्लोळा आंत। मकरोदरीं गुप्त।
होता तयाचा हात। पैठे जालें॥ १७५३॥

तो मत्स्येंद्र सप्तश्रृंगीं। भग्नावयवा चौरंगीं।
भेटला कीं तो सर्वांगी। संपूर्ण जाला॥ १७५४॥

मग समाधि अव्यत्यया। भोगावी वासना या।
ते मुद्रा श्रीगोरक्षराया दिधली मीनीं॥ १७५५॥

तेणें योगाब्जिनी सरोवर। विषय विध्वंसैकवीर।
तिये पदीं कां सर्वेश्वर। अभिषेकिले॥ १७५६॥

मग तिहीं तें शांभव। अद्वयानंद वैभव।
संपादिलें सप्रभव। श्रीगैणीनाथा॥ १७५७॥

तेणें कळिकळित भूतां। आला देखोनि निरुता।
ते आज्ञा श्रीनिवृत्तिनाथा। दिधली ऐसी॥ १७५८॥

ना आदि गुरु शंकरा। लागोनि शिष्य परंपरा।
बोधाचा हा संसरा। जाला जो आमुतें॥ १७५९॥

तो हा तूं घेऊनि आघवा। कळीं गिळतयां जीवां।
सर्व प्रकारीं धांवा। करीं पां वेगीं॥ १७६०॥

आधींच तंव तो कृपाळु। वरि गुरु आज्ञेचा बोलु।
जाला जैसा वर्षाकाळु। खवळणें मेघां॥ १७६१॥

मग आर्ताचेनि वोरसें। गीतार्थ ग्रंथ नमिसें।
वर्षला शांतरसें। तो हा ग्रंथ॥ १७६२॥

तेथ पुढां मीं बापिया। मांडला आर्ती आपुलिया।
कीं यासाठीं येवढिया। आणिलों यशा॥ १७६३॥

एवं गुरुक्रमें लाधलें। समाधिधन जें आपुलें।
तें ग्रंथें बोधौनि दिधलें। गोसावीं मज॥ १७६४॥

वांचूनि पढे ना वाची। ना सेवाही जाणे स्वामीची।
ऐसिया मज ग्रंथाची। योग्यता कें असे॥ १७६५॥

परि साचचि गुरुनाथें। निमित्त करूनि मातें।
प्रबंधव्याजें जगातें। रक्षिलें जाणा॥ १७६६॥

तऱ्ही पुरोहितगुणें। मी बोलिलों पुरें उणें।
तें तुम्हीं माउलीपणें। उपसाहिजो जी॥ १७६७॥

शब्द कैसा घडिजे। प्रमेयीं कैसें पां चढिजे।
अळंकार म्हणिजे। काय तें नेणें॥ १७६८॥

सायिखडेयाचें बाहुलें। चालवित्या सूत्राचेनि चाले।
तैसा मातें दावीत बोले। स्वामी तो माझा॥ १७६९॥

या लागीं मी गुणदोष। विषीं क्षमावी ना विशेष।
जे मी संजात ग्रंथलों देख। आचार्यें कीं॥ १७७०॥

आणि तुम्हां संताचिये सभे। जें उणिवेसी ठाके उभें।
तें पूर्ण नोहे तैं लोभें। तुम्हांसीचि कोपों॥ १७७१॥

सिवतलियाही परिसें। लोहत्वाचिये अवदसे।
न मुकिजे आयसें। तैं कवणा बोल॥ १७७२॥

वोहळें हेंचि करावें। जे गंगेचें आंग ठाकावें।
मगही गंगा जरी नोहावें। तें तो काय करी॥ १७७३॥

म्हणौनि भाग्ययोगें बहुवे पां हे। तुम्हां संतांचे मी पाये।
पातलों आतां कें लाहें। उणें जगीं १७७४॥

अहो जी माझेनि स्वामी। मज संत जोडूनि तुम्ही।
दिधलेति तेणें सर्वकामीं। परिपूर्ण जालो॥ १७७५॥

पाहा पां मातें तुम्हां सांगडें। माहेर तेणें सुरवाडें।
ग्रंथाचें आळियाडें। सिद्धी गेलें॥ १७७६॥

जी कनकाचें निखळ। वोतूं येईल भूतळ।
चिंतारत्नीं कुळाचळ। निर्मूं येती॥ १७७७॥

सातांही हो सागरांतें। सोपें भरितां अमृतें।
दुवाड नोहे तारांतें। चंद्र करितां॥ १७७८॥

कल्पतरूचें आराम। लावितां नाहीं विषम।
परी गीतार्थाचें वर्म। निवडूं न ये॥ १७७९॥

तो मी एक सर्व मुका। बोलोनि मऱ्हाटिया भाखा।
करीं डोळेवरी लोकां। घेवों ये ऐसें जें॥ १७८०॥

हा ग्रंथसागर एवढा। उतरोनि पैलीकडा।
कीर्तिविजयाचा धेंडा। नाचे जो कां॥ १७८१॥

गीतार्थाचा आवारु। कलशेंसीं महामेरु।
रचूनि माजी श्रीगुरु। लिंग जें पूजीं॥ १७८२॥

गीता निष्कपट माय। चुकोनि तान्हें हिंडे जें वाय।
ते मायपूतां भेटी होय। हा धर्म तुमचा॥ १७८३॥

तुम्हां सज्जनांचें केलें। आकळूनि जी मी बोलें।
ज्ञानदेव म्हणे थेंकुलें। तैसें नोहे॥ १७८४॥

काय बहु बोलों सकळां। मेळविलों जन्मफळा।
ग्रंथसिद्धीचा सोहळा। दाविला जो हा॥ १७८५॥

मियां जैसजैसिया आशा। केला तुमचा भरंवसा।
ते पुरऊनि जी बहुवसा। आणिलों सुखा॥ १७८६॥

मजलागीं ग्रंथाची स्वामी। दुजी सृष्टी जे हे केली तुम्हीं।
ते पाहोनि हांसों आम्ही। विश्वामित्रातेंही॥ १७८७॥

जे असोनि त्रिशंकुदोषें। धातयाही आणावें वोसें।
तें नासतें कीजे कीं ऐसें। निर्मावें नाहीं॥ १७८८॥

शंभू उपमन्यूचेनि मोहें। क्षीरसागरही केला आहे।
येथ तोही उपमे सरी नोहे। जे विषगर्भ कीं॥ १७८९॥

अंधःकार निशाचरा। गिळितां सूर्यें चराचरा।
धांवा केला तरी खरा। ताउनी कीं तो॥ १७९०॥

तातलिया जगाकारणें। चंद्रें वेंचिलें चांदिणें।
तया सदोषा केंविं म्हणें। सारिखें हें॥ १७९१॥

म्हणोनि तुम्हीं मज संतीं। ग्रंथरूप जो हा त्रिजगतीं।
उपयोग केला तो पुढती। निरुपम जी॥ १७९२॥

किंबहुना तुमचें केलें। धर्मकीर्तन हें सिद्धी नेलें।
येथ माझें जी उरलें। पाईकपण॥ १७९३॥

## 18.2 Final Prayers पसायदान

आतां विश्वात्मकें देवें। येणें वाग्यज्ञें तोषावें।
तोषोनि मज द्यावें। पसायदान हें॥ १७९४॥

जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मीं रति वाढो।
भूतां परस्परें जडो। मैत्र जीवाचें॥ १७९५॥

दुरिताचें तिमिर जावो विश्व स्वधर्म सूर्यें पाहो।
जो जें वांच्छील तो तें लाहो। प्राणिजात॥ १७९६॥

वर्षत सकळ मंगळीं। ईश्वरनिष्ठांची मांदियाळी।
अनवरत भूतळीं। भेटो तयां भूतां॥ १७९७॥

चलां कल्पतरूचे आरव। चेतना चिंतामणीचें गांव।
बोलते जे अर्णव। पीयूषाचे॥ १७९८॥

चंद्रमे जे अलांच्छन। मार्तंड जे तापहीन।
ते सर्वांही सदा सज्जन। सोयिरे होतु॥ १७९९॥

किंबहुना सर्व सुखीं। पूर्ण होऊनि तिहीं लोकीं।
भजिजो आदिपुरुखीं। अखंडित॥ १८००॥

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं इये।
दृष्टादृष्ट विजयें। होआवें जी॥ १८०१॥

येथ म्हणे श्रीविश्वेशरावो। हा होईल दान पसावो।
येणें वरें ज्ञानदेवो। सुखिया जाला॥ १८०२॥

ऐसें युगीं परि कळीं। आणि महाराष्ट्र मंडळी।
श्रीगोदावरीच्या कुळी। दक्षिण लिंगीं॥ १८०३॥

त्रिभुवनैकपवित्र। अनादि पंचक्रोशक्षेत्र।
जेथ जगाचें जीवनसूत्र। श्रीमहालया असे॥ १८०४॥

तेथ यदुवंशविलास। जो सकळकळा निवास।
न्यायातें पोषी क्षितीश। श्रीरामचंद्र॥ १८०५॥

तेथ महेशान्वय संभूतें। श्रीनिवृत्तिनाथसुतें।
केलें ज्ञानदेवें गीते। देशीकारलेणें॥ १८०६॥

एवं भारताच्या गांवीं। भीष्मनाम प्रसिद्ध पर्वी।
श्रीकृष्णार्जुनीं बरवी। गोठी जे केली॥ १८०७॥

जें उपनिषदांचें सार। सर्वशास्त्रांचें माहेर।
परमहंसीं सरोवर। सेविजे जें॥ १८०८॥

तिये गीतेचा कलश। संपूर्ण हा अष्टादश।
म्हणे निवृत्तिदास। ज्ञानदेव॥ १८०९॥

पुढती पुढती पुढती। इया ग्रंथपुण्यसंपत्ती।
सर्वसुखीं सर्वभूतीं। संपूर्ण होईजे॥ १८१०॥

शके बाराशतें बारोत्तरें। तैं टीका केली ज्ञानेश्वरें।
सच्चिदानंदबाबा आदरें। लेखकु जाहाला॥ १८११॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां
योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
मोक्षसंन्यासयोगो नाम अष्टादशोऽध्यायः॥ १८॥

इति श्रीज्ञानदेवविरचितायां भावार्थदीपिकायां
अष्टादशोऽध्यायः॥ १८॥

श्लोक ७८ ओव्या १८११